# वैद्य दप्तरांतून निवडलेले कागद.

(ऐतिहासिक महत्त्वाची पत्रें)

भारत–इतिहास–संशोधन मंडळ पुणें, पुरस्कृत ग्रंथमाला क्र. ५२

## खंड ५

## १७५० ते १७५५ अखेर

संपादक–

शंकर लक्ष्मण वैद्य

२७६, बुधवार पेठ, राममंदीर पुणें.

शके १८७३

☆

किंमत १० रुपये

# वैद्य दप्तरांतून निवडलेले कागद.

(ऐतिहासिक महत्त्वाचीं पत्रें)

## Historical Papers

From

# Vaidya Daftar

भारत–इतिहास–संशोधन मंडळ पुणें, पुरस्कृत ग्रंथमाला क्र. ५२

## खंड ५

## १७५० ते १७५५ अखेर

संपादक–

शंकर लक्ष्मण वैद्य

३७६, बुधवार पेठ, राममंदीर पुणें.

★

शके १८७३

★

किंमत १० रुपये

प्रकाशक :

*विनायक शंकर वैद्य,*

३८० शनवार पेठ, पुणें.

मुद्रक :

*श्री. र. राजगुरु,*

राजगुरू प्रिंटिंग प्रेस,

४०५ नारायण पेठ, पुणें २

# अर्पण पत्रिका

वैद्य लावगन तालुका व जिल्हा रत्नागिरी या गांवच्या, वाई येथें शाहू महाराजांच्या कारकीर्दीत आलेल्या, वैद्य कुलांतील ज्या ज्या व्यक्तींनीं आपलें आयुष्य, शिवाजी महाराजांचे स्वराज्य स्थापनेचें ध्येय पार पाडण्यांत, तत्कालीन राज्यकर्त्यांस व पराक्रमी पुरुषांस संपत्तीचा व योग्य सल्लामसलतीचा सुमारे १५० वर्षें पुरवठा केला, त्यांतील भास्करभट, बाळंभट, विश्वनाथभट, बाबूराव, कृष्णराव तात्या, रघुनाथराव व नारायणराव यांस हें पुस्तक सादर अर्पण करीत आहे.

माघ वद्य ९ शके १८७३

—ग्रंथकर्ता

# अनुक्रमणिका

**विषयाचे नांव**

१ अर्पण पत्रिका

२ अनुक्रमणिका

३ पुरस्कार

४ लावगन गांवचा नकाशा

५ दिवाकर पुरुषोत्तम चोरघडे मृत्यूतिथी

६ मॉडर्न रिव्हयूच्या जुलै १९५१ च्या अंकांतील
'A Noble Historic family' या लेखाचा

७ प्रस्तावना

८ ऐतिहासिक पत्रे शक १६७१ ते १६७७

९ सूची

(अ) व्यक्तिसूची

(ब) स्थलसूची

# पुरस्कार

दोन वर्षांपूर्वी वैद्य दप्तराचा ४ था खंड प्रसिद्ध झाला त्यावेळीं जी परिस्थिति होती तीच या खंडाच्या वेळीहि आहे खंडाचे संपादक-संशोधक श्री. शंकरराव वैद्य हे रुग्णशय्येवरच असून त्या स्थानावरूनच हें अत्यंत किचकट संपादकीय काम उरकत आहेत. आपल्या घराण्याचें सर्व दप्तर आपल्या हयातींत व आपल्या हातूनच प्रसिद्ध व्हावें ही सद्वासना तर त्यांचें आयुष्य वाढवीत नसेलना? असें त्यांच्याकडे पाहणारांना साहजिक वाटतें. एक डोळा पैलतीराकडे तर दुसरा कागदांवर खिळलेला; देहाचा बिलकूल भरवंसा वाटत नसतांहि एखाद्या चिरंजीवाप्रमाणें अविचल व शांत मनःस्थितींत दादा वैद्य औषधें आणि पथ्यें यांच्या परिवारांत आंथरुणावर बसून लिहितात व वाचतात ! सद्यःफलदायी व अर्थोत्पादक नसणाऱ्या व उलट यातना देणाऱ्या कामाचा हा उरक व त्याबाबत नितांत निष्ठा ही त्यांच्या पिढींतच सापडणार ! श्री. वैद्य यांनीं आपल्या आयुष्यांतील घडामोडींचीं जीं टांचणें करून ठेवलीं आहेत तीं एका अनुकरणीय आत्मचरित्राचा विषयच असून त्यावरून त्यांच्या पितृभक्त चिरंजीवांनीं चरित्र ग्रंथ काढल्यास तो कुटुंब चालविणाऱ्या तरुणांना उद्बोधक होईल यांत शंका नाहीं.

मागच्या खंडातल्या प्रमाणेंच श्री. वैद्यांनीं ज्या प्रस्तावनेंत आपल्या सूचना व शंका मांडल्या आहेत त्यावरून त्यांच्या अभ्यासाची चिकाटी दिसून येतेच; पण त्यांकडे इतर संशोधक दुर्लक्ष करतात. हा दोषहि उघड होतो. सरकार किंवा इतर प्रकाशन संस्था यांचें साहाय्य खटपट करूनहि मिळत नाहीं. तथापि शंकररावांचें ज्येष्ठ चिरंजीव श्री. बाबूराव यांनीं मागच्या खंडापासून वडिलांच्या हयातींत, त्यांनीं निवडून-नकलून तयार ठेवलेले कागद, लवकर प्रसिद्ध करण्याची कसोशी केली यांत शंका नाहीं. पितृऋणाबरोबरच ते समाजऋणहि फेडीत आहेत, हें त्यांस भूषणावह आहे.

प्रस्तुत खंडात शक १६७१ ते शक १६७७ (इ. १७४९-५० ते १७५५-५६) या सात वर्षांतील निवडक कागद क्रमवार दिले आहेत. सनदा-आज्ञापत्रें-रोखे-करार इ; हिशेब-याद्या; लढाया; व राजकीय, खाजगी व महत्वाचीं, अधिकारपरत्वें, पत्रें अशा तऱ्हेनें वर्गीकरण करून त्या त्या शकांतील पत्रें छापलीं आहेत. प्रत्येक पत्राखालीं इंग्रजी सारांश दिल्या कारणानें थोडक्यांत पत्राचा मुद्दा समजून घेऊं इच्छिणारास व मराठी येत नसणारांस चांगली सोय झाली आहे. शिवाय, आरंभीं प्रस्तावनेत प्रत्येक शकांत आलेल्या पत्रांबद्दल माहिती व सविस्तर

क्रमवार मराठी सारांश दिला आहे, तो नुसता वाचला तरी प्रस्तुत खंडांतल्या विषयांची व महत्त्वाच्या गोष्टींची चांगली कल्पना येईल.

वैद्य घराणें हें जुनें प्रतिष्ठित सावकारी घराणें असल्यानें त्यांच्या सावकारी व्यवहाराचे असंख्य कागद या दप्तरांत सांपडणें स्वाभाविक आहे. त्यांतून काहीं महत्त्वाचे जे निवडून या खंडांत दिले आहेत त्यावरूनहि अक्षरशः हजारों लहान थोर व्यक्तींशीं या घराण्याचा कसा संबंध आला हें दिसून येणार आहे. व्यक्तिसूची व स्थलसूची विस्तारपूर्वक तयार केली असून ती चांगली उपयुक्त ठरेल. ओरिसाचे सुभेदार शिवभट साठे यांच्या विषयीं जास्त माहिती मिळवून यांत दिली आहे. एका टीपेंत ओरिसा प्रांताचे त्या काळाचे सुभेदार व शिवभट साठे यांचा सविस्तर इतिहास दिला आहे (शक १६७७- पृ. ३३–३६). सुभेदार शिवभट साठे यांचें स्फूर्तिदायक चरित्र आपल्याकडील विद्यार्थ्यांस अद्यापि परिचित करून दिलेलें नाहीं. शालेय इतिहास लिहिणारांनीं या पराक्रमी महाराष्ट्रीय मुत्सद्याची ओळख करून घेऊन ती पुढें पोचती करणें त्यांचें कर्तव्य आहे. सचिवांकडून पेशव्यांनीं सिंहगड घेणें, तुळाजी-आंगरे याच्याशीं लढाई देणें, कोंकणांतील किल्ले हस्तगत करणें, सदाशिवराव भाऊ कोल्हापूर सरकारचा कारभारी होणें, निजाम आणि ताराबाई यांचें पेशव्यांशीं अंतस्थ वैर असणें यांसारख्या राजकीय महत्त्वाच्या गोष्टींवर प्रस्तुत खंडांतील पत्रांनीं जास्त प्रकाश पाडलेला दिसेल. देवास कौल मागणें, मोठ्या रकमा ठिकठिकाणीं घरांत पुरून ठेवणें, बंगालचें रेशमी कापड आणविणें, प्रवासांत देव बरोबर घेणें, श्राद्धपक्ष करणें, वगैरे कित्येक सामाजिक व धार्मिक व्यवहार पाळणें, तसेंच हुंड्या देण्या घेण्याचे विविध प्रकार आणि व्याजाचे दर यांची विवेचक माहिती यांत मिळते. घर, देऊळ वगैरेंच्या स्थापत्यकामीं आपणाला नवे नवे शब्द भेटतात. कोकणांतील रीळ येथील देवळाच्या जीर्णोद्धाराविषयीं जें पत्र आहे (पत्रांक ३० शक १६७७) त्यांत "मुखसाळ जुनी नाहीं" असें म्हटले आहे. मुखशाळा म्हणजे स्वयंपाक घर, याचा उल्लेख 'आडिवऱ्याची महाकाळी' वर्णनांत येतो. कुडाळ प्रांतांत देवळांत स्त्रियांना बसण्यासाठीं जी विशिष्ट जागा असते तिला मुखशाळा म्हणतात. 'जीवरखी' शब्द वरील पत्रांत येतो. त्याचा अर्थ नक्षीचा देव्हारा असा आहे. जुनी स्थापत्य-विद्या इंजिनियर मंडळींनीं अवश्य अभ्यासिली पाहिजे. असो.

श्री. शंकरराव वैद्य यांनी प्रस्तावनेचा समारोप करतांना, "माझें आयुष्य व हातीं घेतलेलें आमच्या घरच्या दप्तरांतील ऐतिहासिक कागदांच्या छपाईचें काम माझ्या मतें आतां माझेकडून शेवटचें, असें म्हणण्यास हरकत नाहीं,' असें जे उद्गार काढलेले आहेत ते खोटे पडावेत अशीच आमच्या प्रमाणें सर्व इतिहास व्यासंगी मंडळींची इच्छा असणार. आणखी- पुढील शंभर वर्षांतील निवडक कागद

प्रसिद्ध झाल्यानंतरच्या अवभृत स्नानापर्यंत श्री. शंकररावदादांची आयुर्मर्यादा वाढावी व हे त्यांनीं संपादून ठेवलेले कागद प्रसिद्ध करण्याची संपन्नता त्यांच्या चिरंजिवास लाभावी असें परमेश्वराजवळ मागणें आहे.


मंडळांत जसें कार्य चालतें तसेंच बाहेरहि मंडळाचे संशोधक सभासद करीत असतात. याचें नवें प्रत्यंतर म्हणजे वैद्य दप्तराचे हे खंड होत. मंडळाला त्याच्या अल्प सामर्थ्यामुळे अशा सभासदांना कांहीं अर्थसाहाय्य देतां आले नाहीं, तरी मंडळ इतर रीतीनें शक्य तितका पाठिंबा देत असतें. मंडळाची पुरस्कृत ग्रंथमाला वाढती आहे हें त्याला भूषणास्पद वाटतें. तेव्हां प्रस्तुत खंडाच्या प्रकाशनानें मंडळाला मोठा आनंद वाटत आहे यांत शंकाच नाहीं. असें अधिकाधिक पुरस्कार लिहिण्याचे सुयोग यावेत असें मनापासून चिंतून लेखणी खालीं ठेवतों.

ता. क.—मुंबई सरकारनें ३७५ रु. ची पुस्तकें घेतल्याचें कळतें. स्तुत्य आहे.

माघ कृष्ण १ शके १८७३

चिंतामण गणेश कर्वे
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणे.

## मौजे वैद्य लावगनचा नकाशा



# दिवाकर पुरुषोत्तम चोरघोडे यांची मृत्युतिथी

( भारत इ. सं. मंडळाचे २६ वे संमेलनात वाचलेला निबंध शके १८६१ )

या पुरूषाच्या मृत्युतिथीसंबंधी माहिती सांगण्यापूर्वी या पुरूषाची थोडी हकीगत सांगणें जरूर आहे. दिवाकरपंत उर्फ देवाजी यांचें नांव 'सख्या–देवा विठुला ' या शब्दसमूहांत आहे. पेशवाईंत सखाराम बापू बोकील, दिवाकरपंत चोरघोडे व विठ्ठल सुंदर परशरामी हे प्रसिद्ध तीन शहाणे होते. विठ्ठल सुंदर (निजामाचे कारभारी) राक्षसभुवनच्या लढाईंत सन १७७३ सालीं वारले. दुसरे दोघे सन १७८१ मध्यें वारले. नाना फडणीस हे अर्धे शहाणे समजले जात. राज्यकारभारांत नानासाहेब फडणिसास या दोघा शहाण्यांचा इंग्रजाविरुद्ध सल्लामसलत करण्याच्या कामीं उपयोग झाला. पण सखाराम बापूस त्याच्या उलाढाली वृत्तीमुळें २७–२–७९ रोजीं कैद करावे लागले आणि दिवाकरपंतास भोसल्याकडून इंग्रजाविरूद्ध मदत घेण्याच्या बुद्धीने चुचकारून वागवावे लागले.

दिवाकरपंत हा ऋग्वेदी देशस्थ ब्राम्हण नागपूर प्रांतांत नरखेड येथील राहाणारा होता. त्रिंबकजी राजे ( बावीवर भोसले ) यांचेजवळ बाबूराव कोन्हेरराम उमरेडकर म्हणून कारकून होता. त्यांचा देवाजीपंत शागीर्द होता. बखरींत अशी हकीगत दिली आहे कीं, पहिला रघुजी वारल्यानंतर जानोजी भोसल्यास सेनासाहेबसुभ्याचीं वस्त्रें आणण्यासाठीं त्रिंबकजी राजे व बाबूराव वैद्य पुण्यास गेले होते त्यांचेबरोबर दिवाकरपंत ही गेला होता. नानासाहेब पेशवे यांजपाशीं नजराणा ठरविण्यासंबंधीं बोलणें झालें तें देवाजीपंतानें ऐकलें होतें. त्रिंबकजी राजे व बाबूराव उठून गेल्यावर देवाजीपंत हा पेशव्याच्या वाड्यांतच राहिला. त्यानें नानासाहेबांची गाठ घेऊन १॥ लाख रुपायाऐवजीं २॥ लाख भोसल्याकडून देववितो असें सांगितले व तेथून नागपुरास आल्यावर जानोजीकडून त्रिंबकजी राजे ७ लाख सांगत होते त्याऐवजीं २॥ लाखावर मी नजराण्याची रक्कम ठरवितो असे देवाजीनीं जानोजीस सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें पुण्यास जाऊन तितकी रक्कम पेशव्यास देण्याचें ठरविलें. यांत पेशव्याचा व जानोजीचा फायदा झाल्यामुळें दोघेही देवाजीपंतावर खुष झाले. ही आख्यायिका आहे म्हणतात ही गोष्ट सन १७५५ चे सुमारास घडली.

जानोजी व मुधोजी यांचे वाकडे होते. त्यांचा सलोखा सन १७६० मध्यें झाल्यावर दिवाकरपंतास भोसले बंधू कैद करणार होते; पण पेशव्यास ही बातमी कळल्यानंतर त्यांनीं भोसले बंधूस तसें न करण्याबद्दल लिहिलें, यामुळें त्याची कैद टळली. देवाजीपंत हा जानोजीचा प्रथमतः सल्लागार होता. माधवराव पेशवे यांचे व जानोजीचे वाकडे आले असतांना देवाजीपंतानें राघोबामार्फत पेशव्याशीं १७६६ साली सलोख्याचा तह केला.

माधवराव व राघोबा यांचा तंटा होऊं लागला, तेव्हां जी मंडळी राघोबाचे बाजूस होती त्यांपैकीं जानोजी भोसले एक होते. माधवरावानें राघोबास १७६९ सालीं कैद केल्यावर त्याचे साथीदारांचा समाचार घेण्यास त्यांनीं सुरुवात केली. जानोजीच्या कुचराई स्वभावाची माधवरावास पूर्ण जाणीव होती व त्यास देवजीपंत सल्लागार आहे असें समजल्यामुळें त्यास पुण्यास बोलावून आणून कैद केले. आपले बरोबर लष्करांत त्यास ठेविले. पण देवाजीपंत कैदेतून ही जानोजीस त्याच्या हिताच्या गोष्टी कळवीत असे. चंद्रपूरचा पेशव्यांचा वेढा उठविण्यासाठीं देवाजीपंताच्या सांगण्यावरूनच त्यास महिपतरावाकडून 'भोसले पुणे शहर लुटणार' असें पत्र पेशव्यांच्या लष्करांत पाठविले हें कळतांच पेशवे वेढा उडवून पुण्याकडे जाण्यास निघाले. पुढें जानोजीच्या मागे पेशवे लागल्यामुळे १६६९ च्या मार्च महिन्यांत वाशीम येथें देवाजीपंतानें दोघांचा तह घडवून आणला व भोसल्यास पेशव्याकडून मोहिमेचा खर्चही देवविला. पुढें दिवाकरपंताचे व जानोजीचे विनसले, ते इतके कीं शेवटीं त्यास त्यानें कैद केलें, त्याचें घर लुटले देवाजीची किंमत त्यानें ओळखली नाहीं जानोजी मेल्यावर १७७३ मध्यें रघूजीस सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें मिळालीं नंतर मुधोजीनें देवाजीपंतास कैदेतून काढून आपला दिवाण केले. हाच पुढे मरेपर्यंत रघुजी व मूधोजी यांचा सल्लागार होता.

इंग्रजाशीं भोसल्यांचा पत्रव्यवहार दिवाकरपंताच्या सल्ल्याशिवाय कधीच झाला नाहीं. नानासाहेब फडणीस यांना भोसल्याच्या स्वभावाबद्दल पूर्ण जाणीव होती. तथापि दिवाकरपंताच्या शहाणपणाबद्दल त्यास आदर होता. जर कांहीं भोसल्याकडून घडवून आणावयाचें तर दिवाकरपंतच ते घडवून आणील असें त्यास वाटत होतें. इंग्रजा विरुद्ध चौकडीची जूट घडून आणण्यासाठीं नानानी आटोकाट प्रयत्न केले. बाबूराव वैद्य यांस मुद्दाम भोसल्याकडे पाठवून 'इंग्रज परकी आपल्या राज्यांत घुसूं देतां हा मूर्खपणा आहे, हें दिवाकरपंताच्या नजरेस आणलें. याकामांत वाबूरावांची व दिवाकरपंतांची बोलाचाली होऊन वाकडें आले व बाबूराव रागावून लागलींच पुण्यास आले. नाना फडणीस रागावले आहेत, कांहीं शकटभेद चालू आहे हें समजतांच दिवाकरपंतांनीं १७७९ चे सप्टेंबरांत पुण्यास येऊन पेशव्याशीं तह केला. तेव्हां त्यांनीं बंगाल्यांत सैन्य पाठवून इंग्रजावर हल्ला करण्याचे कबूल केले. पण बाबूराव वकील नकोत दुसरे नेमा अशी विनंती केली. त्यावरून सदाशिवराव गुणे यांस १७७९ चे अखेरीस वकील नेमण्यांत आले.

दिवाकरपंत पुण्याहून नागपुरास आल्यावर ठरल्याप्रमाणें सेनाबहादूर खंडोजी उर्फ चिमणाबापू भोसले याचे बरोबर भवानी काळू बक्षी यास देऊन बंगाल्यांत सैन्य रवाना झाले, पण चिमणाबापूस मुधोजीनें अगोदरच सांगून ठेवले होते कीं इंग्रजांशीं लढण्याचा प्रसंग आणू नये. यामुळें १७८० च्या आरंभींच बंगाल्यांत सैन्य पोचावयाचे ते मे महिन्यांत कटक येथेंच गेले व पावसाळ्यामुळें तेथेंच मुक्काम केला. बहार प्रांतातून सैन्य जवळच्या मार्गानें न्यावयाचे ते मुद्दाम ओरिसांतून नेले.

हेस्टिंगनें कटक प्रांताचा सुभेदार राजाराम मुकुंद याचे मार्फत भोसल्यास २५ लाख रु. लाच देऊन परत घालविण्याचे कारस्थान चालविले त्यास यश येऊन चिमणाबापू आपले सैन्य घेऊन नागपुरास जुलै २८ सन १७८१ रोजीं पोचला. सैन्य परत फिरल्याच्या बातम्या नागपुरास आल्या होत्या त्या दिवाकर पंतास कळल्या होत्या पण लाच किती व कां घेतली व काय अटीवर घेतली हे त्यास कळलें नव्हते. चिमणाबापू परत आल्यावर सविस्तर हकीगत कळली. तोपर्यंत सैन्य परत फिरले ही बातमी पेशव्यास कळल्यावर ते आपल्यावर नाखुश होतील या काळजीत दिवाकरपंत होते. या वेळीं दिवाकरपंत आजारी होते. ते सारखे म्हणत कीं, झाली ही गोष्ट फार वाईट झाली मला थोडे बरें वाटतांच पुण्यास नानांचेकडे जाऊन त्यांची समजूत घालीन. पण आजार विकोपास गेल्यामुळे दिवाकरपंत वारले व सर्व तसेच राहून गेलें. मुधोजीस झाल्या गोष्टी बद्दल कितपत वाईट वाटले असेल याचो शकाच आहे.

दिवाकरपंतावर इंग्रजांचाही फार विश्वास होता. कारण त्यांनीं सन १७८० पासूनच यांचे मार्फत पेशव्यांशीं कोणत्या धरतीवर तह करावा, याचा मसुदा भोसल्याकडे पाठविला होता. त्याचें उत्तर भोसल्यांनीं लवकर दिलें नाहीं. तथापि चिमणाबापूस लाच देऊन परत पाठविल्यावर महादजी शिंदे यांजपाशीं तहाबद्दल बोलणें करण्याकरितां हेस्टिंगनें दिवाकरपंतास बनारस येथें जुलै ( १७८१ ) महिन्यांत बोलावले होते व तोही बनारस येथें जाऊन बसला होता. दिवाकरपंतानें त्यास स्पष्ट लिहलें होतें की, पेशव्यांची पुण्यास गाठ घेऊन आल्या–शिवाय मला बनारस येथें तुमचेकडे तहासाठीं येतां यावयाचें नाहीं. दिवाकरपंत आजारी आहेत हें कळतांच हेस्टिंगनें लखनौहून औषध देण्यासाठी एक वैद्य मुद्दाम नागपुरास पाठविला होता.

दिवाकरपंत कोणत्या तिथीस वारला हें काळे यांच्या नागपूरच्या इतिहासांत किंवा रा. ब. सरदेसाई यांच्या रियासतींत दिलेलें नाहीं. मोघम आगष्ट १७८१ मध्यें वारला असावा असें दिलें आहे. पेशव्यांचा वकील सदाशिवराव गुणे हा यावेळीं नागपुराहून नानासाहेबास सविस्तर बातमीपत्रे लिहित असे. या वकिलाची सुमारे २०० पत्रें साताराच्या पारसनीस संग्रहालयांत मला वाचण्यास मिळाली. त्यापैकी ज्या पत्रांत दिवाकरपंताच्या मृत्यूची बातमी लिहिली आहे, त्याचा मी तर्जुमा करून आणला आहे. तो मी वाचून दाखवितों. दिवाकरपंत आषाढ व. ९ शके १७०३ ( १५।७।१७८१ ) रोजीं वारले. असें त्यावरून निघते.

दिवाकरपंताचें अक्षर फार वाईट होते. त्याचा एक नमुना म्हणून हें पत्र आणलें आहे. हें पत्र भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक वर्ष २० अंक १ मध्यें पान १४३ वर छापले आहे. अक्षरावरून मनुष्याच्या बुद्धिची कल्पना होत नसते. रा. ब. ग. व्यं. जोशी व रा. ब. माधवरावजो रानडे यांची अक्षरे मागें एकदा दाखविलीं होतीं.

# A Noble-Historic Family

Our readers know that no other province is so rich in historical materials as Maharashtra and nowhere else have Government and people done so well in publishing them. The Bombay Government has completed printing all the historical papers of the Peshwas in the Marathi language (in 45 volumes) and the despatches of the British Residents at the Maratha Courts in English (15 volumes), besides the selections from the records in Bombay edited by professor Forrest. But the Maratha nation has been earlier and even more active in this field, as the readers of the articles on Rajwade and Parasnis in our Review in 1926-27 know. Every old historic family – and the land of Shivaji and Baji Rao had countless such sons – makes it a point of honour to print the records of its ancestors.

The latest series of family records to reach us is the papers selected from the Vaidya family archives, in four volumes and a Supplement, ranging from 1641 to 1749, These Brahmans were not medicinemen (vaidyas) but bankers and advisers to Chhatrapati Sahu, the Peshwas, the Rajahs of Nagpur, Bhor, Aundh, Miraj, etc., and Nana Fadnis. Hence they not only give precise information on the old indigenous banking of South India, but also throw unexpected light of a purely political character. For example, Chanda Sahib's captive life and end was described solely from these Vaidya papers in our December 1943 number, correcting the prevalent errors. Some other papers throw new light on the Maratha raids in Bengal starting from Nagpur. In the latest volume, Bengal is specially interested in the report of a Vaidya agent who visited Murshidabad and Siraj-ud-daula's court two months before the battle of Plassey.

We congratulate Sri. Shankar Lakshman Vaidya, the aged head of this noble family on his having lived to complete a duty to his ancestors which will also earn for him the thanks of our history research students. Nor have these Vaidys failed to assist in making modern Maratha history, their heir shared in Yerawada Jail the political imprisonment of Sri. B. G. Kher, the present Chief Minister of Bombay.

—**MODREN REVIEW.**

**July 1951.**

# प्रस्तावना

## खंड ५

खंड ४ च्या प्रस्तावनेंत पुस्तकांत दिलेल्या कागदांचा खुलासा मुख्यत्वें करून मी देत असतों व तो देण्यास सुरवात करण्यापूर्वी माझ्या निरसन झालेल्या व न झालेल्या शंकांचें त्रोटक निवेदन करतों असें दिलें आहे. त्याप्रमाणेंच या प्रस्तावनेंत ती माहिती प्रथमतः देण्याचें योजिलें आहे. प्रकृति उत्तरोत्तर खालावत चालल्यामुळें हें प्रस्तावना लिहिण्याचें काम माझ्या हातून होतें किंवा नाहीं ही शंकाच होती. तथापि 'प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति' ह्या न्यायानें ती लिहिण्यास सुरवात केली. मीं दप्तरांतील कागद कसे निवडले हें वेळोवेळीं सांगितलें आहे. व कागद छापतांना संशोधकांस सहज त्यांचा उपयोग करतां यावा याबद्दल कांहीं सूचनाही केल्या व त्या अमलांतही आणल्या. त्या सूचना मला मात्र अशक्ततेमुळें तंतोतंत अमलांत आणतां आल्या नाहींत याबद्दल वाईट वाटतें.

२. खंड ४ मध्यें इसवी सन १७४२ ते १७५० पर्यंतचीं पत्रें सनवार छापण्यांत आलीं; पण आतां लोकसत्ताक राज्य सुरू झाल्यामुळें शकवार शुक्लसंवत्सरापासून युवा संवत्सर-अखेर मितिवार ७ वर्षांचे कागद छापले आहेत. ही वाचकांची थोडी गैरसोय प्रथमत. होणार आहे, हें मी जाणून आहें. एका इसवी सनांत दोन शकांचे कागद घ्यावे लागतात, आतां एका संवत्सरांत २ इसवी सनांचे कागद येतील. संवय मोडणें कठिण असतें. या खंडांत पहिलें संवत्सर शुक्ल असून त्यांत फक्त ६ पत्रें आहेत. कारण खंड ४ मध्यें, १, ह्या अपूर्ण संवत्सरांचे पौषशुद्ध १,२९ डिसेंबर १७४९ पर्यंतचे कागद छापले गेल्यानें, यांत फक्त ३ महिन्यांचे कागद फाल्गुनअखेर छापावे लागत आहेत. पुढील बाकीच्या ६ पूर्ण संवत्सरांचे कागद 'युवा' अखेर छापले आहेत. प्रत्येक संवत्साराच्या कागदांच्या पानांचे क्रमांक निरनिराळे देण्यांत आले आहेत; पण प्रथमपासून क्रमानें पानांचे आंकडे शेवट-पर्यंत दिले असते, तर सोईचें झालें असतें. तें न केल्यानें छपाईत गौणत्व राहिलें आहे.

३. कागदांची निवड करून ते छापण्याचा प्रसंग कां आला हें खंड ४ च्या प्रस्तावनेंत दिलें आहे. छपाईच्या वाढत्या खर्चामुळें व चि. **बाबुरावां**कडे आतां डेक्कन पेपर मिल न राहिल्यामुळें, झालेली आर्थिक ओढ ही कागद वगळण्याचीं मुख्य कारणें आहेत. **कै. दत्तोपंत आपटे** यांच्या आरंभींच्या सूचनेप्रमाणें ज्या कागदांस तारीख देतां आली व ज्या कागदांतील लेख्य व लेखक समजले व तसेंच **रा. ब. सरदेसाई** यांनीं इ. स. १७४३ सालीं महत्त्वाचे कागद निवडून काढले असे सर्व निवडलेले कागद सालवार क्रमानें लावून प्रथमतः त्यांचे गठे बांधून ठेविले होते. पण निवडीचा प्रश्न उपस्थित झाल्यामुळें **रा. यशवंतराव फडके** यांनीं निवडीचें काम केल्यामुळें छापण्यास एवढेच

महत्त्वाचे कागद काढले आहेत. वगळलेल्या कागदांत देखील महत्त्वाचे कागद नाहींत असें म्हणतां येत नाहीं. त्यांचाही उपयोग होणार आहे.

४. चि. **बाबुराव** यांचा इतिहास हा विषय जरी परीक्षेंत ऐच्छिक नव्हता तरी कुलाभिमान व देशाभिमान यांचें वारें अंगांत खेळत असल्यामुळें व माझे या कामांत होत असलेले श्रम पाहत असतां त्यांनीं प्रतिकूल परिस्थितींतही हे इतिहासास उपयुक्त असणारे कागद छापण्यास सुरुवात केली. छापखान्याचा धंदा बरेच वर्षें करीत असल्यामुळें त्यांनीं खंड ४ लवकर छापून निघावा म्हणून निरनिराळ्या छापखान्यांची योजना केली होती. पण ती मनाजोगी यशस्वी न झाल्यामुळें आतां हा खंड एका **राजगुरु** छापखान्यांतच छापून घेतला आहे. कामही सुबक होऊन लवकर झालें, असें मला म्हणावें लागत आहे. आमच्या दफ्तरांतील निवडून व नकलून तयार केलेले कागद माझ्या हयातींत लवकर छापले जावे म्हणून **सरकाराचें** किंवा **संस्थांचें** सहाय्य व्हावें म्हणून **चिरंजिवांनीं** पुष्कळ खटपट केली व करीत आहेत; पण त्यांत अजून यश आलें असें म्हणतां येत नाहीं.

५. **वैद्यांच्या** पूर्वजांनीं देवघेवींत जरी पुष्कळ संपत्ति मिळविली होती, तरी ती राष्ट्रकार्याकडे खर्चून शिवाय धार्मिक कृत्याकडे व गृहप्रपंचाकडेही लाविली होती. **कोंकणांत** व देशावर त्यांनीं **देवालयें** बांधिलीं व तीं निरंतर चालावीं अशी योजनाही करून ठेविली आहे. ह्या संबंधाचे कागद व जमाखर्च छापण्यास अडचण पडूं नये म्हणून ते निराळे काढून तारीखवार लावून ठेविले आहेत. प्रापंचिक हिशोबाचेही कागद निराळे काढले आहेत. यामुळें या खंडांत त्यांची संख्या फार थोडी आढळून येईल.

६. खंड ४ मध्यें माझ्या कांहीं शंकाही दिल्या आहेत; पण त्यांचें निरसन कोणीं अजून समाधानपूर्वक केलेलें नाहीं. त्याबद्दल मला मिळालेली माहिती विचारणीय वाटते.म्हणून देत आहे.

( १ ) **बाबूराव भोसले** यांनीं लेख्यास 'दंडवत' शब्दानें बहुमान दिला नसून 'नमस्कार' शब्द वापरला आहे म्हणून हे **भोसले** ब्राह्मणच असले पाहिजेत. '**धायगुडे**' हे ब्राह्मण आहेत व मराठेही आहेत. पूर्वी जे मराठे सरदार होते त्यांचे कांहीं कारभारी ब्राह्मण होते. त्या सरदारांची कांहीं मिळकत हे कारभारी मालकं म्हणून वापरूं लागले. ते ब्राह्मण असल्यानें पत्रांत बहुमानार्थी शब्द 'नमस्कार' म्हणून वापरूं लागले. कारकून मराठे यजमानांची मिळकत आपली म्हणून वापरूं लागले, तेव्हां त्यांनीं ब्राह्मण जात सोडली नाहीं, अशीं उदाहरणें आहेत.

( २ ) '**वाकडे**' या आडनांवाऐवजीं '**कानडे**' शब्द चुकीनें लिहिला गेला आहे. पण '**वाकडे**' व **काणे** यांचें नातें २०० वर्षांपूर्वीं कसें होऊं शकलें हें कळत नाहीं. तो सामाजिक सुधारणेचा त्या वेळचा प्रकार म्हणणें बरोबर होणार नाहीं.

(३) श्रीमंत लोक परस्परांशीं पत्रव्यवहार करतांना लेख्याचें नांव पत्रारंभीं लिहून लेख्याचें नांव पुनः लिहिण्यापूर्वीं एक लपेटीदार 'छ' अक्षर लिहितात. कै. **वि. का. राजवाडे** यांनीं लपेटीदार अक्षर 'छ' सारखें दिसलें तरी त्यास 'द' च म्हटलें आहे. या 'द' अक्षराचा अर्थ धार्मिक बुद्धीनें करून एका स्नेह्यांनीं मला सुचविला आहे. **बृहदारण्यकोपनिषदांत** अध्याय ५ श्लोक १।२।३ दिले आहेत. त्यांचा मथितार्थ असा आहे कीं, '**प्रजापतीचे** तीन पुत्र—**देव, मानव व असुर.** ते वडिलांकडे जाऊन उपदेश मागत. दर वेळीं पित्यानें '**द**' असा शब्द उच्चारावयाचा. त्याचा अर्थ असा कीं, भोगप्रधान **देवांनीं** इंद्रियांचें दमन करावें म्हणून त्यांना 'द' दिला. संग्रामप्रधान **मानवांनीं** भोगसामुग्रीचें दान करावें म्हणून त्यांनाही 'द'च दिला. क्रोध आणि हिंसाप्रधान **दानवांनीं** म्हणजेच **असुरांनीं** सर्व प्राण्यांवर दया करावी म्हणून त्यांनाही 'द'च दिला. असा '**द**' या अक्षराचा अनुक्रमें दमन, दान व दया यांपैकीं एक अर्थ संदर्भ पाहून करावयाचा असतो. या लपेटीदार 'द' अक्षराचा उपयोग कोणत्या दर्जाचा लेख्य व लेखक कोणास व केव्हां पत्रांत करतो याबद्दल मला निरनिराळीं पत्रें पाहून कांहीं नियम ठरविण्याइतकें मानसिक व शारीरिक सामर्थ्य राहिलें नाहीं. पत्रें पाहून हें ठरवितां येईलसें वाटतें. '**द**' हें अक्षर निरनिराळ्या लेखकांनीं निरनिराळ्या वळणांनीं काढलें आहे; पण त्याबद्दलही मीं विचार केलेला नाहीं. हा उद्योग संशोधकांनीं केला पाहिजे. **मराठ्यांच्या** राज्यव्यवस्थेचा खरा पाया **शहाजीराजे भोसले** यांनीं **मुसलमानी** अमदानींत **कर्नाटकांत** घालण्यास सुरुवात केली. त्याचें खरें स्वरूप समजण्यास तेथील दफ्तर व राजकीय लेखनपद्धति हें उत्कृष्ट साधन आहे. म्हणून **दा** हें अक्षर लिहिण्याचे विविध प्रकार कोणते व लेख्य आणि लेखक यांच्या नांवांपूर्वीं व मागून योजावयाचे शब्द कोणते, उदाहरणार्थ, पोष्य, सेवक, स्नेहांकित, स्नेहाभिलाषी, अपत्यें, अपत्यानुरूप, श्रीमंत, अखंडितलक्ष्मीअलंकृत, राजश्री, विद्यार्थी इ. हें ठरविण्याचा अभ्यास संशोधकांनीं करण्यासारखा आहे. तसेंच नांवाच्यापूर्वीं योजिलेले शब्द तीर्थरूप, तीर्थस्वरूप, स्वामी, गोसावी इ., तसेंच पत्राच्या शेवटचीं व बहुमानार्थी वाक्यें, यांचा संशोधकांनीं अभ्यास करणें जरूर आहे. इंग्रजींत your most obedient servant हे शब्द सही करण्यापूर्वीं योजण्यांत जितका साधा अर्थ आहे तितकाच लेख्य व लेखक यांच्यापूर्वीं 'सेवक' व 'पोष्य' इ. लिहिणें या शब्दांत आहे. पण **नानासाो पेशव्यांनीं** व **सचिवांनीं विश्वनाथभटांस** पत्र लिहितांना स्वतःस 'पोष्य' म्हणणें चमत्कारिक दिसतें. **विश्वनाथभटांचे** नोकर पुष्कळ होते. ते स्वतःस 'सेवक' म्हणत हें गैर नाहीं. पण **विश्वनाथभटांनीं** त्यांना पत्र लिहितांना स्वतःस 'सेवक' म्हणणें गैर वाटतें. **जानोजी भोसले, 'सेनाधुरंधर',** यांनीं सेनासाोसुभा झाल्यावर **विश्वनाथभटांस** पत्र लिहितांना स्वतःस 'पोष्य' म्हणणें युक्त दिसत नाहीं. अपत्यें किंवा अपत्यानुरूप या विशेषणानें नातें दिसून येतें. लेखक लेख्यास दंडवत किंवा रामराम म्हणत असेल तर तो मराठा समजावा. लेखकाचें

आडनांव **भोगले, यादव** असेल व तो लेख्यास नमस्कार लिहीत असेल तर तो **ब्राह्मण** असला पाहिजे. लेख्य विद्वान् व वेदशास्त्रसंपन्न असला तर लेखक कितीही श्रीमंत असला तरी स्वतःस विद्यार्थी म्हणतो. लेख्यास आशीर्वाद किंवा नमस्कार लिहीत असेल तर त्यांपैकीं वडील कोण याचाही बोध होऊं शकतो. **सिवभट साठे, ओरिसाचा** गव्हर्नर असून **विश्वनाथभटास** लिहिलेल्या पत्रांत स्वतःस 'सेवक' म्हणतो. ब्राह्मण अधिकाऱ्यानें मराठे किल्लेदार व कारकून यांस लेख्य म्हणून पत्र लिहिलें तर किल्लेदारांस आशीर्वाद लिहिण्यांत येतो व कारकुनास नमस्कार लिहितात. कारकून बहुधा ब्राह्मणच असतात. ह्याच लेख्यांचा क्रम उलट म्हणजे अगोदर कारकून व मागून किल्लेदार असला तर अगोदर नमस्कार व मागाहून आशीर्वाद लिहिण्यांत येतो.

९. हिशोबांत एकच रक्कम असेल व त्याचे खालीं बेरजेसाठीं दुसरी रक्कम मुळींच नसेल तर 'लग' शब्द लिहून त्याच्या खालीं रेघ ओढतात व बेरीज शून्य हीच रक्कम लिहितात. लग याचा अर्थ शून्य असा आहे.

१०. शिक्के व मोर्तबः– या संबंधानें धुळ्याचे रा. **भास्कर वामन भट** यांनीं "महाराष्ट्रांतील ऐतिहासिक पुरुषांच्या मुद्रांचें प्रदर्शन" असा लेख 'इतिहास व ऐतिहासिक' मासिकांत नं. २८ ते ३१ च्या जोडअंकांत लिहिला आहे. त्यांत बरीच उपयुक्त माहिती दिली आहेः त्यांतील शिक्क्यांपेक्षां जास्त शिक्के माझ्या कागदांत मिळाले ते साकार जरी दिले नाहींत, तरी त्यांतील मजकूर जेवढा समजला तेवढा ओळीबरहुकूम दिला आहे. त्यासंबंधीं पूर्ण माहिती संशोधन केल्याशिवाय होणार नाहीं.

११. घराण्याचे **कुलवृत्तांत** बरेच तयार झाले व नवीन होत आहेत. माझे दफतरांत इतर कुळांचे कागद पाहण्यास कोणी आले तर ते नेहमींप्रमाणें मी त्यांस आनंदानें दाखवीत असतों व त्यांचा उपयोग करून त्याचा उल्लेख ते आपल्या कुलवृत्तांतांत करितात.

१२. **विद्यापीठा**कडे ऐतिहासिक निबंध लिहून पदवी अगर बक्षीस मिळविण्याचा विद्यार्थी प्रयत्न करितात. त्यांसही मीं आपले कागद गेल्या सालीं दाखविले होते. तसेंच यंदांही कांहीं विद्यार्थी ते पाहून गेले.

१३. जमाखर्चांचे व हिशोबांचे कागद वगळण्याचा जरी प्रयत्न केला आहे तरी कांहीं प्रसिद्ध महत्त्वाच्या व्यक्तींसंबंधाच्या कागदांचा समावेश केला आहे. उदाहरणार्थ, **पंतप्रधान, शाहूमहाराज, शिवभट साठे,** नागपूरचे **सेनासाहेबसुभे, सेनाधुरंधर,** मोसल्यांचे सल्लागार, **सरदार व हिम्मत.** कांहीं कपड्यांच्या व

दागिन्यांच्या याद्याही दिल्या आहेत. अशा कागदांची मिति अगर तारीख हे कागद पुरे झाले तेव्हांचीच देण्याचा क्रम ठेविला आहे.

१४. या खंडांत **विश्वनाथभटांच्या काशीयात्रेचे** कागद देतां आले नाहींत. ते निवडून निराळे काढून बऱ्याच कागदांच्या नकला करून ठेविल्या आहेत. कै. **जनार्दनपंत पेशव्यांची** बायको **सगुणाबाई** यात्रेस गेली होती त्याच सालीं म्हणजे १७५६।५७ सालीं ते **वाईकडील** बरीच मंडळी घेऊन गेले होते. याबद्दल **पेशवेदफ्त**-रांतील रा. **देवराव मेघःश्याम लपाटे** यांच्या पत्रांत उल्लेख केलेला आहे. आमच्या यात्रेच्या कागदांवरून रा. **यशवंतराव फफे** ऊर्फ. **मनोहर** यांनीं **विश्वनाथभटांच्या** मुक्कामांची यादी तयार केली आहे ती यात्रेच्या हकीगतीबरोबर देण्यांत येईल.

१५. **काशीकडील** व **महाराष्ट्रांतील** संवत्सरांत फरक असतो. सध्यांच्या सरकारनें इंग्रजी भाषेबरोबर इसवी सनास मार्ग टाकलें पाहिजे. हिंदुस्थानच्या शकमितीच्या कालगणनेस तूर्त प्राधान्य द्यावें. असें झाल्यास अलीकडील विद्यार्थ्यांस पंचांगाची माहिती करून घेणें जरूर पडेल. पंचांगाच्या मुखपृष्ठाच्या डावे बाजूस शालिवाहन शकाचा आंकडा देऊन त्याचे खालीं त्या संवत्सराचें नांव दिलेलें असतें. उजवे बाजूस संवताचा आंकडा देऊन त्याचेच खालीं त्याचें संवत्सर दिलेलें असतें. **शकाचें** संवत्सर चैत्र शुद्ध १ पासून व **संवताचे** संवत्सर कार्तिक शुद्ध १ पासून सुरु होतें. संवत्सरांचीं नांवें ६० आहेत. शालिवाहन शक व विक्रमसंवत् यांचे संवत्सर, महिने व तिथी एकच असतात. पण एकाच कालीं त्यांचें संवत्सर, महिना व तिथींही भिन्न असतात. नर्मदेच्या दक्षिणभागीं अमावास्येपासून महिना सुरू होऊन तो अमावास्येस संपतो. म्हणून त्यास **आमान्त**मास म्हणतात. **नर्मदेच्या** उत्तरभागीं पूर्णिमेस मास संपतो म्हणून त्यास **पूर्णिमान्त**मास म्हणतात. कै. **शंकर बाळकृष्ण दीक्षित** यांच्या '**ज्योतिर्विलास** अथवा रात्रीची दोन घटका मौज' या पुस्तकांत प्रकरण ९ वें पंचांग असून त्यासंबंधानें सोप्या भाषेत चांगली माहिती दिली आहे. त्यांचे चिरंजिवांनीं आतां त्याची नवी आवृत्ति नुकतीच काढली आहे. त्यांत अंतरिक्षाचे नकाशे हा मजकूर जास्त घातला आहे. ३० तिथींत २ पंधरवडे होतात. त्यांस पक्ष म्हणतात. ज्या पक्षांत आवशीस काळोख असतो त्यास वद्य किंवा कृष्ण म्हणजे काळोखाचा पक्ष म्हणतात आणि ज्यांत आवशीस चांदणें असतें तो शुक्ल पक्ष. **नर्मदेच्या** उत्तरभागीं **पूर्णिमान्त** व दक्षिणभागीं **आमान्त** मान चालतें. त्यासंबंधीं कोणाची अशी समजूत असते कीं, महाराष्ट्रांतील शुक्ल पक्ष तो काशीकडील कृष्णपक्ष; पण ही चूक आहे. हीं नांवें अन्वर्थक आहेत, हें न समजल्यामुळें समजुतींत चूक होते. दोन्ही ठिकाणच्या पक्षांची व्यवस्था लक्षांत यावी म्हणून ती खालीं दिली आहे, असें म्हणणें भाग आहे.

| | महाराष्ट्रांतील आमान्त मास | काशीकडील पौर्णिमान्त मास |
|---|---|---|
| | फाल्गुन वद्य पक्ष | चैत्र वद्य पक्ष ( पहिला पंधरवडा ) |
| चैत्र | शुक्ल पक्ष पहिला पंधरवडा—— | चैत्र शुक्ल पक्ष ( दुसरा पंधरवडा ) |
| | कृष्ण पक्ष दुसरा पंधरवडा | वैशाख कृष्ण पक्ष ( पहिला पंधरवडा ) |
| वैशाख | शुक्ल पक्ष ( पहिला पंधरवडा ) | वैशाख शुक्ल पक्ष ( दुसरा पंधरवडा ) |
| | कृष्ण पक्ष ( दुसरा पंधरवडा ) | ज्येष्ठ कृष्ण पक्ष ( पहिला.पंधरवडा ) |
| ज्येष्ठ | शुक्ल पक्ष ( पहिला पंधरवडा ) | ज्येष्ठ शुद्ध पक्ष ( दुसरा पंधरवडा) |

यांत दोन्ही भागांत शुक्लपक्ष एकाच वेळीं आला आहे. महिने मात्र भिन्न आहेत, असें दिसून येईल.

१६. आतां कागदाबद्दल माहिती देण्यास सुरुवात करण्यापूर्वी छापलेल्या ४ थ्या खंडाच्या प्रस्तावनेची आठवण करून देणें जरूर दिसतें. प्रत्येक खंडाच्या प्रस्तावनेस सुरुवात करतांना पूर्वीच्या खंडापेक्षां ह्या खंडात जास्त काय सुधारणा केली आहे हें देण्यांत आलें आहे. खंड ४ च्या प्रस्तावनेंत पुढें छापल्या जाणाऱ्या ५ व्या खंडांत संवत्सराप्रमाणें कागद कां दिले आहेत व त्यांत शकमितीस प्राधान्य दिलें आहे व त्याचें कारण काय व त्यामुळें वाचकांस वाचतांना काय अडचण येईल याचा खुलासाहि केला आहे. ही अडचण इंग्रजांनीं इसवीसनी काल-गणनेची जी पकड आपणांवर बसविली आहे तिचा परिणाम आहे.

१७. कागदांचें स्पष्टीकरण थोडक्यांत करण्याचें योजिलें आहे. वर्गीकरणाचा क्रम साधारण खालीलप्रमाणें ठेवलेला बरा असें वाटतें:—

( १ ) सनदा, इनाम, आज्ञापत्रें, कर्जरोखे, पावत्या, करार, हुकूम. ( २ ) हिशोब, याद्या, ( दागिने, कपडे, कर्जदार ). ( ३ ) लढाया. ( ४ ) खाजगी घरगुती पत्रें. ( ५ ) देवालयें. ( ६ ) वैद्यांनीं लिहिलेलीं पत्रें. ( ७ ) महत्त्वाच्या पुरुषांचीं पत्रें. ( अ ) छत्रपति ( आ ) अष्टप्रधान :–पंतप्रधान–पेशवे, अमात्य-मुजुमदार, सचीव-सुरनीस, प्रतिनिधि. मंत्री :–पंडितराव, न्यायाधीश, वाकनीस, पारसनीस, सेनापति, सुमंत, पंतराजाज्ञा. ( इ ) सरदार :–( अ ) अंग्रे–सरखेल व वजारतमाव, ( आ ) भोसले, ( इ ) गायकवाड, ( ई ) दाभाडे, ( उ ) मुतालीक. ( ८ ) सावकार. ( ९ ) गोसावी, ( १० ) दिवाण-दिम्मत ( ११ ) सुभेदार. ( १२ ) कारकून इ०

# शुक्ल संवत्सर १६७१

## सन १७४९।५०

इ. स. १७४९ मधील या शकाचे कागद खंड ४ मध्यें डिसेंबरनंतरचे घ्यावयाचे नव्हते, ते शके १६७१ च्या मार्गशीर्षअखेरच घेतले आहेत. पुढील ३ महिन्यांचे म्हणजे पौष, माघ, फाल्गुन यांचे कागद १७५० मधील छत्रपति शाहूचे मृत्यूनंतरचे या संवत्सरांतील थोडे असल्यामुळें केवळ ६ च छापावे लागले. या ३ महिन्यांतील राजकीय भानगडी रामराजांच्याच मुख्य आहेत. तसे कागद दफ्तरांत मिळाले नाहींत, तरी इतर महत्त्वाचे कागद सांपडले. तेवढ्याबद्दलचाच उल्लेख यांत केला आहे.

प्रत्येक पत्राचा सारांश पत्राच्या शेवटीं इंग्रजींत दिलेला आहे. हा सारांश देण्याचें कारण पूर्वी दिलेलें आहे. तथापि इतिहासविषयाच्या आवडीमुळें हल्लीं जे कोणी त्याचा अभ्यास करतात त्यांस हा इंग्रजी सारांश सोप्या भाषेंत असल्यामुळें सहज कळणारा आहे. कांहीं न कळलें किंवा शंका आली तर ते मूळ पत्र वाचूं शकतील, म्हणून प्रस्तावना लिहितांना उगीच लांबलचक न होतां कागदाचा खुलासा यांत थोडक्यांत होईल अशी काळजी घेतली आहे. वर्गीकरणानुसार प्रस्तावनेंत कागदांचा खुलासा केला आहे.

१. इनाम, सनदा, आज्ञापत्रें, कर्जरोखे, पावत्या, करार :—शके १६७१ मध्यें दुष्काळ होता. यामुळें मोहरी गांवचा वसूल मोकदमांना होणें कठीण होतें. लोक गांव सोडून गेले होते. म्हणून त्यांनीं इनामदार यांजकडे जाऊन सूट मागून घेतली व पुढील सालची कबुलायत (कौल) लिहून दिली. पूर्वी कबुलायत कशी देत, याचा नमुना हा कागद असून त्यावर इनामदार विश्वनाथ भट वैद्य यांचा शिक्का आहे. त्यांच्या बहुतेक पत्रांवर प्रारंभीं श्रीकाराच्यापुढें त्यांनीं स्वतः 'शंकर' हा शब्द काढला आहे. (प. नं. ६).

२. सरदार व सरंजामदार :—(१) चिमणाजी नारायण पंतसचीव :—(अ) भोर संस्थानांतील नेरे गांवांतून वैद्य यांस सचिवांनीं स्वतःच्या गल्यापैकीं चौसेरी मापी ७ खंडी, यादींत दिलेले धान्याची नेमणूक करून दिली होती. खंडीच्या आंकड्यापुढें मण किंवा पायल्या नसल्यामुळें तुटकें आलें पाहिजे होतें, पण तसा टाइप नसल्यामुळें तें चिन्ह छापलें गेलें नाहीं. (प. नं. ३) (आ) सचिवांचा किल्ला सिंहगड पेशवे मागत होते व त्याबद्दल त्यांनीं सचिवांस लावलेला तगादा चालू राहतो व पंतसाहेब जरी लढण्याची तयारी करीत आहेत तरी

तडजोड होण्याचा संभव आहे. ही गोष्ट राजगडचे अमलदार कृष्णाजी त्र्यंबक लोहोकरे विश्वनाथभटांस कळवितात. पंतांनीं कर्ज ज्याकडून काढलें त्यांस असंतुष्ट ठेवूं नये, असें लोहोकरे यांचें म्हणणें होतें. रास्ते हे त्यांस कर्ज देणारेच होते. (इ) मानाजी पवारानें वैद्यांचे पैसे देणें होतें तेही लोहोकरे यास मिळाले नाहींत. देवासच्या काळोजीबोवाचे हे पवार चिरंजीव असून पाथरेकर शालेचे इम्रतदार सरदार होते. (प. नं. १) (२) रघूजी भोसले:—महाराजांच्या राण्यांच्या खजिन्याचा खजिनदार खंडोजी गोगावले (हवालदार महाल भांडारगृह) यांजकडे ज्या लोकांकडून पैसे जमा झाले त्यांची यादीही असून त्यांत नानाजी नाईक जोशी, वैद्य, उमदी, थत्ते व पोतदार यांच्यासारखी सावकारमंडळी आहेत. गोगावले हा श्रीकारापुढें 'रामो जयति' लिहितो. (प. नं. ५)

३. पत्रें (अ) नारो शिवदेव विश्वनाथभटांस कळवितात कीं, कोल्हापूरचे रंभाजी मोहिते यांनीं स्वतः व श्रीशंकराचार्य यांस वाईट रीतीनें वागविलें. (प. नं. २) (आ) अनतभट द्रविड यास वैद्यांनीं नोकर ठेविला, त्यासाठीं सदाशिव ना. लिमये यांचे मुखत्यार श्रीनिवास व्यंकाजी द्रविड हे जामीन राहिले. जामीनकी कशी लिहितात याचा हा नमुनाच आहे. (प. नं. ४)

---

# प्रमोद संवत्सर शके १६७२

## सन १७५०।५१

१. सनदा,-इनामें, मोकासे, नेमणुका, आज्ञापत्रें, देणग्या, हुकूम, करार पावत्या:—(अ) कान्हाटी परगणे सुपे, खोडद, पा कऱ्हाड, भातगांव, पा कोंकण हीं गांवें इनाम म्हणून वैद्यबंधूंस चालविण्याबद्दल सनदा दिल्याचे अमलदारास हुकूम दिले आहेत, तसेंच वाई येथें १ चाहूर व बावधन येथें ३० बिघे इनाम जमिनी चालविण्याबद्दल सनदा दिल्याचें सांगोलें येथें ठरलेल्या करारांत लिहिलें आहे. सांगोल्याच्या करारांत आणखी अशी नोंद आहे कीं, वाकी, चोपडज देखील भटगव्हण व मावडी या तीन गांवचा वैद्यबंधूंना पालखीच्या सरंजामासाठीं मोकासा दिला आहे. पीकपाणी झालें तर फक्त ७०० रु. नक्त मिळावयाचे. शाहु-महाराज वारल्यानंतर, पूर्वी या दोघांना रु. ७००० सरंजाम म्हणून मिळत, ते रु.३००० करण्यांत आले. मुकासगांव व इनामगांव यांत फरक असा दिसतो कीं, मुकास

गांवाचा नक्त वसूल असतो व इनाम गांवांत नक्त जमीनमहसूल मिळून त्या गांवच्या जमिनीची वहिवाट व कबजा इनामदाराकडे असतो. म्हणजे त्यांतील नदीनाले, झाड-झाडोरा, जंगल, गायरान व गांवठाण यांची वहिवाटही तेच करूं शकतात. **मोकासबाब** ही वसुलाच्या शेंकडा ७५ व **ऐन मोकासबाब** शें. ६६ असते. (प. २५, २६ व ४२) इनाम गांवांपैकीं **खोडदगांव, भातगांव** व **मोकासगांव** सध्यां **वैद्यांकडे** चालत नाहींत. **खोडदगांव** हें **वैद्यांनीं बाळंभट** वारल्यानंतर त्यांची मुलगी सौ. **अनूबाई**, इचें लग्न **भिकाजी ना रास्ते** यांचा मुलगा **गंगाधर** यांच्याशीं केलें व त्यास हें इनाम गांव बक्षीस देऊन टाकलें. सध्यां **मोकासगांव** हें **सरंजामी** गांव म्हणून **वैद्यांकडे** चालत नाहीं व नक्त नेमणूक म्हणून त्याचे पैसेही मिळत नाहींत. **खोडदगांवचें** आज्ञापत्र **जगजीवन** ऊर्फ **दादोबा पंतप्रतिनिधींनीं** काढलें असून त्यावर **श्रीनिवास गंगाधर, भवानरावाचा** शिक्का व मोर्तब आहे. **सांगोल्याच्या** यादींत **कान्होटीगांव** दरोबस्त इनाम असून त्यांत इनामदारास असलेली फौजदारी, बाबती, सरदेशमुखी, व मुकासा हे हक्क नमूद केले आहेत. (ब) **नारो अनंत गद्रे** या इमानी कारकुनास वर्षाची **नेमणूक** वऱ्हाडांतील **भुगांव** इनाम गांवची वहिवाट करण्यास, दरमहा रु. ५० मिळत. त्याच्या तपशिलांत भोजनखर्च फक्त रु. ८ आहे. हें वाचल्यावर आश्चर्य वाटेल. नोकरांचे पगारही फार कमी आहेत. (प. नं. १७) (क) **वैद्य** हे सन १७५० पूर्वी **वाईस** राहत असत असें जमाखर्चावरून कळतें. पण त्यांस घरें बांधण्यास दिलेल्या जागेची सनद श्रीमंत **मातुश्री ताराबाईमहाराजांनीं, सत्यनाथपुरींतील शकरबिबी** ही जमीन धारादत्त (उदक सोडून दिलेलें दान) कैलासवासी चि. **शाहूमहाराजांनीं** दिलेली आहे असें **वैद्यबंधूंस** लेखी कळविलें आहे. अशाच तऱ्हेचे हुकूम गांवकामगार, शेटे, महाजन, ढंगे पाटील, देशमुख, देशपांडे व मोकदम यांस दिलेले आहेत. हे हुकूम छापले नाहींत. (प. नं. २०) या वेळीं **रामराजांचें** बरेंच काम महाराज **ताराबाई**-साहेब निकालांत काढीत असत, असें दिसून येतें.

२. **छत्रपति :— रामराजे** व मा. **ताराबाई :**—(अ) **लावगनकर वैद्यांपैकीं** एक शाखा **सातारा** जिल्ह्यांतील **तांदुळवाडीस** आहे; त्यांचे पूर्वज हे **राजवैद्य** होते. त्यांपैकीं **बापूभटास, शाहूमहाराजांनंतर, ताराबाईसाहेब** व **रामराजे** जेव्हां **सातारा** सोडून जात, तेव्हां **राजवैद्य** म्हणून त्यांच्याबरोबर जावें लागे. हे **विश्वनाथ-भटांपेक्षां** वडील होते. त्यांचा एकमेकांचा पत्रव्यवहार नेहमीं होत असे. १७५० मध्यें **रामराजांस छत्रपतिपद** मिळाल्यावर **रामराजे** व **ताराबाईसाहेब** यांच्या हालचालींच्या बातम्या **बापूभटांकडूनच विश्वनाथभटांस** कळत असत. राजमंडळांत काम करणारीं माणसें **सांगोल्यास** जमून **छत्रपतींनीं** करावयाच्या कामाचा निकाल लावून घेत होतीं. तेव्हांच्या या दोघां व्यक्तींच्या हालचाली **बापूभटांनीं विश्वनाथ-भटांस** कळविल्या आहेत. सर्व मंडळी **पुण्यास** जमून पुढें **सांगोल्यास** गेली.

वैद्यांच्या एका मुलीचे लग्नास हजर राहून ताराबाई पुण्यास गेल्या असाव्या. प्रस्थान ठेवून निघण्याची त्या काळीं चाल असे. ( प. नं. ८ ) ( ब ) विश्वनाथभटांस नानासाहेबांनीं रामराजे पुण्यास आल्यावर बोलावलें होतें. मा. ताराबाईही तेथें होत्या. रघूजी भोसलेही तेथें आले. कसब्यांतील रामचंद्रबाबांचे वाड्यांत राहाण्याची तजवीज केली होती. महाराज १४।८।१७५० रोजीं पुण्यास येऊन सांगोल्यास तारीख २२ रोजीं गेले. रघूजीबाबास ८।९।१७५० रोजीं वस्त्रें देऊन नागपुराकडे पाठविलें, ह्या बातम्या पुण्याहून विश्वनाथभटांनीं बाळंभटास लिहिल्या. ( प. नं. २१,२६ )( क ) रामराजांस गादी दिल्यावर रामराजे कुटुंबांतील मंडळींबरोबर व मा. ताराबाईसाहेबांबरोबर अप्रयोजकपणें, योग्यतेस न शोभणारें वर्तन करीत. ही माहिती महादजीराम दामले हे लक्ष्मण बल्लाळ जोशी यांस वाईस लिहीत असत. ( प. नं. ३६ ) रामराजांच्या वर्तनाबद्दल पे. द. ६ व्या भागांत बरींच पत्रें छापण्यांत आलीं आहेत. ( प. नं. ३६ ) ( ड ) पंतसचिवांनीं वैद्यांकरतां कांहीं मजूर व जिनसा पाठविल्याचा उल्लेख या पत्रांत करण्यांत त्यांचें वैद्याबद्दल किती अगत्य होतें तें दिसून येतें. मा. ताराबाईसाो पुण्याहून साताऱ्यास कधीं जाणार व त्यांच्याबरोबर कोणकोण आहेत ही बातमी रामचंद्रपंत करकरे यांस शिवाजीपंतानें कळविल्याचें दिसून येतें. ( प. नं. ४५ )

### ३. सरदार सरंजामदार :—

( अ ) पेशवे :— पंतप्रधान ( बाळाजी बाजीराव ) नानासाो, भोसले यांचा संबंध पंतसचीव, खंडोजी जाधवराव, सनदा, याद्या, छत्रपति, जोशी यांच्या कागदांत ज्याबद्दल आला आहे, त्याचा उल्लेख त्या कागदांची माहिती देतांना केला आहे. ( प. नं. १२, १५, २३, २५, २६, २८, ३६, ३७, ४८, ५३ ). शाहूमहाराज निवर्तल्यावर वैद्यांकडून पेशवे व्याजीं पैसे घेत असत. भाद्रपद वद्य ३, वद्य ३०।१६७१ प्रमोद संवत्सर यांत एकंदर रु. ५३७५० घेतल्याची यादी वैद्य-दफतरांत आहे. व्याजाचा दर दरमहा द. शें. आठ आणे आहे. या व्यवहारावरून पेशव्यांचा वैद्यांबद्दल आदर कमी होता असें म्हणतां येणार नाहीं. ( प. नं. २८ ) ( आ ) केसो कृष्ण शेंबेकर हे एक मोठे सावकार वैद्यांशीं मोठमोठे देवघेवीचे व्यवहार करीत, यामुळें त्यांचा परस्परांशीं मोठा पत्रव्यवहार होत होता. त्यांत ते राजकीय बातम्याही वैद्यांना कळवीत. निजाम व भोसले यांचें सख्य झालें ही केदारजी मोहित्यानें शिवाजी मोहित्यास लिहिलेली बातमी व भोसल्यांनीं निजामास २० लक्ष रुा देण्याचें कबूल केलें होतें, तरी तो ३० लक्ष मागत होता ही अकोल्याहून जोगांनीं लिहिलेली बातमी ह्या सर्व शेंबेकरांनीं वैद्यबंधूंस कळविल्या. त्यांत पेशवे, भोसले व महाराज यांची भेट होणार होती हेंही त्यांनीं लिहिलें होतें. या भेटींत रघूजीचा मुलगा मुधोजी भोसले यास महाराजांना

भेटविणेचा विचार होता. तो दत्तकाबद्दलचा असावा (प. नं. २८ व ५०).

(आ) भोसले:— वैद्यांचा रामटेकचा विश्वासूक वऱ्हाडांतील कारकून **राघो बल्लाळ भोगले** तिकडील राजकीय व खाजगी देवघेवीची हकीगत त्यांस कळवीत असे. **बाळंभटास टोक्याहून विश्वनाथभटा**कडून आलेल्या पत्रावरून **रघूजी भोसल्यांचा पिंपरीचा** मुक्काम त्यानें कळविला (प. नं. २). **रघूजीनें वैद्यांकडून** शेंकडों रुपयांपर्यंत उसनवार नेलेली रक्कम बरचेवर फेडली जात असे. ही रक्कम या सालीं त्याचेकडे कोणाकडून व कशी जमा झाली त्याची यादी आहे. त्यावरून राणी **सकवारबाई, कृष्णाजी वामन खरे, रतनपूरधमदे**ची रसद देणारे **रामचंद्र शिवदेव,** (**शिवाजी नारायण भाव्यां**चे कारभारी) व **वैद्य** (कर्जरोखा लिहून देऊन घेतलेले रु. २५०००) यांनीं पैसे दिले ते **रघूजीस** या कामीं उपयोगी पडले आहेत. (प. नं. १६) **सेखजी** (**वैद्यांचा** नोकर) **नागपुरास** गेल्यावर **संताजी भोसले** व **रघूजी** यांचे वाद मिटून सख्य झाल्याचें व **रामाजी गिरधर** व **सदाशिव हरी खाडिलकर** आपले पैसे देण्यास तयार असल्याचें **वैद्यास** लिहितो. (प. नं. ३३). **मुधोजी भोसले** यांनीं **विश्वनाथभटाकडे** श्रीमंत **रघूजी** व इतर लोकांस देण्याकरितां हलवा पाठविला.

(१) पंतसचीव **चिमणाजी नारायण**:—(१) या सालांत **पेशवे** पंताकडील **सिंहगड किल्ला** आपल्यास मिळावा म्हणून प्रयत्न करीत होते. व **पंतसचीव विश्वानाथभटा**कडून तो आपल्याकडे राहावा म्हणून खटपट करीत होते. यासंबंधानें मा. **ताराबाईसा** पंतांची गांठ घेऊन त्यांनीं त्यांचे-कडून मदतीचें आश्वासन घेतलें होतें. त्यांची स्त्री सौ. **भवानीबाई वैद्यबंधूंस पुण्या**हून कळविते कीं, **साताऱ्याहून** २०० माणूस **पुण्यास** येऊन कोणाकडे गेलें कळत नाहीं. तिला तें **सिंहगडा**करितां गेलें कीं काय असा संशय आलेला दिसतो. तिनें **विचित्रगडा**स येऊन पुनः **वैद्यांस पेशव्यांचा सिंहगडचा** वेढा उठवण्यासाठीं **साताऱ्यास महाराजां**कडे धोरण बांधा म्हणून लिहिलें.

(२) **कृष्णाजी त्र्यंबक लोहोकरे, राजगडचे किल्लेदार,** यांनीं **वैद्यांना** २ पत्रें लिहिलीं होतीं. त्यांत पैशाचा पुरवठा ठरल्याप्रमाणें करण्याबद्दल विनंति केली होती. ते रुपये मा. **ताराबाईस** व **सदाशिव रघुनाथ** यांस द्यावयाचे होते. (प. नं. ३०) गडांचीं दोन दोन नांवें आहेत तीं अशीं:—

| | |
|---|---|
| सुधागड ऊर्फ भोरद | वितंडगड ऊर्फ तिकोना |
| प्रचंडगड ,, तोरणा | व्याघ्रगड ,, वासोटा |
| सिंहगड ,, कोंडाणा | राजगडमाची ,, संजीवनी माची |
| कठिणगड ,, तुंग | सुवेकमाची ,, पद्मावती |

(३) दुसरें पत्र मोठें असून त्यांत **वैद्यांस** पंतांनीं **सांगोल्यास** ठरल्याप्रमाणें **पंतसचिवांस** द्यावयाच्या रकमेचा उलगडा वेळेवर केला नाहीं याचा उल्लेख केला

आहे. या रकमेबद्दल निशाही करून दिली होती. वैद्याकडून दरमाहा येणारा ऐवजही मिळाला नव्हता. याबद्दल **कृष्णाजीपंतांची** तक्रार होती. **वैद्यांचें** म्हणणें १० हजार रकमेबद्दल योग्य खतपत्र लिहून देत नाहींत. किल्ल्याच्या बेगमीची तजवीज न झाल्यामुळें लोकांचे गवगवे फार झाले होते. पैसे न मिळाल्यामुळें कर्ज काढावें लागलें. त्याच्या फेडीबद्दल वराता **वैद्य** देतात. गडकरी बिथरूं देणें चांगलें नव्हे. (४) **बाळंभटाची** मुलगी कुमारी **अनूबाई** इचे लग्नाचें साहित्य करण्यासाठीं वेठबिगारीची तजवीज **कृष्णाजीपंतांनीं** फाल्गुनांत करण्याचें कबूल केलें होतें. (५) **कृष्णाजीपंतांस पंताबरोबर नानासाहेबा-कडे** गंगातीरीं जावयाचें होतें. (प. नं. ४८)

**४. कांहीं महत्त्वाचे पुरुष :—**

**१. भवानी शंकर मोरेश्वर राजाज्ञा — हे महाराजांचे** खाजगी कारभारी **पंतास विश्वनाथभटांना** चैत्र मास वेतनांपैकीं रु. ४१६॥ द्यावे असें लिहितात. (प. नं. ३८)

**२. नारायणजी कोकाटे** हवालदार **मनमोहनगड** उर्फ **केळंजा सं. भोर :— दमाजी गायकवाडाच्या** बंडखोरीमुळें उडालेल्या अस्वस्थतेस टाळण्या-साठीं **वैद्यबंधू वाई, सातारा** सोडून गडाजवळील **माची पायरवाडीस** राहण्यास जाणार असल्यास त्यांची बरोबर सोय होऊं शकेल, असें **वैद्यांस** त्यांनीं कळविलें. **पंतांनीं** हवालदारास **वैद्यांचें** पत्र पाठवून त्यांची योग्य सरबराई करण्यास अगोदरच कळविलें होतें. (प. नं. ३९)

**३. वैद्य** मौजे **कोरले** येथें रहावयास गेले होते त्यांस एक घर रिकामें करून द्यावें व गडकरी लागतील ते तेनातीस द्यावे म्हणून **पंतांनीं मनमोहनगडचा** किलेदार **सेख नसरूल्ला** व कारकून यांस हुकूम पाठविला होता. (प. नं. ५१)

**४. खंडोजी जाधवराव :—** हा **सिंदखेडच्या** सरदार **जाधव** घराण्यांतील बहादुरजीचा नातू असून **वैद्यांचा** कर्जदार होता. त्यानें कर्जापैकीं रु. २५०० पाठविले. (प. नं. २२)

**५. मानसिंग :—** हा **बहादुरजीचा** मुलगा. **राजाराम छत्रपतींची** कन्या **अंबिकाबाई** इजपासून हा झालेला होता. **मानसिंगाचा** सख्खा भाऊ **राघोजी** किंवा **रायाजी** असावा. त्याचा मुलगा **खंडोजी** होता असें पत्रावरील शिक्क्यावरून म्हणतां येईल. पण दुसऱ्या एका वंशावळींत **लक्ष्मण** हें नांव दिलें आहे. यामुळें निश्चित वंशावळ ठरविणें भाग आहे. **खंडोजीस** गांडापुराहून **पंतप्रधानांनीं निजामावरील** स्वारीसाठीं बोलावून घेतलें होतें यामुळें त्यास **बाळंभट वैद्याकडे** जातां आलें नाहीं. **भालचंद्रपंत व जिवाजी नरहर** हे **खंडोजीचे** कारकून असावे. (प. नं. २३)

६. कृष्णाजी ना॥ जोशी :—हे बाबूजी ना॥ जोशी बारामतीकर यांचे चुलते होत. यांच्या संबंधाचीं पत्रें नं. ३७, ५२ तें ५५ मला मिळालीं. मिळालेल्या माहितीवरून एक टीप युवासंवत्सर शके १६७७च्या शेवटीं छापली आहे. ती वाचली असतां या पत्रांबद्दल खुलासा होईल. नं. ३७ चें पत्र कृष्णाजी नाइकांनींच २७।११।१७५० रोजीं लिहिलें आहे, यावरून ते तोंपर्यंत जिवंत होते, असें म्हणण्यास हरकत नाहीं. वैद्यांनीं जोशांचें कांहीं हजार रु. देणें होतें. त्यांपैकीं रु. २००० दीक्षितास द्यावयाचे होते. पेशव्यांचे दिमत शंकराजी ना॥ पोतदार यास देण्याबद्दल त्यांनीं वैद्यांना हें पत्र पाठविलें होतें, राज्याची पोतदारी जर जोशास दिली होती तर शंकराजी ना॥ हे पोतदार कसे होतील? जोशांचें काम करून पेशव्यांचे पोतदार निराळे कां असावेत?

७. गोसावी बन्सीपुरी :—हा मोठा संपत्तिवान् गोसावी होता. या सालांतील पत्रांत ३ वेळां यांचा उल्लेख आला आहे. याचा मठ साताऱ्यास आहे. याचे पुष्कळ शिष्य होते. त्यांपैकींच प्रख्यात उदेपुरी म्हणून होता. याच्याजवळ पुष्कळ द्रव्य असल्यामुळें यांनीं भोसले, सचिव वगैरेसारख्या संस्थानिकांस कर्ज दिलें होतें. बन्सीपुरीचे पैसे परत करण्यासाठीं रघूजी भोंसल्यानें वैद्यांकडून कर्ज रुपये ५०००० घेतले होते. त्यांतून गोसाव्यास ४७५०० देवविले आहेत. बन्सीकडून घेतलेली रक्कम कोणाकोणास देविली त्याची यादी छापिली आहे. बन्सीपुरीस जे पैसे द्यावयाचे ते वैद्यांनीं आपल्या कोणत्या शिलकी ठेवींतून दिले याचीही यादी छापिली आहे. (प. नं. १,४,६) गोसावी दुसऱ्यास पत्र लिहितांना 'आशीर्वाद' न लिहितां 'आशीर्वचन' असें लिहितात.

८. कृष्णाजी गोविंद गोरे :—(अ) हा महाराष्ट्रांतून रघूजीनें नेलेल्या हुशार माणसांपैकीं होता. भास्कररामाचा अलीवर्दीनें १७४४ मध्यें खून केल्यावर रघूजीनें भास्कररामाची स्त्री ताईबाई इजला वऱ्हाड प्रांताच्या सुभ्याचा कारभार देऊन तिचा कारभारी कृष्णाजी गोविंद यास नेमिलें. पुढें ताईबाईचें व रघूजीचें न जमल्यामुळें तिचा सुभ्याचा अधिकार काढून कृष्णाजी गोविंद यासच १७५१ मध्यें रघूजीनें त्यांस वऱ्हाडचा सुभेदार केलें. ही बातमी नारो अनंत गद्रे यास ऐकून आश्चर्य वाटलें. म्हणून त्यानें ही बातमी पुण्याहून बगाजीपंत काण्यास विचारून खरी करून घेतली व विश्वनाथभटास कळविली. हीच बातमी गोपाळ अनंत गद्रे यांनीं विश्वनाथभटास कळविली. (प. नं. २७,३४) (ब) कृष्णाजी गोविंद हे वाईचे राहणारे असावे. त्यांनीं विश्वनाथभटास तेथें एक घर बांधण्यासाठीं ३ वर्षांपूर्वीं पैसे दिले होते. त्यांतील कांहीं रक्कम येणें होती ती विश्वनाथभटांनीं त्यास मागितली. (प. नं ३५) (क) या वर्षाचे अखेरीस कृष्णाजीपंतांनीं विश्वनाथभटास महत्त्वाच्या बातम्या कळविल्या त्या अशा : (१) रघूजीचें निजामाशीं सख्य झालें. (२) रायाजी

( रघूजीचा चुलत भाऊ, कान्होजीचा मुलगा ) व **राणोजी** ( ऊ. सवाई संताजी ) **रघूजीचा** चुलता, या दोघांचाही वाकुडपणा मिटून सख्य झालें. ( प. नं. ४३ ) शेवटच्या दोन्ही पत्रांच्या शेवटीं कृष्णाजीचें स्वतःचें अक्षर आहे.

९. **झुलाजी जगन्नाथ** :—ह्याला **वैद्यांनीं** कसबे **भुगांवचा** पाटील नेमून त्याजकडे वसुलाची कामगिरी दिली. या गांवचा वसूल २।३ वर्षे **वैद्यांनीं** स्वतःच्या कारकुनाकडून करविला; पण त्यांत तोटा शें. २०० रु. दरसाल होई म्हणून ही व्यवस्था केली. **नारो अनंतांनीं** आपल्या पत्रांत त्यांचा पाटीलकीचा कौल मागितला होता. ( प. नं. ३१ ) यानें **वैद्यबंधूंना** पत्र लिहून **वऱ्हाडांतील** कारकून **नारोपंत गद्रे, केसो हरी सावरकर, गोपाळपंत गद्रे** यांनीं केलेल्या वसुलाची हकीगत कळविली, **शिवभट साठे** यांजकडे **टेकाडी** गेल्यामुळें त्याचा वसूल मिळत नाहीं; **विसापूर** प्रांत **चांदे** येथें गडबड झाल्यामुळें तेथील काम होत नाहीं म्हणून **झुलाजी रघूजीस चांद्यास** भेटावयास गेला होता. **नारोजी नेगीकडील** पैसे तूर्त येत नाहींत, **केसो हरी** आजारी असल्यामुळें त्यास देशावर जातां येत नाहीं हें त्यानें **वैद्यांना** कळविलें. ( प. नं. ३२ )

१०. या पत्रांतील माणसें सावकार, सरदार, व योद्धे अशीं महत्त्वाचीं आहेत. पण **विश्वनाथभटांना** काय प्रसंगानें हें लिहिलें आहे व पत्राचा काल कोणता तें कळत नाहीं. **बाबूजी नाईक बारामतीकर** हे मोठे सावकार **जेजुरीस** आले असतां हें लिहिलेलें दिसतें. **दाभाडे** ( तळेगांवचे ) हे सेनापतींचें काम करणारे होते. या वेळीं त्र्यंबकरावाचा भाऊ **यशवंतराव** सेनापति होता. हा १८।५।१७५४ मध्यें वारला. **उदाजी पवार** हा **मलठण** शाखेतील **धारच्या संभाजीचा** मुलगा. **शाहूच्या** मर्जीतला सरदार होता. यानेंच **मराठ्यांचा** जम **माळवा** व **गुजराथ** येथें बसवून दिला. हा करारी स्वभावाचा होता. त्यानें **वैद्यांचें** कर्ज काढलें होतें तें देण्याबद्दल **शाहूमहाराजांनीं** व **पेशव्यांनींही** त्यास तगादा केल्याचीं पत्रें आहेत. **मल्हार कृष्ण** कोण कळत नाहीं. ( प. नं. ४० )

११. **कृष्णाजी वामन खरे**—हा एक मोठा सावकार होता. याजकडून **रघूजी भोसले** यांनीं **चांदे उटनूरच्या** रसदीचे पैसे **विश्वनाथभटांस** यांजकडून देवविले होते. ( प. नं. १६ ) **कृष्णाजी** हा **विश्वनाथभटाचा** विशेष परिचयाचा व लोभांतला दिसतो. हा **पालीकडे** असतांना त्यानें त्यास धान्याचे भाव कळविले त्यांत महागाईच्या तांदुळाचा भाव रुपयास १० पायली दिला आहे ! ( प. नं. ४४ ).

१२. **रामाजी गिरधर** :—यानें **वैद्यांकडून** काढलेल्या कर्जाच्या फेडीची काय तजवीज केली आहे याची हकीगत **वैद्यांचे** कारकून **नारो हरी चिटणीस, गोपाळ अनंत गद्रे, सखजी** वगैरे लोकांनीं त्यांस पाठविलेल्या पत्रांत लिहिली आहे. हा एक

रघूजीचा सरदार होता, यास इलिचपूरच्या वसुलांतून हे पैसे फेडूं असें वाटत होतें; पण हा वसूल रघूजीनें रघूजी करांडयासही दिला होता. यामुळें हे पैसे मिळणें कठीण झालें. नारो हरी मी तुमचा मुतालिक आहें असें वैद्यांस लिहितो. ( प. नं. १८, ३३, ३४ ) रामाजीनें स्वतःच्या पत्रांत कर्जफेडीसाठीं मुदत मागून घेतली होती व रघूजीनें वऱ्हाडची मामलत काशी भास्कराकडून काढली, ती त्यास परत मिळेल अशी खटपट करण्याबद्दल विनंति यानें विश्वनाथभटांस केली. ( प. नं. १९ ) याच्या अक्षराचें वळण फार चमत्कारिक आहे.

१३. सदाशिव रघुनाथ :—हा गृहस्थ घाणेकर असावा असें सकृद्दर्शनीं वाटतें. पण तो अपत्यें या नात्यानें पत्र वैद्यबंधूंना लिहितो व त्यांना 'तीर्थस्वरूप' ही संबोधितो. तो राजवाडे असावा. त्याचें नातें निश्चित कळत नाहीं. बाळंभटाचा मुलगा भिकंभट याची सासुरवाडी राजवाडयाकडे होती. त्यांपैकीं हा कोणी असावा. याच्याकडे कांहीं वसुलाचें काम दिलें होतें. त्याची हकीकत देतांना सदाशिव रघुनाथ घाणेकर असें नांव आहे. वैद्याबरोबर संस्थानिकांना कर्ज देण्यांत त्याची भागीदारी होती. पत्रलेखकास पुढील लोकांकडे पैशांचा तगादा करावयाचा होता. मल्हार आनंदराव, गंगाधर ना वानवळे येसाजी डोबर व प्रतापराव सिलिमकर इ. हें वसुलीचें काम करण्यास विठ्ठल जिवाजी थोरात यांची मदत सदाशिवरावास होत असे.

१४. गद्रे :—(अ) नारो अनंत हा सोंडे लावगन येथील राहणारा वैद्यांचा विश्वासूक कारकून होता. याचा बाप अंताजी नारायण हाही कोंकणांतील वैद्यांची जमीन महसूल व कारखाने यांचीं कामें पहात असे. नारोपंताचें अक्षर फार चांगलें असून त्याची वऱ्हाडांतील कामगिरी नांवाजण्यासारखी होती. तिकडील राजकीय बातम्या व वसुलाची हालहवाल वैद्यांना हा इत्थंभूत कळवीत असे. यानें बगाजी काणे यांस ते पुण्यास असतांना वऱ्हाडांतील बातम्या कळविल्या व पुण्याकडील त्यास विचारल्या आहेत. त्यानें काशी-भास्करची सुभेदारी जाऊन कृष्णाजी गोविंद गोरे यास मिळाली हें कळविलें व त्यांचीं मुलेंबाळें कोठें आहेत ही मुख्य बातमी विचारली. ( प. नं. २७) रघूजीच्या हालचाली व वसुलाची हकीकत दुसऱ्या पत्रांत दिली आहे व त्यांतच टेकाडी हा गांव आपल्याकडे असून तो काढून रघूजीनें शिवभटास दिल्याचा मजकूर याच्या पत्रांत आहे. ( प. नं. ३१ ) (ब) गोपाळ अनंत गद्रे हाही वैद्यांचा वऱ्हाडांतील कारकुनी करीत असे. त्यानेंही आपल्या पत्रांत वैद्यबंधूंना नारोपंताप्रमाणें वऱ्हाडांतील राजकीय व वसुलाची हकीगत कळवीत असे. ( प. नं. ३४ ) गोपाळपंताचें अक्षर वाचण्यास फार कठीण आहे. चाहरम हा एक हक्क आहे.

१५. बाबुराव मोरेश्वर — हा वैद्यांचा कर्जदार होता. कर्ज रु. ७५० वेंकाजी रामजी उमदी व महादेवभट पटवर्धन यांजवर वरात देऊन वैद्यांना रुपये

पाठविले त्याची पावती मागत आहे. **उमदी** व **पटवर्धन** हीं नवीं माणसें **वैद्यां**बरोबर व्यवहार करणारीं आहेत. ( प. नं. ४६ )

## हिशेब, यादी वगैरे

**१६. फगरे** व **वैशंपायन** यांच्या **वैद्यां**कडील खाते-उताऱ्यांच्या यादी यांत आहेत. **फगरे** उर्फ **खंडकर** यांचे कागद खंड १ मध्यें छापले आहेत. निळो **रघुनाथ वैशंपायन** यानें **त्रिचनापल्ली** घेऊन **चंदासाहेबास** (खंड ३ पत्र नं. १२, २९, ८०) **रघूजी**नें पकडून **नागपुरा**कडे नेला याची हकीगत दिली आहे. पूर्वी दोन्ही घराण्यांचा **वैद्यां**शीं फार दिवसांपासून देवघेवीचा व्यवहार होता. हें दाखविण्यासाठींच हे हिशोब दिले आहेत. यांनीं हिशोब लिहिण्याची पूर्वींची पद्धत ही विचारणीय आहे. ( प. नं. ३, ११ )

**१७. मुक्काम — रामराजे** यांची कारकीर्द सुरू झाल्यावर सर्व कर्तबगार सरदार व सरंजामदार **सांगोल्यास** जमून **छत्रपतिमहाराजां**कडून कांहीं गोष्टी त्यांनीं कायम करून घेतल्या. त्यासाठीं **विश्वनाथभटास साताऱ्या**हून **पुणें** व **सांगोल्या**कडे जावें लागलें. त्या प्रवासाचे मुक्कामाचीं दोन टिपणें छापिलीं आहेत. त्यावरून पूर्वीचा प्रवास कोणत्या मार्गानें होई हें कळून येतें. ( प. नं. २४, २९ ) निरनिराळ्या जिन्नसांच्या किंमती काय होत्या याचें टिपण हिशोबांत आहे पण ते छापले नाहींत.

**१८. माहिती :— (अ) बाळंभटांची** स्त्री सौ. **गंगुबाई** ऊर्फ **सरस्वतीबाई** व **विश्वनाथभटांची** स्त्री **उमाबाई** यांनीं त्यांचे **वाईचे** दिवाणजी **रामचंद्रपंत करकरे** यांजकडून घरांतील दागिने मागविले ते कोठें ठेविले होते तें दाखविणारें हें पत्र आहे. पूर्वी सध्यांप्रमाणें दागदागिने, पैसा-अडका किंवा महत्त्वाचे कागद सुरक्षित ठेवण्यास तिजोऱ्या नव्हत्या; तेव्हां जिन्नस पुरून ठेवीत. या स्त्रियांनीं ते कोठें ठेविले होते त्या जागेचें वर्णन यांत खुलासेवार दिलें आहे. या वेळीं या स्त्रिया **वाईत** नसाव्या. हे दोघे बंधु विभक्त नव्हते. ह्यांस **साताऱ्यास महाराजाजवळ** राहावें लागे किंवा ते सांगतील तेथें राजकीय किंवा खाजगी कामासाठीं जावें लागे. **वाईस** त्यांचा या वेळीं एकत्र राहण्याजोगा **गणपति** आळींत वाडा आहे. ( प. नं. ५ ) (आ) दुसऱ्याकडून आलेली किंवा स्वतःची शिलकी ठेव कोठें पुरून ठेविली होती याचें सविस्तर वर्णन दुसऱ्या पत्रांत आहे. ही ठेवींच्या झडतीची यादी आहे. जिनसा पुरून ठेवण्याच्या जागा पुढें दिल्याप्रमाणें आहेत :— **विश्वनाथभट** वापरीत त्या खोल्या, त्या खोलींत मोरीनजीक **जागा**, माजघर, देवघरांतील पैसे ठेवण्याच्या घागरी, स्वयंपाकघरांतील हंडा. या ठेवीपैकीं किती रक्कम कोणाकरितां काढून दिली याचेंही वर्णन यांत आहे. ठेवींची मोजदाद केल्यावर कोणत्या ठेवींत किती चूक आली याचाही तपशील यांत दिला आहे. पुरलेल्या ठेवीखेरीज रक्कम वर होती, ती **परळी, महाबलेश्वर** व **सदाशिवपंत लिमये** यांजकडून आलेली होती. यावरून **वैद्यबंधूंचा** देवघेवीचा किती व्यापक व्यवहार असे, याची कल्पना होईल. ( प. नं. ६ ) (इ) **मछे** व **लघाटे** हे नवीन कऱ्हाडे गृहस्थ **वैद्यां**शीं देवघेव करणारे होते. कऱ्हाडे

आडनांवच्या टिळक पंचांगांतील यादीवरून त्यांत 'मछे' नांव नसून 'मत्से' असें आहे व त्याचें गोत्र जामदग्नि आहे. **लघाटे** यांचें गोत्र 'कुत्स' आहे. (प. १०) (ई) **नारो अनंत गद्रे** यांनीं वैद्यबंधूंस कळविलें कीं, **ताईबाई कोल्हटकर** यांनीं मागितल्यावरून **काशीनाथरावांचें** (त्यांच्या मुलाचें) नांवनक्षत्र पाठविलें आहे. **विश्वनाथभटांच्या** मुलीचें लग्न व्हावयाचें होतें त्यासाठीं हा मजकूर होता. पे. द. ६ लेख ६ मध्यें या लग्नाचा मजकूर **त्र्यंबकराव मोरेश्वर** यांनीं **सदाशिवरावभाऊस** कळविला आहे, यावरून हा **कोल्हटकर-वैद्यांचा** नात्याचा संबंध जुळून आला असावा, म्हणूनच **कोल्हटकर** यांनीं कांहीं पत्रांत बंधूंना **वैद्य**मामा असें लिहिलेलें आढळून येतें. (प. १५) (उ) **वैद्यबंधूंचा कोकणांत** फार व्यवहार असे. **विठ्ठल जिवाजी थोपत** हे तिकडील कारभार पाहणारे होते. या वेळीं **वाईस वैद्यांच्या** घरीं कांहीं कार्य होतें, त्यासाठीं नारळ, विड्याचीं पानें, वासे, कारवीचे भारे व मेढी हें सामान त्यांनीं पाठविलें होतें. सौ. **अनूबाईचें** लग्न व **बाबुरावांची** मुंज हीं कार्यें या वेळीं होतीं. या कार्याचे कामासाठींच त्यांस **जयगड, गोपालगड** (अंजनवेल) व **विजयदुर्ग** येथें जाऊन परत **वाईस** जाणें भाग होतें. (प. ४४) (ऊ) या जमाखर्चाचे खर्ड्यावरून त्या वेळीं इकडे द्राक्षाची लागवड होई व माघ वद्य १२ ते ३० पर्यंत फक्त ८१८३ त्यासाठीं खर्च झाले, यावरून तीं स्वस्त होतीं असें अनुमानें काढण्यास हरकत नाहीं. (प. ४९)

---

## प्रजापति संवत्सर १६७३

## इ. स. १७५१।५२

१. **सनदा, इनामपत्रें, हुकूम,** आज्ञापत्रें, कर्जरोखे:—**वाई** तालुक्यांतील **धावडी** गांवांतील जंगलांत काठ्या तोडून नेण्यास **विश्वनाथभटांचीं** माणसें येतील, त्यांस अडथळा करूं नये असा महाराजांचे खाजगी कारभारी **हैबतराव भवानीशंकर पंत राजाज्ञा** यांनीं **मोकदमास** हुकूम दिला आहे. यावर **राजाज्ञांचा** मोर्तब व शिक्का आहे. (प. ५)

२. छत्रपति:—**रामराजे, मातोश्री ताराबाई, शाहूमहाराज:—(अ) रघूजी भोसले** यांनीं **राणोजी भोसले (सवाई संताजी)** व **सिदोजी गुजर साताऱ्यास रामराजे** यांचेजवळ असतांना त्यांस स्वामींची परवानगी घेऊन पाठवून

देण्याबद्दल वैद्यबंधूंस लिहिलें आहे. सिदोजीनें मुधोजीची मुलगी ठकूबाई इजला नवलोजीस केली होती व रघूजीनें आपली मुलगी बनूबाई इजला सिदोजीचा मुलगा व्यंकटराव यास दिली होती, असा या तिघांचा नात्याचा संबंध होता. सिदोजीस साबाजीनें पांचगांवच्या लढाईच्या वेळीं मध्यस्ती करावायास पाठविला होता. (प. ११) व (नागपूर प्रांताचा इतिहास पान २०६) रघूजीनें सातान्यास सप्टेंबरांत वस्त्रें घेऊन परत जातांना नासिरजंगास भेटून त्याच्याशीं सख्य केलें होतें. (आ) रामराजे गादीवर आल्यावर मा. ताराबाईही कांहीं हुकूम काढीत असे, असें दिसतें. त्यांपैकींच बावधनचे मोकदमास हुकूम आहे. बाळंभट वैद्यास ३० बिघे जमीन पूर्वीपासून चालत आहे, तशी चालवावी. (प. १८)

३. पेशवे नानासो (बाळाजी बाजीराव):—(अ) यांनीं विश्वनाथभट वैद्याकडून नारायण व्यंकटेश जोशी इचलकरंजीकर यास रु. ५००० देवविले. बाजी मल्हार हा नारायणरावाचा कारकून होता. (प. नं. १) (आ) माधवराव शिवदेव विश्वनाथभटास लिहितात कीं, पेशव्यांचें समाधान करणें कठिण आहे, त्यांना निजामाचा त्रास फार आहे; ते भोरास गेले आहेत. (इ) रामचंद्रपंत करकरे व आनंदराव चिटणीस (जनानखान्याकडील कारकून) भेटले नाहींत, परांडे सरकारची मामलत कोणास द्यावयाची याचा अजून निकाल नाहीं, ती मिळाल्यास पैशाची मदत मागावी लागेल हेंही त्यांनीं सुचवून ठेविलें आहे. (ई) बावधनचे हैबतराव पिसाळदेशमुख, हे बावधनचे मराठे वतनदार देशमुख वैद्यांच्या शेरी जमिनी करणारे होते व अजूनही त्या त्यांच्या वंशाकडे आहेत. त्यांनीं वैद्यबंधूंस कळविलें कीं, पेशवे व दमाजी गायकवाड यांच्या फौजेची लढाई झाली तेव्हां गांवाची फार नासधूस झाली, तथापि गांवाकडून जमिनीची लागण करून पैशाबद्दल कबुलायत घेतली आहे. (प. १७) (उ) वैद्यांकडे हा गांव ठेविण्यास पेशव्यांनीं व मा. ताराबाईनीं मोकदमास कळवून दोन सालचा गला त्यांस द्यावा म्हणूनही कळविलें होतें. (प. १८) (ऊ) विनायक दीक्षित पटवर्धन विश्वनाथभटास लिहितात कीं, पेशव्यांनीं त्यांस हुंडी करून पैसे पाठविले. पण रकमेच्या फेडीसाठीं दिलेल्या मामलतींचा वसूल होणें कठिण आहे. (प. २१).

४. भोसले:—(अ) राणोजी (रघूजीचा चुलता) यास रघूजीनें २०००० रु. काशीभास्कर कोलटकराकडून देवविले. ते पावत्याची ही पावती कोलटकरास दिली आहे. हे रुपये रघूजी देऊरात असतांना काशीभास्करांनीं विश्वनाथभट वैद्य व रत्नाकर विठ्ठल यांजकडून देवविले होते. हे दोघे रघूजीचे सावकार होते. यावर राणोजीचा शिक्का व मुद्रा आहे. (प. २)

५. कृष्णाजी त्र्यंबक लोहकरे— हा राजगड सं. भोरच्या किल्ल्यावरील अमलदार वैद्यबंधूंस लिहितो कीं, महुरीस घर बांधावयाचें तर १५००० खर्च येईल,

तुमचा जो कोणी मनुष्य त्या कामावर पाठवाल त्यास वेठे व इतर साहित्य देऊं. श्रीमंत **पंतसो** यांस १०००० रु. दिले व त्यांचें खत देण्याबद्दल त्यांस त्यानें लिहिलें. **कृष्णाजीपंत पुण्याहून रामचंद्रपंत करकरे** यांजकडून पैसे आणण्यास तयार नाहींत. **राजगड** किल्लयासंबंधानें समजावीस **भोरकरां**शीं चालू असून त्याचा निकाल लवकर तो कळविणार होता. पैसे पाठविणें ते **रामचंद्रपंता**कडे **प्रमाण हुंडीनें** पाठवावें. (प. १६). **प्रमाण हुंडीचा** अर्थ को शांत नाहीं. ज्या हुंडीनें नक्त रोख रुपये मिळतात ती प्रमाण हुंडी असावी.

६. **महादाजी नारायण पोंक्षे** :— हा **वैद्यां**चे कारकुनीचेंही काम दक्षिणेंतील **इनाम**गांवचें करीत असे. पुढें तो **वऱ्हाडां**तही जाऊन मामलती मिळवूं लागला. यानें व आणखी दोघांनीं **बाळापूर, अकोलें, दहियाडे, अलजपूर** व **पेठनांदगांव** येथील मामलत मिळविली होती. यांत मध्यस्थ, **रघूजी करांडे** (**भोसल्यां**चा सरदार) होता. याचे रसदीचे पैसे २ लक्ष रुपये हप्त्यांनीं द्यावयाचे होते. ही रक्कम **बन्सीपुरी गोसाव्या**कडे **रघूजीनें** कर्जफेडीसाठीं भरावयाची होती, असें वाटतें. मक्त्यानें मामलत देण्याची पद्धत कधीं सुरू झाली, हें निश्चित सांगतां येत नाहीं. तथापि **छत्रपति शाहूमहाराजांचे** कारकीर्दीत ती सुरू होतीच.

७. **गोसावी** :— (**अ**) **बन्सीपुरी** यांस रसदेचे पैसे **महादाजी नारायण पोंक्षे** यांनीं मामलती घेतल्यामुळें द्यावयाचे होते. (प. ६) (**आ**) **बभूतगीर गोसावी विश्वनाथभटास** लिहितो कीं, **खंडोजी जाधवास** रुपये २०० द्यावे. (प. १९) (**इ**) **सबाजी कदम** यास **बन्सीपुरी** यांच्या सांगण्यावरून **वैद्यबंधूं**कडून रु. १००० मिळाल्याबद्दल ही पावती त्यानें दिली आहे. या रुपयांत रु. १० बट्टा पडला होता. (प. नं. २२)

८. **केसो भैरव वैद्य** :— हा **वैद्यबंधूं**चा चुलत भाऊ वयानें वडील होता, म्हणून तो त्यांस चिरंजीव असें लिहितो व तो त्यास देण्याघेण्यासंबंधानें सल्लाही देतो. (१) **तांदुळवाडीकर शिदंभट** वैद्यांचा नातू **बापूभट** (राजवैद्य) यांस रु. २००० यानें दिले. **धोंडोपंत जोगळेकर** यांनीं रु. १००० त्यांस द्यावयाचे, पण ते लष्करांत गेल्यामुळें त्यांचेबद्दल ते रु. **केसो भैरवांनींच** दिले. एकूण त्यांनीं **बाळंभट वैद्यां**साठीं ३००० रु. **वैद्यांचें** देणें होतें त्यापैकीं दिले. हे रु. जमा करून आतां किती रु. देणें हिशोबांत निघतात तें त्यानें विचारलें आहे. (प. ९) (२) **रामाजी मल्हार** बर्वे यांच्या **बाळाजीपंत बापट** कारकुनाकडून कळलें कीं, **बर्वे** यांनीं वैद्यांचें देणें होतें ते बिनव्याजी परत घेत असाल तर ते देत आहेत व व्याज घेणें असेल तर **अप्पाजी चव्हाणा**कडून त्यांची येणें रक्कम येईल तेव्हां रक्कम मिळेल व पैसे घेणें तर त्यांचें खत पाठवून द्यावें, तसेंच **धोंडोपंत जोगळेकरही** आपले पैसे परत करण्यास तयार आहेत असें **केसोपंतांनीं** वैद्यबंधूंस कळविलें. (प. १०) (**३**) **केसो-**

पंतांनीं वैद्यबंधूंस विनंती केली कीं, **केसो महादेव कानडे** यास एखादी कमाविशी मिळवून द्यावी. त्यासाठीं लागणारी रसदही देण्यास ते तयार आहेत. या पत्रांवरून **केसोपंत वैद्यबंधूंस** योग्य सल्ला देत असे व दुसऱ्यावर उपकार करण्यासही सुचवीत असे. (प. १३) यांचीं पुष्कळ पत्रें आहेत व त्यांपैकीं हीं ३ च घेतलीं आहेत.

९. केसो कृष्ण शेंबेकर :—**गोपालपंत लघाटे** व **हरबाजी नाना जोशी** यांस यांनीं लिहिलें कीं, **विश्वनाथभट वैद्यांस** रु. ५००० द्यावे. हे रु. **विठ्ठलराव शिवदेव** यांचा मुखत्यार **अप्पाजी रघुनाथ** यांस आमच्या येण्यापैकीं द्यावे. **पेशव्यांनीं लघाटे** यास **चांभारगोंदे** तर्फेपैकीं **लोणी** हा गांव इनाम गेल्या चैत्रांत दिला होता. (प. १४)

१०. अंताजी कृष्ण जोग :—हा **बंगालमधील बरद्वान** प्रांतांतील **चंद्रकोना** येथून **विश्वनाथभटास सातान्यास** पत्र पाठवितो कीं, स्वामीस रु. ५००० देणें आहेत त्यासाठीं **कृष्णंभटजी रायेरकर** यांची **काशीहून** तुमचे नांवची **जोगची** हुंडी घेऊन पाठविली आहे. ती **विसाजी बल्लाळ जोग**च्या रुजुवातीनें घेऊन मिळाल्याचें उत्तर पाठवावें. '**धनीजोग**' हा एक हुंडीचा प्रकार आहे. तुमच्या **जोग**ची म्हणजे तुमच्या नांवाची इतरांना न मिळणारी. **अंताजी** हा **भोसल्याकडील विसाजी कृष्णाचा** जवळचा नातलग असावा. (प. ३)

११. गद्रे :—(अ) गोपाळ अनंत गद्रे :— हा **वैद्यांचा वऱ्हाडांतील** कारकून **नारो अनंताप्रमाणेंच** होता. त्यानें **कृष्णाजी गोविंद गोरे, कृष्णाजी मोरेश्वर, तुळजोपंत** व **रामाजी गिरधर** यांजकडून वसूल होणाऱ्या पैशांबद्दल व **रहाटगांव** व **म्हसांग** येथील जमीनमहसुलाच्या वसुलीबद्दल काय तजवीज केली ही हकीगत वैद्यबंधूंना कळविली. (आ) **नारो अनंत गद्रे :—पातुराहून वैद्यबंधूंस** लिहितात कीं, कर्यात **भुगांव** हे त्यांच्याकडून काढून **रघूजीनें** आपल्याकडे ठेविलें व पूर्वी वसूल केलेला पैसाही परत मागितला आहे. हा हुकूम अमलांत आला आहे कीं काय, हें पाहण्यास ते **भुगांवास** जाणार होते. (प. २०)

१२. राघो बल्लाळ भोगले :—**वैद्यांचा रामटेकचा** हा कारकून त्यास कळवितो कीं, फडनिशी व कारकुनीसुद्धां माझें वेतन रु. ५०० ठरलें होतें. २ वर्षांचे कागदपत्र व हिशेब देऊन मी तिकडे येणार आहें. **रघूजीनें** बोलावलें असतां **विश्वनाथभट** गेले नाहींत, त्यास याबद्दल आश्चर्य वाटलें. (प. १५)

१३. बापूभट दीक्षित :—हा **महाबळेश्वरचा** रहिवासी भिक्षुक होता. तो कर्जबाजारी झाला होता. त्यानेंही **वैद्यबंधूंस** विनंति केली कीं, मला ऋणमुक्त करून मोकळें केलें तर मी तुमचें हितचिंतन करून या क्षेत्रीं सुखरूप राहूं शकेन. **वैद्यांनीं** अशा परोपकाराच्या गोष्टी केल्याचीं पुष्कळ पत्रें आहेत. (प. १२)

१४. **कृष्णंभट काळे**:—हा **नांदिवडयाचा** राहणारा भिक्षुक होता. यास **वैद्यांनीं श्री कऱ्हाटेश्वरावर** कांहीं अनुष्ठान करण्याबद्दल लिहिलें होतें. **रामचंद्रपंत करकरे** हा मा. **सखुबाई** ( **भास्करभटाची स्त्री** ) इजला घेऊन **नांदिवडयास** पोंचविण्यास गेला होता. त्याचेबरोबर हें अनुष्ठान **बाळंभट दातार** यास घेऊन पुरें करावें असें कळविलें होतें. त्याचें उत्तर म्हणून **काळे** लिहितो कीं, पत्राप्रमाणें करीत असतों. **सखुबाईचें** माहेर **नांदिवडयास** असावें. (प. ४)

---

# अंगिरा संवत्सर शके १६७४

## सन १७५२।५३

१. **इनाम व सरंजाम** यांच्या सनदा, **आज्ञापत्रें, हुकूम, कर्जरोखे,** पावत्या व **करार**:—(अ) **जगज्जीवन परशुराम** ऊ. **दादोबा प्रतिनिधि** यांनीं **उंब्रज** तर्फांतील **चोरे** गांवचे **मोकदमास** हुकूम काढला कीं, तुम्ही **बाळंभट वैद्य** यांस कर्ज सव्याज लवकर देऊन टाकावें. ही तक्रार हुजूर ( **छत्रपतीं** ) चे कानांवर गेली आहे. या आज्ञापत्रकावर **प्रतिनिधींचा** शिक्का व मोर्तब आहे. **श्रीनिवास** ऊर्फ **श्रीपतराव परशुराम** यास १३।८।४६ ला मृत्यु आल्यावर **दादोबास प्रतिनिधिपद** १६।१२।४६ रोजीं मिळालें. त्यास १७५० पर्यंत ठेवून घेऊन पुढें **भवानराव** ऊर्फ **श्रीनिवास गंगाधर** यांस तें दिलें. पुढें त्यास १७५२ मध्यें कमी करून पुनः **दादोबास** छत्रपतींनीं **प्रतिनिधि** केलें. ते २०।८।५४ रोजीं वारले. 'निदेश समक्ष' हे पत्राच्या शेवटचे शब्द **प्रतिनिधींचे** स्वतःच्या हातचे होते. (प. ६) (आ) हा **महादाजी नाा निंबाळकर** यांनीं **वैद्यबंधूंकडून** काढलेल्या रु. ४००० चा कर्जरोखा आहे. मुदत ६ महिने व व्याज द. म. द. शें. रु. २ होतें. यावर **दिनकर महादेव**, (**मा. ताराबाईंचा** कारभारी) यांची जामिनकी असून कर्ज २० वर्षांनंतर फेडलें आहे. (प. ४३)

२. **छत्रपति**:—**रामराजे व मा. ताराबाई**:—(अ) **रघूजी बाबा भोसले** म्हणतात कीं, **छत्रपति रामराजे** व **नानासाहेब** यांचें सख्य झालें म्हणजे पैसे देऊं, असें **विश्वनाथभट बाळंभटास** लिहितात. त्यास एका मामलतीची रसद भरावयाची आहे म्हणून त्यांनीं **बाळंभटास** कर्जदारांकडून पैसे वसूल करण्यास लिहिलें होतें. **वऱ्हाडांत** वसुली करण्याकरितां त्यांना **नारो अनंत, सदू मान्या व जखापा कोवडा** यांची जरूरी होती. (प. ३). (आ) मा. **ताराबाईंनीं विश्वनाथभटास**

**रघूजी**कडील कर्ज.वसूल करण्यास मुद्दाम **वऱ्हाडांत** पाठविलें होतें. (प. ११) (इ) **केसो कृष्ण शेंबेकर पुण्याहून विश्वनाथभटास वऱ्हाडांत** पत्र पाठवितात कीं, **रघूजी**कडून येणारे पैसे वसूल करण्यासाठीं त्यांचे सल्लागार, **रघूजी करांडे, त्रिंबकजी राजे वावीकर भोसले** यांस वेळ पडल्यास लांच देऊन वळवावें व पा **पणज व महागांव** येथील वसूल **करांडे** यांजकडे जातो तो बंद करवावा. याबद्दल मा. **ताराबाईस** व **नानासाहेब** यांस व **रघूजीस** पत्र देण्यास **केसो कृष्णानें** तयारी केली होती. त्याचे ३२००० रु. यावयाचे होते (प. १२, १३, १४) (ई) मा. **आईसाहेब** यांनीं **विश्वनाथभट वऱ्हाडांतून वाईस** आले असतां त्यांस ताबडतोब भेटावें असें पत्र पाठविलें. (प. ३०)

३. **पेशवेः—बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासो, पंतप्रधान, सदाशिवराव-भाऊः**— या सालांत **पेशव्यांनीं** स्वतः लिहिलेलें पत्र नाहीं. (अ) **सदाशिवराव-भाऊसो** हे **कोल्हापुरास** कारभारी होण्याची वार्ता आहे, हें **गणेश कृष्णा दामले** यांनीं **वैद्यास** लिहिलेल्या पत्रांत आहे. **निजाम** व **पेशवे** यांचें सख्य झाल्याचें यांच्या पत्रावरून कळलें. (प. ३९) (आ) **नानासो थेऊरास** जाऊन **माळव्यास** जाणार व तो ताब्यांत घेण्यासाठीं **मल्हारजी होळकर** व **गारदीखान** तिकडे अगोदरच पोंचले होते हें **विश्वनाथभटानें बाळंभटास** कळविलें. (प. ९) (इ) **महादाजी नारायण पोंक्षे** यांनीं ३७ गांवची मामलत रु. २५ हजार शिवाय दरबार खर्च कबूल करून **पेशव्यांच्या**मार्फत मिळविली, त्याच्या सनदा व **नरवेल**ची सनद घेऊन पाठवावी म्हणून त्यानें **विश्वनाथभटास** लिहिलें. (ई) **रंगो महादेवानें पंतप्रधान** व **निजाम** यांच्या २० लाखाला झालेल्या तहाची बातमी **विश्वनाथभटास** लिहिली. (उ) **विनाजी केशव दामले** यांनीं हीच बातमी त्यांस लिहिली. (प. ३३) (ऊ) **माहदाजीराम दामले** हे **वैद्यबंधूंस** कळवितात कीं, **कडेगांव** येथें राजकारणी मंडळी जमून **नानासो** व मा. **ताराबाई** यांचें सख्य घडवून आणणार आहेत. सख्य करण्यासाठीं **दिनकर महादेव, सदाशिव रघुनाथ घाणेकर** व **महादाजी ना निंबाळकर** यांनीं खटपट केली होती. (प. ४४, ४५).

४. **भोसले-साबाजी रघूजी, जानोजी, मुधोजी, अजबसिंग व त्र्यंबकजी राजे वावीकरः**—(१) **साबाजी**—यास **रघूजीनें** कळविलें कीं, **विश्वनाथभटाचा** दिमत **नारायणभट गाडगीळ** हे जर **देवगडांतील हुमरीचिखल्या** गांवचा वसूल वगैरे हक्कांचा उपभोग घेतील तर त्यांस अडथळा करूं नये. (प. १) **सदाशिवभट चिपळुणकर** व **परशुरामभट भाभे** हें **वैद्यांचे** मुखत्यार १७४९ मध्यें होते. (वै. द. खंड ४ पत्र ४०). (२) **रघूजी**— यानें **हरी रघुनाथ जोगास** लिहिलें कीं, **विश्वनाथभटास** कर्जफेडीसाठीं पा **अष्टी, विरूर, अरवी** या गांवच्या सरदेशमुखी व बायती या बाबी तुम्हांकडे येतील त्या द्याव्या. (प. २०) (३) **जानोजी**—

चिंतो विठ्ठल फडके यानें जानोजी व तुळजोराम यांस भेटून चंद्रपूरची दफतरदारी मागितली; पण ती मिळेना. विसाजी गोविंदाचा सध्यां राज्यकारभारांत हात नव्हता असें वैद्यबंधूंस त्यानें कळविलें. (प. १५) (४) मुधोजी:— केसो कृष्ण शेंबेकर यानें विश्वनाथभटास अकोटची मामलत मिळण्यासाठीं काय केलें तें कळविलें. त्यांत मुधोजीस रु. १००० दिल्याचें लिहिलें होतें. मुधोजी हे उमरावतीहून मुळतापीकडे जाणार म्हणूनही त्यानें लिहिलें आहे. (प. ३६, ३१) (५) अजबसिंग — भिकाजी बल्लाळ वैद्य यांस पांडवगडास आपल्या हाताखालीं काम करण्यास नेमिले आहेत, असें मा. आईसाो यांनीं यास कळविलें. (प. ४१). (६) त्र्यंबकजीराजे वावीकर:— यांनीं आपला मुलगा रामराजे यांस दत्तक दिला. तोच दुसरा शाहू. त्र्यंबकजी हा रघूजीचा सल्लागार होता.

५ पंतसचीव चिमणाजी नारायण:—(अ) पंतांनीं मावळ प्रांताचा सुभेदार गोविंद सामराज वडगांवकर यास लिहिलें कीं, रा. वैद्यबंधु हे धोमास राहण्यास गेले आहेत. ते १।२ गडकरी कामास मागतील व कांहीं कामकाज सांगतील तें बिनबोभाट करावें. (प. १९) (आ) पंतांना वैद्यबंधूंकडून रु. ४५,७४४ पाहिजे होते, म्हणून त्यांनीं त्यांना बीडआंबडव व जालनापूर या गांवचा वसूल त्यास लावून दिला व आणखी नवीन करार केला कीं, नेहमींच्या खर्चासाठीं वैद्यांनीं हातावर रु. ५० हजार द्यावे. हा करार वार्डानजीक विचित्रगडास केला. (प. ३७)

६. पंतप्रतिनिधि:—(अ) जगज्जीवनराव प्रतिनिधि यांनीं मौजे चोरेगांवच्या मोकादमास वैद्यांचें कर्ज लवकर फेडण्याबद्दल ही ताकीद दिली आहे. (प. नं. ६) (आ) बाळंभट वैद्य यांनीं रघूजी भोसल्यास साताऱ्याच्या व इतर राजकारणाच्या बातम्या कळविल्या. त्यांत प्रतिनिधि व बाबूजी नाा बारामतीकर यांचेमध्यें तांदुळवाडीजवळील चिंचनेर येथें झालेल्या झटापटीची हकीगत वैद्यबंधूंस कळविली आहे. (प. ४२, ४४) (इ) महादाजी राम दामले व केसो कृष्ण शेंबेकर यांच्या पत्रांत ही बातमी दिली आहे. (प. २५)

७. विश्वनाथभट वैद्य यांनीं लिहिलेलीं पत्रें:—(१) यांनीं बाळंभटास कर्जदारांकडून पैसे वसूल करून बरीच रक्कम मागितली होती. त्यास रसद देऊन मामलत मिळवावयाची होती. त्यांचे पैसे रघूजीकडून यावयाचे होते. पण तो म्हणूं लागला कीं, मा. ताराबाईचें व पंतप्रधानांचें सख्य झाल्याशिवाय तजवीज होणार नाहीं. (२) वऱ्हाडांतून ते श्रावणांत इकडे येणार होते. तिकडून येतांना ते नेहमीं कांहीं जिन्नस घेऊन येत. त्यांचे खरेदीसाठीं नोकर सदू मान्या व जखाप्पा कोबडा यास व नारोपंत गद्रे कोंकणांतून आले असल्यास त्यांस बोलावलें होतें. (प. नं. ३) (३) दुसरें पत्र बाळंभटांसच होतें. त्यांत या नोकरमंडळीशिवाय गोविंदशेट वायकोल यास बोलावलें होतें व हत्तीत पाठवावें म्हणून लिहिलें होतें. (प. ५) (४) कृष्णाजी गोविंद गोरे,

सुभेदार प्रांत **वऱ्हाड**, यास लिहिलें कीं, आमच्या रुपयांपैकीं रु. ६३०० **निळो रघुनाथ** वैशंपायन यांस द्यावे. (प. नं. ३६) (५) **नारो अनंत गद्रे** यांस **उंदेरी**हून लिहिलें कीं, तिकडील **भुगांव, टेकाडी, मवाड** व **विसापूर** या गांवचा जमीनमहसूल व प्रांत **देवगडा**मधील **पोतदारी** अमल यांच्या वसुलासाठीं ताकिदीचा उपयोग करून पैसे वसूल करावे. या कामीं **शंकराजी कान्होचा** उपयोग करावा असेंही लिहिलें होतें. (६) त्यांनीं त्यास **बंगालचें** रेशमी कापड विकत घेण्यास लिहिलें होतें. **महाराष्ट्रीय लोकांस बंगाल्या**पर्यंत जाण्याचा प्रसंग आल्यामुळें तिकडील जिनसाही घेण्याची इच्छा होऊं लागली व त्यामुळें दूरच्या प्रांतांशीं त्यांचा व्यापार वाढला. (प. ३४)

८. **रामभट व बाबुराव वैद्य** :—**विश्वनाथभटांनीं भिकंभट, रामभट, बाबुराव** व **कृष्णराव** या आपल्या मुलांस जीं पत्रें **वाई** सोडल्यावर लिहिलीं, त्यांत त्यांनीं त्यांस संसाराची व राजकीय कामाची कशी माहिती करून दिली आहे, हें कळण्यासाठीं युवा संवत्सर शके १६७७ मधील पत्रांक १४ खालीं एक टीप दिली आहे, ती मुद्दाम वाचावी, अशी विनंति आहे. या दोघांनीं, **विश्वनाथभटांनीं** लिहिलेल्या कामाबद्दल काय केलें त्याचें उत्तर या पत्रांत आहे. हें पत्र **ग्रेगोरियन** शकाचा पार्लमेंटचे मंजुरीनें अमल झाल्यावर इंग्रजी तारीख ३ सप्टेंबरच्याऐवजीं १४ सप्टेंबर **इंग्लिश** लोक लिहूं लागले. हें पत्र ग्रेगोरियन पद्धतीनें दिलेल्या तारखेचें एक उदाहरण आहे. पूर्वीच्या शकास **जूलियन** म्हणतात. (प. १६)

९. **खाजगी-घरगुती** :—(अ) कांहीं **लावगनकर वैद्यांनीं नरवण** येथें जाऊन तेथेंच वस्ती केली. त्यांजकडे **लावगनचे** रहिवासी औषधपाण्यासाठीं जात. तेथील **नारायणभट** हे वैद्यकींत निष्णात होते. ते **बाळंभटां**पेक्षांही वडील होते. **बाळंभटांचा** मुलगा **रामभट** हा आजारी झाला असतांना त्यांस **कोंकणांत** पाठविलें होतें. त्यांस **नारायणभटांचें** औषध चालू केलें होतें. त्या संबंधाचीं हीं २ पत्रें दिलीं आहेत. औषधाचे पैसे देण्याचीही **बाळंभटांनीं** तजवीज केली होती. (प. २३, २४) (आ) **केसो भैरव वैद्य** यांनीं **रामभटांच्या** लग्नासाठीं **भास्कर हरी पटवर्धन** यांची मुलगी ७ वर्षांची पाहिली होती. त्यासाठीं त्यांनीं **वैद्यांकडे** मुलीचें पत्रिकेचें टिपण व उंची पाठविल्याचा मजकूर या पत्रांत आहे. पुढें **रामभटांचें** लग्न **पाडळीचे आठवल्यांच्या** मुलीबरोबर झालें. (इ) **धोंडू दामले** यानें **सखूबाई** (भास्करभटाची बायको) इजला आशीर्वाद लिहिला आहे. हे **दामले नांदिवड्याचें** असून **धोंडू** हा **सखूबाईचा** धाकटा भाऊ असावा. (प. नं. ४०) (ई) **महादाजी नारायण पोंक्षे** यांच्या मुलीचें लग्न **जोगांच्या** मुलाशीं ठरलें. हे **पोंक्षे मावजन**जवळील **आमझ्याचे** राहणारे होते.

१०. **हिशोब यादी** :—(१) **नारोपंत जोगांत** रुपये दिले ते कोण कोणांकडून देवविले त्याची ही यादी आहे. यांतील माणसें प्रसिद्ध असून धनसंपन्न आहेत. (प. ७)

( २ ) कोंकणांतील रत्नागिरी तालुक्यांतील तर्फ सैतवड्यामधील कोळिसरे गांवचे गोविंद बल्लाळ व नारो अनंत तेरेदेसाई यांच्या वैद्य-दफतरांतील पैशाचा हिशोब हा आहे. हे देवरुखे ब्राह्मण असून त्या वेळीं श्रीमंत होते. यांची वैद्यांशीं पैशाची देवघेव होती. यांना वैद्यांनीं आपला पुतण्या बापूभट यांजकडून रु. ४० देवविले. पत्रावरील तारीख ग्रेगेरियन आहे. ( प. १७ )

( ३ ) विश्वनाथभट वऱ्हाडांत असतांना वाईकडे मुलांना पत्रें पाठवीत, त्याचीं उत्तरें जात. त्यांची ही संक्षिप्त यादी भिकंभट किंवा बाबुराव यांनीं केलेली आहे. त्यांतील विषय पूर्वींच्या पत्रांतून येऊन गेले आहेत व ते महत्त्वाचे आहेत. ( प. २१ )

( ४ ) त्रिंबक बाबाजी ना नातू यांचे वैद्य-दफतरांतील हिशोब देण्याचें कारण इतकेंच कीं, त्यांचे वैद्यांशीं फार जुने देवघेवीचे व्यवहार होते व नातू-घराणें प्रसिद्ध आहे. त्यांच्यासंबंधीं कुलवृत्तांत लिहितांना इतका जुना पुरुष देतां येईल. मोठ्या रकमा त्यांस दिल्यानें लावगन-जवळील गांवचे लोकांशीं व वैद्य-घराण्याशीं यांचा फार परिचय असला पाहिजे. ( प. २२ )

११. साठे :—

( १ ) शिवभट— हे ओरिसा प्रांताचे सुभेदार ( गव्हर्नर ) होते. त्यांच्यासंबंधानें एक टीप शके १६७७ युवा संवत्सरच्या कागदांत पत्रांक ३१ खालीं दिली आहे. ती मुद्दाम वाचावी अशी विनंति आहे. त्यांचा संबंध ज्या पत्रांत या सालांत आला आहे तेवढ्यांचाच खुलासा देत आहें. (अ) त्यांनीं तुळाजी ना भोई भोकरे यास कर्जरोखा लिहून घेऊन ५० रु. १५ दिवसांच्या मुदतीनें शेंकडा ४ रु. व्याजानें दिले होते. त्याच्या-साठीं एका भोयासच जामीन घेतला होता. बंगालची चौथाई १२ लक्ष घेणाऱ्या कर्तृत्व-वान् पुरुषाचा हा व्यवहार किरकोळ रकमेचा आहे हें लक्षांत यावें, म्हणून कर्जरोखा छापला आहे. (ब) वाईच्या रास्त्यांनीं शिवभटास पैसे उसने दिले होते, ते लवकर परत आले नाहींत म्हणून काशिराव रास्ते यांजकडून त्यांस तगादा केला. धोंडशा व विठोबा हे हरबा रास्त्याचे मुलगे व काशिराव हा भिकाजी ना रास्ते यांचे चुलत भावाचा नातू. हे तीन रास्ते ५ व्या पिढींतील होते. वाईस वाईंतील काशी विश्वेश्वराचें देऊळ हें काशिरावाच्या नांवानेंच आहे. हें पत्र विश्वनाथभटास आहे. (प. ८) (क) हें पत्र रास्त्यांनीं खुद्द शिवभटासच पैशासाठीं लिहिलें आहे. (प. १०) (ड) रंगो महादेव यानें शिवभटास बंगाल्याहून आणलेल्या पैशांपैकीं वैद्यांस पैसे देण्याबद्दल हें तगाद्याचें पत्र लिहिलें होतें. ( प. ३५ )

(२) **महादाजी जिवाजी साठे**— यांना **साचिवांच्या अंबवडयाच्या नागोबाच्या** देवालयाच्या बांधकामासाठीं यावयाचे पैशांपैकीं रु. ५३० पोंचल्याची ही पावती **वैद्यांना** दिली आहे. (३८) **महादाजीपंत साठे** यांच्याशीं **वैद्यांचा** फार चांगला परिचय होता. **धोमच्या कृष्णेच्या** वरच्या घाटाच्या पायऱ्या बांधण्याचें काम पाण्याचा व्यत्यय लक्षांत घेऊन करावें म्हणून त्यास बोलावून आणलें होतें. त्या पत्राचें उत्तर **साठे** यांनीं अगत्यानें पाठविलें होतें त्यावरून परस्पर लोभ दिसून येतो. (प. ३८)

**१२. रघूजी करांडे** :—हा **रघूजीचा** सरदार असून त्यास राज्यकारभारांत मदत करणाऱ्या मंडळींपैकीं होता. याची देवघेव मोठी होती. (अ) त्याच्याकडे **केसो कृष्ण शेंबेकर** यांची रु. ३२००० रकम येणें होती ती वसूल कशी करतां येईल याचा मार्ग **शेंबेकरानें विश्वनाथभटांस** व **रघूजीस** लिहिला होता. (प. १३, १४) (आ) **कृष्णाजी गोविंद** व **रघूजी करांडे आकोटास** घासदाणा मिळेल म्हणून गेले होते. तेथें गेल्याचें **केसो कृष्णानें विश्वनाथभटांस** कळविलें होतें. (प.. २६) **करांडे** प्रथमतः **जानोजीच्या** बाजूस होता. पुढें तो **मुधोजीस** सामील झाला. तो व **मुधोजी व्याहाडास** रुसून गेले होते. त्यांची समजूत **रघूजी** व **जानोजी** घालीत होते, हेंही **केसोपंताच्या** पत्रांत होतें (प. २७) **करांडे** यानें रु. २५००० **वैद्यां**कडून कर्ज काढलें होतें. त्याचा रोखा लिहून दिला होता. त्यावर त्याचा शिक्का व मोर्तब आहे. (प. २८).

**शेंबेकराकडे अकोट** परगणा जर ठेवला असता तर त्या खर्चवेंच वजा जातां त्यास रु. २५००० मिळाले असते. त्या रकमेंतून **विश्वनाथभटास** कांहीं रकम मिळणार होती; पण **अकोट** परगणा **देवढीकडे** देण्यांत आला होता. हा परगणा असा वादांत पडल्यामुळें तिकडील जमीनदारांकडून कांहीं वसूल **केसोपंतास** मिळण्याची आशा नव्हती. पुढें हा परगणा **करांडे** यानें आपल्या नांवानें करून घेतला.

**१३ केसो कृष्ण शेंबेकर** :—हा मोठा सावकार **रघूजीच्या** राज्यांत देवघेवीचा व्यवहार करीत असे. (१) **रघूजी करांडे** यास रु. २५००० दिले होते. हें वर दिलेंच आहे. पैसे मिळाले नाहींत, ते **रघूजी** व **करांडे** यांजकडे आपलें वजन खर्च करून मला मिळवून द्यावे, असें तो **विश्वनाथभटास** म्हणत होता; इतकेंच नव्हे तर त्यास लांच देण्यासही तो तयार झाला होता. याबद्दल त्यानें **विश्वनाथभट** व **रघूजी** यांना पत्रें निरनिराळीं लिहिलेलीं आहेत. **पणज** व **महागांवची** मामलत या पैशासाठीं देतों असें **रघूजीनें पुण्याहून नागपुरास** जातांना **केसोपंताशीं** ठरविलें होतें; पण **नागपुरास** गेल्यावर त्या मामलती **रघूजीनें करांडे** यांजला दिल्या. या पैशाच्या वसुलीसाठीं **केसो कृष्णानें** आपला भाऊ **लक्ष्मण** यास नागपुरास पाठविलें होतें. (प. १३, १४) **अकोट** परगण्याची मामलत

केसो कृष्णास विश्वनाथभटांनीं मिळवून दिली होती. ते पुण्यास गेल्यावर ती मामलत रघूजीनें शेंबेकराकडे ठेविली नाहीं. मामलतीची रसद शेंबेकरानें ३० हजार रुपये देऊन रघूजीस दिली होती व मुधोजीस १ हजार दिले होते. हे रुपये कर्ज काढून दिले होते. अशा संकटांतून मला सोडवा असें तो विश्वनाथभटास लिहीत होता. (प. २६)

१४. कृष्णाजी त्र्यंबक लोहोकरे :— हा राजगड सं. भोर येथील किल्ल्यावरील अमलदार होता. यानें किल्ल्यावरील हवालदार सिदोजी इंगळे व कारकून यांस लिहिलें कीं, वैद्यांचा दिवाण रामचंद्रपंत करकरे आला आहे. याचे रुजुवातीनें वैद्यांचें इनाम गांव जांभळी व मोहरी येथील पाटील व शेतकरी परागंदा झाले आहेत त्यांस आणून गांवचे हिशोब पुरे करावे व गांवच्या पुढील लावणीचा कौल गांवकऱ्यांकडून घेऊन लावणीस सुरुवात करवावी. या पत्रांत लोहोकरे (ब्राह्मण) यांनीं इंगळे (मराठे) यांस आशीर्वाद व कारकून (ब्राह्मण) यांस नमस्कार लिहिला आहे. (प. २)

१५, माहादाजी नारायण पोंक्षे :— यानें २७ गांवची एक मामलत वैद्यांमार्फत पंतप्रधानाकडून मिळविली. त्याची रसद रु. २५००० दरसाल द्यावयाची होती. त्याच्या सनदा आपला मुलगा मोरोपंत व कृष्णाजी गोविंद गोरे याचा मुलगा या दोघांच्या नांवानें किंवा आपल्या एकट्या मुलाच्या नांवानें घ्याव्या असें त्याचें वैद्यांना म्हणणें होतें. (प. १२). याच्या मुलीचें लग्न ठरल्याची बातमी शेंबेकर व दामले यांनीं वैद्यांस कळविली. (प. ४२, ४४).

१६. चिंतो विठ्ठल फडके :— वैद्य हे मराठ्यांतर्फे भोसले दरबारीं पहिले. बाजीरावापासून वकील होते. त्यांनीं भोसल्यांचीं पुष्कळ राजकीय कामें करून दिलीं होतीं. त्यास लाखों रुपये कर्ज लागलें तेव्हां त्यांनींच दिलें. त्याचा मोबदला म्हणून त्यास भोसल्यांनीं वऱ्हाड प्रांतांतील गांवच्या वसुलावर निरनिराळे हक्क दिले. ते वसूल करण्यासाठीं त्यास महाराष्ट्रांतील हुषार माणसें नेऊन त्यांजकडून तीं कामें करून घ्यावीं लागलीं. या माणसांपैकींच चिंतो विठ्ठल हुषार कारकून होता. तो त्यास तिकडील राजकीय उलाढालीच्या बातम्याही पुरवीत असे. तो चांदा प्रांतांतील चंद्रपूर येथें जाऊन जानोजी भोसले व तुळजोपंत यांस भेटला. त्यांजपाशीं चंद्रपूरची दफ्तरदारी मागितली ती त्यांनीं नाकारली. वैद्यांनीं त्यांजकडे पाठविलेल्या ताकिदीस ते जुमानीनात. वैद्यांनीं विसाजी गोविंदांस त्याला मदत करण्यास पत्र लिहिलें होतें. पण त्याचें दरबारांत वजन नव्हतें. भोसले, तुळजोपंत व दिवाकरपंत यांच्या सल्ल्यानें राज्यकारभार चालत असे. (प. १५) चिंचवडच्या देवांच्या दप्तरांतील हें पत्र छापलें आहे. त्यांत या चंद्रपूरच्या मामलतीचा उल्लेख आहे (प. ३८).

१७. (१) **शंकराजी कान्हो**:—हा वऱ्हाडांतील **वैद्यांचा** कारकून. कर्यात **मुगांव** येथें काम करीत असे. **रघूजीनें वैद्यांचें** इनाम गांव, सरंजाम व पोतदारी हक्क जप्त करून टाकले हें यानें **विश्वनाथभटास** कळविलें. **वैद्यांशीं भोसले** इतके वांकडे कसे झाले याबद्दल सर्वांस वाईट व आश्चर्य वाटलें. या **भोसल्यांच्या** कृत्यानें **कान्होची** चाकरी बंद होऊन मिकळत गेली. अशा स्थितींतही तो **उंदेरीस तुळजोरामास वैद्यांचे** पैसे मागण्यास गेला होता, पण कांहीं मिळालें नाहीं. (प. २५)

(२) **विश्वनाथभटांनीं नारो अनंतास** पत्र लिहिलें कीं, **वऱ्हाडांतील** इनामें, सरंजाम वगैरे जप्त केल्याची बातमी कितपत खरी तें कळवावें. तिकडील वसुलासंबंधीं पाठविलेले हुकूम बजावून वसुलाचें काम करून पहावें. या कामीं **शंकराजी कान्होची** मदत घ्यावी. हें पत्र **उंदेरीहून** लिहिलें आहे. ही **उंदेरी हैद्राबादे**कडील असावी. (प. ३४)

(३) इतक्या लांबवर जाऊन महाराष्ट्रीयांनीं आपल्या वागणुकीचा त्या देशांतील लोकांवर व्यापार व चालीरीति यांवर कसा परिणाम घडवून आणला हें पहाण्याजोगें आहे. **विश्वनाथभटांनीं कान्होस** आपलें काम सोंपवून **वाईकडे** यावें असें **नारोपंतास** लिहिलें होतें. (प. १४)

१८. **शिवराम तुकदेव करमरकर**:—हा वैद्यांचाच कारकून–**कान्हाटी बारामती**कडील वसुलाचीं कामें करीत असे. याच्या बरोबरीला **धोंडो अनंत जोग**ही काम करी. **विश्वनाथभटांनीं वऱ्हाडांतून** परत आल्यावर **नरोजी जाचक** (**रघूजीचा सरदार व सल्लागार**) यास कर्ज देण्याचें कबूल केल्याचें व याबद्दलचा कर्जरोखा लिहून घेतल्याचें यांस कळविलें होतें. त्यावर **बाजी विठ्ठल फडके** यांची साक्ष होती. **वैद्यांना** त्या कागदामुळें **नारोजीस** रु. २००० द्यावयाचे होते. **जाचकाचें व रघूजीचें** वांकडें आलें होतें, तें **वैद्यांनींच** सरळ करून दिलें. **जाचक** लोक **ओरिसांत बाराभाटीच्या** किल्ल्यावर किल्लेदार होते. **शिवभटास** १७५६ मध्यें **ओरिसाचा** सुभेदार केलें, तेव्हां त्याच्या बरोबर **जाचकास भोसल्यांनीं** दिलें होतें. (प. ३२)

१९. **रंगो महादेव**:—याचें आडनांव समजलें नाहीं. हा **वैद्यांचा वऱ्हाडांतील** वसुली करणारा कारकून व बातमीदार होता. त्यानें यजमानांनीं सांगितलेल्या कामाची काय तजवीज केली हें सविस्तर देऊन तिकडील महत्त्वाच्या व्यक्तींच्या हालचालीही या पत्रांत कळविल्या आहेत. **निजामाशीं** ठरलेल्या तहाबद्दलही त्यानें लिहिलें आहे. **रघूजीनें नजरपट्टी, नोकरपट्टी व खर्चपट्टी** लोकांवर बसविली हें कोणास आवडलें नाहीं. (प. २९) दुसरें पत्र यानें **नागपुराहून** लिहिलें. त्यांत कामें कशीं विल्हेस लाविलीं याची सविस्तर हकीगत दिली आहे. **शामजी फुलाजी**कडून त्यास कळलें कीं, मोगलांशीं अजून तडजोड झाली नाहीं. त्यानें पत्रांत त्या वेळच्या अव्यवस्थित **भोसल्याच्या** कारभारास नांवें ठेविलीं आहेत. त्यानें **शिवभटास बंगाल्याहून** आणलेल्या पैशांपैकीं **विश्वनाथभटांच्या** पैशाबद्दल पत्र पाठविलें होतें. (प. ३५)

**२०. पिराजी बाबर:**—हा एक वैद्यांचा विश्वासूक नोकर **धोंडोपंत जोग** व **शिवराम तुकदेव करमरकर** या कारकुनांबरोबर वसुलाचें व इतर खाजगी कामें सुपें, कऱ्हाटी, बारामती वगैरे ठिकाणचीं करीत असे. हाच **बारगांव मालोचेचा** पाटील **बोतरे** यांचे हजिरीसाठीं जामीन राहिला होता. (प. १८) (आ) पत्रांतील वायदे रोख्यांत दिलेला सन, सुरू सन हजार ११६२ असा दिला आहे; पण हा सुरू (सुहूर) सन धरला तर या सनावरून इसवी सन काढण्यास मृगापूर्वी ६०० व नंतर ५९९ मिळवावे लागतात. तसें केलें तर इ. सन १७६२ येत नाहीं म्हणून हा फसलीच धरला पाहिजे. तसा जंत्रीवरून निघतो. **शहाजहान** बादशहाचे कारकीर्दीपासून मुसलमानांचा फसली सन राहिला व इतर शक बंद झाले.

**२१ दामले:**—या **दामल्यांचा** उल्लेख पुष्कळ ठिकाणीं आला आहे. त्यांची वंशावळ मिळणें जरूर आहे. (१) **धोंडू दामले:**— याचा उल्लेख प. २४ मध्यें झालेला आहे. (२) **महादेव ना दामले:**—हे वऱ्हाडांत गेले होते व **नानाजी कृष्ण जोशी** व **गणेशपंत दामले** हे **पुण्याहून पंतप्रधानांच्या** हुकुमावरून तिकडे गेले होते, ते परत आले. त्यांच्याबरोबर **महादेव ना** देशास गेले. याशिवाय याच वेळीं **गणोबा ना कोलटकर** व आणखी कांहीं मंडळींही गेली. **महादेव ना** व **सदाशिव ना सहस्रबुद्धे** व **विसोबा ना सहस्रबुद्धे** यांनीं सर्वांनीं मिळून ८००० रु. **भिकंभटांच्या** हुंड्या आल्यावरून दिले. **वाईचें** पत्र आल्यावरून येथील बाकी मोडतोड करून वसूल केली. यजमान आम्हांस वरचेवर पैसे मागतात, ऐवज होता तो **श्रींच्या** हुंडीखर्चाबद्दल जमा केला असें हा म्हणतो. (प. २९). (३) **विनाजी केशव दामले:**— यांनीं **भाडळीहून** लिहिलेल्या पत्रांत महत्त्वाची बातमी म्हणजे **निजाम** व **पेशवे** यांचें ऐक्य झालें. (प. ३३) (४) **गणेश कृष्ण दामले:**—हे **वैद्य**बंधूंस कळवितात कीं, **बाळाजी थोरात** यांजकडून तुमचे रुा ४०० येणें ते आमचेकडे आले. जमा केले आहेत. दुसरी **बातमी अशी**, लिहितात कीं, **पेशवे सदाशिवरावभाऊ कोल्हापूरचे** दिवाण होण्याचा संभव आहे.

**२२. मनाजी टेंभेकार:**—यांजकडे **नागपूरपेठचीं वैद्यांचीं** कामें असत. दसऱ्यास **रघूजी जानोजी** व **मुधोजी** यांच्या भेटी झाल्या; पण त्यांचें रहस्य दिसून आलें नाहीं असें हा **वैद्यांस** लिहितो. **मुधोजीबाबा** व **रघोजी करांडे** हे रुसून **व्याहाळास** गेले. त्यांची समजूत **रघूजीबाबा** घालीत होते. तीन ब्राह्मणांना राज्यकारभारांतून काढण्याचा बेत चालला होता. ही बातमी **विश्वनाथभटास** यानें कळविली. **कृष्णाजी गोविंद सुभेदार** व **बुऱ्हाणशाराजे** यांचेकडील पैसा वसूल होण्यास **रघूजीबाबास** लिहिल्याखेरीज वसूल होणें नाहीं, असें हा म्हणतो. (प. २७)

# श्रीमुख संवत्सर १६७५

## इ. स. १७५३।५४

**१. पंतप्रधान, बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे** :—( अ ) **वैद्यांकडून** काढलेल्या पैशांचा हा व्याजासह हिशोब आहे. असें दिसतें कीं, **वैद्यांनीं** दरसाल **पेशव्यांना** ५० हजार रु. द्यावयाचे होते. या देण्याशीं **बापुराव हरि दीक्षित** व मा. **ताराबाईचा** कारभारी **दिनकर महादेव** यांचा संबंध यांत आलेला आहे. **( प. ८ ). ( आ )** याच रकमेचा हिशोब मार्च २३, १७५४ पर्यंत केला असून त्यांत अधिक महिनाही धरला आहे. **विनायक दीक्षित** हे **बापूराव हरीचे** नातलग असावेत. त्यांसच पैसे आणण्यास पाठविलें होतें. या व्यवहारावरून **पेशवे** यांचें **वैद्यांस** वगळून कांहीं चालत नव्हतें. या पैशांबद्दल **वैद्यांस पेशव्यांनीं** रोखा लिहून दिला होता. **( प. ४० ). ( इ )** हें पत्र **चिंचवडचे** देवांचें दप्तर पाहतांना रा. **कृष्णाजीपंत पुरंदरे** यांस मिळालें. त्यांनीं याचा संबंध **वऱ्हाडच्या चंद्रपूर** परगण्याच्या मामलतीच्या रसदीशीं असल्यामुळें छापण्यास दिलें होतें. या परगण्यावसुलीशीं **वैद्यांचा** संबंध होता. वसुलीचा आंकडा १ लक्ष रुपयांचा होता. या पत्रांत **नानासाहेब पेशवे, मुधोजीचा दिवाण, (सदाशिव हरी), केशवभट कर्वे, त्रिंबकराव**मामा यांसारख्या लोकांचा उल्लेख आहे. **राघो बाजी** हा **देवाचा** कारकून असावा. त्यानें हें पत्र **नानासाहेब पेशवे** यांस लिहिलेलें आहे असें वाटतें. **( प. ३८ )**

**२. पंतसचीव चिमणाजी नारायण** :—( १ ) **पंत सचिवांस वैद्यबंधू** पैशाच्या कामीं व राजकीय सल्लागार म्हणून पुष्कळ उपयोगी पडत. ही जाणीव पूर्णपणें त्यांस असल्यामुळें ते कोणतेंही **वैद्यांचें** काम आपुलकीनें व काळजीनें करीत. या संबंधाचीं पत्रें मधून मधून देण्यांत आलीं आहेत. **वैद्यांना** लागणारे वासे, गवत, पानांचे भारे व चूडवेडे इनामगांवांतून आणण्यास अडथळा होऊं नये म्हणून **राजगडकरी** यास **जांभळीच्या** पाटलाबरोबर ताकिदीचें पत्र लिहिल्याचें **बाळंभटांस** त्यांनीं कळविलें. **( प. १ ) ( २ ) विश्वनाथभट भोरास** गेले असतां, त्यांचेजवळ **पंतांनीं** ऐवज मागितला तो त्यांस घरचें **रामभटांचें** लग्न उरकल्यावर देईन म्हणून त्यांनीं कबूल केलें होतें. **पण** वेळेवर सोय करतां येईना म्हणून **पंत** अडचणींत असल्यामुळें पुनः **वैद्यांस** लिहिलें कीं, पैसे दुसऱ्याकडून देववा व गरज भागवा. मी **सुपें** परगण्यांतील **कोथुळे** किंवा **कर्डेकडेवळित** परगण्यापैकीं एखादें गांव यांचा वसूल लावून देतों. **रास्त्यांच्या**कडे ते गेले होते. पण **पंतांस** त्यांनीं पैसे दिले नाहींत. **( प. ६ ). ( ३ ) बाळंभट**

शिरवळ येथें राहावयास गेले असतां त्यांस रोज लागणारे जिन्नस गवत, लांकूडफाटी व इतर जिन्नस देण्याबद्दल शिरवळच्या होनाजीरामास पंतांनीं पत्र पाठविलें होतें. (प. ९). (४) १० खंडी तांदूळ विश्वनाथभटांनीं वाईस नेण्याबद्दल पंतांनीं हें दस्तक (परवाना) दिला आहे. पत्रावर शिक्का शंकराजी नारायणाचा आहे. (प. २७)

३. भोसले:—(१) रघूजी भोसले—(अ) गणेश मुकुंद यानें दंडवत असें नमस्काराऐवजीं लिहिलें आहे म्हणून त्यास मराठा म्हणावें लागतें. राजाराम मुकुंदाचा हा भाऊ होता कीं काय, कळत नाहीं. यानें भोसल्यांसंबंधीं कांहीं बातम्या वैद्यांना लिहिल्या आहेत:—(i) रघूजीचे ३ दिवसांचे मुक्काम दिले आहेत. (ii) रघूजीचें लग्न देवजी शिर्के याच्या मुलीशीं होणार होतें, तें पुढें ढकललें. (iii) रघूजी व निजाम यांची लढाई चालू असल्याची बातमी अगदीं खोटी आहे. पत्रांत लेखकानें वऱ्हाडांत वैद्य केव्हां येणार हें विचारलें आहे. (प. १४). (ब) नारो अनंतानें वैद्यांस कळविलें कीं, कृष्णाजी मोरेश्वर यानें शिक्केनविसीचे व वकिलातीचे जे पैसे जमा केले, त्यांपैकीं ४००० सिकेनविसीचे रघूजीस देऊन बाकीचे वकिलातीचे रु. २००० विश्वनाथभटांसाठीं त्यांनीं ठेविले आहेत. (प. ३). (क) रघूजीला हंसपुरी गोसावी यांचें कर्ज देणें होतें. त्याचे फेडीसाठीं रु. ६०००० त्यांस द्यावे म्हणून विश्वनाथभटास त्यानें कळविलें. ही रक्कम विश्वनाथभटांना शिवभट साठे यांजकडून नुकतीच मिळाली होती. (प. २६). (ड) रघूजी हे प्रकृतीस बरें वाटत नसल्यामुळें माहुरास सैन्य पाठवून आपण नागपुरासच राहणार आहेत, असें आपल्या मुलांना लिहिलेल्या पत्रांत विश्वनाथभट कळवितात. (प. ३३) (२) अजबसिंग भोसले:— हा हवालदार पांडवगडचा होता. पत्रावरील शिक्का लेखक अजबसिंग यांचाच असावा. त्यांत माधोजी शंकर असें नांव आहे, तें अजबसिंगाचें असावें. लेखकानें लेख्यास राजश्री काका वडील असें लिहिलें आहे. लेखक व लेख्य यांचें नातें कांहीं असल्यास ठरविणें जरूर आहे. यांत विश्वनाथभटांना किल्ल्यावर काय काय तजविजी पाहिजेत त्याची माहिती दिल्याचें अजबसिंगानें कळविलें आहे. (प. २१)

४. हैबतराव भवानीशंकर पंत राजाज्ञा:—हे वाई परगण्याचे सुभेदार होते. ह्यांना 'पंत देशपांडेही' म्हणत. त्यांचे वंशज अजून वाईस आहेत. वाई तालुक्यांतील कुसगांवच्या जंगलांतील गवत नेहमीं धोंडोबा ना रास्ते नेतात. त्यांचीं मनुष्यें तें नेण्यास आलीं तर त्यांस अडथळा करूं नये, पूर्वापार त्यांचा तो हक्क आहे, असें जिवाजी कुरणे यास हैबतरावांनीं सांगून ठेविलें होतें. पत्राचे शेवटीं 'मोर्तब सुद' हीं अक्षरें लेखकाचीं स्वतःचीं आहेत. शेवटीं मोर्तब आहे. (प. २३) हे छत्रपतीचे खाजगी कारभारी असून त्यांस महाराजांची खाजगी मिळकत संभाळावयाची असते.

(प. २३). 'राजाज्ञा' हें पद थोरले **संभाजीमहाराज** यांच्या कारकीर्दींत निर्माण झालें. राजा **संभाजीचा** वध ११-३-१६८९ रोजीं झाल्यावर **अवरंगजेबास** त्याच्या व **राजारामाच्या** कुटुंबियांची व्यवस्था करावी लागली. **राणी येसूबाई** व **शाहूमहाराज** यांस **रायगड** काबीज करून आपल्या छावणींत आणून कैदेंत ठेविलें. त्यांचा मोठा परिवार होता. त्यांच्या व्यवस्थेचें काम **अवरंगजेबाची** मुलगी **पातशहाबेगम** इजकडे दिलें होतें. त्यांची व **संभाजीच्या** नाटकशाळा व दासीपुत्र यांची निगा तिनें यथायोग्य ठेविली होती. **जोत्याजी केसरकर, उद्धव योगदेव** असे कित्येक नोकर **राणी येसूबाई**-( **संभाजीची** स्त्री ) बरोबर होते. **उद्धव योगदेव** हा या वेळेपासून **राजाज्ञा** होता. **राजारामाची** बायको मा. **ताराबाई** इचा खाजगी कारभारी म्हणजेच **राजाज्ञा पंताजी शिवदेव सोमण** होता. **शाहूमहाराज** गादीवर बसल्यावर **रंगराव उद्धव** १७०८-९ मध्यें **राजाज्ञा** झाला. पुढें १७१२-१३ मध्यें हें पद **नारो राम मंत्री** यांस देण्यांत आलें. सन १७१६-१७ मध्यें **चिमणाजी दामोदर** यास **राजाज्ञा** करण्यांत आलें. १७२७-२८ पर्यंतच्या कागदांवर **पंताजी शिवदेव** व **चिमणाजी दामोदर** यांच्या सह्या सांपडतात. **उदाजी चव्हाणाची** बंडखोरी **मोरो जिवाजी देशपांडे** यांनीं मोडली म्हणून त्याला **राजाज्ञा**पद मिळालें व तें या घराण्याकडे चाललें.

५. **विश्वनाथभट वैद्य**:—हे **वाई-सातारा** सोडून राजकीय किंवा खाजगी कामासाठीं बाहेर गेले असतां ते आपल्या मुलांस पत्रें लिहीत. त्यांचा साराश म्हणून त्यावर एक टीप युवा संवत्सरांतील पत्रांक १४ खालीं दिली आहे. त्यावरून त्यास त्या काळीं हे श्रीमंत लोक मुलांना कसें राजकीय व गृहशिक्षण देत हें कळून येईल. श्रीमुख १६७९ मध्यें १०।१२ पत्रें तशा प्रकारचीं आहेत. (अ) हें पत्र दोघां बंधूंनीं **पुण्या**हून लिहिलें आहे. यांत आपल्या घरीं कोणते गडी व विश्वासूक नोकर होते तें सांगून वाड्याची सुरक्षितता राखण्यासाठीं मागील व पुढील दारीं कोठें पहारेकरी म्हणून ठेवावे हें लिहिलें आहे. (प. ११) (ब) हें पत्र **कान्हाटी** इनाम गांवाहून लिहिलें असून कोकणांतील **वरवडें** येथील देवळाचे कामास लागणारे खर्चाची रक्कम **राघोबा ना पटवर्धनां**कडून रु. ५०० व स्वतः रु. ७५ घेऊन कारागीर **जानगवडा** यांस द्यावें, असें त्यांत लिहिलें आहे. नोकरमाणसें काम करणारीं ठेवावीं व वाड्यांत सुरक्षिततेनें कसें राहावें हें पत्रांतून दिलें आहे. (प. १६) (क) **विश्वनाथभट वऱ्हाडांत कारंजास** असतांना त्यांनीं **हंसपुरी गोसावी** यांस रु. २५००० कसे द्यावे हें मुलांना कळविलें आहे. हे रु. हुंडीनें व चिठ्यांनीं जमा व्हावयाचे होते. हे रु. जमा करून **हंसपुरीस** दिल्यावर त्याची पावती हें पत्र हा नमुना आहे. यांत दिलेल्या हुंड्या '**लहणें**' या प्रकारच्या होत्या. आणखी ४ पत्रें **कारंजाहून**च लिहिलेलीं असून त्यांत मुलांनीं वसुली कशी करावी, हिशोब कसे द्यावे यांबद्दल सूचना दिलेल्या आहेत. (प. २९, ३१, ३२, ३३, ३४) **हंसपुरीस** जास्त पैसे लागल्यास १५ हजारांपर्यंत देण्यास हरकत नाहीं असें मुलांना लिहिलें आहे.

६. खाजगी घरगुती :—(अ) माधवराव पेशवे यांचें लग्न अप्पाजी नरहर जोशी यांचे मुलीबरोबर ठरलें होतें. त्याबद्दलची कुंकुमपत्रिका नानासाहेब यांनीं विश्वनाथभटांना लिहिली असून शेवटची ओळ 'बहुत काये लिहिणें हे विनंति' त्यांनी स्वतः लिहिलेली आहे. पण त्या मुलीचे पत्रिकेंत मूळ नक्षत्र असल्यामुळें लग्न मार्गशीर्ष शुद्ध १० स न होतां, शुद्ध १४ स डिसेंबर ९, १७५३ रोजीं झालें. रमाबाईचें माहेर शिवाजी बल्लाळ जोशी राहणार गराडे ता. पुरंदर यांजकडे होतें. हिचे बंधु रामचंद्र यांचा वंश बढवाई सं. इंदूर येथें प्रस्तुत आहे. ही माहिती भालचंद्र विनायक देव रा. थेऊर यांजकडून मिळाली. (प. २५) (ब) भिकंभट व लक्ष्मण बल्लाळ यांस विश्वनाथभटांनीं कळविलें कीं, मी पुण्याहून वाघोलीस जात आहें, देवी कुणबीण पोरांसुद्धां अग्निहोत्रि गोविंदभट दात्ये यांस दिली आहे, ती यास द्यावी. (प. २२)

७. साठे :—(१) शिवभट-(अ) हे बंगालची चौथाई घेऊन नागपुरास ६ लाखांच्या हुंड्या घेऊन अले, हें नारो अनंतांनीं पातुराहून वैद्यांना पत्रानें कळविलें. (प. ३) (ब) वैद्यांच्या हिशोबाच्या यादींत शिवभटांकडून येणें रकमेपैकीं रु. ६०००० त्यानें चौघांकडून पोंचविल्याचा उल्लेख आहे. (प. २८) (क) चिंतामण केशव यांचें आडनांव कळलें नाहीं. यास शिवभटानें पैसे दिले होते, त्यांपैकीं रु. ३८८५ एक महिन्यानें परत करावे अशी अट घातली होती. चिंतामण केशवाचें नांव शिवभटाच्या हिशोबांत लिहिलेल्या पत्रांत आलें आहे, पण आडनांव नाहीं. (प. ३६) (२) महादाजी जिवाजी साठे :—(अ) बाळंभट वारले त्याबद्दल दुखवट्याचें याचें पत्र विश्वनाथभटास आहे. (ब) दोघे बंधु पुण्यास असतांना वाईस जाण्यापूर्वी त्यांनीं महादाजीपंत यास रु. २०० पाठविण्याचें कबूल केलें होतें. त्याबद्दल त्यास त्यांनीं आठवण दिली आहे. (प. १५) हें कसें दिलें याचा तपशील या पत्रांत आहे. हे पैसे अंबवड्याचें नागोबाचें देऊळ बांधण्याचे खर्चाबद्दल होते. असें आढळून येतें कीं, सावकाराकडून श्रीमंत लोक जेव्हां मोठी रक्कम काढीत, तेव्हां ती एकदम न घेतां लागेल तशी घेत असत. सर्व रक्कम एकाच वेळीं घेत नसत.

८. हिशेब :—१ यादी—(अ) बाळंभट यांच्या क्रियेस झालेल्या खर्चाची-ही आहे, व त्यावर दिवस दिल्या कारणानें त्यांची मृत्युतिथि बरोबर रविवार श्रावण शु. १४।१६७५ ठरते. (प. १२). (आ) नरोजी जाचक :—हा रघोजी व जानोजी भोसले यांचा सरदार व मुत्सद्दी होता. हा बाराभाटी किल्ल्याचा पहिला सुभेदार होता. याला वैद्यांनीं रु. २००० करमरकर व जोग यांजकडून देवविले होते, त्यांचा सव्याज हिशोब यांत आहे. (प. २४). (इ) शिवभट साठे :—यांजला वैद्यांनीं ६०००० रुपये दिले होते. ते महादोबा नाना दामले ५००० व बुऱ्हाणशाराजे

५००० यांचेमार्फत परत आले. बाकी रुा ३३०० त्यांजकडे येणें शिल्लक राहिले (प. २८). (ई) **हंसपुरी गोसावी** :—यांनीं **रघूजी भोसले** यांनीं हवाला दिल्यावरून ज्या लोकांकडून **वैद्यांस** पैसे देवविले त्या रु. ६०००० चा यांत तपशील दिला आहे. यांत **बाईचे** पैशांतून २५००० देविले होते. ( प. २६ ). हे पैसे हवाले, हुंड्या, चिठ्या देऊन पुरे केले होते. व हे मुलांस **विश्वनाथभटांनीं** लिहिलेल्या पत्रावरून कळतें. ( उ ) **पंतप्रधान नानासाहेब** यांनीं **वैद्यांकडून** एकोत्रा व्याजानें ५० हजार रु. दरसाल घ्यावयाचा करार केला होता. त्या रकमेच्या व्याजाच्या हिशोबाची ही यादी आहे. हे पैसे शके १६७४ अंगिरासंवत्सरांत काढले होते. हिशोबांत बारोत्रा वजा केला आहे. ऐवजाचें खत **नानासाहेब** यांनीं मागाहून लिहून दिलें होतें. **बाबुराव हरी दीक्षित** यांनीं न दिलेले पैसे वसूल करून घ्यावयाचे होते. ( प. ८ ) **वैद्य**-दफतरांतील हिशोबाशीं या रकमांचा मेळ आहे. या व्यवहारांत **केसो बहिरव वैद्य** यांचा संबंध आलेला आहे. ( प. ४० ).

९. **गोसावी हंसपुरी ( महंत )** :—( अ ) हें पत्र अपुरें आहे; **विश्वनाथभटास** लिहिलें असावें. कोणीं लिहिलें हें कळत नाहीं, पण **हंसपुरी**जवळून **रघूजी, विश्वनाथभट, सदाशिव व रघुनाथ घाणेकर** वगैरे लोकांनीं इतकी रकम त्यांजकडून मागण्याचा संभव आहे, व तो इतकी रकम देण्याच्या लायखीचा होता म्हणून त्यांचे नांवावर हें पत्र घातलें आहे. पत्राचा विशेष असा आहे कीं, रुा २५ हजार लेख्यानें कबूल केले ते दिले तर खर्चास ५०० रु. **हंसपुरी** देणार. ही अडवणूक का सवलत ? २५००० हजारांत रु. ५०० कमी करून घेतले म्हणजे लेखकाचा काय तोटा होणार ? ( प. २० ). ( ब ) **विश्वनाथभटांनीं हंसपुरीस** कर्जफेडीसाटीं रुा ६०००० द्यावे असें **रघूजीनें** त्यास लिहिलें होतें. ( प. २६ ) या वेळीं **विश्वनाथभट वऱ्हाडांत कारंजास** होते. तेथून त्यांनीं आपल्या मुलांना **वाईस** पत्रें घालून ६० हजारांपैकीं त्यांनीं पाठविलेली हुंडी मोडून रु. कसे द्यावेत हें लिहिलें आहे. **हंसपुरी गोसावी, वैद्य व रघूजीबावा** यांच्या देवघेवी झाल्याचीं पत्रें छापलीं आहेत. त्या देवघेवी कशा रीतीनें झाल्या हें कळण्यासाठीं पत्रांतलि आंकडे एकमेकांस ताडून त्या पाहून समजून घेतल्या पाहिजेत. **हंसपुरी, बन्सीपुरी, व उदेपुरी महंत दशनामी** असून, **साताऱ**च्या मठाचे वंशज होत. **नागपूरचे हंसपुरी महंत पदमपुरीमठाचे** वंशज होत.

१०. **कृष्णाजी त्र्यंबक लोहोकरे** :— हे **राजगडचे** किल्यावरील अंमलदार होते. यांनीं हें पत्र किल्याचा हवालदार **सिदोजी इंगळे** ( मराठा ) व कारकून (ब्राह्मण) यांस लिहिलें आहे. **गाडेपट्टी व खर्चपट्टी** ह्या **जांभळी व माहुरी वैद्यांच्या** इनाम गांवांवर बसवून घेऊं नये. ह्या घेणें अन्याय आहे, घेतल्या असल्यास परत कराव्या. या पत्रांतील लेखनपद्धति विचारणीय आहे. **लोहोकरे** ( ब्राह्मण ) हे **मराठे** लेख्यास आशीर्वाद लिहितात व कारकून, ( त्या वेळीं बहुतकरून ब्राह्मण ) असल्यामुळें

त्यांस नमस्कार लिहीत आहेत. अशाच तऱ्हेचीं आणखी पत्रें लोहोकऱ्यांचीं हवालदार व कारकून यांस आहेत. ( प. १० )

११. राघो बल्लाळ भोगले :— हा वैद्यांचा वऱ्हाडांतील कारकून वसुलीचें काम करीत असे. आडनांवावरून तो ब्राह्मण नसावा असें वाटतें; पण तो कोकणस्थ ब्राह्मण होता. त्याजकडे वैद्यांनीं रामटेकच्या देशपांडेपणाचें व फडनिसीचें काम दिलें होतें. आरोली, तुमान, टेकाडी व गोडेगौडी या गांवांचा वसूल कसा केला हें त्यानें वैद्यांना यांत लिहिलें होतें. आरोली, तुमान व डुमरीचिखली यांची लावणी-संचणी त्यानेंच करविली. वैद्यांना पोतदारी मिळेनाशी झाली. विश्वनाथभटांनीं त्यास रामटेकास वाडा बांधावयास सांगितलें होतें. तो या वर्षी भोगले यांनीं पुरा केला. ( प. ५ )

१२. नारो अनंत गद्रे :— हा वैद्यांचा वऱ्हाडांतील वसुली कारकून, त्यांना तेथील कर्जवाम वगैरे कामाची कशी कशी तजवीज केली व नागपूरच्या राजकीय बातम्या काय आहेत हें लातुराहून लिहितो :— त्यांतील मुख्य गोष्टी अशा ( १ ) हंसपुरी गोसावी यांनीं शिवाजी दादाजीजवळ २५ हजार रु. दिले. ( २ ) बाजी विठ्ठल फडके यांनीं १०॥ हजार रु. विसाजी अनंत जोगामार्फत वसूल केले. ( ३ ) नांदगांव काजीकडून १ हजार रु. मिळाले. ( ४ ) कृष्णाजी गोविंद गोरे यांनीं रु. ३३६० दिले ते कृष्णाजी मोरेश्वर यांस दिले. ( ५ ) रामाजी गिरधर याचें कर्ज वसूल होणें कठिण आहे. ( ६ ) कृष्णाजी गोविंद गोरे हा इलिचपूर सुभ्यांतून पैसे वसूल करीन म्हणाला म्हणून मी त्याचेबरोबर जाणार. ( ७ ) सिकेनिविसी व वकिलीचे पैसे कृष्णाजी मोरेश्वर यानें वसूल केले ते सर्व सेना सा० रघूजीजवळ दिले. त्यांपैकीं त्यांनीं रु. ४००० कृष्णाजी मोरेश्वरास दिले व २००० तुमच्याकरतां ठेविले. ( ८ ) रहाटगांवचे पैसे जखात्यानें वसूल केल्यावर मिळतील. ( ९ ) शिवभट साठे बंगाल्याहून ६ लक्षांच्या हुंड्या घेऊन नागपुरास आले. ( १० ) श्री० रघूजी नागपुरासच आहेत. ( ११ ) श्री. रघूजींनीं काटकसरीसाठीं फक्त २००० हजार स्वार ठेवून बाकीची फौज कमी केली.

१३. बाबुराव दत्तो महाशब्दे :—हे सचिवांचे नातलग होते. सं. भोर-मधील नागोजी ना। जेधे देशमुख यांनीं वैद्यांकडून कर्ज काढलें होतें. तें हिशोब करून फेडून टाकावें म्हणून ३ माणसें वैद्यांकडे पाठविलीं होतीं. त्यांचेबरोबर हिशोब करून व कांहीं सूट घालून त्यास कर्जमुक्त करावें अशी वैद्यांना महाशब्दे यांनीं विनंति केली होती. जेधे हें भोर संस्थानांतील वतनदार सन्माननीय घराणें होतें. पंतांनींही यांजला कर्जफेडीचा तगादा करूं नये अशी वैद्यांना पत्रें लिहिलीं होतीं. सन १७५६ मध्यें गोपाळजी व नारो दत्तो यांनीं याबद्दल पत्रें वैद्यांस लिहिलेलीं आहेत. ( प. ७ )

१४. शंकराजी कानो :—हा मुगांव येथील वैद्यांचा कारकून वैद्यबंधूंस कळवितो कीं, राहाटगांवचा वसूल बाबा सिरगिरे यानें जबरदस्तीनें बंद पाडला आहे. त्या गांवचा वसूल मला होणें कठीण आहे. त्याची सर्व जिनगी तेथेंच आहे. त्याचें ह्या गांवावर मोठें वजन आहे. तो सांगेल त्याप्रों लोक वागतात. सनदांचा कांहीं उपयोग नाहीं. जयरामभटानें निर्मळेहून रु. ३०००० च्या हुंड्या पाठविल्या त्यांपैकीं आपणांस ५००० मिळाले. मुधोजी (आपा) भोसले याबरोबर भटजी बंगाल्यांत गेले. काणेबंधूंनीं कानोस फार त्रास दिला. उमरखेडपैकीं त्यांनीं २ हजारांची निशा करून दिली. वसुमत गांवापैकीं ३ हजारांची निशा करून घेतल्यास ते मिळतील व ५ हजारांची हुंडीही मिळेल. पत्र अपुरें आहे. (प. २)

१५. कृष्णंभट काळे :—हा नांदिवडें येथील परिचित भटजी. यास बाळंभट वारल्याचें, त्याचा मुलगा वाईहून आल्यावर कळलें, म्हणून त्यानें हें दुखवट्याचें पत्र विश्वनाथभटास लिहिलें. बाळंभट वारल्यावर ज्यांनीं दुखवट्याचीं पत्रें लिहिलीं तीं मुद्दाम दिलीं आहेत. (प. १८) आबाजी सुंदर हा मराठा असून त्याला बाळंभटाचें फार अगत्य वाटत असे. म्हणून त्यांच्याबद्दल यानेंही विश्वनाथभटास दुखवट्याचें पत्र लिहिलें. (प. १३)

१६. धोंडभट वैद्य :—हा लावगनकर वैद्य विश्वनाथभटांचा नात्यानें पुतण्या लागतो. त्याला महादशेट रेडिजकडून देवविलेले रु. १५० पावले. त्याची विश्वनाथभटांना त्यानें ही पावती दिली आहे. हा विश्वनाथभटांचा सावकारी करणारा नवीन परिचयाचा कोंकणांतील मनुष्य आहे. (प. १९) यानें बाळंभट व विश्वनाथभट यांच्या बायकांना, भिकूनें पैठणाहून लिहिलेल्या पत्रांत नमस्कार लिहिला आहे. सौ. अनूबाई रास्ते इजला आशीर्वाद लिहिला आहे. शेवटच्या ओळीची भाषा सांकेतिक दिसते. ती नीट लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. (प. १७)

१७. गणेश कृष्ण दामले :—हा विश्वनाथभटास कळवितो कीं, नारो अनंत गोखले यास तुमची गांठ घेणेची इच्छा नाहीं. विश्वनाथभट यास तपकीर वगैरे जिन्नस पाहिजे होते, ते दामले यांनीं पाठविले. (प. ३७)

१८. बाळाजी गणेश :—हा वैद्यबंधूंना पुण्याहून त्यांनीं पाठविलेल्या पत्रांची काय तजवीज केली हें हरिपंत करंदीकराबरोबर पत्र देऊन कळवितो. बघी कुणबिणीस त्रिंबकरावमामाकडून आणून वैद्यबंधूंकडे रामजी चव्हाणानें पोंचविली. या वेळीं बाळंभट हयात होते. (प. ३९)

# भावनाम संवत्सर शके १६७६.

## सन १७५४।५५

१. इनाम, आज्ञापत्र, कर्जरोखे, करार, हुकूम, (१) विश्वनाथभटांनीं वऱ्हाडांतील कुऱ्हे प्रांतांतील कोरले गांवच्या मोकदमांस असा हुकूम दिला कीं, तुम्हांकडे आमचा जो ऐवज येणें आहे तो महादाजी नारायण पोंक्षे यांस द्यावा. कुसाजी येवले यास या कामासाठीं ठेविला आहे. त्यास रु. १५ द्यावे. (प. ४) (२) गुणाजी शिरके यास रु. १०० दिल्याबद्दल हा कर्जरोखा आहे. (प. ४८) (३) नानासाहेब पेशवे यांचे सुपे प्रांतांतील चोपडज, मावडी व वाकी या गांवच्या मोकदमास आज्ञापत्र कीं, मानसिंग कडूकडून रुस्तुमराव समशेरबहादर यांजकडे पूर्वीपासून या गांवचा मोकासा मिळत असतो तो त्यास बिनतकार देत जाणें. (प. ५७) कडु यांस मावळांतील देशमुखी होती. रुस्तुमराव या घराण्यास ही पदवी आहे. (शिवदिग्विजय, पा. ४३२) (४) कानोजी शिरके यांस रु. १०० दिल्याबद्दल कर्जरोखा हा आहे. (प. ५८)

२. लढाई :— बाबुराव नारायण गद्रे हे आपला पुतण्या, कृष्णाजीचा मुलगा गणेशपंत यास कळवितात कीं, कोंकणांत फौजा जाऊन लुटालूट करीत आहेत, सदाशिवभट दात्ये यांस रत्नागिरीची सुभेदारी देऊन तिकडे पेशव्यांनीं पाठविलें आहे. त्यांनीं सुवर्णदुर्ग व तळेघोसाळे हे किल्ले घेतले. बाबुराव आस्तिक असून देवपूजा करीत. त्यांनीं प्रवासांत देव नेण्यासाठीं पुतण्याकडून वेताच्या संभळ्या मागितल्या होत्या. (प. १७)

३. हिशोबयादी :—(१) विश्वनाथभटांनीं श्रीमुखनाम (१६७५) व भावनाम (१६७६) मध्यें दिलेल्या कर्जाच्या खतांचीं परिशिष्टांत जीं नांवें आहेत तीं योद्धे, सावकार व सरदार यांचीं आहेत. यांचा तपशील वाचण्यासारखा आहे. (प. २) (२) बायकांच्या मोत्यांचे व रुप्यांचे दागिन्यांच्या या याद्या आहेत, त्या 'खाजगी व घरगुती' या सदराखालीं दिल्या आहेत. (प. ७) (३) भोसल्यांनीं वकिलीचा मुशाहिरा वैद्यांना मिळावा म्हणून ज्या गांवच्या लोकांना हुकूम दिले त्यांची ही यादी आहे. यांतील गांवांचीं नांवें अपरिचित आहेत. ताकिदी व सनदा हे शब्द हुकूम या अर्थीं योजीत असत. (प. २८) (४) वकिलीचे पैसे विश्वनाथभटास देण्याबद्दल भोसल्यांनीं ज्यांना हुकूम दिले त्यांची ही दुसरी यादी आहे. यांत माणसें व त्यांचें गांव यांचीं नांवें आहेत. (प. ३७) (५) बाबुरावानें विश्वनाथभटास पाठविलेल्या पत्रांच्या सारांशाची ही यादी 'बाबुराव' या सदराखालीं आहे. (प. ६१) (६) शिवाजी टाळकुटे यांजकडे आलेल्या

पैशांची ही यादी आहे. ( प. ६६ ) ( ७ ) **शिवभटा**कडून आलेल्या बंगालच्या रु. ७५००० च्या वराती व हुंड्या यांचा हिशोब यांत आहे. ( प. ४५ )

**४. विश्वनाथभट वैद्य** (१) **नागोजीराव पाटणकर** यांस कर्जाच्या पैशाबद्दल तगादा केला. त्यांचें पत्र **पंतप्रधानांच्या** स्वाराबरोबर यांनीं पाठविलें; यावरून **पेशव्यांची** पैसेवसुलीस **वैद्यांना** मदत असे. अशीं आणखीही पत्रें आहेत. (प. १४) (२) **वासुदेव दीक्षित पाटणकर** यांनीं बंगालचे **शिवभट साठे** यांनीं आणलेले पैसे देणें ते हुंडीनें यांना पाठविले. **'जोग'** प्रकारची हुंडी कशी लिहितात तें यांत कळण्याजोगें आहे. ( प. १८ ) ( ३ ) **गोंदशेट होनराव** यांस **कृष्णाजीपंत गोरे** यांचा मुखत्यार **बाळाजीपंत** याजकडून यांनीं रु. १७०० देवविले. (प. ४०) (४) त्यांनीं स्वतः पाठविलेल्या पत्रांत बाकीचीं पत्रें मुलांना लिहिलीं आहेत. ( प. ४४, ५३, ५६, ६० ) **गोंदशेट बायकोल** यांस ५०० रु. देण्याबद्दल त्यांचें **शामजी फुलाजी** यास पत्र आहे. ( प. ५९ ) ( ५ ) **खोडद** गांवचे पाटलाकडून लावणीचा करारनामा घेण्याबद्दल **बाळंभटास** त्यांचें पत्र आलें. ( प. २५ )

**५. बाबुराव विश्वनाथ वैद्य :—विश्वनाथभटांनीं** आपल्या जाणत्या सर्व मुलांस मिळून जीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांत सर्वांचा समावेश झालेला आहे. एक यादी पत्रांची म्हणून दिलेली आहे; पण पत्रें कोणांस व कोणीं लिहिलीं त्यांचीं त्यांत नांवें नाहींत. तीर्थरूप या शब्दयोजनेवरून तीं **बाबुरावांनीं** लिहिलीं असें म्हणावें लागतें. त्यांतील मजकुरावरून तीं **विश्वनाथभटांसच** आहेत. पत्रें अस्सल नसून त्यांचा सारांश यांत आहे. यांतील कांहीं नांवांचा व मजकुराचा खुलासा करणें जरूर वाटतें. ( प. ६१ ). ( १ ) **विश्वनाथभट वऱ्हाडांतून** तूप व कापड घरखर्चासाठीं व दुकानांतील विक्रीसाठीं पाठवीत. ( २ ) **गणेश संभाजी** याचें आडनांव **खांडेकर** आहे. ( ३ ) **यशवंतराव** हा **कोनेरराम कोलटकराचा** मुलगा असावा. ( ४ ) **सदाशिव रघुनाथ** हा **घाणेकर वैद्यांचा** सावकारी व्यवहारांत सहभागी असे. ( ५ ) **सदाशिवपंत** व **आनंदराव** हे **चिमणाजी नारायण** सचिवांचे चिरंजीव होत. ( ६ ) **सदाशिवपंत** हे सचिवांचे गादीवर बसले होते. त्यास **चिकटोपंत**ही नांव होतें. **आनंदराव** त्यांचेपेक्षां वडील असून गादीवर आले नाहींत. ( ७ ) **कोंकणांत सिद्दींची** गडबड होती. व **विवलकर** हे त्यांचे विरुद्ध लढत होते.

**६. बाळकृष्ण व वासुदेव दीक्षित पाटणकर :—**( १ ) **विश्वनाथभटांनीं** दोघां **पाटणकरबंधूंस** लिहिलेल्या पत्रांत **जोग हुंडी** पाठविली होती. त्यांतील रु. १० हजार **शिवभट खरे** यांस द्यावयाचे होते. हा **बंगाल्यांतून शिवभट साठ्यांनीं** आणलेल्या पैशांचा व्यवहार आहे. ( प. १८ व २६ ). ( २ ) **रघोजी भोसले** यांनीं **बाळकृष्णबावास** लिहिलेलें हें पत्र आहे. यांत **विश्वनाथभटास** रदकर्जी ८७१६० रुपये **बंगालच्या** वसुलीपैकीं देण्याबद्दल मजकूर आहे. ( ३ ) **बाळकृष्णबावांनीं**

**विश्वनाथभटांस** लिहिलेलें पत्र **रघूजींनीं** लिहिलेल्या पैशांबद्दल आहे. (प. ३३) हीं सर्व पत्रें **शिवभटांनीं बंगाल्यांतून** वसूल केलेल्या चौथाईच्या रकमेच्या विल्हेवारी-बद्दल आहेत.

**७. खाजगी, घरगुती :—** (१) **विश्वनाथभटांची** स्त्री सौ. **उमाबाईच्या** मोत्यांच्या व सोन्याच्या दागिन्यांची ही यादी आहे. यांत कांहीं अपरिचित नांवांचे दागिने आहेत. **लक्ष्मण बल्लाळ जोशी** यांची आई ही **वैद्यांची** बहीण असावी. हिचें नांव **भिऊबाई** व **बाळंभटांची** पत्नी **सरस्वतीबाई** ऊर्फ **गंगाबाई** या दोघींच्या दागिन्यांच्या याद्या या कागदांत आहेत. शेवटीं **विठ्ठल जिवाजी थोरताचे वैद्या-**जवळ असलेले जिन्नसांची यादी आहे. (प. १) (२) ज्यांच्यासाठीं रुपें खरेदी करून जिन्नस केले त्यांची यादीही आहे. त्यांत बायकांचीं व मुलांचीं नांवें असून कुणबिणीही आहेत. (प. ७) **कर्नाटकांतील बिदनूर** हें धर्मसंस्थान **श्रीरंगपट्टणप्रमाणें** महत्त्वाचें आहे. त्याचें रक्षण **छत्रपतींनीं** किंवा **पेशव्यांनीं** करावें अशाबद्दल केलेल्या प्रयत्नांची माहिती यांत आहे. (प. ३५) (३) **बाबुरावांनीं विश्वनाथभट** यांस लिहिलेल्या पत्रांची यादी यांत आहे. (प. ६१)

**८. रघूजी भोसले :—** (१) हें **विश्वनाथभटाच्या** खतांचें श्रीमुख संवत्सरां-तील फेरिस्त छापिलें आहे. त्यांत **रघूजीनें** रु. ६०००० **वैद्यांकडून** घेतले त्याचे खताचा उल्लेख आहे. (प. २) (२) **विश्वनाथभट वऱ्हाडांतून** देशास येत होते, त्यास **पैठणापर्यंत** सुखरूप स्वार व माणसें देऊन पोंचवावें म्हणून मौजे **उंदरी** पा **माहूरच्या** कमाविसदारास लिहिलें होतें. हा गांव **दीपचंद** आदले याचा होता. (३) **रघुनाथ मानकर** यानें **नारोजीकडील** पैसे वसूल करण्यास मदत मिळण्यासाठीं **रघूजींचें** पत्र मिळवावें म्हणून **विश्वनाथभटास** पत्र लिहिलें होतें. (प. ५) (४) **रघूजीचा** नातलग **गुणाजी शिरके** हा स्वतः आजारी असल्यामुळें पत्रानें त्याचा समाचार विचारतो व त्यांस चांगले तांदूळ व कोंबड्या **रघूजी** आजारी म्हणून पाठवितो. (प. २४) (५) **रघूजी वैद्यांच्या** वकिलातीचे पैसे **चंद्रपूर** संस्थानचा सुभेदार **कृष्णाजी नारायण** यांनीं व आणखी कांहीं अमलदारांनीं दिले नाहींत. म्हणून ते देखत हुकूम देण्याबद्दल **रघूजी** त्यांस लिहितो. (प. २९) (६) **शद्दी जमान विश्वनाथभटास** लिहितो कीं, **रघूजीकडून शेख हुसन** यास नोकरी देववावी याबद्दल त्यानें रु. ७५ देण्याचें कबूल केलें. हा लाच कीं काय ? (प. ३०) (७) **बाळकृष्ण दीक्षित काशीहून विश्वनाथभटास** आणलेले पैसे कोणास कसे द्यावयाचे आहेत हें कळवितो. तसेंच **काशीकडे** बट्टा शेकडा ५॥२ घेणेंत आला आहे हें लिहितो. (८) उष्ण हवेमुळें व **नबाबाच्या** त्रासामुळें सावकारी कठिण जाते हेंही त्यानें लिहिलें आहे. (९) **आनंदराव वाघ** यानें **रघूजीच्या** वतीनें **जामगडच्या** कमा-विसदारास **वैद्यांची** वकिली तावडतोब देण्याबद्दल लिहिलें आहे. तिकडे **सांवगी** नांवाचीं गांवें दोन आहेत. त्यांचाही यांमध्यें समावेश केला आहे. (प. ३४)

( १० ) रघूजींचे सैन्यभरतीवरील अमलदार अंताजी विष्णु यांस रु. ४५००० देण्याबद्दल विश्वनाथभटांनीं करकरे यांस लिहिलें आहे. ( ४२ ) ( ११ ) विश्वनाथभटांनीं बाईस मुलांना रघूजीबावांच्या नादुरुस्त प्रकृतीबद्दल पत्रें पाठविलीं आहेत. ( प. ५६, ६० )

९. जानोजी भोसले :—हा विश्वनाथभटास लिहितो कीं, रघूजीबावांनीं कबूल केल्याप्रमाणें राणोजी ( आजोबा ) बावास खर्चास द्यावें. रघूजी वारल्यानंतर हा गादीवर बसला तरी रघूजींचाच शिक्का वापरीत असे. ( प. ३ )

१०. मुधोजी भोसले :— ( १ ) विश्वनाथभटांच्या खतांच्या फेरिस्तांत यांचा दिमत ऊ. मुखत्यार बाळाजी चिमणाजी यांच्या नांवावर रु. १०० घेतले आहेत. ( प. २ ) ( २ ) मुधोजी यांस पैशाची फार नड होती म्हणून त्यांनीं विश्वनाथभटाकडे येसंभट जोशी यांस पाठविलें होतें; पण पैसे मिळाले नाहींत म्हणून पुनः त्यानें गोविंदजी भोसले यास पत्र पाठवून कसेंही करून पैसे द्या असें त्यांस विनविलें. या पत्रावर मुधोजींची मुद्रा अस्पष्ट आहे. शेवटचें अक्षर स्वतःचें आहे. श्रीकारापुढें 'शंकर' आहे. ( प. ४१ ) पैसे मिळाले नाहींत म्हणून पुनः १ महिन्यानें विश्वनाथभटाकडे मनुष्य पाठविला. त्यांनीं महादाजी केशव खरे यांजकडे रु. १५० देण्याबद्दल चिठ्ठी दिली होती; पण ते भेटले नाहींत. वडील ( रघूजी ) यांच्या प्रकृतीची चौकशी पत्रांत केली आहे. ( प. ४३ ) श्रीकारापुढें 'रघुवीर प्रसन्न' आहे. ( प. ४३ ) विश्वनाथभट हे गाविलगडाहून मुधोजीस नागपुरास आणण्यासाठीं गेले होते. ( प. ५३ )

११. साबाजी भोसले :—यानें गणेश दत्ताजी, कमाविसदार, परगणे नंदरधन, यास लिहिलें कीं, रयतेच्या वसुलावर शेंकडा रु. १ वसूल करून विश्वनाथभट वैद्य यास जात असतो तो बिनहरकत देत जावा. हा अमल पोतदारी, वकिली किंवा सिकेनविसीचा असावा. या पत्रावर साबाजींचा शिक्का व मोर्तब आहे. अशींच पत्रें त्यानें नारो रघुनाथ, सटवाजी भोसले, दत्ताजी शिंदे, फत्तेखान व अंताजी नारायण यांस पाठविलीं होतीं. ( प. ३१ )

१२. नागोजीराव पाटणकर :—हे सातारा जिल्ह्यांतील पाटणचे सरदार असून त्यांनीं वैद्यांकडून कर्ज काढलें होतें. तें लवकर मिळालें नाहीं, म्हणून विश्वनाथभटांनीं त्यांस तगादा म्हणून एक पत्र लिहून पंतप्रधान नानासाहेब यांच्या स्वाराबरोबर पाठविलें. त्याचें उत्तर पाटणकर यांनीं पाठविलें कीं, दुसऱ्या सावकाराकडून रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला, पण ती मिळत नाहीं, म्हणून १ महिन्याची मुदत द्यावी. ( प. १४, १५ ) अशाच प्रकारचीं पत्रें विश्वनाथभटांनीं तीन कर्जदारांना याच वेळीं पाठविलीं. जरी पंतप्रधानांनीं त्यांना स्वतंत्र पत्रें लिहिलीं नाहींत तरी आपलें अप्रत्यक्ष पाठबळ विश्वनाथभटास स्वार देण्यांत दिलें होतें, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. पंतप्रधानांनाही वैद्यांचें कर्ज फेडावयाचें होतें.

फेडीसाठीं पंतप्रधानाना तगादा कोण करणार! वैद्यांच्या कर्जाची फेड लवकर करावी म्हणून त्यांच्या कर्जदारांस त्यांनीं स्वतंत्र पत्रेंही लिहिलेलीं आहेत.

**१३. आनंदराव वाघ :**—( १ ) हा **रघूजीचा** सरदार असून दिमतहीं होता. **वैद्यांनीं** ज्यास कर्जाऊ पैसे दिले होते, त्यांच्या खतांचे एक फेरिस्त आहे. त्यांत यास रु. १०५०० दिल्याची नोंद आहे. व्याजाचा दर २ होता. ( प. २ ) ( २ ) **वैद्यांना** वकिलीच्या कामाबद्दल **भोसले** पैसे देत असत ते निरनिराळ्या गांवांवर वसूल करावे लागत. त्याबद्दलच्या ताकिदीच्या यादींत **वाघांचें** नांव असून ' दिमत पागा ' असें त्यांच्यापुढें लिहिलें आहे. **वाघांच्या** ताब्यांत एक पागा दिलेली असली पाहिजे. ( प. २८ ) ( ३ ) पा. **जामगडचे** कमाविसदार **त्रिंबक कृष्ण** व **नरसो गणेश** यांजला पत्र लिहून **विश्वनाथभटा**कडे वकिलीचा मुशाहिरा द्यावा असें त्यांनीं कळविलें होतें. ( प. ३४ ).

**१४. नारो बल्लाळ जोग :**— हा **रघूजीचा** महत्त्वाचा अमलदार होता. मूळचा **नांदिवड्याचा** राहणारा असून याचीं पुष्कळ पत्रें आहेत. कांहीं विशेष उद्देशानें थोडीं निवडलीं आहेत. यानें **भिकंभट** व **बाबुराव वैद्य** यांजकडे रु. २० हजार ' लहणें ' हुंडीनें पाठविले, यांत **गोविंद अनंत गोखले** यांजकडे चिठ्ठीनें रु. ५००० पाठविल्याचा उल्लेख आहे. हा ' लहणें ' हुंडीचा प्रकार समजून घेण्याजोगा आहे. ( प. ६३ )

**१५. आपाजी राम गाडगीळ :**—हा वाईच्या मंडईजवळच्या **गाडगिळांचा** पूर्वज असून **अक्कलकोटचा** दिवाण होता. **भिकाजी ना रास्ते** यांची कन्या **सगुणाबाई** ही यास दिली होती. इचीच बहीण **गोपिकाबाई** ही **नानासाहेब पेशवे** यास छत्रपतींच्या आग्रहावरून केली होती. ( १ ) **सदाशिव रघुनाथ घाणेकर** व **वैद्य** यांनीं **पंतसचीव** यांस ६० हजार रुपये भागीदारीनें देण्याचें पतकरलें होतें. ही भागीदारी **घाणेकर** यांनीं **रामचंद्रपंत करकरे** यांस पत्रानें कळविली. त्यांत **आपाजी राम गाडगीळ** यांस **घाणेकर** यांनीं १ हजार रु. देणें होते ते त्यांनीं **विश्वनाथभटा**जवळ दिल्याचा उल्लेख आला आहे. ( प. ९ ) ( २ ) **गाडगीळ** हे राजकीय बाबींपासून अलिप्त होते असें नाहीं. त्यांनीं या वेळीं **विश्वनाथभटांस** लिहिलेल्या पत्रांत लिहिलें आहे कीं, श्रीमंत **सदाशिरावभाऊ नाशीक त्रिंबका**कडे गेले असून **राघोबादादांनीं** जाटापासून ३० लाख रु. घेतले व **दिल्लीस** जाऊन **अहमदशहा** बादशहास पदच्युत करून त्याचें तक्त फोडलें व **अलमगीर** ऊर्फ **अझीजउद्दीन** यास गादीवर बसविलें. हें तसेंच **रास्ते** हे आपले घरामोंवतालची जागा नांगरून बाग करीत आहेत ह्याबद्दल त्यास पत्र लिहावें म्हणून त्यांत विनंती केली. ( प. २१ ) **गाडगीळ** यांनीं **पंतसचीवांस** १ हजार रु. पोंचल्याची पावती द्यावी, म्हणून **विश्वनाथभटांस** लिहिलें. ( प. १२ )

१६. **भिकाजी विठ्ठल भुते**:—हा **रामटेक**चा रहिवासी. **विश्वनाथभटांनीं मोहनसिंगाचे** तालुक्यावर मुजुमदार म्हणून नेमला होता. त्यास रु. २००० वेतन ठरविलें होतें. त्यांपैकीं १ हजार **वैद्यास** मिळावयाचे होते. मुजुमदारीशिवाय केलेल्या कामाबद्दल काहीं किफायत झाल्यास त्याचा ½ हिस्सा **वैद्यास** द्यावयाचा होता. **राघो बल्लाळ** भोगले हाही **रामटेक** परगण्यांतील **वैद्यांच्या** कामावर कारकून होता. ( प. २३ )

१७. **भिकाजी बगदेव महिनमाल**:—**विश्वनाथभटानीं चिमणासाव** वगैरे गांवची वकिली वसूल करण्यासाठीं **यादो महादेव** यास नेमलें होतें. त्यास **भिकाजी बगदेव** हा जामीन राहिला होता. ( प. १६ )

१८. **शिवभट साठे**:— ( १ ) हा **ओरिसाचा** सुभेदार ( गव्हर्नर ) **बंगाल्यांतून अलीवर्दीखाना**कडून रु. ७५००० चौथाईपैकीं घेऊन **नागपुरास** आला. ते पैसे कोणा कोणास दिले त्याचा हिशोब दिला आहे. त्यांत **गंदाधरभट कुसरे, शिवभट खरे, रामाजी बा काळे,** या मुख्य व्यक्तींकडे हे रु. रोख व हुंड्या करून देण्यांत आले. (प. ४६) ( २ ) **शिवभटांनीं विश्वनाथभटांना गोंदशेट होनराव** यांस २० हजार रु. द्यावे असें लिहिलें. ( प. ४६ ) **रघूजी भोसले** यांनीं **शिवभट साठे** यांस **बंगाल्यांतून** आणलेल्या ऐवजापैकीं १३०८३० कोणाकोणास किती द्यावयाचे हें कळविलें. (प. ३९) ( ३ ) **शिवभट** यांनीं **बंगाल्यांतून** आणलेल्या ऐवजापैकीं रु. ८७१६० हे **बाळकृष्ण दीक्षित पाटणकर** यांजपाशीं दिले होते. ते त्यांनीं **विसाजी रघुनाथ वैद्य** यांजपाशीं कर्जफेडीसाठीं द्यावे असें **रघूजीनें** त्यांस कळविलें. पत्राचे शेवटचे आकड्यांचा अर्थ लावावयास पाहिजे ती सांकेतिक भाषा असण्याचा संभव आहे. (प. ३२) ( ४ ) मागील **रघूजीच्या** पत्राप्रमाणें **पाटणकर** यांनीं **काशीहून वैद्यास** रुपये कसे कसे वांटावयाचे तें कळविलें. यांत **विश्वनाथभटास** पोंचणारे पैसे रोख नसून निरनिराळ्या व्यक्तींकडून हुंडीनें किंवा चिठ्ठीनें मिळाले आहेत. ( प. ३३ ) या दोन पत्रांचा तपशील **पाटणकरांच्या** पत्रांच्या सदरांत दिला आहे.

१९. **कृष्णाजी नारायण पोंक्षे**:—हा **वऱ्हाडांत चंद्रपूर** संस्थानचा सुभेदार होता. श्रीमंत **रघूजी भोसले** यास, **वैद्यांची** वकिलीची या संस्थानची बाकी राहिली आहे, हें कळतांच त्यांनीं ती ताबडतोब देण्याबद्दल **पोंक्षे** यांस लिहिलें. अशीच बाकी पा **वर्णीपूर चिमणासाव, मानसिंग वंजाळ, मोकदम इसापूर** व **शामराव फुलाजी, भोवरगड**चे सुभेदार, यांजकडे होती, त्यांस **रघूजीनें** अशींच पत्रें **विश्वनाथभटांची** वकिली देण्याबद्दल पाठविलीं होतीं. (प. २९ ) अशी बाकी **प्रां जादेची पोंक्षे** यानें वसूल करावयाची होती व त्याबद्दलची ताकीद पत्रांक ५९ च्या यादींत आहे. **शिवाजी केशव टाळकुटे** यांच्या जमे यादींत यांजकडून १,१३००० यावयाचे, त्यांपैकीं बाकी येणें १३००० दाखविली आहे. (प. ६५ )

कृष्णाजीचाच भाऊ महादाजी नारायण होता, त्यास आमचा येणें ऐवज द्यावा, असें पत्र मौजे कोरल्याच्या मोकदमास विश्वनाथभटांनीं लिहिलें आहे. ( प. ४ )

२०. बहिरजी गायकवाड देशमुख :—हा तर्फ बिरवाडीचा वतनदार असून त्यानें वैद्यांकडून कर्ज घेतलें होतें. त्याबद्दल त्यांचा तगादा आला असता त्यानें रुपये देण्यासाठीं वैद्याशीं मोठ्या अदबीची भाषा वापरून मुदत मागून घेतली. वतनदारीचा यांना अभिमान होता. आपलें जीवमान चालविणें वैद्यांचे हातांत आहे असें या पत्रांत लिहिलें आहे. ( प. ६४ )

२१. नरहर बल्लाळ रिसबूड :— हा विट्ठल बल्लाळ परांजपे सुभेदार याचा मामा होता. वैद्य व रिसबूड यांनीं सरकतीनें रु. २२९६१ कर्ज वडनेरेबिबी या प्रांताच्या वसुलावर देण्याचें ठरविलें होतें. निम्मा हिस्सा प्रत्येकानें द्यावा असा ठराव झालेला होता. रिसबूड हा नागपूरचा सुभेदार होता. हा जळगांव जामोद येथें पेशव्यांविरुद्ध खंडणी घेऊन पंच गव्हाणास बापू करांडे यासह होता. तेथें आनंद गोपाळ व बाळाजी केशव सप्रे यांनीं पेशव्यांतर्फे त्यावर छापा घातला. त्या लढाईंत नरहरपंत मारला गेला. ( प. ५५ )

२२. शामजी फुलाजी :— हा विश्वनाथभटास रंगो महादेव व शिंपी यांजकडून जे पैसे आले त्यांचा व सागरच्या रसदेचा हिशोब लिहितो. त्यांत त्यानें ६ गांवची मामलत मिळविण्यास याच रकमेपैकीं रसद दिली. विश्वनाथभटाची उसनवार रक्कम १०।१५ दिवसांत भरण्याचें त्यानें कबूल केलें. गणोजीपंताची याजवर कृपा होती असें दिसतें. याचें भोसल्याच्या दरबारीं मोठें वजन होतें. ( प. १३ ) रघूजीनें कृष्णाजी नारायण पोंक्षे याच्या पत्रांत वकिलीची व सिकेनविसीची बाकी वैद्यांस ताबडतोब द्यावी म्हणून लिहिलें होतें. ( प. २९ ) विश्वनाथभटांनींही या पैशांबद्दल शामजीस लिहिलें होतें. ( प. ५९ ) शिवाजी केशव टाळकुटे यांस द्यावयाचे १ लक्ष रुपये यानें दिले नाहींत. ( प. ६५ )

२३, बाळाजी व कृष्णाजी ना भाव्ये :— विश्वनाथटांनीं यांजकडून भिकाजी नारायण भाव्ये यांस रु.५०० कृष्णाजी ना रास्ते यांचेमार्फत देवविले. ( प. १९ ) या बंधूंनीं विश्वनाथभटांच्या सांगण्यावरून रु. ४००० शिवभट खरे यांस द्यावयाचे, ते हुंडी बटवण्यास अडचण असल्यामुळें कशी तजवीज केली हें त्यास कळविलें आहे ( प. २१ ) ( ३ ) शिवभट खरे यांस देण्यासाठीं पाठविलेली हुंडी गहाळ झाली म्हणून भाव्यांनीं पेठ हुंडी मागितली. तिचा तपशील यांत आहे. ( प. ५० ) पेटहुंडीचा अर्थ पत्राखालीं टिपेंत दिला आहे.

२४. रामचंद्र गोपाळ करकरे :—हा वैद्यांचा प्रामाणिक जुनापुराणा दिवाण होता. ( १ ) सचिवांस वैद्य व घाणेकर यांनीं ६० हजार रु. कर्ज दिलें.

त्या व्यवहारांत यांचें नांव येऊन गेलें आहे. ( प. ९-१० ) ( २ ) **विश्वनाथभट वऱ्हाडांत** असतांना त्यांनीं घरच्या व्यवस्थेसंबंधीं व राजकीय बातम्यांसंबंधीं यास पत्रें पाठविलीं होतीं. ( प. ३८ ) ( ३ ) तसेंच श्री. **रघूजी भोसले** यांनीं यांस **मावळे** लोकांस देण्यासाठीं रु. २५००० **विश्वनाथभटांच्या** सांगण्यावरून मागितले. ( प. ४२ ) ( ४ ) **विश्वनाथभटांनीं** वऱ्हाडांतून मुलांना जीं पत्रें लिहिलीं त्यांत **करकरे** यांसही लिहिलेलीं कामें मुलांकडून करून घेण्याबद्दल सूचना आहे.

२५. **रघुनाथ मानकर**:—यानें **विश्वनाथभटास** व **विश्वनाथभटानें जानीभाईस** पत्रें पाठविलीं. दोघेही **रामटेक** येथील राहणारे होते. **विश्वनाथभट कोंढाळीहून** पुढें जाऊं लागले. तेव्हां आपलें काम **राघोबल्लाळ भोगले** याचे संमतीनें करावें असें सांगून गेले. श्री. **रघूजी साताऱ्यास** भेटले असतांना **विश्वनाथभटांनीं नारोजी नेगीकडील** पैसे वसूल करण्यास **मानकर** यास मदत करा असें सांगितलें होतें. हें साल नापिकाचें असल्यामुळें रयत लोक जेरीस आले होते. **जानीभाईनीं** रयत लोकांस रु. २००० जमाबंदीस कमी करून दिली. ही रयतेस मदतच होती. **विश्वनाथभटांनीं भोंसलेबंधूंची** व **रामराजाची** मानकर यास भेट करून दिली, याबद्दल त्यास समाधान वाटलें. ( प. ५ )

२६. **जानीभाई ( बावा )**:—ही व्यक्ति महत्त्वाची व माणुसकी संभाळून वागणारी दिसते. **रामटेकचा रघुनाथ मानकर** हा **विश्वनाथभटास** लिहितो कीं, **रामटेकास** दुष्काळ असल्यामुळें गेल्या सालचे जमाबंदीचे २ हजार रुपये यानें शेतकऱ्यास सूट दिली आहे. ( प. ५ ) **विश्वनाथभटाचा** याचा विशेष परिचय दिसतो. **वैद्यांकडे भोसल्यांनीं पोतदारी** व **लग्नपट्टी** यांच्या सनदा दिल्या. त्याच्या वसुलीचें काम **जानीभाईस** त्यांनीं दिलें. त्याच्या मदतीस श्रीमंतांनीं कांहीं माणसेंही दिलीं होतीं. त्यांचेकडून **जानीभाईनीं** काम करावयाचें. असें त्यास **वैद्यांनीं** लिहिलें. ( प. ६ ) **सिकेनिविसी** व **वकिली** वसूल करण्यास **वैद्यांनीं** ज्या १० जणांस नेमिलें त्यांत **जानीभाई** एक आहे. हे हक्क दर शेंकडा १ रुपयाप्रमाणें मिळावयाचें ठरलें होतें. **विश्वनाथभटांनीं शामजी फुलाजीस** लिहिलेल्या पत्रांत त्यांत ही हकीगत आहे. **विश्वनाथभटांनीं** तुपाच्या जोड्या **वाईकडे** पाठविणें त्या **गोविंदशेट बायकोबरोबर** पाठवाव्या, असें **शामजीसच** लिहिलें होतें. ( प. ५९ )

२७. **गोविंदशेट होनराव**:—याचे **शिवभटासारख्या** पैसेकऱ्यापाशीं पैशाचे व्यवहार झाले आहेत, याच्या चिठ्ठ्या त्यानें स्वीकारावयाच्या व त्याच्या यानें स्वीकारावयाच्या असे जमाखर्च आहेत. **वैद्यांशींही** तसाच संबंध होता; हा जातीचा मराठा आहे. याचेकडून **विश्वनाथभटांना** पैसे पाहिजे होते, पण ते नेण्यास ते स्वतः आले नाहींत यावद्दल त्याला राग आला. ( प. ४७ ) त्याला **कृष्णाजी गोविंद गोरे** सुभेदाराकडून व **शिवभटाकडूनही** पैसे मिळाले आहेत. **शिवभटानें** २० हजार रुपये

विश्वनाथभटाकडून त्यास देवविले. (प. ४६) **बाजी मालसी तावरे, संभाजी तावरे** व **ब्रम्हजी सरवटे** यांचे खटले आपसांत समजूत करून **विश्वनाथभटांनीं** रु. ८००० स मिटविले. **नारोजी नेघीकडून** त्यास रुपये देवविले. त्यानें **गोविंदशेट होनराव** यांचे देखत त्यांस ते दिले, याबद्दल त्यांची ही पावती आहे. तीवरील सन सुहूर नसून फसलीच आहे. पावती देणारांचीं नांवें बरोबर वाचतां आलीं नाहींत.

२८. **शिवभट खरे** :— **विश्वनाथभट वैद्यांनीं** यांकडून **वासुदेव दिा पाटणकर** यांस पैसे पाठवितांना **धनीजोग** या हुंडीचा उपयोग केलेला आहे. (प. १८, २६) या प्रकाराची हुंडी कशी लिहितात हें या पत्रांत आहे. हाच हल्लींचा (Bearer Cheque) होय. **भाव्येबंधूंनीं शिवभट खरे** यांस रु. १०००० वैद्यांनीं पाठविलेल्या हुंडीचे घेऊन यावयाचे होते. (प. २७) **शिवभट खरे** यांस **विश्वनाथभटांकडून** रु. २०००० मिळावयाचे होते ते त्यांनीं हुंडीनें पाठविले. पण ती हरवल्यामुळें **पेठहुंडी** पाठवावी लागली. अस्सल हुंडी हरवल्यामुळें हुंडीची नक्कल देतात, त्यास **पेठहुंडी** म्हणतात. (प. ५०) दोन्ही हुंड्यांचा काय घोटाळा झाला हें यांत **खरे** यांनीं लिहिलें आहे.

२९. **सदाशिव रघुनाथ घाणेकर** :— **वैद्यांनीं पंतसचिवांस** ६० हजार रुपये कर्ज देण्याचें ठरविलें. त्यांत यांनीं आपली भागीदारी ठेविली होती. त्यांनीं ⅔ रक्कम द्यावयाची व **विश्वनाथभटांनीं** ⅓ द्यावयाची. व्याज येईल तें रकमेच्या प्रमाणांतच घ्यावयाचें असा करार होता. या कामीं **सदाशिव रघुनाथ** व **विश्वनाथभट वैद्यांचा** दिवाण **रामचंद्रपंत करकरे** यांजमध्यें लेखी पत्रव्यवहार झालेला छापला आहे. २० हजार रकमेसाठीं **पंतसचिवांकडून विश्वनाथभटांनीं जालनापूर** व **बीडआंबड** येथील वसूल व साहोत्रा तारण लावून घेतला होता. (प. ८, ९) हे पैसे **पंतास** कसे दिले गेले हें **घाणेकरांनीं विश्वनाथभटांस** लिहिलें आहे. हे पैसे रोख चिठ्ठीनें व हवाले घेऊन दिले गेले आहेत. या पत्रांत **पेशवे भाऊसाहेब** व **रघुनाथरावदादा** यांचे हालचालीची माहिती दिली आहे. (प. १०, ११)

३०. **गोसावी हंसपुरी** :— (१) **फेरिस्त** खतांच्या यादींत यांचें खत रु. ४००० चें आहे. हीं खतें **विश्वनाथभटांनीं** घेतलेलीं आहेत. (प. २) (२) **रघूजींनीं** ज्यांना **वकिलीचे** पैसे देण्याबद्दल ताकिदी दिल्या त्यांच्या यादींत या गोसाव्याकडे परगणे **भुगांव** होता असें आहे. (प. २८) (३) **हंसपुरींनीं गोविंद निमदेव** यास पावती दिली आहे कीं, **जिवराव मोहित्यांची मोकदमपट्टी** रु. ४०० आम्हांस दिली ती भरून पावलों. यावर 'सही' हा शब्द गोसाव्याच्या हातचा आहे. (प. ३६)

(३१) **राघो महादेव पटवर्धन** :— हे **माखजनचे** असून **विश्वनाथ-भटांच्या** बायकोचे माहेरचे नातेवाईक आहेत. **कोकणच्या** मिळकतीच्या व्यवस्थे-

बद्दल यांना **विश्वनाथभट** कामें सांगत व हे वाईसही जात. या पत्रांत **विश्वनाथभटांनीं** चिठ्ठीनें **कृष्णाजीपंत गोरे** यांस रु. ४७९ देवविले. ते कोणाकोणाकडून किती घेऊन दिले त्याचा तपशील यांत दिला आहे. ज्यांनीं पैसे दिले त्यांत **कृष्णाजी गोविंद गोरे इंदलकर, बाळाजीपंत गोरे इंदलकर** हीं नांवें आहेत. यावरून हे **गोरे इंदल**चे राहणारे असावेत. (प. २० )

**३२ वासुदेव मोरेश्वर** :— हे कोण हें समजलें नाहीं. पण हे **वैद्यां**शीं देवघेवीचा व्यवहार करणारे असले पाहिजेत. त्यांना **वैद्यांनीं चिटकोपंतांस** रुा. १२१३॥ देण्याबद्दल चिठ्ठी दिली होती. त्यांच्याजवळ रु. ५०० कमी होते. बाकीचे रु. ५०० आपण देऊन **चिटकोपंता**चीं गरज भागवा व मीं दिलेले जमा करा असें लिहिलें. यांत **वासुदेव मोरेश्वरा**चा मोठेपणा दिसतो व **वैद्या**पाशीं असलेला निकट संबंधही दिसून येतो. **चिटकोपंत हें सदाशिव चिमणाजी सचिवांचें** नांव आहे. त्यांनीं **चिमणाजी** जिवंत असतांनाही पैसे मागितल्याचीं पत्रें आहेत. (प. ४९ )

**३३ माणको सखदेव** :— यानें **विश्वनाथभटांस** नामदार **खान पन्हीं** यांचा दिमत (मुखत्यार) **मुकुंदपंत** यांस रुा. २६० पेठचलनी द्यावे असें लिहिलें. **सखदेव** हा जर **नागपूर**चा असेल तर जो **सखदेव ओरिसा**चा गव्हर्नर झाला होता, त्याचा संबंधी असावा. पेठचलनी म्हणजे बाजारांत चालणारें नाणें असावें. **मुकुंदपंत** यांचा नामदार **खान पन्हीं इलिचपूर**चा नबाब यांसारख्या श्रीमंतांशीं संबंध होता.

---

# युवानाम संवत्सर १६७७

## १७५५–५६

**१. इनाम, करार, सनदा, कर्जरोखे, आज्ञापत्रें, हुकूम,** पावत्या :— **विश्वनाथभटांना कान्हाटीचे मोकदमांनीं** कळविलें कीं, जरी या सालचा वसुलाचा कौल रु. ५०० गांवाकडून वसूल करण्याचें ठरलें आहे, तरी **सरलस्कर** यंदांचा गांवचा वसूल **मानाजी चव्हाणा**कडून करवीत आहेत. **छत्रपति** स्वामींनीं त्यांस कळविलें आहे कीं, तुम्हीं यंदां वसूल करून घेऊं नये. पैसे घेतले असल्यास **वैद्यांना** परत द्यावे. तो वसूल **वैद्यांनाच** पोंचावयाचा आहे. शिवाय दोन मालक पैसे वसूल करूं लागले

तर गांवकऱ्यांवर विनाकारण जुलूम होतो. **वैद्यांचा** कारकून **शिवराम तुकदेव** हा या तंट्यामुळें वसूल करण्याचें थोपवून बसला आहे. तरी योग्य हुकूम पाठविण्याची तजवीज करावी. (प. ४७) **सरलस्कर** यांचे या इनाम गांवावर काय हक्क आहेत हें कळावयास पाहिजे म्हणजे तंटा. होणार नाहीं असें मोकदमाचें म्हणणें आहे. या पत्राचा **काल** देतांना सन **सुहूर** ११६५ अशी भाषा वापरली आहे यावरून हा **सुहूर** म्हणजे **आरबी** सन असें वाटण्याचा संभव आहे; पण हा **फसली** सन आहे. या वेळीं दक्षिणेंत **सुहूर** म्हणजे **आरबी** किंवा **हिजरी** सन प्रचारांत नव्हताच. ( प. ४१ ) **आरबी** सनावरून **फसली** सन कसा काढावयाचा हें शकावली वरून नवशिक्यांनीं करून पाहणें हें एक शिक्षणच आहे. **सदाशिव हरी खाडिलकरास विश्वनाथभटानें** श्री. **जानोजीच्या** सांगण्यावरून रु. २०००० दिले. त्याच्या पावतीवर **केसो कृष्णा शेंबेकराची** साक्ष आहे. (प. २०) **वैद्यांच्या** खतावणींत **शिवभटांचा** ज्या लोकांशीं संबंध आला, त्यांचीही यादी आहे. त्यांत **केसो हरीचें** रु. २०००० चें खत आहे. (प. २१) हा **ओरिसाचा** सुभेदार झालेला होता.

२. **छत्रपति :—रामराजे, मा. ताराबाई सदाशिव दीक्षित ढकार** यांनीं **विश्वनाथभट वैद्य** यांस लिहिलेल्या पत्रांत **मा. ताराबाई** श्री. **रघूजीस** आजारी असतांना सुखासमाधानाचीं पत्रें पाठवीत असे व ते वारल्यावरही **आप्पाजी भिवराव** याजबरोबर दुःखवस्त्याचीं वस्त्रें पाठविलेलीं आहेत. यावरून श्री. **रघूजीबद्दल मातुश्रीचें** मन कसें होतें हें कळून येतें. (प. ९) पत्रांतून **मातुश्रीला आऊसाो,** किंवा **बाईसाो** असेंही उल्लेखिलें आहे.

३. **पंतप्रधान :—पेशवे बाळाजी बाजीराव** ऊर्फ **नानासाहेब** (१) **वैद्यां**कडून घेतलेल्या कर्जाचा तपशील या पत्रांत आहे. (प. २, ५, ३४) (२) **वैद्यांची** चोरी **भातोडीस** झाली त्याचे तपासाबद्दल हें पत्र आहे. (प. ३२) (३) **वैद्यांचें** कर्ज परत करण्यास कांहीं लोकांनीं टाळाटाळ केली. तें परत करण्याबद्दल **मानाजी पवार** वगैरेस ताकीद पत्रें **पेशव्याकडून** गेलीं. (प. ४३) 'आज्ञाप्रमाण' हे शब्द पत्राच्या शेवटीं असले तर यजमानाची सही नसते. सर्व पत्र कारकुनाच्या हातचेंच असतें. **वैद्यांनीं शाहूमहाराजासही** कर्ज दिलें होतें. म्हणून **पेशव्याप्रमाणें** स्वतः कर्जदार **शाहूमहाराज** यांनीं हीं ताकीदपत्रें पाठविलीं होतीं.

४. **पंतसचीव चिमणाजी नारायण :—(अ) पंतांना विश्वनाथभटांनीं** ५० हजार रुपये द्यावयाचें ठरलें होतें. या रकमेला निशा नव्हती. त्यांनीं बाकीच्या कर्जास बीड आंबड गांवच्या वसुलाची निशा दिली होती. याची यादी आहे. (प. ६) (ब) **भिकंभट वैद्यास पंतांनीं** स्वतःच्या मातुश्रींना दरमहा खर्चास रु. ९०० देण्याबद्दल लिहिलें होतें. (प. १०) (क) संस्थानांतील सरदार **नागोजीराव जेधे देशमुख** यांचेकडून कर्ज यावयाचें. त्याचा तगादा तूर्त करूं नये, त्यांचे घरीं लग्न आहे,

१५ दिवसांची मुदत द्यावी, असें पंतांनीं विश्वनाथभटांस लिहिलें. ( प. ५२ ) ( ड ) पंतांनीं शके १६७७ च्या रामनवमीच्या उत्सवास येण्यासाठीं विश्वनाथभटांना पत्र लिहिलें होतें. त्यांत मुद्दाम भिकंभट व बाबुराव यांस घेऊन यावें असें लिहिलें होतें. यावरून वैद्यघराण्याबद्दल त्यांना आपुलकी किती होती हें स्पष्ट होतें. ( प. ६१ )

५. रघोजी भोसले :— हे सेनासाहेबसुभा १४।२।१७५५ रोजीं वारल्यानंतर त्यांचीं स्वतः लिहिलेलीं पत्रें नसावयाचींच. इतर लोकांचीं जीं पत्रें विश्वनाथभटांना गेलीं त्यांत त्यांच्या मृत्यूचा उल्लेख आहे. रखमाजी जाचक, सदाशिव ठकार, रामचंद्र कोनेर, विश्वनाथभट व शिवभट साठे हीं सर्व मोठीं माणसें आहेत. यांचीं दुःखवट्याचीं व देवघेवीचीं पत्रें त्यांस गेलेलीं आहेत.

६. जानोजी भोसले :— ( १ ) पंतप्रधान यांनीं कर्जफेडीबद्दल विश्वनाथभटास पत्र पाठविलें त्यांत आपले साडेच्याणव हजार रु. शिवाजी भिकाजीकडून येणें आहेत ते जानोजीजवळ तुमचा गुमास्ता आहे त्यास वसूल करण्यास सांगावें. ( प. ५ ) ( २ ) सदाशिव हरी खाडिलकरास विश्वनाथभटांनीं रु. २० हजार जानोजीच्या सांगण्यावरून दिले. त्याची पावती या पत्रांत आहे. ( प. २० ) ( ३ ) विश्वनाथभटांनीं जानोजीस पत्र लिहिलें कीं, धोंडजी खेडकर यानें एक कुणबीण आणली त्याबद्दल या पत्रांत हकीगत आहे. सरकारचे जासुदास तिला जानोजीकडे नेण्यास सांगितलें व ते काय ठरवितील त्याप्रों करण्याचें ठरविलें. ( प. २२ ) ( ४ ) कर्जाचे फेडीसाठीं अकोट व सुरंजीचा वसूल विश्वनाथभटास दिला होता. करांडे यांनीं अकोटचा काढून घेतला. आतां सुरंजी मात्र आहे. अकोटच्या पैशासाठीं केसो कृष्ण शेंबेकर यांनीं १५ हजार घेण्याचें ठरविलें. पण करांड्याकडून १० हजारच मिळाले. बाकीचे ५ हजार जानोजीस तो देणार होता. ( प. २७ ) ( ५ ) जानोजी भोसल्यास आणणेकरितां विश्वनाथभट पैठणास गेले होते. ( प. ३५ )

७. लढाई :— महादाजी गोपाळ पटवर्धन (मावजन) हे लक्ष्मण बल्लाळास कळवितात कीं, मानाजी आंग्रे, इंग्रज व पेशवे एकत्र होऊन तुळोजी बरोबर लढत आहेत. त्यांच्यातर्फे रामाजी महादेव बिवलकर यांनीं लढून रत्नागिरीचा किल्ला घेतला. ( प. १३ ) रामाजी महादेवानें रत्नागिरीशिवाय तुळोजीच्या ताब्यांतील सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा हे किल्ले हस्तगत केले. त्यानंतर २।३ दिवसांनीं बाणकोट, मंडणगड, पालगड, रसाळगड व अंजनवेल हेही घेतले, दिनकरपंत व समशेरबहादूर यांनीं मलकापूर घेतलें, खारेपाटण गढी खंडोजी माणकर व सावंत कुडाळकर यांनीं घेतली. इतकें झालें तरी तुळोजी जेरीस आला नाहीं व तहाचीही भाषा बोलूं लागला नाहीं. ( प. १९ ) रामभटास केसो भैरवांनीं पत्र पाठविलें होतें त्यांतही हे किल्ले घेतल्याची हकीगत पुण्याहून लिहिली आहे. ( प. १२ )

८. हिशोब यादी :—शिवभटांचें खातें वैद्यांच्या जमाखर्चांत आहे. त्यांत त्यांनीं लिहून दिलेल्या कागदांची यादी आहे. औरंगाबादेहून रु. १५००० हुंडी आली, त्याबद्दल त्यांनीं एक कर्जरोखा लिहून दिला व बंगाल्याहून रु. १,३०,८३० रोख त्यांनीं आणले होते. त्यांपैकीं रु. २५,००० त्यांनीं आपल्याजवळ ठेवले. त्याची पावती दिली आहे. (प. १) श्री. नानासाहेब यांनीं वैद्यांकडून कर्ज घेतलें. त्याच्याबद्दल वैद्यांना दोन पत्रें आलेलीं आहेत. (प. ५, २१) वैद्यांच्या खतावणीचे एका पानांत शिवभटांच्या ओळखीच्या माणसांची यादी दिली आहे. (प. २१) वैद्यांच्या जमाखर्चांतील पेशव्यांचा हिशोब यांत दिला आहे. (प. ३४) सचिवांस निशा घेऊन दिलेल्या कर्जाच्या कराराची यादी यांत दिली आहे. (प. ६)

९. घरगुती, खाजगी :—(१) विश्वनाथभटांनीं चि. बाबुराव यांचें पहिलें लग्न कृष्णाजी हरी साठे यांचे मुलीशीं ३।३।१७५६ रोजीं केलें, त्यांचें निमंत्रण केसो गणेश जोग यांस आलें होतें. हें लग्न ठरण्यापूर्वी दिनकरपंत जोशी यांची मुलगी त्यांनीं पसंत केली होती. पण कांहीं गैरसोईच्या निमित्तानें तें मोडलें. याबद्दल विश्वनाथभटांस दोष देणाऱ्यांमध्यें केसो गणेशही होते. असेंच सवाई माधवराव पेशव्यांची लग्नपत्रिका मुलीच्या पत्रिकेशीं जमत नाहीं हें आयत्या वेळीं समजल्यावर श्री. नानासाहेब फडणिसांनीं तें स्थळ नाकारून थत्ते यांची मुलगी ठरवून लग्न करून घेतलें. (प. ५३) (२) मोर जोशी :—यांची मुलगी बाबुरावांच्या लग्नासाठीं बापूनें पाहिली होती. हें पत्र वाईहून मोर जोशींना कोठें पाठविलें कळत नाहीं. बापू हा त्यांचा नातलग आहे हें उघड आहे. या मुलीसाठीं विश्वनाथभट बापूकडे गेले होते. लग्न कोठें करावयाचें, खर्च काय येईल, ही वाटाघाट यांत आहे. हजार-पांचशेंपर्यंत हें स्थळ पडेल असें जोशांना लिहून उत्तर मागविलें होतें. यांत आक्काबाईचा उल्लेख आहे. ती मोरभटाची बायको असावी. मोरभटाचा मुलगा बाळ या नांवाचा होता. (प. ५६) (३) सखूबाई भ्र. भास्करभट वैद्य :—ही द्वारकेच्या यात्रेस निघाली असतां विश्वनाथभट तिला म्हणाले कीं, बाबुरावाचें लग्न येत्या माघांत करणार आहोंत, तुम्ही जाऊं नये. हल्लीं शुक्राचा अस्त आहे व राधाबाई गाडगीळ यांच्याबरोबर जाणार असाल, पण त्यांनीं आपला बेत रहित केला आहे. यात्रेस जाण्याची तयारी लग्नानंतर विश्वनाथभटांनीं करण्याचें आश्वासन दिलें. भास्करभट वारून १२ वर्षें होऊन गेलीं होतीं तरी विश्वनाथभटांनीं त्यांच्या बायकोबद्दल यत्किंचित्‌ही प्रेम व आदर कमी केला नाहीं. (प. ४२)

१०. विश्वनाथभट वैद्य :— आमच्या दफतरांत यांनीं लिहिलेलीं पत्रें फार थोडींच असावयाचीं. तीं दुसऱ्या लोकांकडेच जावयाचीं. अशीं पत्रें कोणास लिहिलीं हें कळलें तर त्यांचेबरोबर देवघेवीचा व सल्लामसलतीचा धंदा कोण करीत असत हें कळेल, म्हणून

तेवढ्या पत्रांबद्दलचाच खुलासा केला आहे. व सूचींत यांच्यापुढें फक्त ह्याच पत्रांचे आंकडे घातले आहेत. यांना आलेल्या पत्रांचे आंकडे घातले नाहींत. ते फारच होतील. असेंच **बाळंभटाच्या** पत्रांच्या सूचीसंबंधीं केलें आहे. अशा पत्रांच्या खुलाशांत **विश्वनाथभटांनीं** व **बाळंभटांनीं** काय केलें हें दिलें आहे. ज्या लोकांचीं पत्रें आलीं आहेत तीं पुष्कळ आहेत त्यांच्या खुलाशांत **वैद्यांचा** संबंध कसा आला तें दिलें आहे. ( १ ) **आनंदराव वाघ**:—यांस रु॥ ५००० देऊन कर्जखत करून घेतलें आहे. (प. ४) ( २ ) **रायाजी यादव शिरवळचे** फौजदार:—यांजकडून येणें रकमेपैकीं रु॥ ३००० पोंचल्याची ही पावती आहे. ( प. १६ ) ( ३ ) **सदाशिव रघुनाथ घाणेकर**:—यांनीं व **वैद्यांनीं पंतसचिवांना** रु॥ ३६००० देण्याचें कबूल केलें होतें. ते दोघांनीं कसे द्यावयाचे याचा खुलासा यांत आहे. ( प. १६, १८, ३६, ५१ ) ( ४ ) श्री. **जानोजी भोंसले**:—यांस यांनीं कळविलें आहे कीं, **धोंडजी खेडकर** यांनें एक बटीक आणली होती, त्यासंबंधानें काय निकाल देणें तो आपण द्यावा. (प. २२) ( ५ ) **रामचंद्रपंत करकरे** यांजकडून **वाईहून** कांहीं लोकांचे हिशोब व खतें मागविलीं होतीं. **वऱ्हाडांत** गेल्यावर सुभेदार लोकांस भेटून हिशोब करावयाचे होते. ( प. ३६ ) ( ६ ) **नारोपंत गद्रे** यांस **जेजुरीहून जानोजीची** व त्यांची गांठ कधीं पडली हें लिहिलें आहे. ( प. ३७ ) ( ७ ) **लक्ष्मण बल्लाळ जोशी** यांस हाच मजकूर लिहून त्यांनीं **रामचंद्रपंतांस** घेऊन सर्व हिशोब लिहून काढावे असें सुचविलें होतें. मुलांना खर्चवेंच सावधपणें करावा असें त्यांच्या पत्रांत लिहितात. तीच सूचना यांत आहे. ( प. ४० ) ( ८ ) मातुश्री **सखूबाईस** विनंति केली आहे कीं, **द्वारकेस** जाण्याचा बेत रहित करावा. चि. **बाबुरावाचें** लग्न झाल्यावर तुमची तयारी करून देऊं. ( प. ४२ ) ( ९ ) **शिवभट साठे** यांनीं **बंगालमधून** जे चौथाईचे पैसे आणले ते त्यांनीं **बाळकृष्ण दीक्षित पाटणकर** यांचेपाशीं ठेवले होते, ते पैसे **रघूजीला** कोणास कर्ज परत करावयाचें होतें त्यांचीं नांवें **पाटणकर** यांस कळविलीं आहेत. ( प. ४४ )

**११. रामभट वैद्य**:— याचे चुलत आजोबा **केसो भैरव पुण्याहून यमाजी शिवदेव** यांजकडून पैसे कसे वसूल करावे, हें त्यास यांत लिहितात, व **तुळोजी आंग्रे** यांचे **सुवर्णदुर्ग** वगैरे किल्ले **पेशवे, इंग्रज** व **मानाजी** यांनीं घेतल्याची हकीगतही त्यास कळवितात. ( प. १२ ) **रामभट** व **बाबुराव** यांनीं **विश्वनाथभटांच्या** पत्रांस उत्तरें देतांना त्यांत घरगुती कामासंबंधीं कांहीं न लिहितां आपणांस बालदशेंत व विद्यार्थीदशेंत लागणारें सामान मागितलें आहे. उदाहरणार्थ, कागद, तिरकामटे, बसण्यासाठीं लहान तट्टें ( शिंगरें ). ( प. १४ ) **कोंकणांतून जनार्दनभटांनीं कोंकणांतील** देवींना कौल लावून व अंगास आणवून त्यांच्या कुटुंबास आयुरारोग्य होण्यास काय केलें पाहिजे याबद्दल देवांनीं सांगितलेली हकीगत पत्र पाठवून कळविली. तुमच्या पूर्वजांनीं देवालयें बांधण्याचें कबूल केलें होतें, त्या-

प्रमाणे तीं बांधलीं नाहींत, तीं बांधण्यास सुरूवात करा म्हणजे दुखणीं-बाणीं नाहींशीं होतील, असें देवांनीं सांगितलें. ( प.३८ )

१२. **रामचंद्र ऊ. बाबुराव कोन्हेर कोल्हटकर**:— हा **सातान्याहून विश्वनाथभटांना नागपुरास** पत्र लिहितो कीं, माझे वडील व तुम्ही श्री. **रघूजीस** भेटलां तेव्हां काय हकीगत झाली ती कळवा. **शिर्के** यांनीं कबूल केल्याप्रमाणें तुमचे पैसे परत केले नाहींत, मा. **ताराबाई** यांस विनंति केली कीं, माझे वडिलांनीं **विश्वनाथभट** तेथून निघेपर्यंत इकडे येऊं नये. त्यास **भोसल्या**कडून आपली रक्कम वसूल करण्याबद्दल लिहिलें होतें. **रामचंद्रपंत कोनेर** यांस त्यांच्या वडिलांचीं पत्रें **साखरखेडल्याहून** आलीं होतीं. ( प.२९ )

१३. **व्यंकटराव गंगाधर हणमंते**:— ह्या **हणमंते** कुटुंबाबद्दल माहिती खंड १ च्या पुरवणीमध्यें दिली आहे. **व्यंकटरावानें वैद्यांकडून** पुष्कळ कर्ज काढलें होतें. ह्या पत्रांत त्याचा हिशोब आहे. तो हिशोबाच्या सदरांत छापला आहे. .याच्या रकमेवर व्याज मुद्दलापेक्षांही जास्त झालें आहे. ( प. ४५ )

१४. **सदाशिव हरी खाडिलकर**:— हा **ओरिसाचा** सुभेदार (गव्हर्नर) झाला होता. यास **जानोजी भोसल्याच्या** पत्रावरूत रु. २०००० **विश्वनाथभटांनीं** दिले, त्याची ही पावती त्यानें दिली आहे. हा प्रथमतः **मुधोजीचा** दिवाण होता. पुढें तो **जानोजीस** मिळाला. ( प. २० ) **शिवभटांचा** संबंध ज्या लोकांशीं आला होता त्या लोकांची यादी **वैद्यांच्या** खतावणींतून घेतलेली आहे. त्यांत यांचें नांव आहे. त्यांचे नांवावर रु. २०००० आहेत. ( प. २१ )

१५. **बन्हाणजी मोहिते**:— **विश्वनाभट** वाईस चि. **बाबुरावाच्या** लग्नासाटीं आले असतांना **बन्हाणजीबावा** त्यांस लिहितात कीं, श्री. **जानोजीबावांनीं** विनंती केल्याप्रमाणें दरबारच्या कामांत तुम्हीं आम्हांस पूर्ण मदत करावी. असेंच याच वेळीं वे. मू. **सदाशिव दीक्षित ठकारांचें** याच मजकुराचें पत्र आलेलें आहे. ( प. ५४ ) **सदाशिव बिन बावदेव ठकार** हे वाजपेयी होते. यांस २ मुलगे नारायण व यज्ञेश्वर. यांचे वंशज **सातान्यास** आहेत. यांचें घर सोमवारांत पंचपाळ्या हौदाजवळ आहे. त्यांचा हौदाजवळील घराचा कांहीं भाग चि. **बाबुराव वैद्यांनीं** अलीकडे खरेदी करून त्यांत **आनंद छापखाना** चालविला आहे.

१६. **रखमाजी जाचक**:— यांचें हें पत्र **कटकहून विश्वनाथभटास** आलेलें आहे. हा श्री. **रघूजीचा** सरदार होता. **शिवभट साठे ओरिसाचे** सुभेदार नेमल्याबद्दल उल्लेख यांत आहे. हा **बाराभाटी** किल्ल्यावर किल्लेदार होता. **रघूजी** वारल्याचें कळल्यावर किल्ल्यावरील लोक पगाराची बाकी राहिल्यामुळें बिथरले. **हंसपुरीचे** मुखत्यार **दिनानाथजी** हे देशावर गेले आहेत. ते इकडील हालहवाल

सांगतील, असें त्यांत आहे. **शिवभटा**बरोबर **ओरिसांत भोसल्यांनीं जाचका**बरोबर **मुकुंद पंडित** हाही पाठविला होता. ( प. ३ ) **शिवभटा**च्या **विश्वनाथभटास** लिहिलेल्या पत्रांत **शिवभट** सुभेदार झाल्याचा उल्लेख आहे. ( प. ५७ )

१७. **आनंदराव वाघ** :— हा श्री. **रघूजी**चा सरदार होता. याचा एक मुलगा **रामचंद्र** ऊर्फ **बापू** नांवाचा होता. श्री. **जानोजी** गादीवर आल्यावर त्याचे बहुतेक सरदार श्री. **रघूजी**च्या वेळचेच होते व राज्यविस्तारास ज्यांनीं मदत केली त्यांपैकींच हा **वाघ** होता. **वैद्यां**कडून यास कर्ज मिळत असे. रु. ५००० घेतल्याचा एक कर्जरोखा **इनाम** सदरांत छापला आहे. हा रोखा **नारो कृष्ण,** त्याचा दिमत, यानें लिहिला आहे. ह्याचें आडनांव **काळे** असावें. हा **पेशव्या**चा वकील होता. याचें नांव पहिल्या मराठा-इंग्रज युद्धांत आलेलें आहे. ( प. ४ ) ज्यांचा **शिवभटां**शीं देवघेवीचा संबंध आला होता त्यांच्या यादींत या **वाघा**चे नांवावर रु. ३०० आहेत. ( प. २१ ) **नारो अनंत गद्रे** यांनीं **नागपुराहून विश्वनाथभटां**स पत्र पाठविलें त्यांत **वैद्यां**च्या कर्जदारांत **वाघा**चें नांव असून त्याचेकडे रु. ५००० येणें दाखविलें आहे. ( प. ६० )

१८. **शिवभट साठे** :— **बंगाल्यांतून नागपुरा**स आल्यावर यानें **विश्वनाथभटांस** पत्रें लिहिलीं त्यांपैकींच हें पत्र आहे. **सद्रुद्दीखान, बंगाल**च्या नबाबाचा सरदार होता. याच्या हालचाली त्यांनीं **विश्वनाथभटां**स कळविल्या. **मिरजासाले** याचेपाशीं मैत्री करून **मुर्शिदाबादे**स जाण्याचें ठरविलें. व श्री. **जानोजीं**शीं **विश्वनाथभटानें** कसें वागावें हें या पत्रांत लिहिलें आहे. या पत्राच्या टिपेंतील मजकुरांत **ओरिसाची** माहिती दिली आहे. **ओरिसाचे** आजपर्यंतचे सुभेदार दिले आहेत व **शिवभटांच्या** ८ वर्षांच्या कारकीर्दीचें सिंहावलोकन केलें आहे. हें सर्व पत्र **शिवभटांनीं** स्वतः लिहिलें आहे. ( प. ३१ ) त्यांनीं स्वतः लिहिलेलें एक पत्र **विश्वनाथभटां**स आहे. **नागपुरास** आल्यावर आपल्या कामाची माहिती त्यांनीं त्यांना दिली आहे. इतर पत्रांतून यांचा उल्लेख आला आहे तो त्या त्या सदरांत दिला आहे. ( प. ४८-५७ ) यांच्या बापाचें नांव पत्रव्यवहारांत कोठेंही मिळत नाहीं. इंग्लिशांनीं लिहिलेल्या रेसिडेन्सी दफ्तरांतही बापाचें नांव नसावें हें आश्चर्य आहे.

१९. **केसो कृष्ण शेंबेकर** :— यांच्या कर्जफेडीसाठीं भोसल्यांनीं **अकोट** व **सुरजी अंजनगांव** यांचा वसूल लावून दिला होता. पण **रघूजी करांडे** यानें त्याचेकडील **अकोट** काढून आपल्याकडे घेतलें; पण **विश्वनाथभटांस** १५ हजार यावयाचे होते. **शेंबेकरास सुरजी अंजनगांव**चे १० हजारच आले ते दिले. आतां श्री. **जानोजी** देशीं येतील तेव्हां त्यांजकडून ५ हजार वसूल करून घ्यावे, असें **शेंबेकरांनीं विश्वनाथभटांस** लिहिलें होतें. ( प. २७ )

२०. **गंगाधरभट चिपळुणकर** :— हा सावकार असून दरबारीही होता. हा **विश्वनाथभटांस** लिहितो कीं, श्री. **पेशवे** अजून **वऱ्हाडांत** आले नाहींत.

यांचे वैद्यांशीं इतकें सख्य होतें कीं, तो त्यांस लिहितो कीं, तुमचें कोणतेंही काम करण्यास मी तयार आहें. (प. २५)

२१. **सदाशिव रघुनाथ घाणेकर**:—(१) हा **वैद्यां**च्याबरोबर सावकारीचे मोठमोठे व्यवहार करीत असे. त्यानें **वैद्यां**बरोबर सर्कत ठेवून **पंतसचिवास** रु. ४६००० कर्ज दिलें होतें. त्याबद्दलची माहिती **विश्वनाथभटां**च्या सदरांत दिली आहे. (प. १६, १८, ३६, ५१) **नारो बल्लाळ जोग** यांचे पत्रांतही त्याचा उल्लेख आहे. (प. ११) **घाणेकरांनीं** स्वतःसाठीं **वैद्यां**कडून २० हजार रुा घेतले. (प. २६) त्यांनीं **बाबुरावाच्या** लग्नासाठीं **दिनकरपंताच्या** मुलीची शिफारस केली होती. (प. ५१).

२२. **हंसपुरी गोसावी**:—**हंसपुरीचे** मुखत्यार **शंकराजी वासुदेव** व **दिनाजी जगन्नाथ** असतांना त्यांस पत्र पाठविलें व कळविलें कीं, **महंत हंसपुरी-बावा सेनासो सुभा श्री. जानोजी** याबरोबर जावें लागलें. तिकडील बातमी समजली नाहीं. आम्ही **शिवभटा**जवळ सुखरूप आहोंत असें लिहिलें. (प. ४६)

२३. **मोरो रामचंद्र करकरे**:—हा **रामचंद्र गोपाळ** (**वैद्यांचा** दिवाण) यांचा मुलगा. हा **पुण्याहून** वडिलांना लिहितो कीं, **पंतप्रधान नानासाहेब** यांनीं **विश्वनाथभट** भेटीस आले असतां त्यांचा बहुत सन्मान केला व **श्री. जानोजीं**च्या कारभारासंबंधीं विचारपूस केली. **विश्वनाथभट श्री. जानोजीस पुण्यास** आणण्यासाठीं **पैठणास** त्याच्या मुक्कामीं गेले होते. (प. २५)

२४. **नारो बल्लाळ जोग**:—हे **भिकंभट** व **बाबुराव वैद्य** यांस कळवितात कीं, **सदाशिव रघुनाथ** सर्व रक्कम देतील; पण त्यांनीं फक्त रु. २६००० दिले व ते अर्कटी दिले. त्यास बट्टा पडतो. **सदाशिव रघुनाथ हे पंतसचिवांचे** दिमत होते व त्यांचे दिमत **बापूजी दादाजी फाटक** होते. रुपये पुरे **घाणेकरांचे** मुखत्यार यांणीं **शंकराजी ना। भिडे** यांजकडून ३ महिने मुदतीनें घेऊन २६००० दिले. हेही **अर्कटी** म्हणून बट्टा कबूल केला. (प. ५१). **भिकंभट** व **बाबुराव** यांजकडे **जोगा**कडून ज्या ३ हजारांच्या हुंड्या आल्या त्या **लहण्या** जातीच्या होत्या म्हणून परत केल्या. तेव्हां त्यांनीं ४ हजारांच्या चिठ्या पाठविल्या. त्याही स्वीकारल्या गेल्या नाहींत. दुसऱ्या सावकारामार्फत केलेल्या हुंडीस **लहणी** हुंडी म्हणतात. (प. २४)

२५. **केसूजी हुद्दार**:—यानें **बगूजी यादव** यांस प्रां **कळंबेश्वर** येथील पोतदारीचा वसूल करून **विश्वनाथभट** यांस द्यावा असें सांगितलें. पत्राची भाषा पूर्ण वऱ्हाडी आहे. ह्याच्याकडे पारसनिशीचें काम होतें. **पेशवे राघोबादादांनीं दिल्लीस** जाऊन तक्त फोडलें होतें. त्यांनीं **गाझीउद्दीनला** काढून **अझीजउद्दीनला** गादीवर बसविलें, ही बातमी त्यांनीं **पेशवे नानासाहेब** यांस कळविल्यावर बक्षिसें वांटलीं. (पे. द. २१, ६५) (प. १७)

२६. **रघुनाथ टेंभेकार** :— हा **वैद्यांचाच** वऱ्हाडांतील कारकून होता. यास **नागपूरपेठेचा** वसूल **विश्वनाथभटांनीं** वसूल करण्यास सांगितलें होतें. याचीं पत्रें फार थोडीं आहेत. अक्षर व भाषा **नागपुरी** आहे. हा जातीचा ब्राह्मण होता. **रंगो महादेवा**जवळ यानें वसूल घ्यावयाचा होता. (प. ५८)

२७. **नरहर बल्लाळ रिसबूड** :— हे **विठ्ठल बल्लाळ परांजपे** यांचे भाचे होत. दोघे सुभेदार **वऱ्हाडांत** होते. (१) **शिवभटांचा** संबंध ज्या लोकांशीं आला, त्यांचीं नांवें **वैद्यांच्या** खतावणींत आहेत. त्यांतील एका पानाचा उतारा दिला आहे. त्यांत त्यांच्या विद्यमानें **विश्वनाथभटांचा** प्रांत **देवगड** वगैरेकडील वकिलातीचे रु. ३००० यांत आहेत. यावरून **वैद्यांशीं** त्या प्रांताचा संबंध येत असला पाहिजे. **बाळापूरच्या** लढाईनंतर याचा मुक्काम **पंचगव्हाण** येथें होता. यांचेबरोबर **रघूजी करांड्याचा** मुलगा **बाबूही** होता. **पेशव्याकडील आनंदराव गोपाळ** व **बाळाजी केशव सप्रे** यांनीं त्याजवर छापा घातला. त्यांची लढाई होऊन तींत **रिसबूड** मारला गेला. हा **नागपूरचा** सुभेदार होता. श्री. **जानोजीनें** यास **गाविलगडास** आपलीं माणसें संभाळण्यास ठेविलें होतें. (प. २१) (२) यानें **विश्वनाथभटांस** कळविलें कीं, **बिंबाजी आबा, रघूजीचा** मुलगा, **निजाम** व **रायाजी** ( **रघूजीचा** चुलता ) यांनीं **वऱ्हाडांत** चालविलेली धामधूम बंद पाडण्यांत आली असून आतां शांतता झाली आहे, आतां घरगुती भांडण आहे. त्यानें **वैद्यांची** वकिली व कर्जाची वसुली हें काम बिनबोभाट चालविलें होतें. (प. १७, ५९)

२८. **सदाशिव दीक्षित ठकार** :— हें पत्र **विश्वनाथभटांना** लिहून त्यांत श्री. **रघूजी** १४।२।५५ रोजीं वारल्याबद्दल दुःख प्रदर्शित केलें आहे. मा. **ताराबाईनींही** त्याबद्दल पत्र लिहून आदर व्यक्त केला आहे, **ठकार** घराण्यास श्री. **रघूजीनीं** इनाम सरंजाम करून दिला होता, तो श्री. **जानोजी**कडून वंशपरंपरा चालू ठेववावा अशीं त्यानें **विश्वनाथभटांस** विनंति केली आहे. **मावळे लोक** रोजमुरा वेळेवर मिळत नसे, म्हणून त्यांत **ठकार** व **अंताजी विष्णु** यांनीं पैसे देऊन गप्प बसविलें होतें. या कामीं दोघांनीं पदरचे ५ हजार रुपये खर्च केले. (प. ९)

२९. **नारो अनंत गद्रे** :— हे **लाखणवाड्याहून विश्वनाथभटांस** आपल्या वसुलीच्या कामगिरीची हकीगत कळवीत. त्यांचा ज्या कर्जदारांशीं संबंध आला, त्यांचीं नांवें या पत्रांत आहेत. **रामाजी परशुराम घारे** व **सदाशिव विश्वनाथ सहस्रबुद्धे** यांनीं त्यांस दिलेल्या पैशाची पावती **विश्वनाथभटांकडे** पाठविली. **विश्वनाथभटांस शिवभटानेंही नागपुरास** आल्यानंतरची हकीगत कळविली. (प. ३३) **विश्वनाथभटांच्या** व **विठ्ठल हरी फडणीस** यांच्या पत्रांतून **गद्रे** यांजबद्दल उल्लेख आहे, तो त्यांच्या नांवाच्या सदरांतून पत्रावरून कळेल. (प. ३७, ३९)

३०. **विठ्ठल हरी फडणीस**:— हे **विश्वनाथभटांना** कळवितात कीं, प्रांत बारीची फडनिशी तुम्हीं मला मिळवून दिली. त्याबद्दल वार्षिक वेतन रु. १५० मिळावयाचें. तें काम करण्यासाठीं यानें आपला धाकटा भाऊ **शिवाजी** यास पाठवून त्याचे हाताखालीं एक कारकूनही ठेविला होता. हें वेतन कमी आहे व तुम्ही इकडे आलां म्हणजे वाढवून द्याल अशी आशा त्यानें पत्रांत व्यक्त केली आहे. आतां **वैद्यांचे** कारकून **नारोपंत गद्रे** व **केसो हरी सावरकर** हें काम मजकडून काढून आपण करूं म्हणत आहेत. हें **विश्वनाथभट** काम देतांना जें बोलले त्याचे विरुद्ध आहे. **बोरीची** सनद **रत्ना महाडिकाचे** नांवें पाठवावी असें त्याचें म्हणणें होतें. ( प ३९ )

३१. **रंगो महादेव**:—(१) हे **वैद्यांचे** कारकून **नागपुराहून विश्वनाथभटांस** कळवितात कीं, **शिवभट साठे बंगाल्यांतून** आले असून, **काळे** यांचे बंगल्यांत राहिले आहेत. तें म्हणतात कीं, **सदुद्दीखानाची** व श्री. **जानोजीबावांची** भेट झाल्यावर तुमचे पैसे देण्यांत येतील व तेच सर्व सावकारांचे वांटतील. **विश्वनाथभटांनीं पेशव्याबरोबर** असावें असें **शिवभटांचें** म्हणणें होतें. **शामजी फुलाजी, जगोजी फुलाजी**, व **कृष्णाजी गोविंद गोरे** यांजकडील कर्जाची वसुली, व वकिलीची उगवणी यांबद्दल **रंगो महादेव** यांनीं हकीगत **वैद्यांस** लिहिली आहे. ( प. ४९ ) ( २ ) हें पत्र जरी लांबलचक आहे तरी यांत **विश्वनाथभटांच्या वऱ्हाडांतील** देवघेवीचा व तिकडील अधिकाराचा पुष्कळ खुलासा आहे. यांत राजकीय व ऐतिहासिक माहिती जरी फारशी नाहीं तरी **विश्वनाथभटांचा** कोणत्या माणसांशीं संबंध आला हें यांत वाचावयास सांपडेल. ( प. ६० )

---

## समारोप

माझें आयुष्य व हातीं घेतलेलें आमच्या घरच्या दफतरांतील ऐतिहासिक कागदांच्या छपाईचें काम माझ्या मतें आतां माझेकडून शेवटचें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मी मुंबई विश्वविद्यालयांतील शेतकी या विषयाचा पदवीधर आहें. इतिहास हा माझा ऐच्छिक विषय नसून मी कुलवृत्तांत छापण्याचें काम न करतां ऐतिहासिक कागद छापण्याचें काम कां हातीं घेतलें हें मीं खंडांच्या प्रस्तावनेंत दिलें आहे. हें काम खर्चाचें व पैसे घालविण्याचें असल्यामुळें सरकारकडून त्याची प्रसिद्धी व्हावयास पाहिजे; पण खटपट करूनही यश येत नाहीं. खरा इतिहास बाहेर आणण्यास मदत करणारी ही बाब नाहीं असें कोण म्हणेल? मीं काय खटपट केली व करीत आहें याची वेळोवेळीं प्रस्तावनेंत माहिती दिली आहे.

ज्यांनीं हें काम करण्यास मला निष्कामबुद्धीनें मदत केली त्यांचा मीं प्रत्येक खंडाच्या प्रस्तावनेंत उल्लेख केला आहे. रा. रा. **यशवंतराव फफे** उर्फ **मनोहर** यांचे नांवाचा या वेळीं उल्लेख टाळणें हा दोषच होईल. हें काम करतांना प्रस्तावनेंत कागदांत आलेल्या विषयांचा व व्यक्तींचा उल्लेख करतांना संशोधकास कांहीं नवीन माहिती व्हावी अशी दृष्टि ठेविली होती. हा उद्देश कितपत साधला आहे हें वाचकच ठरवितील. माझ्या कागदांचें ऐतिहासिक दृष्ट्या काय महत्त्व आहे हें **रा. ब. सरदेसाई**-सारख्यांच्या मतांचा केलेला उल्लेख वाचून वाचकांस कळणार आहे. मॉडर्न रिव्ह्यूच्या जुलै १९५१ च्या अंकांत A noble Historic family या मथळ्याखालीं सर **यदुनाथ सरकार** यांनीं आपला अभिप्राय दिला आहे तो वाचकांनीं अवश्य वाचावा.

छापण्यासाठीं कागद कसे तयार करावे लागतात, छपाईचें काम सोपें व कमी श्रमाचें व्हावें याबद्दल कंपॉझिटरांस काय सूचना द्याव्या, इंग्रजी विशेष नामांचे अपभ्रष्ट मराठी शब्द कोणते, प्रस्तावना व सूची तयार करण्यास कोणती तयारी करावी, प्रस्तावनेंत ऐतिहासिक कागदांचें वर्गीकरण करण्यास कोणतीं व कशीं सदरें पाडावीं, स्थल व विषय सूची कशी करावी, जमाखर्चांतील पूर्वींचे हुंड्यांचे प्रकार कोणते होते ? कर्तबगार, राजकीय बाबतींत तरबेज मंडळी कोणती होती ? यांचीं टिपणें मीं वेळोवेळीं करून ठेवलेलीं आहेत. तीं माझे चिरंजीव पुढील कागद छापतांना उपयोगांत आणतील. लोकराज्य झाल्याकारणानें हिंदुस्थानांतील प्रांतांचींही नांवें बदलण्यांत आलीं आहेत, तीं ऐतिहासिक विषयांचा विचार करतांना आतां अभ्यासावीं लागतील. मी आज १५।२० वर्षें माझे दप्तरांतील कागद पाहत आहें. त्यांतील कांहीं महत्त्वाच्या व्यक्ति व विषय यांबद्दल निबंध लिहून भा. इ. सं. मंडळांत वाचले आहेत. माझ्या प्रत्येक खंडांत यांपैकीं मीं एक निबंध छापला आहे. मंडळाचे त्रैमासिकांत माझे फारच थोडे निबंध छापले गेले आहेत. न छापलेल्या निबंधांचा माझे चिरंजीव योग्य तो उपयोग करतील.

माझे स्नेही रा. रा. **कृष्णाजीपंत पेंडसे** यांचीं मला सूची करण्यांत फार मदत झाली आहे. त्यांचा मी आभारी आहें. मीं हें काम करण्याचे कामीं जीं नियमवजा टिपणें केलीं आहेत त्याप्रमाणें मीं हें काम समाधानकारकपणें केलें आहे असें वाटत नाहीं. याचीं कारणें माझे प्रकृतीची दुर्बलता व योग्य मदतीचा अभाव हीं होत. याबद्दल वाचक क्षमा करतील. वैद्य दप्तरांतील ऐतिहासिक कागद निवडून प्रसिद्ध केल्यानें आपल्या देशाचा खरा इतिहास तयार करण्यास मदत झाली तरच माझ्या श्रमांचें चीज झालें असें म्हणतां येईल. 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते ।' इत्यलम्.

सोमवार, मिति पौष वद्य ११<br>शके १८७३ — शं. ल. वैद्य

# शुक्र संवत्सर शके १६७१

## इ. सन १७४९।५०

पत्रांक १ ] श्री. मार्गशीर्ष वा। १३।१६७१
डिसेंबर २६, १७४९

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री **बाळंभट** व ता। **विश्वनाथभट** स्वामी गोसावी यासि—

पो **कृष्णाजी त्र्यंबक** कृतानेक नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल ता। मार्गशीर्ष वद्य त्रयोदसी मु।। **किले राजगड** जाणून स्वकीय लेखन कीजे विशेष. आपण पत्रें पाठविलीं होतीं तीं **पुणियासि** रवाना करून रा। **केसोपंताचा** जाब आणून पाठविला आहे. त्या पत्राचा अर्थ विदित होईल. रा। **मानाजी पवार** यास पत्र दिल्हें होतें. त्यास प्रविष्ट करून उत्तर दिल्हें व हुंडीपत्र माघारें आणलें आहे, तें पाठविलें असे. तूर्त कोणापासून रा। हातास यावासा दिसत नाहीं. महिन्या दो महिनिया स्वस्तिक्षेम असलिया यैवज येईल, तूर्त येत नाहीं. लस्करांत मनुशें रवाना करतों. उत्तर तेंही कोण्ही मनुषाचा लौकर देईना. मनुश हैरान होऊन येतें. आमचें कार्य कांहीं यैशा वरातांनीं होत नाहीं. गडकरी यांचा वसुलाचा गवगवा पडला. उपाये तो नाहींच. तुम्हांस मात्र वारंवार लिहितों. इकडील फौजा जमा जाल्या आहेत. त्यांचें वर्तमान तहकीक तो नाहीं. परंतु वार्ता येती कीं, समजावीस होत आहे, पुढें होईल तें पहावें. वरकड आपले दरबारचा मजकूर तरी कारभाराचा अर्थ. तुम्ही आम्हांस निरोप इकडे यावयासि दिल्हात. मागें रा। **मोरोपंतां**कडील निशेचा बखेडा आरंभीं करावयाची निशा करावी म्हणतां. नाहीं तो उद्योग योजून कर्जदार च्यार दिवस समजवावें, तें आधीं पुढें लाऊन त्यांची तगादे निर्माण करतां. खावंद गिरीचे सदुपाये नाहीं. आम्ही काय वावगें करतों म्हणोन हटा खालें गोष्टी मात्र घालितां. उत्तम गोष्ट आणखी कोणास ल्याहावें ! जैसें पुढें होणार तदनुरूप ईश्वर अनुकूल करितो. तुमची निशा रा। **मोरोपंतां**ची नेमली आहे, ते करून देतील. तुम्ही घेणें. **रास्ते** यांची दहा हजारांची मात्र चिटी कराराप्रों घ्यावी. वरकड **रास्ते** यांची समजावीस करणें तैसी करून देतां येईल. उगाच बखेडा सर्वथा होऊं न दीजे. वरकड वर्तमान सविस्तर श्रीमंतांचे पत्रीं लि।। आहे, त्यावरून कळेल. बहुत काये लिहिणें, लोभ असो दीजे हे विनंति.

Krishnaji Tryambak Lohokare, Sachva's officer at Rajagad fort, writes to Vaidya brothers what mistakes they

were committing with regard to the submission of Sinhagad to the Peshwa. Though the army was being kept ready to oppose, there was a chance of compromise. Manaji Pawar was indifferent in arranging to pay the debt. The date of this letter will determine the approximate dates of letter nos. 1 and 2 of 1749.

---

पत्रांक २']

शके १६७१
सन १७५० ?

सेवेसी **नारो सिवदेव** कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन आपलें निरंतर स्वकुशल लेखन करीत गेलें पाहिजे. यानंतर आपण पत्र पाठविलें तें पावलें. येथें **करवीरकर** स्वामी यांजकडील अर्थ सविस्तरें लिहिला तो कळला. यैसी-यासि राजश्री **रंभाजी मोहिते** येथे आले होते. त्यांनीं करार-मदार करून गेले. त्यांतील कांहींएक प्रकार दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. तस्मात् थोर आहेत, त्यास काय म्हणावें ? आम्ही त्यास तर कैलासवासी **शाहू महाराज** यांचे स्थानीं धरितों, यैसे असोन ते दूर धरितील तर ते थोर आहेत, यांस काय म्हणावें ? याजकडून दुसरा विचार दिसोन आल्यास आम्हांसहि इतर स्थल पाहावें लागेल. मग म्हणतील कीं, पदरचे बहुधा दिवसाचे आसोन यांणीं इतर दरबारीं आर्जव करून उदरपूर्तीचा विचार

अपुरें पत्र

यादी कागद येणेंप्रमाणें पा.

२ **पेशवे** यांचीं पत्रें कीं, **सदासिव रघुनाथ** यांचे शो तुम्ही देणें म्हणून मोर्तबनसी

१ **बापूजी दादाजी** यांचे नांवचें कबज आहे. चाळीस हजार. आणखी वर आहेत ते.

—

३

१ **यशवंतराव गुलाब** यांची वरात रुा १४००.

—

१

२ **जानोजी जालके** व **राघोजी जालके पोटभरे** यांचीं

१ खत शो ४०० त्याची नक्कल

१ खतें देखील मार.

—

२

येकूण च्यार कागद पाठवावे.

Naro Shivdeo belonging to Raja Bahadur Vinchurkar's family writes this letter after the death of Shahu Chhatrapati. He complains of the undesirable attitude of Rambhaji Mohite towards the Shankaracharya of Kolhapur and also, himself.

The list of the papers, issued as orders, given at the end does not throw any light on the matter mentioned in this letter. However the orders refer to the payment of money by Vaidyas to Sadashiv Ragunath Ghanekar. Bapuji Dadaji's sirname was Phatak & was Ghanekar's mukhtyar. The date is doubtful.

---

पत्रांक ३ ] श्री शके १६७१
सन १७५०

यादी नेमणूक गला दास्तान नेरेपैकीं राजश्री विश्वनाथभट वैद्य यांस देविला. सुमा इहिदे खमसैन. चौसेरी[१]-मापें गला खंडी.

| | |
|---|---|
| २८२ | बाजरी |
| २ | नागली |
| ·।· | गहूं |
| ·।३ | जोरी |
| ·। | मीठ |
| २ | तांदूळ मोठे |
| ७ | एकूण सात खंडी रो अन्ताजी हरी यांणीं द्यावें. |

१ चारशेरी माप.

Pant Sachiv of Bhor had given a yearly allowance of corn to Vishwanathbhat Vaidya to the extent of 7 Khandis from the village Nere of his state. After 7 there is a sign showing that there is no more corn.

पत्रांक ४ ]                    श्री                    २५ सफर

पौष वद्य ११।१६७१

जानेवारी २३, १७५०

श्रीमंत राजश्री **बाळंभट** व **विश्वनाथभट वैद्य** स्वामींचे शेवेशी.

विनंती सेवक **श्रीनिवास व्यंकाजी द्रावीड** दि॥ राजश्री **सदाशीव नाईक लिमये**, नमस्कार. विनंती येसीजे, तुम्ही **आनंत भट द्रावीड** चाकर ठेविला, त्यास जमान मागितले, त्या आपण जमान असो, नायकले तरी हजर करून. हजीर करूं न सके, तरी त्याचे निसबतीचा जाब करून देऊं. सुमा खमसैन मया आलफ छ. २५ सफर सही (तेलगू).

Shriniwas Vyankaji Dravid, the agent of Sadashiv Naik Limaye, gives guarantee to Vaidyas for presenting Anantbhat Dravid to serve them as settled with him. The signature at the end in Telagu should be got read by one knowing the language.

---

पत्रांक ५ ]                    श्रीरामो जयति                    छ १९ राविल

माघ व. ६।१६७१

फेब्रुवारी १६, १७५०

वर्क[1] जमा माहाल भांडारगृह अैवज ता॥ **खंडोजी गोगवले** हवालदार महाल मजकूर. सु॥ खमसैन मया अलफ. बा॥ जमाई यैवज राजश्री **रघूजी बाबा भोसले** बा॥ खाजगी वगैरेपैकीं मा॥ राजश्री **बाळंभट** व **विश्वनाथभट** वैद्य रुपये २००००. वीस हजार [2]वजापाडा [3]बहुडा ०, बाकी जमा माहाल मजकूर वीस हजार रुपये.

ता॥ २००००,

| | |
|---|---|
| गुजारत **नानाजी नाईक जोशी** रुपये | हवाले सावकार छ. रबिलावल |
| ९७०० छ. १५ माहे रबिलावल | १२०० **वेंकाजी शामजी उमदी** |
| ३०० छ. १७ रबिलावल | ८०० **रंगाणा मासाल** |
| —— | ३००० **महादोबा नाईक थथे** |
| १०००० | —— |
| गुजारत राजश्री **बाळंभट वैद्य** | ५००० |
| २००० छ. १७ रबिलावल | |

२५०० छ. १८ रबिलावल
५०० छ. १९ रबिलावल
—
५०००

गुजारत वेंकाजी नाईक पोतदार
३९९० छ. १७ रबिलावल
१०१० छ. १८ रबिलावल
—
५०००

तेरीख १९ माहे रबिलावल बार

---

१ वारख, अर्धा बंद, देशी कागदाचा ½ भाग. २ वजावाट ३ खोटे

This letter is written by Chhatrapati's private treasury officer Khandoji Gogawale to Raghuji Bhosle, acknowledging the receipt of Rs. 20,000. It is important for the technical words and also the mention of some well-known persons such as Nanaji Naik Joshi, Venkaji Shamji Umadi, Rangana Masal, Mahadoba Naik Thathe and Venkaji Naik Potadar.

---

पत्रांक ६ ] श्री फाल्गुन शुध ६।१६७१
मार्च २,१७५०

शिक्का व मोर्तब
तिहेरी लंबगोल

श्री सिवचर
णी तत्पर रघुनाथ
सुत वीस्वनाथ
नीरंतर

( विश्वनाथभट वैद्यांच्या
शिक्क्यांतील मजकूर )

कौलनामा आज स्वारी राजश्री **बाळंभट** व **विस्वनाथभट वैद्य** ता। मोकदमानी मौजे **मोहरी** बु॥ ता। **गुंजण मावळ** सुभा खमसेन मया आलफ. तुम्ही **सातारीयाचे** मुकामीं येऊन विनंती केली कीं, येंदा नापीक जाहाले, त्यास जीवन माफिक,[1] सोड देऊन वसाहात करावी; त्यास तुम्हांवर नजर देऊन, सालगु॥ हुजूरची खंडणी रुपये परभारें खेरीज करून, खंडणी सा करार केले असत. तरी यैवज हुजूर

पावऊन सुखरूप राहाणें. पेस्तर सालची लावणी करून आबादानी करणें. धरिंचध कौल आसे. जाणीजे छ ४ माहे रचिलाखर.

मोर्तब
सुद

---

१ सूट.

This is a model of contract made by Vaidya brothers with the Mokadam of Mohari Budruk village, for the cultivation of the lands by the villagers after the famine year. On the paper the stamp and Mortab of Vaidyas, are used.

# प्रमोद संवत्सर शके १६७२

## इ. सन १७५०।५१

पत्रांक १ ] श्री १९ जावल
चैत्र व. ६।१६७२
एप्रिल १६,१७५०

राजश्री **विसाजी रघुनाथ वकील** गोसावि यासि.

श्रो **रघोजी भोसले** सेनासाहेब सुभा दंडवत सुभा खमसैन मया आलफ. तुम्हाकडे सरकारचा यैवज पनास हजार येणें, त्यापैकीं तपोनिधि राजश्री महंत **बनसीपुरीबावा गोसावी** यांसी रुपये ४७५०० सतेचालीस हजार पाचसे रुपये रदकर्जे देविले असेत. देणें. छ. १९ जमादिलोवल † बहुत काये लिहिणें.

---

† पुढील अक्षर लेखकाचें स्वतःचें

Raghuji Bhosle writes to Vishwanathbhat that he should pay Rs. 47,500 to Bansipuri Gosavi out of Rs. 50,000 to be received from him, to pay his debt.

---

पत्रांक २ ] श्री वैशाख शु. १०।१६७२
मे ४,१७५०

पो छ. २८ माहे रजब ऊर्फ जेष्ट वा ३०.

श्रीमंत राजश्री **बाळंभट बावा वैद्य** स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक **राघो बल्लाळ भोगले** मुकाम **रामटेक** कृतानेक सा नमस्कार विनंती. येथील क्षेम ता वैशाख सुद्ध दसमी पावेतों स्वामीच्या आसीर्वादें करून सुखरूप असे. विशेष श्रीमंत राजश्री **विश्वनाथबावांहीं** पत्र **टोकयाच्या** मुक्कामीहोन लिहिलें, त्याजवरून संतोष जाला, छ. ६ जमाखरीं **पिंपरी** यांसी उभयता श्रीमंत दाखल जाले. आपण दर्शनास जाणार. आम्हांकडील वर्तमान रा **सदाशिवपंत** मुखवचनें सांगता निवेदन होईल. आपणा कडील संतोष लिहावयासि आज्ञा केली पाहिजे. बहुत काय लिहिणें. कृपालोभ असो दीजे हे विनंती.

राजश्री **रामचंद्रपंत** स्वामीस सा। नमस्कार, लोभ करीत असले पाहिजें. बहुत काय लिहिणें हे विनंति.

सौभाग्यादिसपन वज्रचुडेमंडित मातुश्री **सरस्वतीबाई** व मातोश्री **उमाबाई** यांसि सा। नमस्कार, श्रीमंत रा। **सदाशिवपंत दादा** स्वामीस सा। नमस्कार व रा। **रामाजीपंत दादास** सा। नमस्कार हे विनंती.

Ragho Ballal Bhogale writes this letter to Balambhat from Ramatek, informing that Raghuji arrived at Pimpari and he expected him to go to see him. Sadəshiwapant Limaye had gone ro Satara and was able to give the news of Nagpur.

---

पत्रांक ३ ]　　　　　　श्री　　　　　　सु॥ खमसैन
वैशाख शु॥ १४।१६७२
मे ९,१७५०

हिशेब राजश्री **राघोपंत फगरे** सुरू खमसैन मया आलफ ता। वैशाख शु॥ १४

६०० प्रभव भाद्रपद सुध चतुर्दशी
१७६ व्याज रुपये १ प्रो मु॥ आहे
३२ रुपये १९२ वजा
बारोत्रा रुपये १६. बाकी.

---

७७६

This is an account of Raghopant Phagare also called Khandakar. The letters of this family are published in volume I. The family had money dealing with Vaidyas for many years.

---

पत्रांक ४] श्री वैशाख वद्य १।१६७२
मे ११,१७५०

**रघूजी भोसले** यांनीं **बन्सीपुरी** गोसावी यांजकडून ज्यांस रकमा देवविल्या त्यांची यादी.

४००० **अंबाजी महाडिक** बा। लग्नाबद्दल
२००० **कृष्णाराम मोधी**
५०० **लाडाई तांबोलीण** ग्रा। **महिपतराव**
छ. ३ जा।कर
२०० **लाडाई तांबोलीण**
३० **बाबाजी बागवान** ५० पैकीं
१७० ता। **कृष्णाजी तानदेव**
२० **बागवान** ५० पैकीं
१०० **लोणारी**
५० **बुरूड** बाकी
———
१७०
———
४००
१०० लोणारी ता। **कृष्णाजी तानदेव**
———
५००
१५० छ. ६ जाखर **महादू तेली**
८००० छ. जाखर **विसाजीपंत खासनीस** परवानगी
———
१४७५०
२०० लग्नाचे समई ग्रा। **विश्वनाथभट** रोख व मोहरा सुमार १० पैकीं
———
१४९५०
५० बाकी देणें
———
१५०००
५००० रकमेचा तपशील
४८०० बटा रुपये २०० वजा रु. ५००० त जातां बाकी दिले, त्याबा। चिटया रुपये
१५०० **हैबतराव पांढरे**

२७०० मानाजी बोरकर

४२००

२००००

This is a list of persons to whom money was paid by Raghuji Bhosle through Bansipuri Gosavi. Receipts were taken by Vaidyas, as they paid the sums according to Gosavi's Chits or Hundis.

---

पत्रांक ५ ] श्री ज्येष्ठ १६७२
मे १७५०

चिरंजीव राजश्री **रामचंद्रपंत** यास प्रती सौ. **गंगाबाई** व सौ. **उमाबाई** आसीर्वाद. उपरी माझगराचे खोलीमधें मेडीजवळ वितीच्या अंतरानें पुतळ्या पाचसे व कडी तीन, मोहरा सात व चिंदल्याचा जोड येक, वेणीचे नग यैसे आहेत, ते तजविजीनें काढून पाठवून देणें. हा आशीर्वाद.

Wives of Balambhat and Vishwanathbhat ask Ramachandrapant Karakare to send the oraments, stated in the letter. It is to be marked that their place underground in the Wai house (joint) is definitely given. Date is uncertain.

---

पत्रांक ६ ] श्री ज्येष्ठ शुा ११६७२
मे २५,१७५०

यादी झाडा ठेवा

| जमा — रुपये | रुा |
| --- | --- |
| १४५०० खोली **विश्वनाथभट** | २२५०० खोली **विश्वनाथभट** |
| रुपये २५५०० पैकीं. | अलीकडील |
| | ६९९७ खोली **विश्वनाथभट** |
| १४५०० | अलीकडील नि मोरी |
| बाकी | ३३५०० खोली **विश्वनाथभट** |
| ५७४२७ | पलीकडील हल्लीं माजघर |

| | | | |
|---|---|---|---|
| | १७००० | | १४५०० १९००० |
| | ——— | ९००० | देवघर घागरी २ |
| | ७४४९७ | ——— | ५००० ४००० |
| ९००० | देवघरपैकीं देणें रघूजी भाो देणें. बन्सीपुरी आदा.महादेव नाातांबवे कर वय १२ | ७१९९७ | |
| | | १७००० | सैपाकघर हांडा १ |
| ८००० | खोली विश्वनाथभट २२५०० पैकीं | ——— | |
| | | ८८९९७ | |
| | | | खेरीज |
| | ७७०५ यैन जमा | १०००० | परली |
| | २९५ चूक | ६००० | मामलेस्वर |
| | ——— | ७०० | सदासिवपंत |
| | ८००० | ——— | |
| २५ | खोली विश्वनाथभट ५००० पै. चुका. बाकी सन इहिदे खमसैन ज्येष्ठ १ | १६७०० | |
| ६९९७ | खोली विश्वनाथभट पैकीं हांडा १ | | |
| ३३५०० | माजघर हांडे २ १४५०० १९००० | | |
| १७००० | सैपाकघर | | |
| ——— | | | |
| ५७४९७ | | | |

सदरहू बाा जमाखर्च जाहला आसे बाकी ०

This list of the various amounts of money is a document showing how the money was kept safe by Vaidyas in the secret parts of the Wai house in metal pots such as हंडे, घागरी and also drain ( मोरी ) and rooms देवघर where the family deities were worshipped every day. This was the practice in 1750 when the whole family was not divided and was living at Wai in the house which was first built in the Ganapati-ali.

पत्रांक ७ ]　　　　श्री　　　　३ रजब
जेष्ठ शु. ४।१६७२
मे १८,१७१०

तर्थिस्वरूप राजश्री **बालंभटबावा** व राजश्री **विश्वनाथबावाभट** वडिलांचे शेवेसी.

अपत्येसमान **सदाशीव रघुनाथ** कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ **३** माहे साबान पावेतों येथील वर्तमान यथास्थित असे. विशेष राजश्री **विठल जिवाजी,** आपण रा **मल्हार आनंदराव** याजकडोन रुपये वसूल करावयास पाठविलें होतें. त्यास या दिवसामध्यें पैका मिळतो नाहीं, हें स्वामीस विदितच आहे. त्यास आम्ही सांगितल्याप्रमाणें श्रम करून रुपये वसूल केला व श्रीमंतांनीं **साताऱ्या**हूनं येते वेळेस रुपये साडेच्यार हजारांचें खत लिहोन दिल्हें, त्यापैकीं साडेतीन हजार रुा राजेश्री **नारोपंत नाना** यांचे गुजारतीनें तुम्हांकडील पावले. **गंगाधर नाईक बानवळे** यांस हजार रुा देविले होते, ते तुम्ही न दिले तें उत्तम केलें. साडेतीन हजार रुा तुमचे श्रीमंतांनीं साडेच्यार हजारांचे खताबाबत देणें. त्यास तूर्त येथें यैवज नव्हता. सालमजकुरीं मुलकास सोड बहुत पडली, परंतु स्वामीजवळ वचन श्रीमंतांनीं जें केलें तें खरें जाहलें पाहिजे. यास्तव रा **मल्हार आनंदराव** यांचें खत रुपये २४०० चोवीशेचे रुपये **विठ्ठल जिवाजी** याजजवळ दिल्हें आहे व रो **बापूभट वैद्य** यांजकडून आम्ही देविले रुपये ८०० आठशें हे घेऊन रो **खंडो मल्हार** यांचे नांवें कबज द्यावें जें, श्रीमंतांनीं तुम्हांकडून रुा ८०० आठशे देविले ते मारफत **सदाशीव रघुनाथ घाणेकर बापूभट** वैद्याकडून लेहून पावलों असें कबज लिहोन, रो **बालाजीपंत मामा** यांजवळ जे बाकी साडेतीन हजारांपैकीं राहिले रुपये ४०० हे पौष मासचे दिडोत्र्याप्रमाणें व्याज कापून घ्याल तर आम्ही हालीं देऊं, याचें उत्तर पाठवणें म्हणजे पौष मासचें मुदतीचें व्याज कापून रुपये चारशें पाठवून देऊं. याप्रमाणें श्रीमंताकडून तुम्हांस साडेतीन हजार रुपये पावले व रा **मल्हार आनंदराव** यांनीं दोन हजार रुपयांच्या हुंड्या दोन रो **विठ्ठल जिवाजी** यांजवळ दिल्या आहेत, रुपये पावल्याचा जाब राा **मल्हार आनंदराव** यांचे नांवें पाठविनें. स्वामी सेवा **विठ्ठल जिवाजी** यांनीं बहुत केली आहे, याचे जाण होणारे आपण समर्थ आहेत. येविशीं आपणास बहुत लिहिणें नलगे. सेवक पदरचे. यांचें आपण चालवितील. आम्ही सांगितल्याप्रमाणें उपवासही केले. खटपटही सांगितल्याप्रमाणें करून पैका स्वामीचा उगविला. आपणांस विदीत व्हावें म्हणून लिहीलें. लोभ असो दीजे हे विज्ञापना.

**येसाजी डोबरे** व **प्रतापराव सिलीमकर** यांचें वर्तमान, तूर्त पैका येत नाहीं. आम्ही अलियावर शेवेसी विदीत करूं व हलीं **विठ्ठलपंतही** सांगतील. तजविजेनें कार्य केलें तर शेपन्नास रुपये येतील हे विनंती.

This letter is written by Sadashiv Raghunath in the capacity of a younger relative of Vaidya brothers. It is not known what family relation he bears. The remaining contents refer to the recovery of money from Malhar Anandrao and Pant Sachiv. Yesaji Dobar and Prataprao Silimkar did not pay any money.

---

पत्रांक ८ ] श्री जेष्ट शु. ४।१६७२
मे २८,१७५०

सहस्रायु चिरंजीव विजये भव राजेश्री **विश्वनाथभट वैद्य** यांसि प्रति **बापूभट वैद्य** कृतानेक असिर्वाद. उपरी येथील कुशल ता जेष्ठ सुध चतुर्थी जाणून स्वकीये लिहित जाणें. विशेष आपण पत्र पाठविलें तें पावलें. भेटीस येणें म्हणून लिहिलें, त्यास श्रीमंत महाराज मातुश्री **आईसाहेब पुण्यग्रामास** जावयासि आजि त्रितीये प्रहरीं निघणार. प्रस्थान प्रातःकालीं डेऱ्यास गेले. समागमें आम्हांसही जावें लागतें. ती बाहीर निघून खेडावर गेली म्हणजे आम्ही तुमचे भेटीस येऊं. वरकड वर्तमान भेटीअंतीं कळेल. बहुत काये लिहिणें. लोभ असो दीजे हे † आसीरवादं.

सौ. येसूबाई **सातारेस** येणार आहे. त्यांस तुमचे घरचीं माणसें आगर कोणी दुसरे उत्तम सोबत सोईला येईल त्याबरोबर पाठवून देणें.

---

† पुढील अक्षर लेखकाचें स्वतःचें आहे.

Bapubhat Vaidya, Chhatrapati's medical adviser, writes to Vishwanathbhat from Satara, the news about the movement of queen Tarabai to Poona. He was to accompany her and meant to see him before she proceeds from Khed.

पत्रांक ९ ]　　　　श्रीरामो जयति　　　　ज्येष्ठ शु॥ ९।१६७२
जून २,१७५०

श्रीमत् राजश्री **रघूजी बावा**

**भोसले** गोसावी यासि.

श्री **खंडोजी गोगवले** हवालदार महाल भांडारगृह. रामराम विनंति उपरी. बा॥ यैवज हवाला सु॥ सन इहिदे दीड लक्ष पैकीं देणें, राजश्री **जिवराव सिंदे** रुपये २५०० अडीच हजार देऊन पावलियाचें कबज घेतलें पाहिजे. तेणें प्रों [1]मजरा असे छ ८ माहे रजब सुरू इहिदे खमसैन मया अलफ हे विनंति.

मोर्तब सुद

---

१ वजा.

This is a letter by Khandoji Gogawale to Raghuji Bhosle to pay Rs. 2500 to Jivarao Shinde out of Rs. one and half lac to be paid to Chhatrapati.

---

पत्रांक १० ]　　　　श्री　　　　जेष्ठ शुध १०।१६७२
जून ३,१७५०

रा॥ **विश्वनाथभट वैद्य** स्वामी गोसावी यासि.

सेवक **अंताजीराम मछे** नमस्कार विनंति उपरी. आमचे यैवजी रा॥ **गोविंद-भट लघोट** यासी रु॥ १९७॥। येकेस पावणे आठ्याणव देणें. मिति शके १६७२ जेष्ट शुध १० हे विनंति.

Antajiram Matse (मत्से) requests Vishwanathbhat to pay Rs. 197–12 to Govindbhat Laghate. Both persons are Karhade Brahmins.

पत्रांक ११ ] श्री

प्रमोद ज्येष्ठ शुा १५।१६७२
जून ८,१७५० ते
प्रजापति अश्वीन वा। ५।१६७३ सप्टेंबर २८,१७५१

हिशेब राजश्री **निलो रघुनाथ व दामोदर रघुनाथ वैशंपायन** सुमा इसने खमसैन मया आलफ प्रजापति सवछंरे

| | ऐन | व्याज दर ११ |
|---|---|---|
| प्रमोद नाम सवछरे जेष्ट शुा १५ ता। प्रजापति सवछरे आश्विन वद्य ५ ताो मुा माहे १२ रोज ८५ | १०० | १६८=॥ |
| प्रमोद नाम सवछंरे आश्विन शुा १४ ता। प्रजापती सवछरे आश्विन वद्य ५ मुा माहे १२८७ | १५० | १८।=॥ |
| | २५० | ३४॥- |

तेरीज रुपये

| मुद्दल | व्याज |
|---|---|
| २५० | ३४॥- |

एा

२८४॥-

This is an account of Nilo and Damodar Raghunath Vaishampayan of money dealings with Vaidyas. Nilo Raghunath appears to be the same person who wrote the account of the capture of Chanda Khan of Trichanapalli. ( Vide his letter of 26-4-1741. )

---

पत्रांक **१२** ] श्रीरामचद्र जे. व. १।१६७२
जून ९,१७५०

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री **बालंभट व वैश्वनाथ वैद्य** स्वामी गोसावी यांसी.

पोष्य **चिमणाजी नारायण** सचीव कृतानेक नमस्कार विनंति. येथील वर्तमान ता। ज्येष्ठ वद्य प्रतिपदा मुा पुणें येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान

पेशवे यांणीं बहुत निकड जागयाकरितां केली आहे. मातुश्री आईसाहेब यांणींही बहुत अभिमान धरिला आहे की, तुम्हासी बोली आहे, ती प्रमाणें आहे. आपण तुमचें कार्य करून देऊन. आम्हांस दोहीं कोठें ठिकाण नाहीं, येसें जालें तरी याचा सर्व अर्थ ध्यानांत आणून उत्तर लेहून पाठवणें. राजश्री **स्वामी**कडील सविस्तर वर्तमान लेहून पाठवणें. येथील सविस्तर वर्तमान **भिकाजी जगदळा** सांगेल, त्यावरून कळों येईल. तुम्ही तेथील सर्व वर्तमान **भिकाजी** मार याजपासीं लेहून पाठवणें. त्याहावयाचें वर्तमान नसिलें तरी मुखजबानी सांगणें. लौकर यास पाठवणें. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे, हे विनंति. तुम्हास **मल्हारजी जाधव** याजबरोबर पत्र लिहिलें आहे, त्याप्रमाणें **त्र्यंबक मोरेश्वर** यांजकडे कार्य करून दिल्हें पाहिजे. अनमान येकंदर न करणें. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंति.

---

सर्व पत्र सचिवांच्या हातचें दिसतें.

The whole letter appears to be in the hand of Chimnaji Narayan Sachiv and written to Vaidya brothers in connection with the attitude of Peshwa for securing the fort of Sinhagad. The queen Tarabai seems to take the side of Pant Sachiv.

---

पत्रांक १३ ] श्री १६ रजब
जेष्ठ व. २।१६७२
जून १०,१७५०

राजश्रिया विराजित राज्यमान्य राजश्री **बाळंभट** व **राजश्री विश्वनाथभट वैद्य** स्वामी गोसावी यासि.

प्रति सौ **भवानीबाई** क्षेम विनंती उपरी. येथील वर्तमान ता॥ छ. १६ रजब जाणोन स्वकीये लेखन करणें. विशेष **सातारी**याहून भृगुवारीं दोनसें माणूस निघोन मंदवारीं या मार्गानें आले, कोणीकडे गेले हें वर्तमान कळत नाहीं, तरी सविस्तर लेहून पाठवणें. पेसजी तुम्हांस दोन तीन पत्रें पाठविलीं कीं, दरबारचें वर्तमान क्षणक्षणाचें लेहून पाठविणें. त्यास वर्तमान लोक आल्याचें लेहून पाठविलें नाहीं, तरी सविस्तर वृत्त लेहून पाठवणें. **श्रीमंता**कडील वर्तमान तरी **पुणीयाहून** पत्र लिा आहे त्यावरून कळेल. दरबारचें वर्तमान क्षणक्षणाचें वृत्त लेहून पाठवणें. बहुत काय लिहिणें. कृपा असो देणें हे विनंति.

S. Bhawanibai, wife af Chimnaji Narayan Saahiv, writes from poona to Vaidya brothers some definite news about the movement of 200 persons, coming to poona and going to unknown place. She informed them the doings of her husband and desired to know the political news of Satara Darbar. The date of the letter is doubtful.

---

पत्रांक १४ ] श्री २७ रजब

जेष्ट वा। १४।१६७२

जून २१,१७५०

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री **बाळंभट** व राजश्री **विश्वनाथ भट वैद्य** स्वामी गोसावी यासि—

प्रती सौ. **भवानीबाई** नमस्कार विनंती उपरी येथील वर्तमान तरी ता। छ २७ रजब पावेतों मुकाम किले **विचित्रगड** सुखरूप असो विशेष. तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तरी सविस्तर लेहून पाटवणें. इकडील वर्तमान तरी **श्रीमंत** अद्यापि **पुणियांतच** आहेत. **सिंहगडास** तो वेढा बसला आहे. तो पूर्वी तुम्हांस लेहून पाठविलें त्याप्रमाणेंच आहे. दिवसेदिवस आधिकच भरती येती, परंतु नून्य होत नाहीं. राजश्री **स्वामी** कडून मदत येऊन वेढा उठावा, ते गोष्टी कांहीं होऊन येत नाहीं, तुम्ही येविषई राजश्री **स्वामीस** विनती करितां किंवा नाहीं हेंही कळत नाहीं तरी राजश्री स्वामीस विनती करून **सिंहीगडचा** वेढा उठे ते गोष्टी केली पाहिजे. **रोहिड** खोरियांत व **सिरवल** देशांत राऊत येऊन बसले आहेत. येसा चौहकडून दंगा झाला आहे आणि तुम्ही निःकाळजी बसला आहा, हे गोष्टी अपूर्व आहे. राजश्री **स्वामींनीं** तो अर्धोवटकी घातले. कांहींसें खर्चास व थोडकीसी मदत पाठविली, तेणेंकरून **पेशव्ये** अधिकच हाटास पेटले. तरी राजश्री **स्वामीस** विनंती करून पुर्ता अभिमान धरित आणि किलाचा वेढा उठे ते गोष्टी केली पाहिजे. **श्रीमंता**कडून **सेख हुसेन** तुम्हांस व **राजश्री** स पत्रें घेऊन आला होता, त्याचें उत्तर काय पाठविलें पाहिजे? तुम्ही रुपये येकसे पाठविले, त्याचें खत पाठवणें म्हणून लिहिलें, त्यावरून खत पाटविलें आहे. घेणें. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनती.

This letter is written by S. Bhawanibai, the wife of Chimnaji Narayan Sachiv, from Vichitragad (रोहिडा) to Vaidya brothers, requesting that they should advise the Chhatrapati to order Peshwa.to raise the siege of Sinhagad. At this time the Sachiv was at poona. Vichitragad is also called Rohida and Sinhagad is also called Kondhana.

पत्रांक १५ ]

जेष्ठ वद्य ३०।१६७२
जून २२,१७५०

श्रीमंत् राजश्री **बाळंभट व विश्वनाथभट वैद्य** स्वामींचे सेवेसी.

सेवक **नारो अनंत गद्रे** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील क्षेम ता जेष्ट वद्य अमावाशा. मु **दयाडे** जाऊन स्वकीये लेखन करावयासि आज्ञा केली पाहिजे. विषश. बहुता दिवसीं **गोपाळ महादेव** याजबा पत्र

× × ×

वरून कळों येईल. श्रीमंत राजश्री **पंत प्रधान** यांची भेटी जाहल्यावरी या प्रांतास आले पाहिजे. आम्हांकडील वर्तमान पेसजी लिहिलें आहे. त्या प्राच आहे व हालींही जबानी **गोपाळा** सांगेल. त्यावरून कळों येईल. वरकड वर्तमान येथास्थित असे. रा **कासिराव भास्कर** यांचें नांवनक्षत्र लिहोन पाठवणें म्हणून लिहिलें त्यास **ताईनीं** पत्र पाठविलें आहे त्यावरून कळों येईल. बहुत काये लिहिणे. लोभ असो दीजे. आपला मार्ग लक्षित आहे हे विनंति.

वडिलाचे सेवेसी. **महादाजी राघचंद्र केळकर** सा नमस्कार. लिा परिसिजे, हे विनंति.

This letter is written by Naro Anant Gadre to Vaidya brothers. The intervening page is missing, however it makes a reference of the horoscope of Kashi Bhaskar Kolatkar who was to be married, Taibai, Bhaskarrao's wife, supplied the proper information of Kashirao's horoscope to them. It is not possible that Kasirao was married at 6 years old, if his birth-date is taken after 1744.

---

पत्रांक १६ ]

श्री

छ. २० साबान इहिदे खमसैन
आषाढ वद्य ७।१६७२
जुलै १४,१७५०

राजश्री **विसाजी रघुनाथ वैद्य** गोसावी यांसि.

श्रीं **रघोजी भोसले सेनासाहेबसुभा** दंडवत. सुा इहिदे खमसैन मया आलफ. तुम्हांकडे सन खमस आर्बैन या सालीं भरणा बीतपसील रुपये.

५०००० **देवढी थोरली** कर्ज घेतलें.
४९००० माा **कृष्णाजी वामन** रसद **चांदें उटनूर** रुपये ५०००० पैकीं मारानिलेकडे राहिले. रुा १००० बाकी.

२०००० रसद रतनपूर धमदे मा रामचंद्र सिव-
देव दिा शिवाजी नारायेण सो २५०००
पैकीं, [१]गैरादा सा ५००० याकी.
२५००० कर्जे तुम्हांकडील रुपये

१४४०००

येकून एक लक्ष चवेचालिस हजार रुपये तुम्हांकडे जमा केले होते. त्याजवर लोकांची खासुदगी करून देविला. त्यास सालमजकुरीं सदरहू रुपयांच्या हिसेबाची पुरसीस केली, त्यास गैरादा रुपये व बटा बी.

५००० गैरादा रुपये
१००० महंत गुलाबगीर पैकीं
२००० रामाजी दामोदर
सुलतानजी कोकरे व येसवंतराव
वाबळे

५०००
१९६०॥ तुम्ही आपले नांवें लिहिले त्यांपैकीं
४८१४ बटा तुम्ही जमा करून दिल्हा
येकंदर सदरहू रुपयेपैकीं
११७७४॥

येकून आकरा हजार सातसे साडे चवऱ्या हातर रुपये सरकारांत जमा केले असेत. जाणीजे. छ २० माहे साबान † बहुत काये लिहिणें हें विनती.

मोर्तब
सुद

१ इतर वरकड लोक. + पुढील मजकूर रघूजी भो यांच्या हातचा.

This is a detailed account of the money paid to Vishwanathbhat by Raghuji Bhosle for different purposes, for paying off his debt.

पत्रांक १७]　　　　　　　　श्री　　　　　　　　छ २५ साबान
　　　　　　　　　　　　　　　　　　　　नकल　आषाढ वद्य १२।१६७२
　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　जुलै १९,१७५०

नेमणूक नि राजश्री **नारो अनंत** मो **भुगाव** सुा इहिदे खमसैन मया आलफ. दरमहा रुपये.

२५ **नारो अनंत**
९ प्यादे ३ दरमाहा ३ प्रों
२ खिजमतगार
१॥ दिवट्या
८ भोजनखर्च
४॥ जासूद श्रावण सु १ पासून

५०

येकून दरमहा पनास, पैवस्ती मुदत [1]माफीक देणें छ २५ शाबान.

---

१ बेताची, मध्यम.

This paper gives the monthly remuneration given to the clerk, Naro Anant Gadre by Vaidyas, when he was employed to work in Bhugaon, the Inam Village in Berar, together with expenditure incurred for the menials and his dinner.

---

पत्रांक १८]　　　　　　　　श्री　　　　　　　　आषाढ शक १६७२
　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　जुलै सन १७५०

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथबावा** वैद्य स्वामीचे सेवेसी.

सेवक **नारो हरी चिटनिवीस** साष्टांग नमस्कार. विनति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आपले जासूद जोडी, सरकारचे राजश्री **रामाजी गिरधर** यांजकडे सा हजारा रुपयाकरितां पाठविले. त्यासी ऐवजाविसीं **गोपालपंतास राहाटगांवाहून** बोलाऊन मारानिलेसी तगादा केला. त्यामध्यें जोडी हे आली. करार केला कीं, जोडी **नागपुराहून** आलियावरी यैवज देतों. त्यासी **नागपुराहून** जोडी आलियावरी रा **रघोजी करांडे** यांजकडे **अलजपूर** हवेली जाली म्हणोन हें श्रुत झालियावरी चितांत अनमान केला. मग आम्ही सांगितलें कीं, त्यांचे ऐवजास तुम्ही खलेल करावासा नाहीं. त्यावरी म्हणो

लागला कीं, वैद्यबावासी बहुत कामें मजला घ्यावीं लागतात. त्यांचे ऐवजास खलेल करतों यैसें नाहीं. प्रस्तुत [1]सजावल सरकारचे [2]ताहुदाचे रुपये करितां बसले आहेत. यांसी वाटेस लाऊन सवेंची मागाहून रा सदाशिवपंत वकील रवाना करून. त्याबरोबरीं साहजारा रुपयाची हुंडी करून पाटवितों, यैसा करारमदार केला असे. पहिले तवजीचे ऐवजांत पाठवीन, म्हणोन पत्रीं स्वामीचे लिहिलें; परंतु आम्ही बहुता प्रकारें सांगितलें तेव्हां कबूल केलें कीं, वकील श्रीमंतांकडेस पाठवितों त्याबरोबरीं हुंडी करून यैवज पाठवितों यैसा निश्चय केला असे. आम्ही आपले तरफेनें मुतालिक असों. आम्हांस सर्व प्रकारें भरवसा तुमचा आहे. सूज्ञाप्रती विशेष काय लिहिणें. लोभ करीत जाणें. † हे विनंति.

---

१ तगादा करणारा, ढालाईत. २ ठराव, करार, हत्ता. † पुढील अक्षर लेखकाचें स्वतःचें.

Naro Hari Chitaniwis writes to Vishwanathbhat how he has settled with Ramaji Girdhar, a Sardar of Bhosle, to recover from him Rs. 6000. Gopal Anant Gadre was sent to him from Rahatgaon for the early recovery. Ramaji intended to pay the money from Illichpur. But the place was given into the hands of Raghuji Karande by Bhosle.

---

पत्रांक १९] श्री आषाढ १६७२
जुलै १७५०

श्रिया विराजित [1]रमासानकुल सदाराजमान्य राजश्री विश्वनाथबावा स्वामीजीचे

सेवेसी रामाजी गिरधर कृतानेक सा। नमस्कार विनंति उपरी. येथील क्षेम जानऊन स्वकीये आनंद लिहिती(ल), लेखकास आज्ञा केली पाहिजे. विशषु. रा गोपालपंताबरोबरी पत्र पाठविल. उत्तम समई पाऊन अभिप्राये अवगत जाहाला. साहजार रुपयांचा तगाजा लिहिला व पइलेही दोन पत्र आलीं होतीं. परंतु येथील कुल वर्तमान रा पंत मजकुरास सांगितलें, आनि वाकीफही केल. हे बयाजवार सेवेसी विनंति करतील. रुपये बहुत दिवस राहील. म्हनऊन विशाद.न मानावा. आपनांस वोढा बहुत, आणि गुंतावा बहुताजागीं. अटकाव जाला. यास्तव विलंब लागला. आतां विजया दशमी अगर दिपवाली पावेतों सरंज्याम करून पाठवितों. तों पावेतों [2]तुसारचा यैवजही शुरू होतो. पैकाही जागाबगाचा येईल. हा वायेदा टळूं देणार नाहीं.

दसरियाचे व दिपवालीचे मधें भागीच रुपये पावतील. समाधान असूं देन. **श्रीमंत बाबासाहेबांकडे** आमचे रुपये बहुत गुंतले. त्याचा यैवज हावेली **अलजपूरचे** च्याहरमचे[4] यैवजी सन अकरासे साठीचे नेमनुक करून दिधली होती. हालीं रा **कासिरायेपंत भास्कर याकडे** हवेलीच काम दिधल तरी आपनांस सर्व प्रकार भरंवसा तुमचा व मुरबी जानते यैस असतां हें काम आनखीकडे जावे ! अजब गोष्ट आहे. आतां कृपाकरून श्रीमंत साहेबांस विनंति करून सन ११६० ची च्याहरम, हवेली अलजपूरची सनद, बोध उपबोध करून साहित्य पुरऊन पावविली पाहिजे. श्रीमंताकडे यैवज आहे तो तुमचे रुपयांसमवेत आहे. त्याचा कारभार तो इकडे यैवज देवितात आणि तोच दुसरियास देवितात. हरप्रकार त्याहापासून आमचे रुपये विले लाऊन घेतले पाहिजेत. त्यांत तुमचे रुपये वसूल येतील. आपन पहिलहि जें काम केलं तें तुमचे भरवसियावर केल. आणि पुढहि जें कनें तें तुमचे विचारें करून. परंतु श्रीमंताकडील रुपये विले लाऊन घेतले पाहिजेत. बहुत काये लिहिन. कृपा निरंतर असूं देन. हे विनंति.

---

१ लक्ष्मीअलंकृत. २ जागोजागचा. ३ भात, बाजरी, वरी, वगैरे तृणधान्यें. ४ एक वसुलावरील हक्क.

Ramaji Girdhar writes to Vishwanathbhat that he will have to wait till Dasara, when he would collect money and pay his debt of 6 thousand rupees. He was to receive his own dues from Raghuji Bhosle, who had assigned the payment of the Chaharam ( right ) on Elichpur. But Raghuji gave this right to Kashirao Bhaskar. The writer therefore requests the adressee to make Raghuji this payment to him.

---

असल बा। नक्कल.

पत्र २० ] श्री छ १६ रमजान इहिदे खमसैन

श्रावण वद्य २।१६७२

आगस्ट ८, १७५०

श्रीमन्त **महाराज मातोश्री** **आईसाहेब** यांनीं राजश्री **बाळंभट वैद्य** व राजश्री **विश्वनाथभट वैद्य** यांसी आज्ञा केली ऐसीजे, तुम्ही विनंति केली कीं, **श्रीकृष्णातीरीं** घर बांधावयास जागा द्यावी म्हणोन अर्ज केला, त्याजवरोन साहेब कृपाळु होऊन कसबे **वाई** येथें **सत्यनाथपुरीं** सेरी बावद

**शकरबिबी** ही जमीन ब्राह्मणांस घरें बांधावयास [1]धारादत्त कैलासवासी चिरंजीव महाराज **शाहूराजे** यांनीं दिल्ही आहेत. तेथें तुम्हास घर बांधावयास जमीन हात पूर्व-पश्चम २०० दोनशें हात व उत्तर दक्षण १०० शंभर हात येणे प्रों दिल्हे असे, तरी घर बांधून स्वामींच्या राज्यास कल्याण चिन्तून वंशपरंपरेनें सुखरूप राहाणें. जाणिजे. छ १६ रमजान सुा रहिदे खमसैन मयाअलफ बहुत काय लिहिणें.

सीका. बार.

---

१ उदक सोडून दिलेलें दान.

It appears from the wording of other papers of this order that Shahu Maharaja had granted land to build a house at Wai to Vaidyas before 1739, when Bhaskarbhat was alive. Out of the 3 orders issued by the queen Tarabai for the gift of the land to Vaidya brothers in the town of Wai to build a house to stay, in Satyanath Pari, ( a lane ) of Shakkarbibi Sheri lands. This order is meant for Vaidya brothers only and the other two to Shete Mahajan and Dhage patil and the Deshmukh and Deshpande and Mokadam of Wai to execute the Sanad. The other two orders meant for village officers, are not printed.

---

पत्रांक २१ ] + श्रीशंकर श्रा. व. १२।१६७२ ऑगस्ट १७,१७५०

तीर्थस्वरूप राजश्री **बाळंभटदादा** वडिलांचे सेवेसि.

आपत्येसमान **विश्वनाथभट वैद्य** कृतानेक नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल ताा श्रावण वद्य द्वादसीपर्यंत मुाा **पुणें** सुखरूप असो विशेष. महाराज राजश्री **स्वामी** येथें आले आहेत. तमाम सरकारकुनाच्या भेटी जाल्या. येका दो दिवसीं जाऊं यैसें म्हणतात. कोणे गोष्टीचा निकाल पडत नाहीं. राजेश्री **रघोजी बावा** येथे आहेत. जो मजकूर होईल तो मागाहून लिहून पाठऊं. तुम्ही घरीं बहुत खबरदारीनें
+
राहणें. आपणही आठा चौरोजी येतां. कळलें पाहिजे. येथें कोणे गोष्टीचा ताल आहे ऐसें नाहीं. बहुत काये लिहिणें. लोकांकडेस पैका येणें तो वसूल करणें. हे विनंति. चिरंजीव मुलांस आसीर्वाद.

सेवेसि **कृष्णाजीपंताचे** साष्टांग नमस्कार. लिाा परिसिजे हे विनंति.

---

+ पुढील अक्षर विश्वनाथभटांचें

The letter is written by Vishwanathbhat from Poona to his elder brother Balambhat. At this time Ramraje was at Poona and was visited by all head clerks of offices. He was to go back to Satara in a day or two and did not give any decisions on matters placed before him, for consideration. The writer intended to go back in a week and was not sure to say any thing definitely.

---

पत्रांक २२ ] श्री श्रावण १६७२
जुलै १७५०

शिक्का व मोर्तब
दुहेरी अष्टकोनी

राजश्री **बाळंभट वैद्य** गोसावी यासि.

छ अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य स्नो. **खंडोजी जाधवराऊ** दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष बहुत दिवस जाले, तुम्हांकडील वर्तमान कळत नाहीं, तरी यैसें न करणें. सदैव पत्र पाठवणें. परामृष करीत जाणें. यानंतर राजश्री **भालचंद्रपंत** आपणांकडे आले, त्यांनीं कितेक वर्तमान सांगितलें. मागें खर्चवेच चालविला. बहुत उत्तम गोष्ट केली. आम्ही आपले पदरचेच आहों, सर्वप्रकारें भरवसा तुमचा आहे. तूर्त आपणांस रुा २५०० आडीच हजार पाठविले आहेत. घेणें. मागाहून आणखी यैवज पाठवितों. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंती.

(शिक्क्यांतील मजकूर) श्री राजा शाहू
चरणीं दृढ भाव रा
याजि सुत खंडोजी
जाधवराव

मोर्तब
सुद

Khandoji Jadhavrao writes to Balambhat that Bhalchandrapant who returned from you gave the details of your interview. He sent Rs. 2500 to Balambahat out of the debt due from him. He is the grandson of Bahadurji of Sindakhed family and a cousin of Manasing whose mother is Ambikabai, the daughter of Rajaram Chhatrapati. From the stamp, he appears to be the son of Rayaji.

---

पत्रांक २३ ] श्री भाद्रपद शुध २।१६७२
ऑगस्ट २२,१७५०

० श्री

शिक्का व मोर्तब अष्टकोनी दुहेरी — सिक्का: श्री राजा शाहु चरणीं दृढभाव रा घोजि सुत खंडोजी जाधवराव

राजश्री **बाळंभट वैद्य** गोसावी यांसि.

दा आखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये स्नो **खंडोजी जाधवराऊ** दंडवत विनंति उपरी. येथील कुशल ता भाद्रपद शुध २ जाणऊन गोसावी यांनीं आपुलें निजानंदलेखन केलें पाहिजे. विशेष श्रीमत् राजश्री **पंतप्रधान** यांचें पत्र आलें कीं, आगत्ये भेटीस येणें. त्यास आम्हाला **गोंडापुरीहून** देशास येणें, याजकरितां **पुणियास** आलों. यांची भेट घेतली. देशास जावयास आज्ञा मागितली. ते न देत. यांचा आग्रह दिसोन आला कीं, समागमेंच चालावें. आतीशये देखोन समागमें जावें यैसें जालें. त्यास आमचा हेत होता कीं, आपली भेट व्हावी. कितेक आपणासीं बोलणें तें राजश्री **भालचंद्रपंत** बोलिलें आहेत, आणि आपणहि समक्ष तेणेंप्रमाणेंच बोलावें. त्यास त्यांच्या अत्याग्रहामुळें इकडे जावें यैसें जालें. याजनिमित्यें राजश्री **जिवाजी नरहर** सेवेसी पाठविले आहेत. हे कितेक आपणांसीं बोलतील, तर हे आमचे टाईं जाणून ध्यानास आणून कार्येभाग केला पाहिजे. हे सरदारी आपले घरची. आम्हीं आपले पदरचे. बोलल्या बोलास आंतर होणार नाहीं. यैसें ध्यानांत आणून आगत्येरूप कार्येभाग केला पाहिजे. साकल्ये वर्तमान रा **भालचंद्रपंतीं** आपणाकडील आम्हांस सांगितलें, तर ते बोलिल्यास तिलतुल्यें आंतर होणार नाहीं. सर्वप्रकारें भरवसा आपला जाणून रा **जिवाजीपंत** पाठविले असेत. कार्यभाग करून यांची रवाणगी सत्वर होये तें केलें पाहिजे. विदित होये. विशेष काय लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंति.

(मोर्तब सुद)

This letter is also written by Khandoji Jadhavrao of Sindakhed family to Balambhat Vaidya. He was called by Nanasaheb Peshwa to Poona in order that he should accompany him to invade Nizam in 1751. He had sent his clerks

Bhalchandrapant and Jiwaji Narahar to express his obligations for the interest he was taking to protect his Sardari. His relation with the Chhatrapati is given in letter of July 1750. The stamps on these letters do not give a clear idea of his father's name. He seems to be a grandson of Bahadurji, whose son was Raghoji.

---

पत्रांक २४ ] श्री छ. २ रमजान ते रमजानअखेर

इहिदे खैमसैन

श्रावण शुद्ध ३।१६७२ ते

भाद्रपद शुद्ध २।१६७२

जुलै २५,१७५० ते ऑगस्ट २२,१७५०

स्वारी राजेश्री **विश्वनाथभट** वैद्य सूहूरसन इहिदे खमसैन मया आलफ गुा **रामजी चव्हाण,** यांच्या खर्चांच्या टिपणावरून निघणारे मुक्काम खाली दिले आहेत.

| वार | शकमिती | फसली सन व तेरीख | इंग्रजी तारीख | मुक्काम |
|---|---|---|---|---|
| बुधवार | श्रावण शुध ३।१६७२. | छ. २ रमजान ११६०. | जुलै २५,१७५० | **माहुली** |
| गुरुवार | ,, शु. ४ ,, | छ. ३ ,, ,, | ,, २६ ,, | **देहूर** |
| शुक्रवार | ,, शु. ५ ,, | छ. ४ ,, ,, | ,, २७ ,, | **पिंपरे** |
| शनिवार | ,, शु. ६ ,, | छ. ५ ,, ,, | ,, २८ ,, | **जेजुरी** |
| रविवार | ,, शु. ७ ,, | छ. ६ ,, ,, | ,, २९ ,, | **लोणी** |
| सोमवार | ,, शु. ८ ,, | छ. ७ ,, :: | ,, ३० ,, | |
| ते | ते | ते | ते | **पुणें** |
| बुधवार | भाद्र. शु. २ ,, | छ. ३० ,, ,, | ऑगष्ट२२ ,, | |

These were the halts of Vishwanathbhat while going from Satara to Poona.

---

छ. ७ सवाल इहिदे खमसैन

पत्रांक २५ ] श्री

भाद्रपद शुद्ध ८।१६७२

ऑगस्ट २९, १७५०

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री **बाजी दामोदर कारदार** दिा मोकाशी पाा **सुपे** गाो यासि.

सेवक **बाळाजी बाजीराव** प्रधान नमस्कार. सुा इहिदे खमसैन मया व अलफ. राजश्री **बाळंभट** व **विश्वनाथभट वैद्य** यांजकडे हुजुरून गाव पा मार पैकीं बीा.

मुकासे गांव मौजे **कान्हाटी** इनामगांव

१ **मौजे वाकी** १

१ **चोपडज देर्खाल भटगव्हण**

१ **मावडी**

---

३

यांों च्यार गावपैकीं तीन गाव मुकासे व येक गांव इनाम येणेंप्रांो पेशजी पासून आहेत, त्याप्रांो सदरहू गांव यांचे. यांजसीं रुजू होऊन वसूल सालाबाद प्रांो देत तें गोष्ट करणें. मौजे **मावडी** मार येथील वसूल पेशजीचे राजपत्राप्रांो मारनिले घेतील. तुम्ही ही ताकीद करून वसूल सुरलीत देणें. जाणीजे छ. ७ सवाल.

लेखन
सीमा

This is an order by Nanasaheb Peshwa to Baji Damodar Subhedar of Supa Paragana, to allow the Vaidyas to receive and enjoy the revenue of the 4 villages—3 Mokasas and one Inam, according to the Sanad. Mokasa is 75 p.[c. of the revenue and Ain-Mokasa is 66 p. c.

---

पत्रांक २६ ] श्री भाद्र. १६७२
ऑगस्ट १७५०

यादी करार मु **सांगोले** श्रीमंत राजश्री **भाऊसाहेबीं** करार केले.

पेशजी उभयतांस रुपये ७००० त्यांज पो करार केले रुा ३००० निवळ.

पालखीच्या सरंजामास गाव, **बाकी** व **चोपडज** व **मावडी** तीन गाव राजपत्रीं

इनाम जमीनी.
१ वाई चाहूर
·|· बावधन
पैकीं चालत्ये बावधन. पौ बिघे तीस.

इनाम. मोकासबाबेचा यैवज रुा ७०० सातसे. प्रज्यन पडला, पीकपाणी उत्तम जाहालें तर आठसे. राजश्री स्वामी कैलासवासी जाहालियावर सा वर्षे चालले. त्याजवर पाच वर्षे चालत नाहीं येक.

इनाम गाव तीन
१ काराडी पा सुपे.
१ खोडद ता तारगाव पा कराड.
१ भातगाव ता वेलंब पा कोकण.

३

याजपैकी कराटी दरोबस्त चालत्ये. फौजदारी, बाबती, सरदेशमुखी, मुकासा दरोबस्त आहे. त्यास तीन वर्षे दरमान्ये उपद्रव करितात, बाजी हरी वगैरे.

This gift to Vaidya brothers was settled at Sangola & was communicated to officers concerned, by Sadashivrao (Bhausaheb) afterwords.

---

पत्रांक २७ ] श्री भाद्रपद वा ११६७२
सपटंबर ६,१७५०

श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री बगाजीपंत काणे, याप्रती नारो अनंत गद्रे आसिर्वाद. उपरी येथील क्षेम ता भाद्रपद वद्य प्रतिपदा जाणून स्वकीये लेखन करीत जाणें. विशेष बहुत दिवस तुम्हांकडील कागदपत्र येत नव्हते. त्यास पुणेयाचे मुकामचें पत्र पाठविलें तें पावोन संतोष जाहाला. पत्रीं लिहीलें जें, श्रीमंत राजश्री काशीराव भास्कर याजबा आलों आहों, म्हणून लिहीलेंत. त्यास उत्तम आहे. रावजींची व श्रीमंतांची भेट कोणाचे विद्यमानें जाहली? कासीरावजी पुणेयासि आले, श्रीमंतांची भेट जाहली, पुढें काय आज्ञा जाहाली, हें सविस्तर ल्याहावें. यानंतर चिरंजीव गोपाळ व रामचंद्र यांचा प्रकार काय आहे? पेशजी लिहीलात तो कळला. त्यांस अलीकडे काय करतात? कडेगांवचा यैवज कांहीं उगवला कीं नाहीं, हेंही मनास आणून लिहोन पाठवणें. श्रीमंत राजश्री कृष्णाजी गोविंद सुभेदार व त्यांचे पुत्र कोठें आहेत, धंदावदा कांहीं आहे किंवा नाहीं, हें ल्याहावें. येथें आम्हीं अैकीलें जे, वराडचा सुभा कृष्णाजीपंतास जाहाला, म्हणून यैकतों. त्यास हें काय

वर्तमान आहे हें ल्याहावें. वरकड आपणाकडील वरचेवरी वर्तमान लिहीत जाणें. **पुणेयासी** आला अहा, त्यास बहुत सावधपणें वर्तणूक करीत जाणें. बहुत काये लिहीणें कृपा लोभ असो दीजे हे आसिरवाद.

हाो **विनायेक अनंत गद्रे** याचे आसिरवाद. उपरी येथील जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असलें पाहिजे. यानंतर आम्हांकडील वर्तमान तरी तीर्थस्वरूप **राजश्री नानांनीं** लिहीलें आहे, त्यावरून कलों येईल. आपणाकडील सविस्तर वर्तमान लिा पाठवीत असिलें पाहिजे. बहुत काये लिहीणें. कृपा लोभ असो दिला पाहिजे. बहुत काये लिहीणें. हे आसिरवाद.

अपत्ये **बापूनें** चरणावर मस्तक ठेवून सिरसां नमस्कार. विनंति लिा परिसोन बालकावरी लोभ असो दीजे. कांहीं अधिकोतर ल्याहावें असें नाहीं. बहुत काये लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. हे विज्ञापना.

Naro Anant Gadre writes ro Bagajipant Kane and wants to know the following:—( 1 ) Whether Kashi Bhaskar saw Raghuji Bhosle and what was the result. ( 5 ) How Krishnaji Govind Gore got the Subhedari of Berar and how his sons were engaged. It is doubtful whether Kashirao Bhaskar Kolatkar was born in 1744 or 1745 i. e. after Bhaskarrao's death. He was not so old as to have an interview with Raghuji in 1750, if his birth was taken to be in 1745.

---

पत्रांक २८ ] श्री भाद्रपद वद्य ३।१६७१<br>सपटंबर २,१७४९<br>ते<br>प्रमोद भाद्रपद वद्य ३०।१६७२<br>सपटंबर १९,१७५०

यादी हिसेब राजश्री **पंतप्रधान** रुपये.

२६५०० भाद्रपद ३ शके १६७१ ता भाद्रपद वद्य ३ प्रमोधनाम सवत्सरे शके १६७२, मुा माहे १२८११

२५००० मुदल रुा
१५०० व्याज दरसदे ||।·।। विन सूट.

२६५००

२७२५० भाद्रपद वद्य ३० शके १६७१ ता शके १६७२ प्रमोध-
नाम सवत्सरे भाद्रपद वद्य ३० मुा १२

२५००० मुदल
२२५० व्याज दरमाहे दरसेद रुा ||·|||·
विनसूट

२७२५०

५३७५०

This is an account of money lent to Pant Pradhan Nanasaheb by the Vaidya brothers since 2-9-1749.

पत्रांक २९ ] श्री प्रमोद

५ जिल्काद
अश्वीन शुध ७।१६७२
सपटंबर २६,१७५०
ते
२३ जिलकाद
आश्वीन वद्य ११।१६७२
आक्टो. १४,१७५०

रा. **विश्वनाभट** वैद्य शके १६७२ मध्यें **सातान्याहून सांगोल्यास** गेले असतां त्यास झालेल्या खर्चाच्या हिशोबाच्या यादींत त्यांचे मुक्काम दिले आहेत, त्यावरून ते खालीं दिले आहेत. **शिवराम गदाधर** व **शिवराम तुकदेव** या वेळीं यांच्याबरोबर होते.

| वार | | मुक्काम |
|---|---|---|
| ५ जिल्काद | बुधवार | **सातान्याहून** निघाले. |
| ६ ,, | गुरुवार | **जयरामस्वामीचें वडगाव** |
| ७ ,, | शुक्रवार | **झरी** |
| ८ ,, | शनिवार | **अटपाळी** |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | जिल्काद | रविवार | **सांगोलें** |
| १६ | ,, | रविवारपर्यंत | ,, |
| १७ | ,, | सोमवार | **पंढरपूर** |
| १९ | ,, | बुधवारपर्यंत | ,, |
| २० | ,, | गुरुवार | **सांगोलें** |
| २३ | ,, | रविवारपर्यंत | ,, |

The halts of Vishwanathbhat during his journey from Satara to Sangola up to October 14,1750.

---

पत्रांक ३० ] श्री २० जिल्काद ( पैवस्ती )
अश्विन वद्य ५ शके १६७२
आक्टो. ८,१७५०

सेवेसी **कृष्णाजी त्र्यंबक** सा नमस्कार. विज्ञापना विशेष येथील वर्तमान ता अश्विन वद्य ५ परियेंत यथास्थित असे. यानंतर **सातारीयाहून** श्रीमंत माहाराज **आऊ साहेबांकडून** दरमाहा करितां हुजरे बसले आहेत, त्याचा मजकूर स्वामींनीं लिहिला व रा **माहादाजी जिवाजी** यांणीं सांगितलें, त्या प्रमान तुमचा दरमाहाचा हिसेब स्वामीकडे पाठविला आहे तो पाहावा, म्हणजे वर्तमान कळेल; परंतु त्यास कांहीं यैवज पाठवावा म्हणोन स्वामींनीं सांगोन पाठविले, तें प्रमाणच आहे. याजकरितां राजश्री **विश्वनाथभट वैद्य** यांस पत्र पाठऊन दरमाहास रुपये ३५०० साडेतीन हजार आणवावे. त्यां पैकीं **मातुश्री बयाबाई** यास रुपये ५०० पावसे पाठवावे. बाकी तीन हजार रुपये **सातारा** पाठवावे. राजश्री **सदासिव रघुनाथ** यांजकडे पाठवावे, ते तेथील खासगदेतून सदरहू रुपये देतील. साल गुा **वैद्यांची** निशा केली, त्याप्रमाणें निशा लागू जाहाली, त्यांत कांहीं तफावत नाहीं. यैवज त्यांचा त्यांस पावेल. त्यांणीं दरमाहास जिल्हेकडील खर्चास पन्नास हजार रुपये द्यावे. त्यांत दरमाहाचे रुपये २५००० पंचवीस हजार येणें, त्यापैकीं कांहीं यैवज दिल्हा नाहीं. त्याचा यैवज त्यांस पावला. हालीं प्रमाणें दरमाहाचा यैवज त्यांणीं द्यावा. त्या यैवजी साडेतीन हजार रुपये आणून ते सदहू लिहिल्याप्रमाणें पावयाची आज्ञा केली पाहिजे. रा **गोपाळ शंकर** यांजकडे त्याचा यैवज येणें, त्या पैकीं आम्हांकडे रुपये १००० पावले, ते आम्ही **स्वामीकडे** राजश्री **गोविंद सामराज** सुभेदार याचे विद्यमानें पेसजी पाठविले आहेत. ऐकूण साडेच्यार हजार रुपये वैद्यांकडील नवें कर्ज जमा जालें. येणेंप्रो त्यांस सांगून साडे तीन हजार रुपये त्याकडून घ्यावे आणि **सतारीयास** रवाना करावे, सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

Krishnaji Tryambak writes to Pant Sachiv how he should arrange to pay the settled monthly instalment of Rs. 4500 to be paid to Rani Tarabai. Pant Sachiv was to receive Rs. 3500 every month from Vaidyas. Out of this sum he was to pay Rs. 500 to Bayabai of late Janardanpant. The remaining sum of 3 thousands was to be sent to Sadashiv Raghunath by Vaidyas. The sum of Rs. 1000 received from Ramachandra Samraj makes up the whole amount of Rs. 4500. Pant Sachiv will newly borrow a debt of 4500 from Vishwanathbhat.

---

पत्रांक ३१ ] श्री कार्तिक शुध १।१६७२
आक्टोबर २०,१७५०

श्रीमंत राजश्री **बालंभट** व **विश्वनाथभट** **वैद्य** स्वामीचे सेवेसीं.

सेवक **नारो अनंत गद्रे** मुकाम **भुगाव** कर्यात कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती येथील क्षेम ता। कार्तिक शुध प्रातिपदा जाणून स्वकीये लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विपेश स्वामीकडून बहुत दिवस कागदपत्र येऊन सांभाल होत नाहीं, याजकरितां चित उदास आहे. तरी यैसें न करितां आलिया माणसाच्या पत्रीं संतोषवीत असावें. वि॥. या प्रांतींचें वर्तमान तर श्रीमंत राजश्री **रघोजीबावा उमरावतीवर** आहेत. तेथून श्रीमंत **चांदेयास** जाणार आहेत. प्रस्तुत **नागपुरास** येत नाहीं, म्हणून वर्तमान आहे, **चांदेयाची** फौज **चांदेयास** आहे. राजश्री **कासीराव भास्कर** यांजकडील वर्तमान तो स्वामीस कळलेंच असेल. त्यांजकडील यैवज येणें त्याचा करार आम्हांसी केला होता. त्याचा मजकूर कोठपर्यंत ल्याहावा? परंतु आतां प्रस्तुत त्या उगवतो दिसत नाहीं. हालीं त्यांचा करार होता, त्याकरितां **गोपाळ** त्यांजकडे पाठविला होता. तो आपणांकडे आला आहे. हा पहिलें व हलीचें वर्तमान सांगेल, त्याजवरून विदित होईल. **वराड** प्रांतीचे गांव व कर्यात **भुगांव** देखीलही कांहीं राहतील, यैसा भरवसा दिसत नाहीं. **टेकाडी** तो **भटजीस** दिल्ही. हें वर्तमान सेवेसी पूर्वींच दोन तीन पत्रीं लिहीलें होतें, त्याजवरून कळलेंच असेल. **टेकाडीच्या** सनदा **जखापा कोबडा** याजबा। पाठविल्यात, त्या पावल्या. परन्तु त्या सनदांवरी **भटजीच्या** च्यार ताकिदा आल्या. आतां तो **भटजीच** श्रीमंताजवळ आले आहेत. आपण या प्रांतास आले तर उत्तम आहे. आपण आल्यानें

जे गांवखेडीं आहेत ते राहतील. नाहीं तर राहातां दिसत नाहीं. **नारोजी नेगी** याजकडे दोनच्यार येरझारा केल्या. परंतु रुा देत नाहीं; आणि देत नाहीं थैसेंही म्हणत नाहीं. तर येक पत्र **निगीस** व येक पत्र राजश्री **बुराणशहाराजे** यांस पाठविलें पाहिजे. कर्यात **भुगाव** येथील यैवज बाकी सालगुापैकीं व सालमजकूर-पैकीं व **रामटेक**पैकीं यैवज जमा जाहला होता, तो **गोपाळा** बा हुंडी करून पाठविला आहे त्याचा हिसेब आलाहिदा पाठविला आहे. त्यावरून कळेल. कसबा **भुगांव** दोनतीन वर्षे सरकारांत पाटीलकी होती, त्यांस हिशेब पाहातां साल-दरसाल सेदोनसे रुा तोटा आहे. याजकरितां सालमजकुरीं **झुलाजी जगन्नाथ** यास पाटीलकी दिल्ही आहे. त्यास कसबे याचे पाटीलकीचा कौल **कसबे** याचा **झुलाजीचे** नांवें पाठविला पाहिजे. सरकारांत गांव ठेविल्यानें सरकारचा तोटा आहे. याजकरितां सेवेसी लिहीलें आहे. बहुत काये लिहीणें लोभ असो दीजे, हे विनंति.

Naro Anant Gadre writes from Bhugao to Vaidya brothers the following information about the Court news and the recovery of money from debtors:—(1) Raghujibawa Bhosle is at Amaraoti and means to go to Chanda without going to Nagpur. (2) Kese Bhaskar intended to pay money from the revenue to be recovered from Alajapur (Illichpur). Gopal Anant Gadre will give the detailed account of it. (3) The Sanads of Tekadi were received, but the village was given to Shiwabhat Sathe by Raghuji. (4) He requests Vishwanath-bhat to write to Naroji Negi and Burhanshaha Raje to pay the money. (5) Zulaji Jagannath's order of appointment, as Patil of Karyat Bhugao, should be sent. He will recover the revenue of the villages.

---

पत्रांक ३२ ] श्री कार्तिक शुध २।१६७२

आक्टोबर २१, १७५०

श्रीमंत राजश्रिया विराजित राजमान्य राजेश्री **बाळंभटबावा** तथा राजेश्री **विस्वेनाथभटबावा** वैद्ये स्वामीचे सेवेसी.

सेवक **झुलाजी देसमुख** कर्यात **भुगांव** कृतानेक साष्टांग नमस्कार, विनंती विनवावया कार्ने यैसाजे. येथील क्षेम कुशल स्वामीचे कृपेंकरून कारतिक सुध

द्वितीयापावेतों आसे. स्वामीनें आपलें सकल **सामराजियाचें** वैभव लेखकास आज्ञा करीत आसलें पाहिजे. विशष स्वामीनें रा **नारोपंत** नाना याहास इकडील कामकाजाबदल कागदपत्र सनदा देऊन बिदा केलें. ते छ ५ सुध भाद्रपद मासीं येऊन कर्यात मजकुरास पोहोचलेत. यानंतर कर्यात मजकूरची वंगेरे बाकी व हाली तवजी ठाकून पैका वसूल केला, त्याचा हिसोबू हुंडी आलाधि याद पाठविली आहे, आणि इकडील वर्तमान ल्याहावें लागत होतें, म्हनऊन खालीं मनुशे स्वामीकडे, कैसें करावें याकरितां **केसोपंता**कडील यैवज व हालीं **नारोपंता**कडील यैवज थोडकासा हुंडी करून **गोपाला**बरोबर पाठविला आहे. तो सेवेसी पोहोचल आनि मौजे **टेकाडी** मामले **रामटेक** हे **भटजीच्या** सनदा वरच्यावर येतात, यामुलें सालमजकूरचा पैका वसूल **भटजी**कडे **टेकडीचा** होत आहे. याची कांहीं **बावा**कडून **बंधान** होऊन **टेकाडीच्या** सनदा बंदोबस्त करून आपल्या आल्या पाहिजेत, आनि सेवकास बलावल्याबदल दोनचार पत्र आलीं, याजवर स्वार होऊन येन, यैसा विचार धरला, तों रा **केसोपंत** आजारी आस्याड मासीं पडले, यामुळें येन सेवकाचें न जालें. याजवरी स्वामीनें रा **नारोपंत**नानाबरोबर पत्र सेवकांस पाठविलें जें, स्वार होऊन न येन. रा नारोपंत व सेवक येक विचारचा करीत जानें. तरी आपन आज्ञांकित असूं. दुसरे, **विसापूर** प्रांत **चांदे** येथील मजकूर तरी चैत्रमासापासून धामधूम जाली आहे. तेथील कामकाज अवघें बंद जालें आहे. पुढें **चांदे** प्रांतास रा **श्रीमंतबावा** येतील त्या प्रसंगीं **बावा**पासीं आम्ही जाऊन अर्ज विनंति केली जाईल; आनि जें वर्तमान वर्तल आनि होईल, तें सेवेसी लिहिलें जाईल. दुसरे, **ठाकरीणचें** कनकर वय, येथ सेवकान बंद केलें आहे. परंतु रा **भिकपाटील** व **ठाकरीण** एक विचारें म्हनतात जें, कर्जामधें ऐवज देला असे, यामुलें आपनास **भिकपाटील** भये दाखवीत असे. आनि कर्जवाम काये केलें, तें कांहीं आपला त्यान्हें रोजगार **भिकपाटलानें** केला असल. आनि **ठाकरीणचें** कनकर वय तिन्हें दिलें, तें घेऊन जाऊन, यैसें म्हनत आहेत. या विसई स्वामीचें चित जैसें पडल तैसें [1]बंधोनपूर्वक पत्र सेवकास आलें पाहिजे. दुसरे, रा. **नारोजी नेग्या**कडील अवेज बाकीयाविसई आपन, रा **नारोपंत नाना**, यैसें तगादा दहापाच वेला केला, परंतु अवेज देऊंदिलाऊं करीत आहेत, आनि **नेग्या**चा **कारभार** कांहीं **राजया**कडे चालता दिसत नाहीं, आनि सेंभरा रुपयाची हुंडी पेशजी **ब्रम्हचारी** वकलांपैकीं करून **नेग्यानें** पाठविली. ते **स्वामी**कडेस पेसजी पोहोचल असल, आनि कसबे मजकूर पाटिलकी रा **नारोपंतनानानें** आज्ञापत्र घेऊन आलें. यास सेवका—

पुरवनी बंद २

कडे लाऊन टका पैसा वसूल करून घेत आहेत. याकरितां कसबे **भुगांवचा** कौलपत्र स्वामीनें सेवकांस लिहून पाठविलें पाहिजे. इस्तमालत लावनी संचनी उत्तम प्रकारें केली

---

१ सत्तापूर्वक.

आहे. सेवेस कळावें म्हनऊन लिहिलें आहे. या प्रांतास स्वामीचें येन होये तरी बहुत उत्तमच आहे. [१]केसोरीच्या सनदा पाठविल्या, त्याप्रमाणें रा **संकराजीपंत कान्हो** याहाचे स्वाधीन **केसोरी**(नें) केली असे, आनि + दाहा रुपये सेकडा पटी सालमजकुरी व साल मजकूरची पेसकसी यैसी रा **नरहरपंत** यानें लाविलें आहे. परंतु पहावें जें होईल तैसें सेवेस लिहून पाठऊन. स्वामीनें रा **नरहरपंतास** सेवकाविसई व रा **नारोपंत** नानाचेविसई पटी पेसकसीयाविसई **नरहरपंतास** पत्र लिहून पाठविलें पाहिजे. जेन्हेंकरून उपद्रो न होये यैसें जालें पाहिजे. बहुत काये लिहिनें. आपन आज्ञाअंकित सेवक असूं, हे विनंति ताा छ २ सुध कारतिक.

---

+ पुढील मजकूर झुलाजीच्या हातचा असे.

१ केसो हरी.

Zullaji Jagannath Deshmukh of Karyat Bhugav gives in this long letter the following account of the recovery of revenue and debtors, to Vaidya brothers. (1) Naropant Gadre after his return recovered the balance of revenue of Karyat Bhugav. (2) The money collected by Keso Hari Sawarkar and Naropant Gadre was sent with Gopalpant Gadre by hundi. (3) The revenue of Tekadi. of Ramtek district was recovered by Shiwabhat Sathe for this year. (4) The write was unable to leave, as Keso Hari was ill. (5) There was a disturbance at Visapur. (6) He was going to see Raghuji at Chande for it. (7) The oppositions of Thakarin and Bhika Patil cannot be stopped unless Vishwanathbhat writes his final decision. (8) Naroji Negi is postponing the payment for one reason or other. He does not seem to be in the good graces of Raghuji.

---

पत्रांक ३३ ] श्री कार्तिक शुद्ध ४।१६७२

आक्टोबर २३, १७५०

श्रीमंत राजश्री **बाळंभटबावा** व तथा राजश्री **विश्वनाथभटजीबावा** वैद्य साहेबांचे सेवेसी.

विनंति सेवक **सेखजी** कृतानेक रामराम. विनंति उपरी येथील क्षेम ताा कार्तिक सुध चतुर्थीपर्यंत साहेबांचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. रोज मजकुरीं

आपण **नागपुरास** पावलों. उदईक **भुगावास** रा। **नारोपंती** पत्रें दिलीं होतीं, तीं व साहेबीं ज्यांस खतें दिलीं होतीं, तीं ज्यांचीं त्यास पोहोचविलीं. श्रीमंतांचीं पत्रें पोहोचाविलीं. **रामाजी गिरधर** यांहीं करार केला आहे कीं, लस्करांतून **अलजपुरास आलियावर** कांहीं ऐवजाची सरबराह करून देऊन, ऐसा करार केला आहे. व **सदाशिव हरीनें** ही करार केला आहे. महिन्या पंधरा दिवसीं कांहीं तजवीज करून. थोडा बहुत ऐवज देऊन. श्रीमंतांचा व रा। **संताजी भोसले** यांची समजूत जाहालियावर कांहीं तजवीज करून देऊन. व **ताईबाईचे** कागद त्यांस दिले. यांहीं करार केला आहे. दोन हजार **जखापास** वगैरे देऊन बाकीचा ही निकाल धीरे धीरे होऊन येईल. [1]खिजमत तर आमची [2]तालबिताल जाहली आहे. येविसीं आम्हीं पत्र लिहिलें आहे. यैसा जाबसाल त्यांहीं केला आहे. सेवेसी विदित होय. बहुत काय लिहिणें, नौकरावर कृपा असो दिली पाहिजे. हे विज्ञापना.

---

१ सेवा, चाकरी. २. अनियमित.

Sekhaji, the trusted servant of Vaidyas writes what he did after reaching Nagpur. He informs them what was settled about the recovery of money from Ramaji Girdhar and Taibai Kolhatkar, Bhaskarrama's wife. Ramaji Girdhar expected to pay some amount after the friendly relations of Raghuji and Santaji Bhosle are established.

---

पत्रांक ३४ ] श्री कार्तिक शुध १० शके १६७२ सोमवार
ऑक्टोबर २९, १७५०

श्रीमंत राजश्री **बाळंभट दादा** ता। राजश्री **विस्वनाथभट दादा** स्वामी वडिलांचे सेवेसी.

पो सेवक **गोपाळ अनंत** दोनी कर जोडून सिरसां नमस्कार. विनंति उपरी येथील कुशल ता। कार्तिक सुध १० सोमवार जाणऊन स्वकीये लेखन केलें पाहिजे. विशेष **स्वामी**कडील वर्तमान कळों येत नव्हतें. त्यास **सेखजी**बरोबरीं पत्रें पाठविलीं तें पावलीं. ज्येच त्यांस दिलीं. सकल वर्तमान **जाखापा** व **सिवापा** तुमचे कडेस गेले आहेत, सकळ वर्तमान सांगतील. आम्हाकडील वर्तमान रा। **नारोपंतदाजी** तुम्हांकडून आले, त्या बरोबरीं जें पत्र **स्वामीं**नें पाठविलें, त्या पत्रावरूनी पूर्वीं रो **रामाजी गिरिधर** याकडेस तगादा करीत होतो, त्यास त्यांणीं करार केला होता कीं, त्याचें कर्ज सरकारांत गुंतलें आहे, तें उगवलें म्हणजे तुमचे रो देऊं. त्यास श्रीमंत **बाबासाहेब**

या प्रांतास आले. त्यांचे भेटीही जाहाल्या. याउपरी **अलजपुरीचे** सुभा, **आस्टी आमनर** पा मजकुराकडेस जाणार आहेत. त्यांचे लस्करांत रा **रामाजी गिरिधर** आहेत, त्या कडेस येक वेल जातों. काये जापसाल करतील तो पाहतों. रुा दिले तरी हुंडी करुनी घेऊन येतों. रो **सदासिव हरी** यांसही तगादा केला होता. त्यास त्यांणीं मान्य केलें होतें कीं, रो **संताजी बावा** व श्रीमंत **बावासाहेब** यांचे ठीक जाहल तरी रुो उगावा करुनी देऊं. त्यास मामला ठीक जाहाला नाहीं. त्याकडील रुो प्रस्तुत उगवत नाहीं. तेही **मोगलांचे** लस्करांत आहेत. रो **ताईबाई**कडील वर्तमान तरी त्याकडील मामलत **वराड** प्रांतीचे काडिली, त्यामुलें **ताईबाईचा** श्रमकाल जाहाला. त्यामुलें रुो प्रस्तुत उगवत नाहीं. **ताईबाई** निघोन रा श्रीमंत **बावासाहेबाकडेस** लस्करांत **चांदे प्रांतास** गेली. दरम्याने रो **रघुनाथभटजी** पडिले आहेत, ते घेऊन गेले. तमाम **ताईबाई**कडील गाव **मोकासा** होते. ते दूर केले आणि सरकारांत ठेविले. तुम्हांस वर्तमान कलावें याकरितां लिहिलें आहे. तुम्हांकडील गांव मौजे **लाखणवाडा** दूर केला. **म्हसांग** दूर केले. रो **महादाजी नारायण** व रा **शिवाजी दादाजी** यांणीं **बालापूर** व **आकोलें** साल मजकुरीं पा कमाविसी केली आहे. त्यांचे भरणीयास दिले. बाकी गाव **वराड प्रांतीचे** मौजे **राहाटगाव** कर्यात **मवाड** तुम्हांकडेस करार करूनी सनदा गुदस्ताप्रमाणें करूनी घेतल्या. त्यास **नांदगाव पेठ** रा **कृष्णाजी गोविंद** यांचे स्वाधीन. तमाम वराड प्रांत केला. **नांदगाव पेठ** येथील **कमाविसी** रो **कृष्णाजीपंताकडेस** जाहाली. त्यांचे तरफेनें कमाविसदार रो **मोरोपंत** पाठविले आहेत. त्यांचे खटखट **रहाटगाव**विसीं करितों. म्हणतात कीं, **नदरघासदाणा** व **च्याहरम** तुम्ही घ्या. बाकी जो ऐवज होईल तो आ (प) ण घेऊं. ऐसी खटखट आहे. तुम्ही पत्र लिहाल तरी रां **कृष्णाजी गोविंद** यास लिहिणें. **मवाडीचें** वर्तमान तरी गुदस्ताचे बाकी राहिली आहे, त्यास साल मजकूर दरोबस्त सनद करून घेतिली आहे. रो **नारोपंताकडेस** पाठऊन देतों. तुम्ही लिहिलें, कीं, उठोन येणें. त्यास वाटखर्चीस जागा नाहीं, म्हणऊन राहिलों. त्यास **स्वाम** न आलें. आतां आपण अर्जे कोणापासीं करावा. कृपा करूनी सांभाल कराल, तरी बहुत उत्तम आहे. रा **केसोपंत** येणार आहेत या बराबरी आपणही येतों. सकल वर्तमान **गोपालजी** सांगतां कलों येईल. पत्रीं विस्तार कोठवरी लिहावा! भेटी होईल तो सुदीन जाणावा. बहुत काये लिहिणें, कृपा लोभ असो देणें हे विनंति.

रो **रामचंद्रपंत** दादास सां॥ नमस्कार. लिखितार्थ परिसोन लिहोन पाठवणें, हे विनंति.

Gopal Anant Gadre writes to Vaidya brothers the following information:—

( 1 ) Taibai Kolatkar lost her Mamlat of Berar and Krishnaji Govind was made the Mamlatdar of the same. ( 2 ) Taibai saw Raghuji at Chande to get this injustice set right. ( 3 ) Mahadaji Narayan Ponkse and Shiwaji Dadaji got the Kamavisi of Balapur and Akola. ( S ) Ramaji Girdhar agrees to pay the money when Raghuji and Santaji have settled their dispute. (5) Lakhanwada and Mhasang were lost to them. ( Vide P. D. 20, pp. 1918 and 1937 ).

---

पत्रांक ३५ ] श्री शंकर छ १६ जिल्हेज
कार्तिक वद्य ३।१६७२
नवंबर ५,१७५०

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री **विश्वनाथभटजी** स्वामीचे सेवेसी.

सेवक **कृष्णाजी गोविंद** कृतानेक सा। नमस्कार. विनंति उपर येथील कुशल ता। छ. १६ माहे जिल्हेज मु। ठाणे **पातुर** जाणोन स्वकुशललेखन करीत आसिलें पाहिजे. विशेष बहुता दिवसी स्मरणत्वें पत्र पाठविलें तें पावोन बहुत संतोशावाप्ति जाहली. येसेंच निरंतर पत्रीं संतोशवीत आसावें. यानंतर पत्रीं कितेक घरकृत्य व राजकृत्य लेखन केलें तें सविस्तर कळों आलें. येच रीती दिनचर्येचें वृत साद्यंत लिहीत जावें. वरकडघरा चा। रुपयाचा मजकूर लिहिला, त्यास पूर्वी स्वामीस घर बांधावयासी सांगितलें होतें, त्यास तीन सवत्सर जाहाले. आतां बतीससे रुपयाविसीं लिहितां हें आपूर्व. कळलें पाहिजे. +चरे भेटीनंतर कळों येईल बहुत काये लिहिणें हे विनंति.

---

+ पुढील मजकूर लेखकाच्या हातचा.

Krishnaji Govind Gore had to pay Rs. 3200 for the cost of the house which Vishwanathbhat was asked to build at Wai. It is to be marked that Vaidyas of Wai and Kolatkar of Pandewadi had taken with them many families of Wai side to Berar who rose to a high position in the Bhosle administration.

पत्रांक ३६ ]　　　　श्रीसांचप्रा　　　　मार्गसीर्ष शुध १०।१६७२
नोवेंबर २७,१७५०

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **लक्ष्मणपंत स्वामी** गो.

सेवक **महादजीराम दामले** कृतानेक सां नमस्कार विनति. येथील क्षेम ता. मार्गसीर सुध दशमीपर्यंत सुखरूप असो विशेष. येथील मजकूर तर काल दोन प्रहरीं दिवसास श्रीमंत **रामराजे आईसाहेबांचें** दर्शन करून पोशक देऊन मोरचेल करून दोन घटिकापर्यंत येणे प्रों होते. मग पूर्वस्तलास पूर्ववत् प्रों आतां असेत. **राघोबा** अद्यापि आला नाहीं. याचा विचार काय तो लिहून पाठवणें. वरकड मजकूर तर अद्यापि **श्रीमंत व निजा(म)ली** ऐलि **गंगेवर** आहेत यानंतर तुम्ही लिा कीं, साइत्याचा मजकूर तुम्ही लिा कीं, **मोहरीस** लिहून पा आहे, म्हणून लिा, तर धातुपोषण लिा तर हेंच तुम्हांस उचित आहे. राजेश्री **चिमणाजीपंतास** सांगणें कीं, उधारपाधार वसूल करीत जाणें. येवेलेस आपण वसुलास जावे म्हणजे काय ऐसें म्हणतील तर उदीम करावा तेव्हां त्यांचे माथा प्रकार वसुलाचा आहे तर वसूल करणें आणि उधार कोणास माल एकंदर न दीजे हे विनंति.

रा **चिमाजी विठल जोसी** स्वामीस नमस्कार लिा परिसोन उधार वसूल करावयास अंतराय न कीजे. माणूस उत्तम चांगलें मिळालें तर ठेवणें. उधार कापड कोणास न देणें हे विनंति.

Mahadaji Ram Damle from Satara writes to Laxman Ballal Joshi the behaviour of Ramraja with Rani Tarabai. Nanasaheb and Nizam were near the river Godavari at this time.

---

पत्रांक ३७ ]　　　　मार्गशीर्ष शुा १०।१६७२
नवंबर २७,१७५०

श्रीभवाणी शंकर प्रो.

राजेश्री **बालंभट (व) विश्वनाथभट वैद्य** यांचे सेवेशी.

**कृष्णाजी ना जोशी** नमस्कार. उपर आमचा आयैवज तुम्हांकडे. वेदमूर्ती **विणायेक दिक्षितबा** रुपये २००० अक्षरी दोन हजार रुपये, रा **शंकराजी ना पोतदार**, दिा श्रीमंत राजेश्री **पंतप्रधान**, यांस दीजे. मारगेस्वर श्रुध १० दशमी भोमे+हे विनंती.

+ पुढील 'हें विनंति' शब्द कृष्णाजी नाईकाचे दिसतात.

Krishnaji Naik Joshi asks Balambhat and Vishwanathbhat Vaidya to pay out of his money to Shankaraji Naik Potdar, the agent of Pant Paradhan, for Vinayek Dixit, Rs. 2000.

पत्रांक ३८ ] श्री+शंकर प्रसंन १० मोहरम
मार्गसीर्ष शुध १२।१६७२
नोवेंबर २९,१७५०

श्रीमंत राजश्री **पंतसचींव** स्वामींचे सेवेसी.

सेवक **भवानीशंकर मोरेश्वर राजाज्ञा** कृतानेक नमस्कार. विनंती उपरी बदल देणें वेतनांत रा **विश्वनाथभट वैद्य** यांस रुपये ४१६॥ च्यारशे साडेसोला रुपये देविले असत. ऐवज सालमजकूर हाता चैत्रमास पैकीं प्रविष्ट करून पावलियाचें कबज घेतलें पाहिजे. छ १० मोहरम सुहूर सन इहीदे खमसैन मया आलफ. बहुत काय लिहिणें + लोभ असो दीजे हे विनंती पर. बार बार

---

+ पुढील मजकूर लेखकाच्या हातचा.

Bhawani Shankar Moreshwar Rajadnya writes to Pant Shachiv to Pay Rs. 416 Annas 8 to Vishwanathbhat Vaidya as the instalment of Chaitra, and get a receipt for the same.

---

पत्राक ३९ ] श्री २२ मोहरम
मार्गसीर्ष वद्य ९।१६७२
डिसेंबर २१,१७५०

पत्रावर दुहेरी अष्टकोनी शिक्का व मोर्तब

शिक्का
श्री चरणी
तत्पर नाराय
णजी कोकाटे
निरंतर

राजश्री **बाळंभटबावा** व राजश्री **विश्वनाथ बावा वैद्य** गोसावी यासी.

दा अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री **नारायेणजी कोकाटे** हवालदार व कारकून किले **मनमोहनगड** दंडवत व सां नमस्कार. विनंती येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष आपण राजश्री **रामचंद्रपंता**समागमें श्रीमंत राजश्री **पंताचें** व आपलें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें कीं, गडबडेचा प्रसंग जाला आहे, याकरितां जागियाची सोय करून धावी म्हणून लिा, त्यावरून रा **रामचंद्र-पंता**समागमें येक गडकरी देऊन **माचीं व पाथरवाडी** दाखविलीं. उदकाची अनुकूलता

विषेश नाहीं. त्याहीमध्यें आपले विचारें येथेंच यावेंसें जालें, तरी लक्ष प्रकारें यावें. सविस्तर वृत राजश्री **रामचंद्रपंत** सांगतील, त्यावरून कळेल. बहुत काये लिहिणें. कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे. छ. २२ माहे मोहरम हे विनंतीपर. सारांश गोष्टी, कोणेविसीं यथानशक्त राहिल्यास आळस होणार नाहीं. कृपा असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद

There was a disturbance in Maharashtra owing to the rebelious attitude of Damaji Gaikawad. The Vaidyas were searching for a quiet place like Manamohangad called also Kelanja in Bhor State, for leaving disturbed portion, such as Wai or Satara for the time being.

---

पत्रांक ४० ] श्री प्रमोद पौष १६७२
डिसेंबर १७५०

राजश्री **विस्वनाथभ(ट) स्वामीस**

विनंति उपरी राजश्री **बाबूजी नाईक** निरोप घेऊन **जेजुरास** आले. **सेनापतींस** निरोप जाला. त्याजकडील **हरबाजी नाईक** ठेविले व **दाभाडिया**-कडील **मल्हारपंत** टेविले. ते समई राजश्री **बाळंभट** यांनीं त्यांस पुसिलें. त्यास उत्तर दिल्हें कीं, आम्हांकडे पाठवणें. तर तुम्हांस पाठवणें. ते व आपण बा जाऊन कितेक बोलणें चालणें आहे त्यास आपला व त्यांचा योग तेथें होईल. त्यास त्यांचें आनमोदन बरवें प्रकारें घेऊन त्यांचें पत्र आम्हांस द्यावें कीं, तुमचे **चिरंजाविास** पाठऊन देणें. धंदा करतील. किंवा यैसें पत्र न देत तर चिरंजीवास पाठवणें. त्यांचें आपण चालऊ. तुमची त्यांची जैसी बोली होईल तैसा सिधांत करणें. येविसीची येश-कीर्ती आपली आहे. जनांत हासें आमचें झालें आहे, ती उजागरी करणार आपण आहेत व **उदाजी पवार** यांजकडील टीकबोली करून **खंडोपंता**चा पत्रें देऊन रवाना करणें व खर्चास व येक वस्त्र देवणें हे विनंति.

The date of the letter and the name of the writer is uncertain. The matter discussed is important. Vishwanathbhat is consulted by the writer.

---

पत्रांक ४१ ] श्री ५ सफर
प्रमोद पौष शुध ७।१६७२
डिसेंबर २४, १७५०

पत्रावर दुहेरी अष्टकोनी सिक्का व मोर्तब मुधोजी भोसले यांचा.

श्री
शाहु राज
प्रसादेन रघूजी
सुयशोधरः त
त्सूनोस्तु मुधोना
म्न स्वेषा मुद्रा वि
राजते भद्रं.

राजश्री **विस्वनाथभट** वैद्य गोसावी यांसि.

दाा अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्रो **मुधोजी भोसले** दंडवत. विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत गेलें पाहिजे विशेष. आम्ही तुम्हांकडे संक्रमणाचें तील शर्करायुक्त थैल्या व लाखोटे प्रथकाकारें पाठविले व राजश्री **स्वामीचें** तील व पत्र, वाडियांतील थैली व पत्र पाठविलें आहे, हें घेऊन **राजश्रीस** पोहचऊन पावलियाचें उत्तर पाठवणें व लोकांचे कागद व थैलिया पाठविल्या आहेत, त्या ज्यांच्या त्यांस देऊन उत्तरें सत्वर रवाना करणें. अनमान सहसा येकंदर न करणें, जाणिजे छ. ५ सफर + बहुत काये लिहिणें. हे विनंति.

मोर्तब
सुद

काळेकृत नागपूरचा इतिहास, पान ५५१
मधील शिक्क्यांतील मजकूर वर दिला आहे.

Mudhoji Bhosle sends in small bags of sugarcoated sessamum of Makar Sankrant to be handed over to Ramraje and also to other persons through Vishwanathbhat Vaidya.

---

पत्रांक ४२ ] श्री ११ सफर इहिदे खमसैन
पौष्य शुध १४।१६७२
डिसेंबर ३०, १७५०

आज्ञापत्र राजश्री **पंतप्रतिनिधी** ताा मोकदमानी मौजे **खोडद** ताा **तारगाऊ** सुहुर सन इहिदे खमसैन मया व अलफ. मौजे मजकूर राजश्री **बालंभट** व राजश्री

**विश्वनाथभट्ट वैद्य** यांजकडे इनाम आहे, त्याप्रमाणें मौजे मजकुराचा वसुल मार-निलेकडे सुधा मत देत जाणे छ **११** सफुर निदश समक्ष.

सुरू सुद
बार

शिक्का व मोर्तब
अष्टकोनी, दुहेरी

शिक्का
श्री
श्री आई आदि पु-
रुष श्री राजाराम
छत्रपती स्वामी कृपा-
नीधी तस्य श्री निवा-
स गंगाधर प्रति-
निधी.

श्री
लेखना
वधिरयम्

This is an order issued by Jagajiwan alias Dadoba Pratinidhi to the Mokadam of Khodad that as the village is an Inam to Vaidya brothers, they should receive the revenue of the village without interruption.

---

पत्रांक ४३ ]  श्री+शंकर  मार्गशीर्ष १६७२
डिसेंबर १७५०

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथभटजी** स्वामीचे सेवेसी.

सेवक **कृष्णाजी गोविंद** कृतानेक सिरसां नमस्कार. विनंति येथील कुशल जाणोन कुशल लेखन करीत असावें. विशेष. स्वामींनीं पत्र पाठविलें (तें पावलें) पत्रार्थं अक्षरशाहा कळों आला. श्रीमंत राजश्री **पंतप्रतिनिधि** यांचा मजकूर लिहिला, तो कळों आला. या प्रांतींचें वर्तमान तर (**यजमा**)नाचा व **येवनाचा** हर्षामर्ष आरंभिला. परंतु आपले कृपेकरून उभयेतांचें सख्य उत्तम प्रकारें जाहालें. त्याचें वर्तमान आपणांस परस्पर कळलेंच असेल. प्रस्तुत **श्रीमंत** सेनासह वर्तमान **नागपुरास** आहेत. राजश्री × × × × **श्रींचे** यात्रेस **तुळजापुरास** × × **रायाजीबावा** यांचें सख्य करून × × गिरीचे महालीं ठाणीं श्रीमंतांचीं होतीं. × ल देवबून बंदोबस्त करून दिल्हा. पुढें × × समाधानपणें राहावें, यैसा विचार × × नंतर राजश्री **राणोजी बावा भोसले सप्तऋषीहून** आल्यानंतर राजश्री **संताजी बावा भोसले** यांचें सख्य करून मारानिलेचे हस्तकीं दिल्हें. त्यांत कृत्य × रोज **वराड** प्रांतीं उपद्रव न × वा यैसा × जाहाला. त्याहास जामीन त्यांची मातुश्री व **रायाजीबावा** राहिले आहेत. हें वर्तमान कळावें. दुसरें,

वरकड वकिली व सिकेनिसी व पोतदारीचें × × आणिखी कितेक वृत सायंत राजश्री (**नारोपंत**) आपनांस लिहितील. त्यावरून कळों येईल. × × ले विसीं किमपि चिंता न करावी. आपल्या × नाचा विचार व दरबारी व राजकी वर्तमान व घडेल तें सविस्तर लेहून पाठवणें, म्हणजे × × × लेले पाहिजे. तुम्ही × × × बहुत काय लिहिणें. × × × **नारोपंताच्या** पत्रावरून अर्थ कलो येईल. हे विनंति.

Krishnaji Govind, the Mukhatyar of Tai Kolatkar writes to Vaidya brothers the following information :—

( 1 ) The Nizam and Raghuji have settled their differences and became good friends. ( 2 ) Raghuji arrived at Nagpur and after giving the possession of some villages of his ownership to Rayaji, his enmity was brought to an end. ( 3 ) Ranoji returned from Satara and agreed to stop giving trouble to Santaji Bhosle in Berar. His mother and Rayaji stood security for his future conduct.

---

पत्रांक ४४ ] श्री माघ १६७२
फेब्रुआरी १७५१

श्रीमंत राजेश्री **बालंभट बावा** व राजेश्री **विश्वनाथ बावा** स्वामींचे सेवेसी.

विनंती सेवक **विठल जिवाजी** कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती उपरी येथील कुशल लेखनआज्ञा केली पाहिजे. विषेश. सामान रवाना केलें, मध वजन ॥· दाहा मण, नारल सुमार ५०० पाचसे, पानें सुमार १०००० दाह हजार, वासे ३०० तीनसे, कारवी भारे ५० पनास, मेढी १० दाहा, येणेंप्रमाणें रवानगी केली आणि आज्ञे-प्रमाणें **गोपालगडास** गेलों, तेथून **जयेगडास** जाऊं. तेथून **विजयेदुर्गास** जाऊन येतों आणि आठा दिवसीं सेवेसीं येतों. स्वामीस कलावें म्हणऊन लिहिलें असे. बहुत काये लिहिणें हे विज्ञापना.

Vithal Jiwaji Thorat sends articles from Konkan to Vaidyas at Wai, for the marriage of Anubai and the thread ceremoney of Baburao. The quantity of honey sent is 10 Maunds, which may be for yearly expense.

---

पत्रांक ४५ ] श्री प्रमोद, पौष शके १६७२
जानेवारी सन १७५१

राजश्री **रामचंद्रपंत** स्वामीस.

विनंति उपरी. तुम्ही पत्र राजश्री **सिवाजीपंत** यांच्या माणसांबरोबर पांठविलें तें पावलें व सखलादा दोन गज सात पाठविल्या त्या पावल्या. श्रीमंत राजश्री **पंत सचीव** यांनीं पा **सुपे**पैकीं च्यार वेळ्ये एक माही, सालाबादप्रों देविले आहेत. त्यांची सनद पाठविली आहे तरी राजश्री **सिवरामपंत** यास त्यांचें पत्र सुपे यास घेऊन **संताजी सिंदा** यास पाठऊन वेळ्ये जलदीनें येत तें केलें पाहिजे. आम्ही **पुणेयास** येणार त्यास, अद्यापि पाय बरा जाहला नाहीं. दो चौ रोजांत काहीं बरा जाहला म्हणजे येतों. मातुश्री **आईसाहेब सातारियास** निंघोन येणार, त्यांस बरोबर कोण कोण येतात, कधीं निघणार तें लिहिलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे, हे विनंति.

The writer probably from Wai asks Ramchandrapant Karkare who was at Poona, the information, when Rani Tarabai comes to Satara from Poona, & who are to accompany her. This is probably after the ascendeney of Ramraja to the throne of Chhatrapati.

---

पत्रांक ४६ ] श्री १४ सफर
पौष वद्य २।१६७२
जानेवारी २,१७५१

वेदमूर्ती राजश्री **विस्वेनाथभटजी वैद्य** स्वामीचे

सेविसी सेवक **बाबुराव मोरेस्वर** सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता पौश वद २ मुकाम **चेन्हापूर** जाणऊन स्वकीये कुशल लेखन केलें पाहिजे. विशेसु स्वामीचे रुपये सातसे पन्नास आम्हीं घेतले होते. त्यांस हुंडी **वेंकाजी शामजी उमदी** वर रुा ७०० साताश्याची पाठविली आहे व राजश्री **महादेवभटजी पटवर्धन** यांचे ऐवजांत रुा पन्नास ५० पाठविले आहेत. त्यापासून घेऊन येकूने साडेसातशे रुपये घेऊन पावलियाचें उत्तर पाठविलें पाहिजे. आपन पदरचे असूं कृपा लोभ असूं दीजे. बहुत काय लिहिन. हे विनंति. रो छ. १४ माहे सफर पौश वद २ शके १६७२ प्रमोदनाम सवसरे.

Baburao Moreshwar requests Vishwanathbhat to receive Rs. 700, sent by a cheque throngh Venkaji Shamji Umadi and Rs. 50 from Mahadeobhat Patwardhan and acknowledge payment of Rs. 750.

---

पत्रांक ४७ ] श्री प्रमोद पौष व. ५।१६७२
जानेवारी ५,१७५१

वेदमुहूर्ती राजश्री **विश्वनाथभट वैद्य** स्वामिचे सेवेसी.

पोष्य **कृष्णाजी वामन** सां नमस्कार. विनंती येथील कुषल ता पौश वद्य पंचमी मंदवारपर्यंत कुषल असो विशेष. आपण पत्र पा पावलें. तुपाविसीं लिा त्यावरून आठेचाळसी वजनें ·।३। सव्वा आठ मण रवाना केले असे. बाकी तूप राहिलें तेंहि लवकर न्यावयासी पाठविलें पाहिजे. भात आपण थोडेंच घ्यावयासी सांगितलें. त्यावरून वीस रुा चें भात दाहा पायली प्रा घेतलें आहे. आम्ही **पालीस** प्रस्तुत आहों. माघारे **कोले यास** जाऊं, आणि लेहून पाठऊं, तेव्हां उंटे अगर बैल पाठविले पाहिजेत. हालीं भात घ्यावें तरी **आठ पायली** धारण जाली, आणि मिलतही नाहीं, ऐसें आहे. वरकड आम्हीं मामला करून घेतला आहे. भरवसा तुमचा धरिला आहे. सूचना लिा असे. दिले पा. गरज लागली तरी चिटी करून पाठऊं. उत्तर पाठवीन. कृपा असो दिजे हे विनंती.

The letter gives the rate of rice as 10 payalis per rupee.

---

पत्रांक ४८ ] श्री २१ सफर
पौष वद्य ८।१६७२
जानेवारी ८,१७५१

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **बालंभट वैद्य** व तया राजश्री **विश्वनाथभट वैद्य** स्वामी गोसावी यांसि.

पो **कृष्णाजी त्र्यंबक** नमस्कार विनंती. उपर येथील कुशल ता. छ. २१ सफर जाणऊन स्वकीये कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. तेथून इकडे राजश्री **रंगोपंत** आले. त्यांनीं तेथील सविस्तर वृत्त सांगितलें, त्यावरून कललें. यैसी यास

आपणांस कळावें म्हणोन स्मरणार्थ ल्याहावें लागलें कीं, लष्करांत **सांगोलीयावर** असतां स्वामीच्याच चित्तानुरूप जालें कीं, यैवज बोलीप्रमाणें तुम्ही सरकारांत द्यावा. तुम्हांकडे निशाही करार केल्या. त्या तुम्हांकडे घ्याव्या, त्याप्रमाणेंच येते समईं **सातारा**हीं करारी करून आपणांकडे सरकारच्या यैवजाची निशा करार केल्या. बोलीप्रमों आम्हांकडून तो अंतर पडिलें नाहीं. आम्ही इकडे आलियावर तुम्ही बोलीप्रमाणें यैवज घ्यावें. त्यास हुंडी देतां ते फिरते. दोन तीन हुंडिया फिरल्या, रा। **गोपाळ शंकर** याची निशा तुम्हांकडे जाली, म्हणोन आम्हांस दिसतें आणि तुम्ही लिहितां कीं, निशा झाली नाहीं. तरी त्याच्या पत्र लेहून घेतलें आहे, तेंही ठेवून घेतलें. तें पत्र आपल्यापाशीं कैसीयास ठेविलें ? पत्र माघारें द्यावें होतें, म्हणजे निशा त्यांजकडील आणवितों. तैसेंच **रास्तियांस** यैवज तुम्हां देखत जितका करार देविला तो न देतां त्यांस यैवज बहुत दिल्हा. तेव्हां त्यांजकडेही तुम्ही सालमारीं यैवज द्यावयाची बोली केलीच असेल; यैसें असतां तुम्ही इकडे यैवज आम्हीं आणविला तो द्यावा. त्यास तोही येतां दिसत नाहीं, अथवा दरमाहासही यैवज देत नाहींस. तेव्हां पूर्वील वचनोक्त तुम्हांकडून फिरली कीं काय ? जरी आपण पूर्वील करार येकीकडे ठेऊन दुसराच मनसबा आरंभिला, तरी पुढें विचार काय केला ? तेथें खावंद आहेत व आपण आहेत. तुमच्या आमच्या वचनोक्तीचे करार चालेना, तेव्हां आम्हांकडून विपर्यास जाला, किंवा तेथील कारभाराच्या अन्वयें जाला ? तेव्हां आम्हांकडे यांचा दोश आहे कीं काय, —श्री २ ( पुरवणी )— हा अर्थ चित्तांत आणावा. तुम्हीं आम्हांस लिहून पाठविलें कीं, दहा हजारांचें खत येजमान न देत, तेव्हां आम्ही [1]जातखत द्यावें कीं कैसा अर्थ ? सरकारचा कारभार या प्रांतें आलियावर **भोरपकर** येऊन बैसले आहेत कीं, किल्यास येऊन बेगमी करावी. या प्रांतींचे किलाचे गदगवे पडले आहेत यांस यैवज पाहिजे. त्याचा उपाये काय ? तुम्हीं यैवज द्यावासा करार होता. तो अर्थ येरीतीचा झाला. राजश्री **मोरोपंता**पासीं यैवज करार केला. तेव्हां त्यांचे द्रोही होऊन यैवज केला, तो बोलीप्रमाणें खर्च न करितां मनास येईल तैसा पैका खर्च केला आणि त्याच्या कामानिमित्त आम्ही श्रीमंत **पेशवे** यांजकडे जावें. आम्ही त्यांजपासून पैका घेतला याजकरितां आम्ही त्याचे लढे गुंते वारावयास **पेशव्या**मागें जावें आणि पैका आला तो तुम्हीं खर्च करावा. दरमहाचा व गड किल्याचे बेगमीचा यैवज कर्जदारांस द्याल आणि आम्ही कारभारी म्हणोन आम्हांवर कर्जदारांच्या वराताकरिता. **रत्नपारखी** यांची वरात केली. पुढेंही काय काय वराता करणार ? यास यैवज आम्हांकडे कोणता ध्यानांत आणिला आहे ? पूर्वील राज्यभार होता कीं, गड किल्यास कोण पुसतो ? गडास काव्या लावणें यैसें **पार्थीवच** म्हणत होतें. आतांचा कारभार तैसाच आहे कीं काय ? पर्वतवासीयाचें आतां मनोधारण

---

१ स्वतःच्या जबाबदारीवर केलेला करार.

रक्षून त्याची बेगमी करून न दिल्ही तर पुढें गत काय? गडकरी हातचे गेले म्हणजे बरें कीं काय? तेथेंच मनसबे कैसें जाले आहेत, हें स्वामीस ठावकेंच असेल. येजमान व तुम्ही तेथील अन्वयें म्हणत असाल कीं, तुम्ही वावगा गवगवा गड किल्याचा कासीयास मनास आणिता? पूर्ववत प्रों स्थलोस्थलीं असिल्या पदार्थांत संपादून घेतील हें बरेंच. परंतु आतांचा प्रसंग पाहिल्याप्रमाणें नाहीं. परचक्र नाहीं. स्वचक्र आहे. तेंच कठिण आहे. या जिल्याचें रूप आहे तें किल्यामुळें आहे. किल्याची अनस्था जालियानें पुढें बरें नाहीं. श्रीमंत राजश्री **बाजीराव अमात्य** यांजकडे इकडे जिल्हाकिले नाहींत कीं आहेत? हें चित्तांत आणावें. त्याजमुळें दरबारीं त्यांचा अगत्यवाद आहे तोही जाणतच आहेत. तरी याउपर आम्ही ल्याहावेंसें नाहीं. गडकिल्याच्या समजाविशीस व दरमाहास यैवज तुमच्या विचारेंच योजिला, तो तुम्हीं कारभार मोडिला. पुढें याचा विचार काय? तो पुर्ता ध्यानांत आणून उत्तरें लेहून पाठवणें. जर आपल्या वचनाप्रमाणें चालावेंसें —श्री ३ (पुरवणी)— असिलें तरी दरमहास यैवज राजश्री **गोपालबाबा**कडे लागेल तो देणें. व आम्ही यैवज आणविला होता तो पाठवणें असिला तरी लेहून पाठवून देणें. माणसें पाठऊन आणऊन राजश्री **गोपाल शंकरा**कडील निशा जाली नसली तरी त्याचा कागद घेतला आहे, तो इकडे पाठवणें. म्हणजे तें पत्र त्यांजकडे देऊन त्याची निशा करून घेऊं. सुरलीत बोलीप्रों चालों द्यावें. नाहीं तर आमचा दुराग्रह नाहीं. चित्तास येईल तें कीजे. दाहा हजारांचें खत येजमान तेथें देत नसिलें तरी हिशेबी जमाखर्चें आहे. रुपये सरकारांत जमा आहेत. खासगत खर्चास कोण्हीं घेतले नाहींत, हें आपणांसही ठावके आहे. याजकरितां नसत्या दिकती चित्तांत न आणितां येथोचित बोलीप्रों साफ चालों द्यावें किंवा आम्हांस तऱ्ही काये तें साफच लिहिलें पाहिजे. तुमचा विचार तुम्हांकडूनच फिरला. आम्हांवरी शब्द नाहीं. यानंतर तुम्ही खासगत आपला मजकूर नागलीचा लिहिला तर नागली पावतील. दाणे जमा होतात. गुंता नाहीं व लग्नसाहित्य **वाईत** करवावें, म्हणोन लिहीलें, तरी गडकरी आतां वेठेबेगार करितात यैसें नाहीं वासे पाठवावयास अनुकूल पडत नाहीं. किरकोळ वेठबेगार थोडीबहुत व बुरूड काम यैसें मनास आणून फाल्गुन मासीं लग्ननिश्चयें पाठवून देऊं. **मावळ** प्रांतें रयेतेवर सर्व कसाले सोसतात, यैसें नाहीं. रा **मोरोपंता**कडील वेठबेगार येत नाहीं व अथवा **सुपे** वगैरे देशचे माहाल, तेथील प्रात आहे. नाहीं हें ठावकीच आहे. येका **मावळा**वर सरकारचें कार्य व आणखीही सर्वांचें कार्य. गडकिल्याची वेठ बैसली आहे. त्यांस आपल्या लिहिल्यावरोन थोडीबहुत योजना करून देऊं. भारी मजकूर. घरें बांधावयाचें व वासे आणवायाचे योजना आगखी तरतूद करवावी. कललें पाहिजे. यजमानाचा मजकूर या प्रांतें यावयाचा होता. तरी तुम्ही कोण्ही तरी कारभारी समागमें येतेस गडकिल्याच्या बोली तुमचें मतें करितों, म्हणजे सर्वांस सुख कलतें. ते गोष्ट अनुकूल नाहीं. याउपर रा **मोरोपंता**चा उपसर्ग दाटीचा लागला, तिकडे लष्करांत **गंगातीरास श्रीमंता**समागमें जाणें लागेल.

इकडे **राजश्री बापू**समीप कोण्ही पाठवून, इकडील तहरह गडाकिल्यांची बंदोबस्ती करवावी. जो केला कारभार सेवटास जाऊन द्यावा. हा तुमचा संकल्प. तेथें आमचें येकट्याचें काये चालणार ? होणार तैसें ईश्वर अनुकूल करूं. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

(पान ४)

विनंती उपरी पत्रें तुम्हांस लिा आहेत तीं राजश्री **पंतास** दोन क्षण आवकाश करून सविस्तर वाचून अक्षरशः दाखविणें, व तुम्ही व रा **सदाशीव** व **गोपाळबा** येसें वाचून पाहाणें. बहुत काय लिहिणें हे विनंती. तुमचीं दोन पत्रें माघारीं पाा असेत हे विनंती.

This lengthy letter is written to Vaidya brothers by Krishnaji Tryambak Lohokare, the Sachiva's officer at Rajgad fort. It refers to the understanding arrived at between the Peshwa and Sachiv at Sangola about the payment of money by the Peshwa to Sachiv. There is also a reference of his help to Vaidyas for the preparation of rhe marriage of Anubai, the daughter of Balambhat which was to take place in Phalgun 1672 with the son of Bhikajipant Raste of Wai.

---

पत्रांक ४९ ]　　　　श्री　　　　सुा इहिदे खमसैन
माघ वद्य १२।१६७२
फेब्रुवारी ११,१७५१

खासगी निा वैद्य
खर्च यैन खर्च रा स्वारी　　　　मार तहवेल कोठी
खरेदी द्राक्षें　　　　माघ मास
८॥ वद्य १२ ताा ३०

It seems the cultivation of grape fruit is more than 200 years old in India.

---

पत्रांक ५० श्री प्रमोद फाल्गुन वद्य १।१६७२
मार्च २,१७५१

श्रीमंत राजश्री **बाळंभटजी** व राजश्री **विश्वनाथभटजी** वैद्य स्वामीचे सेवेसी.

पोष्य **केसो कृष्ण** कृतानेक सा॥. नमस्कार. विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. राजश्री **रघोजीबावा भोसले** याकडील वर्तमान तरी फलगुण सुध सप्तमीचें पत्र **केदारजी मोहिते** यांचें **सिवाजी मोहिते** यांसि आलें, तें फलगुण वद्य द्वितीयास आलें. तेथें लिहिलें जें, **आविंदाचा** व **बावांचा** स्नेह जाहाला. राजश्री **जानोजी निंबाळकर** यांच्या भेटी जाहल्या. पुढें दुसरे दिवशीं **मुख्याची** भेट होणार होती. देणेंघेणें पडिलें, काय किती, हें लिहिलें नाहीं. **आकोलेहून** पत्र **जोगांचें** आलें होतें. त्यांत लिहिलें जे, वीस लक्षपावेतों बोली **सेनासाहेब** सुभा यांजकडील आली होती, **मोगला**कडील तीसपावेतों होती, ऐसें वर्तमान आहे. यानंतरीं आम्ही प्रातःकाळीं **पुणयासि** जावयासी येतों. राजश्री **मुधोजी भोसले** यासि न्यावें हा विचार राजश्री **बाणजी मोहिते** यांचे विच्यारें व **भटजींचे** मतें आहें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

राजश्री **रामचंद्रपंत** स्वामींस सां॥ नमस्कार. विनंती चिरंजीव राजश्री **मोरोपंत** पंचमी करून निघोन येतील. कळलें पाहिजे. हे विनंती.

Keso Krishna Shembekar writes to Vaidya brothers the contents of the letter received by Shiwaji Mohite, from Kedarji Mohite. A treaty was being framed between Nizam and Raghuji Bhosle in which Raghuji proposed to pay 20 lacs. But Nizam demanded 30 lacs. Janoji Nimbalkar had an interview with the Nizam. Jog also writes from Akole the same news.

---

पत्राक ५१ ] श्री छ. २६ रबिलाखर इहिदे खमसैन
फाल्गुन वद्य १३।१६७२
मार्च १४,१७५१

अजम **सेखनसरुला** किलेदार व कारकून किले **मनमोहनगड.**

मोहू.

इजतशार अजी **चिमणाजी नारायेण** सचीव दुवाव नमस्कार. सु॥ इहिदे खमसैनमयावअलफ. राजश्री **विश्वनाथभट वैद्य** मौजे **कोरलें** येथें राहावयास सहकुटुंब

आले आहेत. त्यांस गडकरी पाठऊन मौजे मजकुरीं येक घर रिकामें करून देवणें. जाणीजे. छ. २६ माहे रबिलाखर पा हुजूर.

श्री
शंकराजी
नारायण

शिका

पत्रा
वधिरयं
भाति

मोर्तब

• सुरू सुद

Chimnaji Narayan Sachiv has used the stamp of Shankaraji Narayan. He has asked the clerk and officer of the fort of Manamohangad, Sekh Nasarulla, to secure a convenient house at Korale for Vishwanathbhat Vaidya who was going there to stay with his family, for safety.

---

पत्रांक ५२ ]

श्री

श्रीमंत तीर्थस्वरूप **पंतप्रधान** राजश्री **भाऊसाहेब** स्वामी वडिलांचे सेवेसी. आपत्ये समान बालके **विस्वनाथ कृष्ण** व **जनार्दन कृष्ण जोशी श्रीहून** श्रीचरणावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार. विनंति. येथील कुशल ता श्रावण वद्य पंचमीपर्यंत आपले आसिर्वादेंकरून समस्त सुखरूप असों. तीर्थरूप **नाईक** कैलासवासास प्रयाण करते समईं मजला आज्ञा केली, तुम्हांस श्रीमंत **पंतप्रधान** यांचे वोटींत घातलें. मायबाप, धनी, देव, छत्र, तुम्हांस ते आहेत. चिरंजीवाप्रमाणें चालवितील. तुम्हांस चिंता काय आहे ! त्यांच्या पुन्येंकरून आपण **कासिवास** करून गायत्री-पुरछरणा सोमयाग, श्रीकोटिहोम, आवांतर कितेक धर्म जाले, ते त्यांचे, त्यांच्या द्रव्याचे, त्यांच्या अनाचे. सेवटीं परलोकही उत्तम जाहाला. ते असे पुन्यवान् प्राक्तनवान् समर्थ आहेत. तुमचे उभयता बाळकांचें चालवणें, तें किती ! आम्हांस सर्व प्रकारें छत्र आपण आहेत. वरशास रुपये दाहा हजार आठसे येत असतात. त्यांस तीर्थस्वरूप **नानाजी कृष्ण** यांनीं लिहिलें. अकरा हाजारांचा रोखा करून घेतला. उत्तम जहालें. परंतु अवंदाचे वर्षीं तीर्थस्वरूप कैलासवासवास जावयास आणि धर्म खर्च बहुत होण्यास, वृतबंध माझ व श्रीकोटिहोम, संसारखर्चे, उत्तरकार्यास व इमारतीस मिळून खर्च रुपये पंचवीस हजार जाहाले. त्यास आपणांकडील यैवज वरशास येतो, तेणेंकरून

सर्व चालतें. अवघा चहूंकडून सर्व गोष्टींचें अनकुळ जाहालें; परंतु **स्वामी** सर्व दयज्ञ; आमचें छत्र असतां आमची उपेक्षा करणार नाहींत. जेणेंकरून आमचा खर्च चाले, ते गोष्टी केली पाहिजे. वरिसश्राध जालियावर पुढें मजला आज्ञा काय ते केली पाहिजे. **उभयता स्वामींच्या** चरणापासीं हेत लागला आहे. हें संवेसी विनंतिपत्र लिहिलें आहे. याचें आसीर्वादपत्र आलें म्हणजे त्याप्रमाणें वर्तनूक करून, पूर्वापासून **वडील** अनाचे आहेत, हा अभिमान धरून आपले पदरचे जाणून चालविणार समर्थ सर्व प्रकारें आहेत. मजविशई येक पत्र वेदशास्त्रसंपन **बालकृष्ण दिक्षित पाटणकर** यांस पाठविलें पाहिजे. स्वकीये परकीय धर्मन्यायाखेरीज याजवर जाजती करतील तर यांचा सांभाळ तुम्हीं करणें, व **गोविंद नाईक** यांचा कोणे रीतींनें सांभाळ करीत असतात, हें वर्तमान आम्हांस लिहिणें. पत्राचें उत्तर लिहिणे ( स ) आज्ञा केली पाहिजे. बहुत काये लिहिणें. कृपालोभ बालकावर केली पाहिजे. हे विज्ञापना.

This letter is writren by Kakubai's sons, Vishwanath and Janardan from Kashi, after the death of their father Krishnaji Naik, communicating what their father said, to them, at the time of his death. They were assured of the kind treatment, Peshwa would give them. In this, they have prayed the addressee to increase the annual Tankha by stating the difficult circumstances through which they were to pass rheir lives.

---

पत्रांक ५३ ] श्री

चिरंजीव विजई सर्वकाल सर्वेश्वर्यसपन्न राजमान्य राजेश्री **नानापंत प्रधान** यांसी प्रती **काकूबाई** अनेक आसीर्वाद. उपरी तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें, लिहिला अभिप्राये कलों आला. राजेश्री **नाईक कैलासवासी** यांचा व आपला स्नेह विशेष होता म्हणून लिहिलें, तरी ते समर्थच होते, आणि आपणही सर्व प्रकारें समर्थच आहेत. तेयें परस्परें लोभ विशेष असेल त्यांत कांहीं अंतर नाहीं. परंतु कांहीं आम्हांवर लोभ असिला तरि बरेंच आहे. विशेष तुम्हीं लिहिलें कीं, **नाइकांच्या** पुत्रांचा उत्तम पुरुपार्थ होईल तें करणें आम्हांस आगत्य आहे म्हणून लिहिलेंत. त्यास त्यांचे पुत्र दोघे जण. येक **धर्मपुत्र** आणि येक **स्वबीज.** त्याजकरितां कोण्हाचा उत्तम लौकिक करणार हें आपणांस कलत नाहीं. आम्हीं तो दोघे समान मानिले आहेत. आपल्या चित्तांत अभिप्राय असेल तें प्रत्योत्तर पाठविणें. धर्मकार्यास विरुधता होईल तें न करणें. तुम्हांस

कोनेविशीं आटक नाहीं. ईश्वरें सर्व सामर्थ दिल्हें आहे. त्यां प्रकारें धर्मास आविरुध तें केलें पाहिजे. आम्ही मृत्युलोकीं मागें राहून पुत्रांच्या वितविषयाविशीं कलह करावा हा कांहीं पुरुषार्थ नाहीं. आम्हांस तुम्हीं सर्व विषईं धर्मपुत्र आहां. सुज्ञाप्रती बहुत काये लिहिणें. कृपा लोभ असो देणें. हे आसीर्वाद.

This letter is addressed to Peshwa Nanasaheb by Kakubai, the widow of Krishnaji Naik Joshi. She says, Peshwa and Krishnaji Tatya were competent statesman and had gocd friendly relations. She wished to know whether the two sons of hers, Narayan alias Nanaji and Vishwanath–were considered by the Peshwa like her on the same standing, though she considered one of them Dharmaputra and the other Bijaputra.

---

पत्रांक ५४ ] श्रीशंकर भाद्रपद शुध १।१६७१
सपटंबर १,१७४९

तीर्थरूप राजश्री **कृष्णाजी नाईक तात्या** वडिलांचे सेवेसी.

बालके **बाबूजी (व) आबाजी जोशी** सां नमस्कार, विनंती उपरी. श्रीमध्यें आमचें घर **जोगाबा** होतें, तें **वडिलांस** विकत दिल्हें. किंमत रुा १०००० दाहा हजार. वडिलीं सुखरूप त्या घरांत राहावें. आम्हांस व चिरंजीव **गोविंदजी** यांस घराविसीं समंध नाहीं. शके १६७१ सुक्लनाम सवछरे. भाद्रपद सुध १ प्रतीपदा सही.

Babuaji and Abaji Naik Joshi admit in this letter that their house in Benaras was sold to Krishnaji Naik on receipt of Rs. 10,000 as price and hence they, including Govindji had no connection with it henceforth.

---

पत्रांक ५५ ] श्रीशंकर भाद्रपद शुध १।१६७१
सप्टंबर १,१७४९

तीर्थरूप राजश्री **कृष्णाजी नाईक तात्या** वडिलांचे सेवेसी.

बालके **बाबूजी व आबाजी जोशी** सां नमस्कार विनंति उपरी. तीर्थरूप व मातोश्री यांणीं कैलासवास करते समईं त्यांजपासीं वित होतें त्याचे विभाग तीन

केले. येक विभाग चिरंजीव **गोविंदजीस** तेथेंच होता, त्याचे हवाले तीर्थरूपानींच केला. आमचे दोन विभागांचा ऐवज वडिलांचे हवाले केला. रुा ६५५१० पासष्ट हजार पांचशे दाहा केला होता, तो यैवज **सतरसांस** चिरंजीव **नाना**पासून घेतला. वडिलांस कबज लिहून दिल्हें. बहुत काये लिहिणें. हे विनतीपर शके १६७१ सुक्रनाम सवछरे. भाद्रपद सुध १ प्रतीपदा. हें लिहिलें. सही

Babuji and Abaji Naik Joshi admit in this letter the fact that their parents (father and mother) at the time of their death divided, whatever property they had, into three parts and handed over themselves one part to Govindji, their younger brother, who was at Benares and the two other parts belonging to them to Krishnarao Tatya. The sum of their shares ammounted to Rs. 65,510, which they received at Satara from Nanaji (Narayan), Krishnarao Tatya's son. They gave a receipt to Krishnarao Tatya, acknowledging the payment, on 1st September 1749. The transaction of partition is very fair and befitting the members of the Joshi family. It seems the writers' mother was Satti, as she took part in partition with Krishnarao along with her property.

## प्रजापति संवत्सर शके १६७३

### इ. सन १७५१।५२

पत्रांक १ ] श्री छ. २ जमादिलावल
चैत्र शुध ३।१६७३
मार्च १९,१७५१

वो। राजश्री **विश्वनाथभट वैद्य** स्वामी गोसावी यांसी.

सेवक **बालाजी बाजीराव प्रधान** नमस्कार. सुा इहिदे खमसैन मया व अलफ. **साताराचे** मुकामीं कर्जाचे ऐवजाविषीं तुम्हांस मांगितलें. तुम्हीं कबूल केलें होतें. त्यास सांप्रत प्रयोजन यैवजाचें आहे. याबद्दल राजश्री **नारायेणराव वेंकटेश** याजकडील राजश्री **बाजी मल्हार** कारकून पाठविले आहेत, तर तूर्त पांच हाजार रुपये याजवळ देणें. खत पाठवून दिल्हें जाईल. जाणिजे. छ २ जमादिलावल अनमान सहसा न करणें. जरूर जाणून लिहीलें असे. बहुत काये लिहीणें.

मोर्तब
सुद

Nanasaheb Peshwa asks Vishwanathbhat to pay Rs.5000 to Narayan Venkatesh Joshi alias Ghorpade of Ichalkaranji as debt; as settled at Satara, with Baji Malhar, Narayanrao's clerk. The conveyance deed given by Narayanrao was on receipt of money.

---

पत्रांक २ ] श्री छ. ५ जावल
चैत्र शु. ७।१७७३
मार्च २२,१७५१

राजश्री **कासी भास्कर** गोसावी यासि.

दाा अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्ये स्नेाा **राणोजी भोसले** दंडवत. उपरी येथील जाणून स्वकीये कुशल वृत्त लिहीत जाणें. यानंतर चिरंजीव राजेश्री **रघोजी**

**भोसले** यांणीं तुम्हांकडून वीस हजार रुपये विद्यमानें राजश्री **विश्वनाथभट वैद्य** व राजश्री **रत्नाकर विठ्ठल** यांचे नांवें **देवरांत** देविले होती. तो यैवज सदरहूप्रों **विश्वनाथभट** यांजकडू(न) घेतले. तुम्ही त्यास देणें. छ. ५ माहे जमादिलावल बहुत काये लिहींणें.

मोर्तब
सुद

This letter is written by Ranoji Bhosle to Kashi Bhaskar Kolatkar, informing that he received from Vishwanathbhat, the money Raghuji promised to pay through him. There are a stamp and Mortab of Ranoji on the letter.

---

पत्रांक ३ ] श्री प्रजापति वैशाख शुध १०।१६७३
एप्रिल २४,१७५१

श्रीमंत राजश्री **विश्वनाथभटजी वैद्य** मुकाम **सातारा** स्वामींचे सेवेसि.

सेवक **अंताजी कृष्ण जोग** कृतानेक सां नमस्कार विनंति उपरी. येथील क्षेम तागायेत वैशाख शुध १० दशमी मुकाम **चंद्रकोना,** प्रांत **बर्द्वान.** यथास्थित असो, जाणोन स्वकुसल लेखन केलें पा. यानंतर स्वामींचे मुदल पांच हजार आम्हीं देणें, त्याजबाबद रुपये राजश्री **कृष्णभटजी रायेकर** यांची हुंडी **श्री** हून सहा हजार रुपये तुमचे जोगची पा आहे. घेऊन पावलीयाचें उत्तर पा पाहिजे. सदरहू रुा तीर्थस्वरूप राजश्री **विसाजी बलाळ जोग** यांचे रुजूनें घेऊन उत्तर पाठविलें पाहिजे. शके १६७३ लोभ कीजे हे विनंति.

This letter is written by Antaji Krishna Jog to Vishwanathbhat from Chandrakona of Bardwan district. He sent him his bebt through Krishnambhat Rayekar of Kashi. He was closely related to Visaji Ballal Jog.

---

पत्रांक ४ ] श्रीकरहाटेश्वर जेष्ट शुद्ध ५।१६७३
मे १८, १७५१

वेदमूर्ति राजमान्य राजश्री **बाळंभट** तथा राजश्री **विश्वनाथभट वैद्य** स्वामी गोसावि यांसि.

आश्रित **कृष्णंभट काळे** कृतानेक नमस्कार, विनंती उपरी येथील क्षेम. तरी जेष्ठ शुद्द पंचमीपर्यंत समस्त सुखरूप असो. यानंतर राजश्री **रामचंद्रपंत व गंगाभागीरथी-समान मातुश्री सखूबाई** आली त्यांहीं साकल्य वर्तमान सांगितलें व त्यांजवळ पत्र पाठविलें तें पावलें. त्यावरी राजश्री **रामचंद्रपंत** यांहीं सांगितलें कीं, तुम्ही व वेदमूर्ति **बाळंभट दातार** उभयता मिळोन **श्री**ची सेवा करणें, त्यावरी आम्ही उभयता मिळोन यथाज्ञानें शेवा करीत आहों, आपली मनकामना जी असेल ती **श्री** सिद्धी पाववील. श्रीचे नैवेद्याची व आमची बेगमी केली आहे. राजश्री **रामचंद्रपंत** यांहीं केली, तेच विदित कीतलि. बहुत काय लिहिणें, तरी राजश्री **रामचंद्रपंत** मुखवचनीं साकल्य वर्तमान विदित होईल. कृपालोभ असो दीजे. हे आशीर्वाद. तुम्हांकारणें **श्री**चा प्रसाद नारळ १ एक पाठविला आहे. तो घेणें. आशिर्वाद.

इहेव उभयतांस **बाळंभट दातार** यांचे आशिर्वाद. तुम्हांकारणें **श्री**चा प्रसाद नारळ १ येक पाठविला आहे,' तो घेणें. लिंखितार्थ परिसोन लोभ असो दीजे, हे आशिर्वाद.

Krishnambhat Kale of Nandiwade family writes to Vaidya brothers that Ramchandrapant Karkare and Sakhubai, the wife of Bhaskarbhat arrived safely. As they were in need of the grace of God, Karhateshwar to get over some difficulties, they asked Ramchandrapant to request Krishnambhat and Balambhat Datar of Nandiwade, to serve the God in the best possible way so as to give them their desired object. It seems Sakhubai's parents were the inhabitants of Nandiwade near Jaygad.

---

पत्रांक ५ ]  श्री  छ ८ रजब
जेष्ठ शु. १०।१६७३
मे २३,१७५१

शिक्का व मोर्तब
पद्मदलसम

॰ श्री ॰
श्री भवानी शं-
कर प्रसन्न श्रीराजा
शाहु चरणि दृढभा-
व भवानी शंकर
सुत हैबतराव

अज सुभा पा। वाई मोकदमानी मौजे धावडी संमत हवेली सुरू इसने खमसैन मया आलफ. मौजे मजकूरच्या डोंगरीं राजश्री विश्वनाथभट वैद्य यांचीं माणसें काठ्या तोडावयास येतील त्यांस तोडूं देणें. अडथळा न करणें. छ. रजब

मोर्तब
सुद

This is an order to the Mokadam of Dhawadi, issued by Pant Rajadnya to allow the men of Vishwanathbhat to cut sticks from the forest of the village. The stamp and Mortab of Rajadnya are on the paper. The names entered in the stamp were the forefathers of the Wai Panta Rajadnya family.

---

पत्रांक ६ ]  आषाढ व. १०।१६७३
जुलै ७,१७५१

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाळंभट व ता। राजश्री विश्वनाथभट वैद्य स्वामींचे सेवेसी.

पोष्य माहादाजी नारायेण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल आषाढ वद्य दशमीपावेतों आपले कृपेंकरून सुखरूप असो विशेष. बहुत दिवस तुम्हांकडील वर्तमान कळत नाहीं, तर सविस्तर कुशलार्थ लिहिला पाहिजे. आम्हांकडील वर्तमान तर आपले कृपेंकरून कुशल असो. यानंतर परगणे बाळापूर व

**आकोलें** व **दहीयाडें** व **अलजपूर** व **पेठ नादगाव** हे मामलत आपण व आनखी येक दोन ग्रहस्त मिलोन केली. त्यास लक्ष रुपये प्रस्तुत अखेर श्रावण द्यावे व लक्ष रुपये दसरा-दिवाळीस द्यावे. दरम्याने राजश्री **रघोजी करांडे** आहेत. मामलत निभाऊन द्यावी, त्यास प्रस्तुत श्रावणअखेरची रवानगी तों आपण करितों. पुढें दसऱ्यादिवालीचे वायदीयास आपण कृपा करून लिहितील तर कांहीं चिठी तुम्हांवर लिहूं. चिठी कोठपावेतों ल्याहावी हा तादात (?) लिहोन पाठविला पाहिजे. त्यासारिखी चिठी केली जाईल. याचें उत्तर येईल तैसी वर्तणूक (क) रूं. वरकड दरबारचें व आपलें सविस्तर वर्तमान लिहीलें पाहिजे. यैवज महंत **बनसीपुरीस** द्यावा लागतो. सुज्ञाप्रति+बहुत काये लिहीणें. कृपा लोभ दीजे हे विनंति.

---

+ पुढील अक्षर लेखकाचें.

Mahadaji Narayan (probably) Ponkse writes to Vaidya brothers that they have secured the Mamlats of Paraganas Balapur Akole, Dahiyade, Alajpur and Peth Nandagaon for Rs. 2 lacs with the intervention of Raghuji Karande. The first instalment of one lac to be paid at the end of coming Shrawan and the second of one lac at Dasara or Dipawali. He wants to know what ammount he would be ready to pay for him. It was to be paid to Mahant Bansipuri Gosavi.

---

पत्रांक ७ ]　　　　　　श्री　　　　श्रावण शुद्ध १।१६७३, शुक्रवार
जुलै १२,१७५१

श्रीमंत राजश्री **बालंभट ता। राजश्री विश्वनाथभट** दादा स्वामी वडिलांचे सेवेसी.

पो। सेवक **गोपाल अनंत** दोनी कर जोडून सिरसां नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल ता। श्रावण सुध प्रतीपदा सुकुरवार जाणऊन स्वकीयें लेखन केलें पाहिजे. विशेष तुम्हांकडेस **कालोजी जासूद** पाठविला आहे. त्याबरोबर सकल वर्तमान लिहिलें आहे. त्यावरून कलों येईल. हली **कालोजी**बराबरी **हुंडी** रु॥ **तीनसेची** पाठविली आहे. त्याचे तपसील रो **कृष्णाजी मोरेस्वर** याबाबत २०० व **म्हसांग**-पैकीं, येक १०० येकून तीनसेची हुंडी पाठविली आहे. मौजे **राहाटगांवींचे** रु॥ सातसेची हुंडी केली होती त्यास साउकार टके साडेतीनसे भरणा केला त्यापैकीं राहीले ते पांडिये मजकूर देत नाहीं. गैरहाजीर जाहाले. सालमजकुरीं सन ११६० या सालास **तुलजोचे** नांवें दाखला[१] रु॥ नवसे घातले, त्यापैकीं हुंडी सातसेची केली. त्यास हुंडी फिरोन आली. याकरितां तट पडिला. त्यास **पांडिये** तो पलोन गेले. कबिला

तमाम **बोरगांवास** गेला. जरारे[२] **पांडियाचे** लेक दोघे जणे येथें आहेत. **महादजी पंत** प्रसिद्धपणें भेटत नाहीं. या सालास रो अडीच हजार मागतात. त्यास जागा नाहीं म्हणऊन निघोन पलोन गेले. सन ११६० या सालाचा विचार पत्रीं लिहितां पुरवत नाहीं. जर तुम्ही या प्रांतास याल तरी तुमचे गांव तुम्हांकडेस होतील. म्हणऊन लोकांस उमेद आहे. काय तुमचें येणें होतें कीं नाहीं हें कलत नाहीं. रा **रामाजी गिरधर** रो देत नाहीं. म्हणतो कीं, रा श्रीमंतीं मना केलें ऐसा जाचसाल करितो. कोणी मानीत नाहीं. सकल वर्तमान **गोपाळजी** सांगतां कलों येईल.

श्री २

पुरवणी श्रीमंत राजश्री **विस्वनाथभटजी** दादा स्वामीचे सेवेसी.

प्रार्थना रा **कृष्णाजी गोविंद** याचे मोकाम **उमरावतीवरी** चैत्रमासीं होते. त्यास **राहाटगांवींचें** वर्तमान रो. **नारोपंत** फाल्गुणमासीं राहाटगांवीं होत त्या समई [१]दाखला टके आठावीससेपावेतों घातला. आणि आसाम्य लिहोन घेतल्या. यावर त्याची सनद आली त्यास कोणीं सांगितलें कीं, रो गेले नाहीं. दाखला घातला आहे. त्यावरूनी आम्हींही खटखट केली. दोन दिवस जासूद मागें लाविला. त्यावरी **पांडये** मजकुरास पुसिलें, त्यास त्यांणीं सांगितलें कीं, रो येक हजार दिले. मग निदान सेवट नवसे ठरावले. परत मनास आणिता रा **कृष्णाजीपंतीं** भागयचा विभाग आम्हांस दिला. म्हणों लागले, जे तुमचे **वैद्यबावा** येतील ते समई रा रा **श्रीमंत** देववितील तरी देऊं. परत हा समयो आमचा आहे. याकरितां **स्वामीस** वर्तमान कलावें याकरितां लिहिलें आहे. **स्वाम** येक वेल येऊन आम्हांस घेऊन जावें. वाटेचें बहुत भय वाटतें. पदरीं पैसा नाहीं. परंत '**सिर सलामत तरी पगाड्य पच्यास**' हा विचार बनोन आला आहे. **स्वामींचें** उत्तर आलें म्हणजे निघोन स्वामीपासीं येऊं. सात वरसें सांभाल केला. पुर्वेही तुम्हीच कराल. रा **रामाजी गिरधर** याचे लेक **नागपुरास** गेला आहे. ज्या समई तुमचें येण होईल त्या समई त्यापासून रो घेतले जातील. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ आसो देणें. हे विनंति.

---

१ नोंद. २ सडा, फटिंग.

Gopal Anant Gadre writes to Vaidya brothers the details of the money collected from different persons such as Krishnaji Govind, Krishnaji Moreshwar, Tuljopant and Ramaji Girdhar and from Villages such as Rahatgaon Mhasang. The proverb 'सिरसलामत तरी पगडया पच्यास' is worth remembering. It means 'आपण वांचलों तर वाटेल तें मिळूं शकेल.'

पत्रांक ८ ] श्री श्रावण व. ११।१६७३
आगष्ट ६,१७५१

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथबावा** स्वामींचे सेवेसी.

पो॥ **माधवराव सिवदेव** सां नमस्कार विनंति. उपरी येथील कुशल तागाईत श्रावण वद्ये ११ परियेंत सुखरूप असों विशेष. आम्ही आपली आज्ञा घेऊन आलों त्यास येथील वर्तमान तर श्रीमंत राजश्री **पंतप्रधान** यांजकडील तर मर्जी १कुबलच आहे. २अविंधाची गडबड बरच दिसत आहे. पुढें जें होईल तें खरें. आमचे श्रीमंत तो **भोरास** गेले आहेत. धाकटे येथें आहेत. उभयेतांत चित सुध नाहीं. आम्हांवर थोरलीयांची क्रूर द्रिस्ट दिसत आहे. सविस्तर वर्तमान राजश्री **कृष्णाजीपंत** सांगतील. त्याजवरून कलेल, पत्रीं तपसील कोठवर ल्याहावा? राजश्री **येमाजीपंता**कडलि मजकूर आपण सांगितला होता, त्यास राजश्री **रामचंद्रपंत**हि येथें आले नाहींत व राजश्री **आनंदराव चिटनिस** ३**देहुडी**कडील आम्हांस भेटला नाहीं. याचमुलें तो मजकूर कांहींच कलला नाहीं. **परांडे** सरकारची मामलत आद्याच तशीच आहे. येकदोन लढे त्यांचे आहेत. ते उलगडले तर आम्ही करूं. दोचौ रोजांनीं काये तो निश्चय करूं. मामला केला तर यैवजाची चिठी आपणांस लिहून. चिटी पाठवावी. बहुत काये लिहिणें. कृपा असो दीजे. हे विनंति.

---

१ कठिण; २ निजामाची; ३ जनानखाना.

Madhavrao Shivdeo writes to Vishwanathbhat that it is hard to please Peshwa. The Nizam is troubling him. Pant Sachiv is at Bhor. There is nothing more to communicate but Yamajipant. Mutalik, Anandrao Chitnis of the queen's department are not seen, and there is no definite decision about granting the Mamlat. He informs Vishwanathbhat that if the Mamlat is secured, he will have to pay him money. The matters stated in this letter are unintelligible but important.

---

पत्रांक ९ ] श्री

भाद्रपद शुध ३।१६७३
आगष्ट १३,१७५१

चिरंजीव राजश्री **बालंभट वैद्य** यांसि **केसो बहिरव वैद्य** आसिर्वाद उपरी येथील कुशल ता॥ भाद्रपद सुध त्रितीयापावेतों येथास्थित आसे विशेष. चिरंजीव राजश्री

**बापूभट वैद्य** यास दोन हजार रुये आम्हांकडून व येक हजार रा **धोंडोपंत जोगळेकर** यांजकडून यैसे तीन हजार तुम्ही आपले यैवजपैकीं देविले, त्यास **धोंडोपंत** लष्करास गेला. त्याजकरितां आम्हीं आपल्याकडून तीन हजार रुपये तुमचे ऐवजपैकीं दिल्हे, कललें पाहिजे. आमचें खत व जो यैवज आम्हांकडे जाहला असेल तें लिहून पाठवणें. बहुत काये लिहिणें हे आसिर्वाद. **धोंडोपंताची** चिटी ठेविली आहे. त्यांणीं हजार रुये दिले तर घेतों. हे आसिर्वाद.

Keso Bahirav Vaidya, elder relative of Balambhat, informs him that he paid Rs. 3,000 to Bapubhat Vaidya (of Tandulwadikar branch). Dhondopant Jogalekar had gone to Laskar and hence Kesopant paid for him Rs. 1000 in addition.

---

पत्रांक १० ] श्री ५ सवाल

भाद्रपद शु॥ ६।१६७३

आगष्ट १६,१७५१

चिरंजीव राजश्री **बाळंभट** व **विश्वनाथभट** वैद्य यांसि

**केसो बहिरव वैद्य** कृतानेक आशीरवाद उपरी येथील कुशल ता॥ छ ५ सवालपावेतों मुकाम **पुणें**, समस्त सुखरूप असो विशेष. राजश्री **रामाजी मल्हार** यांजकडे तुमचा यैवज आहे. त्यास त्याजकडील रा॥ **बाळाजीपंत बापट** यास पुसिलें. त्यांणीं जबाब दिला कीं, जर मुदल घेतील तर निकाल करून देऊं, जर व्याज हिशेबासुद्धां घ्यावयाचें अशिलें तर **आपाजीपंतांनीं चवाणास** रुपये दिले आहेत, ते देतील. साउकारींत त्यांणीं लोकांचें फारच कर्ज करून **चवाणास** पैका दिल्हा आहे. याजकरितां जैसा पैका उगवेल तैसा घ्यावा, हें आमच्या विचारास आलें आहे. रा॥ **बाळाजीपंतास** आम्ही सांघीतलें त्याजवरून येणेंप्रों करार जाहला आहे. जर याजप्रमाणें विल्हेस लावावें, यैसें आसीलें तर खत पाठवून देणें. जें व्याजांत साधेल तें साधूं. निम रुपयाप्रों व्याज आहे. त्यापैकीं जें साधतां साधेल तें करून, जाब लवकर पाठवणें. बहुत काये लिहिणें. रा॥ धोंडोपंत जोगळेकर यांणीं सांगितलें आहे, ज्यास यैवज देवाल त्यास देऊं. हें काम दिरंगावर टाकायचें नाहीं. बहुत काय लिहिणें. हे आशिर्वाद.

Keso Bahirav informs Vaidya brothers that it is learnt from Balajipant Bapat that Ramaji Malhar Barve is willing to pay their debt, if the interest on the sum is forgone and if interest is required, the money with interest can be recovered from Chavan to whom Apajipant Barve has advanced money as a creditor. Kesopant asks them to send the conveyance deed early if the proposal is accepted. Dhondopant Joglekar is going to return money which is due from him. to anybody according to his direction.

---

पत्रांक ११ ] श्री छ ८ सवाल

भाद्रपद शुध ९।१६७३

आगष्ट १९,१७५१

यावर रघूजीचा शिक्का
व मोर्तब आहेत.

राजश्री **बाळंभट व राजश्री विश्वनाथभट वैद्य** गोसावी यांसि.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो **रघोजी भोसले** सेनासाहेब सुभा दंडवत विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष तीर्थस्वरूप राजश्री **राणोजीबावा** यांची रवानगी सत्वर करून आम्हांकडे लौकर येत तें करावें, म्हणोन पेशजी तुम्हांस सांगितलें असोन अद्याप त्यांचें येणें होत नाहीं. यैसीयास येविसी तुम्हांस दोनच्यार वेळां लिहिलें असोन तुम्हीं त्यांचे रवानगीचा विचार केला नाहीं. तरी याउपरी हें पत्र पावतेक्षणीं राजश्री **स्वामीचा** निरोप देवऊन सत्वर आम्हांकडे रवाना करणें, येविसी विलंब सहसा लागों न द्यावा. राजश्री **सिदोजी गुजर** यासी ही सत्वर रवाना करावें. रा छ ८ सवाल बहुत काये लिहिणें हे विनंति.

सिका

मोर्तब
सुद

Raghuji Bhosle writes to Vaidya brothers to send as early as possible Ronoji Bhosle his uncle and also Sidhoji Gujar. Raghuji left Poona in September 1750 with Peshwa's

permission. Sidhoji's son, Vyanktesh was married with Raghuji's daughter and Mudhoji's daughter Thakabai was married with Navaloji Gujar. Such were the family relations of Bhosle and Gujar families. Ranoji and Sidhoji were both at Satara with Ramraje and they were called back by Raghuji.

---

पत्रांक १२ ] श्रीमहाबलेश्वर प्रसन्न भाद्रपद वद्य १२।१६७३
सपटंबर ५,१७५१

श्रीमत्सकलगुणपरिपूर्ण गोब्राह्मणप्रतिपालक राजश्री **बाळंभटदादा** व तथा. राजश्री **विश्वनाथभटबावा** याप्रती

स्नेहपूर्वक **बापूभट्ट दीक्षित** कृतानेक नमस्कार. उपरी आपले कृपेंकरून भाद्रपद वद्य १२ पर्यंत क्षेत्रीं सुखरूप असे विशेष. यंदां दरबारीचें वर्तमान येक प्रकार जाहलें आहे. ऐशायासी ब्रम्हस्वानें तो बहुत श्रम पावलों आहों. त्यें सर्व वर्तमान विदित आहे. सर्व भरोसा आपला आहे. याउपरी जो यत्न कलेल तो करून येक वेळ ऋणमुक्त केलियानें स्नानसंध्या करून क्षेत्रीं **श्री**सान्निध्य अभिष्ट चिंतून सुखरूप राहों ऐसें करणार आपण समर्थ आहेत. आपल्यावांचून दुसरा आम्हांस सांप्रत आश्रय कोणाचाही नाहीं. सर्व भरोसा आपला आहे. क्षेत्रीं कुटुंब आपलेंच आहे, ऐसें चित्तांत आणून चालवीत गेलें पाहिजे. कृपा वर्धमान असो दीजे. हे नमस्कार.

The writer, Bapubhat Dixit of Mahabaleshwar requests Vaidya brothers to make him free from debt; so as to pass days in this holy place wishing them happiness in future.

---

पत्रांक १३ ] श्री भाद्रपद वद्य १३।१६७३
सपटंबर ६,१७५१

चिरंजीव विजयी भव राजमान्य राजश्री **बाळंभट** व **विश्वनाथभट** वैद्य यासि **केसो बहिरव वैद्य** अनेक आसिर्वाद उपरी. येथील कुशल ता। भाद्रपद वद्य त्रयोदशी-पावेतों मु॥ **पुणें** सुखरूप आसो विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. पावोन बहुत समाधान जाहलें, येसें निरंतर पत्र पाठवीत असावें. यानंतर चिरंजीव राजश्री **केसो**

**माहादेव कानडे** हे धंद्यानिमित्य तुम्हांकडे आले आहेत, तर तुमच्या विचारें येकाधी कमावीस चांगली असली तर मनास आणून यांसी सांगीतली पाहिजे. रसद पडेल ती हे तरतूद करतील. बहूत काये लिहिणें. हे आसिर्वाद.

सौभाग्यवती वज्रचुडेमंडित **सरस्वती** व **उमा** यांसी आसिर्वाद. मातुश्री **सकुबाईवहिनीस** नमस्कार.

चिरंजीव राजश्री **बापूभटास** व **गोविंदपंतास** आसिर्वाद. आपलें वर्तमान हमेश्या लिहित असावें. बहुत काये लिहिणें. हे आसिर्वाद.

Keso Bahirav requests Vaidya brothers to secure some suitable Kamavisi for Keso Mahadeo Kanade. He was prepared to pay Rasad for it. Kesopant being elder gives good blessings to Bhaskarbhat's wife and also good wishes to the wives of the Vaidya brothers.

---

पत्रांक १४ ] श्री प्रजापति आश्विन शु. १।१६७३
सपटंबर ९,१७५१

राजश्री **गोपाळपंत लघाटे** व राजश्री **हरबाजी नाईक जोशी** स्वामी गोसावी यासि

सेवक **केसो कृष्ण** नमस्कार विनंति. राजश्री **विश्वनाथभट वैद्य** यांसी रु. ५००० पांच हजार ता। **अप्पाजी रघुनाथ** दि॥ रा॥ **विठलराव सिवदेव** देणें, आमचे-यैवजीं बोलीपैकीं देणें. मिती आश्विन सुध १ हे विनंति. शके १६७३ प्रजापति संवत्सरे.

Keso Krishna Shembekar asked Gopalpant Laghate and Harbaji Naik Joshi to pay Rs. 5 thousands to Vishwanathbhat Vaidya through Appaji Raghunath, the agent of Vithalrao Shiwadeo as promised. Peshwa had granted to Laghate in Inam the village Loni Turf Chambhargonde in Chaitra, Shak 1673, March 1751.

---

पत्रांक १५ ] श्री कार्तिक वद्य ५।१६७३
आक्टोबर २१,१७५१

श्रीमंत राजेश्री **बाळंभटबावा** तथा राजश्री **विस्वनाथबावा** स्वामीचे सेवेसी.

सेवक **राघो बल्लाळ भोगले** मु॥ **रामक्षेत्र** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील क्षेम कार्तिक वद्य पंचेमी जाणोन स्वकुशल लेखन आज्ञा केली पाहिजे, विसेष

स्वामीपासोन राजश्री **नारोपंत** याहास पत्र आलें त्यावरून वर्तमान कलों आलें. बहुत समाधान जाहलें. यैसेंच पत्रीं सांभाल केला पाहिजे. दुसरें, येथील वर्तमान राजेश्री **नारोपंत** आले आहेत ते सोस निविदन करतां कलों येईल. देसपांडेपनाचा धंदा तो गुदस्ता मार्गेसीर मासीं **चंद्रपूरचे** मुकामींच जतच केला; व फडनिविसीचें वेतन बलाये कारकून २ सुधा पांचसे रुपये केले हें वर्तमान स्वामींचे सो पेसजीच लिहिलें आहे. त्यावरून सो कलों आलें असेल. आतां येथ दो वर्षांचा कागदपत्रांचा गुंता राहिला आहे म्हणोन या अटकेकरितां राहनें जालें. त्यास फागचैत्रपावेतों कागदपत्रांचा गुंता वारून जेस्ट मासीं स्वामीचे दर्शनास येतों. देसपांडेपनाचा कागदपत्र आहे तोही येतां समयीं समागमें घेऊन येऊन. **श्रीमंता** . कडून येकदोन पत्र आपनांस बलावयाचीं आलीं होतीं आनि स्वामीजीनेंही राश्री **नारोपंतास** लिहिलें होतें कीं, त्या प्रांतास आपन येतों, हें वर्तमान आयेकून बहुत संतोश जाहला जे. आपले चरन या प्रांतास येतात म्हणोन चितास बहुत हरश जाहला जे, सर्व मनोदये सिधीस पावतील. त्यांस स्वामीचें येन न जाहलें यामुलें येथ दोन दिवस प्रसंग घेऊन येथ असो.+ राजश्री **वासुदेवजीची** वरात दोनशा रुपयांची स्वामींनीं पाठविली, त्यास पनास रुपये पावले. बाकी देणें तो आमल निघोन गेला. कोणावरी कर्जवाम येणें तेंही उगवत नाहीं. जोरा असिला तरी वसूल येईल; नाहीं तरी पैसा उगवत नाहीं. स्वामीस कलावें, म्हणून लिहिलें असे. वरकड वर्तमान राजश्री **नारोपंत** सांगतां कलों येईल. बहुत काये लिहिणें. कृपालोभ असो दीजे, हे विज्ञापना.

श्रीमंत राजश्री **विस्वनाथभटजी** स्वामीचे सोस. सेवक आज्ञाधारक **बाबू गोपिनाथ** चरनावरी मस्तक **साष्टांग नमस्कार. पत्रावरून** वर्तमान कलों येईल, हे विज्ञास.

---

+ पुढील अक्षर भोगले यांचें.

Ragho Ballal Bhogle writes to Vaidya brothers that Naro Anant Gadre on arrival, stated their well-being. His service of Deshpandepan of Chandrapur came to an end. The remuneration of Phadanvisi was reduced to Rs. 500. Bhogle was prepared to go Satara in Jeshtha after submitting accounts of 2 years. Raghuji wanted Vishwanathbhat in Berar but he did not go.

पत्रांक १६ ] श्री पौष शुध. ६।१६७३
डिसेंबर १२,१७५१

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **बाळंभट वैद्य** व तथा राजश्री **विस्वनाथभट वैद्य** स्वामी गोसावी यासि.

पो **कृष्णाजी त्र्यंबक** नमस्कार विनंति उपरी येथील कुशल पौश सुध सष्टीपर्यंत मुा **राजगड** जाणऊन स्वकीये कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहीलें वर्तमान सर्व कललें. आपण नागलीचा मजकूर लिहिला, तरी जेथें सांगाल तेथें नागली देऊं. घर बांधावयाचा मजकूर लिहिला कीं, **मोहरीस** घर बांधावें लागतें, साहित्य वेठे देवणें. त्यास इकडे मनुश्य येतात, घर बांधावें हा सिधांत जालाच आसिला, तरी आपल्याकडील कोण **मोहरीस** घर बांधावयास येईल ? भिंती सिध करणें लागेल तेव्हां काय साहित्य घेणें तें घेऊं. कललें पाहिजे. राजश्री **रामचंद्रपंत** यांजबराबर माणसें देविलीं तरी त्यांचें लिहिलें आम्हांकडे आलें म्हणजे देऊं. दाहा हजार रुो पाठविले, त्याचें खत पाठवणें म्हणोन लिहिलें. तरी येविसी **येजमानास** सांगोन खतें धावींसें राजश्री **सदासिवपंतास** लिहिलें आहे. खत देतील. न देतच तेव्हां दुसरें पत्र लिहिलें पाहिजे. तदनंतर उतर लेहून पाठऊन. यानंतर आपण लिहिलें कीं, राजश्री **रामचंद्रपंता**कडे **पुणियांत** पैका जमा जालियावर तुम्हांस पाहिजेसा आसेल तो लेहून पाठवणें, पाठऊन देतील म्हणोन लिहिलें, तरी आम्ही परभारें त्यांजकडे काय म्हणोन मागावें! अपलें पत्र असावें इकडे **गडकिलाची** समजावीस, यैवज पाहिजे. गवगव पडिला आहे. **भोरपकर** आले आहेत. यैवज पाहिजे याजकरितां हें पत्र लिहिलें आहे व रा **नारायेणजी कोकाटे** पाठविले आहेत, तरी रुो पंधरा हजार पाहिजेत. उतर पाठवणें. माणसें पाठऊन देऊन पैका आणऊन. पहिलें पत्रें **पुणिया**कडे दिल्हीं. त्या हुंडिया फिरल्या. तैसा विचार न करितां **प्रमाण हुंडी** रा **रामचंद्रापंता**कडे देविली पाहिजे. अगर तेथूनच देणें आसिलें तर तैसेंच ल्याहावें. मनुष्यें पाठऊन. यैवज आणऊन पंधरा हजार रुो अगत्यरूप पाहिजेत, पाठऊन द्यावें. निशा जाल्या न जाल्या हा सर्व मजकूर लिहिला नाहीं तर कोणकोणाच्या निशा जाल्या व कोणत्या न जाल्या हें सर्व लिहिणें. + बहुत काये लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंति.

---

+ पुढील मजकूर लेखकाच्या हातचा.

Krishnaji Tryambak Lohokare, an officer of Rajgad Fort wrote this letter to Vaidya brothers. He informs them that if a house is to be built at Mahuri Rs. 15000 will be necessary. He was ready to help Ramchandrapant Karkare if he be sent for this erection. He was going to write the result of his

correspondence with Sadashiv Raghunath Ghanekar about 10 thousands. To arrive at a compromise for the possession of forts Rs. 15000 will have to be paid to Bhorapkars.

---

पत्रांक १७ ] श्री पौष व. ७।१७७३
डिसेंबर २७,१७५१

राजश्री **बालंभट** व तथा **विस्वनाथभट वैद्य** गोसावि यासि

दा अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्री **हैबतराव पिसाळ पाटील** कसबे **बावधण** दंडवत विनंति. येथील कुशल जाणऊन स्वकीये कुशल लिहित गेलें पाहिजे. विशेष. दया करून पत्र पाठविलें. पावोन परम समाधान जाहलें. यैसेंच सदैव पत्रद्वारें सांभाल करीत असावें. यानंतर पत्रीं सनदेच्या शेताचा मजकूर लिहिला त्यास आपण गांवीं नव्हतों. रा **रघोजीबावा**समागमें गेलों होतों. त्यास **पेशवे सातारियास** आले, त्यासमागमें आलों. आपलें पत्र आलियाउपरी **सोनजीपा** यास बोलाऊन मजकूर पुसिला. त्यास त्यांनीं वर्तमान सांगितलें कीं, **पेशव्याचे** फौजेचें आणि **गायकवाड** यांचें झुंज जालें आणि **गायकवाड** यास वेढा घातला. ते समईं तमाम कहीनें मुलुकांत धामधूम मांडिली. ते समईं आपण जाऊन श्रीमंत रा **नाना पुरंदरे** यांसि जाऊन भेटलों, आणि कौल मागितला. कौल घेऊन रखवालीस राऊत मागितले. त्यांनीं जाब दिल्हा कीं, तुमचा गांव खाजगीचा आहे. त्यास येथें रा **येसवंतराव** येथें नाहींत; परंतु **महाराजस्वामींची** पागा आहे. पागेचे रखवाली नेणें. त्यावरून पागेचे पंचवीस स्वार आणिले. त्यास दाणा-वैरण पाहिजे. सनदें( त ) जितकें होतें तितकियाचो वैरणदाणा जो जाला तो त्यांनीं चारिला आणि आम्हांपासीं नगद हजार रुपये दो महिनिया चारायला घेतला. येणेंप्रों हकीकत सांगितली. तरी हें साल दंगियाचें याजमुलें यैसी गत जाली. पुढें तुमची सेतें आजीपरियेंत पडिलीं. तुमचे सरीक न करऊन मग आम्ही नगदी कौल देऊन लावणी मात्र केली आहे. जैसें आपलीया विचारें करणें असतील तैसीं लाविलीं पाहिजेत. आम्ही आपले पदरींचे आहों. कळलें पाहिजे. कृपा लोभ असूं दीजे हे विनंति.

Haibatrao Pisal Patil of Baodhan gives in detail to Vaidya brothers the circumstances that led to the destruction of the crops in their Inam lands at Baodhan when they were at Satara and he was with Peshwa fighting against Gaikawad and suffered a great loss. However he was prepared to give a Kabulayat to them for cultivating their lands.

---

पत्रांक १८]　　　　श्री　　　　नक्‍कल　छ. १९ सफर
पौष वद्य ७। श. १६७३
डिसेंबर २७,१७५१

श्रीमंत माहाराज मातुश्री **आईसाहेब** यांणीं मोकदमानी को **बावधन** सा हवेली प्रां **वाई** सुा इसने खमसैन मया व आलफ कसबेमारी राजश्री **बालंभट वैद्य** यांजकडे इनाम जमीन बिघे तीस आहेत, पेसजीपासूनच चालत आहेत त्याप्रों हालीं करार करून जमीन सदरहू दिल्ही असे. तरी मारनिलेकडे जमिनीचा गला सुरलीत देणें व साल गुदस्त सेतचा गला राहिला असेल तो देणें. सुदामत चालत आलें असेल त्याप्रों चालों देणें. जाणीजे. छ १९ माहे सफर लेखनावधि.

This is an order of queen Tarabai after the ascendency of Ramraje to the throne; to the Mokadam of Baodhan that 30 bighas of land in the village are being enjoyed by Balambhat Vaidya as Inam for many years. The previous Inam Sanad was confirmed by the queen Tarabai, as Ramraje was not doing any bussiness of the office.

---

पत्रांक १९ ]　　　　श्री　　　　छ. २६ सफर
पौष वद्य १३।१६७३
जानेवारी ३,१७५२

राजश्री **विस्वनाथभट वैद्य** गो यासि.

श्रो **बभुतगीर गोसावी** आसिर्वादन उपरी. तुम्हांकडून आमचा यैवज येणें. त्याजपैकीं रा **खंडोजी जाधवराऊ** यांसि रु २०० दोनसे, यांजकडील **कुसाजी जामदार** येईल, त्याजपासी चिटी पावतांच देणें. मिती पौश वध्ये १३ रुपये तुा ना देणें.

छ. २६ सफर.

Babhutgir Gosavi asks Vishwanathbhat to pay Rs. 200 to Khandoji Jadhavrao who will send his Jamdar Kusaji to receive the same.

पत्रांक २० ] श्री फाल्गुन शुद्ध १३।१६७३
फेब्रुआरी १६, १७५२

श्रीमंत राजश्री **बालंभट** व ताा राजश्री **विस्वनाथभट वैद्य** स्वामीचे सेवेसी.

सेवक **नारो अनंत गद्रे** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ताा फाल्गुन सुध त्रयोदसी मुक्काम **पातूर** जाणून स्वकिये लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. स्वामीकडील कागदपत्र बहुत दिवस येऊन सांभाल होत नाहीं. याजकरितां चित उदास आहे. तर यैसें नसावें. विषश या प्रांतीचें वर्तमान तर कर्यात **भुगांव** आपणांकडे होतें. त्यास प्रस्तुत श्रीमंतांनीं तुम्हांकडून दूर करून खालसा ठेविले आणि सालाचा वसूल फिरोन माघारा घ्यावा म्हणून राा **जान महमद** यासि श्रीमंतांनी लिहिलें आहे. त्यास आम्ही **पातुराहुन** आज स्वार होऊन **भुगांवास** जातों. तेथें गेलियावरी जो अर्थ असेल तो लिहोन पाठऊन कर्यात **भुगांव** वगैरा गांवखेडीं तमान गेलीं. याउपरी आम्हांस आज्ञा कराल त्याप्रमाणें वर्तणूक करून. राा **कासिनाथ भास्कर** याजकडील वर्तमान राा **नरसीपंत** सांगतील त्यावरून कलों येईल. बहुत काये लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंतिपर.

राजश्री **रामचंद्रपंत स्वामींस** साष्टांग नमस्कर. विनंति उपरी. इकडील वर्तमान राजश्री **वैद्यबावास** लिहिलें आहे, त्यावरून कलों येईल. पत्राचें उत्तर आलें म्हणजे आम्ही स्वार होऊन येऊन. बहुत काये लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंतीपर.

चिरंजीव राजश्री **लक्ष्मणपंतास** आसीर्वाद. उपरी आपणांकडील वर्तमान वरचेवरी लिहीत जाणें. बहुत काये लिहिणें हे आसीर्वाद.

Naro Anant Gadre writes from Patur to Vaidya brothers that Raghuji removed your ownership over the Karyat Bhugao and merged it into his villages. He also ordered Jan Mahamad to recover the revenue collected by Vaidyas of the attached villages. Naropant went to Bhugao to see if the order of Raghuji is being cxecuted.

---

पत्रांक २१ ] श्री फाल्गुन वद्य ३।१६७३
फेब्रुआरी २१, १७५२

वेदशास्त्रसंपन्न राजश्री **विश्वनाथभट वैद्य** स्वामी गोसावी यासि.

पोा **विनायक दिक्षित** ××× कृतानेक साां नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असावें. विशेष पत्र पाठविलें तें

पावोन वर्तमान विदित जाहालें. **श्रीमंतांनीं** वरात पूर्वी आपल्यावर दिली आहे म्हणून लिहिलें, त्यास ज्या मामलतीवर वरात त्याचा विचार आपणांस विदीतच आहे. संपूर्ण प्रांत दोनी सैन्यांमुळें हैराण. रसद दिली त्यासच जागा नाहीं. बहूत काये लिहिणें हे विनंति. फाल्गुन वद्य ३ प्रजापति संवछरे.

This letter is written by Vinayak Dixit to Vishwanath-bhat about the money which the Peshwa sent by a hundi and informing him of the poor condition of the country whose Mamlat he was offered for enjoyment.

---

पत्रांक २२ ] श्री फाल्गुन वद्य ६।१६७३
फेब्रुआरी २४, १७५२

वेदमूर्ति रा॥ **बाळंभट व विश्वनाथभट वैद्य** स्वामीचे सो॥.

श्री॥ **सबाजी कदम** सा॥ दंडवत विनंति उपरी. तुम्हांकडून रा॥ **बनसिपुरी महंत** यांनीं रु. देविले १०००, पैकीं बटा १० जातां बाकी रा॥ ९९० नऊसे नवद भरु( न ) पावलों. बी॥ **गोपाळ आनंदराऊ** छ. मिति फालगून वध्ये ६ सोमवार. हे विनंति.

Sabaji Kadam gives a receipt of Rs. 1000 to Vaidya brothets for having obtained the sum on behalf of Bansipuri Gosavi from them.

---

# अंगिरानाम संवत्सर शके १६७४

## इ. सन १७५२।५३

पत्रांक १ ] श्री सल्लास खमसैन
अंगिरा शके १६७४
सन १७५२

श्रियासह चिरंजीव विजई भव राजश्री **साबाजी भोसले** यांसी प्रति **रघोजी भोसले** सेनासाहेबसुभा आसिरवाद उपरी. वेदमूर्ति राजश्री **बाळंभट बिन नारायणभट गाडगीळ** दिा राजश्री **विसाजी रघुनाथ वकील** यांसी मौजे **डुमरी चिखल्या** मामले **रामटेक** प्रां **देवगड** यासी मौजे मजकूर [1]मुदामतपासून आहे. तरी मौजे मजकुरास ताकीद करून मोकासा, माल, सायर, जकात, कुलबाब, कुलकानू वसूल. वेदमूर्तीकडे वसूल देवणें. सुा सलास खमसैन मया अलफ जाणिजे.

---

१ पूर्वीपासून.

Raghuji Bhosle informs Sabaji Bhosle, his son, that the village, Dumari Chikhalya in Ramtek District, has been granted to Vishwanathbhat Vaidya, long ago. His present agent (दिमत) Balambhat bin Narayanbhat Gadgil should therefore get the same revenue from the village, as before, e. g. the Mokasa, Mal, Sayar, Jakat, Kulbab and Kulkanu revenue. In 1749 Sadashivbhat Chipalunkar and Parshuramabhat Bhabhe were Vaidyas' agents (दिमत). (वै. द., खंड ४, पत्रांक ४० पहा.)

---

पत्रांक २ ] श्री अंगिरा छ. १७ जाखर
वैशाख वद्य ४।१६७४
एप्रिल २१,१७५२

राजश्री **सिदोजी इंगले** हवालदार व कारकून किले **राजगड** गोसावी यांसि.

ाद अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो **कृष्णाजी त्र्यंबक** असिर्वाद व नमस्कार. सुमा इसने खमसैन मया अलफ मौजे **महुरी** सुा ता **गुंजण**

**मावळ** येथील पाटील व कुळें परागंदा जालीं आहेत, म्हणून विदित जालें, **त्यावरून** हें पत्र सादर केलें असे; तरी मौजे मारच्या पाटिलाचा व कुळांचा दिलासा करून गांवची लावणी करवणें. राजश्री **बाळंभट** व **विश्वनाथभट वैद्य** यांजकडील कारकून **रामचंद्रपंत** अणविले आहेत, ते अलियावरी तुम्हांस लेहून तुमचाही कारकून आणून सालमजकूरच्या वसूल कोणाकडे काय जाला आहे, ये गोष्टीची चौकशी करून ज्याकडे यैवज जाजती गेला असेल, त्याकडून अणऊन तहरहप्रमाणें जिकडील तिकडे देविला जाईल. तर तुम्हीं मौजे मारची लावणी करणें व मौजे **जांबली** ताा मार हा गांव वैद्याकडे आहे, तर त्यास वावगा उपसर्ग न करणें. **मोहरी** बुाा येथें गांवकरी यांसि कौलकरार देऊन लावणी जलदीनें करणें. पुढें लावणी होणार नाहीं. हिशेब करणें तें आठा-चौ दिवसां होईल. तूर्त लावणी करणें. दिसगत न लावणें. **जांबलीस** वेठबेगारीचा उपसर्ग न लावणें. छ. १७ जाखर बहुत काये लिहिणें. लोभ असो दीजे. हे आसीर्वाद.

Krishnaji Tryambak Lohokare informed Sidoji Ingale, Hawaldar and clerk of Fort Rajagad, that he should, in consultation of Ramchandrapant Karkare, the Diwanji of Vaidyas, settle the estimate of the revenue of their Inam villages Mahuri Budruk and Jambali, in the presence of the villagers and see that the cultivators begin to cultivate their lands soon.

---

पत्रांक ३ ] श्री+शंकर ज्येष्ठ वद्य २।१६७४

मे १९,१७५२

तीर्थस्वरूप राजश्री **बाळंभटबावा** वडिलांचे सेवेसी.

अपत्ये **विस्वनाथभट वैद्य** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. ताा जेस्ट वद्य द्वितीयापावेतों सुखरूप असो विशेष. आपणांकडील पत्र **महादाजीपंताच्या** पुत्राबा आलें, त्यावरून वर्तमान कळों आलें. घरीं व दरबारीं बहुत सा(व)धपणें असावें. लोकां(क)डील यैवज वसूल करणें म्हणऊन पेशजी लिहिलें होतें, त्यास यैवज काये जमा केला असेल तो लेहून पाठवावा. बाकी राहिल्या यैवजाचा तगादा करून यैवज जमा करून ठेवणें. यास गुंता न करणें. येथें मामलत करावयाची आहे, त्यास यैवज देवावा लागेल, तरी आधीं यैवज वसूल करून ठेवणें. सरकारचें काम तूर्त होत नाहीं. राजश्री **रघोजीबावा** म्हणत आहेत कीं, राजश्री **पंतप्रधान** यांचें व **मातुश्रीचें**

सौरस्य होऊन आम्हांस पत्र आलें म्हणिजे यैवज पावता होईल. येणेंप्रों वर्तमान आहे. **सदू मान्या** व **जखापा कोबडा** यांस पाठविलें पाहिजे व +राजेश्री **नारो अनंत गद्रे** कोकणांतून आले असिले तर पाठविणें. तुम्ही **पुणेयासीं** गेलों म्हणून लिहिलेंत त्यास काय मजकूर केलात तो लिहिणें. घरीं बहुत सावधपणें राहाणें. आम्हांविसी कांहीं चिंता न करणें. अमसोल धडाभर पाठवणें. बहुत काये लिहिणें हे विनंती. चिरंजीव मुलांस आशीर्वाद. लिहीत जाणें हे आशीर्वाद. राजेश्री **रामचंद्रपंत** व **लक्ष्मण** यांस आसीर्वाद. बहुत सावधपण वर्तणूक करणें. सविस्तर वर्तमान लिहिणें. हे विनंती.

---

+ पुढील अक्षर लेखकाचें स्वतःचें.

Vishwanathbhat Vaidya asks Balambhat to recover money from the debtors. It was required to secure some Mamlat. Raghuji was not ready to pay off Vaidya's money, unless it was seen that Queen Tarabai and Pant Pradhan Nanasaheb have joined hands. At this time, writer wanted Naropant Gadre and Sidu Mane and Jakhappa Kobada in Berar. Gadre was to return from Konkan.

---

पत्रांक ४ ] श्री ज्येष्ठ वा। ३।१६७४

मे २०,१७५२

कर्जरोखा सके १६७४ अंगिरानाम संवछरे जेष्ठ वद्य ३ ते दिवसीं खत लिखिते धनकोनाम राजश्री **सिवभट साठे** यांसी रिणकोनाम **तुळाजी नाईक भोई भोकरे** सन ११६१ कारणें रोखा लेहून दिल्हा यैसाजे, तुम्हांपासून घेतलें कर्ज मु॥ रु॥ ५० पनास, यासी व्याज दरमाहा दरसदे रुपये २ दोनप्रों देत जाऊं. यांसि वायेदा पंधरा दिवसां देऊं. वायेद्यास न देऊं तर दरमाहा दरसदे रु॥ ४ प्रों देऊं. हा रोखा सही बीा **दगडो त्र्यंबक.**

नि॥ दांडी

This is a conveyance deed given by a palanquin carrier, Tulaji Naik Bhoi Bhokare, Shivbhat Sathe for Rs. 50, rate of interest being Rs. 2. Bhokare's signature is according to his profession Dandi ( दांडी ) of palanquin. Shivbhat dealt with small sums also.

---

पत्रांक ५ ]　　　　श्री+शंकर　　　　अधिक आषाढ शुध ८।१६७४
　　　　　　　　　　　　　　　　　　　जून ८,१७५२

तीर्थस्वरूप राजश्री **बालंभटबावा वैद्य** वडिलांचे सेवेसी.

अपत्ये **विस्वनाथभट वैद्य** कृतानेक सास्टांग नमस्कार. विनंति ता। अधिक आषाढ शुध ८ **मु॥ नागपूर** सुखरूप असों विशेष. वडिलांकडील पत्र येऊन वर्तमान कलों येत नाहीं, तरी सविस्तर लेहून पाठविलें पाहिजे. राजश्री **नारोपंत गद्रे** व **लक्षुमण** व **जखापा कोबडा** व **गोविंदसेट वाइकोल** व **सदू मान्या** यैसे पाठऊन देणें. संगत उतमसी पाहून हती पाठविला पाहिजे. दरबारचें वर्तमान सविस्तर लेहून पाठवावें. घराचें काम कितेक जालें हें लेहून पाठविलें पाहिजे. दर (बारीं) व घरीं बहुत सावधपणें असावें. लोकांकडील येणें तो वसूल निकडीनें करावा, म्हणऊन पेशजी येकदोन वेला लेहून पाठविलें होतें, त्यास यैवज वसूल काये जाला हें लेहून पाठविलें पाहिजे. राजश्री **पंत सचिव** यांजकडील हिसेब जाला किंवा नाहीं ? केला नसिला तरी अधीं हिशेब आगत्यरूप करून घेतला पाहिजे. बहुत सावधपणें वर्तणूक करणें. आम्ही श्रावण मासीं येऊं. कांहीं चिंता न करणें. रा॥ **नारोपंत** व **जखापा** यांजबरोबर हथी (हत्ती) पाठवणें.+ हे विनंति. राजश्री **रामचंद्रपंतास** नमस्कार. लि॥ परिसिजे, इकडे लोकांकडे यैवज येणें, त्याचे हिसेब खतें पाठवणें लोकांकडील यैवज वसूल बहूत जलदीनें करणें, घरीं बहूत सावधपणें वर्तणूक करणें. हे विनंति.

आपत्ये **नारो सिवदेव** सां। नमस्कार.

सेवेसी **विठ्ठल जिवाजी** सां। नमस्कार. घरचें वर्तमान समाचार घेत आसावें, हे विज्ञापना.

---

+ पुढील मजकूर लेखकाच्या हातचा आहे.

Vishwanathbhat writes from Nagpur to Balambhat to send early Naropant Gadre, Jakhappa, Govindset Vaikol, Sadu Manya and also the elephant. He was to leave Berar in Shrawan.

पत्रांक ६ ] श्री छ. १४ साबान
अधिक आषाढ वद्य १।१६७४
जून १६, १७५२

० श्री आईआदी
पुरुष श्रीराजाराम
छत्रपती स्वामी कृपा
नीधी तस्य जगजी
वन परशराम
प्रतिनिधि

आज्ञापत्र राजश्री **पंतप्रतिनिधि** ता मोकदमानी मौजे **चोर** ता **उंबरज** सुरु सलास खमसैन मया व अलफ, मौजे मजकुराकडे राजश्री **बालंभट वैद्य** यांचें कर्ज येणें, त्यास अद्यापि भाग वारिला नाहीं म्हणून, हुजूर विदित जाहलें. तरी हे गोष्ट कामाची नाहीं. हल्लीं देखत आज्ञापत्र मारनिलेचें कर्ज व्याजसुधां भाग वारून देणें. यांचा कर्जाचा फिरोन बोभाट येऊं न देणें. जाणिजे छ १४ शाबान निदेश समक्ष.

मोर्तब
लेखना व
धीरियम्

शिक्का व मोर्तब
अष्टकोनी दुरेघी

This is an order from Pant Pratinidhi to Mokadam of Chor Tarf Umaraj that the debt he owes to Balambhat Vaidya should be paid with interest without any more delay. The complaint reached the ears of Chhatrapati.

---

पत्रांक ७ ] श्री छ ७ रमजान
आषाढ शुद्ध ९।१६७४
जुलै ८,१७५२

यादी **नारोपंत जोग** यास दिल्हे रुा.

८००० छ. ६ शाबान हुंडी रुा **नारो बल्लाळ जोग** यासि रुा दिल्हे
राजश्री **बालंभटदादा**कडे **वाईंत** देविले, येथें घेतले.

१५८९ छ. ८ शाबानी दिल्हे रोख रुा.
१३८९ हवाले गडकरी **वेंकाजी नाईक** याजकडील.

२०० चिटी सराफी मिती अधिक शुा १०

---

१५८९

१४०० किता छ. शाचानी

९०० **अंताजीपंत जोग** याजकडील हवाला दिल्हा, रोख कर्जचा शा कर्जपैकीं

५०० रा **सदाशिव हरी** बाबत शा च्यारसे व **देशमुा** मा **श्यामजी फुलाजी** शा १०० येकून शा ५०० मा **श्यामजी फुलाजी**

---

१४००

५०० छ. ७ रोज रमजान रा **कृष्णाजी गोविंद** यांजकडील वकिलीचा यैवजची हुंडी रा **रामाजी नाईक काले** याजबा देविले मा **बाबुराव** शो

This is a list of sums and persons from whom money was paid to Naro Ballal Jog. The transaction is worth considering. The persons mentioned are well known and had money dealings with Vaidyas.

---

पत्रांक ८ ] श्री आषाढ वद्य ११ मंदवार १६७४
जुलै २५, १७५२

वेदमूर्ति राजश्री **विश्वनाथभट्ट वैद्य** स्वामींचे सेवेसी.

विद्यार्थी **विठोबा नाईक** व **धोंडोबा नाईक रास्ते** कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत जाणें विशेष. तुम्ही गेलिया ता दाहापांच पत्रें घरास आपल्या पाठविलीं, परंतु येकही पत्र न ( लि ) हिलेवरून आपूर्व वाटलें. तरी निरंतर पत्र पाठऊन साकल्यार्थ लेहून आनंदवीत गेलें पाहिजे. इकडील नवल विशेष तरी पूर्ववत्‌च आहे. अधिकोतर लिहिनेंसें नाहीं. चिरंजीव राजश्री **काशीराव** यास पत्र लिहिलें आहे तेंही प्रविष्ट करावें. घरचीं सर्व सुखरूप आहेत. तुम्ही येणार कधीं हें लिहिणें. नवल विशेष लिहीत जाणें व रा **दताजी सगे** यास पत्र लिहिलें आहे व राजश्री **भगवंतराव पिसाल** यास लिहिलें

आहे, तें पावतें करणें. रा मिती आषाढ वद्य येकादशी मंदवासर बहुत काये लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंती. म्हैस उत्तम चांगली येक दुसरी आपल्या + + बरावर पाठवणें. **शिवभट साठे** याकडे + + रुपयाचा तगादा करून पाठवीन. पत्र लिा आहे. हे विनंति.

Vithoba and Dhondoba Naik Raste write a letter to Vishwanathbhat for having sent letters to Kashirao Raste Dattaji Sage and Bhagwantrao Pisal for money. They also demanded money from Shivbhat Sathe.

---

पत्रांक ९ ] श्री+शंकर छ. २५ रमजान
आषाढ वद्य ११।१६७४
जुलै २६,१७५२

राजश्री **रघोजी भोसले** सेनासाहेबसुभा गोसावी यासि

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो **बाळंभट वैद्य** कृतानेक आसिर्वाद. विनंति येथील क्षेम जाणून स्वकिये कुशल लेखन करावयासि आज्ञा केली पाहिजे. यानंतर तुम्हांकडील वर्तमान बहुत दिवस कलत नाहीं, यैसें नसावें. सदैव पत्र पाठऊन संतोषवीत असिलें पाहिजे. यानंतर दरबारचें वर्तमान तरी, राजश्री **पंतप्रतिनिधि सातारियासि** आले आहेत व राजश्री **यमाजी सिवदेवही** आले आहेत व राजश्री **अंताजीपंत** व **पुराणिक** किले **परली** येथें होते, तेही **सातारा** आले आहेत. राजश्री **मल्हारजी होळकर** व **गारदीखान** यैसे दक्षणेचा सुभा१ करून **मालवेयांत** आले.आहेत, म्हणोन वर्तमान आहे, त्यावरून राजश्री **पंतप्रधान**-ही **थेउरावर** गेले आहेत. फौजही दहापंधरा हजार बरोबर आहे. मजल दरमजल पुढें जाणार. कळावें म्हणोन लिहिलें आसे. सरकारच्या ऐवजाविसीं मातुश्री **आई-साहेब** आम्हांस या विसीं तगादा फार केला आहे. त्यास सरकारचा यैवज कांहीं पाठवावा. वरकड सविस्तर वृत चिरंजीव राजश्री **विश्वनाथभट** यांचे पत्रीं लिहिलें आहे. त्यावरून विदित होईल. रा छ. २५ माहे रमजान. बहुत काये लिहिणें + हे विनंति.

---

+ पुढील मजकूर लेखकाच्या हातचा.

१ प्रांताधिकार.

The letter is written by Balambhat Vaidya to Raghuji Bhosle giving a few details of Maratha Politics from Satara during 1752 such as ( 1 ) Pratinidhi and Yamaji Shivdeo came to Satara. ( 2 ) Antajipant Mutalik and Puranik of Parali came to Satara. ( 3 ) Malharji Holkar and Gardikhan after finishing their invasion in South reached Malva and Pant Pradhan Nanasaheb with 10 or 15 thousand army was at Theur intending to go to Malva. ( 4 ) The Queen Tarabai wrote to Vishwanathbhat to recover money from Raghuji Bhosle.

---

पत्रांक १० ] श्री आषाढ वद्य ११।१६७४
जुलै २६,१७५२

वो राजश्री **सिवभट साठे** स्वामी गोसावी यांसी, सेवक **विठोबा नाईक व धोंडोबा नाईक रास्ते** नमस्कार विनंति उपर. तुम्हांकडे आमचें कर्ज येणें त्यास बहुत दिवस झाले, अद्याप रुपये पाठवीत नाहीं. तर रुपये व्याज सुधां पाठवून देणें. रुा [1] बेमवलग तुम्हांकडे झाले आहेत. पस्ट समजोन रुपये पाठवून देणें. मिती शके १६७४ आंगिरा सवछरे आषाढ वद्य ११ हे विनंति.

---

१ अपरिमित, असंख्य.

Vithoba and Dhondoba Naik Raste demand their money paid as debt, from Shivbhat Sathe. The amount due with interest had become a large sum.

---

पत्रांक ११ ] श्री छ. २७ रमजान
आषाढ वद्य १४।१६७४
जुलै २८,१७५२

श्रीमंत महाराज मातुश्री **आईसाहेब** यांणीं राजश्री **विसाजी रघुनाथ** यांसी आज्ञा केली ऐसाजे. तुम्हांस राजश्री **रघूजी भोसले** याजकडे रा केलें. त्यास तुम्ही

जाऊन तिकडेच बैसलां. याजवरून काये म्हणावें? हलीं आज्ञापत्र सादर केलें असे. तरी मारनिलेकडील१ पोख्ता यैवज घेऊन अविलम्बें हुजूर येणें. जाणिजे छ. २७ रमजान सुा सलास खमसैन मया अलफ. बहुत काये लिहिणें.

मोर्तब
सुद

सुरू सुद बार

१ मोठा.

Tarabai tried to bring Raghuji Bhosle to her help, but he did not come. She was in great need of money which Vishwanathbhat was to demand and recover from Raghuji.

---

पत्रांक १२ ] श्री अंगिरा श्रावण शुध १५।१६७४
आगष्ट १३,१७५२
पौष भाद्रपद शुध ६ गुरुवार

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथभट** वैद्य स्वामींचे सेवेसी.

**महादाजी नारायेण** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील क्षेम ताा श्रावण शुध पूर्णि(मा) मुा **लाखणवाडा** लस्कर जाणून स्वकीये लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष जासुदाचा पत्र पाठविलें तें पावलें. पत्रीं सताविसा गांवचा मजकूर लिहिलात जे, श्रीमंत राजश्री **पंतप्रधान** यांजकडून तिसाला गांवचा करार करून घेतला आहे जे, दर साल रुपये २५००० पंचवीस हजार व दरबार खर्च दोन अडीच हजार येकून साडेसत्ताविसा हजारांस करार करून ठेविले आहे. तुमचें पत्र आलें म्हणजे सनदा घेऊन पाठवितों. त्यावरून हें पत्र आपणांस पाठविलें आहे. तर कराराच्या सनदा पाठऊन देणें. दरबार खर्चाची बाबत येक साला आहे त्यामध्यें आपले विचारें जैसें होईल त्याप्रों करून घेऊन. सनदा घेऊन पाठवणें. आमचे चिरंजीव **मोरो** यांचे नांवें मसुदा करावा. राजश्री **कृष्णाजी गोविंद** यांचे पुत्र दोघांचें नांवें न होय तर आमचेच चिरंजीवाचें नांवें करून घेणें. यांत कांहीं [१] तथा न ठेवणें. रुपयेयाची वाईदे करून निशा करून देणें. फिरोन आम्हांस ल्याहावयाची आगत्य न टेवितां काम सत्वर करून सनदा पाठवणें व मौजे **नरवेल** पाा **मलकापूर** हा गांव राजश्री **अपाजीराम** याकडून घेतला असिला तरी सनदा पाा, सूज्ञाप्रति बहुत काय लिहिणें. कृपा कीजे, हे विनंती.

हो X X माहालची कमाविसी राजश्री **सिवाजीपंत** (व) आपण केली. दोन लक्ष सत्तर रसद कर्ज दिल्हें. स्वामीस कळावें. कृपा कीजे हे विनंति.

---

१ संदेह.

Mahadaji Narayan writes from Lakhanwada to Vishwa-nathbhat at Satara that he has secured the Mamlat of 27 villages from Pant Pradhan for Rs. 27500, he should therefore send the Sanads. He wanted the orders for the Mamlat wich should be issued in the names of Moropant, his son and Krishnaji Govind's son jointly or in the name of his son only. He desired that even though the village Naravel, Pargane Malakapur was taken from Appajiram, its Sanad should be sent.

---

पत्रांक १३ ] श्री श्रावण वद्य ३।१६७४
आगष्ट १६,१७५२

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथभट वैद्य** स्वामीचे सेवेसी.

पोष्य **केसो कृष्ण सेंबेकर** कृतानेक सां। नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल ता। श्रावण वद्य ३ त्रितिया मुकाम **पुणें** जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष गुदस्ता रोजगार, **धार** परगणा ‑ला होता. त्यांस पैका टका काहीं उगवला, कांहीं बाकी राहिली. पुढेंहि तेच माम ।यत आहे. स्वामींचा गुंता होता तो थोडाबहुत दिल्हा होता. बाकी राहिला आहे तो देऊं. कळलें पाहिजे. यानंतरीं पा। **पणज माहागांव** प्रां। **वराड** येथें आमचें कर्ज, जमीनदार गांवगना मिलोन बत्तीस हजार रुपये मुदल आहेत; रोख जमीदार पाटील यांचे आहेत. हिसेब रुजू आहे. जहागीरदार **मुगला**कडील आहेत. त्यांचे मोहरेनिसी साक्षी रोखियावरी आहेत, त्यास राजश्री **रघोजी करंडे** यांणीं पूर्वीं आमचे श्वाधीन परगणा **देवढी**कडे दिल्हा, तेव्हां आपलें कर्ज होतें त्याची निशा आम्हांपासूनच करून घेतली. त्यामुळें कर्ज आम्हीं सावकाराचें काढून दिलें. त्यांस फिरोन परगणा त्यांजकडे जाहाला. तेव्हां श्रीमत् राजश्री **रघोजीबावा** यांणीं **करंडे** यांसी आज्ञा केली कीं, जमीदाराकडे कर्ज आहेत (तें) देवणें. त्यावरून **करंडे** यांणीं मान्य केलें आणि सांगितलें जें, ठाणें देवणें. कर्ज आम्हींच निशा करून घेतली आहे, फिरोन देऊं. चिंता न कीजे. त्यांस दोन

वरसें चिरंजीव राजश्री **लक्षुमणपंत** त्यांजमागें फिरलें; परंतु माग लागला नाहीं. गुदस्ता श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, पेस्तर सालीं येणें, यावरून चिरंजीव **लक्षुमण कृष्ण सातारा** आला. त्यास ईश्वरकृपा जे, स्वामी त्या प्रांतीं गेले आहेत. आमचें कर्ज परभारें परगणेयांत येणें आहेत. मुदल तीसबतीस हजार आहे. त्या स्वामींनीं येजमानास चतुर्थांश देऊन बाकीची निशा करून घ्यावी. रोखापत्र हिसेब, आज्ञा होईल तरी, आम्ही आगर चिरंजीव **लक्षुमणपंत** पाठऊन देऊं. निदान तिजाईमध्यें दरबारखर्च सुधां स्वामीचे विद्यमानें पडल, तरी करून स्वामींनीं आपली निशा करून घ्यावी. स्वामींनीं उपराला करून कार्य करून घ्यावें. म्हणजे आम्ही कर्जापासून मुक्त होऊन तुमचे उपकारी जन्मपर्यंत

( पुरवणी पान २ )

असों. याकरिता सेवेसी मुजरद जासूद पाठविला आहे. राजश्री **त्र्यंबकजी राजे भोसले** यांसीहि पत्र लिहिलें आहे. स्वामींनीं ऐसी युक्ती करावी जे, **करंडे** यासी **नालबंदी** देणें. त्यांत ऐवज कर्ज भरोन द्यावें. येजमानाची चतुर्थांश देऊन बाकीचा हवाला स्वामींचा होय ऐसें करावें. मग स्वामी आम्हास देतील, [ ते ]व्हां कर्जापासून आम्ही मुक्त होऊं. परंतु ज्या रीतीनें कार्यभाग होईल तिकडून करावें. स्वामी जो हें करून कार्यभाग करतील तो आम्हांस मान्य आहे. आम्ही स्वामीचे आज्ञेखेरीज नाहीं. परंतु श्रीमंत् राजश्री **सेनासाहेबसुभा** यांसी नजर देऊन कार्य करावें ऐसा निच्ययें असेल तरी पत्राचें उतर पाठवणें. आम्ही दर्शनास येऊं. श्रीमत् राजश्री **पंतप्रधान** यांचें साहित्यपत्र व मातुश्री **आईसाहेब** यांचें पत्र जें पाहिजे तें घेऊन येऊं आगर विनापत्र म्हणाल तरी येऊं. परंतु सर्व भरोसा आपला आहे. या समईं कार्य न होये तरी पुढें आंतर पडेल. येजमानाचे पदरचें कांहीं जात नाहीं. परभारें रयेतकडे पैका येणें. वचन मात्र बोलिलें पाहिजे. तेंहि फुकट न बोलावें ऐसें आहे. स्वामीचे विद्यमानें पांचसात हजार द्रव्य मिलेल ऐसें येजमानांस आहे आणि आम्हांवरी स्वामींचे उपकार बहुत होतील. याकरितां स्वामीकडे पत्र पाठविलें आहे. येजमानांसहि विनंति लिहिली आहे. तरी येजमानाचें उतर व स्वामीचें उतर आलीं म्हणजे आम्ही आगर **चिरंजीव लक्षुमणपंत** ऐसे येऊं. कागदपत्र व हिसेब जमीदार सांगतील तें मान्य आहे. वरकड इकडील वर्तमान तरी राजश्री **बालंभटजीकडून लक्षुमणपंत** श्रीमंत **पंतप्रधान** याजकड आला होता, कार्यभाग जाहाला नाहीं, कललें पाहिजे. समस्त सुखी आहेत. बहुत काय लिहीणें हे विनंति ० ० ० ० ० राजश्री **त्र्यंबकजी राजे** यांचे हातून कामकाज घेऊन त्यांचें समाधान करावें. जिकडील प्रसंग बनेल तिकड करून कर्जाचा गुंता वारावा. हे विनंति. राजश्री **रघोजी करंडे** यांसी सामदाम जैसें जाणाल तैसें सांगोन, चतुर्थांवश हाच घेईल. आधिकउणें तरी उतमच आहे. निशापत्र भरवसा जाणोन उतर पाठवावें. त्याप्रों येऊं. हे विनंति.

This is a letter by Keso Krishna Shembekar, to Vishwanathbhat discussing the same matter written to Raghuji in the next letter. Keso Krishna is also prepared to say to him, for recovering his money that he may make use of unfair means, such as bribing Raghuji Bhosle, Tryambakji Raje Bhosle Wavikar, and even Karande. Mr. Shembekar was ready to secure letters from Nanasaheb Psehwa and queen Tarabai, addressed to Raghuji in the same matter. The sum of 32000 was to be recovered independently, from the cultivators of the villages. He wanted Sanads of the Mamlat villages.

---

पत्रांक १४ ] श्री श्रावण वद्य ३।१६७४
आगष्ट १६,१७५२

श्रीमंत राजश्री **रघोजीबावा भोसले सेनासाहेबसुभा** साहेबाचे सेवेसी.

आज्ञाधारक **केसो कृष्ण** कृतानेक आसिर्वाद विज्ञापना ऐसाजे. साहेबीं आज्ञापत्र पाठऊन सेवकाचा सांभाल न केला. **सातारियाचे** मुकामीं साहेबीं आज्ञा केली होती जे, तुम्हीं आम्हांपासी येणें. तुम्हांस रोजगार सांगोन चालऊं. त्यास साहेबीं जाते समई आज्ञा केली नाहीं, याकरितां सेवेसी येणें न जाहालें. याउपरी कृपा करून साहेबीं आज्ञापत्र पाठविलें, तरी सेवेसी येऊं. यानंतरी पा **पणज व माहागांव देवढी**कडून दूर करून राजश्री **रघोजी करंडे** यांजकडे दिल्हा, तेन्हा आज्ञा केली कीं, तुमचे गुजारतीचें कर्ज आहे तें देवितों म्हणौन आज्ञा करून राजश्री **रघोजी करंडे** यांसीं खुद्द **सातारियाचे** मुकामीं आज्ञा केली. त्यांणीं आज्ञेप्रमाणें जामीदारास व गांवगना पाटिलास ताकीद दिल्ही, त्यावरून आमचा भाऊ **लक्ष्मण कृष्ण** याणें परगणा **करंडे** यांचे श्वाधीन करून कर्ज मागों लागलें. त्यास **करंडे** यांणीं फिरोन ताकीद तोंडावर केली. त्यास कार्य कांहीं जाहालें नाहीं. त्याउपरी गुदस्ता चिरंजीव **लक्ष्मण कृष्ण** साहेबापासीं **नागपूरचे** मुकामीं आला होता. त्यास साहेबीं आज्ञा केली कीं, पेस्तर सालीं येणें. कर्ज परगणेयाचें देवितों. त्यास साहेब धणी आहेत. रुा बत्तीस हजार परगणेयांत परभारें जमीदाराकडे येणें आहे. साहेबीं निकडीची आज्ञा केलियानें आम्ही कर्जापासून दूर होऊं. साहेबांचीं आज्ञापत्र जमीदारांस दोनतीन वेलां दिल्हीं, परंतु त्यांणीं मान्य करून भाग वारून दिल्हा नाहीं. याकरितां हालीं सेवेसी विनंतिपत्र पाटविलें आहे व राजश्री **विश्वनाथभट वैद्य** विनंति

करितील त्याप्रों आज्ञा करून आज्ञा उतर पाठविलें पाहिजे.+ बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

---

+ पुढील अक्षर लेखकाचें स्वतःचें.

Keso Krishna Shembekar writes from Poona to Raghuji Bhosle, putting in mind of his interview with him at Satara about the Mamlat of Panaji and Mahagaon for realising his debt paid by him to Raghuji Karande. The debt was nearly 32 thousand Rs. The way suggested and settled by both was not in the end effective to recover the money. Keso Krishna also wrote another letter in this connection to Vishwanathbhat Vaidya, on the same day. He was at this time at Nagpur. The Mamlat of Panaji and Mahagaon had been given to Raghuji Karande by Raghuji. The revenue was to go to the expenses of his queens. Keso Krishna's brother Laxman was sent to Nagpur to Raghuji to recover the money from Karande.

---

पत्रांक १५ ]  श्रीगजानन प्रसन  छ. २५ सवाल

श्रावण वद्य ११।१६७४

आगष्ट २४,१७५२

श्रीमत् राजश्री बाळंभटबावा विश्वनाथबावा स्वामीचे सेवेसी.

विनंति सेवक चिंतो विठल कृतानेक सां नमस्कार विनंति. येथील क्षेम ताा छ. २५ माहे सवालपावेतों समस्त सुखरूप असो. प्राा चंद्रपूर मुाा लस्करांत पावलों. राजश्री जानोजी भोसले यांची भेटी घेतली. राजश्री तुळजोपंताचीही भेटी घेतली. कागदपत्रही दिल्हे. आम्हीं चंद्रपूरची दफ(तर)दारीची ताकीद सांगितली, त्यास ते म्हणेतात कीं, आम्हांस श्रीमंतांहीं सरंजाम दिल्हा आहे. ते समईची सन(द) तुमची दाखवा म्हणतात. त्यांस आम्हीं उत्तर केलें कीं, गुदस्तची बाबाची सनद आहे. त्यास ते मानीत नाहीं, येसा म्हणेतात. त्यास मज काय ते आज्ञा केली पाहिजे. घोडियाविसीं राजश्री विसाजी गोविंद यांसी तुम्हीं पत्रें दिल्हीं आहेत. त्यास (त्या)चे येथें कांहीं कारभार चालत नाहीं. येथें जानोजीबावाचें पंताजी

आहे, त्याणें आमच्या ताकिदी मना केल्या आहेत. हल्लीं **जानोजीबावा**जवळ कारभारी, **पंताजी** जाहाला आहेत. **तुळजोपंताची** कांहीं चालत नाहीं. राजश्री **तुळजोपंताकडे** घोडियाची बोलीचाली करीत होता. त्यास ते म्हणेतात कीं, आम्ही **वैद्यांचीं घोडीं** ठेवीत नाहीं. **डीग**चे सिलेदार होऊन राहाल तर हाली करून देऊन, ऐसें म्हणतात. त्यास **लश्करांत** येकदोन दिवस राहून बोलीचाली मनास आणिली. त्यास **तुळजोपंता**चा कारभार लबाडी फारसी दिसोन आली. **लश्करांत** एकदोन दिवस हैराण होऊन **नागपुरास** गेलों. पैसा मिळत नाहीं. घरांत कांहीं अर्थ नाहीं. लोकांचें देणें फार आहे. याजउपरी आम्हांस कोणेचा आसरा नाहीं. सर्व मायबाप आपण होइजे सोकल ते चालवणें. आतां मज काय आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. मीं स्वामीच्या पायाची जोडी केली आहे. येनदा बहुत हायेराण आहें. बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

Chinto Vithal Phadke writes to Vaidya brothers from the Camp in Paragana Chandrapur that he met' Janoji Bhosle and Tuljoram. His request for granting the Daftardari was denied for want of fresh order. Visaji Govind has no hand in administration. He is known to be an unreliable person.

---

पत्रांक १६ ] श्री भाद्रपद सुद्ध ७।१६७४
सपटंबर १५,१७५२

तीर्थस्वरूप राजश्री **काका** स्वामी वडिलाचे सेवेसी.

आपत्ये **रामचंद्र** व **बाबुराव** चरणावर मस्तक ठेऊन सां नमस्कार. विज्ञापना ता। भा। शुध ७ पावेतों वडिलांचे आसिर्वाद. समस्त सुखरूप आसों विशेष. राजपत्रें व कागद पाठवणें म्हणोन आज्ञा त्यावरून **दुलबाजी**बरोबर कागदपत्र देऊन रवाना केला होता. त्यास प्र( ज )न्य लागला. **नीरा** भरली. याजकरितां चार दिवस **मिरजेयांत** होता. काल सायंकाळीं फिरोन **वाईस** आला. याजकरितां हालीं **सदू पवार** याजबरोबर कागदपत्र देऊन रवाना केला आहे. तेथें पोहोंचलियानंतर यास निरोप घ्यावा. घोडियाजवळ आणखी माणूस नाहीं. याजकरितां लिहिलें आहे. राजपत्रें सर्व पाठवावीं तर प्रजन्य लागतो. यास्तव मुख्य पत्रें मात्र पाठविलीं आहेत. **भातगाव** येथील मुख्य पत्र राजश्री रामचंद्रपंतीं जाते समई नेलें व हातरोखा

तुळाजी आंग्रे याम होता तोही नेला आहे. वरकड ताकिदीही सर्व पाठविल्या आहेत. नाइकजी भोइटे यांचें खत पाठवावें म्हणून लिहिलें, त्यावरून पाठविणार आहे. व अमृतराव खोपडे यांचे घरीं जाऊन माजघरीयांत केळंजेकरी बसविलें आहेत व जेधे यांचे घरीं गडकरी बसविले आहेत. दर्याजी नाईक जेधे पुणेयास गेले आहेत. भाग वारून दिल्हा तर घ्यावा. वरकड वर्तमान येथास्थित आसे. राजपत्राची वगैरे कागदपत्राची यादी आलाहिदा आहे. हे विज्ञापना. आपत्यें लक्ष्मणानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार.

This letter is written to Vishwanathbhat by Rambhat, Balambhat's elder son, and Baburao, Vishwanathbhat's son. They have explained why they delayed in sending the papers and how they tried to recover the money from Khopade and Jedhe. Laxman appears to be an issue of Balambhat and to have not survived for many years. The letter is an example of the English date which was changed to 14th September instead of 3rd September from this year i. e. 1752 by the Parliamentary Act. This change is named as Gregaran System. The old system was a Jullias System.

---

पत्रांक १७ ] श्री भाद्रपद वद्य १३।१६७४
आक्टो. ५,१७५२

गोविंद बल्लाळ व नारो आनंत तेरेदेसाई ता सैतवडे शके १६७४ अंगिरा संवत्सरे भाद्रपद वा १३ चिटी बापूभट वैद्य याजवर रुो ४००

व्याज दर १॥ प्रमाणें.

This account shows dealings of Govind Ballal and Naro Anant Tere Desai of Tarf Saitawade with Vaidya brothers.

---

पत्रांक १८ ] श्री छ. २६ जिलकाद


भाद्रपद वद्य १३।१६७४

आक्टो. ५,१७५२

रामराम.

राजेश्री **विश्वनाथबावा** [१]मोकासी साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक **पिराजी बाबर** का। **सुपे** सुमा सन हजार ११६२ कारणें वाइदे रोखा लेहून दिधला ऐसाजे, साहेबांचें कर्ज राजश्री **जिवाजी** व **फिरंगोजी** पा। **बोतरे** मोकदम मौजे **पारगांव मालोचे** याजकडे आहे, त्यास वाइदा फलगुणे मासीं **जिवाजी** पा। व **फिरंगोजी** पा। **बोतरे** या उभयेतांस आणणें, मुदतीस फलगुणे मासीं हजीर करूं. न करूं तर याचे निसबतीचा जबा( ब ) करूं, हें लिहिलें सही. छ. २६ जिलका( द ).

निशान 

बीा **महिपत रघुनाथ वाद्य** कुलकरणी मौजे मजकूर **काराटी** पा। **सुपे**

गोही

**सटवोजी दिघे** मौजे **काराटी**.

---

१ मोकासा घेणारे असा अर्थ नसून हे इनामदारच. २ साक्ष.

Piraji Babar, Vaidya's servant wrote a letter to Vishwanathbhat Vaidya, Inamdar, that he stood a guarantee to the presence of Jiwaji and Phirangoji Botare Patil of Paragaon Maloche, before him on the appointed day. The year given is just like Sursan but it is Phasali, and not Sur.

---

पत्रांक १९ ] श्री छ. २७ जिलकाद

भाद्रपद वद्य १४।१६७४

आक्टो. ६,१७५२

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री **गोविंद सामराज गोसावी** यास

सेवक **चिमणाजी नारायण सचिव** नमस्कार सुरू सल्लास खमसैन मया अलफ. राजश्री **बाळंभट** व राजश्री **विश्वनाथभट वैद्य** मौजे **धोम** प्रांत **वाई**

येथें राहिले आहेत. त्यास हे तुम्हांस एकदोन माणसें गडकरी मागतील, तरी यांजकडे पाठवून कामकाज सांगतील तें करवणें. वरचेवरी यांचा परामर्ष करीत जाणें. छ. २१ जिल्काद.

Chimnaji Narayan Sachiv asked Govind Samraj to give to Vaidya brothers who were staying at Dhom, one or two labourers of the fort to work and look to their conveniences often.

---

पत्रांक २० ] श्रीलक्ष्मीकांत छ. २९ जिलकाद
आश्विन शुद्ध १।१६७४
आक्टो. ८,१७५२

यावर रघूजीची मुद्रा व मोर्तब
दुरेघी अष्टकोनी आहे.

राजश्री **हरी रघुनाथ गोसावी** यासी.

दा। अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य श्नो **रघोजी भोसले** सेनासाहेबसुभा दण्डवत सुरू सलास खमसैन मया अलफ. तुम्हांकडील बावती सरदेशमुखीचे यैवजपैकीं राजश्री **विसाजी रघुनाथ वकील** यांसी रद कर्जाबद्दल यैवज देविला असे. बीा रुो.

८००० पा आष्टी १४००पा विरूर ६०० पा आरवी

येकूण रुपये १०००० दहा हजार देविले असत. देणें जाणिजे. छ. २९ माहे जिलकाद +बहुत काये लिहिणें.

मोर्तब
सुद

---

+ पुढील मजकूर रघूजीचे हातचा.

Hari Raghunath Jog was in the enjoyment of the revenue of Paraganas Ashti, Virur and Aravi. Raghuji Bhosle asked him to pay the amals of Babati and Sardeshmukhi of these, to Visaji Raghunath Vaidya, in payment of debt due to him. The amals amounted to 10 thousands.

पत्रांक २१ ] श्री अंगिरा आश्विन शुध १।१६७४
आक्टोबर ८,१७५२

यादी पत्रें राजश्री **विश्वनाथभट* वैद्य** यासि येणेंप्रों देविलीं पाहिजेत.

१ **दीक्षिता**कडे यैवज सन सलास खमसैनांत आश्विन शुध १ देविला होता रुा ३५६ तो न पावला सदरहू यैवज व्याजसुधां रुा ४८५॥ देवविले पाहिजेत.

१ मौजे **कान्हाटी** पा **सुपें** येथील यैवज **सरलस्करा**कडील कमाविसदार चौथाई नेतात. त्यांस ताकीद कीं, मानिलेकडील गांव इनाम आहे येथें उपद्रव न देणें आणि चौसाला वसूल रुा ८४४ आठसे चवेचालिस नेले आहेत, ते माघारे देणें, म्हणौन ताकीद देविली पाहिजे आणि [१]उरूबुरू कामदारांस ताकीद करावी.

१ मौजे **खोडद** ता **तारगांव** प्रां **कराड** हा गांव वैद्यांकडे आहे त्यास पत्र कीं, [२]सुदामतप्रों चालत आला आहे त्याप्रों **वैद्यां**कडे वसूल सुरलित देणें, म्हणौन पत्र.

१ रा **दादोपंत वाघ** यांसी पत्र कीं, **कराडदेसीं वैद्यांचें** कर्ज येणें आहे, त्यास **वैद्यांचे** रुा व्याजसुधा ज्यांकडे असतील त्यांकडून झाडियानिसीं रुा उगऊन देणें म्हणौन पत्र.

१ कसबे **बावधन** येथें इनाम जमीन बिघे ३० तीस आहे त्यांस तेथील जमीन [२]सुधामतप्रमाणें चालत आली आहे, त्याप्रों **वैद्यां**कडे चाले तें करणें म्हणौन **बावधन**-च्या कमाविसदारास ताकीद.

---

१ प्रत्यक्ष. २ बिनधोक. * निंबाजी नाा निंबाळकर.

This is a list of 5 orders which Vaidyas wanted to be issued by the Chhatrapati to the following persons for the payment of their money :—( 1 ) Mr. Dixit to pay Rs. 485-8-0. ( 2 ) Sarlaskar should not trouble Vaidya to collect the Chouthai of their Inam village Karhati and to return them Rs. 844, which they have taken away as previous four years' revenue. The order should be served on the Kamavisdar also. ( 3 ) Kamavisdar of the village Khodad to pay Vaidyas regularly its revenue as it has been theirs for long. ( 4 ) Dadopant Wagh should be asked to see that the persons to whom they have advanced money as debt, pay back the sum with interest without any balance. ( 5 ) Kamavisdar of Baodhan should see that Vaidyas should enjoy the Inam Land of 30 bighas as before without any obstruction.

१२ ]

---

पत्रांक २२ ] श्री आश्विन शुद्ध ११।१६७४
आक्टोबर १८,१७५२

हिसेब राजश्री त्रिंबक बावाजी
ना नातू सुमा सलास खमसेन मया
आलफ ता आस्वीन सुा ११
५०० प्रजापती सवच्छरे पौष्य वद्य ३
३४।।।= व्याज इा ता आंगिरा
आस्वीन सुा ११
मुा माहे दर ॥। प्रा
८८२४ येन माहा
८१५ अधिक माहा

९८९

५३४।।।= ये. रुेय

रुये

| | येन | व्याज दर ॥। |
|---|---|---|
| प्रजापती संवत्सरे फालगुन वद्य ७. देणें बापूजी गणेश जोग बा लग्न आपा चैत्र वद्य १. देणें म्हणोन चिठी ता मुा माहे<br>५८२६ येन माहा<br>८१५ अधिक<br>६८११ | १०० | ४।।। |
| आंगिरा श्रावण वद्य ९. देणें कृष्णंभट काळे नांदिवडेकर, रोख घेऊन चिटी दिली ता मुा माहे १८१८ | २७५ | ३।÷॥ |
| आंगिरा श्रावण वद्य १. देणें नारो आनंत गद्रे आदा कृष्णाजी अनंत गद्रे ता मुा माहे १८२६ | ५० | ॥≡॥ |
| आंगिरा आस्वीन सुा ११ देणें लक्ष्मण बलाळ जोसी मुा | ५० | |
| | ४७५ | ८।।।÷ |

बाकी अस्वीन सुा १२ यैनांत वजा
यैन मुदल २५ व्याज रुा २६८÷
॥=॥॰ ता पौष्य सुा १५ वजा ॥-।॰
सुा माहे ३८१८

२५॥=॥॰ २६ ॥-।॰

वजा बारावा सुा सलास
रुा २८≡।- बाकी रुपये २४॥
रुपये ४९॥॰

This is an extract of the account of Tryambak Babaji Naik Natu entered in the ledger of Vaidyas. This is the only old reference to Natu in the daftar.

---

पत्रांक १३ ] श्रीभवानीशंकर आश्विन शुध १५ रविवार १६७४
आक्टोबर २२,१७५२

श्रियासह चिरंजीव राजश्री **बाळंभट वैद्य** यांशि. **नारायणभट वैद्य** आसिर्वाद उपरी. येथील कुशल जाणउन आश्विन शुद्ध पौर्णिमा रविवारपावेतों स्वकुटुंब सुखरूप असों विशेष. **रामजी चवाण** यांजबराबर पत्र पाठविलें, तेथें चिरंजीव **रामा**ची शरीरप्रकृत कांहींच लिा नाहीं. तुमचे लिहीणाराच्या बुद्धि भ्रांत आहेत. रोगहान्य औषध पाठवावें, की पुष्टिकारक पाठवावें हें कांहींच शरी [र] प्रकृतीविना न कळे. अजमासें मंडूर दोन तोले पाठविलें आ [हे]. घेऊन वेलेस येक तोला मध व अधमासा मंडूर देणें. दुवेल दिवस चवीस देणें. पथ्य पूर्ण बरा ते करवणें. ज्येष्ट मासीं औषध दीड मासाचें दिलें होतें, त्यास पांच महिन्यांनीं पत्र पाठविलें तोही मनुष्य दुसरा पाठविला. तुम्ही श्रीमंत. तुम्हांस काय बोल लावावा ? लु[ग]डें व खण पाठविला तो पावला ; हे आसिर्वाद.

Narayanbhat Vaidya probably of Narvan branch writes to Balambhat Vaidya about the way, in which the medicine, he prescribed and sent for his son Ramchandra (bhat), should be administered and also blames him for his indifference. The Narwan Vaidyas write on letters after Shrikar, Bhavani Shankar.

पत्रांक २४ ] श्री आश्विन वद्य २।१६७४
आक्टोबर २४,१७५२

वेदमूर्ति राजश्री **बालंभट वैद्य** व रा **विश्वनाथभट वैद्य** स्वामींचे सेवेसी.

पो **बापू गणेश जोशी** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल ताा आश्विन वद्य २ जाणून आपला संतोष लिा गेलें पा विशेष. चिरंजीव **रामचंद्र** औषध घ्यावयास कोंकणांत आला, त्यास तुम्हीं खर्चास देविले रुा **राघोबा नाा पटवर्धन** यांजकडील रुा २५, व **बालाजी थोरात** यांजकडून रुा २५, **बचंभट पटवर्धन** रुा ५ व बराबर रुा ५, येकूण साठ रुा जमा. त्यास खर्च जाहाले, त्याची यादी **रामजी**जवळ पाठविली, त्यावरून कळेल. सिलक रुा सा राहिले ते **रामजी** जवळ दिले. यानंतर वेदमूर्ति रा **नारंभट वैद्य** हे म्हणतात कीं, खातियास रुा पंनास-पंचावन. त्यापैकीं त्यास पावले वीस. बाकी पस्तीस राहिले, ते आम्हांजवळ मागतात. याजकरितां तुम्हांस लिा आहे. तर त्यास पत्र पाठविणें कीं, आम्ही तुमचे बाकी राहिले ते येथें देऊं. यैसें त्यास पत्र लिा पाठविलें पा, अनमान सहसा न करणें. ते आम्हांस रुाविसीं आडवितात याजकरितां लिा आहे. तर त्यास पत्र लिहीणें कीं, आम्हांजवळ नं मागत तें करणें. कृपालोभ असो दीजे. केरसुण्या वगैरे सामान मार्गशीर्ष मासीं पाठवितों. कळलें पा हे विनंति. **तानसेट** यास रुा तीन देणें. अनमान न करणें. सौभाग्यवती वज्रचुडेमंडित **गंगाबाईस** आसिरवाद. खादीच्या पासोड्या दोनं पाठविल्या पाहिजेत. येथें मिळत नाहीं. याजकरितां लिा आहे. अगत्य पाठविलें पा. हे आसिरवाद.

हाो **धोंडू दामले** याचे साां नमस्कार विनंति. मीठ एक पायली पा आहे. हें घेऊन उत्तर पा पाहिजे. नारळ सुमार २ दोन पा आहेत. हे विनंति.

हाो **सखूबाईस** व सौभाग्यवती वज्रचुडेमंडित **उमाबाईस** आसिरवाद. लोभ असो दीजे.

Ramchandrabhat alias Rambhat Vaidya was ill and hence sent to Konkan for change and medicine. The account of the money given with him for expenses is given by Bapuji Ganesh Jog in this letter to Vaidya brothers.

पत्रांक २५ ] श्री आश्विन वद्य ५।१६७४
आक्टो. २७,१७५२

श्रीमंत राजश्री **बालंभटबावा** व तथा राजश्री **विश्वनाथबावा** स्वामींचे सेवेसी.

आज्ञाधारक **संकराजी कानो** साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष आम्हांकडील वर्तमान ताा अस्विन वधी पंचमी मुाा **नागपूर** येथें स्वामींचे कृपेंकरून सुखरूप आसो. यानंतर येथील सरंजाम तमाम निघाला आणि घेतल्या पैशास तोष्ट लागलें. **भुगांव व इसापूर** व **पोतदारी** व **चांद्याची** वरात यैसें तमाम गेले. येथें आम्हांस बसावयास जागा नाहीं ऐसें जालें. तमाम मुछेदी पाठीस लागले. लोक मस्कर्या करूं लागले जे, **श्रीमंतांचा व वैद्यांचा** इतका स्नेह होता आणि कैसें जालें? येणें रीतीचा धंदा जाला. आम्ही आज साहा वरसें येथें या मुलुकांत आहों आणि यैंदो द्राड गत अठवली. त्याणें बांईको या मुलुकांत आणिली. दोनसे रुपये कर्ज जालें आणि फिरोन देशास जावेतों सरंजाम आणावयाचा नाहीं. पागेबराबरीं आज्ञा होईल तरी घेऊन येतों. नाहीं तर मरण जालें, यैसा विचार आहे. राजश्री **तुळजोपंता**-कडीलही रुपया उगवत नाहीं. वोडीखालें फार पडिला आहे. त्यास आमी आस्विन वधी सतमीस निघोन **उंदेरीस** राजश्री **तुळजोपंता**कडे गेलों. रुपया तो मिळणार नाहीं; परंतु पंचवीस रुपये कर्ज खाऊन कसाला करून पाहातों. आपली आज्ञा येईल तेव्हां स्वार होऊन देशास येतों. वरकड वर्तमान राजश्री **नानांनीं** लिहिलें आहे, त्यावरून विदित होईल. बहुत काये लिहिणें. **चांद्याची** हुंडी पांचा हजारांची पाठविली, त्याचें उत्तर आलें नाहीं. वसूल कांहीं आला नाहीं. पावला न पांवला हेंही नकळे, बहुत काये लिहिणें हे विज्ञापना.

Shankaraji Kano, Vaidyas' clerk in Berar writes that Raghuji confiscated their Inam villages, Potadari and Saranjam. He describes his own condition in these circumstances. He lost his honour and felt degraded. People were struck to see how the Bhosle inclined to go against the Vaidyas. Shankaraji also in this light tried to recover money from Tuljopant, a Bhosle's Sardar, but could not get any thing.

पत्रांक २६ ] श्री आश्विन वद्य ७|१६७४
आक्टोबर २९,१७५२

श्रीमत् राजश्री **विस्वनाथभट वैद्य** स्वामीचे सेवेसी

पोष्य **केसो कृष्ण सेंबेकर** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. ता। आश्विन वद्य ७ सप्तमीपावेतों मुकाम **सुरंजी अंजणगांव** आपले दयेकरून वर्तमान यथास्थित आसे. विशेष. स्वामींनीं रुा। करितां पेशजी जासूद पाठविला होता, त्याजबरोबरीं पत्रें लिहोन दिलीं ते पोंचलींच असतील. त्यास स्वामींनीं आम्हांस मामलत करून दिली आणि निघोन **पुणेयास** गेले. तेव्हां मागें आम्हांकडून **आकोट** दूर जाहालें. पंधरा हजारपैकीं दाहा हजार करार केले. बाकी पांच हजार राहिले, ते **आकोटा**वरी करार करून श्रीमंतांनीं पत्र आपल्यास दिल्हें कीं, पांच हजार राहिले ते **आकोट** येथील चुकोती होईल. तेव्हां नेमून देऊं. **केसोपंता**कडे तगादा पांचा हजारा तगादा न करणें, म्हणून पत्र लिहोन दिल्हें. त्याची नकल आपणांकडे पाठविली होती. ते पावलीच असेल. बाकी दाहा हजार राहिले ते आपण राजश्री **सदाशिव हरीस** देविले, ते देऊन कबज लिहोन घेतली. त्याचीहि नकल आपणांकडे पाठविली आहे. तरी श्रीमत् **बाबुराव**ही तेथें आहेत. **आकोटा**वरी पांच हजार रुायाची वरात घेतली पाहिजे. वरकड वर्तमान तरी प्रांत **वराड** यंदां पाऊसामुळें बुडाला. बाडी जाहाली. **पणज** परगणा तो अगदीं बुडाला. **सुरंजी** परगणा तीन तक्षिमा बुडाला. येक तक्षीम पीक जाहालें. रबीचा तो दाणा कोणीं पेरिला नाहीं. गुदस्ता चुकोती **बमोजीब** रुा। तो घेऊन चुकले. तीस हजार रसद व श्रीमत् **मुधोजीबावा** येक हजार व **घासीराम** वरात तीनसे व फूट **मुकासे** सालमजुरीं नवे दोन गांव दिल्हे व मुशारा व व्याज सिबंदी येकूण बेचाळीस ते चाळीस होतात आणि परगणेयांची हकीकत तो या रीतीची आहे. लोकांचें कर्ज काढून दिली ते कैसी उगवती, हें संकट पडलें आहे. परगणेयांत तो जागा नाहीं. सर्व भरवसा आपला आहे. **आकोटा**वरी जीव आहे, तरी स्वामींनीं तेथें ऐवज घेऊन आमचा रोखा निघे तो अर्थ केला पाहिजे. मामलत **स्वामींच्या** भरवसेयावरी केली. परंतु ईस्वरानें पाणी नेलें. **पणजे**चें कांहीं कर्ज उगवेल म्हणून कर्म केलें तें उपराटें जाहालें. त्यास आम्ही निघोन येत होतों परंतु श्रीमत् **कृष्णाजी गोविंद** व **रघोजी करांडे** समस्त मंडळी **आकोटीं** जमा जाहाली. **घासदाणे** याची चुकोती होणार म्हणून राहिलों. आपणांस कलावें म्हणून लिा। आहे. बहुत काय लिहीणें. कोप न करावा. आपल्याखेरीज नाहीं. सर्व आश्रा स्वामींचा आहे. सेवेसी श्रुत होय हे विनंति.

Keso Krishna Shembekar writes to Vishwanatbhat how the Mamlat of Akot which he obtained by his influenc was not enjoyed by him owing to the queer nature of Bhosle.

He paid the money settled, to Sadashiv Hari as directed by him and got the receipt. In Berar there was famine on account of want of rain. There was no sowing of Rabi crops. Rs. 30,000 for this year's Rasad was paid to Raghuji and one thousand to Mudhoji and one more thousand for other expenses. This money borrowed as debt has yet to be repaid. He therefore requests Vishwanathbhat to do his best to relieve him from this calamity. Krishnaji Govind and Raghuji Karande and other concerned persons had gathered together at Akot to receive the Ghasdana amount.

---

पत्रांक २७ ] श्री अश्विन वद्य १२।१७७४
नवंबर ३,१७५२

श्रीमंत राजश्री **विस्वेनाथभटजीबावा** स्वामीचे सेवेसी.

सेवक पोस्यांकित **मनाजी टेंभेकार** मुा **नागपूर** चाा मस्तक ठेऊन सिर साा नमस्कार विनंति. येथील कुशल ताा आस्वीन वद्य १२ द्वादसीपरियेंत तुमचे कृपें-करून श्वस्थ क्षेम असो. स्वामींनीं लेखन करून अज्ञा केली पाहिजे. विसेष आपनां-कडील वर्तमान बहुत दिवस कलत नाहीं. त्यास येथें **रामजी** जासूद यान्हें वर्तमान सांगितलें, त्यावरून कळूं आलें. येथील वर्तमान तर उभैता **श्रीमंतांच्या** भेटी विजया दसमीस जाल्या. परंतु उभैतांचें रहसें अद्याप नाहीं. **नागपुरीहून** श्रीमंत **अप्पासाहेब** व **रघोजी करांडे** यैसें रुसवा करून **व्याहाडास** गेले. त्यानंतर **श्रीमंतबाबा** यांची रदबदल लागली असे, परंतु त्रिवर्ग ब्राह्मनांना कामांतून काढावयाचा आक्षेप **आपाचा** फार असे, यैसें वर्तमान आहे. येथील वसुलाचा मजकूर तरी राा **सुभेदार** यांसि नित्य तगादा करीत असो. परंतु **सुभेदाराचे** वोढीमुळें रुो वसुलांत येत नाहीं. पांचसातसे रुो वसूल जाले, ते आपले वोढींत घातले. **राजे बुन्हानसाहेबांनीं** वारता करून देल्या होत्या. त्यांनींच आमलास मना केल्या. तेही फार वोढींत आहेत. त्यांस आतां आपन **सुबेदारास व राज्यास** लिहून पाठवणें. त्याजमुळें कांहीं वसुलांत येईल. बहुत काये लिहिणें. कृपा लोभ असो दीजे.

Manaji Tembhekar of Nagpur who is very rarely mentioned in other papers, writes to Vishwanathbhat the relations

between the members of the Bhosle royal family and Raghuji Karande. They, he says, were against the brahmins and wanted to get rid of three of them. It is also made clear by him how cifficult it is, to recover money from the subhedar (Krishnaji Govind) and Buranshah Raje owing to want of money Mudhoji and Karande went to Vyahad.

---

पत्रांक २८ ] श्री छ. १ मोहरम
कार्तिक शुद्ध २।१६७४
नवंबर ८,१७५२

करांडे याचा शिका दुरेघी अष्टकोनी व मोर्तब षट्कोनी आहे.

शिक्क्यांतील मजकूर: श्री माहाल क्षीमी चरेनीं तत्पर रघूजी करंडे निरंतर

राजश्री **विश्वेनाथभटजी वैद्य** गोसावी यासी

दां अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो **रघोजी करंडे पागा** दिा राजश्री **सेनासाहेबसुभा** दंडवत विनंति उपरी.' येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करणें. विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें, पावोन लिा वर्तमान कळों आलें. तेथें पाा **आकोटचे** रुपयाविसीं लिहिलें, तरी आमचे पंचेवीस हजार व व्याज व माहाल मजकूरचा खर्च जाऊन बाकी राहील तो पैसा जिकडे देवितील तिकडेस देविला जाईल. रवाना छ. १ माहे मोहरम + बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद

---

+ पुढील मजकूर लेखकाचें.

Raghuji Karande, in charge of a Paga of Raghuji Bhosle writes to Vishwanathbhat how the revenue of Paragana Akot will be distributed. Karande was to receive Rs. 25,000. Vishwanathbhat expected to get some amount from this revenue.

---

पत्रांक २९ ] श्री कार्तिक शुद्ध ४।१६७४
नवंबर १०,१७५२

श्रीमंत राजश्री **विस्वनाथबाबा** स्वामीचे सेवेसी.

सेवक **रंगो माहादेव** कृतानेक सां। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। कार्तिक शुध ४ मुा **नागपूर**, स्वामीचे कृपावलोकनें यथास्थित असे विशेष. पेश(जी) **आनंदराम कासीद** याजबरो हुंडिया पाठविल्या, त्याचें उतर पावल्याचें आलें. त्या आलीकडे वर्तमान, पत्र येऊन कळलें नाहीं. तरी सविस्तरें आज्ञापत्रलेखनें संतोषविलें पाहिजे. विशेष. आपली आज्ञा जे, कामकाज सावधतेनें करणें. त्यास आज्ञेप्रमाणें जेथवर सावधता करणें तेथवर करीतच आहों. दुसरें, राजश्री **सुभेदार** यांचे कानावर घालून त्यांचे आज्ञेनें जें करणें तें करितों. येंदां **सुभेदार** पांचसाहा लाख रुपायांस गुंतले आहेत, यैवज करून घेतला आहे, परंतु पार लागतां लागेल तें पाहावें. दुसरें, रा। **बगाजीपंत** यांस लोकांचे हिशेब घेणें हा जिमा करून दिल्हा आहे. राजश्री **बाबूराव** कांहीं फौजेनिसी स्वार होऊन **वराडांत** गेले. पुढें श्रीमंत **पंतप्रधान** आज्ञा करितील तिकडे जातील. **भागानगराकडे मोगलांच्या** फौजा फिरंगी गारदी आहेत. त्यांजवर जावें, यैसीं पत्रें येथें **यजमानास व रायास** आलीं आहेत. **मोगलांसी** फार विरुध होते, दोन च्यार जुंजें जालीं. आलीकडे पत्रें आलीं जे, सलुख जाला. वीस लक्ष्यांच्या जाहागीर घेतल्या, यैसें आहे. राजश्री **राव** येथून गेले, तेव्हां गांवाविसीं रोज विनंति करीत असतां **कोंडाली**पावेतों जाऊन विनंती केली. न होय तेव्हां मागें आलों. दुसरे दिवसीं कांहीं कार्यें **नागपुरीं** राहिलें, थाकरितां **रावजी** आले. पेठेंत रा। **आपाजीपंत** यांचे घरीं राहिले. कोणकोणाच्या घरीं जावें लागत होतें, तेथें जाऊन कामकाजें उरकेलीं, आणि आठा दिवसीं मागती गेले. तेव्हां येथें आणखी रोज उठोन दोन प्रहर तीन प्रहर रात्रो उगेच बैसोन उठोन येऊं. तेव्हां काये चितांत आणिलें आणि **श्रीमंता**जवळ विनंती करून, देणें गांवचें करून घेतलें, आणि आमचे स्वाधीन केलें. उपरांत सनदा करून घेतल्या, आणि गांवांस तोरणें बांधलीं. गांवकरी आणून मनास आणितां रा। **बाबाशास्त्रींनीं** हजार-आकरासे रुपये घेऊन गेले. पुढें जत करून यैवज घ्यावा, तरी येंदां [1]**नजरपट्टी** व पंचविसाची [2]**मोकदमपट्टी** म्हणोन रयेतीवर घेतली. ती व [3]**खर्चपट्टी रामटेकची** यैसा तीन पट्या मिळोन रुपये सात साडेसातशें [4]**दिवाणांत** देणें**चा** + फिटलें नाहीं. ते वसूल होईल त्यापैकीं हे रुपये जाऊन सेपन्नास दोनसे हातास येतील; परंतु गांव जाला यैसें जालें. सेवेसी कळावें. दुसरे, या तिनी पट्या **आदली तुमान व देशपांडियेपण** यैसे पांचसाहासे तेथें पडतात. कांहीं दिल्हे, बाकी देणें घेतात, बहुत रदबदल जाली. येंदां रसदा **सुभेदार** यांणीं दिल्या. यैवज लाविला देखील. मोकासे सर्वांस घेतलीबाबत आम्हांसही पडिली, यैसें आहे.

सेवेसी सर्व कळावें. **वकिलीची** बाकी बहुत तटली. आद्याप **दूर** नाहीं. परंतु मनाही नाहीं. ताकीद मागितली तरी कशास पाहिजे ! कोणी उजूर करील, त्यास आम्हांस सांगणें, यैसें **राव** म्हणाले, या प्रकारें उत्तर करीत. हलीं **रावजी** गेले. **बळवंतराव-जीस** येथें ठेविलें. **यजमान** आहेत. ताकिदीविसीं म्हणतच आहों. करून देतील, तरी घेऊं. तोंवर जैसें होत आहे तैसें करून. थोडके बहुतानें वसूल घेत आहों. सेवेसी कळावें. यैवज जमा प्रस्तुद.

(२ पुरवणी श्रीमंत राजश्री **वैद्यबाबा** स्वामींचे सेवेसी)

कांहीं नाहीं. गुंतला आहे, त्यास वसूल करितों. याउपर देवघेव करीत नाहीं. दिल्हा वसूल घेत आहों व वकिली वगैरे जो वसूल करणें, तो करितों. दोनच्यार प्यादे आणखी ठेविले आहेत. देशाकडील वर्तमान बरेंच आहे. पत्रें पेशजी जीं आलीं तीं सेवेसी पाठविलीं. आपल्याकडील आलीं तीं सर्व **काळोजी जासूद** आला होता, तो घेऊन गेला. राजश्री **माहादेव नाईक दामले** येथें आले होते. आजवर होते. आज स्वार होऊन देशास राजश्री **नानाजी कृष्ण जोसी** व **गणेशपंत दामले पुणियाहून पंत-प्रधान** यांजकडून आले होते. ते, व **गणोबा नाईक कोलटकर** व आणिखी कोणी होते, सर्व समागमें जावया प्रस्तान करून **सिताबर्डी**वर जाऊन राहिले. रा **माहादेव नाईक** व **सदाशिव नाईक सहस्रबुधे, विसोबा नाईक सहस्रबुधे** यैसे तिघे मिळोन आठ हजार रुपये राजश्री **भिकंभटजींच्या** हुंड्यावरून दिल्हे. सेवेसी कळावें. येथील यैवजाची वसूलबाकी [५]गुंतारुंता यैवज जमा कैसें काये हें सर्व **माहादेव नाईकांस** पाहून [६]आडसटा घेऊन देणें म्हणोन **वाईचें** पत्र होतें, त्याप्रमाणें यांणीं मनास आणिलें. आडसटा येक करून दिल्हा. आपणांस कळावें. सारांश स्वामींचें येणें सत्वर झालें म्हणजे उत्तम. भेटीनंतर सविस्तरें निवदेनीं कळों येईल. **रावजी** गेल्या-वर **यजमानांस** कोण काय सांगतात हें न कळे. वरच्या वर जासूद पाठवून आम्हांस बोलावून कांहीं देणें यैसें म्हणतात. त्यास उत्तरें केली कीं, जो यैवज होता तो, **श्रीस** हुंडी खर्चाबद्दल केली. पांचच्यार हजार [७]वोढा करून यैवज रवाना केला. तेवढाच वसूल घेऊन [८]फारक केला म्हणजे फार. यैसें म्हटलें आणि चिठी लिहून द्यावी तरी धणीयाची आज्ञा नाहीं यैसें आहे. त्यास आग्रह यैसा आहे जे, दोन महिन्यांनीं आम्हांकडे आले, यैसी तु (मी) चिठी देणें. येका महिनाभरा आम्ही देऊं, रा **शामराव पुळाजी** यांत दिसतात, आम्ही त्यास म्हणतों, परंतु आम्हांस टावके नाहीं यैसें म्हणतात. परंतु तर्क दिसतो जे, त्यांची सर्व [९]खोवणी. याप्रमाणें वर्तमान आहे, काय होईल पाहावें. आपलें पुण्य समर्थ, तरी गुंतणार नाहीं, यैसें असोन जो विचार, रा **सुभेदार** आहेत त्यांचे विचारें करूं. सारा कारभार वोढींचाच. × पंत जो वागवेल तो बरा. सेवेसी विदित होय. + बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो द्यावा. हे विज्ञापना.

राजश्री **रामचंद्रपंतदादा** स्वामीचे सेवेसी. सां नमस्कार विनंती. पत्रावरून सर्व वृत्त कळों येईल. भेटीचा योग सत्वर घडोन येईल तो सुदीन. भेटीनंतर सर्व निवेदन होईल. सदैव येणारा समवेत पत्रद्वारें परामर्ष करीत जावें. पदरींचे आहों. कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

---

१ नजर म्हणून घ्यावयाची रक्कम वसूल करण्यासाठीं बसविलेला कर. २ ही पट्टी रघूजी भोसले मोकदमी देण्यासाठीं रु।. २५ घेत असे. ३ सरकारी कामगारासाठीं होणारा खर्च भागविण्यासाठीं बसविलेला कर, गोसावी लोकांच्या टोळीचा खर्च किंवा नैमित्तिक गोष्ट घडली असतां तिच्या खर्चासाठीं बसविलेला कर. ४ सरकारांत ( भरणें ). ५ अडथळा, अडचण. ६ अजमास. अंदाज, बेत, अडचण. ७ खटपट, श्रम. ८ कर्जफेड. ९ पाठबळ.

+ पुढील अक्षर लेखकाचें स्वतःचें.

This lengthy letter is written by Rango Mahadeo, a Vaidyas' clerk in Berar, to Vishwanathbhat giving what work he was doing in respect of the recovery of money. He also wrote the movements and doings of certain important personages; such as–Bagajipant, Bapurao Koner, Pant Pradhan Nanasaheb, and Mogals accepting the treaty of 20 lacs, Baba Shashtri, Mahadeo Naik Damle, Nanaji Krishna Joshi, Ganeshpant Damle, Ganoba Kolatkar, Sadashiv and Visoba Naik Sahasrabudhe, Bhikambhat Vaidya, and Shamrao Phulaji. Raghuji was recovering नजरपट्टी, मोकदमपट्टी and खर्चपट्टी from villages in the enjoyment of Vaidyas.

---

पत्रांक ३० ] श्री छ. ४ मोहरम

कार्तिक शुद्ध ५।१६७४

नवंबर ११,१७५२

श्रीमंत महाराज **मातुश्री** **आईसाहेब** यांणीं राजश्री **विश्वनाथभट वैद्य** यांसी आज्ञा केली येसिजे, तुम्ही **वाईस** आलां म्हणून हुजूर विदित जाहलें, तरी देखत आज्ञापत्र हुजूर दर्शनास येणें. दिरंग न करणें. जाणिजे. रा। छ. ४ माहे मोहरम सुरू सल्लास खमसैन मया व अल्लफ बहुत काये लिहीणें.

मोर्तब

सुद

बारसुद सुर सुदबार

The queen Tarabai on knowing Vishwanathbhat's arrival at Wai, sends an urgent call for him. It seems she wanted to consult him on some serious matter.

---

पत्रांक ३१ ] श्री कार्तिक शुद्ध १५।१६७४
नवंबर २८,१७५२

पुरवणी राजश्री **विश्वनाथभटजी** स्वामींचे सेवेसी.

विनंति उपरी. श्रीमंत राजश्री **मुधोजी भोसले** यांचा मुकाम कार्तिक शुध १५ **उमरावतीचा** आहे. तेथून कूच करून **मुलतापी**कडे जाणार आहेत. **नागपुराकडे** आपला गुंता आहे. त्यास येथून तेथें कोणीं पाठवावा, त्याच्यानें काम होणार नाहीं. याजकरितां तेथूनच कोणी कारकून [1] इतबारी पाठविला पाहिजे. अनमान न करावा. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

---

१ प्रामाणिक, भरंवशाचा.

It is a supplementary letter to Vishwanathbhat. The writer gives the whereabouts of Mudhoji Bhosle and requests Vishwanathbhat to send some reliable person from Wai to Nagpur to recover money.

---

पत्रांक ३२ ] श्री कार्तिक वद्य १२।१६७४
डिसेंबर २,१७५२

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथभटबावा** वैद्य स्वामी गोसावी यासि.

पो **सिवराम तुकदेव** व **धोंडो अनंत** सां नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. आपण **वऱ्हाडांतून** आले. तेव्हां **कऱ्हाटीस** स्वामींचें दर्शन झालें. ते समईं आपण आम्हांस सांगितलें कीं, राजश्री **नऱ्होजी जाचक** यास कर्ज द्यावयास आपण मान्य केलें. खत लेहून घेतलें. राजश्री **बाजी विठल फडके** यांची उगवणी घालून खत राजश्री **विसाजी अनंत जोग**

याजवळ त्यांणीं दिल्हें आहे. ऐशाय **बाजीपंता**कडून यैवज न्यावयास माणसें येतील, तीं आम्हांकडे पाठवणें म्हणून सांगितलें. त्यास चिरंजीव **विसाजीपंत** कोकणांत जाते समईं कर्जरोखा आम्हांजवळ येथें ठेविला आहे. यैशास हल्लीं लष्करांतून **बाजी विठल** यांणीं रा॥ **सटवोजी नलंगे** यास यैवज देविला· येविसीं तुम्हांस **बाजीपंतांनीं** पत्र पाठविलें आहे, तें व **नरोजी जाचक** याचें पत्र यैसीं दोनीं पत्रें, पैकियांस माणसें आलीं आहेत त्याजबोच पाठविलीं आहेत. कर्जरोखाही याच माणसाबराबरी पाठविला आहे. त्यास पहिला तुमचा त्यांचा करार जाला आहे व हल्लीं **बाजीपंताचें** तुम्हांस पत्र आहे, त्याप्रमाणें यैवज यास द्यावा. पहिला तुम्हीं त्याजपासीं मान्य केंलें असेल त्याप्रमाणें **सटवोजी नलंगे** यास रु॥ २००० दोन हजार देविले आहेत, ते द्यावे. पैका न्यावयास **नरोजीबाबा**कडील **कान्होजी** जासूद व **सटवोजी नलंगे** यांकडील भला माणूस मुसलमान याचा पत्रें पाठविलीं आहेत. बहुत काय लिहिणें. कृपा असो दीजे+ हे विनंति.

---

+पुढील अक्षरें लेखकाचीं स्वतःच्या हातचीं आहेत.

On his return from Berar, Vishwanathbhat told the writers at Karhati that he promised Naroji Jachak to pay debt. Jachak gave in writing a document which Baji Vithal Phadake signed as a witness. This paper was kept in the custody of Visaji Anant Jog, who while going to Konkan gave it to the writers. On receiving these documents from the writers Vishwanthbhat was to pay Rs. 2000 to persons sent by Satwoji Nalange and Naroji Jachak.

---

पत्रांक ३३ ] श्रीशंकर मार्गशीर्ष शुध ७।१६७४
डिसेंबर १३,१७५२

वा॥ राजश्री **बालंभट व विश्वनाथभट वईद्य** स्वामीचे सेवेसी.

सा॥ **विनाजी केशव दामले** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता॥ मार्गसीर सुध सप्तमीपावेतों वडिलांचे आसीर्वादेंकरून मौ॥ **भालकी** येथें समस्त सुखरूप असो विशेष. आपण गेलिया ता॥ पत्र येऊन परामृश करीत नाहीं, तरी ऐसें न करणें. आलिया माणसाबराबर पत्र पाठऊन परामृश करित असावें. यानंतर

**कुशाजी** पाठविला तो येथें आला, कागदपत्र आम्हीं पाहिले आणि राजमान्य राजश्री **रघोजी भोसले** सेनासाहेबसुभा यांचा कागद होता, तो त्यांस दिला. त्याचा जाब आपणांकडेस पाठविला आहे. वरकड कागद होते ते माघारा पाठविले आहेत. **नबाब** यांचा सला जाहला. **औरंगाबाजे**कडे समागमें जातां श्रीमंत **पेसवे** माघारा **पुणे**यास + + केली आहे. आपणांस कलावें म्हणून लिहिलें आहे. बहुत काये लिहिणें. कृपा लोभ करीत असिलें पाहिजे. हे विज्ञापना.

हो राजश्री **रामचंद्र गोपाळ** व **मोरो रामचंद्र** यांस **विनाजी केशव दामले** याचे साष्टांग नमस्कार. लिा परिसोन लोभ करीत असावें. सूचनार्थ लिहिलें आहे. कृपा करावी हे विनंती.

मोर्तब
सुद

Vinaji Keshav Damle writes to Vaidya brothers from Bhalki that the letter sent for Raghuji, was handed over to him. The important news he worte was that Nabab and Peshwa established former friendly relations between them.

---

पत्रांक ३४ ] श्री+शंकर मार्गशीर्ष वद्य ३।१६७४ शनिवार
डिसेंबर २३,१७५२

राजश्रियाविराजित राजमान्ये राजश्री **नारोपंत** कमाविसदार कर्यात **भुगांव** गोसावि यासि.

सेवक **विस्वनाथभट वैद्य** नमस्कार विनंति उपरी. येथील क्षेम ता मार्गशीर्ष वद्य त्रितिया मंदवरपावेतों मुा **उंदेरी** येथें, जाणौन स्वकीये लेखन करीत जाणें विशेष. तुम्हांस दोनच्यार पत्रें पाठविलीं कीं, घोडीं घेऊन सत्वर येणें. त्यास अद्याप येत नाहीं. हालीं पत्र लिहिलें आहे व का **भुगांव** व **टेकाडी** व का **मवाड** व मौजे **इसापूर** येथील ताकिदी व प्रांत **देवगडचे पोतदारांच्या** पेसजीप्रमाणें ताकिदी पाठविल्या आहेत. घेऊन जेथील सनदा तेथें लाऊन आमल सुरू करणें, व **ज्यान महंमद** यासही ताकीद पाठविली आहे, हें त्यास देऊन गांवास व ताकिदी व **पोतदारांच्या** माहालेनहाल ताकि(दी) घेऊन आमल चालता करणें. **इसापुरास संकराजीपंतास** पाठऊन तेथें सनदा लाऊन आमल चालता करणें. तेथें **संकराजीपंतास** ठेऊन तुम्हीं पेसजी लिहिल्याप्रमाणें घोडीं घेऊन सत्वर येणें. दिवसगत न लावणें. येते

समई कांहीं **बंगाल्या**कडील जिनस रेसीम व सोवलीं यैसे सस्ते किफईतवार यैसे मिळाले तर कांहीं घेऊन येणें. व **रामटेक**चे फडनिसीची ताकीद व **नागपूर** प्रांतची वकिली व दप्तरदारीची ताकिदी पाठविल्या आहेत. येणेंप्रमाणें आसाम्या चाल्त्या करणें. तेथील बाकीसाकी कामकाज **संकराजी कान्हो** यांचे स्वाधीन करून तुम्हीं पत्रदर्शनीं स्वार होऊन येणें, व कुलबिणी दोन घेऊन येणें. घोडीं घेऊन येणें. पत्र पावतांच निघोन येणें. येते समई **मवाडाहून** म्हसी आणविल्या आहेत व कुलबिणी व सूतताणे, कांहीं खाद्या, त्या **राहाटगांवचे महादाजी** पाज्यास हिशेब व कांहीं रुपये बराबर घेऊन येणें. + तुम्हीं सत्वर येणें. बहुत काये लिहिणें. हे विनंति.

ताकिदी सुमार १७

पैस्ता **काळोजी** जासूद
छ. १४ वदी मार्गेस्वर
गुरूवार

Vishwanathbhat writes to Naro Anant Gadre from Underi to say whether the orders regarding the recovery of money from villages Bhugaon, Tekadi, Mawad and Isapur and also the Potadari Amal of Deogad, were served and the work begun. He desired that he should use the service of Shankaraji Kano to do the work. He asked him to buy silk and holy cloth from Bengal if found cheap there. This letter shows how Maratha trade and life expanded by contact with distant lands like Bengal.

---

पत्रांक ३५ ] श्री मार्गशीर्ष वद्य ९।१६७४
डिसेंबर २९,१७५२

श्रीमंत राजश्री **विश्वनाथबावा** स्वामीचे सेवेसी.

सेवक **रंगो महादेव** सिरसाष्टांग नमस्कार विनंति. येथिल कुशल ता॥ मार्गसीर्ष वद्य ९ मुक्काम **नागपूर**. स्वामीचे कृपावलोकनें येथास्थित आसे. विशेष. कृपा करून **आनंदराम** जासूद याजबा॥ पत्रें पाठविलीं तीं पावोन संतोष जाला. पत्रीं आज्ञा जे, ज्याज्यांस पत्रें पाठविलीं आहेत, हीं लखोटे करून पावतीं करणें, आणि लिहिल्याप्रमाणें काम करून प्रत्योत्तरें घेऊन पाठवणें. त्यांस आज्ञाप्रमाणें पत्रें सर्वांस पाठविलीं. जीं उत्तरें आलीं तीं घेऊन पाठविलीं आहेत. त्यावरून कळेल. स्वार प्यादेयाविसीं व दस्तकाविसीं त्यांस देस्तकें राजश्री **राघोपंता**जवल घेऊन दिल्हीं;

स्वार प्यादे राजश्री **बलवंत रावजींनीं** नेमून दिल्हे; परंतु त्यांनीं व राजश्री **सुभेदार** यांनीं तजवीज केली जे, येथील स्वार प्यादे पाठवणें तर निभावणें कठिण. दुसरें, चोमाट कार्याचा नाहीं. तेथेंच सिबंदी सेपनास [1]पुरबी ठेऊन आणावें हें उत्तम. यैसी विचारणा केली, आणि राजश्री **राघोपंता**जवळ **रामटेकचे** प्यादे वीस, रा **नारो रघुनाथ** यांजकडून रावजींनीं देविले ते व कांहीं **राघोपंत** घेऊन येतील व दस्तकें व संस्थानें यांचीं पत्रें, यैसीं घेऊन दोचौ रोजांत माानुलें येतील. कळावें. इकडील सविस्तरें वृत्त **राघोपंत** सांगतां कळेल. आम्हांजवळून श्रीमंतीं ती हजार रुपये घेतले. त्याविसीं दोन महिने टाळाटाळी केली. निदान **जिवराव मोहिते** यांजकडे कर्ज होतें दोन हजार. त्याचें व्याज दोनसे यैसें व आठसे दुसरेकडील, यैसें त्यांणीं [2]वळू (न) घेतलें, आणि आम्हांवर वरात त्यास तीन हजारांची करून दिली. ते कबूल करीत नसतां कांहीं जबरदस्ती जाली. कामकाज जत करितों. सावकारीकरितां धणी-यास काय वोढा पडला आणि तुम्ही न द्याल तरी कार्यास येणार नाहीं. तुमचे गांव व वकिलीच्या ताकिदी देतों, यैसें कितेयेक प्रकारें खरें लकटलों. **शामराव फुलाजी** वगैरे म्हणोन घेतले, हें वर्तमान भेटीनंतर कितेक कळेल व **राघोपंत** निवेदन करील त्यावरून कळेल. दोन वेळ गांव घेतला. मागती त्यास दिल्हा. मतलबी दरबार. खरें कांहीं नाहीं. आज करणें तें उदईक नाहीं, हें रीत आहे. कामकाज आळणी पडलें आहे, उगेच [3]भामेभाम आहे. कळलें पा. दुसरे **चिंताजी नाईका**चा सोबलीं रवाना केलीं आहेत. त्यांच्या यादी आलाहिदा होत्या, त्याही पावल्या आहेत. तेथें आज्ञेप्रों आलियावर घेऊन निवेस ठेवितों. राजश्री **बलवंतराव** येथें होते या चौ रोजांत पेशजी गेले. पत्रें येथेंच त्यास पावलीं. त्यांचीं प्रत्योत्तरें आहेत. त्यावरून कळेल. त्यांचीं सनगें आलियावर तींही [4]निवेस ठेवितों. **मातुश्रीबाईचा** कागद पावला. हुंडी केली होती ती आज्ञेप्रों आमान्य झाली. (परं)तु यैवजही नव्हता. यैवज याउपरी येणें तो वसूल घेऊन जमा करितों. राजकी वर्तमान तरी **मोगलांसी** सल्लूख नाहीं. राजश्री **रावजी** महिना दीड महिना पुढें गेलें. आहेत तेही **वराडांत** आहेत. श्रीमंत वद्य प्रतिपदेस गेले. राजश्री **आणा** काल-परवां गेले. वोढीच्या प्रसंगानें येथें कितेका-जवळून कामकाजाच्या घालमेली करून यैवज घेऊन फसविलें, यैसें वर्तमान आहे. श्रीमंतास कागद होता व रावजींचा, यैसे कागद राजश्री **आणा** यांनीं आपल्या जासूदा-बा। पाठविले. त्यास पावतील. राजश्री सुभेदार यांनीं लिा आहे, त्यावरून कळेल. हुंडीविसीं जासूद माघारा आला आहे. म्हणत होता जे, रुा तेथें घेऊन लटकी चिटी दिल्ही. तेथें जाऊन दुपट रुा घेणें, त्यावरून माघारें पाठविला. कळलें पा. या दो रोजांत **राघोपंत** निघतील. आलियावर सर्व वर्तमान कळेल. बहुत काये लिहावें, हे विज्ञापना. राजश्री **सिवभटजीस बंगालिया**च्या यैवजाची ताकीद दिल्ही आहे, ती पाठविली आहे.

---

१ पूर्वी. २ तयार करून. ३ भ्रमिष्ट, घोंटाळा. ४ काळजीनें.

This letter is written by Rango Mahadeo to Vishwanathbhat from Nagpur, giving the account of the result of the work assigned to him and about the recovery of money, from persons whose payment was due. The debtors were important persons like Jiwarao Mohite, and Shamji Phulaji. He also informed that Mogals had not come to terms yet. He criticised the mismanagement in the administration of Bhosle. He wrote a letter to Shiwabhat Sathe to pay the money, out of the sum, brought by him from Bengal.

---

पत्रांक ३६ ] श्री+शंकर मार्गशीर्ष वद्य ११।१६७४
डिसेंबर ३१,१७५२

राजश्रियाविराजित राजश्री **कृष्णाजीपंत सुभेदार** स्वामी गोसावी यासि.

सेवक **विश्वनाथभट वैद्य** नमस्कार विनंति उपरी. आमचे यैवजपैकीं राजश्री **निलो रघुनाथ** यासि रुये ६३०० सा हजार तीनसे रुये देणें. मिती मार्गशीर वद्य ११ येकादसी शके १६७४ भावनाम सवछरे सदरहू रुा पावलियाचें कबज घेणें. बहुत काये लिहिणें. +हे विनंति.

---

+ पुढील अक्षर लेखकाचें स्वतःचें आहे.

Vishwanathbhat writes to Krishnaji Govind Gore, Subhedar of Berar, to pay Rs. 6300 to Nilo Raghunath Vaishampayan, who was the same person who wrote a letter to Vaidyas about the capture of Chandakhan at Trichanapalli.

---

पत्रांक ३७ ] श्री छ. २६ सफर
अंगिरा मार्गशीर्ष वद्य १३।१६७४
जानेवारी २,१७५३

देणें कर्ज राजश्री **बाळंभट व विश्वनाथभट वैद्य** सुा सलास खमसैन मया आलफ हिसेब करार.

रुपये
४५७४४॥·

| यासी यैवज | रुपये |
|---|---|
| २७००० | साल मार बीड आबड |
| २०००० | जालनापूर साल मजकूर |
| ४७००० | |

येणेप्रमाणें यैवज देऊन पुढें यैवज लागेल तो तुम्हीं घ्यावा. दरमाहा व खर्च यैवज पाहिजे करार ५०००० रुये. सदरहू पन्नास हजार रुा नवें कर्ज सरकारांत घ्यावें. छ २६ सफर मुा वाडीनाजिक किल्ले विचित्रगड.

Pant Sachiv wanted a debt of Rs. 45,744-8 from Vaidya brothers. For this, he gave a security of his revenue of Beed Ambad and Jalnapur. A new contract was made for the payment of Rs. 50,000 over and above the previous sum, for expenses usually to be made every month, and occasionally.

---

पत्रांक ३८ ] श्री मंदवार

पौष शुद्ध २।१६७४

जानेवारी ६,१७५३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **बाळंभट** व **विश्वनाथभट** वैद्य स्वामींचे शेवेसी.

पो **महादाजी जिवाजी** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी. श्रीमंत राजश्री **पंतसचीव** यांणीं श्रीचे देवालयाचे इमारतीकडे तुम्हांकडून यैवज देविला. त्यापैकीं रुा ५०० पाचसे आम्हो भरून पावलों. मिा शके १६७४ अंगिरा नाम सवत्सरे पौष शुध द्वितीया मंदवार. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. छ ३० माहे सफर हे विज्ञापना. सुमा सलास खमसैन मया अलफ हे विज्ञापना.

This is a receipt of Rs. 5000 given to Vaidya brothers by Mahadaji Jiwaji Sathe, the engineer, who was appointed by Pant Sachiv to build the temple at Ambawade. Pant Sachiv borrowed money from Vaidyas to build the temple and Vaidyas had to pay the money to the engineer by instalments.

पत्रांक ३९ ] श्री पौष १६७४
जानेवारी १७५३

राजमान्य राजश्री **बाळंभटबाबा** व रा. **विश्वनाथभट वैद्य** स्वामी गोसावी यांसि.

सेवक **गणेश कृष्ण दामले** नमस्कार विनंती. क्षेम जाणून स्वकुशल लिहित गेलें पाहिजे. विशेष राजश्री **बाळाजी थोरात** यांनीं च्यारसे रुपये तुमचें देणें आहेत. तर ते ४०० तुमच्या नांवें जमा आम्हीं करून ठेविले आहेत. चिठी करून उतरून घेणें. सदरहू रुपयांचें कबज पाठवून दिल्हें पाहिजे. याजनंतर दरबारचें वर्तमान यथास्थित असे. **करवीरवासीयांजकडे पुणीयाचे** ग्रहस्तांचें सूत्र लागलें आहे, ऐसें वर्तमान असे. बहुत काय लिहिणें. सदरहू च्यारसे रुपयांचें कबज पाठवून दिल्हें पाहिजे. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

हेच **माहादाजीराम दामले** सां। नमस्कार. विनंती उपरी लिा परिसोन लोभ करीत गेला पाहिजे. हे विनंती.

Ganesh Krishna Damle writes to Vaidya brothers that the sum of Rs. 400, due from Balaji Thorat to you, has been credited to your account and hence its receipt may be sent. He also informs that a Poona man, probably Sadashivrao Bhau, is likely to be a premier of Kolhapur State.

---

पत्रांक ४० ] श्री पौष शुद्ध ११।१६७४
जानेवारी १५,१७५३

चिरंजीव राजमान्य राजश्री **बाळंभट** (व) **विश्वनाथभट वैद्य** यांसी. **केसो बहिरव** आसिर्वाद. उपर येथील कुशल ता। पौष्य शुध येकादसीपावेतों येथास्थित आसे. विशेष. नोवरे मुलीविसीं लिहिलें होतें. त्याजवरून राजश्री **भास्कर हरी पटवर्धन** यांची मूल नोवरी साता वरसांची आहे. त्यांचेंहि माणूस साल्गुदस्ता तुम्हांकडे आलें होतें. तें मनांत आणिल्यास तुमचें राश–नक्षत्र व सूत्र उंचीचें, येसें आणाविलें आहे. दोघांचें लिहून पाठवणें. बहुत काये लिहिणें हे आसिर्वाद. गाईविसीं लिहिलें. त्याजवरून गाई पाठविली आहे, घेणें. हे आसिर्वाद.

Keso Bahirav Vaidya writes to Vaidya brothers to send the horoscopes in order to see if the girl of Bhaskar Hari Patwardhan of 7 years can be approved of, for Rambhat, Balambhat's son.

---

पत्रांक ४१ ] श्री पौष शुद्ध १४।१६७४
जानेवारी १८,१७५३

श्रीमंत महाराज मातुश्री **आईसाहेब** यांनीं राजश्री **अजबसिंग भोसले,** हवालदार व कारकून किले **पांडवगड** यासी आज्ञा केली येसीजे. राजश्री **भिकाजी बल्लाळ** हे हुजूर कार्याचे जाणोन यांजवरी कृपाळू होऊन यांची आसामी सभासदात घालून **किले** मजकुरास पाठविले असेत. यांस **किलीयावरी** घेऊन याचे हातें सेवा घेणें. यांस तैनात सालिना, देखील चाकर [1]मोइनप्रों होन पा. ७०० सातसे [2]रास करार केले असेत. ह्या पैवस्तापासून [3]वजावाटा दंडकप्रों वजा करून, उरलें वेतन दरबार सिरस्ता [4]सां देत जाणें. चाकर मोईनप्रों, हजीर करतील त्या दिवसापासून चाकराचा हक्क शिरस्ता [4]सां पावीत जाणें. यांसी जमीन, नवा सरंजामपैकीं, तैनाती, माफीक, दुमाले करून सेवा किला घेणें. यासी [5]जमान **किले** मजकुरीं घेणें. जाणिजे छ १२ माहे रबिलावल सुा सलास खमसैन मया अलफ. लेखनालंकार.

(मोर्तब सुद)

---

१ टराव. २ संख्या. ३ हिशेबाचा उलगडा. ४ सांगोन. ५ जामीन.

The Queen Tarabai writes to Ajabsing Bhosle, Havaldar and clerk of Pandavgad that Bhikaji Ballal (Vaidya) has been appointed to work at the fort under him and he will be paid Rs. 700 as remuneration according to the rules of the State.

---

पत्रांक ४२ ] श्री पौष वद्य ७।१६७४ गुरुवार
जानेवारी २५,१७५३

सेवेसी **केसो कृष्ण सेवेकर** यांचा सां नमस्कार. विनंति आम्ही गुरुवारीं सायंकाळीं निघोन शनवारीं स्वामीपासीं **वाईस** येतों. **सातारियां**तील वर्तमान तरी **बापूजी नाईक** यांसीं तीन जखमा लागल्या. पनाससाटी स्वारानिसी आले, ते हुजुरांत सामिल जाहली, तेन्हां येऊं दिल्हें. वरकड **आबाजी नाईक** व हस्ती देखील धरून नेला. **आबाजी नाईक** उघडा नागवा लोकांनीं केलियावरी **यमाजी-पंताची** गांटी पडली. त्यांणीं आपले अंगावरील वस्त्रें घातलीं. येसें आहे. **राजश्री**

**महादाजी नारायेण** वऱ्हाडांतून आले. त्यांचे घरीं लग्न कन्येचें आहे. **जोगाचे** घरीं दिल्ही. वऱ्हाड प्रांतचे सरदेशमुखीचे मामलतीविसीं स्वामीस शब्द लाविला. आम्ही येऊं तों न जाणें. येका (द) दिवस शहरांत नजिक मुक्काम करणें. हे विनंति.

Keso Krishna Shembekar writes to Vishwanathbhat that he intends to see him next Saturday. He communicates to him the Satara news that Babuji Naik got three wounds and then joined the Huzur army with 50 soldiers. His brother Abaji Naik and an elephant were taken away. Abaji was made naked. When Yamajipant came, he gave him clothes to wear. (See P. D. 6. 213). This battle took place at Chinchaner near Tandulwadi.

---

पत्रांक ४३ ]                श्री                छ. १७ रावल
पौष वद्य ५।१६७४
जानेवारी २३,१७५३

कर्जरोखा शके १६७४ अंगिरा नाम संवत्सरे पौष वद्य ५ पंचमी ते दिवशीं खत लिखिते धनको नाम राजश्री **बाळंभट व विश्वनाथभट वैद्य** यांस रिणकोनाम **माहादाजी नाईक निंबाळकर** कारणें रोखा लिहून दिल्हा येसाजे. तुम्हांपासून आत्मकार्य [1]पर्वत संमधें घेतले रुपये ४००० चार हजार, यांसि व्याज दरमाहे दरसदे रुो २ दुहोत्राप्रमाणें वारून देऊं. हा रोखा लेहून दिल्हा सही. सदरहू रुो ह्यापासून सा महिन्या देऊं. मेाा

विद्यमान **गोविंद कृष्ण** दिा मार तेरीख १७ माहे रावल.

सदर्हू खेरीज पत्रें.

राा **दिनकर महादेव** यांचें पत्र कीं, तुम्ही पत्र पाा तें पावलें. राा **महादाजी नाा निंबाळकर** यांजकडे कर्ज येणें त्याचा हिशेब पाा आहे. त्यांस ताकीद करून पैका देवावा, म्हणोन लिहिलें, तें कळों आलें, त्यास मार-निल्हेस तुमचा मजकूर फार निकडीचा शिक्का असे.

वरात नांवें राा **निंबाजीपंत मुजुमदार व चिमणाजीपंत शेखदार** टाण **नात्यापुतें** प्राा **दहीगांव** यांजवर **माहादाजी नाा** यांनीं वरात लिहिली कीं, सुाा सन ११६९ राजश्री **दिनकर महादेव** यांच्या कर्जांपैकीं सन ११७० या सालांत प्राा मार च्या यैवजीं यांस रुो एक हजार देणें आणि त्यांजपासून

सांगितला. त्यास त्यांनीं सर्व कर्जदारी-यांस येकोत्रा सरळे व्याज करून हते-बंदीप्रों पैका द्यावयाचा करार केला. त्याप्रों तुमची मोडतोड करावी तर तुम्हांस सांगितल्याविना कसें करावें, याजकरितां तूर्त हजार रुायांची चिठी घेऊन पा। आहे. **आंजणडोहास** पा। पैका आणवणें. बाकी राहिला यैवज मारानिल्हे मुलुकगिरीहून आल्यावर तोड-मोड करून देणें ते देतील. तुमच्या कार्यास आम्हांकडून अंतर होणार नाहीं. यैसें पत्र १.

रुा पावलियाचें कबज घेणें रा। छ. ७ माहे शाबान वर मोर्तब असे. (प)त्र १

**दिनकर महादेव** यांचें पत्र रा। **निंबाजीपंत मुजुमदार** व **चिंतामणपंत शेखदार** यांस पत्र १

हिशेब बंद १

एकूण पांच पत्र रा। **बाळाजीपंत आठवले** यांजपासी **पुणेयास** पा। दिल्हीं. जेष्ठ वा। ६ नंदनसवछरे.

सदरहू **आपाजीपंत आठवले** याचा पा।.

---

१ ओझें, बोजा, देवघेव, व्यापार.

This is a copy of the deed of debt passed by Mahadaji Naik Nimbalkar of Rs. 4000, with Vaidya brothers, the interest being Rs. 2 per cent per mensem. The sum was to be paid in 6 months. Below this copy, it is stated, the copies of the letters written by Dinkar Mahadeo about the repayment of the debt are sent to Balujipant Athawale in Shaka 1647 that is after 20 years.

---

पत्रांक ४४ ] श्री छ. ९ भौमवार-रा।खर
माघ शुद्ध १०।१६७४
फेब्रुआरी १३, १७५३

राजमान्य राजश्री **बाळंभट** व **विस्वनाथभट वैद्य** स्वामी गोसावी यांस.

सेवक **माहादाजीराम दामले** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें लि। वर्तमान कळों आलें. आपण लि। कीं, त्रिवर्ग वराडांतून आले. त्यांचे मालाची चउकसी करणें म्हणून लि।, त्यास ते त्रिवर्गही आपणांकडे उदईक येणार व आम्हीही येतों. आपणांस कळावें म्हणून लि। असे. याज-नंतर दरबारचें वर्तमान तर राजश्री **बाबूजी नाईक** यांचें युध बहुत जाहालें. जखमा

तीन लागल्या असेत. रा **आबाजी नाईक** तव श्रीमंत **प्रतिनिधींच्या** लस्करांत जुंजामध्यें, त्याच्या हातांस लागलें. ते प्रस्तुत त्यांच्या लस्करांत असेत. याजनंतर सविस्तर वर्तमान तर आपण परस्परें ऐकिलें असेल. याजनंतर रा **माहादाजी नारायेण पोंक्षे** वराडांतून मुलीच्या लग्नास आले आहेत. जोगाबराबर शरीरसमंध योजिला आहे. आपणांस कळावें म्हणून लिहिले आहे. राजश्री **राघोपंत राजवाडे** यांनीं पत्र आपणांस लिहिले आहे तें पत्र-अवलोकन करून त्याचा प्रतिउत्तर पाठविलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. रा **केसोपंत** व **श्याम** × × यांनीं पत्र लिहिले आहेत. तर **माहादाजी** व आम्हीही येतों. बहुत काय लिहिणें हे विनंती.

This letter of Mahadajiram Damle contains the same news as given by Keso Krishna Shembekar to Vaidya brothers in his letter dated January 25,17. It is to be found out who were the three persons that returned from Berar. The fight mentioned was between Babuji Naik and Jagjiwanram alias Dadoba Pratinidhi.

---

पत्रांक ४१ ] श्री अंगिरा फाल्गुन १६७४
मार्च १७५३

राजमान्य राजश्री **बाळंभट व रा विस्वनाथभट वैद्य**
स्वामी गोसावी यासी.

सेवक **माहादाजी राम दामले** कृतानेक.साष्टांग नमस्कार. विनंती उपरी आपण सजुगरे पाठवणें म्हणून सांगितलें, त्यास रा **राघोपंत राजवाडे** यांस पुसिलें. त्यां(नीं) निघती उतर केलें जें, आम्हांपासून **वैद्यबावांनीं** रुपये मजुरा हिसेबांत घेतलें, तेव्हां आम्हीं सजुगरे खर्च केले. आतां आम्हीं सजुगरे कोठून द्यावे ऐसें म्हणतात. आपणांस कळावें, म्हणून लिहिले असे. याजनंतर खिळे किंमत रा ४ च्यार सुमार खिळे ९५ पैकीं पेसजी पाठविले ५१ बाकी हालीं पाठविले ४४. येकून पंच्याणव वजन पक्के पांच सेर दर १। सवासेर प्रों ६॥। याजनंतर राजश्री **पंतप्रधान कडेगांवावर** आले आहेत. येथून रा **दिनकर माहादेव** व रा **सदासिव रघुनाथ घाणेकर** रा **माहादाजी ना निंबाळकर** ऐसें त्रिवर्ग आज स्वार होऊन **पंतप्रधान** याजकडे रवाना जाहाले. **पंतप्रधान** व **पंतप्रतिनिधि** यांच्या भेटी जाहल्या. **सातारा** यावें ऐसा विचार आहे. आपणांस कळावें म्हणून लिहिले असे. बहुत काय लिहिणें. कृपा निरंतर असिली पाहिजे. हे विनंती.

Mahadaji Ram Damle writes to Vaidya brothers why Raghopant Rajwade did not keep for them Sajagura corn i. e. Bajari. Peshwa, Dinkar Mahadeo and Sadashiv Raghunath Ghanekar and Mahadaji Naik Nimbalkar met together at Kadegaon and it seems they discussed how the mother Tarabai and Peshwe would establish friendly relations. Pratinidhi also met Peshwa. Dinkar Mahadeo was the Karbhari of Tarabai. (see P. D. 6. 213 to 216 letters.)

---

पत्रांक ४६ ]

श. १६७४
स. १७५२

( पहिलें पान सांपडलें नाहीं. )

२

प्रमाणें निघोन येणें. घोडियांची व उंटेयांची निगादास्त उत्तम प्रकारें करणें. राजश्री **जानोजी भोसले** याचा अद्याप तहरह जाहला नाहीं. वरकड सविस्तर वर्तमान मागाहून लिहून पाठऊं. श्रीमंत राजश्री **पंतसचीव** यांणीं चारा हे ( शें ) रुपये याच्या चिट्या केल्या आहेत त्याप्रों यैवज देणें. बहुत काये लिहिणें. मातुश्री **सकूबाई** यांसि पत्र लिहिलें आहे. तरी त्यांस सांगणें कीं, चिरंजिवाचें लग्न करणें आहे. लग्न जाहलें म्हणजे श्री **द्वारकेस** रवानगी करून देऊं म्हणोन सांगणें. घोडिया घरीं आहेत, त्यास घोडियांनीं हत्याणें केलीं असिलीं तरी बरेंच जाहालें. बरोबर घोडिया घेऊन येणें, घोडें न आणणें. घोडिया येथें काढऊं, तरी घोडी घेऊन येणें. बहुत काये लिहिणें. हे आसिर्वाद.

The letter, from the two lines at the end, seems to be written by Vaidyas. The addressee cannot be determined. The referrence to the differences between Janoji and Raghuji will be useful to fix the date. Vaidya is very careful to have the mares covered by horses of good kind. The pilgrimage of Sakhubai is also referred.

---

# श्रीमुख संवत्सर शके १६७५

## इ. सन १७५३-५४

पत्रांक १ ] श्री+रामचंद्र चैत्र १६७५
एप्रिल १७५३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **बाळंभट** वैद्य स्वामी गोसावी यांसि.

पोष्य **चिमणाजी नारायेण सचीव** नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणौन लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावोन वर्तमान विदित जाहालें. तरी वासे बाकी राहिले, तेहि मागाहून रवानगी करवितों. तुम्हीं लिहिलें कीं, **जांभळीचें** गवत व पानभारे व चुडवेडे किले **राजगडकरी** हे तगादा × × कारितात तरी नाना पत्र किलेमारास पाठविलें आहे. तगादा करणार नाहीं व ग(व)त ३००० तनि हजार **जांभळी**च्या पाटलाबा दिल्हें आहे. आणखीही गवत लागेल तें देऊं. राजश्री **विश्वनाथभट** यांजकडील वर्तमान तुम्हांस अढळलें असेल तें लिहोन पाठवणें आणि तुम्हांकडीलही वर्तमान सविस्तर वरचेवरी लिहीत जाणें. + बहुत काये लिहिणें. लोभ असो दीजे, हे विनंति.

---

+ पुढील अक्षर सचिवांचें.

Chimnaji Narayan Pant Sachiv writes this letter to Balambhat, regarding the supply of grass of Jambhali forest and other things to him. The fort officer of Rajgad was warned by him not to obstruct the Vaidya's men, from cutting the grass. It is to be marked that Pant Sachiv takes care even of the household conveniences of Vaidyas.

---

पत्रांक २ ] श्री चैत्र शुद्ध १०।१६७५
एप्रिल १३,१७५३

श्रीमंत राजश्री **बालंभटबावा** व तथा राजश्री **विस्वनाथबाबा** स्वामींचे सेवेसी.

विनंति सेवक **संकराजी कानो** सिरसाष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लेखन करावया आज्ञा केली पाहिजे. विशेष. आम्हां-

कडील वर्तमान ता चईत्र सुध दशमी मुा **नागपूर** स्वामींचे आसीर्वादेंकरून सुखरूप असो. यानंतर आपण पत्रें राजश्री **गोविंदपंत व रा मल्हारपंता-** बराबरा पाठविलीं तीं पावलीं. लिहिलें वर्तमान कळों आलें. **राहाटगांवचें** वर्तमान दोनचार वेळां लिहिलें. पत्रें पावलीं कीं नाहीं, हें नकळे. त्यास तो गांव जबरदस्ता खालें आहे. **सिरगिरे** याकडे आहे. सेतें गांवांत. याचींच घरें, घोडीं अगदीं गांवांत. [१]मवेसी त्यांचीच आहे. याकरिता राजश्री **आपा** बोलिलें जें, गांव चालणार नाहीं, तो त्याहीमध्यें सनदेंत **सिरगिरे** यैसें लिहिलें नाहीं, तुम्ही खांद्यावरी धोतर घालून आसलेत, तुम्हांसी कोण मानितो ? आणि स्वामींनींही आम्हांस सांगितलें नाहीं, जें तुम्हीं गांवास जाणें, यैसें सांगितलें नाही. **आपा**पासीं नेऊन सनदा द्या, येसी आज्ञा केली, त्यावरून आम्हीं **आपा**पासीं सनदा दिल्या. त्यांनीं **संकराजी गोविंद** यापासीं दिल्या. ज्याच्या नांवाच्या सनदा तो कमाविसदार येईल, त्यापासीं देणें. यैसें वर्तमान गांवचें वर्तमान जाहालें. रा **गोपाल अनंत** यांनीं **आपा**कडे जावें. ते परभारें **नागपुरास** आले. तें वर्तमान पत्रीं कोठवरी ल्याहावें ? भेटीनंतर विस्तारें निवेदन होईल. रा **जयरामभट** यांणीं तिसा हजारांच्या हुंडिया **निर्मले**हून केल्या, त्या हुंडियांपैकीं रुपये पांच हजार **स्वामीस** देविले, यैसें आण शपथ वाहून आम्हांसीं त्यासी बहुत कटकट जाहाली, ते सर्वांसी ठाऊक आहे. तेव्हां इतका निर्वाहा केला आणि आपण **बंगालियास** राजश्री **आपा**बराबरीं गेले. त्यास आपणांकडे हुंडी केवढी-याची गेली ते लिा. रा **माहादाजी कृष्ण व हरी कृष्ण काणे** यांणीं आम्हांसी बहुत घसघस केली, ते ईश्वर जाणे. तेव्हा **उमरखेड**ची चुकोती जाहाली. तेव्हां समये रासोन दोन हजारांची निशा करून घेतली. बाकी **वसमत** चुकेल तेव्हां तीन हजारांची निशा करून पाचाची हुंडी करून पाठवितों, यैसें आपले मातापित्याचा शफत वाहून करार केला. त्यास हुंडी कि(ती) रुपयांची गेली, तें लिहिलें पाहिजे. वरकड. (पुढील बंद मिळाला नाहीं.)

---

१ मालमत्ता, गुरन्ढोरें.

Shankarji Kano writes this letter to Vaidya brothers, from Nagpur, infoming that Rahātgaon was under the strong control of Sirgire who had his property houses and horses in the village. Hence Shankaraji thought that it was difficult to manage it. Jayrambhat sent hundis of 30 thousands from Nirmal, and went to Bengal with Appa. Vaidyas, he said on oath, were to receive only Rs. 2000, including the revenue of Vasamat village also.

पत्रांक ३ ]　　　　श्री　　　　चैत्र वद्य ९।१६७५
एप्रिल २३,१७५३

श्रीमंत राजश्री **बाळंभट** व ता राजश्री **विश्वनाथभट वैद्य** स्वामीचे सेवेसी–

सेवक **नारो अनंत गद्रे** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथिल क्षेम तागा चैत्र वद्य नवमी मुा **पातुर** जाणून स्वकीयें लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपणांकडील कागदपत्र येऊन बहुत दिवस वर्तमान कळत नव्हतें. त्यास हल्लीं **पुजाजी** जासूद याजबाा पत्र पाठविलें तें पावोन संतोष जाहाला. या प्रांतीचें वर्तमान तर श्रीमंत राजश्री **बाबासाहेब** यांचा मुक्काम **नागपुरीं** आहे. फौजेस तमाम निरोप दिल्हा. दोन हजार स्वार प्रस्तुत नागपुरीं आहेत. रा **सिवभट साठे नागपुरास** आले. सा लक्ष रुा हुंड्या घेऊन बाा आले. या प्रांतें लोकांकडे पैका येणें, त्याजपैकीं येणेंप्रों आला. राजश्री **हंसपुरी गोसावी** यानीं राजश्री **सिवाजी दादाजी** यांजकडे देविले रुा २५००० पंचवीस हजार. मिा चैत्र सुध पंचमी. पाा **नांदगांव काजी**पैकीं रुपये येक हजार व राजश्री **बाजी विठल** यांजकडील ह्या यैवज **विसाजी अनंत जोग** रुा साडे दाहासे, राजश्री **कृष्णाजी गोविंद** यांजकडील रुा तेतीससे साठ घेतले आणि **कृष्णाजी मोरेश्वर** यास दिल्हे. बाा यैवज खाा कापड आदा **जखापा कोबडा** रुा पांच हजार पैकीं आणिखी **कृष्णाजी गोविंद** यांजकडे यैवज येणें आहे, तो द्यावयासी ते सिध आहेत, आम्हीच घेत नाहीं. **रामाजी गिरधर** यांजकडील यैवज येत नाहीं. त्याजकडे तगादा बहुत केला, परंतु पैसा येत नाहीं. रा **कृष्णाजी गोविंद आलजपूर**चे सुभे यांचा बंदोबस्त करावयासि जाणार आहेत, त्यांजबाा आम्ही जाऊं. कटकट करून पाहो. **सिकेनिसी व वकिलीचा** यैवज रा **कृष्णाजी मोरेश्वर** यांनीं **श्रीमंतास** सांगोन सरकारांत ठेविला आणि आपले कर्जाचे यैवजीं त्यांनीं घेतला. **सिकेनिसीचा** यैवजपैकीं चार हजार रुा **कृष्णाजी गोविंद** यांस दिल्हे. **वकिली**पैकीं दोन हजार रुा तुम्हांस नेमिले आहेत; परंतु अद्याप वसूल जाहाला नाहीं. मौजे **राहाटगांवची** जमाबंदी कुल रुा १५०० पंधरासे राजश्री **कृष्णाजी गोविंद** यांनीं करार केले, त्यांजपैकीं **सेखजी जखापा कोबडा** यांजकडे रुा वसूल सातसे. बाकी आठसे राहिले, त्यापैकीं च्यारसे रुा आठा पंधरा रोजांत वसूल होतील. **फडनिसीचें** वर्तमान तर हा कालपर्यंत पैसा येक पावला नाहीं, दोनसें रुा तुमचे यैवजपैकीं **कृष्णाजी गोविंद** याजपासून घेऊन खादले. येणेंप्रों वर्तमान आमचें आहे. हा कालपर्यंत आपले आगमनाचा मार्ग लक्षिला. त्यांस अद्याप या प्रांतांस यावयासी दोन महिने लागतील, ऐसें दिसतें. त्यांस आम्हांस जे आज्ञा करणें असेल ते करावी. त्यप्रमाणें वर्तणूक करून. त्यास पदरचा पैसा खाऊन येथें राहावें, ऐसें येथील वर्तमान आहे. स्वामीस कळावें म्हणून लिहिलें आहे, ज्याप्रमाणें आज्ञा होईल त्याप्रों वर्तणूक करून. उत्तर पाठविलें पाहिजे. बहुत काये लिहिणें, लोभ असो दीजे हे विनंति.

Naro Anant Gadre writes to Vaidya brothers the account of his work regarding the recovery of money and other political news, from Patur. Raghuji had come to Nagpur and disbanded whole of the army excepting 2000 horse-men. Shivbhat Sathe had come to Nagpur with hundis of 6 lacs.

The following persons of this province paid the money due from them. ( 1 ) Hansapuri Gosavi paid 25 thousand rupees to Shivaji Dadaji. ( 2 ) Baji Vithal paid $10\frac{1}{2}$ thou sands through Visaji Anant Jog ( 3 ) Rs. 1000 were received for Nandagaon Kaji. ( 4 ) 'Krishnaji Govind paid Rs. 3360 which were given to Krishnaji Moreshwar. ( 2 ) The money to be received from Jakhappa and Krishnaji Govind is ready for payment. ( 6 ) Money from Ramaji Girdhar is hard for recovery. ( 7 ) Naropant intends to accompany Krishnaji Govind for this money when he goes to recover his money from his Illichpur Subha. ( 8 ) Money recovetd for Sikenisi and ambassadarship by Krishnaji Moreshwar was wholly paid to Raghuji and he paid Rs. 4000 of Sikenisi ro Krishnaji Moreswar and has kept Rs. 2000 of ambassadarship for Vishwanathbhat. ( 9 ) Of the revenue of Rahatgaon the money from Jakhappa will be shortly recoverd by Krishnaji Govind and paid.

---

पत्रांक ४ ] श्री भौमवार वैशाख सुध ५।१६७५
मे १३,१७५३

सेवेसी **गणेश मुकुंद** सां। दंडवत. विनंति येथील कुशल ता वैशाख सुध पंचमी सोमवार जाणून स्वकीयें लिहिणें विशेष. राजश्री **स्वामी** काल मंदवार **बुधास** गेले असत, रविवारीं तेथून **श्रीअवध** येथें गेले असत, उदयेक येतील. ल्याचा मजकूर राजश्री **देवजी सिर्के** यांनीं केला होता, त्यास राजश्री **विठोबा नाईक वाकडे** याजवरून राजश्री **स्वामींनीं देवजी सिर्के** यांस सांगितलें 'कीं, येनदाचे चतुर्मास

गेलियावर करून. यैसी बोली जाली. तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें आसे. राजश्री **रघोजीबावा** यांचें व मोंगलांचें जुंज झालें म्हणोन वर्तमान मागा होतें, परंतु तें लटकें. **बोधणास** सुखरूप आहेत म्हणोन येथें वर्तमान असे. येथून तुमचा मुकामाचे तो कांहीं बोली नाहीं. तुम्ही उभयेतांतून येकजणही येथें नाहीं. काये म्हणोन राहिलें हें न कळे, तर तुम्ही सत्वर येणें. बहूत काये लिहिणें हे विज्ञापना.

Ganesh Mukund, a Maratha Sardar, writes to Vaidya brothers the halts of Raghuji Bhosle at Budha, Satara and Aundha. Raghuji postponed his intended marriage to Kartik probably with Deoji Shirke's daughter. The news of fight between Nizam and Raghuji was false as he was staying at this time at Bodhan. The writer wanted to know when Vaidya brothers intended to visit Berar. The date entered in the letter seems not correct.

---

पत्रांक ५ ] श्री छ. ११ रजब

वैशाख शुद्ध १३।१६७५

मे १५,१७५३

श्रीमंत राजेश्री **बाळंभटबावा** तथा राजश्री **विस्वनाथबावा** स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक **राघो बलाळ भोगले मु॥ रामटेक** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. विनवावयाकारनें यैसाजे, येथील क्षेम ता॥ छ. ११ माहे रजबपावेतों स्वामीचे कृपादृष्टीकरून **देसपांडेपनाचें व फडनिसीचें** वर्तमान येथास्थित असे. यानंतर स्वामीकडील वर्तमान बहुत दिवस कलत नव्हतें. यावर स्वामीजींनें **गोपालजी**-बराबरी पत्र पाठविलें त्यावरून बहुत समाधान जालें. पत्रीं आज्ञा कीं, हुंडी करून यैवज पाठविनें. त्यास मौजे **अरोली व तुमान** दोही गांवचा आकार साडे सोलासे रुपये होतो व [1] **रसुम** खालसापैकीं भेटीसुधां सवाचारसे व [2] **सायरेजकाती**पैकीं, यैवज सवादोनसे; येकून रुपये तेवीससे जमा जाहला. **मोकास्या**कडील [1] **रुसुम** रुपये अडीचसे यावे, त्यांपैकीं वसूल **टेकाडी** वजा करूनास वसूल जाहले असेत. बाकी दोनसे यावे त्यांत कोन्ही देत नाहींत. मौजे **गोडेगौडी सिधभट ठकार** व रा॥ **रघुनाथभट** वगैरा कितीयेक [3] धोमायेती आहेत. **भट व गोसावी व पंडे** वगैरा भिक्षुक ब्राह्मन देत नाहींत व देसमुखासही देत नाहींत. तेविससांपैकीं झडती पांचसे रुपये

**पेसकशी** सरकारात दिल्हे आनि सासे रुपये **स्वामी**कडे पावले. पहिले मुा **नागपुरीं** च्यारसे, हालीं **सेखजी**बराबरीं दोनसे, येकून सासे व **पेसकशीचे** रुपयांचे व्याज व बट्टा वगैरे रुपये दोनसे रुपये वसूल होत तोंपावेतों पडले. व वाडा बांधावयाची आज्ञा केली त्यास वाडा तयार जाहला. त्यास खर्च ग्रहप्रवेश देखील सवाच्यारसे लागले. व महाल मजकूरचा खर्च कारकून व प्यादे असामी ५ नेमनुके-मध्यें होते, त्यांस आकरा लागोन वसूल केले. येकून रुपये साडेनवसे होतात. **सायेरीजकातीचें** काम ज्या चौकीवर प्यादा ठेविला आहे, त्यास दोन रुपये देन लागतात; आनि तेथ दीढ रुपया उत्पन्न होत नाहींत. प्यादा न ठेवावा तरी अमल बुडतो. बाबत देसमुखाचें निमे घेन लागते. या प्रकारचें काम आहे. फार तपसील पत्रीं लिहिला म्हणोन स्वामींनीं रागास न यावें. सालमजकुरीं मौजे **आरोली** व **तुमान** व **डुमरीचिखल्या** येथील लावनीसंचनी उतम प्रकारें केली असे. दोन गांव पाटीलकीचे करावे लागतात. त्याची सनद पाठविली पाहिजे. देशमुखानें अमीनीचें दफ्तर म्हणोन बसविलें; आपलेंच बसविलें; वऱ्हाड (एक) टाच अम्हीं केला, परंतु दाखला दुसरा जाहला. त्याची दफ्तर उठवावयाची सनद आली पाहिजे. अमीनीचें दफ्त (राचें) कांहीं प्रयोजन नाहीं, यैसी ताकीद आली पाहिजे. हें मोठें कार्य आहे. त्या दफ्तरावरीं देशमुखानें कारकून आपला ठेविला. दुसरा कारकून सरकारचा, यैसें अमीनी नांव ठेविलें. आमच्या कारभारांत [४]खतरा करतो, त्याचें पारपत्य केले पाहिजे. रयेत लोक आमच्याकडे आहेत. परंतु सरकारांतून बळ देशमुखाकडे आहे. **यादोजीपंत** त्यांचाच आहे. तेथें उपाय, **स्वामी** या प्रांतास येतील तेव्हां होईल. **पोतदारीचा** अमल मिळत नाहीं. **फडनिर्सा**च्या [५]फारखतावणीचा येक रुपया दर गांवीं यैसी सनद होती ती **यादोजी** चालों देत नाहीं. त्याची सनद ताकीद पाठविली पाहिजे. वरकड वर्तमान **गोपाळजी** सांगतां कळों येईल. **भुगांव** व **टेकाडीचें** वर्तमान **गोपाळजी** सांगतां कळों येईल. **गोपाळजीस** रुपये ५ पांच दिल्हे असेत. **कृष्णा** आमच्या घरास पाठविला, तो अद्यापि आला नाहीं. त्याची रवानगी केली पाहिजे. आपणांजवळ कोणी पोटागीचें मनुष्य नाहीं, तरी **गोपाळजीस** अगर कोणास पाठविलें पाहिजे. सायेरचे कमाविसीवरी माणसें दाहा लागतात व कारकून पांच, येकून पंधरा असामी ठेविले आहेत. जें उत्पन्न होतें तें त्यांस लागतें. इजारा द्यावयाची आज्ञा केली पाहिजे. इजारा द्यावा तरी जमीदारी काम; नवा कारभार; कितेक बेपारी; नायकाची धिमायती करीत होते. त्यांस आजि दोन महिने ताकीद नायकाची आणिली. तेव्हां देशपांडियाचा अमल यैसें कळों लागलें. याजकरितां [६] इजारा द्यावयाचें अनमान करतों. परंतु खर्च पडतो. याहीउपरी आज्ञा येईल तेणेंप्रमाणें वर्तणूक करीन. लिहिल्याप्रमाणें वाचून ताकीदपत्रें सादर जालीं पाहिजे. वरकड वर्तमान **गोपाळ** सांगतां कळों येईल. बहुत काये लिहिणें, कृपालोभ असो द्यावे हे विज्ञापना.

श्रीमंत राजश्री **बाबा** स्वामीचे सेवेसी. आज्ञाधारक **बाबू गोपिनाथ** चरनावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार. वरकड साकल्या व्रत पत्रावरोन कलोन येईल. हे विज्ञापना.

---

१ नक्त नेमणूक, हक्क. २ जंगम मालावरील जकात. ३ संथ, मठ. ४ धोका, घोंटाळा. ५ कर्जफेडीचा कागद, सोडचिठी. ६ मक्ता, खंड.

\+ पुढील मजकूर लेखक भोगले यांच्या हातचा असे.

Ragho Ballal Bhogale writes to Vaidya brothers how the revenue of their villages such as Aroli, Tuman, Tekadi, Gode Goudi, was being recovered. He writes that a house was built at Ramtek. He has given a detailed account. He was enjoying on behalf of Vidyas the Deshpandepan and Phadnisi of Ramtek.

---

पत्रांक ६ ] श्री + रामचंद्र छ. १८ रजब सलास खमसैन

वैशाख वद्य ५।१६७५

मे २२,१७५३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विस्वनाथभट वैद्य** स्वामी गोसावी यासि.

पो **चिमणाजी नारायेण सचीव** नमस्कार विनंती उपरी. तुम्ही का **भोरच्या** मुा आलां होतां त्या समई तुम्हांस यैवजाकरितां हाटकिलें, परंतु मान्य केलें नाहीं. त्याहीमधें लग्न जालियावरी यैवजाची तर्तूद करून देतों, म्हणून मान्य केलें. यैसें असतां यैवज दिल्हा नाहीं, यावरून अपूर्व आहे. बोलिल्याप्रमाणें कार्य करावें, हें उचित आहे. यानंतर **रास्तियाचा** मजकूर तरी स्वदेशींचे गांव **लासुर्डी** वगैरे मागतात; परंतु देतां [१]पूर्व नाहीं. पा **सुपे** येथील **कोथुळ** व प्रो **कर्डे कडेवळीत** येथील येक गांव यैसे दोनपैकीं येक देतों, परंतु घेऊन यैवज देत नाहींत, अनमान करितात तरी तुम्हीं त्यास च्यार गोष्टी सांगोन सदरहू दोन्ही गांवपैकीं येक गांव घेऊन पंचवीस हजार रुा देत ते गोष्टी कीजे. सदरहू यैवजास पेस्तर सालीचा यैवजपैकीं प्रा **कर्डे कडेवलीत** येथील देऊं. यैवजास मोचदला करणार नाहीं, तरी यैवज देत तो अर्थ करणें. तथापि त्यास न फुर्वेच तरी तुम्ही सदरहू पंचवीस हजार रुपये देऊन नेमिल्याप्रमाणें यैवज पेस्तर सालीं पावता करूं; तरी आनुमान न करितां लिा प्रों यैवज देणें. सुमासलाम खमसैन मया आलफ छ. १८ रजब बहुत काय लिहिणें. लिहिल्याप्रमाणें यैवज देणें. अनमान सहसा न करणें. **रास्ते** यांचा मजकूर

आहे तो तुम्हांस ठावकाच आहे. यानंतर आमचें आगत्य तुम्ही धरीतच आहां, लिहावें ऐसें नाहीं. येविशई धोंडो केशव सांगेल तें यैकोन कार्य करून देणें. + बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंति.

---

१ पुरेसा. + पुढील मजकूर सचीवांच्या हातचा.

Vishwanthbhat agreed to pay Pant Sachiv the sum of rupees he wanted after the marriage ceremony at his house was over. The promise was not fulfilled. Pant Sachiv, being in need requested him to pay the money anyhow through Raste on the revenue of Kothul in Paragana Supe or of that of one in Pargana Karde Kadevalit by his influence. This letter shows how Pant Sachiv was dependant and confident in Vaidyas for supply of money when in great need.

---

पत्रांक ७ ] श्री जेष्ठ १६७५<br>जून १७५३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथभट वद्य** स्वामीचे सेवेसी.

पो **बाबुराव दत्तो** कृतानेक नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. आपण राजश्री **नागोजी नाईक जेधे** देशमुख यांजकडे पैका देविला, त्यास रा **दयाजी नाईक** व **रामाजी नाईक** व रा **अंताजीपंत** आपणांकडे हिसेबास आले आहेत. हिसेब व मनास आणून यांची मुक्तता केली पाहिजे. आम्हांकडे यैवज यांजकडील पावला नाहीं. हे आपणांकडे सोडतोड मागावयास आले आहेत, तरी त्यांचा हिसेब करून सोडतोड देऊन निर्गम करून घ्यावा. यांचा मजकूर आहे, तो आपणांस कळतच आहे. तरी याजवर कृपाळू होऊन यांजकडील यैवज आपणांस पावोन यांची मुक्तता होय, तो अर्थ केला पाहिजे. बहुत काये लिहिणें. लोभ असो दीजे. हे विनंतिपर.

The writer is by surname Mahashabde महाशब्दे, related to Sachiv. He requests Vishwanathbhat to make Nagoji Naik Jedhe Deshmukh of Bhor State, free from debt by giving him some remission or making some compromise. Dayaji Naik and Ramaji Naik and Antajipant had gone to him to settle the account.

---

पत्रांक ८ ] श्री आश्विन शुद्ध १।१६७४
आक्टो. ८,१७५२
ते
आषाढ शुद्ध १।१६७५
जुलै २,१७५३

यादी यैवज राजश्री **पंतप्रधान** यांजकडे येणें सुा आर्बा खमसैन मया

८६०६॥· अलफ बा हिसेब मुदत माफिक रुपये ५०००० पैकीं व्याज
मिति अंगिरा
माघ वद्य १४

५०९॥· **बाबुराव हरी दीक्षित** यैवज **बेलापूर** वगैरे यैवजपैकीं चिठी
मिति अंगिरा दिली होती, तो यैवज न पावला. मोबादला यैवज पावला,
आश्विन शुा १ त्याचें व्याज मुदत माफिक सदरहू हिसेब राजश्री **बाबा फडनिवीस** यांजकडे आहे.

१५३॥ सरकारांत
३५६ चिठी **बाबुराव हरी दीक्षित** यांजकडे दिली होती ती चिठी फिरोन आली ती राजश्री **दिनकरपंत** याजपासीं आहे.

९११६ ५०९॥

सदरहू यैवजाचें खत राजश्री **पंतप्रधान** यांचें करून घ्यावें. पैकीं श्रीमुख संवत्सरे आषाढ शुध १ व्याज दर १ प्राों खत घेतलें.

८६०६॥ किा
१५३॥ किा सा ५०९ पो

८७६०

बाकी **दीक्षिता**कडे यैवज येणें आसे, त्याचा निकाल करून घेणें.

This is a detailed account of money paid by Vaidyas, to Peshwe between 8–10–52 and 2–7–1753. Dinkarpant mentioned seems to be Dinkar Mahadeo, Tarabai's Karbhari. It appears from another list that Vaidyas had to pay every year 50 thousand Rs. to Pant Pradhan.

पत्रांक ९ ]　　　　　　　　श्री　　　　　　　　छ. २ रमजान
आषाढ शुद्ध ४।१६७५
जुलै ४,१७५३

राजमान्य राजश्री **होनाजीराम गोसावी** यांसि.

सेवक **चिमणाजी नारायेण सचीव** नमस्कार. सुा सन अर्बा खमसैन मया आलफ. राजश्री **बालंभट वैद्य** तेथ राहतील त्यास का **सिरवळीं** गंज आहे. त्यापैकीं गवत पुले सुमार ५०० पां (च) शे दररोज देणें. व फाटी व किरकोळी साहित्य जें लागेल तें करणें छ. २ रमजान पा हुजूर.　　　　मोर्तब

पत्रा
वधिरयं
माति

Honaji Ram of Shirwal was asked by Sachiv to look to the conveniences of Balambhat Vaidya who was staying at Shirwal such as supply of daily want of grass and firewood and other necessary articles.

---

पत्रांक १० ]　　　　　　　　श्री　　　　छ. १९ रमजान आर्बा खमसैन
आषाढ वद्य ६।१६७५
जुलै २१,१७५३

राजश्री **सिदोजी इंगळे** हवालदार व कारकून **किल्ले राजगड** गो.

ाद. अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो **कृष्णाजी त्र्यंबक** असीरवाद व नमस्कार सुा अर्बा खमसैन मया आलफ. मौजे **जांबली** व **महुरी** बुा ता **गुंजण मावळ** हे दोन्ही गांव राजश्री **बालंभट** व **विश्वनाथभट** वैद्य यांजकडे आहेत. त्यांस तुम्ही दोन्ही गांवांवर **गोडपटीचा** व **खर्चपटीचा** यैवज घालून वसुलाचा तगादा केला आहे. त्यावरून लिहिलें असे. तरी सदरहू दोन्ही गांवांस **गोडपटीचा** (व) **खर्चपटीचा** तगादा न करणें. कांहीं वसूल घेतला तरी फिरोन माघारा गांवाकडे देणें, येविशई फिरोन बोभाट येऊं न देणें + छ. १९ रमजान बहुत काये लिहिणें. लोभ असो दीजे हा आसीर्वाद.

---

+ पुढील मजकूर लेखकाचे हातचा.

Krishnaji Tryambak Lohokare, the officer of the fort of Rajagad, writes to the Hawaldar of the fort, Sidhoji Ingale and the clerks that the cart tax (गाडेपट्टी) and expense tax (खर्च-पट्टी) were levied on the people of Jambhali and Mahuri, the inam villages of Vaidyas. This act was considered by him as unjust. He therefore asked them not to do so and if any tax was already recovered, it should be returned. Ingale is a Maratha officer. Hence Mr. Lohokare gives him आशीर्वाद and to the clerks, being brahmins, नमस्कार.

---

पत्रांक ११ ] श्री+शंकर बुधवार श्रावण शुध २।१६७५
आगष्ट १,१७५३

प्रियासह चिरंजीव **भिकू** व **रामा** व **बाबू** यांसि. प्रति **बाळंभट** व **विश्वनाथभट वैद्य** कृतानेक आशीर्वाद. उपरी येथील क्षेम ता। श्रावण शुध द्वितीया बुधवारपावेतों मुकाम **पुणें** सुखरूप असो. यानंतर तुम्हीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लिहिला अभिप्राय कळो आला. सतमी जाहलियानंतर येथील कामकाज उरकून येतों. तुम्हीं घरीं बहुत सावधपणें राहणें. रात्रीस **चिरगुटे** व **मोराजी बाळू** व **सत्या** वगैरे माणसें आहेत. त्यांस मागील दारीं व पुढील दारीं निजवीत जाणें. बहुत खबरदारीनें राहाणें. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें + हा आशीर्वाद.

---

\+ पुढील अक्षर वैद्यांचें स्वतःचें आहे.

Vaidya brothers were both out of Wai and wrote this letter to their younger sons how to take care of their houses and property, in their absence.

---

पत्रांक १२ ] श्री रविवार श्रीमुख नाम
श्रावण शुध १४।१६७५
आगष्ट १२,१७५३

यादी क्रिया राजश्री **बाळंभटबाबा** श्रावण शुध १४ रविवार

८ प्रथम दिवसीं मु॥ **सिवापूर.**

३ गोवरिया, ३ सेला, २ चंदन

---

त्रितीय दिवसीं सेला १ आंगवस्त्रें
साहित्य.

·।।· मडकीं १।।६·८= विंजण ·।६
१८=।। छऱ्या १ रु. ·।।

This paper determines the day of Balambhat's death (मृत्युतिथि).

---

पत्रांक १३ ] श्री श्रावण १६७५
आगष्ट १७५३

श्रीमत् राजमान्य राजश्री **विश्वनाथभट वैद्य** स्वामीचे सेवेसी.

सेवक **आबाजी सुंदर** दंडवत. विनंति. येथील कुशल श्रीकृपें असे. विशेष. **राजश्री बालंभट** यांचें वर्तमान यैकोन श्रम जाहाला, तो पत्रीं काये ल्याहावा ! आम्हांस आश्रय होता. बरें, रुणानबंद प्रमाण. होणारास येत्न नाहीं. आवतारादिकाची ××× याचप्रों आहे, आपण ××× विवेकी आहेत. श्रमाचे ×× व परिहाराचा ×× आम्हांस आपणाविना कोणी आहे, यैसें नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे. आजी साहामास ×× होऊन श्रमी केले आहे. दिवसेंदिवस चढ होतो उपाये नाहीं. ईश्वरी इच्छा प्रमाण आहे. सवि (स्तर) रा **बापूजी गणेश** सांगता विदित होईल हे विनंति.

Abaji Sundar, a Maratha writer, sends this condolatory letter to Vishwanathbhat for the death of Balambhat, which took place on 12-8-1753.

---

पत्रांक १४ ] श्री भाद्रपद शुध १।१६७५
आगष्ट २९,१७५३

वेदशास्त्रसंपन्न राजश्री **विस्वनाथभटजी वैद्य** स्वामीचे सेवेसी.

पोष्य **गोविंद अनंत गोखले** कृतानेक सां नमस्कार. विनंति. येथील क्षेम ता। भाद्रपद शुध १ पर्यंत स्वामीचे कृपेंकरून सुखरूप जाणोन स्वकीय सानंद लिहि(न), ती

अर्शी केली पाहिजे. विशेष वो **बाळंभटजीचें** वर्तमान यैकोन परम क्षेद जाहाला. तुम्हांस तों दुःखाचे पर्वत जाहाले; परंतु मर्त्यलोक, ईश्वरी कृतीस उपाय नाहीं. तुम्ही तो विवेकी पुरुष, विवेक करून श्रमाचें परिमार्जन करावें. वरकड कांहीं यैवज जमा जाहाला, तरी राजश्री **माहादोबा नाईक दामले** यांस पत्र पाठवणें जे, यैवज देतील तो घेणें. यैसी चिठी पाठवणें, नाहीं तर काय तें उत्तर पाटवणें. तदनुसार वर्तणूक करून. विशेष काये लिहिणें कृपा कीजे. हे विनंति.

This condolatory letter is written by Govind Anant Gokhale to Vishwanathbhat, for the death of Balambhat. It seems Vishwanathbhat had to receive some sum from Govindrao which he advised to pay to Mahadoba Naik Damle at his Pedhi.

---

पत्रांक १५ ] श्री भाद्रपद शुध ७।१६७५
सपटंबर ४,१७५३

श्रीमंत राजश्री **विश्वनाथभट वैद्य** स्वामीचे सेवेसी.

पो **माहादाजी शिवाजी** कृतानेक नमस्कार. विनंति येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखनआज्ञा केली पाहिजे. विशेष. **श्रीचे** कारखानीयाच्या यैवजीं दोनसे रुा आपणांकडे येणें, त्यास आपणांस **पुणियास** असतां पत्र **गणेश बल्लाल** याजबराबर पा होतें. तेव्हां सांगितलें जें, **वाईस** गेलियावर तेथें पैका देऊं. त्यास **वाईस** येते समई राजश्री **बाळंभटबावास** देवाज्ञा जाली. ईश्वरें खोटें कर्म केलें. बरें, मृत्यलोकांस उपाये नाहीं. निरोपाय गोष्ट जाली प्रेत्न काय ! आपण विवेकेंकरून शोकाचें परिमार्जन करावें. अनकूल पडिलें, तरी यैवज देविला पाहिजे. **येसजी चिरगुंटीयाचे** हवालीयपैकीं दाहा रुा आपणांकडे येणें ते द्यावे. श्रावणमासची मुदत आहे. बहुत काये लिहीणें. लोभ असा दिल्हा पाहिजे. हे विज्ञाति.

यादी **नागोजी** तुपा भाद्रपद सुा ७ रोख रुा

१०० रुा २०० पैकीं

५ **येसू चिरगुटा**पैकीं रुा १० पैकीं

---

१०५

रा॥ **नागोजी ना॥ जेधे** याजवर रुपये १००, सदरहू चिठी फिरोन आली. हालीं **सिवराम तुकदेव** प्रा॥ **सुपे** याजवर दिली, **आस्विन सु॥ १** रुा देणें म्हणोन.

This is also a condolatory letter from Mahadaji Jiwaji Sathe, for Balambhat's death. He was building the Nagoba temple at Ambawade at the request of Pant Sachiv. Vishwanathbhat had to give him Rs. 200 which he had promised to pay on his arrival at Wai. The sum was paid at his urgent demand. The account is given below the letter.

---

पत्रांक १६ ] श्री+शंकर भाद्रपद शुध ९।१६७५

सपटंबर ६, १७५३

चिरंजीव विजईभव राजश्री **भिकंभट** व **रामचंद्र** व **बाबुराऊ** याप्रती **विस्वनाथभट वैद्य** आसिर्वाद उपरी. येथील क्षेम भाद्रपद सुध नवमी मु॥ **कराटी** जाणून स्वकीयें लेखन करणें. विषश. मौजे **वरवडे** येथील देवलाचे कामास राजश्री **राघोबा नाईक** व **परशराम नाईक** यांजकडून **जानगवडा** यासी रुपये ५०० पांचसें देवणें. अनमान न करणें. यासिवाये **नरवणचे** देवलास रुपये ७५ पाऊणसे तुम्हीं देणें. आम्ही उदईक येथून निघोन पुढें जातों. तुम्ही घरीं बहुत सावधपणें राहणें. बहुत काये लिहिणें. + हे आसिर्वाद.

राजश्री **रामचंद्रपंतास** नमस्कार विनंति उपरी. **जानगवड्यासी** पावणेसासे रुा देविले आहेत. त्याप्रमाणें देववणें आणि **वरवडेयाचे** देवलास आणिखी पैका लागेल, त्यास राजश्री **कृष्णाजी अनंत** याचें पत्र येईल त्याप्रमाणें पैका देववणें. घरीं बहुत सावधपणें राहाणें. बहुत काये लिहीणें. घरीं च्यार माणसें चांगलीं कामाचीं पाहोन ठेवणें. रात्रो वाडेयांत निजवीत जाणें. माणसें चांगलीं कामाचीं पाहोन ठेवणें. + बहुत काये लिहीणें हे विनंति.

---

+ पुढील मजकूर लेखकाच्या हातचा आहे.

Bhikambhat, Rambhat and Baburao were asked by Vishwanathbhat to write to Raghoba Darave and Parashuram Naik Joshi to pay Rs. 500 to John Gawada to build the temple at Warawade and pay themselves Rs. 75 for building the temple

at Narawan. He advised them and Ramchandrapant Karkare to be cautions about the safety of the house and other property and engage good and reliable servants as guards to keep watch on the Wada during night.

---

पत्रांक १७ ] श्री भाद्रपद शुध १०।१६७५
सपटंबर ७,१७५३

तीर्थरूप मातुश्री **बाई** व सौभाग्यादि संपन्न वज्रचुडे मंडित मातुश्री **काकू** वडिलांचे सेवेसी.

अपत्यें **भिकूनें** दोनी कर जोडून सिरसां नमस्कार. येथील क्षेम ता भाद्रपद शु. १० मुा **पैठण** ×× मगा ×× कळावें. आपणांकडील वर्तमान सविस्तर लिहून पाठवणें. बहुत काये लिहिणें हे विज्ञाति.

आपत्यें **धोंडभट वैद्य** सां नमस्कार. दया कीजे हे विनंति. चि. सौ आनूस आसिर्वाद.

टपडिह पाना शाल तपधी आडिपसाक्ष कालिष बावा ओषे तासाचे कान्वी-पुनवसाईचे कावेदे कान्वी हिसेनवयुम पुनवीम लाखये.

Bhikambhat writes this letter from Paithan to his mother, Saraswatibai and Vishwanathbhat's wife, Umabai, requesting them to write their well-being. S. Anubai was his sister. The last 2 lines are not understood, being written in secret language of prose or poetry.

---

पत्रांक १८ ] श्रीकरह्याटेश्वर भाद्रपद शुध ११।१६७५
सपटंबर ८,१७५३

वेदमूर्ती राजमान्य राजश्री **विश्वनाथभट वैद्य** गोसावी यांसि.

आश्रित **कृष्णंभट काळे** कृतानेक नमस्कार. विनंति उपरी. येथील वर्तमान भाद्रपद शुद्ध एकादशीपर्यंत यथास्थित असे. यानंतर तुम्हाकडील वर्तमान चिरंजीव

घरास आले, त्यांहीं सांगितलें कीं, **बालंभटास** अतिसाराची व्यथा फार जाहाली आनिखी **वाईस** गेले म्हणून सांगितलें. त्यावरी मागाहून ब्राह्मण आले. त्यांहीं विपरीत सांगितला. तें ऐकून मनास खेद जाहाला ××× कळों येईल. बहुत काय लिहिणें. असो दीजे. हे विनंति.

After knowing the news of Balambhat's death from his son and Brahmins who came from Wai. Krishnambhat Kale of Nandiwade writes this condolatory letter to Vishwanathbhat.

---

पत्राक १९ ] श्री भाद्रपद वद्य १।१६७५
सपटंबर १३,१७५३

तीर्थस्वरूप **विश्वनाथभट वैद्य** काका वडिलाप्रति.

अपत्य **धोंडभट वैद्य** वस्ती **लावगन** साष्टांग नमस्कार. विनंति उपरी. आपण राजश्री **मादशेटी रेडिज** याकरवीं आम्हांस रुपये १५० दीडशे देविलेत, ते भाद्रपद वद्य प्रतिपदेस चिंटीप्रमाणें रुपये भरोन पावले. बहुत काय लिहिणें हे विनंती.

This is a receipt of Rs. 150 given by Dhondbhat Vaidya to Vishwanathbhat who was his uncle, received the sum through Madsheti Redij, a :new man of Vishwanathbhat's acquaintance doing money transactions.

---

पत्रांक २० ] श्री छ. २७ जिल्काद
भाद्रपद वद्य १३।१६७५
सपटंबर २५,१७५३

राजश्री **विसाजी रघुनाथ** वकील गोसावी यासि.

विनंति उपरी. तुम्ही आम्हांस खर्चास पंचवीस हजार रुपये द्यावयाचे करार केले आहेत, ते आधीं देणें. ते दिल्हियावरी तुम्हांस खर्चास पाचसे रुपये देऊं. रा छ. २७ माहे जिल्काद होती. कितेक बसले होते ( अपूर्ण )

The letter refers to Vishwanathbhat's paying first Rs. 25000 and then Rs. 500 will be paid for his own expenses. ( incomplete ).

---

पत्रांक २१ ] श्री कार्तिक शुध १४।१६७५
नवंबर ९,१७५३
खाशे

अष्टकोनी शिका

० श्री ~
राजा शाहु चर-
णीं तत्पर माधो-
जी शंकर नि-
रंतर.

राजश्री **नाना** स्वामीचे सेवेसी.

दा श्री सकलगुणालंकरण अखंडित लक्षुमी अलंकृत राजमान्य सेवक.
**अजबसिंग भोसले** हवालदार व कारकून किले **पांडवगड** कृतानेक दंडवत व [1]आ. साष्टांग नमस्कार विनंति. आपले कृपेकरून कार्तिक सुध चतुर्दसीपर्यंत वर्तमान येथास्थित आसे. विनंति ऐसीजे. किलेमारचें वर्तमान साकल्यें वेदमूर्ती राजश्री **विस्वनाथबावा वैद्य** यास सांगणें, तें सांगितलेंच आहे. ते आम्हांविसीं आपणांस विनंति करतील तीं चितावर धरून किलेमारची बेजमी केली पाहिजे. आम्ही सर्व प्रकारें आपले पदरचे असों. आम्ही आपले आशेवितरिक्त नाहीं. बहुत ल्याहावें तर सर्व प्रकारें आमचें आगत्य आपणांस आहे. कृपावृधि केली पाहिजे हे विनंति.

मोर्तब
सुद

---

१ आशीर्वाद.

The letter is written by Ajabsing Bhosle Hawaldar and clerk of the fort of Pandavgad to probably Nana Purandare. He stated all what was wanted, to Vishwanathbhat and requested him to get the wants fulfilled. The letter contains the Stamp and Mortab. Hence it is selected the matter in stamp is not properly understood. Mudhoji Shankar should be the name of Ajabsing.

---

पत्रांक २२ ] श्री+शंकर श्रीमुखनाम

कार्तिक वद्य ५।१६७५

नवंबर १५,१७५३

चिरंजीव विजई भव राजश्री **भिकंभट** व **लक्षुमणपंत जोशी** यासि **विश्वनाथभट वैद्य** अनेक आसिर्वाद. उपरी येथील कुशल ता। कार्तिक वद्य ५ मुक्काम **पुणें** समस्त सुखरूप असोन स्वकीयें कुशल लिहीत जाणें. यानंतर आम्ही आज येथून निघोन **वाघोली** येथें जातों. यानंतर तेथें कुणबिणी आहेत. त्यास **देवी-कुणबीण** पोरे सुधां वेदमूर्ती राजश्री **गोविंदभट दात्ये** अग्निहोत्री यांसी देविली आहे, ती देणें. + बहुत काये लिहिणें हे आसिर्वाद.

---

+ पुढील अक्षर लेखकाचें स्वतःचें आहे.

Vishwanathhhat writes from Poona to Bhikambhat and Laxmanpant Joshi, that he would today leave Poona and make a halt at Wagholi. One of the maid servants named Devi Kunbin along with her children was given by Vishwanatbhat to Govindbhat Datye Agnihotri. This Datye is mentioned in many other letters, dealing in money matters with Vaidya and other influential and moneyed men.

---

पत्रांक २३ ] श्री छ. २४ मोहरम

कार्तिक वद्य १०।१६७५

नवंबर २०,१७५३

मो **जिवाजी कुरणे** यासि **हैबतराव भवानीशंकर** सुभेदार प्रां **वाई** सुमा आर्बा खमसैन मया व अलफ, राजश्री **धोंडोबा नाईक रास्ते** यांसि **कुसगांव**च्य डोंगरपैकीं सालाबाद गवत त्यांचीं माणसें येऊन काढीत असतात, त्याजप्रों साल मजकुरीं देविले आसे. तरी सालाबादप्रमाणें रान दाखऊन देणें. छ. २४ मोहरम + मोर्तब सुद.

मोर्तब सुद

---

+ पुढील अक्षर हैबतराव देसपांडे यांचें स्वतःचें आहे.

Haibatrao Bhawani Shankar Deshpande, Subhedar of Wai ordered Jiwaji Kurane to allow the men of Dhondoba Naik Raste to take away the grass from the forest of Kusgaon, Taluka Wai, as usual. Haibatrao's descendents are still living at Wai.

---

पत्रांक २४ ] श्री

कार्तिक वद्य ३०।१६७५
नवंबर २४,१७५३

हिशेब राजश्री **नऱ्होजी जाचक** सुमा आर्बा खमसैन मया अलफ सो.

२००० अंगिरा सवछरे कार्तिक वद्य १२ ता **महंमद मुजफूर.**

४२३॥ व्याज झा ता श्रीमुख सवछरे कार्तिकअखेर मुा माहे १२८३ दरसदे रुा १॥ प्रो रुा.

२४२३॥

The account of money advanced to Narhoji Jachak during the years 1752 and 1753.

---

पत्रांक २५ ] श्री **छ. २ सफर**

मार्ग. शुद्ध ४।१६७५
नवंबर २८,१७५३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथभट** वैद्य स्वामी गोसावीं यांसी.

पो **बाळाजी बाजिराव** प्रधान नमस्कार. विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहीत जाणें. विशेष. चिरंजीव राजश्री **माधवराव** यांचें लग्न मार्गशीर्ष शुध दशमीस, शरीरसंबंध राजश्री **आप्पाजी नरहर** यांचे कन्येचा निश्चय केला असे. तरी तुम्ही सहकुटुंबं लग्न उत्साहास येणें. रा छ. २ सफर बहुत काये लिहिणें हे विनंति.

This letter mentions that the Peshwa Madhavrao's marriage was first fixed with the daughter of Appaji Narhar Joshi. The girl was rejected at the last moment, on knowing the मूळ Nakshatra in her horoscope and then Ramabai, the daughter of Shivaji Ballal Joshi, was selected. The marriage ceremony took place on मार्गशीर्ष शु० १४ and not on दशमी. Shiwaji Ballal of Garade's descendents are at present at Badhawani (Indore State).

छ. ४ सफर

पत्रांक २६ ] श्रीलक्ष्मीकांत मार्ग शु. ५।१६७५

नवंबर ३०,१७५३

राजश्री विसाजी रघुनाथ वैद्य गोसावी यांसी.

स्नो रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत. विनंती उपरी. तपोनिध राजश्री हंसपुरी बाबा गोसावी यांजकडे रुपये ६०००० साठ हजार रद कर्ज देविले, आसेत देणें. सुमा आर्बा खमसैन मया आलफ छ. ४ माहे सफर बहुत काय लिहिणें. हे विनंतिपर.

मोर्तब
सुद

Visaji Raghunath Vaidya was asked by Raghuji Bhosle to pay Rs. 60,000 to Taponidhi Hansapuri Gosavi, in payment of his debt. The details of payments are given in the accompanying paper. This money was received by Vishwanathbhat from Shivbhat Sathe a few days ago.

---

पत्रांक २७ ] श्री छ. १३ सफर आर्बा खमसैन

मार्गसीर्ष शुद्ध १४।१६७५

डिसेंबर ९,१७५३

हा सचिवाचा शिक्का
शंकराजी
नारायणाचा
आहे, चिमणाजीचा
नाहीं.

श्री
शंकराजी
नारायण

शिक्क्यांतील मजकूर

दस्तक सरकार राजश्री पंत सचीव ताा कमाविशदारांनीं व चौकीदारांनीं व रहदारांनीं व बाजे लोकांनीं, जकाती माहालानिहाय सुा आर्बा खमसैन मया अलफ, राजश्री विश्वनाथभट वैद्य यांचें खासगत तांदूळ, साडे तिसेरी माहाल मार्गे, खंडी १० दाहासि माहालीहून भरून कसबे वाईस घेऊन येतील, त्यांस मार्गीं कोण्ही मुजाहिम व होणें. जकातीच्या हासिलाचा तगादा न लावणें, जाणिजे.

छ. १३ सफर पाा हुजूर बार सुरू सुद. मोर्तब

पत्रा
वधिरयं
भाति

This is a permit to Vishwanathbhat Vaidya to take 10 Khandis of rice to Wai, by Pant Sachiv. It is to be marked that Chimnaji Narayan used the stamp of Shankaraji Narayan. This letter shows that Vaidya family was living at this time at Wai.

---

पत्रांक २८ ] श्री

मार्गसीर्ष वद्य १३।१६७५
डिसेंबर २२,१७५३

यादी येवज रा सिऊभट साठे याजकडील वसूल.

रुये.
२५००० ———
२५००० ———
५००० माहादेव ना दामले
५००० बुन्हा( ण )शा राजे
———
६००००

Rs. 25,000 are entered in the letter dated 25-9-1753 and other items are given in the list dated 4-1-1755. In it the balance due from Sathe is given Rs. 3300.

---

पत्रांक २९ ] श्री+शंकर

मार्गसीर्ष वद्य १३।१६७५
दिजे. २२, इ. १७५३

चिरंजीव विजई भव राजश्री भिकंभट व रामभट व बाबुराव वैद्य यांप्रती विस्वनाथभट वैद्य आसिर्वाद उपरी. येथील क्षेम ता मार्गसीर्ष वद्य १३ मुक्काम लस्कर नजिक कारंजे प्रां वराड जाणोन स्वकीयें लिहीणें. विशेष तुम्हांवर राजश्री हंसपुरी गोसावी महंत यांसि हुंडी पंचवीस हजार रा दिली आहे त्यास सदरहू

यैवजाची हुंडी घेऊन रुा देणें. याजखेरीज **गोसावीबावास** दाहापंधरा हजार गरज लागेल तरी चिठी लिहून घेणें आणि यैवज देणें.

| | |
|---|---|
| ४००० | **राघोबा नाईक गोडसे** |
| १०००० | **उभयेता दामले** |
| ५००० | **बैहिरवभट बापट** |
| ५००० | **परशराम नाईक जोसी** |
| १००० | **माहादाजी आनंद गडबोले** |
| २५००० | |

येकून पंचवीस हजार रुा येणेंप्रमाणें देवणें + बहुत काये लिहीणें हे आसिर्वाद. +

ह्यो राजश्री **रामचंद्रपंतास** नमस्कार. विनंति उपरी हुंडी राजश्री **हंसपुरी-बावा**ची पंचवीस हजार रुपये केली आहे. तरी हुंडी घेणें आणि रुये देणें. याखेरीज यांसी पंधरा हजार रुा गरज लागली तरी चिठी लिहून घेणें आणि यैवज देणें. यादी लिहून पाठविली आहे, याप्रमाणें सराफांकडून यैवज देवणें. + चार रोज आधिक उणे लागत ऐसें आसिलें तर फेरमोबदला करून देणें. हे विनंति. +

---

+ मधील अक्षर लेखकाचें स्वतःचें.

Vishwanathbhat writes from Karanje to Bhikambhat, Rambhat and Baburao that they should cash the Hundis sent and pay the amount stated in the letter to Hansapuri Gosavi. If he wants 15 thousands more, he may be paid, on receipt of a Chit.

---

पत्रांक ३० ] श्री

मार्गसीर्ष वद्य १३।१६७५

डिसेंबर २२,१७५३

राजश्री **विश्वनाथभट वैद्य** स्वामींचे सेवेसी.

सेवक **गोपाळराम** सां नमस्कार. विनंति उपरी राजश्री **दाजीपंतीं** तुमची निशा आम्हांकडून रुपये ४४००० चवेचालीस हजाराची करविली होती; त्यास सदरहू रुपयाची निशा आज शनवार ता मंगलवारपावेतों निशा करून द्यावी. निशा नव्हे तरी तुम्ही आम्ही **दाजीपंताकडे** जावें. यास अंतर पडणार नाहीं. तुम्ही कर्ज **सर-कारांत** दिलें,[१] त्यापैकीं दरमाहास रुपये २५००० पंचवीस आमचे विद्यमानें

घावेंसा करार केला आहे. त्याचें खत घेऊन देऊन. दरमाहास लागतील तसें घेऊं. मिती मार्गसीर्ष वद्य त्रयोदसी हे विनंति.

This letter is addressed to Vishwanathbhat by Gopalram who stood guarantee to Rs. 44000 to be paid by him to Dajipant. Vaidya gave Rs. 25000 to Peshwa, as debt when Gopalram intervened.

---

पत्रांक ११ ] श्रीशंकर श्रीमुख

मार्गशीर्ष वद्य १३।१६७५

डिसेंबर २२,१७५३

चिरंजीव विजई भव राजश्री **भिकंभट** व **रामभट** व **बाबुराऊ वैद्य** आनेक आसिरवाद. उपरी येथील क्षेम जाणोन स्वकीयें लिहीणें विशेष. तुम्हांवर हुंडी केली, राजश्री **हंसपुरी बावा महंत** गोसावी यांसी रुा २५००० अक्षरीं पंचवीस हजार देविले आहेत, तरी हुंडी पावलिया रोजा ४०४ च्यार च्यार उपरी देणें. पावलियाचें कबज घेणें. मिती शके १६७५ श्रीमुखनाम सवत्सरे मार्गसीर्ष वद्य १३ त्रयोदशी मंदवार बहुत काये लिहिणें, हे आसिरवाद.

हुंडी सही मा। **विसाजी बल्लाळ जोग** माघ सुध ३ मंदवासरे.

लिखित **हंसपुरी** गोसावी सदरहू हुंडीचे रुपये मा। **विसाजी बल्लाळ जोग** आपले [1] लहणें रुपये पंचवीस हजार भरून पावलों.

---

१ ज्याजवळ त्याचे पैसे नसतात अशा व्यापाऱ्यावर जेव्हां एखादा व्यापारी हुंडी देतो, तेव्हां तो त्यांजकडे हुंडीची रोख रकम अथवा ज्याकडे त्याचे पैसे असतील त्या व्यापाऱ्यावर दिलेले तितक्या रकमेची दर्शनी हुंडी पाठवितो. ही रोख किंवा हुंडी 'लहणे' होय.

Vishwanathbhat writes to Bhikambhat, Rambhat and Baburao to pay to Hanspuribava Gosavi Rs.25000 of the Hundi sent to them. The receipt of the money given by Hansapuri is at the end of the letter. The hundi is 'Lahane' and paid by Visaji Ballal Jog.

पत्रांक ३२ ] श्री+शंकर मार्गशीर्ष वद्य १४।१६७५
डिसेंबर २३,१७५३

चिरंजीव विजई भव राजश्री **भिकंभट** व **रामभट** व **बाबुराव** यांसि प्रती **विस्वनाथभट वैद्य** आनेक आसिर्वाद उपरी. येथील क्षेम तागाईत मागसीर्ष वद्य १४ चतुर्दसी मुा. **लस्करनजिक कारंजे** प्रांत **वराड** जाणोन स्वकीयें लेखन करणें. विशेष तुम्हांकडील वर्तमान कलत नवतें. त्यास राजश्री **हरीपंत** दिा **रामचंद्र कोनेर** याजबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. लिहीलें वर्तमान कलों आलें. यानंतर लोकांकडे यैवज येणें आहे त्यास तगादे करून यैवज वसूल करणें. राजश्री **बाबुराव हरी, गोविंदराव हरी** यांजकडे आमचा यैवज येणें होता, त्यास सालगुदस्ता फाल्गून अखेर हिसेब केला आहे, तो करारच आहे. तरी तो हिसेब पाहोन, यांचीं खतेंपत्रें असतील तीं यांचीं यांसी देणें. हजार रुा यांणीं गुा माहे मारीं दिल्हे आहेत. त्यास त्यांची हुंडणावल दरसदे रुा ४ प्रों वजा करून बाकी यैवज राहेल तो कर्जांत वसूल देऊन यांची बाकी जे निघेल, ती देणें. आम्हांकडील वर्तमान येस्थास्थित आसे. तुम्हीं आपणांकडील वर्तमान वरचेवर लिहोन पाठवीत जाणें. बहुत काये लिहीणें + यांचा हिशेब पेसजी केला आहे, त्याप्रमाणें करून बाकी काये राहात्ये ती लिहीणें. येथें देऊं. हे आसिर्वाद. + मिा श्रीमुख पौष्य सुा २ सेवेसी **मोरो रामचंद्र** सां नमस्कार.

हो राजश्री **रामचंद्रपंतास** नमस्कार विनंति. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें लिा वर्तमान कलों आलें. यानंतर राजश्री **बाबुराव** व **गोविंदराव हरी** यांजकडे यैवज येणें होता, त्यास यांणीं गुदस्ता हजार रुा दिल्हे होते. त्यास यांचा हिसेब पाहोन जो यैवज यांचा निघेल तो यांसी देणें. वरकड दरबारचें व घरचें वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. लोकांकडे यैवज येणें आहे, त्यांस ताकीद करून वसूल करणें + बहुत कायें लिहीणें हे विनंति. +

अपत्यें **मोरयानें** चरणावर मस्तक ठेऊन सां नमस्कार. विज्ञाप्ति यैसी जे, वडिलांचे आसिर्वादेंकरून हा कालपरयेंत सुखरूप असे. वडिलीं पेसजी पत्र पाठविलें तें पावलें. यैसेंच हरघडी आसिर्वाद पत्र पाठऊन सांभाळ करावा हे विज्ञाप्ति.

---

+ पुढील अक्षर विश्वनाथभटांचें.

This letter is addressed by Vishwanathbhat to grown up children of his family Bhikambhat &c. from camp near Karanje in Berar, about the management of household affairs, and recovery of money from debtors. They were asked to settle the account of Baburao Hari and Govindrao Hari, with great care. The children were not so grown up as to do these matters properly. Hence the writer specially asked Ramchandrapant Karkare to carry out his orders.

पत्रांक ३३ ] श्री+शंकर पौष शुद्ध ३।१६७५
डिसेंबर २७,१७५३

चिरंजीव राजश्री **भिकंभट** व **रामभट** व **बाबुराव वैद्य** यांप्रती **विस्वनाथभट वैद्य** आनेक आसिर्वाद. उपरी येथील क्षेम तागाईत पौष्य शुध ३ त्रितिया मुा **लस्करनजिक कारंजे** प्रां **वराड** जाणौन स्वकीयें लेखन करणें. विशेष तुम्हांकडील वर्तमान कलत नाहीं, तरी यैसें न करणें. सविस्तर वर्तमान वरचेवर लिहित जाणें. यानंतर लोकाकडे यैवज येणें आहे त्यांस तगादे करून यैवज वसूल करणें. राजश्री **हंसपुरी गोसावी** यांसी हुंडी रुा २५००० पंचवीस हजार रुपयांची तुम्हांवर केली आहे त्यांस यैवज येणेंप्रमाणें देवणें बी.

| | |
|---|---|
| १०००० | **केसो कृष्ण सेंबेकर** यांजकडून देवणें. |
| २५०० | **रामाजी कृष्ण सेंबेकर** |
| १२५०० | किरकोल लोकांकडून देवणें. |
| २५००० | |

येकून पंचवीस हजार रुा येणेंप्रमाणें देणें व लोकांकडील यैवज वसूल करणें. बाकी यैवज राहेल त्यांचें खत करून घेणें. घरचें वर्तमान वरचेवर लिहून पाठवीत जाणें. घरीं सावधपणें राहाणें. आम्हांकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री **रघोजीबावा भोसले** सेनासाहेबसुभा यांसी बरें वाटत नाहीं. याजकरितां फौजा **माहूर** प्रांतें रवाना करून आपण **नागपुरास** जावें हा विचार आहे. यांजबरोबर आम्ही **नागपुरास** जातों. तेथें गेलियावर निरोप घेऊन घरास येऊं. चिरंजिवाचें लग्न करणें आहे त्यासी **पुणियांत** नवरिया मुली आहेत, त्यांस येथें कोणास पाठऊन मुली नेमस्त करून लिहून पाठवणें, म्हणजे येऊं. तुम्हीं घरीं सावधपणें राहाणें. घरीं दाणावैरणीची बेगमी करून ठेवणें. आपणांकडील व दरबारचें वर्तमान सविस्तर लिहून पाठवणें. राजश्री **अंताजी विष्णु** दिा **बराणजी मोहिते** यांची हुंडी छतीससे रुा तुम्हांवर केली आहे, तरी सदरहू रुा देणें. वरकड या प्रांतीं गावसीव आहेत त्यांस ताकिदी घेतल्या आहेत. तुम्हांस कळावें म्हणौन लिहीलें आहे. बहुत काये लिहीणें, + हे आसिर्वाद.

हो राजश्री **रामचंद्रपंत** यांसी **माहादाजी कृष्ण काणे** यांचे नमस्कार. विनंति. मातुश्री घरीं आहेत, त्यांस सांगणें कीं, आम्ही सुखरूप आहें. चिंरजीव **जिऊबाही** महिनीयानें घरास येईल, म्हणोन सांगणें हे विनंति.

हो राजश्री **रामचंद्रपंत** यांसी नमस्कार विनंति उपरी. लिा. परिसोन लिाप्रो कामकाज करून उत्तर पाठवणें. घरीं सावधपणें राहाणें + हे विनंति.

---

+ पुढील मजकूर विश्वनाथभटांच्या हातचा.

This letter gives important details of the banking operations and the perparation of social functions like marriages. The children of the family have to carry out these suggestions with the help of the head clerk Ramchandrapant Karkare, written by Vishwanathbhat from camp Karanje.

---

पत्रांक ३४ ] श्री+शंकर पौष शुद्य ३ शके १६७५
डिसेंबर २७,१७५३

चिरंजीव वीजईभवं राजश्री **भिकंभट व रामभट वैद्य** याप्रती. **विश्वनाथभट वैद्य** अनेक आसीर्वाद उपरी. क्षेम तागाईत पोष्य सुध ३ त्रितीया मुा **लष्करनजिक कारंजे** प्रां **वराड** जाणून स्वकीयें कुशल लेखन करणें. विशेष आतां तुम्हांवर हुंडी केली येथें राखलें. राजश्री **अंताजी विष्णू** दिा राजश्री **बऱ्हाणजीबाबा मोहिते** यांजपासून घेतले रुपये ३६०० अक्षरी छत्तीससे याची निमे अठरासे याची दुणी करून हुंडी पावलिया रोजा ४८४ चारचार उपरी नामें **धणी जोग** टावठिकाणा चौकस करून धणी याचें कबज घेऊनं सा पेठ चाल देणें शके १६७५ श्रीमुखनाम संवत्छरे पौष्य सुध ३ त्रितीया बहुत काये लिहिणें + हे आशीर्वाद.

हाो राजश्री **रामचंद्रपंत** यांसि नमस्कार विनंति उपरी. सदरहू रुपये देऊन पावलियाचें कबज घेणें + हे विनंती.

लखतम **अनंता विष्णू** दिमत **बरानजी मोहिते** मा **सदासिव नाईक** **लिमयें** गुा **दये भुकनजी कासिदास** तसलमात **गोपाळ नाईक भनगे**. सदरहू हुंडीचे रुये भरून पावलों.

This is a receipt for Rs. 36000 given by Antaji Vishnu, the agent of Barhanji Mohite. The language of a Hundi of Dhani Jog kind is typically stated here. Vishwanathbhat was in Berar and sent a Hundi to Bhikambhat and Rambhat Vaidya, his cousins, to pay the sum to the agent of Mohite. This amount is shown in Shivbhat Sathe's account of 23-12-1735.

---

पत्रांक ३५ ] श्री श्रीमुख

पौष वद्य १।१६७५

जानेवारी ९,१७५४

भरणा राजश्री **हंसपुरी गोसावी** बा। हवाला राजश्री **रघोजी भोसले सेनासाहेब** सुभा आर्बा खमसैन मया आलफ.

रुो ६००००

आदा ——————— रुये

१०००० **केसो अप्पाजी** मार्गसीर सुध १०
५००० गु॥ **कृष्णाजी गोविंद**
५००० गु॥ **कृष्णाजी मोरेश्वर**

———

१००००

२००० आदा **सिवाजी दादाजी** आदा **नरहर बलाल** मिती मार्गसीर वद्य ११.

१५२७६ चिटी **कृष्णाजी गोविंद** मिती पौष्य वद्य १

७७२८ चिटी **माहादाजी नारायेण पोंक्षे** मिती मार्गसीर वद्य १३

२५००० हुंडी **वाई** तांबे **भिकंभट व रामभट वैद्य** यांजवर दिली. मिती मार्गसीर वद्य १३

———

६००००

This amount of 60 thousand rupees was paid to Hansapuri by Raghoji Bhosle through the persons mentioned in the letter, who are well known. In this, Mahadaji Narayan is clearly stated as Ponkshe.

———

पत्रांक ३६ ] श्री पौष वद्य २।१६७५

जानेवारी १०,१७५४

राजश्रियाविराजित राजश्री **चिंतामण केशव** स्वामी गोसावी यासि.

सेवक **सिवभट साठे** नमस्कार विनंति उपरी. राजश्री **विश्वनाथभट वैद्य** यास आमचे ऐवजपैकीं रुये ३८८५ आठतीसशें पंच्यासी रुपये येका महिन्यानें देणें. बहुत काये लिहिणें. मिती पोष वद्य द्वितीय + हे आसिर्वाद.

———

+ पुढील मजकूर शिवभटांच्या हातचा.

Shivbhat Sathe writes to Chintaman Keshav to pay Rs. 3885 to Vishwanathbhat after one month, out of his money with him. From the accounts and letters, it is clear that Vishwanathbhat had intimate relations with Shivbhat Sathe and dealt with him in great money transactions. ( Vide letter dated December 18,1754. )

---

पत्रांक ३७ ] श्री फाल्गुन सुध १।१६७५
फेब्रुवारी २३,१७५४

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री **विस्वनाथभट वैद्य** स्वामी गोसावी यांसी.

सेवक **गणेश: कृष्ण दामले** नमस्कार विनंती उपरी. येथील वर्तमान ता। फाल्गुन सुध प्रतिपदापावेतों समस्त सुखरूप असो विशेष. पत्र पाठविलें तें पावोन लिहिलें वर्तमान कळों आलें. **नारोपंत गोखले** यांसी मजकूर लिहिला. त्यासी **नारोपंत** आपणांकडे येत नाहीं. एकदोन निरोप पाठविले. दोन माणसेंही गेलीं, त्यांजवळ घेतों कीं नाहीं सांगत नाहीं. बहुत करून **जखापा**बरोबर लिहून पाठवितील. त्यांसी बहुत काये लिहिणें हे विनंती.

हेंच पत्र(श्रीं) **नानाचे** सां नमस्कार. विनंती उपरी. श्रीमंतांकडील कतबा **जखाबा**बरोबरीं पाठऊन देणें. बुधली **महादाजी पोंक्षे** ह्यांकडील सुधां भोयाबरोबरीं पाठविली असेत व आंबसोले व × खतपत्रील **जखापा कोबडे** याबराबरीं पाठऊन देऊं. कळेलें पाहिजे. बहुत काये लिहिणें हे विनंती.

Ganesh Krishna Damle writes to Vishwanathbhat that Naro Anant Gokhale is not willing to go to him, though Jakhappa was specially sent to him. He wanted snuff and Ambasole. which Jakhappa Kobde.was to take to him. The name 'महादाजी पोंक्षे' is clearly mentioned in this letter. His father's name was Narayan.

---

पत्रांक ३८ ]

श्रीमुख
फाल्गुन शुध १३।१६७५
मार्च ७,१७५४

( **चिंचवडच्या** देवांच्या दप्तरांतील रा. **पुरंदरे** यांनीं दिलेलें पत्र )

श्रीमंत राजश्री **नानासाहेब** वडिलांचे सेवेसी.

पोष्यांतरगत **राघो बावाजी** कृतानेक सां नमस्कार विनंति उपरी. येथील क्षेम ता फाल्गुन शुा १३ पर्यंत स्वामीचे कृपेंकरून येथास्थित असे. स्वानंदवैभवलेखनासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर कृपा करून दोन पत्रें, येक पत्र **सुदाम सेटी**बराबर, येक पत्र सरकारचे जासुदाबराबर हालीं पा, तें पाऊन परम संतोष झाला. येसेंच पत्रद्वारां सांभाल करून कुशल वृत लिहीत असावें. पूर्वींचे पत्रावरून उगवणीचे खतावें व्याज **तपस्वी** कडून श्रीमंत रा **दिवानजी** यांनीं श्रीमंतांचे नांवें घेतली होती. सांप्रत सरकारचे चित्तांत **बऱ्हाणजीचे** नांवें व आपलें पत्र आलें, त्यावरून सांप्रत हिसेब तागाईत श्रावण शुध पौर्णिमेपर्यंत साडेवीस महिनयांचें व्याज रुये १६४००० एक लाख चौसष्ट हजार रुपयांची वरात श्रीमंत **पंतप्रधान** यांचे नांवें कीं, **पटणे** व **बंगाले** येथील यैवज श्रीमंत रा **दादा**कडून आम्हांस देविला आहे, त्यायैवजीं रा **केशोभट करवे** यांचें कर्ज आम्हांस देणें आहे, त्यांसी सदरहू यैवज देऊन कबज घेतलें आहे. यैसी वरात **श्रीमंतांचें** नांवें व **केसोभटाचें** नांवें पत्र कीं, सदरहू यैवज **श्रीमंतां**कडून देविला आहे. जरी तुम्हांस यैवज न पावला तर आपण दुवोत्रा व्याजानसी देऊं. यैसीं दोन पत्रें **श्रीमंत रा मुधोजी भो** यांचे नांवें लिहोन घेत(ले)लीं, याच जासुदाबराबर पाठवावीं. त्यासी जासुदांनीं सांगितलें कीं, श्रीमंत राजश्री **नानासाहेब** हुताशनीकरतां **पुण्यास** जाणार, ते गेले व **भाऊसाहेब नासिकाकडे** जाणार आहेत. आपण आज्ञा लिहीली कीं, पनास हजार रुा याचें खत आम्हांपासीं आहे तें व हें, दोन्ही पत्रें पाठऊन देणें. जरी तुम्ही सत्वर आलेस तर बराबर घेऊन येणें. यैसीयासी जासुदांस विचारलें तो जासूद म्हणाले कीं, आम्ही **पुण्यास नानासाहेबाकडे** जाऊं, त्यांस आपला निस्च्ये **श्रीत्रिंबकेस्वरास** जावयाचा पूर्वीं यैकत होतों. सांप्रत **भाऊसाहेब** तिकडे गेले, तेव्हां आपणही **त्रिंबकास** गेले असतील. त्यांचे विचारेंकरून पनास हजारांचें खताची व (एकल)क्ष चौसष्टी हजारांची वरात × ची व **केशोभट करव्यांचे** नांवें. अशीं तीन पत्रें जासुदांबराबर पाठविले पाजे. पावतील न पावतील याजकरितां तिन्ही पत्रें आपल्याजवळ ठेऊन घेतलीं. जमाखर्चाची परवानगी तो राजश्री **त्रिंबकराऊ मामा** यांचे नांवें आपण घेतलेच आहे. आम्ही येथून दोनचौ रोजांत **दिवाणजीचा** निरोप घेऊन सेवेसी येतों. पत्रेंही बराबर घेऊन येतों. जरी करितां चार दिवस आदि(क) लागले तर मुजरद विस्वासूक माणसाबराबर पत्रें व खत सेवेसी पाठऊन देतों. विदित जालें पाहिजे. आम्हांसी रा **सदाशिवपंत** लग्नाकरितां घेऊन आले. न यावें तर रुष्टता दिसते. या आर्थेंकरून

आलों. लग्न जालें. सांप्रत **मलकापुरावर** मुकाम आहे. लस्करास नालबंदी देऊन खर्चाची **दहबुधी** करून पुढें जावें. रा **मल्हारपंता**ची मार्गप्रतीक्षा आजवर होती. सांप्रत तेही आले. यैसीयासी त्याचा पूर्वील मार्ग सर्व विदितच आहे. येथें आल्यावर याचा निर्गम होऊन पुढें यांनीं जावें हें त्यांनीं टाकून आपल्या स्वार्थांकरितां नानाप्रकारचे विक्षेप (पा)डिले आहेत. **मलकापूर** परगणा गतवरसीपासून **आंताजी विठल** यांचे पुत्राकडे दिला होता, तो मामलाही **हरी दामोदर** यांचे पेट्यांत नवता. सांप्रत **आंताजीपंत** वारले त्यांचे पुत्र **दिनकरराव** यांनीं **सदासिवपंतासी बाजिदी** केली कीं, धंदा आपल्या नलगे. इप्रकारें आमचा गला उग ××× त्याजवरून **दिवानजींनीं** इकडे आल्यावर **मलकापूरची** कमाविस **माधोराव सोमनाथ** यास सांगितली आणि **बाजी विठ्ठल** यांचें कर्ज मामलत समंधें निघेल तें त्यांनीं द्यावें, यासिवाये पन्चावन हजार रुये रसद द्यावी. सर्व मामला मिलोन आवघा त्रेतालिस हंजारांचा, त्याजवर रसद **जुनदा** कमाविसदाराचें देणें व सरबरीचे खर्चास मिलोन ऐसी हजार रुये ठरविले, ते त्याजपासून घ्यावे. यैसीयासी **मल्हारपंत** आल्यावर दुराग्रही पडले आहेत कीं, **मलकापूर** जरी **माधोरावासी** सांगणें तर दीडलक्ष रुये **हरी दामोदर** यांनीं दिले, त्याची वांटणी फक्त **मलकापुरावर** सत्याणव हजार रुये पडतात ते द्यावे. नाहीं तर मामला त्यास सांगूं नये. यैशा नाना प्रकारच्या **वेंगोती** घेऊन, रयेतीस वेगले, फौजेस वेगले फितवे द्यावयास लागले आहेत. सारांश यास तो इप्रकारें ××× नात जाणें जरूर. याजकरितां दुरुत्तरें ××, कारभार जैसा निर्गमेल तैसा निर्गमून मजल दरमजल जातात व कूच करून **पयोष्णीवर** मुकाम आहे. येकदोन दिवसांत सर्व गुंता वारून **दिवाणजी** मजल दरमजल जातील आणि आम्ही माघारें फिरोन सेवेसी येतों. दर्शनांतीं सविस्तर विनंति करीन. पुढें सर्व प्रकारें या सरदारीचें व **सदासिवपंताचें** स्वरूप राहे ते करणार. आपणांवेगळें कोण्ही नाहीं. **चंद्रपूरकर** कमाविसदार **नरसो मल्हार** यांनींही सर्वस्वें ××××× उलटे कजिये करावयासी सिध जाले आहेत. सर्व रसद तीन लक्ष रुये दिल्हे, त्यांत मामलतीचा वसूलही त्यांजकडे पडिला आहे. ते घालून साडेपांच लक्ष रुये, मन मानेल तैसें हिसेब करून काहाडितात. जर त्यांची समजुती सरकत्याची आपल्या आपल्यांत येथें जाली तर होईल. नाहीं तर हेंही सर्व प्रकरण आपल्याकडेच पाठऊन देतील. मग आपण जें येथास्थित दिसेल तैसें करोन दिल्हें पा. **वराडचे** मामलतीचा फजिता **मलारराम** यांनीं केला, तैसा **चंद्रपूरचा**ही त्यांनीं मांडिला आहे. सूचनार्थ लि॥ आसे. आमचें खत, आम्ही पूर्वी सरकारांत जमाखर्च करावयाची जलदी जाली तरी कृपा करून आमची खताचा जिमा आपण आपला करून पनास हजारांचा जमाखर्च आपल्या नांवें सरकारांत करून घेतला पाहिजे. आपल्या नांवाच्या करितां कांहीं पेंच चितांत आला तर **करड्यांचे** नांवें जमाखर्च करविला पाहिजे. विशेष विस्तारें लिहावें येसें नाहीं.

कृपालोभ आसो दीजे हे विज्ञप्ति. पत्रार्थ सर्व ध्यानास आणून पत्र वेगळें ठेवावें. हे विनंति.

This lettet is written by Raghobawaji to probably Nanasaheb Peshwe. It refers to the acquirement of the Mamlat of Berar, and Chandrapur in payment of a lac of rupees. Though the letter is lengthy it makes a mention of important persons such as Nanasaheb Peshwe, Sadashiv Hari (Mudhoji's Diwan), Keshavbhat Karve, Mudhoji Bhosle, Baji Vithal, and Trimbakrao Mama. The letter was found in the Chinchwad Deo's Daftar and handed over to me by Mr. Purandare. Because it refers to Nagpurkar Bhosle's territory.

---

पत्रांक ३९ ] श्री श. १६७५

सन १७५३

बाळंभटाच्या मरणापूर्वींचें

वेदमूर्ती राजमान्य राजश्री **बाळंभटबावा** व तथा राजश्री **विस्वनाथभट-दादा** स्वामी गोसावी यांसि.

सेवक **बाळाजी गणेश पुण्याहून** सां नमस्कार विनंति उपरी. येथील क्षेम जाणौन स्वकीयें लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. रा। **हरीपंत करंदीकर** यांजबराबर पत्रें गृहस्तांस कामकाजाचीं पाठविलीं तीं आम्हांस पोचलीं. ज्याचीं त्यास दिल्हीं. कोणी घरीं भेटले, कोणी न भेटले. यास्त(व) उत्तरें नं पाठविलीं. राजश्री **रामाजी मल्हार कटोरास** आहेत. **बाळाजीपंत बापटा**जवळ दिल्हीं, तीं पत्रें मशारनिलेकडेस **कटोरास** पाठविलीं. उत्तर आलें म्हणजे स्वामीकडे पाठऊन देतों, येसें **बाळाजीपंत** बोलिलें. राजश्री **केसोपंत वैद्य** मॉ कवडी पागा **श्रीमंतांची** आहे तेथें गेले आहेत. आले म्हणजे उत्तर घेऊन पाठवितों. वरकड ही उत्तरें पत्राचीं पाठऊन देतों. शेवाचाकरी शेवकास सांगितली पाहिजे, मी स्वामीच्या अन्नाचा येथें स्थापित आहें. स्वामींचें अन्न येशाची आहे. मी कुटुंबाखेरीज नाहीं. **बची** कुणबीण येथें पलोन आली होती. **रामजी चव्हाण** आला तेव्हां लाग लागला. ती कुण(बीण) दरबारीं दाखल जाली, तेव्हां श्रीमंत राजश्री **त्रिंबकराव** यांजकडे जाऊन कुणबिण घेऊन आलों. राजश्री **केसोपंत वैद्य** यांजकडे नेली. ते स्वामीकडे **रामजी चव्हाण** घेऊन आला आहे. येथें रु॥ १ येक खर्चास दिला आहे. राजश्री **रामाजी नाईक** यांजकडे, रु॥ आपण गुदस्ता ठेविले त्यांपैकीं रु॥ १०५० साडे दाहासे दिल्हे.

ता

५० गुजराथी सुतार, १००० रा खंडो मल्हार तोरणेकर यैसे साडे दाहासे

१०५०

दिल्हे. बाकी राहिले त्याची हुंडी करावी, रुा देतील. वरकड वर्तमान.सविस्तर लिहून पाठवितों. बहुत ल्याहावें तर स्वामी सूज्ञ आहेत. कृपालोभ असो दिल्ही पाहिजे. हे विनंति १०००००.

हो राजश्री रामचंद्रपंत दादांस सां नमस्कार.

सौ उभयता बाईस नमस्कार. कृपालोभ करीत जावे. हे विनंति.

The letter is written by Balaji Ganesh from Poona to Vaidya brothers. He received letters from them with Haripant Karandikar which he handed over to those concerned. Ramaji Malhar Barve was living a Kator. Hence he sent his letter with Balajipant Bapat. Keso Bahirao Vaidya had gone to Kavadi ( कवडी ) Paga where the peshwa had kept his horses. The answers from Barve aud Vaidya will be sent if received. Bachi Kunbin was caught at Poona, who was with Trimbakrao Mama. She was sent to Vaidya brothers with Ramaji Chavan. Ramaji Naik paid Rs. 1050 out of the debt he was ro repay. The letter is of the time when Balambhat was alive.

---

पत्रांक ४० ] श्री श्रीमुख

फाल्गुन वद्य ३०।१६७५

मार्च २३,१७५४

हिसेब राजश्री पंतप्रधान सुा आर्बा खमसैन मया अलफ बा व्याज पेसजीपैकीं चिटी राजश्री विनाइक दिक्षित नि बाबुराव हरी यैवज बेलापूर वगैरे. चिटी छ ६ जिल्कादची येणें माघ सुध १ प्रज्यापति सवछरे.

रुा ५८२८॥

-गुा दिक्षित माा केसो बहिरव वैद्य आंगिरा आस्वीन सुम १ ५८२८॥

-९ व्याज दरमाहे दरसदे रुा १प्रों चिनसूट इा ता मुा माहे आधिक सुधा माहे ९ येकून रुो ५२४॥÷

व्याज इा आस्वीन सुध १ आंगिरा ता श्रीमुख सवछरेअखेर मुा माहे १० दर १ प्रों चिनसूट ५२।⌿

An account of Nanasaheb Peshwe with Vaidyas. ५७७

# भावनाम संवत्सर शके १६७६

## इ. सन १७५४-५५

पत्रांक १ ] श्री चैत्र शुद्ध १।१६७६
मार्च २४,१७५४

यादी वस्तभाव नि **राघोबा नाा करकरे** चैत्र शु. १

**सौ. उमाबाई** किता दागिने मोत्येजडित व सोनें वगैरे.

४ मोहरा
६ पुतळी सफासी
२ बुगडी जोड
२० मणी लहान
३ मोत्यें नाखर्ची[1]
२ दाण्याचीं मोत्यें
१ थोर
१ लहान
———
२
१ साधें
———
३

सरकार
३४३ फुतळी ताटें
८५ मोहरा
———
४२८
४६
———
४७४

२ मास बाळ्या[२] जोड
१ घोस बाळ्या[२] जोड
१ चिंचपेटी मोत्याची
१ गलसरी मोत्यें जडित मणी
१ खुंटबाळ्या जोड
———
४१
किता रुपे दागिने
२ जोडवीं[८] जोड २
२ विरोद्यां जोड २
———
४
१ चालीन रुपें
———
५
———
४६

**भिऊबाई**

२ मुदा
८ मोहरा
४ होन
१ बुगड्या जोड
१ खुंट बाळ्या जोड
१ कोथिंबीर बाळ्या
२ मोत्यें नाकचीं[1]
१ विरोद्या जोड
२ जोडवी [८] जोड

२२

**सरस्वतीबाई**

१ मूद
१ आगठी गमनामाची
१ मास बाळ्या जोड
१ मणगटी जोड
१ विरोद्या जोड
१ मोतीं नाखचें[1]
१ कुडुक बा भोकरें
१ बुगडी जोड
३ पवित्रें
१ जोडवी ४ पाईची जोड
१ राखडी लाहान
३ जोडवी जोड
३ विरोद्या[६] जोड
१ साखली रुपें लाहान
१ जानवी मानेसरी[3]

२१

फणी हतिदंत ४

**सरकार दिा विठल जिवाजी**

किता

१ पोतें तांदूळ कसदे[4]
प्रतीचें ३
१ खोड चंदन
१ दाणे पोतें
३ पंचपात्रें
  २ पितळीं
  १ निकलीं

३

६

पांघरुणें

१ पासोडी पटकीं
१ रजई छीट
१ रजई अस्तर लाल
१ रजई औरंगडी
१ न्याहाली छीट

५
१ रजई सेलारी

६

१२

१ नाकांत घालण्याचा एक किंवा दोन मोत्यांचा दागिना.
२ बाळ्यांचे प्रकार—घोसबाळ्या, कोथिंबीर बाळ्या, मास बाळ्या, खुंट बाळ्या.
३ हासळी.  ४ कसदार, सरस, सडलेले.

२ चंबू पितळी
२ पीतांबर–पांढरा १ हिरवा १
१ कमल
१ संपुष्ट

---

१८
१ हंडा पितळी

---

१९

This is a list of ornaments golden, silvery or studded with pearls, belonging to S. Umabai ( Vishwanathbhat's wife ), Shrimati Saraswatibai ( Balambhat's wife ), Bhiubai ( Laxman Ballal Joshi's mother, Vaidya brothers' sister ). Other articles and dresses of Vishwanathbhat are also given. Some ornaments are unknown at present. The manner of writing should be marked. The name of a woman having a husband is always preceded by S., while that of a widow is not.

---

पत्रांक २ ] श्री १/२

श्रीमुखनाम माघ सुा १ ते १६७५ भावनाम
वैशाख सुध ३,१६७६
जानेवारी २४।१७६४ ते एप्रिल २५, १७५४
श्रीमुख कार्तिक वद्य ८।१६७५ ते भावनाम
वैशाख शुध ३,१६७६
नोवेंबर १८।१७५३ ते एप्रिल २५,१७५४

फेरिस्त खतें दि राजश्री **विश्वनाथभट वैद्य** सुमा आर्बा खमसैन मया अलफ ता

५००० **काशिनाथ भास्कर २**
४००० पेशजीचें कर्ज येणें आहे त्याचा बाइदे रोखा १ मिती श्रीमुख संवत्छरे माघ सुा १.
५००० हल्लीं कर्ज दिल्हें बा खत दस्तदे १ प्रमाणें मिा वैशाख सुा ९ भाव नाम संवत्छरे.

---

९००० पैकीं नांवें **बाळाजी महादेव** ४००० कमी.

४००० **बाळाजी महादेव** याचा कागद कीं, **काशिनाथ भास्कर** यांज
बाा सदरहू रुपये आम्हांकडे आले, आश्विन मासीं देऊं. जेस्ट शुा १
पासून व्याज रुा १ प्रों देऊं, म्हणोन कागद घेंतला आसे.

६२६४॥ **गणेश माहादेव गद्रे** व **कानो महादेव गद्रे** दिा **मालोजी भोसले** मिती.

५०० श्रीमुख संवत्छरे फाल्गुन वा १० सोमवार खत १ व्याज
दरसदे रुा २ प्रों

५३२५ शके १६७६ भावनाम संवत्छरे वैशाख शुा ५ दरसदे
रुपये २ प्रमाणें.

---

५८२५

---

४३९॥ किता खत नसे ६२६४॥

---

६२६४॥

४००० **हंसपुरी गोसावी** खत १ मिती फाल्गून वद्य १० श्रीमुख संवत्छरे
व्याज दरसदे रुा १ प्रों.

५० **गोविंद नारायण** दिा **हणमंतराव मोहिते,** यांची चिठी सदरहू
रुा देऊं म्हणून मिती श्रीमुख संवत्छरे फाल्गुन शुा ७

४२५ **खंडोजी सेस्ये कदम** को **वाई** खत मिती श्रीमुख संवत्छरे
फाल्गुन वद्य १ व्याज दरसदे रुा १ प्रों दोन महिनेयानें झाडा
करून देऊं.

७५० **बयाजी नलवडे वाईकर** खत मिती श्रीमुख संवत्छरे कार्तिक वद्य
८ व्याज दरसद्दे रुा १ प्रों. पैकीं आदेसुद ७५० गैरादा २५०

१०५०० **आनंदराव वाघ** दिा **रघोजीबावा भोसले**

१०००० खत १ मिती श्रीमुख संवत्छरे मार्गसीर्ष शुध १ व्याज दर
सदे रुपये २ दुहोत्रा प्रों

५०० मिती भाव संवत्छरे चैत्र वद्य ३ व्याज दर २

---

१०५००

६०००० **रघोजी भोसले** खत १ मिती श्रीमुख संवत्छरे मार्गसीर शुध २
छ. १ सफर व्याज दरसदे रुये २ प्रमाणें

याजखेरीज कागद सदरहू यैवजाचा पेस्तर **वराडांत** लाऊन
देऊं म्हणोन.

शंकराजी वामन व हिराजी दिवाकर देशपांडे प्रां उंबारडी प्रा देवगड खत १ व्याज एका महिनेयानंतर दरसदे शा ३ प्रमाणें देऊं, म्हणोन १

६०० श्रीमुख संवत्छरे कार्तिक वद्य १३ खत १ राघो बल्लाळ भोगले लग्नास दिल्हे उसने, एका वरषान देऊं.

१०० बाळाजी चिमणाजी दिा मुधोजी भोसले मिती श्रीमुख संवत्छरे पौष्य सुध १ दरसदे २

७५ कृष्णाजी ठाकूर मोझरी तळेगांवकर मिती श्रीमुख माघ शु ५, सदरहू शा देऊं म्हणोन.

१००० मौजे राहाटगांव प्रा नांदगांव पेठ खत १ व्याज दरसदे शा १ प्रों, खरीपाचे हंगामीं देऊं. माहादाजी पांडे छ. १ रजब वैशाख ३

४००० बाबुराव गणेश देवस्थळी खत मिती भावनाम संवत्छरे वैशाख सुध ३ व्याज दरसदे शा १। प्रों.

This is a list of conveyance deeds of debts given by various persons, doing great money transactions, to Vishwanathbhat Vaidya since 18-11-1753 to April 1754. The second paper is missing.

---

पत्राक ३ ] श्रीलक्ष्मीकांत ३ रजब

वैशाख शुध ५।१६७६

एप्रिल २७,१७५४

राजश्री कमाविसदार मौजे उंदरी पा माहूर गांव दिा दीपचंद आदले गों.

दाा अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री स्नेंा रघूजी भोसले सेनासाहेबसुभा सुा आर्बा खमसैन मया अलफ राजश्री विसाजी रघुनाथ वकील यांसि सातारियासी रवाना केले आहेत. तरी तुम्ही आपले स्वार व माणसें समागमें देऊन पैठणास पोंचाऊन देणें आणि पावलियाचें कबज पाठऊन देणें. रा छ. ३ माहे रजब. बहुत काये लिहिणें.

Raghuji Bhosle writes to Kamavisdar of Undri, which village belongs to Dipchand Adhale, to give soldiers and men to Visaji Raghunath Ambassadar, who is sent to Satara, as far as Paithan.

---

पत्रांक ४ ] श्री छ. ५ रजब
वैशाख शुद्ध ७।१६७६
एप्रिल २९,१७५४

अजस्वारी राजश्री **विसाजी रघुनाथ** वैद्य ता मोकदमानी मौजे **कोरले** प्रा **कुऱ्हे** प्रां **वऱ्हाड** सुमा आर्बा खमसैन मया अलफ. तुम्हांकडे आमचा यैवज येणें आहे, त्यास सदरहू यैवज राजश्री **माहादाजी नारायेण पोंक्षे** यांजकडे देविला आहे. तरी मारानिलेकडे यैवज देऊन पावलियाचें कबज घेऊन पाठऊन देणें. या कामास **कुसाजी येवले** पाठविलें. त्यास रुा १५ पंधरा देणें. जाणिजे छ. ५ माहे रजब मोर्तब सुद.

Vishwanathbhat writes to the Mokadam of Korale, in Paragana Kurhe of Berar province to pay Mahadaji Narayan Ponkshe the money he owes to him.

---

पत्रांक ५ ] श्री आश्विन शुव १५।१६७५
आक्टोबर १२,१७५३
ते
ज्येष्ठ शु. ५।१६७६
मे. २६,१७५४

श्रीमंत महाराजांसी

श्रीमंत श्रीमाहामेरू अखंडित रमासानुकुल सदायेशवंत राजमान्ये राजश्री **विस्वेनाथबावा** स्वामी गोसावी यांसि

सेवक सदासेवक आज्ञाधारक **रघुनाथ मानकर** मुकाम **रामटेक** दोन्ही कर जोडून चरणावरी मस्तक ठेऊन विनंति. येथील क्षेम ता छ. १५ सुध आस्वीन ता छ. ५ सुध जेष्टपावेतों स्वामींचे कृपेनें कुशल जानऊन साहेबीं क्षेम कुशल लिहित आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपन समागमें देशास गेले. तेव्हां **कोंढाळीचे** मुकामीं आपली विदा केली. त्या समई आज्ञा केली जे, तुम्ही व राजश्री **राघोपंत** मिळून आपलें कामकाज करीत जानें. त्याचप्रमानें आपन व **पंत** मिळून कामकाज **रामटेकचें** करीत आसूं. कोन्हे गोष्टीची दुजाई करीत नाहीं. पहिलेंही येक विनंतीपत्र आपन लिहिलें होतें तें सो पोहचलें. आपल दुसरें, येथील ही इस्तमालतींचें कामकाज सन आर्बे 'सालाचे चालीस लावलें आसे. नापिकार्चे सबब रयेत लोक येकरास बहुत आजुरदा जाले. त्यांस रा **जानीबाबाही** या सालास दोन हजार रुपये

गुंदस्ताचे जमाबंदीस बाद देले. तेन्हेंकरून थोडीबहुत रयेतीची समजावीस केली. परंतु पीक होत नाहीं याकरितां रयेतीचा बल बहुत पातल आहे. दुसरे,———विनंतीपत्र लिहिलें आहे तें त्याहास प्रविष्ट करून देनें. तुमचे आसिर्वादेंकरून जये जाला, आनि **सततसीस** जाऊन ——— भेटी करून दिल्ह्या, हें वर्तमान आयेकोन आपनास बहुत संतोश जाला. आनि ——— तुम्हांस येश दिल्हे तरी तुम्ही पुनेश्लोक आसा. सदईव येशाचीं गाठोडीं तुमचे पदरीं आसे. जें कार्य चितीं धराल तें कराल. आमचे-विशाई **बावास** जे विनंती सांगायाची असल ते सांगनें. दुसरे, रा **राघोपंतास** लिहिनें जें, याहाचा परामोश करीत जानें. नवी हवेली **राघोपंताहीं** तयार केली. आपले कामकाजाविशाई बहुत सावधपनें आहेत. कोन्हेविशाई गाफली करीत नाहींत. दुसरे, **कोंढाळीचे** मुकामीं ——— **बावासाहेबीं नेगीस** सांगितलें जें, **केळवदा**-पैकीं दोन हजार रुपये देशमुखाचे उगऊन देनें. त्यास त्यांहीं अद्याप कांहीं त्या रुपयांचा निकाल केला नाहीं. याजकरितां ताकीदपत्र पाठविलें पाहिजे. आपन सेवक पदरचे आसूं. सदईव पत्रद्वारें परामोश करीत जानें. बहुत काये लिहिनें हे विनंति.

साोस पोश चरनरज आवलीया[1] रायें कुरनीस[2] करून———विनती.

---

१ साधु, विदेही. २ सलाम, प्रणिपात.

The letter is written by Raghunath Mankar of Ramtek to Vishwanathbhat. He states what he did according to the instructions given to him by him when he left him at Kondhali. He was advised to do the work in conjunction with Raghopant Bhogale without any hitch. He received letters also from Vishwanathbhat as to how he should behave with him. The writer was fully satisfied with Vaidya's successful attitude at Satara. He suggested that Raghuji Baba should be asked to help him for recovering Rs. 2000 from Negi. The language and peculiar words used by him to show greatness of Vaidya, is worth considering. Janibhai gave remission of revenue of Rs. 2000. to the cultivators of Ramtek.

---

पत्रांक ६ ] श्रीशंकर जेष्ठ १६७६
मे १७५४

राजश्री **जानीभाई** गोसावी यासि :—
दा अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य **श्रीं विसाजी रघुनाथ वकील**

आसिर्वाद उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लेखन करीत गेलें पाहिजे विशेष. तुम्हांकडील बहुत दिवस कागदपत्र येऊन वर्तमान कलत नाहीं. तरी येसें न करणें. सदैव आलिया माणसाबरोबरीं सुखसमाचार लिहीत जाणें. यानंतर मामले **नागपूर** प्रांत **देवगड** येथें **श्रीमंतांनीं पोतदारीच्या** सनदा व **लग्नपट्टीची** वरात **पेठ**वरी दिली आहे. त्यांच्या वसुलास रा **गोविंद केशव** पाठविले आहेत. तरी याचे पदरीं रुपये घालून पावलियाचें कबज घेतलें पाहिजे. व मारानिलेयासि खर्चास रुपये अडीचसे दिले आहेत ते देऊन पावलियाचें कबज घेणें. रा **नारोपंत** तेथें पोतदारीचे वसुलाबद्दल धा मागतील, ते देऊन वसूल करून आम्हांकडे पाठवून देणें. प्रांत **छतीसगड** प्रांतास आम्ही राजश्री **बालाजीराम** व **सदाशिव गोपाल** यांची श्रीमंतांनीं, रवानगी केली आहे. तरी यांसी दाबदार करून देऊन हमेदास पोचाऊन पावलियाचें उत्तर आम्हांकडीस पाठऊन दिलें पाहिजे. येविसी बहुत काये लिहिणें. हे विनंति.

Vishwanathbhat writes to Janibhai what has been done by Raghuji Bawa and himself for the recovery of Potadari and marriage tax. Raghuji had sent Govind Keshav for doing the work at peth Nagpur, and Balajiram and Sadashiv Gopal in Prant Chhattisgad. Janibhai was asked to help these men.

---

पत्रांक ७ ]

रौद्रनाम जेष्ट १६६२ ते भावनाम ज्येष्ट १६७६
मे १७४० ते मे १७५४

इा इहिदे आर्बैन ता आर्बा खमसैन अखेर साल

३/१ तेरीज येकंदर बाा बोटखत खरेदी रुपें निा वार

१६२ चिरंजीव मुलें
**३८ रामभट वैद्य, ८८ बाबू, १ अनी व लक्ष्मण,**
**३५ बालकृष्ण**

१६२

२१६। निा सौ. **गोपिकाबाई**
२५ निा सौ. **खारूबाई**
६ श्रावणशाच्या राा **सातारा राजवाडे** यांचे घरीं
१३ सौ. **जनाकीबाई वैद्य**

६२ वस्ता स्वारी नागपूर गुा विश्वनाथभट वैद्य पैकीं,
१ कडें १ ता उमाबाई, १ साखळी ता सिती १,
२ वाकी जोड १ येंा :— १ वाक ता सिती, १ वाक
ता रत्नी —
— २
४
— रुये

८ येसी कुणबीण वस्ता
२४ खरेदी वर्जी पवळीयांची ता सौ. उमाबाई १
२३ करंडा गुा कृष्णा १
२५ खरेदी डबा १ ता उमाबाई
२॥। हलकार्ती १
२५ खरेदी चौफुला १ गुा रास्ते

५९२।
२४२७।= तेरीज •

३०१९॥=
६५ नि। सरस्वतीबाई वाक्या व झुणझुणें येंा जोड २.
७५ नि। सौ. उमाबाई

२९ वाकी साधा जोड १, घागऱ्या सुधा
४६ गुजरिया जोड १

७५
३१५९॥=
२५ खरेदी वाट्या ३ येकून शा

३१८४॥=

This is the second page of accounts of Vaidyas, regarding the purchase of silver for ornaments in which the names of children, women and female servants of the Vaidya family are mentioned, during 14 years. The first page is missing.

पत्रांक ८ ] श्री छ. २० साबान
जेष्ठ वद्य ७।१६७६
जून १२,१७५४

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथभट वैद्य** स्वामीचे सेवेसी.

पो **सदाशिव रघुनाथ घाणेकर** सां नमस्कार विज्ञापना सुा खमस खमसैन मया अलफ. श्रीमंत राजश्री **पंत सचीव** स्वामींनीं आपणांपासून कर्ज रुा ६०००० साठ हजार घेतलें. मिति ज्येष्ठ वद्य सप्तमी शके १६७६ भाव नाम संवछरे. त्यापैकीं आम्हीं सरकत तुम्हांसी केली आणि वीस हजार रुा आम्हीं दिल्हे व तुम्ही चालीस हजार. यों साठ हजार रुा यांसी सरकारांतून यैवज तुम्हांकड दिल्हा. सनदा बीतपसील,

| | |
|---|---|
| ५००० | **साहोत्रा** |
| १०००० | **जालनापूर** |
| ५००० | **बीड आंबड** |
| २०००० | |

यो वीस हजारांच्या वराता दिल्ह्या. तीन तक्षिमीप्रमाणें यैवज विभागें तुम्हीं आम्हीं घ्यावा. बाकी यैवज चालीस हजार पेस्तर सालाकारणें राहिला. त्यास जो यवैज सरकारांतून येईल, तो सदरहूप्रो यथाविभागें तुम्हीं आम्हीं घ्यावा. येणेप्रों करार आसे. सदरहू साठ हजार तुम्हीं व वीस हजार आम्हीं **श्रीमंता**कडे कर्ज दिल्हें. याचा यैवज **श्रीमंता**कडून हालीं वीस हजार, सदरहू वरातांपैकीं व पेस्तर जे उगवतील त्यांपैकीं, येक तक्षिम आम्हीं व दोन तक्षिमा तुम्हीं येणेंप्रों घ्यावें; म्हणून **स्वामींचा** आमचा करार आसे. सेवसी श्रुत होये हे विज्ञापना. मिती शके १६७६ भाव नाम सवछर जेष्ठ वद्य ७ छ. २० साबान आवल साल, हे विज्ञापना.

Vishwanathbhat Vaidya and Sadashiv Raghunath Ghanekar together agreed to pay a debt 60 of thousands to Shrimant Sachiv. The conditions of the fulfilment of agreement are stated in this by Mr. Ghanekar. There is also another letter written by Mr. Vishwanathbhat to Mr. Ghanekar, having the same contents. Mr. Ghanekar was to pay $\frac{1}{3}$ of the portion of capital and to receive in return $\frac{1}{3}$ of the capital and interest, if received. Vishwanathbhat was to pay $\frac{2}{3}$ of the capital i. e. 40,000, but received security, of 20 thousands It was Sahotra and the revenues of Jalnapur and Beed Ambad.

पत्रांक ९ ] श्री आषाढ शुध ५।१६७६
जून २५,१७५४

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **रामचंद्रपंत** स्वामी यांसि.

पो **सदाशिव रघुनाथ** सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकीयें लेखन करीत आसिलें पाहिजे विशेष. राजश्री **विश्वनाथबावा** यांणीं सरकारांत दोन हजार रुपये **हतीवाल्यास** व **परभू गुजर** यास देविले ते दिल्हे. ऐसीयास **बावाची** व आमची करारी जाहली ती आपणांस कळलीच असेल. त्यांस आम्हीं सरकारांत रुपये किती ध्यावे व **बावांनीं** किती द्यावे याचा अर्थ मनास आणून लिहिला पाहिजे. राजश्री **आपाजीराव गाडगीळ** यांचे रुपये आम्हीं हजार देणें होते, ते एक हजार ऱ्याणव रुपये राजश्री **बावांकडे** दिल्हे. त्याचें खत तुम्हांकडे **गाडगीळ** यांणीं दिल्हें आहे, तें व आपणांकडे आमचीं जुनीं खतें असतील तीं, पाठवून द्यावें. राजश्री **बावांची** आमची बोली जाहली कशी ! साठ हजार भरणा श्रीमंतांकडे **बावांनीं** केला, त्याजमध्यें वीस हजार रुा आम्हांस श्रीमंतानीं रद कर्जांत देविले व **मोरो नारायण** यांजकडे पंधरा हजार देविले. वरकड किले दाहा व श्रीमंत पंधरा, त्यांजपैकीं आम्हांकडे रुपये **बावांनीं** द्यावे किती ! आम्हांस पावले किती ! अथवा आम्हांकडे कांहीं तुमचे फिरतात कीं काये ! **पन्नास हजार रुा** दरमहास **बावांनीं** द्यावेसा करार. त्यास ऐवज **बीडअंबड** चाळीस, दाहा हजार **जालने**, एकूण पन्नास. त्याजपैकीं **हत्तीस** तूर्त दिल्हे दोन हजार. ते आम्हांकडून देविले ते दिल्हे. सदरहू साठ हजार नवें कर्ज **श्रीमंतांनीं** घेतले. यास ऐवज बिनऐवजीं चाळीस व ऐवजीं वीस. त्यास **बागती जालने** दाहा व **बीडअंबड**पैकीं पांच व **सावोत्रा** पांच, एकूण वीस. सालगुदस्तांचें कर्ज रुपये तुम्हांकडील शेचाळीस हजार **श्रीमंतांनीं** देणें, त्यास ऐवज लाऊन दिल्हा, **निघोज** हजार व खासगी हजार **बापूकडील** व **फौजदार सिरवळ** पांच हजार व सुभा **मावळे** दाहा व **सुपे** तिनि व **मोरो नारायण** पंधरा हजार तिनिशें व **बीडअंबड** अकरा हजार. याजप्रमाणें निशा त्यांस तुमच्या निशा जाहल्या कोणत्या ! नाहीं कोणत्या ! तुम्हांस **बावांनीं** कसें समजाविलें ! तुम्ही कसें समजलां ! त्यांची आमची बोली तिजाई सरकतीची आहे. त्यास ते म्हणत होते निमे. त्यांचा मजकूर तुम्ही कसा समजला ! तें विस्तारें लिहावें, म्हणजे त्याजप्रमाणें तुमच्या आमच्या जमाखर्चास ताल पडेल. **फौजदाराकडील** पांचपैकीं तीन हजारांची निशा आमची त्यांणीं केली. **सुभेदाराची** ही जाल्याचमध्यें आहे. **सुपे, निघोज** व खासगी गांव येथील पाचा हजारांची निशा श्रीमंतांनीं **बाजी बावाजी** कडून **बावांचें** रुबरूच करीवली, असें वर्तमान आहे. त्यास सेचाळीसाच्ये निशेपैकीं अठरा हजारांची निशा जाहाली. बाकी राहिली. त्याचा विचार काय केला ! तो लिहिणें. श्रीमंताकडे पंधरा हजार रुपये देणें, त्यांजपैकीं सतावीसशे तो तुम्हीं दिल्हेच होते. आम्हांकडून बेवीसशे व

**सातारीयास** दिल्हे. **रत्नपारखी** यांस ध्यावयास पांचशें, एकून सत्तावीसशें. यांजखेरीज कांहीं दिल्हे कीं काय ? निशा करून घेऊन ऐवजही झाडून तुम्हीं कराराप्रमाणें दिल्हाच असेल. परंतु उगेंच लिहिलें. असा लिहिला अर्थ मन घालून समजोन वाचून राजश्री **बावांस** माहितगिरी पुसोन कारकुनीनें तपसीलें, लिहोन पाठविलें पाहिजे. खतें **बहीरजी सिंदा** दि॥ **सोनजी जोरकर** पाठविला आहे. याजवळ जरूर द्यावीं, देखील **गाडगीळ** कडील. हजार रुपयांचें खत **धेमाजीपंत खंडेराव जाधव**कडील कारकून यास द्या, **बावांस** सांगितलें होतें कीं, येकसे दीजे, ते दिल्हे नसिले तर न देणें. दिल्हें असिलें तर माघारें घेणें. येथें त्यास आम्हीं दिल्हे. हातास द्या तुमच्या न येत तर पावती तरी घेऊन पाठविजे. श्रीमंत राजश्री **पंतांचे** नांवें कीं, **सदाशिवपंताचे** विद्यमानें तुम्हांकडे आपली असामी आहे, याचे द्या १०० एकशत पावले, ऐसें कबज घेऊन पाठविलें पाहिजे. कृपा कीजे हे विनंती. कागद वाचून फाडूनच टाकावा हे विनंती.

This lengthy letter is written by Sadashiv Raghunath Ghanekar to Ramchandrapant Karkare about the partnership he had with Vishwanathbhat for the debt of Rs. 60000, they agreed to pay to Pant Sachiv. The terms of the partnership and the documents made, were explained in detail to him as he was the head manager ( दिवाण or दिमत ) of Vaidyas and kept the accounts. Mr. Karkare had gone with Vishwanathbhat to Kashi in 1756. This letter seems to be written either in 1754 or 1755.

---

पत्रांक १० ] श्री भौमवार आषाढ शु. ६।१६७६
जून २६, १७५४

राजश्रियाविराजित राजश्री **विश्वनाथभट बावा** स्वामींचे सेवेसी.

पोष्य **सदासिव रघुनाथ** साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकीयें कुशल लेखन करीत आसिलें पाहिजे विशेष. अम्ही **भोराहून** श्रीमंतांची आज्ञा घेऊन स्वार होऊन भौमवारीं आषाढ शुध षष्टीस **पुणीयास** दाखल जाहलों. **श्रीमंतांची** भेटी जाहली. गुदस्तापेक्षां सालमजकुरीं कृपा बरीच आहे. श्रीमंत राजश्री **भाऊसाहेब श्रीगंगास्नानास** गेले. आठा दिवसीं येणार ऐसें वर्तमान आहे. **दिल्लीकडील** वर्तमान तुम्हांस कळलेंच असेल. पेशजीचे **पातशाहा** कैद करून नवे **पातशाहा** बसविले. आपण **भोराहून वाईस** गेल्यावरी पत्रें येकदोन आलीं तीं **भोरांत** पावलीं. त्या आलीकडे पत्र येऊन वर्तमान कल्त नाहीं. तरी लिहून पाठविनें. **भोरामध्यें**

स्वामींनीं श्रीमंतांकडील कर्जाचा हिसेब करून यैवज लाऊन घेतला. सेचालीस हजारांस, व सालमजकुरीं दिल्हे साठ. पैकीं बिनयैवजीं चालीस. यैवजीं वीस, पन्नास हजार दरमाहास. त्यांतील आम्हांकडे स्वामींनीं द्यावें किती व आम्हीं स्वामीचें द्यावें काये? सरकत तिजाई कीं निमे? याचा तपसील राजश्री **रामचंद्रपंतास** लिहिला आहे. त्याचा अर्थ मनास आणून आज्ञा कर्तव्य ते करावी. **किल्ल्याचे** रुो दाहा हजार देणें, त्याजपैकीं साहा हजार आपण दिल्हे व **अंबरसिंग** व **जेधे** यांजकडे कांहीं देविले. त्यास **अंबरसिंग** जमान, **जेधे** तो कलतच आहे. व याजकरितां **किल्याचा** यैवज ठेऊं नये. जरूर दिल्हयास पाहिजे. **जेध्या**कडील यैवज पंधरामध्यें श्रीमंताकडे धरावे; म्हणजे त्याची उगवावयाची तरतूद होईल, परंतु **किल्याचे** येकंदर न धरावे. राजश्री **बाबूरायाकडे** देवावे अथवा येथें आम्हांकडे द्यावे. त्यास पावते करूं. **श्रीनागनाथाचे** इमारतीस पंधरा हजार **श्रीमंतां**कडील, पैकीं आम्हांकडे देवावे. आम्ही पावते करूं. हजार रुा सरकारांत गेल्यानें **श्रीस** त्वरेनें पावते होणार नाहीं. आपण जाणतच आहेत. कागदाचा अर्थ पुरता ध्यानांत आणून जाब पाठवावा. त्याजप्रमाणें जमाखर्च करूं. **श्रीमंतांनीं** दरमाहास रुा तुम्हांपासून आणविले व राजश्री **रामचंद्रपंत** सुभेदारास कर्जाचे यैवजीं पंधरा देविले. त्याचा विचार स्वामींनीं कसा केला? दरमहास व सुभेदारास रुपये देणें आहेत कीं काये? तें तथ्य लिहावें. जो जाबसाल उलगडला नसेल, आमचे कागदीं तो फिरोन लिहावा. माणूस मागती पाठवूं. आपण कधीं येणार तें लिहिनें. हे विज्ञापना.

This letter is written by Sadashiv Raghunath to Vishwanathbhat detailing the money dealings amongst them as regards the debt they paid to Pant Sachiv and other persons. This letter is useful to determine the date as it gives the definite time of other important incidents that happened at that aime. The visit of Sadashivrao Bhau. and the arrest of the Present Delhi Patshaha and the installation of a new one are some of them.

---

पत्रांक ११ ] श्री आषाढ शु. ७।१६७६

जून २७,१७५४

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथभट वैद्य** स्वामी गोसावी यांसि.

पो **आपाजी राम गाडगीळ** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील वर्तमान तागायेत आषाढ सुध ७ पावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री **भाऊसाहेब नासिक-त्रिंबकास** गेले व रा **दादा**कडील वर्तमान तरी **जाटा**पासून तीस लाख रुपये घेऊन सलुख केला आणि

**हस्तनापुरास** गेले. सार्वभोम लुटून फस्त केला आणि नवा पातशाहा बैसविला. इतके करावयासि कारण रा. **हिंगणे** यांजकडून जालें. त्याजवरून यैसें वर्तमान तिकडील जालें. येथील **श्रीमंतास** बहुत खुशाली आहे. आमचे घरून **नारो विश्वनाथ** यानें **वाईहून** पत्र पाठविलें कीं, **मल्हार नाईक** व **गणोबा नाईक रास्ते** जागा नांगरून बाग करितात म्हणोन लिहिलें. **रामचंद्र जोसी** यांचे घराचे पाठीमागें व आमच्या भिंताडाचे मध्यें मैदान आहे तें नांगरून बाग करितात म्हणोन लिहिलें, त्यास आम्हीं त्यास पत्र त्याहावें तरी आम्ही कांहीं त्यांचें खातरेंत नाहीं. यास्तव कांहीं **नारोबानें** सांगितलें तें कांहीं यैकत नाहींत. तरी तुम्ही त्यांस +++++ सांगऊन पाहणें, ++++ पचवीस हजार रुा खर्च करून +++ कितेक लोकांनींही घरें बांधिलीं. त्यास माळावर १ जबून बसविली. गावही नव्हे, तेथें जरकरता सेपनास घर जालें तर वस्ती करावयासि योग्य. नाहीं तरी दाहापांच घरांनीं निभाव तेथें होतो यैसें नाहीं. च्यार चोहीकडे बागा केल्यानें उत्तम नाहीं. मैदान जागा, पंचवीस इमारती व्हायची जागा आहे, यास्त (व) तुम्ही त्यास बरे प्रकारें उमजोन सांगून पाहाणें. ऐकतील तर उत्तम, न आईकत तरी तसेंच आम्हांस सांगून पाठवणें. येथें श्रीमंतांच्या कानावर घालूं. येथील श्रीमंतही कदाचित् अमान्य केलें तरी आम्हींच आपलीं मनुष्यें तेथून **पुणीयास** आणावीं लागतील. मग सुखरूप साऱ्याच जागीं त्यांच्या बागाच होतील. या पत्राचें प्रत्योत्तर पाठवावें, त्यासारिखी वर्तणूक करूं. बहुत काय लिहिणें. कृपा असो दीजे हे विनंती.

---

१ वाईट, खराब.

Appaji Ram Gadgil wtites to Vishwanathhhat the news that Sadashivrao Bhau went to Trimbak and Nasik. Raghunathrao Dada received Rs. 60 lacs from Jat and went to Delhi where he deposed the Patshaha and after destroying the throne, a new Patshaha was installed. He also informed him that Rastes were converting the land near their house into gardens.

---

पत्रांक १२ ] श्री आषाढ १६७६
जुलै १७५४

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथभट वैद्य** स्वामी गो.

पो **आपाजीराम गाडगीळ** कृतानेक सां नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. श्रीमंत राजश्री

**पंत सचीव** यांणीं तुम्हांकडून आम्हांस देविले रुा १००० येक हजार ते सदरहू येक हजार राजश्री **पंत सचीव** यांसि देविले असेत. देऊन कबज घेणें. सदरहू आर्कोटी देणें.+ बहुत काये लिहिणें हे विनंति.

---

\+ पुढील मजकूर लेखकाच्या हातचा.

Really it is a peculiar transaction that Pant Sachiv asked Vishwanathbhat to pay Rs. 1000 to Appaji Ram Gadgil. But Gadgil before receiving the money wrote to Vishwanathbhat to pay the amount to Pant Sachiv and get a receipt of the same. It seems Gadgil had to pay the money to Pant Sachiv.

---

पत्रांक १३ ] श्री पो आषाढ वद्य ६।१६७६
जुलै १०,१७५४

पो आषाढ वद्य ६ मु पुणें.

वेदशास्त्रेसपन राजेश्री **विश्वनाथ वैद्य बावा** स्वामींचे सेवेसी.

सेवक **शामजी फुलाजी** कृतानेक सां नमस्कार निनंति उपर. येथील क्षेम जाणून स्वकीयें कुशल लिा जाणें. विशष बहुत दिवस जाले. पत्रें पाठऊन सनाथ न कलें, हें अपूर्व आहे. आतां आलिया मनुश्याबरोबर पत्रद्वारें परामृश केला पाहिजे. उपर सालमजकूर रुा मामलीयेत केली. येक लक्ष रुपयांची निशा केली. व **सागर** येथील वीस हजार रुा रसद दिधली. येकून येक लक्ष वीस हजार रुा दीधले. वडिलांस कलावें. आपलें कर्ज आम्हांकडे येणें त्यांजपैकीं बीा

५२०० राजेश्री **रंगोपंत** याजकडे रुा आले.
७०६। किता **सिंपी**

---

५९०६।

येकून पांच हजार नवसे साह रुा चार आणे वसूल पावला. बाकी मुदलपैकीं रुा अकरासे व व्याजाचा हिसेब अधिक आहे तोही पंधराविसा रोजांमधें रो **रंगोपंत** याचे पदरीं घालून कबज घेतों. रुपये आम्हीं सर्व दिले कीं, नवे सालची रसद भरना केला. याजकरितां रुपये रसदेचे भरनियांत घातले. आतां आशाढ मासीं रसदा घेऊन तुमचा हिसोब तमाम वारून देतों. बाकी मामलितींचें कर्ज गतवरसींचें तमाम फडशा केलें. आपनांस कलावें. आपनही सत्वर आलें पाहिजे. राजेश्री **बगोजीपंत**

बहुत कृपा करित आहेत, आपनास कलावें.+ बहुत काये लिहिणें. हे विनंति. सविस्तर वर्तमान रा **रंगोपंता**च्या पत्रावरून कळूं येईल हे विनंति.

+ पुढील मजकूर लेखकाच्या हातचा.

Shamji Phulaji writes to Vishwanathbhat the account of his money obtained and spent for securing Mamlat of 6 villages. He had to pay the debt of Vishwanathbhat which he agreed to pay off in the month of Ashadh. He was an influential person at the court of Mudhoji, Janoji's brother.

---

पत्रांक १४ ] श्री+शंकर छ. २४ रमजान
आषाढ वद्य ११।१६७६
जुलै १६,१७५४

राजश्री **नागोजी राऊ पाटणकर** गोसावी यांसि.

दा। अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नों **विश्वनाथभट वैद्य** आसिर्वाद. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन केलें पाहिजे. यानंतर तुम्हांकडे आमचे रुो येणें, यास बहुत दिवस जाहाले. अद्याप भाग वारीत नाहीं, हे गोस्ट कार्याची नाहीं, तर देखतपत्र व्याजसुधां रुो आपालिया कारकुनाबरोबर पाठऊन देऊन आपलें खत आहे तें घेऊन जाणें. दिसगत न लावणें. रा छ २४ माहे रमजान बहुत काय लिहीणें. या कामास श्वार दिा राजश्री **पंतप्रधान** पा. यास रुपये १० दाहा देणें. बहुत काये लिहीणें. हे आसिर्वाद.

+ पुढील अक्षर लेखकाचें स्वतःचें आहे.

याच मितीचीं व मजकुराचीं पत्रें १ **श्रीनिवास नारायेण देशपांडे पाली**; **२ मल्हार त्रिंबक मसूरकर**; **३ स्वरूपजी प्रतापजी** व **दुर्गोजी माहाडिक** ( तारळ्याचे इनामदार ) यांस पाठविलेलीं आहेत, तीं छापलीं नाहींत.

This letter is addressed by Vishwanathbhat Vaidya to Nagojirao Patankar Jedhe deshmukh of Bhor state, for the demand of money given to him as debt. It is worded just like the one addressed by him to Mahadik brothers (Inamdar of Tarale) on the same day. Though these letters are not written by Pant Pradhan, Vishwanathbhat is indirectly helped by him, by probably providing his soldiers sent for the recovery of these debts.

---

पत्रांक १५ ] श्रीराम १६७५
१७५३

शिक्का व मोर्तब
वाटोळा व दुरेघी

शिका

श्रीराम प्रस
न राजा शाहू
चरणीं तत्पर ना
गोजीराव पा
टणकर

राजश्री **विश्वनाथभट** व राजश्री **बाळंभट वैद्य** गोसावी यांसि.

दाा अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्ये श्रों **नागोभाऊ पाटणकर** दंडवत विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीणें. यानंतर आपण पत्र पाठविलें तें पावलें. तेथें लिहिलें कीं, पैका पाठवणें. यैसीयासी आपणांपासीं पंधरा दिवसांचा नेम केला, परंतु **सातारा** सावकार जितका होता त्यांसहिते शोध केला, परंतु पैका नाहीं. **सातारीयाच्या** सावकारांचा विचार आपणांसही विदित आहे. **गोसावि**-यांकडेही प्रेत्न केला, परंतु नाहीं. याजकरितां पैका राहिला तरी इतकी दिवस जैसी मेहरबानी केली तैसीच आणखी येक महिना केली पाहिजे. प्रेत्न फारसा केला, परंतु कोठेंही पैका नाहीं. पैका मिळता तरी आम्ही येकंदर न ठेवितों. तरी येका महिनीयानें कोठें तरी प्रेत्न येत्न करून पैका पाठवून देतों. तरी मेहरबानी करून येक महिना राहिलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे, हे विनंति.

मोर्तब
सुद

Nagojirao Patankar writes to Vaidya brothers the difficulty of paying off his debt as the money lenders of Satara and even Gosavis are not willing to lend money. He requests them, therefore to give time of one month to arrange for payment. There is a stamp and Mortab also of the writer on the paper. Balambhat died in 1753. The date of the letter cannot be 1754).

---

संवत १८१०
पत्रांक १६ ]
आषाढ वद्य १२।१६७६
जुलै १७,१७५४

श्रीमंत राजश्री **विस्वेनाथबावा वैद** स्वामींचे सेवसी.

पोसे **भिकाजी बगदेव महिनमाल**[1] सां नमस्कार विनंती उपरी. आपन रा **यादो महादेव** यांसि तालुका **चिमनासाव**[2] वगैरे गांव येथील वकीलीचा रोजगार सांगितला. त्यास जामिनीचे विसई आज्ञा केली. तर आपन माानिलेस हजर करून देऊन. हजर न करून तर आपन याहाचे कामकाजाचा जो X भरून. बहुत काये लिहिनें हे विनंति.

ता छ १२ वदी आखाड सा १८१० वो.

---

१ महिन्यांचे बोलीनें ठेविलेला चाकर. २ एक वऱ्हाडांतील गांव.

Bhikaji Bagdeo Mahinmal stood a guarantee for the honest work of Yado Mahadeo who was engaged by Vishwanathbhat Vaidya to recover the dues of ambassadarship of Chimnasao and other villages.

---

पत्रांक १७ ] श्री छ. २ सवाल
श्रावण शुध ३।१६७६
जुलै २३,१७५४

चिरंजीव राजश्री **गणेशपंत तात्या गद्रे** यांसि प्रति **बाबुराव नारायेण** कृतानेक आसिर्वाद उपरी. येथील कुशल ता छ २ माहे सवालपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष सांप्रत तुम्हांकडून पत्र येऊन कुशलार्थ कलत नाहीं. तर यैसें नसावें. सदैव येणाराबा पत्र पाठऊन संतोषवीत जावें. इकडील मजकूर तर **कोकणांत** फौजा गेल्या आहेत. तमाम मुलूक लुटितात. यैसें आहे. **रत्नागिरीचा** सुभा राजश्री **सदाशिवभट दात्ये** यांसि सांगोन पाठविले आहेत. इकडूनच खालीं गेलें. **सुवर्णदुर्ग व तलाघोसाळा** वगैरे किले यांनीं घेतले. कलावें. वेताची संचली देवपूजेस पाहिजे, त्यास दोन संचल्या चांगल्या लांब दीड वीत व उंच येक वीत याप्रों पाठऊन द्याव्या. आमचे शरीरीं समाधान नाहीं त्यास देवीऔषधी उपाय करीत आहों. अद्याप गूण पडत नाहीं. **को[क]णांत** सिपाई पाठविले आहेत. आठाचौ रोजा येतील. कलावें. बहुत काय लिहीणें. लोभ आसो दीजे, हे आसिर्वाद. सदरहू लिा प्रों संचल्या तीन पाठऊन द्याव्या. हे आसिर्वाद.

आपल्ये विष्णूचे सिर सां नमस्कार. विज्ञापना ऐसी जे. तीर्थस्वरूप रा **दादाचे** शरीरीं वायूच्या उपद्रव जाहाला, त्यास देवीऔषधी उपाय करीत आहों. परंतु आद्याप गूण पडत नाहीं. कलावें. आपण बहुत सावधपणें आसावें. तिकडे दंगा जाहाला आहे, यास्तव लिहीलें आहे. कलावें. येकादा शालग्राम चांगलासा मिला [ला] तरी येत्न करून किल्यास घेऊन यावें. बहुत काय लिहूं. कृपा करावी हे विज्ञापना.

The Gadre persons mentioned in this letter belong to their native place Gadre Lawagan in Konkan near Vaidya Lawagan, on the side of Shastri River i. e. Jayagad Khadi. Baburao Narayan Gadre writes to Ganesh Krishna Gadre, his uncle's son that armies have gone in Konkan and plundering the people. Sadashivpant Datye was appointed as Subhedar of Ratnagiri district. He captured Suwarnadurga and Tale Ghosale, Baburao was not keeping good health. He asked Ganeshpant to supply him three cane-woven boxes (संबल्या) in which he kept the images of gods to be worshipped daily.

---

पत्रांक १८ ] श्रीशंकर हुंडी

श्रावण शुध १०।१६७६

जुलै २९,१७५४

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री **वासुदेव दिक्षित पाटणकर** स्वामींचे सेवेसी.

पो **विश्वनाथभट वैद्य** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन केलें पाहिजे. यानंतर तुम्हांवर आम्हीं आपले यैवर्जी चिठी केली आहे. येथें रावलें वेदमूर्ति राजश्री **सिवभट खरे** मा वेदमूर्ति राजश्री **आपाभट शारंगपाणी खरे** यापासून घेतले रुपये १०००० आक्षरें दाहा हजार, याचे निमे पनासले, याची दुणी करून नामें वेदमूर्ति राजश्री **बापूभट खरे शारंगपाणी जोग,** टावठिकाणा चौकस करून चिटी पावलिया रोजा ४॥४॥ उपर रुपये हालीं सिका दीजे. मिती श्रावण सुध १० शके १६७६ भावनाम संवत्छरे.+ बहुत काये लिहिणें हे विनंति दस्तक खासा खुद.

यादी चिट्या **वासुदेव दिक्षित** यांजवर श्रा सु १० रावले **सखाराम ना। भिडे** व **भिकाजी ना मराठे** देणें. जोग **सखाराम ना। भिडे,** हुंडी पा रोजा ८४॥४॥ उपर १३०००, १२०००, १५०००, १००००.

५००००

This is a Hundi written by Vishwanathbhat Vaidya and sent to Vasudeo Dixit Patankar to pay Rs. 10 thousands to Shiwabhat Khare Bapubhat Khare (Sharangpani). It seems he was asked by different Hundis to pay in all 50 thousands to Sakharam Naik Bhide and Bhikaji Naik Marathe on the same day. This is a Hundi of Jog (जोग) kind, typically writhen.

---

पत्रांक १९ ] श्री+शंकर श्रावण शुा ११।१६७६
जुलै ३०,१७५४

चिरंजीव राजश्री **बाळाजी ना। व कृष्णाजी ना। भाव्ये** यांसी **विस्वनाथभट वैद्य** आसिर्वाद उपरी. आमचे यैवजीं राजश्री **सिवाजी नारायण भाव्ये** यांसि रुपये ५०० पांचसे देविले आहेत तरी देणें. पावलीयाचें कबज घेणें. तेणेंप्रों सदरहू रुपये राजश्री **कृष्णाजी ना। रास्ते** त्यास देणें. मिा श्रा शुा ११ भावनाम सवछरे + हे आसिर्वाद.

+ पुढील अक्षर विश्वनाथभटांचें आहे.

Bhave family seems to be related with Vaidyas. Vishwanathbhat addresses Balaji and Krishnaji as Chiranjiv and give them Ashirwad. These Bhave brothers were Inamdars of Adur in Kolaba district.

---

पत्रांक २० ] श्री श्रावण वा। ११।१६७६
आगष्ट ४,१७५४

श्रियासह चिरंजीव विजयी भव राजश्री **विश्वनाथभट वईद्य** या प्रति **राघो माहादेव पटवर्धन** आसीर्वाद उपरी. तुम्हीं चिटी केलीत. राजश्री **कृष्णाजी गोविंद गोरे इंदलकर** रुये ४७५ पावणे पाचसे, याचा तपसील, रा। **आपाजी दादाजी दामले** रु. १५५ व आम्हांकडील ३२०, एकूण पावणे पांचसे देविले. त्यास राजश्री **बाळाजीपंत गोरे इंदलकर** व **धनसिंग** व **सटवोजी वाघमारे** यांचे पदरीं

सदरहूप्रों रुपये घालून कबज घेतलें असे. सदरहू पावणे पांचशे रुपयेपैकीं येणेंप्रों दिले. तपसील.

१०५ **आपाजी दादाजी दामले** यांसी चिठी १५५, पैकीं त्याणीं दिले.
५० **बापोजी विश्वनाथ कोलटकर** यांणीं **आपाजी ना दामले** यांचे चिठीपैकीं दिले रुपये.
३२० खुद्द आम्हीं दिले.

४७५

येणेंप्रमाणें दिले आहेत. सदरहूप्रों जमाखर्च करणें नांवनिसीवार. बहुत काय लिहिणें, हे आसीर्वाद. मिती शके १६७६ श्रावण वद्य १.

This letter is written by Ragho Mahadeo Patwardhan to Vishwanathbhat confirms the letter written by Appaji Dadaji Damle. Krishnaji Govind Gore was also called Indalkar ( इंदलकर ) being, it seems, an inhabitant of इंदल.

---

पत्रांक २१ ]

भावनाम श्रावण वद्य १।१६७६
आगष्ट ४,१७५४

श्रीमंत राजश्री **विस्वनाथभट** स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक **आपाजी दादाजी दामले** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. आपण राजश्री **कृष्णाजी गोविंद गोरे** यांस चिटी रुा १५५ येकसे पंचावन याची चिटी केली. त्यास आम्हाजवळ भर(ती) नवती. त्यास आम्हीं मुद(ल) दिले रुा १०५ येकसे पाच व राजश्री **बापाजी ना** यांहीं दिलें ५०. आपणांस कळावें म्हणून लिा आहे. राजश्री **राघोबा नाईक** यांहीं आपणांस तपसीलवार लिा आहे. परंतु सूचना मात्र लिा आहे. पुढें आस्वीन मासीं आम्ही भेटीस येऊं. तेव्हां आपला हिसेब वारूं, आणि आपलें खत काढून घेऊं. रा **बालाजीपंत गोरे** व जासूद यांचे गुजारतीनें दिले. बहुत काये लिहिणें. कृपालोभ आसो दीजे. हे विज्ञापना. शके १६७६ भावनाम सवछरे. श्रावण वद्य प्रतीपदेस दिले हे विनंती.

Appaji Dadaji Damle informed Vishwanathbhat that he was unable to pay the whole amount of Rs. 155 to Krishnaji Govind Gore according to his letter ( चिटी ). He himself

paid only Rs. 105. and Bapaji Naik paid Rs. 50. This letter contains the surname of Krishnaji Govind distinctly written as Gore ( गोरे ). He was the manager of Bhaskarram Kolatkar's wife, Taibai.

---

पत्रांक २२ ] श्री छ १५ सवाल
श्रावण वद्य २।१६७६
आगष्ट ५, १७५४

शिक्का
अष्टकोनी दुरेघी
मोर्तब षट्कोनी
दुरेघी

॥ श्री ॥
रघुविर सुतस्ये
यं जित शत्रोर्बलिय
सि जानोजी भोसले
नाम्नो माति मुद्रा
यशस्करि

राजश्री **विश्वनाथ वैद्य** गोसावी यासी.

दा। अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये श्रों **जानोजी भोसले** दण्डवत उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन करणें. विशेष. राजश्री **राणोजी-बावा भोसले** यांच्या यैवजाविसीं पेशजी तीर्थरूप राजश्री **बावासाहेबीं** तुम्हांस सांगणें तें सांगितलें आहे. तरी तुम्ही त्यांस यैवज प्रस्तुत खर्चास देणें. येतद्विषयीं अनमान न करणें. आम्हीही **वराड** प्रांतेस बंदोबस्त करावयास आलों. असो. सांप्रत येथील बंदोबस्त ये प्रांतीचा करून तुम्हांकडे यैवज पोहोंचता करून. वरकड वर्तमान येयास्थित असे. रा छ. १५ माहे सवाल. बहुत काय लिहिणें. मोर्तब
सुद

Janoji Bhosle writes to Vishwanathbhat to pay to Ranojibaba Bhosle the money necessary for his expenses as ordered by Raghuii Bhosle. Ranoji was the uncle of Raghuji. Janoji was going to Berar to keep the administration in good order. On his return he was to repay Vaidya's money. When Janoji was not Sena Saheb Subha, and even for some years after the assumption of Subhaship, he used his father's stamp.

---

पत्रांक २३ ] श्रीशंकर श्रावण वद्य १०।१६७६
आगष्ट १३, १७५४

लिहिलें पत्र राजश्री **विस्वेनाथपंत वैदे** स्वामी गो यांसि. **भिकाजी विठल भुत** मा **रामटेक** सां नमस्कार विनंति. आपणांस तुम्हीं रा **मोहनसिंग-बावाचे** तालुकयावरी मुजुमू देऊन पाठविलें. त्यास दोन हजार वेतन असे. त्यांपैकीं हजार रुपये १००० ҄ तुम्हांस देऊन. आनि आवांतरतून मिळेल, त्यांजपैकीं चवथा हिसा आपन घेऊन. हे विनंति.

ता छ. १० वदी श्रावण, सां १८१० बा.

Bhikaji Vithal Bhute of Ramtek writes to Vishwanath-bhat Vaidya that he is willing to recover the revenue of the Talukas of Mohansing, if he is appointed Mujumdar and paid Rs. 2000 as his remuneration. He is also ready to give him Rs. one thousand out of the two and one-fourth of other emoluments if acquird. This Bhute is a new man, not yet found in other papers.

---

पत्रांक २४ ] श्री श्रावण वद्य १३।१६७६
आगष्ट १६, १७५४

राजश्री **रघोजीबावा भोसले** गोसावी यांसी.

ाद श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्ये स्नों **गुणाजी सिरके** रामराम विनंति उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकीय लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर आम्हांकडील वर्तमान तर श्रावण वदे त्रयोदसी-पावेतों समस्त सुखरूप असो, विषेसी बहुता दिवसीं दया करून पत्र पाठविलें तें पावलें. तेथ लिहिलें होतें जें, भेटीस येण तर शरीरीं समाधान नाहीं. कलल पाहिजे. यानंतर तांदूळ ·।· चार पायली व कोंबडी सुमार ५ पांच पाठविलीं आहेत, तीं घेतलीं पाहिजे. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे. + हे विनंति.

+ पुढील लेखकाचें अक्षर.

Mr. Shirke has written this letter when Raghuji was ill. He sent for Raghuji rice and hens. Raghuji died on 14-2-1755.

पत्राक २५ ] श्री भाद्रपद १६७५

आगष्ट १७५३

अपत्यें **विश्वनाथाचे** साष्टांग नमस्कार विनंती उपरी. मौजे **खोडद** येथील पाटील पलाले होते, त्यास कौल[१] देऊन आणिले. त्यांचा करारनामा पाठविला आहे, त्याप्रों कौल लिहोन सिकारून पाठवणें, आणि **बालोजी ढुबल** व **केसरकर** यांचा गुदस्ताप्रों रुपये देऊन त्यांचा रोखापत्र येकंदर न होय तें करणें. वरकड यांसी कोणा येकाचा उपद्रव लागो न देणें. बहुत काये लिहिणें. तुम्हीं आपणांकडील सविस्तर लिहिणें. आम्ही येथून पुढें गेलों. तुम्हांस कळावें. हे विनंति. **सुभानजीस** रोजमारा येक महिना देणें.

---

१ अभयपत्र, वचन, कबुलायत.

Vishwanathbhat writes to Balambhat what is to be done with the cultivation of Khodad village. He asked him to get a Kabulayat from the village according to the draft sent to him. He was at Khodad and left it for further tour. The whole letter is written by the writer himself during the life-time of Balambhat who was no more after 1753.

---

पत्रांक २६ ] श्री+शंकर भाद्रपद शुध ७।१६७६

आगष्ट २४,१७५४

वेदशास्त्रसपन्न राजश्री **वासुदेव दिक्षित** व **बालकृष्ण दिक्षित** पाटणकर स्वामीचे सेवसी.

पौ **विश्वनाथभट वैद्य** कृतानेक नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणून श्वकीयें कुशल लेखन केलें पाहिजे. यानंतर तुम्हांवर पूर्वी हुंडी केली मिती श्रावण शुध १० दशमीची केली आहे. येथें राखिले, वाो **सिवभट खरे** पासून घेतले रुा १००००, अक्षरें दाहा हजार, याची निमे पांच हजार, याची दुणी करून चिटी पावलिया रोजा ४॥-४॥ उपर नामें **बापूभट खरे शारंगपाणी** जोग, ठावठिकाणा चौकस करून घणीयाचें कबज घेऊन रुये हलीसिकयाचें घेणें. सदरहू हुंडी आलाहिदा आहे, ते पावलीनसी उत्तर हेपट[१] घेऊन सदरहू दाहा हजार रुये देणें. लिा मिती भाद्रपद सुध ७ शके १६७६ भावनाम सवत्छरे+ बहुत काये लिहिणें. लोभ असो दिल्हा पाहिजे, हे विनतीपर.

लिखित बाळकृष्ण दिक्षित पाटणकर नमस्कार उपरी. हें पत्र मार्गसीरश वदी ५ पचमीस पावलें. रुये तुमचे औरंगाबादेस पाठविले. तुम्हांसही लिहिलें आहे. या पेठचे रुा दिले नाहीं, कललें पाहिजे.

लिखित सिवभट खरे सदरहू पेठचे रुपये व हुंडणावळ व्याजसुद्धां हिशेबाप्रों चौ रोज्या दिल्हे. मिती भाद्रपद सुध ८ शके १६७७ युवानाम सवंछरे.

---

+ पुढील अक्षर विश्वनाथभटांचें. १ झटपट.

१ राखले – हुंडी घेणाराची स्थिति किंवा योग्यता, अधिकार.

२ धणीजोग – हुंडी विकत घेणाऱ्यास, ज्याच्या नांवची ती असेल त्यास, जिचे पैसे द्यावयाचे असतात त्यास यास ऑर्डर (Order) चेक म्हणतात. याच्या उलट शहाजोग – ज्याच्या हातीं ती असेल त्यास बेअरर (Bearer) जोग – योग्य.

३ उपरनामें – दुसऱ्या नांवानें.

This letter is about a hundi sent by Vishwanathbhat to Dixit Patankar brothers for paying Rs. 10,000 to Shiwabhat Khare. The language of Jog sort of hundi is worth studying. This letter contains the hand-writing of Balkrishna Dixit and Shiwabhat Khare. The words राखले, जोग, धणी and उपरनामें, have a peculiar meaning.

---

पत्रांक २७ ] श्री भाद्रपद १६७६
ऑगस्ट १७५४

तीर्थस्वरूप राजश्री विश्वनाथभट वईद्य मामा वडिलाचे सेवेसी.

आपत्ये समान बाळाजी जिवाजी भाव्ये व कृष्णाजी जिवा (जी) भाव्ये कृतानेक साष्टांग नमस्कार विनती. येथील स्वकीयें कुशल त्याहावयासी आज्ञा केली पा विशेष. वडिलीं हुंडी वोमूर्ती रा सिवभट खरे यांजकडील रुपये ४००० च्यार हजार देविले, त्यास पूर्णिमेस आम्ही देतों. परंतु ते येकादशीस मागतात. त्यास आम्ही त्यांजकडून न आले तरी रुये देऊन याजखेरीज आम्हांकडील रुये ५०० पाचसे देविले. परंतु हिसेब तूर्त जाला. त्याजमुळें रुा ध्यावयाची अनकूल पडत नाहीं व रा केसोपंत वईद्य यांजकडून देविले. ते म्हणतात कीं, दसरा जाल्याखेरीज रुा देत नाहीं. यैसें शाप सांगितलें. लक्ष्मण सिंपी पाठविला आहे तरी पत्राचें उत्तर सत्वर पाठवावें. भटजीकडील रुो आलियाखेरीज पैसा देत नाहीं. विस्तारें ल्याहावें तरी वडील आहेत. बहुत काये लि हे विनती. केसोपंताकडील रुये अडीच हजार, व आम्ही लावूं. रास्ते यांसी न देणें म्हणून पत्र पाठवावें. खरे यांजकडील रुये च्यार हजार आले म्हणजे सदरहू रुये देऊन. हे विनती.

रास्ते यांसी पत्र पाठवावें कीं, केसोपंत व कृष्णाजी जिवाजी यांजकडे रुये न मागणें. पत्राचें उत्तर पाठविलें पा. मार्ग लक्षितों.

Vishwanathbhat writes to Bhavye brothers by sending a hundi ( cheque ) to pay Rs. 4000 to Shivbhat Khare. They, in return, inform their difficulties of payment and the way they intend to follow.

---

पत्रांक २८ ] श्री अश्विन शके १६७६ सप्टेंबर सन १७५४

यादी ताकिदी सरकारच्या घेतल्या.

१ पा भागपूर यादो रघुनाथ
१ पा मारूड कादार नारो रघुनाथ
१ किले पवनी हुसेनखान
१ पा हिंगणे दादो बाबाजी कादार
१ कुसाजी केशव पा सावनेर
१ पा बोरी बाबूराव मुरार कादार
१ पा विरली दिा गुणाजी बाबा सिर्के
१ तालुका रघोजी करांडे दिा पागा
१ खंडोजी भोसले मोकासदार पांढुर्णे
१ पा केळवद वेंकाजी केशव
१ प्रा भीवगड
१ पाहामी वगैरे पा अमरावती
१ पा डोंगरमोदे दिा रा सटवाजी भोसले
१ पा धापळे
१ पा काटवळ हरबाजी नारायेण
१ पा रामपाईली फत्तेखान मोकासदार
१ पा पांढुर्णे
१ पा चिमूर
दिा त्रिंबकजी राजे भोसले
१ पा कुही
दिा त्रिंबकजी राजे
१ कर्यात हलदगाव बाळाजी विश्वनाथ
१ पा भिसी
दिा त्रिंबकजी राजे
१ कर्यात कारगांव
१ पा नंदरधन गणेश दत्ताजी
१ पा कळंबेश्वर रघूजी येशवंत
१ पा पाटणसांगवी अंताजी नारायेण
१ पा अमरावती पुजाजी शंकर
१ पा आबागड नारो रघुनाथ
१ पा ठाणेगांव मानाजी जाचक
१ पा वैरागड ता मोतीराम
१ पा ब्रह्मपुरी दामाजीराम
१ पा पारडसिंगे
१ पा गिरड पातीखान कारभारी रुद्राजीपंत कादार सनद रा नरसो भिकाजी
१ मौजे तारणे पा अम्रावती मोकदम

१ पा भुगाव हंसपुरी गोसावी
१ पा हासूल यशवंतराव मोहिते
१ ता मोकदम मौजे कळापरी
१ कळापरी बोरगाव पा आम्रावती
१ पा म्हैसरे रामाजी मल्हार
१ पारसिवनी पा भिवगड
१ पा पेठखापे आबूजीपंत
१ ता आनंदराव वाघ दिा पागा
६ ता रघोजी करांडे दिा पागा
१ ता मानसिंग वांजाळ दिा पागा
१ ता सिवणी सिपोरे मजीदखान
१ पा पेडवणी
१ पा मालेगांव दोनशाचे
१ पा नागभीड जीवनसा कादार
१ ता जीवनरामबाबा मोहिते गावगना प्रांत देवगड
१ सटवाजी सिंदे मोकासदार धापले व डोंगरमावदे
१ ता आटोली कर्यात विरली

It is to be seen from this list that Bhosle had to pay the remuneration of ambassadorship of so many villages to Vaidya and Vaidya came in contact with so many Paraganas and their officers, in Berar.

---

छ. ९ जिल्हेज

पत्रांक २९ ] श्री आश्विन शुध ११शके १६७६
सपटंबर २७ इ.स. १७५४

राजश्री कृष्णाजी नारायेण सुभेदार संस्थान चंद्रपूर गोसावी यांसि.

दा अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रों रघोजी भोसले सेनासाहेब सुभा दंडवत सुा खमस खमसैन मया अलफ राजश्री विसाजी रघुनाथ वकील यांची बाकी संस्थान मजकूरचे वकिलीपैकीं राहिली म्हणून विदित जाहालें. तरी [1]देखतपत्र वकिलीची बाकी झाडियानसी देऊ(न) पावलियाचें कबज घेणें. जाणिजे. छ. ९ माहे जिल्हेज.

---

१ पत्र पावतांक्षणीं.

Raghuji Bhosle, Senasaheb Subha, on knowing that the money was not paid to Vishwanathbhat for his ambassadorship, ordered Krishnaji Narayan, Subhedar of Chandrapur State, to pay the same to him in full, without leaving any balance.

There are also similar orders, issued to the following persons by Raghuji to pay the remuneration of ambassadorship of Vishwanathbhat Vaidya.

का. पा **वणासिरपूर चिमणासाव** आश्वीन शुद्ध ११।१६७६.
**मानसिंग वंजाळ** दि पागा आश्वीन वद्य ६।१६७६.
ता मोकदम मौजे **इसापूर** पा हवेली **चांदे** आश्वीन वद्य ७।१६७६.
**शामराव फुलाजी** सुभेदार ता **किलेभोवरगड** वगैरे आश्वीन वरघाट वद्य ६।१६७६ बरघाट.

It seems there was a Kamavisdar by name **चिमणासाव** and also it was a name of a village.

---

पत्रांक ३० ] श्री छ. १७ जिल्हेज
आश्विन वद्य ४।१६७६
आक्टोबर ५,१७५४

(पर्शियन भार्षेतील पत्रांकाखालील मजकूर ही लेखकाची सही असावी)

राजश्री **विसाजी रघुनाथ** साहेबांचे सेवेसी.

अर्जी शइदी जमान सलाम दिगर **सेख हुसन** यांस श्रीमंत राजश्री **बावासाहेब** यांकडून मारनिलेस नवकरीचे[1] वर्ख्रे घ्यावावीं. **साहेबांस** रुो ७५ पाउणसे देऊं, हे चिटी लेहून दिल्ही. सही तेरीख १७ माहे जिल्हेज सुा खमस खमसैन मया व अलफ.

---

१ नोकर, चाकर.

Sayyad Husen was to be employed as servant by Raghujibawa Bhosle. For this, Vishwanathbhat was promised Rs. 75 by Sayyad Jaman, who, it seems, has made his signature on the left corner of the letter in Persian language.

---

पत्रांक ११ ] श्री छ. २५ जिल्हेज
आश्विन वद्य १२।१६७६
आक्टो. १३, १७५४

साबाजीचा शिक्का व मोर्तब
अष्टकोनी दुरेघी

॥श्री॥
रघुविरचर
णीं तत्परसा
बाजी भोसले
निरंतर

राजश्री **गणेश दत्ताजी** कामदार पा **नंदरधन** गोसावी यांसि.

दा अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य श्रीं **साबाजी भोसले** सुा खमस खमसैन मया व आलफ. राजश्री **विसाजी रघुनाथ** वकील यांस [1]**रयेत-निा** दरसदे रुपया येक सुदामतपासून असे. तरी मारानिलेकडे सुदामतप्रमाणें देणें. जाणिजे.

श्री
मोर्तब
सुद

छ. ३५ आहे जिल्हेज + बहुत काये लिहीणें.

---

+ पुढील निराळया वळणाचा मजकूर लेखकाच्या हातचा.

१ रयतसंबंधीं.

Sabaji Bhosle writes to Ganesh Dattaji Kamavisdar Paragane Nandardhan to pay Visaji Raghunath Vaidya one per cent of the revenue for his Potadari as usual. Similar letters were sent by him to the following persons.

१ का पा **डोंगरेमोदे** दि रा **सटवोजी भोसले** आश्वीन वद्य १२।१६७६ रोजीं.

२ का पा **आबागड नारो रघुनाथ** आश्वीन वद्य १३ रोजीं.

३ का पा **मालेगाव** दोनशाचे, **दत्ताजी सिंदे** आश्वीन वद्य १४ रोजीं.

४ मोकासदार पा **रामपायेली दामो फत्तेखान** आश्वीन वद्य १४ रोजीं.

५ का पा पाठण **सांगवी अंताजी नारायेण** मार्गसीर्ष शुध ९।१६७६ रोजीं.

All letters have a Stamp and Mortab of Sabaji. These letters are not printed, being of the same contents. A list of orders issued by Raghuji to persons in charge of the Paraganas is printed on a separate paper dated November 10, 1754.

---

पत्रांक ३२ ] श्रीलक्ष्मीकांत छ. २९ जिल्हेज
कार्तिक शुध २।१६७६
आक्टोबर १७,१७५४

वेदशास्त्रसंपन्न राजश्री **बाळकृष्णबावा दिक्षीत** स्वामींचे सेवेसी.

सेवक **रघोजी भोसले सेनासाहेबसुभा** दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. **बंगाल्याचे** यैवजीं वेदमूर्ती राजश्री **सिवभट साठे** यांजकडे राजश्री **विसाजी रघुनाथ वैद्य** यांसी रदकर्जे रुा ८७१६० सत्यासी हजार येकसे साठ रुपये देविले आहेत, त्यांस सदरहू यैवज **सिवभट साठे** यांणीं आपणांकडे जमा केला आहे. यैसीयास **वैद्यांनीं** यैवजाविसी मागणी + + आपणांकडे केली आहे, तरी मारनिले ज्यास रुपये देवितील त्यास दिले पाहिजे + + माहे जिल्हेज. सेवेसी ( श्रुत ) होय हे विज्ञापना.

Shiwabhat Sathe brought from Bengal Rs. 87160 and kept the sum with Balkrishna Dixit Patankar of Paithan in order to pay the same to Visaji Raghunath Vaidya in payment of his debt. Raghuji, therefore, asked Balkrishnababa Dixit to pay the amount to Mr. Vaidya or his agent. At the end, it seems, there are four lines of figures, representing secret language.

---

पत्रांक ३३ ] श्री छ. १ मोहरम
कार्तिक शुध ३।१६७६ शुक्रवार
आक्टोबर १८,१७५४

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथभट वैद्य** याप्रती.

**श्रीवाराणेशीहून बाळकृष्ण दिक्षित पाटणकर** नमस्कार विनंति उपरी. येथील क्षेम ता कार्तिक शुद्ध ३ भृगवार जाणऊन स्वकीयें कुशल लिहीत गेलें पाहिजे. यानंतर

तुमचें रा **गदाधरभट कुसरे** पत्र घेऊन आले. रा **सिवभट साठे** यांसी लिहिलें कीं, रा **विश्वनाथभट** यांची वरात राजश्री **रघोजी भोसले** यांणीं तुम्हांवर दिली आहे. **गदाधरभट मकसुदाबाजेस** गेले. तेथून हुंडी सावकारांवर आणिली, परंतु हुंडी **गदाधरभटीं** आणिली नाहीं. परभारी **सिवभट** यांणीं पाठविली कीं, रा **विश्वनाथभट वैद्य** यांजपासून वरात रा **रघोजी भोसले** यांचे मोहोरेनसी घेणें. रा पावलियाची कबज घेणें. आणि मा **बालकृष्ण दिक्षितांचे** मा दरमासीं येकाचे देणें. त्यासी तुमची वरात आम्हांपासीं आली नाहीं व कबजही तुमचे हातींचे आम्हांपासीं नाहीं. मागून **सिवभट** यांणीं लिहीलें कीं, रा **आवरंगाबादेस** कबज वरात नसिली तरी रा **वासुदेव दीक्षिता**जवली पाठवणें. त्यांसी **गदाधरभटीं** कागद **सिवभटाचा** पाहिला. केवल रा कबजे वराते खरीज हातास न येत, हें आपण जाणतच आहेत. रा **गदाधरभट कुसरे** यांसी खर्चास नवते. मग आम्ही रा ३५० दसमासी देविले. ते **नागपुरास** गेले, त्यासी बहुत दिवस जाले. त्यासी **कासींत** साता साहुकारांचीं दिवाळीं निघालीं. बाकी दोनच्यार राहिले. हे उगमगिता मग साहुकारांचे गलीं पडोन आपली चिठी लिहून दिली. भाव येथें दसमासीये **आवरंगाबादेस** आटेचे, यैसा भाव करून रा ७३९०० पैकीं वजा **गदाधरभट कुसरे** रा ३५० बाकी रो ७३५५०, तीर्थस्वरूप रा **वासुदेव दिक्षितां**कडे हुंडी करून मार्गेच पाठविली. आटेचे वरात व कबज व आमचें पत्र **गदाधरभट कुसरे** यांजबरोबरी तुमचे नांवाचें ते, यैसें देऊन रा रा **वासुदेव दिक्षिताज**वली अमानत आहेत ते घेणें. त्यांणीं आस्विन शुा १० तुमचे पत्रांत हेंच लिहीलें होतें कीं, भाव बरोबरीचा असिला तरी **अवरंगाबादेस** रो उतरून टाकणें. आम्ही आधींच रो पाठविले. वरात कबज पाठविलीं आसतीं तरी दरसदे बटा रा ५८= देऊन हालीं करून ठेविले आसे. येथें घडीघडीचा भाव आधिकउणा होतो. तोटा कोणे द्यावा? कांहीं लिहितां बनत नाहीं. साहुकारी **कासींत** कठीण आहे, **नबाबाचा** लेक तोहि **कासी**कडे येतो. दुरट आहे. कललें पाहिजे. बहुत काये लिहीणें+ लोभ आसो दीजे. तीर्थस्वरूप दादास लीहिलें तें त्याकडे पाठऊन रुपये घेणें. हे नमस्कार.+ छ. २५ मोहरम.

---

\+ मधील अक्षर लेखकाचें स्वतःचें.

This letter is written by Balkrishnabhat Dixit Patankar to Vishwanathbhat regarding the payment of money to be paid to him by Shiwabhat Sathe. Raghuji was to pay his debt and he meant that it should be paid out of the money brought by Mr. Sathe from Bengal as Chauthai.

पत्रांक ३४ ] श्री छ. ४ मोहरम
कार्तिक शुद्ध ६।१६७६
आक्टोबर २१,१७५४
संवत १८११

राजश्री त्रिंबक कृष्ण व नरसो गणेश का। दार पा। जामगड गोसावी यांसि.

दा। अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य श्री। आनंदराव वाघ दिमत पा।गा रो। सेनासाहेबसुभा दंडवत सु॥ खमस खमसैन मया आलफ. पा। मजकूरची वकिली सन १८११ वा। बाबत तफरीक करून यैवज राजश्री विश्वनाथ-बावा वैद्य यांजकडे देविली असे. तरी पत्रदर्शनीं दस्तक करून सदरहू यैवज वैद्य बावांकडे प्रविष्ट करणें. उजूर न करणें. जाणिजे रवाना छ. ४ माहे मोहरम. बहुत काय लिहिणें. दोनी सावंगी देखील पा। मजकुराबराबर दस्तकें करून दोनी सावंगी व पा। मजकूर मिलोन माणूस दि॥ मशारनिले यास पाठविलें आहे. याचे पदरीं रुो ११५ येकसे पंधरा देणें. माणसास बहुत रोज न ठेवणें. छ मजकूर.

Raghuji's agent, Anandrao Wagh, Dimat Paga, writes to Tryambak Krishna and Narayan Ganesh Kamavisdar to sent Rs. 115 of the revenue of Paragana Jamagad and two Savangis to Vishwanathbhat Vaidya as the remuneration of his ambassadorship for Samwat 1811.

---

पत्रांक ३५ ] श्रीहेरंब प्रसन्न बुधवार कार्तिक शुध ८।१६७३
आक्टोबर १६,१७५१

स्नेहाभिलासी बालंभट व विश्वनाथभट वैद्य शरणार्थ विनंति. ता। कार्तिक शुध अष्टमी सौम्यवासरपर्यंत स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. त्या संस्थानचा विचाराच्यार सविस्तर राजश्री मोरो महादेव आम्हांजवळ सांगतच होते; परंतु तेथील कागदपत्र तिकडील श्रीमत् राजश्री स्वामीस आला नाहीं. त्यास हलीं राजश्री 'शडाक्षरी यांणीं रा। गोपाल विश्वनाथ याजबराबरी रा। मोरो महादेव यांस स्नेहेंकरून कित्येक अर्थ सांगोन त्यांणीं आम्हांस येऊन सांगितला कीं, बिदनूर म्हणजे धर्मसंस्थान श्रीमत् राजश्री स्वामीस विदित करून जसें श्रीरंगपट्टणचें चालतें, तसेंच बिदनूर चितांत आणून तेथील चालवावें, म्हणजे मोठें श्रेयस्कर आहे, म्हणोन त्यांवरून आम्हीं राजश्री स्वामींचे सेवेसी येकांतीं विदित करून, तें संस्थान आपलें करावें, खंडणी येथून करून द्यावी, फौजांचा प्रतिवर्षी उपद्रव होतो. तो

चुकवावा, म्हणोन वचन घेतलें आहे. तरी हें पत्र पावतांचे बोलीचालीस वकील पाठऊन घ्यावा. सविस्तर रा **मोरो महादेव** यांस सांगितलें आहे. तेही लिहितील, व रा **गोपाल विश्वनाथ** व वेदमूर्ती **विश्वनाथभट** पाठविले आहेत, हे मुखता विदित करितील. आम्ही या संस्थानीं आहों. त्या संस्थानच्या साहित्यास चुकणार नाहीं. विदित जाहालें पाहिजे. हे विनंति.

The writer is not known, but he requests Vaidya brothers to treat the Deosthan of Bidnur as holy as Shrirangpattan. This fact has been brought to the notice of Swami (Peshwa or Bhosles ?) probably, and to make provision for its upkeep. Moro Mahadeo, Gopal Vishwanath and Vishwanathbhat were sent to get this done through Vaidya brothers.

---

पत्रांक ३६ ] श्री कार्तिक शुध १०।१६७६
आक्टोबर २५,१७५४

राजश्री **गोविंद निमदेव** यासी महंत **हंसपुरी** गोसावी आसीर्वचन. उपरी रा **जिवराव मोहिते** बा **मोकदमपटी** रुपये ४०० आक्षरी च्यारसे, आमचे ऐवजपैकीं पावले. सदरहू यैवज कार्तीक वद्य १२ पावला. मिती कार्तिक शुा १० शके १६७६ भावनाम सवछरे सही.

This is a receipt passed by Hanspuri Gosavi to Govind Nimbadeo, to the effect that he received Rs. 400 as the Mokdampatti, out of the debt due by the addressee.

---

पत्रांक ३७ ] श्री २४ मोहरम
कार्तिक वद्य ११।१६७६
नोवेंबर १०,१७५४

यादी वकिलीच्या सनदा दिल्हा गुा **मयाराम** व **संभू** छ. २४ मोहरम रवासुदगी [१].

२ पा कुही सनद १ कमाविसदार देवजी बल्लाळ गा देविले
१ कमाविसदार महिपतराव पा नेरी सनद १
३ मोकासदार गा सटवाजी सिंदे डोंगरमावदे व धांदले सनद १ — सनद फिरली
२ पा नागभीड जीवनसा कड्ड कादार सनद १
१ ता मोकदम आबोली कादार विरली सनद १
२ कर्यात कारगाव रामाजी सदाशिव सनद १
१ पा भिसी विष्णाजीपंत कादार दिा त्रिंबकजी राजे सनद १ — सनद फिरली
२ पा हळदीगांव सनद १ कादार बाळाजी नारायेण
२ चिमूर सनद १ कादार अंताजी हरी
१ कलाकदरी बोरगांव सनद १ — सनद फिरली

१७ १०

० जिवराव बावसी तालुकयाची सनद दिली. विठ्ठलपंताकडे गुा मुरादखान छ. २७ मोहरम १
३ छ. २८ मोहरम देणें मुरादखान प्यादा मसाला
१ पा पारसिवनी गोविंदराव सिर्के मोकासी १
२ पा बोरी कादार बापुराव मुरार १

३ २

२ छ. २९ मोहरम पा भिवपूर गा करांडे याचा जासूद सरकारची सनद देऊन पाठविला. आलीमहमद १ कमाविसदार संताजी चव्हाण
१ छ ३० रोज मोहरम फकीर महमद देणें पा चिमूर येथें हुदार केसोराय यांजकडे
० पा मारूड

१ दस्तऐवजाची नोंद, नक्कीचा किंवा रोखीचा जमाखर्च.

This list contains the names of villages and their Vahiwatdars whom Raghuji had ordered to pay one percent of the revenue to Vishwanathbhat as remunetation for ambassadorship, in accordance with the terms of the Sanads granted.

पत्रांक ३८ ] श्री+शंकर मार्गशीर्ष शुद्ध ९।१६७६
नोव्हेंबर २३,१७५४

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **रामचंद्रपंत** स्वामी गोसावी यांसी.

सेवक **विश्वनाथभट वैद्य** नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें लेखन करीत जाणें. विशेष तुम्हांकडे दोनचार पत्रें पाठविलीं, परंतु येकही पत्राचें उत्तर न आलें. त्यास **चिरंजीवास** लिहिलें आहे. त्याप्रों लोकांकडील यैवज घेणें व घरीं गलेदाणे यांची व वैरणीची बेगमी करून ठेवणें. जें कामकाज करणें तें बहुत सावधपणें करणें. रा **हरीपंत चापेकर** यांसी चिरंजीवांकडून रुा दीडशें देविले आहेत, तर त्यास सांगोन सदर रुा देवणें. बहुत काय लिहिणें. सदरहू हुंडीचें रुपयास दरसदे रुा २ दोन वजा करून बाकी यैवज देणें. धामधुमीचा प्रसंग असिला तर घरीं बहुत सावधपणें राहणें + बहुत सावधपणें राहणें हे विनंति.

चिरंजीव राजश्री **लक्ष्मणपंतास** आसिर्वाद उपरी. चिरंजीवास लिहिलें आहे त्याप्रमाणें कामकाज करणें. घरीं खर्चवेच जो करणें तो बहुत सावधपणें करणें. तुम्ही **पुणेंयासि** जाऊन पेसजी सांगितलें आहे त्याप्रों कामकाज करणें. हिसेब इ्रापासून तयार करणें. बहुत काय लिहिणें. घरीं बहुत सावधपणें राहणें. धामधूम जाहली तर बहुत सावधपणें राहणें, आणि सविस्तर वर्तमान **साताराचें** व **पंतप्रधान** यांजकडील व **कोकणचें** व **रास्ते** यांजकडील वर्तमान लिहिणें. **बावधन** व **सोनगाव** व **खोडद** येथील सेताचा वसूल घेणें. रा **भगवंतराऊ पिसाळ** याजकडील पैका घेणें. +बहुत सावधपणें राहाणें हे आसीर्वाद.

---

+ पुढील मजकूर लेखकाच्या हातचा आहे.

Vishwanathbhat writes from Berar to Ramchandrapant Karkare and Laxmanpant Joshi how to manage the household affairs in his absence. He also wanted information of Satara politics and expected some disturbance owing to the new administration of Ramraje.

---

पत्रांक ३९ ] श्री भावनाम रविवार
मार्गसीर वद्य २।१६७६
डिसें. १।१७५४

यादी-सरकारची वरात **सिवभट साठे** यावर **बंगाल्याचे** यैवजीं दिली ती त्याचे स्वाधीन केली. मिती मार्गसीर वद्य २ रविवार छ. १५ माहे सफर मुा **नागपूर** सुमा खमस खमसैन मया आलफ. रुा १३०८३०

This document gives the date when Shivbhat Sathe was asked to pay Rs. 130830, recovered by him from Bengal for Bhosle. (Vide letter dated 17-10-1754.)

---

पत्रांक ४० ]　　　श्री　　　मार्गसीर्ष वद्य ७। शके १६७६
डिसेंबर ६, १७५४

राजश्रियाविराजित राजश्री **बाळाजीपंत** दिा रा **कृष्णाजीपंत सुभेदार स्वामी** गोसावी यांसि.

सेवक **विश्वनाथभट वैद्य** सां। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन करीत जाणे विशेष. तुम्हांकडून आम्हांस **गोडाजी यादव** यांणीं रुपये १७०० सतरासे देविले आहेत, त्यास राजश्री **कृष्णाजीपंत** व **गोडाजी** यांच्या चिठया पाठविल्या आहेत. ह्या घेऊन सदरहू रुपये **गोंदसेट होनराव** यांस देणें. प्रावलियाचें कबज घेणें. मिती मार्गसीर वद्य ७ शके १६७६ भाव संवत्सरे बहुत कायें लिहिणें.

Vishwanathbhat writes to Balajipant, the agent of Krishnajipant Subhedar, that he should cash the hundis (Chitis) and pay the money to Gondshet Honrao.

---

पत्रांक ४१ ]　　　श्रीशंकर　　　छ. २२ सफर
मार्गसीर्ष वद्य ८। १६७६
डिसेंबर ७। १७५४

राजश्री **विश्वनाथबावा** गोसावी यांसि

दा। अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य　　स्नों **मुधोजी भोसले** दंडवत, विनंति उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लेखन करीत गेलें पाहिजे विशेष. पूर्वी आपणांकडे वेदमूर्ती राजश्री **येशभट** पाठविले होते, त्यांस आपण मौजे **चोरे** येथील रोखा पाठविला. यैसीयास, त्या यैवजावर आमची आपण समाजावीश केली. त्यास तो यैवज आमच्या प्रस्तुत निकडीस कार्यास येत नाहीं. तो यैवज प्रस्तुत वसूल होत

नाहीं, अम्ही तो निकडीसाठीं गोसावी यांसि यैवज मागितला होता. तर आपण यैसें न करावें. अम्हांस गरज फार आहे. यास्तव हालीं गोविंद्जी भोसले पाठविले आहेत, तर आम्ही खत आपणांस दिल्हें आहे, त्याप्रमाणें यैवज तूर्त अम्हांस मारनुलेबरोबर पाठविला पाहिजे. अम्हांस सर्वस्व भरवसा आपला आहे, तरी रिकामे न पाठवावें, अगत्यरूप कार्य करून पाठविलें पाहिजे. अनमान सहसा न करावा. रा छ. २२ माहे सफर+ लिहिल्याप्रमाणें कार्य करून अगत्यरूप दिल्हें पाहिजे. बहुत काये लिहिणें हे विनंति.

---

+ पुढील अक्षर लेखकाचें.

Mudhoji Bhosle, being in need of money, was given a note by Vishwanathbhat to recover the money at Chore with his man Vedamurti Yeshambhat (propably) Joshi Upadhye. The recovery of the money was not possible at that time, when he was in need. Mudhoji, therefore, requested him to give money from any other source, with Mr. Govindji Bhosle without fail. The stamp and Mortab on the letter are not clear.

Mudhoji asked for money in March 1755 also. The letters are not printed being similar in language and subject.

---

पत्रांक ४२ ] श्री पौष शुा ४। १६७६
डिसेंबर १७, १७५४

राजश्री रामचंद्रपंत. विनंति उपरी. श्रीमत् राजश्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा यांनीं आम्हांपासून कर्ज घेतलें रुो २५००० पचवीस हजार, त्यास सदरहू यैवज मावळे लोकांचे बेगमीबदल राजश्री अंताजी विष्णु यांजकडे श्रीमंतांनीं देविले आहेत. तरी जे लोक खरे होऊन अंताजीपंतांची चिठी येईल त्याप्रमाणें रुा देणें, आणि पावलियाचें कबज घेणें. सदरहू यैवज घाल त्यास हुंडनावल दरसदे रुा वजा करून यैवज देणें. चिठी पावलिया रोजा ८॥ ८॥ उपरी देणें. मिती शुध चतुर्थी शके १६७६ भावनाम संवछरे.

Ramchandrapant Karkare was asked by Vishwanathbhat to pay Rs. 25000 to Antaji Vishnu, an officer, doing recruting work for Raghuji Bhosle, in order to make provision of things for Mavale people.

पत्रांक ४३ ] श्रीरघुवीरप्रसन्न छ. ६ रावल

पौष शुद्ध ७।१६७६

डिसेंबर २१,१७५४

वेदमूर्हूर्ति राजश्री **विश्वनाथभट वैद्** गोसावी यांसि.

दा। अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्ये श्रो। **मुधोजी भोसले** दंडवत विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. **माहादाजी केशव खरे** यांजकडे रुपये १५० दीडसे देविले होते, त्यास माानिले येथें लस्करामध्यें आले नाहीं. आम्हांस त्याजकडून रु॥ न पावले. याजकरितां जासूद पाठविला आहे. तरी यांजपासी सदरहू दीडसे रुपये दिले पाहिजे. अनमान न कीजे. जरूर दिले पाहिजे. तीर्थरूप राजश्री **बावासाहेबांच्या** सरीरीं आरोग्यता जाहाली कीं काये तें लिहिलें पाहिजे. रु॥ छ ५ माहे रबिलोवल+लिहिल्याप्रमाणें रुपये जासुदाचे पदरीं घालणें. अनमान न करणें. तुम्हांस माझ्या गल्याची आण असे. बहुत काये लिहिणें लोभ असो देणें. हे विनंति.

---

\+ यापुढील मजकूर निराळ्या वळणाचा लेखकाच्या हातचा.

Mudhoji Bhosle asks Vishwanathbhat to pay him Rs. 150 with a messenger which he expected to get from Mudhoji Keshav. He enquired about the health of Raghuji, his father.

---

पत्रांक ४४ ] श्री+शंकर पौष शुद्ध १५।१६७६

डिसेंबर २९,१७५४

पुरवणी चिरंजीव **भिकंभट व रामचंद्र व बाबुराव वैद्य** यांसी आसिर्वाद उपरी. बंगालेयाचे वरातेपैकीं ऐवज आला त्यापैकीं **अवरंगाबादे**होन हुंडी राजश्री **भिकाजी नाईक मराठे व बाबूजी नाईक भिडे** यांचे दुकानची **चालती साताराची** हुंडी बा। **कालोजी** जासूद रु॥ ४०००० चालीस हजारांची पाठविली आहे, हे घेऊन यैवज **साताराहोन** आणून घरीं ठेवणें. पेशजी राजश्री **अंताजी विष्णु** याजचाो **मावले** लोकांची हुंडी केली आहे, त्यास मागाहून तुम्हांस लिहोन पाठऊं, त्याप्रों त्यांस यैवज देवऊं, त्यास देणें. तूप जोड्या १० दाहा व कापड पाठऊन देतों. मुगटे सल्याचे व पुरुशाचे व पाकाणे पाठऊन देतों, पोचतील. घरीं बहुत सावधपणें राहाणें. मिती पौष सुध पूर्णिमा शके १६७६ भावनाम सवछरे. बहुत काये लिहिणें +हे आसिर्वाद. राजश्री **रामचंद्रपंतास** नमस्कार विनंति उपरी. चालीस हजार रु॥ हुंडी पाठविली आहे हे घेणें आणि यैवज आणून घरीं ठेवणें. वरकड चिरंजीवास लिहीलें आहे त्याप्रों कामकाज करणें. बहुत काये लिहीणें +हे विनंति.

---

\+ पुढील मजकूर लेखकाच्या हातचा.

After receipt of money from Shivabhat Sathe, who recovered it from Bengal, Vishwanathbhat sent a hundi of Rs. 40,000 to Bhikambhat, Rambhat and Baburao and gave them instruction about the payment of money to Antaji Vishnu and the care to be teken of Ghee, cloth, and other articles, sent from Nagpur.

---

पत्रांक ४५ ] श्री पौष वद्य १।१६७६<br>डिसेंबर ३०,१७५४

हिसेब झाडा हुंडीवरात बंगाळपैकीं आलेले रुपये जमा ७५०००

ता.

१४५० गदाधरभट कुसरे

११०० मुा मकसुदाबावेस मा रा सिवभट साठे

३५० मुा श्रीवाराणसींत वि रा दिक्षित

१४५० ८

१०००० हुंडी दिली सिवभट खरे यांस

६३५५० हुंडी रा रामाजी ना काळे

५९९५३ यैन रुा, ३५९७ हुंडणावळ व बटा

७५००० ६३५५०

This in an account of Hundis and Varats made, of the amount received from Bengal by Shivabhat whose account with Vaidya includes this figure of Rs. 75000.

---

पत्रांक ४६ ] श्री छ. १६ रावल<br>पौष वद्य २।१६७६<br>डिसेंबर ३१,१७५४

राजश्री विश्वनाथभट वैद्य स्वामी गोसावी यासि

पोष्य सिवभट साठे सां नमस्कार विनंति उपरी. गोंदसेट होनराव यांसि रुपये २०००० वीस हजार देणें. मिती पौष्य वद्य २ + हे विनंति.

---

\+ पुढील अक्षर शिवभटाचें स्वतःचें आहे.

This sum of Rs. 20,000 was paid through Krishnaji Govind Subhedar. The transaction of money with Gondshet Honrao is referred in the letter dated 6-15-54.

---

पत्रांक ४७ ] श्री २० रावल
पौष वद्य ६।१६७६
जानेवारी ४,१७५५

श्रीमंतयाविराजित राजमान्ये राजश्री **विश्वनाथ वैद** गोसावी यांसि.

स्नो॰ **गोंदसेट होनराव** रामराम विनंती उपरी. आपल्यास मऱ्हाटे यांची देण्याची फारशी निकड लागली आहे. आपण तुम्हांपावेतों येत होतों; परंतु आम्हांस येऊं देत नाहींत. समागमें येऊन गवगवा करितलि. याजकरितां तुम्हांकडे राजश्री **जिवाजी गोपाळ** दिा **येसाजी बागूल** यांस पा आहे. यांस रुपये ७२०० सात हजार दोनशे देणें. बहुत काये लिहिणें हे विनंति. छ. २० रबिलावल.

Gondshet Honrao, a Maratha writer, writes to Vishwanathbhat, why he did not come himself to ask for money which he had to pay to Marathe.

---

नकल

पत्रांक ४८ ] श्री छ २० माहे रावल
पौष वद्य ७।१६७६
जानेवारी ४।१७५५

कर्जरोखा शके १६७६ भावानाम सवछरे पोष्य वद्य ७ तदिनीं खत लिखिते धनको नाम राजश्री **विश्वनाथभट** वैद्य यांसि रिणको नाम **गुणाजी सिरके**, तुम्हांपासून आत्मकार्याकारणें घेतले मुदल रुा १०० शंभर यासि व्याज दरमाहे दरसदे रुा २ प्रों देऊं. यासि मुदत फाल्गुनमासआखेर देऊं. आन उत्तर न होऊं देवूं. हा रोखा लिहिला सही.

बीक(ल)म **रामजी** ता छ २० माहे
तुकदेव दिा **मानुले** रावल

गोई

This conveyance deed is passed by Gunaji Shirke to Vishwanathbhat for Rs. 100 at the rate of 2 per cent per mensem.

---

पत्रांक ४९ ] श्री छ २१ रावल
पौष वद्य ८।१६७६
जानेवारी ६,१७५५

राजश्री **विश्वनाथभट बावा वैद्य** स्वामीचे सेवेसी.

सेवक **वासुदेव मोरेश्वर** सां नमस्कार विनंति उपरी. राजश्री **चिटकोपंत** यांची चिटी बारासे साडेतेरा आम्हांकडे दिली. त्यास यांचे खर्चाची वोढ. याकरितां सातसे साडेतेरा आमचे जमा करणें. बाकी रुपये ५०० पाचसे यास देणें. छ २१ रावल पौष वद्य अष्टमी शके १६७६ भाव सवसरे हे विनंती.

Vasudeo Moreshwar writes to Vishwanathbhat to pay Rs. 1213, annas eight to Chitkopant as he must be in need of money. He paid Rs. 713, annas eight in cash and asked Vishwanathbhat to credit the sum to his account in the account book. The remaining amount was paid by Vaidya.

---

पत्रांक ५० ] श्री पौष वद्य ९।१६७६
जानेवारी ७,१७५५

राजश्रियाविराजित राजमान्य राजेश्री **विस्वनाथभट वईद्य** स्वामी गोसावी यासि.

पो **सिवभट खरे** नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष तुम्हीं पत्र पाठविलें पावलें, लिहिलें वर्तमान कलों आलें. हुंडी व **पेठेस**[1] साहा महिने जाहले म्हणून लिहिलें. त्यासी हुंडी घेऊन अजुरदार पाठविला तो मार्गी गइप[2] जाहाला, तो पावला नाहीं. **पेठ** घेऊन पाठविली, ते पावली. तेव्हां त्यांणीं रुपये देत नाहीं म्हणून नकारून[3] दिली. साहा महिने जाहाले तर हे गोष्टीची आम्हांस कालजी किमपि नाहीं. तुम्हांस निकड असावी कीं, हुंडी फिरली तर व्याज हुंडणावल घ्यावी लागेल. तुम्हीं पत्रें पावविलीं आणि यैवज उतरून घेतला, तेव्हां तुम्हीं यैवज हुंडी केली असतां तेथें ठेविला नाहीं. पैसा, पत्रीं बहुत विशदय करून पेठ, हुंडी व कबज देणें आणि रुपये दाहा हजार घेणें, म्हणून लिहिलें. त्यासी आपण सावकारी उदीम करितात. आपणांस सर्व विदितच आहे. बहुता दिवसीं गाठ पडली ते आम्हांस फसविलें, तर दया करून तुमचें आमचें रहस्य राहे आणि आपले

जागा समजोन बोलीप्रमाणें व्याज सुधा रुो दाहा हजार व हुंडणावळ पडेल ती यैसी वोरा **आपाभट खरे शारंगपाणी** पाठविले आहेत. त्यांची निशा करून पुणेयासी पावते करावे. रा **कृष्णाजी नाईक भाव्ये** यांसी पत्रें दिलीं होतीं ते [४]**बदरदेवाचे** यात्रेस गेले आहेत, भेटले नाहीं. त्यांचीं पत्रें माघारीं पाठविलीं आहेत. व्याज सुधां हिशोब करून **कासीची** हुंडी करून देणें आणि आमचे उदीमाचा जाब करावा लागेल. दया करून **भटजी** पाठविले आहेत. यांजपासीं निशा करून देणें. रुो दिले नाहीं तर पुढें दिढोत्राप्रमाणें व्याजसुधां घ्यावे लागतील. कळलें पाहिजे. **नकारलीपेठ** पाठविली आहे, ते घेणें आणि याची निशा करून कबज घेणें. बहुत काये लिहिणें. कृपा लोभ असो दीजे, हे विनंति. पौष वद्य ९.

---

१ असल हुंडी हरवली गेल्यामुळें केलेली हुंडीची नकल. २ मृत.
३ न स्वीकारून. ४ बदरीकेदार.

श्री

**हिशेब. विश्वनाथभट वैद्य**

१०००० हुंडी मुदत श्रावण सुध १० शके ७६ भावा सवत्छरे ता माघ सुध १, येकून माहे ५ रोज २१ येकून व्याज दरसदे रुो १ प्रों येकूण
५७०।।।= व्याज हिशोबाप्रों.

---

१०५७०।।।=

सदरहूप्रों रुपये वर्षें दोन आज दूर पडले आहेत ते, यैसें देवावे.

Shiwabhat Khare was to receive Rs. 20,000 from Vishwanathbhat. He writes to him in a strong and chastising language why he should be so negligent in paying the money early. The delay is inexcusable. This Khare, is the only person who has used cutting language in this letter expressing Vishwanathbhat's unbecoming behaviour for other's money.

---

पत्रांक ५१ ] श्री संवत १८११
पौष वद्य १२।१६७६
जानेवारी ९,१७५५

राजेश्री **विश्वनाथबावा वईद** स्वामी गोसावी यांसि.
सेवेसी **आबाजी नागेश कमाविसदार** करियात **कुही** सां नमस्कार विनंती

उपरी. वकिली व सिकेनविसाबा[1] सन १८१० व सन १८११ मोस रुा १६९ अंके येकसे येकोनाहतर, हे रुपये रोना ८ रुये पनास व येका महिनिया ११९ देऊं. सन १८११ याची पावनकाली आलेली आहे. जे जमाचंदीप्रों होईल त्याप्रों बाकी निघेल ते देऊं. बहुत काये लिा हे विनंति. मिती पुस वद १२.

---

१ शिक्का मारण्याच्या अधिकाराबा.

Abaji Nagesh writes to Vishwanathbhat about the payment of money to be made for ambassadorship and Sikeniwisi. He was a Kamavisdar of Karyat Kurshi.

---

पत्रांक ५२ ] श्री छ. २४ रावल
पौष वा १२ शके १६७६
जानेवारी ९, १७५५

वेदमूर्ति राजश्री विश्वनाथभटजी वैद्ये गोसावी यांसि.

दा अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्ये श्रों बाजी मालसी मोरे व संभाजी तावरे व ब्रम्हाजी महादेव काटे दंडवत विनंती उपरी. आमचे समजाविसीस सन ११६३ पैकीं तुम्हांकडून देविले मारं रो नारोजी नेघी यांनीं गुा गोविंदसेट होनराव रुपये ८००० आठ हजार ते आपणांस पावले. सन हजार ११६४ सके १६७६ भावनाम संवत्छरे पुस वद्ये द्वादसी छ. २४ माहे रबिलावल बहुत काये लिहिणें हे विनंती.

बी। खंडो गोविंद दिा मानुले.

It is a receipt given by 3 men to Vishwanathbhat for money received through Govindshet Honrao who is mentioned in the accounts of Shiwabhat Sathe.

---

पत्रांक ५३ ] श्री+शंकर छ. २६ जावल
पौष वद्य १३।१६७६
जानेवारी १०,१७५५

चिरंजिव विज्याई भव राजमान्ये राजश्री **भिकंभट** व **रामचंद्र** व **बाबुराव** यांसी **विश्वनाथभट वैद्य** आसिरवाद उपरी. येथील कुश[ल] जाणून स्वकीयें ता छ. २६ माहे जावलपावेतों मुकाम **उमरावती-भवानीची** येथें लस्करांत सुखरूप असो विशेष. श्रीमंत राजश्री **मुधोजी भोसले** यांसी **गाविलग(डा)हून नागपुरास** न्यावयाकरिता आलों. त्यास ×××× स घेऊन **नागपुरास** जात असो. यानंतर कापड पाठविलें आहे. त्याच्या पट्याहि पाठविल्या आहेत. त्याबरहुकूम चौकसीनें विकत घ्या. **श्रीमंत** उभयेतांच्या भेटी करून आम्ही **नागपुरास** येतों. + पेसजी हुंडिया दोन पाठविल्या आहेत. पोचल्या असतील. उत्तर पाठवणें. बहुत सावधपणें वर्तणूक करणें. आम्हांविसीं चिंता न करणें, हे आसिर्वाद.

---

+ पुढील मजकूर विश्वनाथभटांच्या हातचा.

Vishwanathbhat writes from Umaravati-Bhawanichi to Bhikambhat, Rambhat and Baburao that was engaged to take Mudhoji from Gavilgad to Nagpur for reconciliation of Mudhoji and Janoji. There are also other instructions regarding household management to addressees.

---

पत्रांक ५४ ] श्रीशंकर माघ शुा १।१६७६
जानेवारी १३,१७५५

राजश्री **विस्वनाथबावा वैद** स्वामीचे सेवेसी.

सेवक **माणको सकदेव** नमस्कार विनंति उपर. रा **मुकुंदपंत** दिा **नामदारखान पन्ही** याम रुा २६० दोनसे साठ देणें. **पेठ** चलनी देणें. मिति माघ सुध १ सके १६७६ भावनाम संवछरे हे विनंति.

Manko Sakadeo requests Vishwanathbhat to pay Rs. 260 to Mukundpant, the Mukhtyar of Namdarkhan Panhi.

---

पत्रांक ५५ ] श्री माघ शुा ४ शके १६७६
जानेवारी १६,१७५५

राजश्रियाविराजित राजमान्ये राजेश्री **विसाजी रघुनाथ वैद्य** स्वामीचे सेवेसी.

सेवक **नरहर बल्लाळ रिसबूड** सां नमस्कार विनंति उपरी. प्रा **वडनेराबिबी** यांसी तुम्ही आम्ही मिळोन सराक्तीनें कर्जे रुपये २२९६१ दिल्हे आहे. हे रुपयाचे [1]तहासिलेस राऊत आमचे गेले आहेत. यैवज वसूल येईल त्या [2]बमोजीब निमे तुम्हांस देऊं. निमे आपण घेऊं. नफातुकसान तुमचे आमचे सामिलांत असे. बहुत काय लिहीणें हे विनंति. मिति माघ शुा ४ भावनाम संवछरे.

---

१ वसुलीस. २ प्रमाणे, बरहुकुम.

Narhar Ballal Risbud had a partnership with Vishwanathbhat for paying Rs. 2296, upon the revenue of Vadner Bibi Prant. He agreed to collect revenue and share one-half of the profits.

---

पत्रांक ५६ ] श्री+शंकर माघ शुा ८।१६७६
जानेवारी २०,१७५५

पौ फाल्गून शुा २

चिरंजीव विजई भव राजश्री **भिकंभट व रामभट व बाबूराव वैद्य मुा वाई** यांसि. प्रति **विश्वनाथभट वैद्य** अनेक आशीर्वाद उपरी. येथील क्षेम तागाइत माघ शुा ८ मुक्काम **नागपूर** जाणून श्वकीयें लिहिणें. यानंतर तुम्हांकडील वर्तमान कळत नाहीं तरी यैसें न करणें, सविस्तर वरचेवर लिहून पाठविणें. आम्हांकडील मार तरी श्रीमंत राजश्री **रघोजीबावा भोसले** यांस बरें वाटत नव्हतें. हाली ईस्वरकृपेंकरून आरोग्यता जाहली आहे. त्या प्रांतें लोकांकडे यैवज येणें आहे. त्यास कोणाकडील ऐवज काये आला तें लिहून पाठविणें. बाकी यैवज येणें राहिला आहे त्यांस वरचेवर तगादे करून यैवज वसूल करणें. श्रीमंत राजश्री **पंतसचिव** यांजकडे यैवज येणें, त्यास ऐवज काये आला, बाकी यैवज येणें राहिला, त्यास त्यांचें खत करून घेणें. राजश्री **केसो कृष्ण संबेकर व गोविंदपंत गोखले व बहिरवभट बापट** वगैरे यांजकडे आहे, त्यास त्यांजकडील यैवज झाडियानिसी वसूल करणें. वरकड दाणावैरणीची बेगमी करून सावधपणें राहणें. आम्हांकडील वर्तमान तरी मुक्काममजकुरीं सुखरूप असो. तुम्ही आपणांकडील वर्तमान सविस्तर लिहिणें. बहुत काये लिहिणें. सविस्तर वर्तमान लिहिणें हे आसीर्वाद.

हो राजश्री **रामचंद्रपंत** यांसि नमस्कार विनंती उपरी. लिाप्रों कामकाज करून सविस्तर लिहून पाठविणें.+ हे विनंती.

---

+ पुढील मजकूर लेखकानें स्वतः लिहिलेला आहे.

Vishwanathbhat writes to Bhikambhat, Rambhat and Baburao the news that Raghuji was ill, but he has been now improving. Instructions about the household management are also given as usual to the addressees.

---

पत्रांक ५७ ] श्री छ. १६ रारवर

माघ वद्य १।१६७६

जानेवारी २९,१७५५

आज्ञापत्र राजश्री **पंतप्रधान** ताा मोकदम मौजे **चोपडज व मावडी व वाकी** देहाय प्रांत **सुपे** सुाा खमस खमसैन मया व आलफ. मौजे मजकूर पेशजीपासून हुजुरून राजश्री **मानसिंग कडू रुस्तुमराऊ समसेरबाहद्दर** यांजकडे मोकासा आहे. त्याप्रमाणें करार आसे. तरी तुम्ही यांसी रुजू होऊन मोकासबाबेचा अमल सुदामतप्रमाणें सुरळीत देणें. दुसरेकडे वसूल न देणें, जाणिजे छ. १६ माहे रबिलाखर.

Pant Pradhan Nanasaheb issues an order to the Mokadams of the villages of Chopadaj, Mavadi and Vaki to pay the Mokasa Amal to Mansing Kadu. रुस्तुमराव is a title granted to Kadu family. They are Deshmukh of Maval prant.

---

नकल

पत्रांक ५८ ] श्री छ. १६ रारवर

माघ वाा ३।१६७६

जानेवारी ३०,१७५५

कर्ज रोखा शके १६७६ भावानाम सवतसरे माघ वद्य त्रितीया तदिनीं खत लेहून दिल्हें, धनकोनाम राा **विस्वनाथजी वैद्य** यांसी. ऋणकोनाम **कानोजी सिरके**

सुा खमस खमसैन मया व आलफ. आम्हीं तुम्हांपासून आपल्या आत्मकार्येंलागीं[१] परवतसमंधें[१] घेतले मुदल रुो १०० शंभर घेतले. यासि व्याज दरमाहे दरसदे दुहोत्राप्रमाणें देऊं. यांसि मुदत येक महिनियानें व्याज व मुदल यैसें देऊं. यासि आंतर होणार नाहीं. हा कागद लेहून दिला सही रुजू.

तेरीख छ १६ माहे रााखर.

निा कटार

साक्षी

बी जानो गिरमाजी दिा खंडेराव बावा मोहिते.

---

१ स्वतःच्या व्यापार धंद्यासंबंधीं. १ परवत — देणें घेणें, देवघेव.

This is debt deed granted by Kanoji Sirke to Vishwanathbhat Vaidya for Rs. 100, borrowed at the rate of 2 p. e. p. m. for a period of 1 month.

---

पत्रांक ५१ ] श्रीशंकर नकल

माघ १६७६

फेब्रुवारी १७५५

राजश्रियाविराजित राजमान्य राजेश्री शामजी फुलाजी स्वामी गोसावी यांसि.

सेवक विश्वनाथभट वैद्य नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें, लिहिलें वर्तमान कलों आलें. यानंतर गोंदसेट वाइकोल यांस रुये पाचसे दिले म्हणून लिहिलें, तें कललें. वरकड रुये त्यांचे पदरीं घालून रवाना करणें. तूप जोडिया दाहा गोंदसेटीबरोबर पाठऊन देणें. तूप जोडियाबराबर जासूद देऊन टाकळीस पोचत्या करणें. लवकर मा रवाना करणें.

यादी सिकेनिसी व वकीली यांसि ताकीदपत्रें.

१ प्रां देवगड १ कृष्णाजी मोरेश्वर

१ प्रां जादे १ कृष्णाजी नारायण

हो राजश्री **रामचंद्रपंत** यांसि नमस्कार विनंती उपरी. लिाप्रों कामकाज करून सविस्तर लिहून पाठविणें.+ हे विनंती.

---

+ पुढील मजकूर लेखकानें स्वतः लिहिलेला आहे.

Vishwanathbhat writes to Bhikambhat, Rambhat and Baburao the news that Raghuji was ill, but he has been now improving. Instructions about the household management are also given as usual to the addressees.

---

पत्रांक ५७ ] श्री छ. १६ रारवर

माघ वद्य १।१६७६

जानेवारी २९,१७५५

आज्ञापत्र राजश्री **पंतप्रधान** ताा मोकदम मौजे **चोपडज** व **मावडी** व **वाकी** देहाय प्रांत **सुपे** सुाा खमस खमसैन मया व आलफ. मौजे मजकूर पेशजीपासून हुजुरून राजश्री **मानसिंग कडू रुस्तुमराऊ समसेरबाहद्दर** यांजकडे मोकासा आहे. त्याप्रमाणें करार आसे. तरी तुम्ही यांसी रुजू होऊन मोकासचाचेचा अमल सुदामतप्रमाणें सुरळीत देणें. दुसरेकडे वसूल न देणें, जाणिजे छ. १६ माहे रविलाखर.

Pant Pradhan Nanasaheb issues an order to the Mokadams of the villages of Chopadaj, Mavadi and Vaki to pay the Mokasa Amal to Mansing Kadu. रुस्तुमराव is a title granted to Kadu family. They are Deshmukh of Maval prant.

---

नकल

पत्रांक ५८ ] श्री छ. १६ रारवर

माघ वाा ३।१६७६

जानेवारी ३०,१७५५

कर्ज रोखा शके १६७६ भावानाम सवतसरे माघ वद्य त्रितीया तदिनीं खत लेहून दिल्हे, धनकोनाम राा **विस्वनाथजी वैद्य** यांसी. ऋणकोनाम **कानोजी सिरके**

सुा खमस खमसैन मया व आलफ. आम्हीं तुम्हांपासून आपल्या आत्मकार्येलागीं[१] परवतसमंधें[१] घेतले मुदल रुो १०० शंभर घेतले. यासि व्याज दरमाहे दरसदे दुहोत्राप्रमाणें देऊं. यांसि मुदत येक महिनियानें व्याज व मुदल यैसें देऊं. यासि आंतर होणार नाहीं. हा कागद लेहून दिला सही रुजू.

तेरीख छ १६ माहे राा।खर.

निाा कटार

साक्षी

बीा जानो गिरमाजी दिाा खंडेराव बावा मोहिते.

---

१ स्वतःच्या व्यापार धंद्यासंबंधीं. १ परवत — देणें घेणें, देवघेव.

This is debt deed granted by Kanoji Sirke to Vishwanathbhat Vaidya for Rs. 100, borrowed at the rate of 2 p. e. p. m. for a period of 1 month.

---

पत्रांक ५९ ] श्रीशंकर नकल

माघ १६७६
फेब्रुवारी १७५५

राजश्रियाविराजित राजमान्य राजेश्री शामजी फुलाजी स्वामी गोसावी यांसि.

सेवक विश्वनाथभट वैद्य नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें, लिहिलें वर्तमान कळों आलें. यानंतर गोंदसेट वाइकोल यांस रुये पाचसे दिले म्हणून लिहिलें, तें कळलें. वरकड रुये त्याचे पदरीं घालून रवाना करणें. तूप जोडिया दाहा गोंदसेटीबरोबर पाठऊन देणें. तूप जोडियाबराबर जासूद देऊन टाकळीस पोचत्या करणें. लवकर मा। रवाना करणें.

यादी सिकेनिसी व वकीली यांसि ताकीदपत्रें.

| | |
|---|---|
| १ प्रां देवगड | १ कृष्णाजी मोरेश्वर |
| १ प्रां जादे | १ कृष्णाजी नारायण |

| | |
|---|---|
| १ प्रां वराड | १ बिंबाजी वांजाळ |
| १ बगोजी यादव | १ जानीभाई |
| १ शामजी फुलाजी | |
| १ कृष्णाजी गोविंद | |
| — | — |
| ६ | ४ |

—तेरीज—
१०

येणेप्रों सिकेनीस व वकिली दरसदे रुा १ येकप्रमाणें.

This letter by Vishwanathbhat is a copy and mentions the arrangement of sending Ghee to Wai. Shamji Phulaji was asked to send it with Gondashet Waikol. Below this letter is a list of places and personages for which orders were issued. for paying the Sikenisi and Vakili at the rate of one p. c.

---

पत्रांक ६० ] पो फाल्गुन वद्य १४ श्री+शंकर फाल्गुन शुा४।१६७६
शनिवार फेब्रु. १५,१७५५

श्रियासह चिरंजीव विजई भव राजश्री भिकंभट वैद्य व रामचंद्र व बाबुराव वैद्य मुा वाई यांसी विस्वनाथभट वैद्य विनंति उपरी. येथील क्षेम ताा फाल्गून शुाचतुर्थी + मंदवासरपावेतों मुक्काम नागपूर येथें सुखरूप आसो. यानंतर येथील वर्त(मान) तरी श्रीमत् राजश्री रघोजीबावा भोसले यास काल सुध ३ सुक्रवारीं पाहांटेस साहा घटका रात्रीस देवाज्ञा जाहाली. समागमें साहा बायका गेल्या. फार ईश्वरें अनुचित केलें. ईश्वरगतीस उपाय नाहीं. कललें पाहिजे. यानंतर बहुत दिवस तुम्हांकडील कांहीं पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं. तर हरघडी येणारा मनुष्यासमागमें सविस्तर लिहीत जाणें विशेष. मागें राजश्री अंताजी विष्णु यांची हुंडी मावले लोकांपैकीं केली आहे त्यास येकंदर पैसा न देणें. कांहीं दिल्हा आसिला तर फिराऊन घेणें ×× जिवाजीपंत यास सांगणें कीं, याउपर लोकांचे (प्र)योजन नाहीं. येकंदर लोक घेऊं नये. वरकडही कोण्हास पैसा न देणें. मागाहून लिहून पाटऊं, त्याप्रों वर्तणूक

करणें. **कालोजी** जासुदाबा **आवरंगाबादेहून चालली** हुंडी चालीस हजारांची पाठविली आहे ती पावलीच असेल. तो यैवज घरीं आणून नीट निघेनें ठेवणें. घरीं बहुत सावधपणें राहणें. आम्हांविसीं चिंता न करणें. आम्ही लवकरींच घरास येऊं. वोराजश्री **गोविंदभट दात्ये** याकडे आमचे रुपये पंधराशे होते, त्यास सदरहू रुपये येथें आम्हीं + + मुदल व व्याज सुधां घेतले. त्यांस त्यांचे राजश्री **भासकर नाईक गोडसे** यांणीं त्यास लिहिलें कीं, पंधरासेपैकीं येथें आम्हांजवळून रुपये साडे सातसे घेतले म्हणोन लिहिलें, तरी तुम्ही रा **अग्निहोत्री** यांचे यैवज साडे सातसे रुपये घेतले असिले तर रा **राघोबा नाईक** यांस मिती[१] सुधां मजुरा देणें, **गोडसे** याकडील खासगत यैवज वारून घेतला असिलात तर सदरहू यैवज रोख देणें. राजश्री × × **वरवडेकर** याबा माघ सुध ७ मीं रोजीं पाठविले ते पावले. लिा वर्तमान कलों आलें. राजश्री **सिवभट खरे** यांचे हुंडीचा मार लिहिला तर त्यास **पुण्यांत** यैवज × × × स राजश्री **रामचंद्रपंतास** पा × × म्हणून लिहिलें. त्यास त्यांणीं यैवज घेतला तर देणें. नाहीं तर **श्रीमध्यें** त्यास पाहिजे तरी वोराजश्री **दिक्षितावर श्रीमध्यें** हुंडी ले× × अपूर्ण.

पाो फाल्गून वद्य १४.

---

+ पुढील मजकूर विश्वनाथभटांच्या हातचा. १ व्याज.

The death of Raghuji Bhosle is reported in this letter and 6 wives went with him as Sati, by Vishwanathbhat who was at Nagpur. Instructions about transactions of money with Antaji Vishnu, Govindbhat Datye, Godse and others and about household management are also given by him, to Bhikambhat and Bàburao.

---

पत्रांक ६१ ] श्री फालगुन वद्य ७।१६७६
मार्च ५,१७५५

यादी पत्रें **तीर्थरूपास** फाल्गुन वद्य ७ खमस ( खमसैन ).

१ तुपाच्या जोड्या दाहा व कापडाचीं वोझीं ३ बो पत्या पाटविलेत. त्यास मार्गी येतां **जालनापूर** येथें **गणेश संभाजी** यांनीं येक जोडी तुपाची जकातीबदल ठेविली. बाकी तुपाच्या जोड्या नऊ येथें आल्या. त्यास येक

जोडी मोजून पाहिली. त्यास नऊ मण पासरी तूप वजा भरलें. कापड पटया बा पावलें. अद्याप कोणास सिमगेयाच्या गडबडीमुळें घ्यावयास बनलें नाहीं. आतां गडबड वारलियावर देऊं. वरकड मार्गी जकातीस रुा पा ते दिल्हे.

२ येशवंतराऊ यांजबराबर सणगें पाठविलीं तीं पावलीं. त्यांची यादी आलाहिदा पा आहे. त्यावरून कलल.

१ आपण हुंड्या केल्या. त्याप्रा सिरस्त्याप्रों दिल्हे. रा बलवंतराऊ यांस ही रुये लिा प्रों दिल्हे. अंताजी विष्णू यास रुा दिल्हे नाहीं.

१ राजश्री पंतप्रधान यांच्या ताकिदी काराटीविसीं रा सदासिव रघुनाथ यां( नीं ) घेतल्या, गांवांस पाठविल्या. राजश्री आनंदराऊ व सदाशिवपंत, पेशवे यांचा निरोप घेऊन भोरास आले.

१ राजश्री पंतसचीव यांजकडील वर्तमान तर भोरास पूर्ववतप्रों आहेत. सदाशिवपंत व आनंदराऊ भोरास हुताशनीकरतां आले आहेत. बीडआंबडविा सरलस्कर यांजकडे प्रधानपंतांचे आज्ञेनें लागले( लीं ) निशापत्र करून घेतलीं. आमचे रुये वरातेप्रों येतील. आम्हीही भोरास जाणार आहों. जालनापूरचें वर्तमान अद्यावत् येथास्थित कलत नाहीं. विल्हे लागलें नाहीं. आजपर्यंत श्रीमंत कांहीं घालमेलीची गोष्ट बोलत नाहीं. करार निभावेल यैसें दिसतें. पुढें काय होईल तें पहावें.

१ कालोजी जासूद याजबो चालीस हजार रुायाच्या हुंड्या पा, त्या पावल्या. त्यांचा मार पेशजी जासूद मार याजबो पा आहे.

१ गोविंदराम खांडेकर यानें सातशे रुा देतों म्हणोन करार केला होता, त्यास तो यैवज सदाशिव रघुनाथ यांजकडे देविला होता, त्यास तो ऐवजाकरता माणसें उभयतांकडे पा होतीं. त्यास गोविंदराम यांस बरें वाटत नव्हतें. त्यांनीं लिा कीं, तीनसे रुा सदासिवपंताकडे दिल्हे, चारसे राहिले ते वाईस पाठवितों. सदासिवपंतीं लिा कीं, येक पैसा पावला नाहीं. याचा मार कलत नाहीं. तेही रुा येतील.

१ राजकीय वर्तमान तर पेशवे नगारावर आहेत. त्रिंबकेश्वरास जावून कर्णाटक प्रांतें आबदाब गेले व त्यांणीं गोकाकचा किला घेतला. पुढें बेलगांव शाहापूर येथपर्यंत गेले. पुढें जात आहेत. रा स्वामी व आईसाहेब सातान्यास पूर्ववत्प्रों आहेत. वरकड वर्तमान येथास्थित असे.

१ श्रीयात्रेहून रास्ते आले. व गोविंदराम वगैरे गृहस्त सुखरूप आले. भिकाजी ना। आपले परिवार सुद्धां नासिकीं राहिले आहेत. लवकरच येतील.

१ कृष्णाजी ना। रास्ते व मल्हारराऊ रास्ते वाईस आहेत. मल्हारराऊ यांस बरें वाटत नव्हतें, त्यास बरें जाहालें.

१ सौभाग्यसंपन्न मातुश्री उमाबाई यांस बरें वाटत नव्हतें, त्यांस आरोग्य जाहालें. आपणांस कळावें याजकरितां लि। आहे. वरकड वर्तमान येथास्थित आसे.

१ कोकणचें वर्तमान तर दिवसेंदिवस उपद्रव बहुतच होत आहेत. पुढें काय होईल तें पहावें.

१ आपणांकडील व ते प्रांतीचें वर्तमान लिहिलें पाहिजे.

---

१ अव्वू.

This list of the substance of letters sent as answers to Vishwanathbhat, seems to be written by his son Baburao as it is addressed to Tirtharup. It is a model of training, received by the male young members of the family. Baburao has given a good summary and was particular in giving answers to all points mentioned in his father's letters. In giving political news, he has mentioned important matters, viz. 1 Disturbance in Konkan and 2 Peshwa's movements from Nagpur to Tryambakeshwar, and Karnatak, and 3 Capture of Gokak fort.

---

पत्रांक ६२ ] श्री छ. २४ जमावल

फाल्गून वद्य ११।१६७६

मार्च ८,१७५५

श्रीमंत राजश्री विश्वनाथबाबा स्वामी वडिलांचे सेवेसी.

विनंति सेवक आज्ञाधारक राघो बल्लाल भोगले मुकाम मामले रामटेक कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील क्षेम ता। छ २४ जमादिलावलपावेतों वडिलांच्या

आसिर्वादेंकरून **देसपांडियेपण**[१] बमये **फडनिसी** वर्तमान येथास्थित आसे. यानंतर वडिलांकडील मार्गे येक पत्र आलें. हालीं **जिवाजी जासुदा**बराबर आसिर्वादपत्र प्रविष्ट जाहालें. त्यावरून बहुत संतोष जाहाला. आपणांकडील वसुलाविसीं लिहीलें तरी झाडियानिसी पैसा वसूल करून राजश्री **रंगोपंता**जवल देऊन[२] हुजती घेतल्या आहेत. मौजे **टेकाडी व अरोलीतुमान** येथील वर्तमान उतम असे. अवंदा या प्रांतें पीकपाणी उतम जाहालें. पंधरा रुपया पकी खंडी गहू वगैरे धारण आहे. **स्वामींचें** या प्रांतास येणें होईल तो सुदीन असे. बहुत काय लिहीणें हे विज्ञापना. **जिवाजी** जासुदास रुपये ५ पाच देविले होते. लिा प्रों पांच रुो दिल्हे. सेवेसी निवेदन होये हे विज्ञापना.

राजश्री **रामचंद्रपंत**स्वामींचे सेवेसी. साां नमस्कार विनंति. कृपा लोभ आसो दीजे हे विनंति.

स्वामींचे साो. सेवक आज्ञाधारक **सगशाहा** व **बाबूजी गोपिनाथ** साां नमस्कार विनंति उपरी. पत्रावरून श्रुत होईल हे विज्ञापना. तीथ माघ वद्य १० रोज **श्रीरामक्षेत्र.**

---

१ सहित. २ पोत्यास ऐवज जमा जाहल्याची पावती.

This letter is written by Ragho Ballal Bhogale to Vishwanathbhat giving information about crop prospects of the district and money collection.

---

पत्रांक ६३ ]  श्री  रविवार फाल्गून वद्य १२।१६७६
मार्च ९,१७५५

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **भिकंभट व बाबुराव** स्वामींचे सेवेसी.

पो **नारो बलाल जोग** कृतानेक नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणोन श्वकीयें कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. तुम्हावरी चिटी केली रुपये २०००० अंके वीस हजार. यांपैकीं तुम्हांस **लहणे**, राजश्री **गोविंद अनंत गोखले** यांजवरी चिटी रुो ५००० पाच हजारांची पाठविली आहे. हा यैवज घेऊन पावलियाचें उत्तर पाठविलें पाहिजे. सदरहू ऐवजपैकीं बाकी, आम्हांकडे तुमची रुपये पंधरा हजार राहिले. हेहि मागाहून आठापंधरा दिवसांआलीकडे उतरून देऊं. तुम्हांस यैवजाची गरज जरूर असेल तरी या पत्राचें उतर पाठवणें. जे क्षणीं पत्र पावेल ते क्षणीं उतरून देऊं.

पुणेयासी जमा करून ठेवा म्हणाल तरी ठेऊं. परंतु आजीची सातारेयाची [1]घडती द्रसदे सा १। सवाप्रों वजा करून जमा करून ठेऊं. सा आटीचें व्याज आठ आणे-प्रों देऊं. यामध्यें तुम्हांस अनकूल पडेल तैसें उतर पाठवणें. त्याप्रों वर्तणूक करूं. हालीं लहणी तुम्हांस पाचा हजारांची पाठविली आहे. या ऐवजाचीहि तुम्हांस गरज नसेल तरी लहणी माघारी आम्हांकडे पाठवणें. घडती वजा लिहिल्याप्रों वजा करून आटेचे सा तुमचे जमे करूं. कळलें पाहिजे. बहुत काये लिहीणें. कृपा लोभ असो दीजे, हे विनंति. मिति फाल्गून वदी द्वादसी रविवार. वेदमूर्ति राजश्री आपाभट खरे शारंगपाणी यांचा मजकूर तुम्हीं लिहीला होता, ऐशास मारनिले श्रीत्रिंबकेश्वराचे यात्रेहून आद्यापि आले नाहीं. आलियाउपरी त्यांचा मजकूर नेमस्त करून लिहून पाठवितों. हे विनंति.

राजश्री रामचंद्रपंत दाजी स्वामींस सां नमस्कार विनंति उपरी. लिा परिसिजे. पत्राचें उत्तर सत्वर पाठऊन देणें. त्याप्रों वर्तणूक करूं; कलर्ले पाहिजे. कृपा लोभ कीजे हे विनंति. किरकोली चिठीचपाटी आम्हांस गव[2] असली तरी तुम्हांवरी करावी कीं नाहीं, तें ल्याहावें हे विनंति.

---

१ उतार, तूट, कमजास्तपणा २ जरूर, प्रसंग, वेळ.

Naro Ballal Jog writes to Bhikambhat and Baburao about the Lahane (लहणे) hundi dealing, he made, of Rs. 20,000 with them. This sort of hundi (लहणे) is peculiar money payment or Cheque account. It has been explained in one of the previous letters. The money was to be paid to Appabhat Khare Sharangapani.

---

पत्रांक ६४ ]

छ. २७ जावल
फाल्गुन वद्य १३।१६७६
मार्च १०,१७५५

वेदमुहूर्ती राजश्री विश्वनाथभट वैद्यबावा मौ वाई स्वामींचे सेवेसी.

चरणरज बहिरजी गायेकवाड देशमुख ता बिरवाडी रामराम विज्ञापना. ताा छ. २७ जावलपर्यंत साहेबांचे कृपेंकरून वर्तमान येथास्थित आसे. यानंतर

आपण कर्जाकरतां शिपाई पाठविले, त्यास आम्ही घरीं नवतों, पुणेंयासि होतो; तेथें घरींहून येकदोन पत्रें गेलीं. याजकरितां निकडीनें घरीं आलों. येऊन च्यार दिवस जाले. पैसीयासि आम्ही साहेबांचे देणेदार. वाजिबी देणें मुदतीसच घ्यावें. परंतु हलाखी करितां सेवेसी अंतर पंडलें, आसो. परंतु आठा दिवसीं, दोनसे रुये देऊन सुज्यातखान याची रवानगी करितों, आणि चैत्र मासीं आम्ही साहेबांचे सेवेसी येऊन सारें देणें आहे तें हिसेबसुधां देऊन. कतबा आणूं. साहेबीं फिकीर न करावी, आणि सिपाईही क्षणक्षण न पाठवावें. आम्ही वतनदार आहों; पैसेयासि खोट पडों देणार नाहीं. आणि आमचा जीव वांचणें हेंही स्वामींचे हातानें वांचेल, असें आहे. तूर्त अगोदर दोघे आले होते, ते पाठविले आहेत. सावारी पैसेयासि घरीं वरातदार आसावे ऐसें काये आहे! येक जण ठेऊन घेतला आहे. त्याजबराबर लि प्रों रुये पाठवितों. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

Bahirji Gaikawad, Deshmukh of Birwadi, was a debtor to Vishwanathbhat Vaidya who had sent sepoys to recover money from him. He agrees to pay the money but wants postponement till Chaitra. His submissive language is worth noting. It seems Vishwanathbhat had given loans to many Vatandars of Bhor state who were proud of their position as Vatandars.

---

पत्रांक ६५ ] श्रीराम+प्रसन्न भावनाम

शके १६७६।७७

सन १७५४।५५

यादी जमे येवज शिवाजी केशव

२५,००,००० हंसपुरी बावा.

| | जमा | वसूल | बाकी |
|---|---|---|---|
| हंसपुरी बावा | | | |
| | १०,००,००० | १०,००,००० | ० |
| रामाजी ना | | | |
| | ३,००,००० | २,५०,००० | ५०,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| कृष्णाजी नारायेण | १,१३,००० | १,००,००० | १३,००० |
| चिमणासाव | ६५,००० | ५२,००० | १३,००० |
| कृष्णाजी गोविंद | १,००,००० | १,००,००० | |
| सिवभट | ४,००,००० | २,७५,००० | १,२५,००० |
| शिवाजी दादाजी | १,००,००० | ० | १,००,००० |
| हरीपंत | १,००,००० | ० | १,००,००० |
| विस्वनाथ वैद्य | १,००,००० | ५०,००० | ५०,००० |
| त्र्यंबकजी राजे | २७,००० | २७,००० | |
| गिरमाजी खंडेराव | ५०,००० | ० | ५०,००० |
| बगूजीपंत. | | | |
| नारो मुकुंद | ५०,००० | ४०,००० | १०,००० |
| | २४,०५,००० | १८,९४,००० | ५,११,००० |
| शामजी फुलाजी | १,००,००० | ० | १,००,००० |
| | २५,०५,००० | १८,९४,००० | ६,११,००० |
| गायकवाड | ३०,००० | ३०,००० | ० |
| | २५,३५,००० | १९,२४,००० | ६,११,००० |

येकून देणें

५,००,००० हुजरात
२५,००,००० निा सिवाजीपंत

---

३०,००,०००

It is not known why this sum was collected. Shiwaji Keshav must be. Talkute, an important person, amongst Raghuji's advisers. The amount is 30 lacs. The persons from whom the money is collected, are mostly moneyed, political advisers and Savakars. They had occasions to deal with Raghuji as creditors. Ramaji Naik might be Kale, the well-known money lender of C. P.

# युवानाम संवत्सर शके १६७७

## इ. सन १७५५-५६

पत्रांक १ ] श्री चैत्र शुध ५।१६७७
मार्च १८, १७५५

यादी कागद **सिवभट** यांसी लिहोन दिल्हे.

| | |
|---|---|
| रोखा शके १६७६ भावनाम सवछरे यैवज हुंडी **अवरंगाबादे**पैकीं रु. २५००० पंचवीस हजार यांसी व्याज दरसदे रु. ।॥॰ अर्धा रा. | कबज रा वरात यैवज **बंगाला** याजवरी रा १३०८३० पैकीं पावले मिती चैत्र शुध ५ युवानाम सवछरे रा २५००० पंचवीस हजार. |

These are two documents, the one is a hundi of Rs. 25000 received from Aurangabad and the other is a receipt of Rs. 25000 given to Sathe which he gave out of the sum of Rs. 1,30,830, received by him from Bengal as Chauthai.

---

पत्रांक २ ] श्री छ. १६ जाकर
चैत्र वद्य ३।१६७७
मार्च ३०,१७५५

वेदमूर्ति राजश्री **विस्वनाथभट वैद्य**—स्वामी गोसावी यांसि.

पोष्य **बाळाजी बाजीराव** प्रधान विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें लिहिणें. विशेष. तुमचा ऐवज कर्जाचा सरकारांत आहे त्यांपैकीं तुम्हांस राजश्री **सिवाजी भिकाजी** यांजकडे प्रांत **वराड** येथील **बाबती सरदेशमुखीचा** सालगुाचा आषाढ मासचा ऐवज रुपये ९२५०० साडे ब्याणव हजार रुपये येणें ते श्रावण सुध प्रतिपदेचे मितीनें देविले असे. तरी श्रावण सुध प्रतिपदेचे मितीनें व्याजसुधा साडेब्याणव हजार रुपये घेणें. रा छ १६ जमादिलाखर बहुत काय लिहिणें हे विनंती.

Nanasaheb Peshwe arranges to pay to Vishwanathbhat the Babati and Sardeshmukhi of Varad, for repayment of his debt with interest of Rs. 92,500.



---

पत्रांक ३ ] श्री चैत्र वद्य ५।१६७७
एप्रिल १, १७५५

शिक्का व मोर्तब षट्कोनी दुरेघी

शिक्यांतील मजकूर

• श्री ◡
श्री रघुवीरच
रजीतत्पर र
रवमाजीजाच
क निरंतर

राजश्री **विस्वनाथभटजी** गोसावी यांस.

दा॥ अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रों **रखमाजी जाचक** दि॥ पाग राजश्री **सेनासाहेब सुभा** दंडवत विनंति उपरी. येथील कुशल ता॥ चईत्र वद्य पंचमी मु॥ **कटक** स्वस्तिक्षेम आसो विशेष. आपली आज्ञा घेऊन वेदमूर्ति राजश्री **सिवभट** याजबराबरीं किलेमजकुरास दाखल जाहलों. सरकारच्या [1]दरखासा किलेयाच्या अजम **फतेखान** यासी दाखविल्या. त्यानंतर दोन रोज आपले [2]तल(ब)ची [3]रदबल घातली होती. आमची तलब देणें. आम्ही किला देतों. इतकेयांत मागाहून **खान** मजकुराचा सांडणीस्वार आला. त्यानें श्रीमंत **बाबासाहेब** कैलासवासी जाहाले, म्हणोन वर्तमान आणिलें. त्या दिवसापासून [4]बेबदल जाहाले. वाजवी हिसेची गोष्टी सांगत नाहीं. मनास येईल तो पैसा मागतो. वेदमूर्ति राजश्री **भटजींनीं** व अजम **मिरजासाले** यांणीं आपला मला माणूस पाठऊन सरकारच्या सनदा आहेत, त्याप्रमाणें तुम्हीं व आम्हीं वर्तणूक करावी. त्याणीं गोष्टी मान्य न केली, इतकें वर्तमान आईकोन गडजाती[4] बेबदल जाहाले. पैसा मुलकी [5]बाद जाहाला. हें वर्तमान सविस्तर वेदमूर्तींनीं लिहिलें आहे व राजश्री **दिना[ना]थजीपंत** यांचे सांगीतल्यावरून श्रुत होईल. वरकड आम्हीं आपला [6]बयाण त्याहावा तरी इस्तकबीलपासून जाणतच आहा व हिकडील उभारणीहि आपण केली त्याप्रमाणें आभिमान धरून श्रीमंताचें पत्र वेदमूर्तीस पाठऊन ऊर्जीत होय तें केलें पाहिजे, हे विनंति [ मोर्तब सुद ]

---

१ यादी. २ तनखा, पगार. ३ वाटाघाट, चर्चा. ४ बंडखोर. ५ रद्द. ६ वर्णन, विस्तार.

Shivabhat Sathe's appointment to Cuttack is mentioned in this letter by Rakhmaji Jachak, a Sardar of Raghuji, for the information of Vishwanathbhat Vaidya. Rakhmaji was one of the officers of Orissa, when Shivabhat assumed charge of Subhedari of that district. Mukund Pandit was also his companion. Dinanathjipant was an agent of Hansapuri.

पत्रांक ४ ] श्रीमंगलमूर्ति चैत्र वद्य ७ शके १६७७

एप्रिल ३, १७५५

— श्री ०

शिक्का व मोर्तब षट्कोनी व दुरेघी — शिक्का — श्रीरघुवीर चरणीं तत्पर आनंदराव वाघ निरंतर

कर्जरोखा शके १६७७ युवनाम संवसरे चैत्र वद्य सप्तमी ते दिनीं धनको नाम रा। विश्वनाथबावा वैद्य यांसि उधारनिकोनाम आनंदराव वाघ दिमत पागा रा। सेनासाहेबसुभा, कारणें लिहोन दिलें ऐसें जें, आपणापासून कर्ज घेतलें मुद्दल रुपये ५००० पांच हजार, यांसि व्याज दरमहा दरसदे रुपये दुबोत्रेप्रमाणें व्याज व मुद्दल कार्तिक मासीं देऊं. यासि आंतर होणार नाहीं. हें लिहिलें, छ. २० माहे जाखर सु॥ खमससमसीन मया व आलफ. बी नारो कृष्ण दिमत मानुले. + हें लिहिलें सही. + ( मोर्तब सुद )

पांच हजार रुपयांस [1]मनोती, हुंडणावळ, बटा वगैरे दरसदे रुपये ५ पांचप्रमाणें २५० आडीचशें हे रुपये वाईदियास देऊं. हें लिहिलें. सही.

---

+ मधील अक्षर लेखकाचें स्वतःचें. १ व्याजाखेरीज घेतलेला मोबदला.

This is a conveyance deed passed by Anandrao Wagh through his agent Naro Krishna for Rs. 5,000 to Vishwanath-bhat Vaidya. He had to pay for manoti, charge of Hundi and bad coin at 5% to Vaidya Rs. 250.

---

पत्रांक ५ ] श्री छ २४ जाकर

चैत्र वद्य ११।१६७७

एप्रिल ७, १७५५

पु॥ वेदमूर्ति राजश्री विश्वनाथभट वैद्य स्वामी गोसावी यांसि.

विनंती उपरी. तुम्हांस राजश्री सिवाजी भिकाजी यांजकडून साडेश्याणव हजार रुपये सालगु॥चा आषाढ मासचा ऐवज देविला आहे, तर तुमचा गुमस्ता राजश्री जानोजी भोसले यांजवळ असेल त्यास लेहून पाठवून सदरहू ऐवज व्याजसुधां वसूल करून घेणें. राजश्री त्रिंबकजीराजे भोसले व रघोजी करांडे पटण्या-

बाऱ्या हवाल्या च्यार लक्ष रुपये **येणें**, तो ऐवज **केशवभट कर्वे** वगैरे साहुकार यांस देविला आहे. त्यास तुम्हांकडील कारकून तेथें असेल त्यास लेहून पाठवून च्यार लक्ष रुपये साहुकाराचे पदरीं पडे तें करणें. रा छ २४ जमादिलाकर हे विनंती.

This lettr is written by Pant Pradhan Nanasaheb to Vishwanathbhat, showing how he should get his money from Shiwaji Bhikaji, referred to in letter dated 30-3-55. The addressee is requested to recover 4 lacs from Trimbakji Raje and Kaghuji Karande and pay the same to Keshavbhat Karve and other money lenders.

---

पत्रांक ६ ] श्री+रामचंद्र छ ३० जाखर

वैशाख शुध २।१६७७

एप्रिल १३।४।१७५५

यादी राजश्री **विस्वनाथभट वैद्य** यांजकडे निशा येणेप्रमाणें करून देणें.

पेस्तर सालचे यैवजी करार बोली विा **लक्ष्मणपंत** दिा मार छ ३० जाखरीं वैशाख शुध द्वितीयेस मुा का **भोर** सुा खमस खमसैन मया अलफ रुो.

| | |
|---|---|
| १५००० | **मावळे** |
| १५००० | **कर्डेकडेवलीत** |
| ३००० | **सुपें** |
| ३००० | **इंदापूर** |
| १८००० | **जालनापूर व बीडआंबड** |
| ५४००० | |

येकूण चौपन हजार आणि सरकारांत [1]**बिनयैवजी** कर्ज द्यावें, पनास हजार ५०००० रुो.

सदरहूप्रमाणें बोली करार असे. [2]**रास**

---

+ 'रामचंद्र' वेगळया वळणाचा. सचिवांच्या हातचा.

१ हातावरील. २ मुद्दल

The terms of the debt given to Vishwanathbhat Vaidya by Pant Sachiv are given in this letter. Vaidya had to pay Rs. 50,000 to Chhatrapati without any mortgage property for Sachiv.

---

पत्रांक ७ ] श्री छ १ रजब

वैशाख शुध २।१६७७

एप्रिल १४, १७५५

वेदमूर्ति राजश्री भिकंभट वैद्य यांस.

प्रती मातुश्री लक्ष्मीबाई आसिर्वाद. उपरी चिरंजीव राजश्री पंतांनीं तुम्हांकडून खासगत बेगमीचा ऐवज देविला त्यापैकीं हफ्ता वैशाख मास गुा ××× पाटणा जमा रुये १००, ××× शके १६७७ युवानाम सवछरे वैशाख शुध द्वितीया सुमाखमस खमसैन मयाअलफ रा। छ १ माहे रजब बहुत काये लिंहिणें. हा आसिर्वाद.

Matoshri Laxmibai ( wife of Naro Shankar Sachiv ), gives a receipt to Bhikambhat Vaidya, of Rs. 100 as monthly allowance given to her for buying private supplies.

---

पत्रांक ८ ] श्री छ १ रजब

वैशाख शुध २ व ३।१६७७

एप्रिल १४, १७५५

[1]तबलक रोजकीर्दी खाा राा विसाजी रघुनाथ वैद्य सुा खमस खमसैन मयाअलफ माहे रजब ह्या छ १ ताा रोज पाो मुकाम नागपूर राा उर्फ वैशाखमास

---

१ कागदपत्राच्या पुडक्यास गुंडाळलेला कागद.

This is a covering of papers of daily accounts of Vishwanathbhat showing that he was at Nagpur at this time.

पत्रांक १ ] श्री वैशाख सुध ५।१६७७
एप्रिल १६,१७५५

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथबावा वैद्य** यांप्रती.

श्रेहाभिलाषी **सदासिव दिक्षित** नमस्कार विनंती. उपरी येथील कुशल ता वैशाख सुध पंचमी जाणौन स्वकीयें कुशल लेखन करीत आसिलें पाहिजे. विशेष तुम्हांकडील बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं, तरी ऐसें नसावें. सदैव आपल्याकडील साकल्यार्थ लिहीत आसिलें पाहिजे. राजश्री **बावांस** देवाज्ञा जाहाली, हें वर्तमान तुम्हीं आम्हांस कांहींच लिहीलें नाहीं. ईश्वरें मोठी आनुचित गोष्टी केली, तरी तुम्ही तेथें प्रसंगीं आहां. राजश्री **बावामाघें** नुन्य न पडे तो आर्थ केला पाहिजे. ज्याप्रमाणें राजश्री **बावांनीं** मुलुकाचा व फौजेचा बंदोबस्त केला, त्याप्रमाणें पूर्ववत् चाले तो आर्थ केला पाहिजे. राजश्री **येजमानास** श्रीमंत मातुश्री **आईसाहेबीं** समाधानाचीं पत्रें पूर्वीं पाठविलीं होतीं व हालींहि त्यांसीं **मातुश्री** नीं पत्रें पाठविलीं आहेत. त्यांजवरून कलों येईल. राजश्री **आपाजी भिवराव** यांजपासीं दुखोटियाचें वस्त्र व समाधानीचीं पत्रें पाठविलीं आहेत, त्यांजवरूनी सर्व कलों येईल. आम्हांस राजश्री **बावांनीं** संरजाम इनामपत्रें करूनी वौंशपरंपरेनें दिल्हीं आहेत, तरी **येजमानास** सांगोन संरजामाविसीं ताकिदी दिल्या पाहिजेत. **मावल्या** लोकांबदल राजश्री **अंताजी विष्णु** येथें आले, त्यांसी आजिपरियेंत आम्ही दो चौ हाजारांसी खालीं आलों. आपणांस कलावें. याजबद्दल लिहीलें आसे व यासिवाये राजश्री **अंताजीपंतहि** दोन हाजारा रुपयांसी गुंतले आहेत. येकून पांच हाजार रुपयांसी आजिपरियेंत **मावले** लोकांबद्दल गुंता जाहाला आहे. +**तुमि** आमचे स्नेही तेथें प्रसंगीं आहां. तरि लिहिल्याप्रमाणें कार्य करणें. बहुत काय लिहिणें. लोभ असों देणें हे नमस्कार.+

---

+ यांमधील मजकूर खाशाच्या हातचा असून बालबोधींत आहे. लेखन मुळांतील कायम ठेविलें आहे.

Sadashiv Dixit Thakar refers in this letter the death of Raghuji Bhosle which took place on 14-2-55 and the regard of Tarabai towards him is also mentioned. The writer requests the adressee to get his Inam Saranjam letters granted by Raghujibawa renewed by Janoji. In satisfying Mavale soldiers, Antaji Vishnu and Sadashiv Dixit together spent Rs. 5000.

पत्रांक १० ] श्री+रामचंद्र छ ३ रजब

वैशाख शुध ५।१६७७

एप्रिल १६, १७५५

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री भिकंभट वैद्य स्वामी गोसावी यांसि.

पो चिमणाजी नारायेण सचीव नमस्कार विनंति उपरी. देणें तीर्थरूप मातुश्री बाया यांस दरमाहाच्या यैवजीं रुपये ९०० नऊसे देविले असत, तरी तुम्हांकडे यैवज करार केला आहे, त्यायैवजीं सदरहू नऊसे रुा महादेवभट यांजपासीं देऊन, पावलियाचें कबज घेणें. रुा उतम देणें. सु खमस खमसैन मया व आलफ. छ ३ रजब बहुत काये लिहिणें+सदरहू रुपये बिनबटा नऊसे देणें. मातुश्रीस रुपये द्यावे लागतात. तरी उतम बिनबटा देणें. लोभ असो दीजे हे विनंति.+

---

+ मधील अक्षर सचिवांचें स्वतःचें.

Chimnaji Narayan Sachiv asks Bhikambhat Vaidya to pay Rs. 900 to his mothers, the usual monthly allowance, out of the sum borrowed from him as debt. His father Naro Shankar had two wives viz. Laxmibai and Gopikabai. Vaidyas were asked by him to pay mothers, their monthly allowances, granted for their expences.

---

पत्रांक ११ ] श्री शनिवार वैशाख शुा. ८।१६७७

एप्रिल १९, १७५५

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री भिकंभट व बाबुराव वैद्य स्वामी गोसावी यांसि.

पो नारो बलाल जोग कृतानेक नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहीलें कीं, राजश्री सदासिवपंत घाणेकर दिा राजश्री पंतसचीव, यांजकडे आमचा यैवज येणें, त्यापैकीं तूर्त रुा वीस हजार देवितों नीं म्हणोन रा बापोजी दादाजी, पुणें यास मारानिलें पा आहे. त्यांणीं ऐवज काये दिल्हा तो लिहून पाठवणें, म्हणोन तुम्ही लिहीलें. ऐशास मारानिलें जवळ तुमचें पत्र आम्हांस होतें कीं, सविस हजार रुा देतील ते जमे करून घेणें. त्यावरून रुपये आरकटी २६००० सवीस

हजार घेतले. तुमचे जमे करून रसीद आलाहिदा लेहून दिली आहे, त्यावरून कलेल. हालीं येथें यैवजाची कोणास गरज नाहीं. आणि रा **आरकटी** कोणी न घेत कीं, नित्य बटा **आरकटीचा.** भाव घडीघडीचा. याजकरितां मग आम्ही सोला हजार रा **आरकटी** तीन महिनेयाचे मुदतीनें रा **संकराजी नाईक भिडे** यांकडे ठेविले. बाकी दाहा हजार राहिले ते दोन च्यार रोज घरीं ठेविले कीं, **आरकटीच** तुमचा यैवज कोणाकडे ठेऊं तें न बने. मग आजी रा बारा आणेयाचे बटेयानें विकून, **आटीचे** करून विल्हेस लाविले, स्वामीस कलावें, जरी बटेयाचें विचारास आलें तरा उत्तम आहे, नाहीं तरी **आरकटी** पाऊण रुपयाच्या भावात दाहा हजार देऊं. तुमचा यैवज आम्हांकडे बहुत जांहाला आहे, कांहीं गव पडेल त्याप्रों उतरून घेणें. बहुत काये लिहीणें. कृपा लोभ असो दीजे हे विनंति. मिति वैशाख शुध ८ शनवार. रा **बापूजी दादाजी** सवीस हजारा सिवाये साहा हजार आणीक देत होते; परंतु तुमचें पत्र नवतें. याजकरितां घेतले नाहीं कललें पाहिजे हे विनंति.

राजश्री **रामचंद्रपंत व लक्ष्मणपंत** यांस सां। नमस्कार. लिा परिसिजे हे विनंति.

Naro Ballal Jog writes to Vaidyas that they have not sent the whole amount of Sadashiv Raghunath. Only Rs. 26,000 were received of Arkati kind. The rate of Arkati is always changing. The writer has shown the difficulties of engaging Arakali amount. Sadashiv Raghunath was agent of Pant and his agent was Bapuji Dadaji Phatak. There are more letters writren by Naro Ballal Jog in this connection to the addressees. ( Vide letters dated 11-5-55 and 24-5-55 ). They are not printed. Naro Ballal was one of Raghujis' trustworthy persons at the time of securing 7½ laes. for the release of Chandakhan.

---

पत्रांक १२ ] श्री वैशाख शुध ८।१६७७
एप्रिल १९,१७५५

चिरंजीव राजश्री **भिकंभट वैद्य** मो **वाई** यांसी **केसो बहिरव** आसीर्वाद. उपरी येथील क्षेम ता वैशाख सुध अष्टमी जाणून स्वकीयें लि(हिलें पाहिजे). विशेष तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. ( त्यांत ) यांज-

कडील रुपये वसूल करून पाठवणें म्हणोन लिहिलेंत, त्यास मानिलेचा कागद राजश्री **येसाजीपंतास** घेऊन पाठविला आहे. हा वाइदेरोखा तुम्हांपासीं असेल (तरी) त्यांजकडे माणूस पाठऊन रुपये आणवणें. वरकड वर्तमान तरी येथास्थित असे. **तुळाजी आंगरे** यांजकडील किले **सु(वर्ण) दुर्ग** व **फत्येदुर्ग, कनकदुर्ग** व **गोवें** ऐसे च्यार किले व **बाणकोट** (व **मंड-)णगड** व **पालगड** यैसे किले घेतले.

× × × × × × ×

चिरंजीव राजश्री **रामा** व **बाबू** यांस आशीर्वाद. राजश्री **रामचंद्रपंत** यांसी नमस्कार.

रा **लक्षुमणपंतांस** आशीर्वाद.

हो **बाळाजी नाईक भाव्ये** सां. नमस्कार. लिा परिसोन लोभ असो दीजे हे विनंती.

Keso Bahirava Vaidya, on receipt of the letter of Bhikambhat Vaidya from Wai for the recovery of money from Yamajipant, writes from Poona how the sum is to be rcovered. He also informs him of the names of forts taken from Tulaji Angare. Suwarnadurga was captured on 12-4-1755 and not on 22-4-1755 as given in Riyasad.

---

पत्रांक १३ ] श्री वैशाख, १६७७
एप्रिल, १७५५

सहस्रायु चिरंजीव विजईभव रा **लक्ष्मणपंत जोशी** याप्रती **महादाजी गोपाळ पटवर्धन** आनेक आसीरवाद उपरी. येथील कुशल जाणोन आपलें कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान विदित जालें. यैसेंच सर्वदा पत्र पाटऊन आमचा परामृश घेत जाणें. यानंतर आमच्या गांवाकडून रा **सदाशिवभट वेलणकर** आलेत, त्यांणीं सविस्तर सांगितलें कीं, समस्त मंडळी हा काल परयेंत गांवीं सुखरूप आहेत. तुमचे घरीचीं माणसें व आमचे घरचीं मनुष्यें समस्त सुखरूप आहेत. कांहीं चिंता न करणें. आम्ही वरचेवर समाचार घेत आहों. आणिखी राजकीय वर्तमान तर राजेश्री **रामाजी महादेव** व **इंग्रज** आरमार सुधां **रतनागिरीस** जाऊन बैसले आहेत. मोरचे व आरमार यांचा [1]मारण्या [2]रसा

जाहाला आहेत. आठा चौ रोजांनीं घेतील ऐसें वर्तमान तहकीक आहे. पुढें ईश्वर इच्छेनें होईल तें खरें. रा मोरोपंत दामले आपले गांवीं सरंदेमधिं सहकुटुंबानसी सुखें आहेत. तूर्त वर घाटीं येत नाहीं ऐसें वर्तमान आहे. रा आपाजी महादेव खांडेकर विजयदुर्गास सुखें आहेत. बाजीपंत कानिटकर व रा रायोबा नाईक दामले यांजकडून अलीकडे कांहीं कागदपत्र आला नाहीं. तुम्हांकडे कांहीं कागदपत्र आला तर सविस्तर लिहोन पाठवणें. आमचें स्मरण करून पेसजी व हालीं पत्रें पाठविलीं, तेणेंकरून आम्हांस परम समाधान जाहालें. ऐसेंच सर्व काल आमचें स्मरण असो देत जाणें. तेणेंकरून ईश्वर बरेंच करील. तुमचे व आमचे वडिलांचें पुरातन चालत आलें आहे. त्याप्रों तुम्हीं चालविलें म्हणजे उत्तमच आहे. तुम्हीं आमची खबर घेतली म्हणून कांहीं उपरोध मानावा ऐसें नाहीं. फार ल्याहावें तर तुम्ही सूज्ञ आहां. बहुत काय लिहिणें. कृपालोभ करीत गेले पा हे आसीर्वाद.

---

१. किल्ल्याच्या तटावरील राखलेलें उतरतें भोंक, हल्ला. २. नाश होणें.

Mahadaji Gopal Patwardhan of Makhajan writes this letter to Laxman Bllal Joshi of Burambad, at present living at Wai. It has importance that it gives an information about the alliance of Manaii, English and Peshwa. On their behalf Ramaji Mahadeo Biwalkar opposed Tulaji at Ratnagiri and captured it. The remaining matter refers to the well-being of his friends near about Wai. This letter contains the account of the capture of the Konkan forts given, by, probably, Bhikambhat and Baburao in the incomplete letter dated 27th April, to Vishwanathbhat.

---

पत्रांक १४ ]                श्री                छ. १४ रजब

वैशाख वद्य ११।१६७७

एप्रिल २७,१७५५

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेसी.

आपत्ये रामचंद्रानें व बाबूनें दोनी कर जोडून सिरसां नमस्कार. विज्ञापना ता। छ. १४ रजब पावेतों वडिलांचे आसिरवादेकरून समस्त सुखरूप असो. यानंतर वडिलांनीं कालोजी जासूद याजबरोबर पत्र पा तें पावोन संतोष जाहाला. यानंतर

आम्हीं वडिलांस कागदाविसीं दोन तीन पत्रें पाठविलीं, परंतु XXX पाठविलें नाहीं. तर आतां तरी कागद व [1]कमगा, व तरि पाठविणें. आणि आम्हांकारणें घोड्या दोन उत्तमशा, मुलांना बसूं देतशा, दोन उत्तम घेऊन आगत्य येते समई घेऊन येणें. न आणाल तर आमची शपथ आसे. बहुत काये लिहिणें कृपा वर्धमान करीत जावें. कळावें हे विनंति.

---

१. धनुष्य, कमठा.

## विश्वनाथभटांचीं मुलाना पत्रें.

**टीपः**—विश्वनाथभट वैद्य यांनीं बाळंभटांचीं मुलें भिकंभट व रामभट व स्वतःचा मुलगा बाबुराव यास लिहिलेलीं बरींच पत्रें आहेत. या सालांत तीं सर्व छापण्यासाठीं निवडलीं नाहींत. कारण त्यांतील बरेच विषयांची प्रत्येक पत्रांत पुनरुक्ति जाहलेली आहे. बाळंभट १७५३ मध्यें वारल्यावर विश्वनाथभट वऱ्हाड-नागपुराकडे गेले असतांना हीं लिहिलेलीं आहेत. दोघे बंधु मरेपर्यंत विभक्त झालेले नव्हते. यामुळें बाळंभटांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलांची काळजी घेणें विश्वनाथभटांकडेच आलें होतें. त्यांच्या मुलांमुलींना व बायकोला आपल्या कुटुंबांतील व्यक्ति समजून त्यांचें ते पालनपोषण करीत. बाळंभटांची मुलगी अनूबाई रास्त्यांच्याकडे दिलेली होती. तिला अशी वागणूक देत कीं, तिच्या आईला (सरस्वतीबाईला) आपणांस परकेपणानें वागविलें असें वाटूं दिलें नाहीं.

त्या काळीं मुलांच्या शिक्षणासाठीं जरी स्वतंत्र शाळा नव्हत्या, तथापि तीं आपल्या दर्जाप्रमाणें कुटुंबाचा आब राखून राहतील असें राजकीय व सामाजिक गृहशिक्षण विश्वनाथभट चि. बाबूरावाबरोबर भिकंभट व रामभट यांसही देत. तें कसें दिलें जाई हें त्यांचीं पत्रें वाचून कळण्याजोगें असल्यामुळें त्यांतील फक्त महत्त्वाचा भाग देण्याचा प्रयत्न केला आहे. केसो बहिरव हा मुलांचा चुलत चुलता होता. त्यानेंही त्यांस पत्रांक नं. १२ चें पत्र लिहिलें आहे. कारकुनांनींही त्यांस पत्रें लिहिलीं आहेत. वैद्यांचें घराणें त्या वेळच्या श्रीमंत घराण्यांत वरच्या दर्जाचें गणलें जात असे. यामुळें मुलांना वाडवडील ज्या इतमामानें वागले, तो कायम ठेवण्यासाठीं, योग्य राखण्यासाठीं व चालविण्यासाठीं आपली जिंदगी, घरेंदारें, जमीनजुमला, व राजदरबार व देवघेव, यांचें शिक्षण त्यांस देणें जरूर असे. वैद्य हे केवळ देवघेवीचा धंदा करीत नसत. त्यांचा राजदरबारीं सल्लागार कोटींत समावेश होत असे. यामुळें राजकीय गोष्टींची त्यांना माहिती करून देणें जरूर असे.

जुनीं पत्रें वाचलीं तर आरंभीं लेखक आपल्या मुक्कामाची माहिती देऊन कौटुंबिक ख्यालीखुशालीबद्दल उल्लेख करतो असें दिसून येईल. नंतर दरबारांतील राजकीय गोष्टींचें निवेदन करून लेखक व लेख्य परस्परास कांहीं माहिती विचारितात.

या घराण्याची उपयुक्तता लक्षांत घेऊन, छत्रपतींनीं यांस संपत्तीची अडचण पडूं नये म्हणून कांहीं इनाम गांवें व सरंजाम म्हणून जमिनी दिलेल्या होत्या. केलेल्या सेवेचा मोबदला उपभोगतां यावा म्हणून केवळ इनाम गांवें व जमिनी त्यांजकडे होत्या. त्यांचें संरक्षण व त्यांवर देखरेख ठेवण्याबद्दल बहुतेक पत्रात उल्लेख आहे. भोर संस्थानांत जांभळी व महुरी बुद्रुक व पुणें व रत्नागिरी जिल्ह्यांत अनुक्रमें कऱ्हाटी, व कासारी, अशीं इनाम गांवें त्यांस दिलेलीं आहेत. महुरीबुद्रुक गांवीं सागवानाचें कुरण आहे. त्यांतील लाकडाची तोड करून वाईचा वाडा व इतर इनाम गांवांतील घरें व देवालयें यांची नवीन बांधणूक व दुरुस्त्या करण्यासाठीं तीं नेऊन उपयोगांत आणावीं, या मुलाना पत्रांतून सूचना आहेत. सातारा जिल्ह्यांत व वऱ्हाड-नागपुराकडे त्यांस कांहीं सरंजामी गांवें होतीं. तीं सध्यां त्यांजकडे सरंजाम खालसा झाल्यामुळें चालू नाहींत.

**मुलांच्या जन्मतिथी खालीं दिल्याप्रमाणें आहेत :—**

**भिकंभट :—** कार्तिक शुद्ध २।१६६०; २,११,१७३८

**रामभट :—** ज्येष्ठ शुद्ध ३।१६६४; २५,५,१७४२

**बाबुराव :—** मार्गसीर्ष शुद्ध १३।१६६७ २५,११,१७४५

**कृष्णराव ऊर्फ तात्या :—** मार्गसीर्ष वद्य १४।१६७२ १६,१२,१७५०

यावरून त्यांचीं वयें लक्षांत येतील. ( खंड ३ मधील वंशावळ पहा. )

महुरीच्या रानांतील लांकडें वाईच्या व कऱ्हाटीच्या इमारतीसाठीं न्यावयाची, महुरीस अमृतेश्वरच्या देवालयाचें बांधकाम चालू होतें त्यासाठीं खाणींतून दगड काढणें, धोमच्या कृष्णेच्या कांठीं घाट बांधणें, वाईहून धोमापर्यंत सडकेच्या बाजूस सावलीसाठीं झाडें लावणें, कृष्णेच्या बाजूस आंबराई करणें, धोमचा घाट बांधण्यासाठीं अमृतेश्वरचा चौथरा व दिपमाळ बांधून झाल्यावर तेथील पाथरवट कऱ्हाटीच्या कामासाठीं तोडी पाडणेस नेणें व कऱ्हाटीचे सुतार महुरीस नेऊन सोपा बांधणें, कऱ्हाटीचे कुंभार महुरीस नेऊन विटा पाडणें, कोकणांतील वरवड्याचें देऊळ शिवभट साठ्यांनीं सांगितल्यावरून चालविलेलें बांधकाम पुरें करणें, यांसाठीं त्यांनीं ५००० रु. दिले होते. घराच्या संरक्षणासाठीं भोरकराकडून रखवालीसाठीं रामोशी मागून घेणें, घराचे मागील व पुढील दरवाज्यांवर हुशार रखवालदार ठेवणें, असलीं कामें करून घेण्यास त्यांस लिहिलें होतें. याशिवाय सावकारी देवघेवीचें कामही त्यांस सांगत असत. पैसा टका सावधपणें देणें, दरमहा दर शें. १ पेक्षां कमी व्याजानें उसनवार पैसे न देणें. खर्चवेंच वारगा न करणें, हुंडीनें किंवा चिठ्यांनीं पैसे देणें किंवा घेणें, धार्मिक वृत्तीनें हें कुटुंब वागत असल्यानें रोज ब्राह्मणभोजन घालण्यासाठीं घरीं १००।१५० पात्रांपर्यंत लागणारे सामानाची बेगमी वेळेवर करणें, रामजोशी वरवडे-कर यांस लग्नासाठीं रु. १००० द्यावयाचे, ते त्यांस कोकणांतूनच मिळतील अशी तजवीज करणें, हीं कामें त्यांत करावीं लागत.

वैद्याचें एक दुकान कापडाचें होतें. त्यात विक्रीसाठीं कापड वऱ्हाडांतून पाठविलें जाई, तसेंच तिकडून तूप पाठवीत. तें घरांत खर्चासाठीं व दुकानासाठींही असेल. तें उंटावर बुधल्यांत येई. तिकडून जातिवंत म्हशीही इकडे पाठवीत. कापड, तूप व म्हशी पाठविल्यावर त्यांची व्यवस्था कशी करावयाची हें विश्वनाथभट लिहून पाठवीत. वाई-धोम रस्त्याचे बाजूस किंवा बागेंत लावलेल्या झाडांस पाणी घालण्यासाठीं कातडी पखाली वऱ्हाडांतून आणीत.

राजकीय हकीगतही पत्रांत विचारली जात असे. कोकणांत तुळोजी आंग्रे यानें व सिद्धीनीं काय गडबड चालविली आहे? रामराजे गादीवर आल्यामुळें दरबारचे कामांत काय फरक आहे? सदाशिव रघुनाथ घाणेकर यांचा रु. २०,००० चा हिशोब काय झाला? जानोजी भोसल्यास पंतप्रधानांनीं तातडीनें कां बोलावलें आहे? याची चौकशी सचिवास भेटून करणें, सचिव गांव व मामलत देणार आहेत तें गांव उत्तम, सुपीक पाहून पतकरणें.

हीं सर्व कामें मुलांकडून योग्य होण्यास कुटंबाचे कारभारी ऊर्फ दिवाणजी रामचंद्र गोपाळ करकरे व लक्ष्मण बलाळ जोशी यांस याच पत्रांत हाच मजकूर लिहिला जात असे.

पत्रांक नं. १५ यांत एक रामभट व बाबुराव यांनीं लिहिलेलें पत्र आहे. आपल्या वयोमानास व वृत्तीस अनुसरून कागद तिरकामटे व घोड्यावर बसण्यास सवय होण्यासाठीं मुकाट्यानें बसूं देतील अशीं लहान तट्टे २, वऱ्हाडांतून मागितलीं आहेत.

नागपुराकडे जाणें किंवा तिकडून परत येणें म्हणजे बरोबर ४०।५० माणसें तरी असत. त्यास उंट व घोडीं यांची गरज लागे. हीं जनावरें नीट राहावीं म्हणून त्यांच्या दाणावैरणीच्या बेगमीची व उत्पत्तीचीही विश्वनाथभट चौकशी करीत असत. प्रवास घोड्यावरून होत असे. घोड्या माजास आल्या तर त्यांस चांगला वळू घोडा देवविण्यासाठीं कोणत्या घोड्यांचा उपयोग करावा हेंही पत्रांत सुचविलें जाई. इतकी बारीक दृष्टि ठेवीत म्हणून यांचा संसार सुखकर व इतमामानें होत असे यांत शंका नाहीं. बायकांचा प्रवासही घोड्यावरून होत असे.

The letter is written by Ramchandra and Baburao to Kaka (विश्वनाथभट) and contains the demand of things such as papers and arrows, the like of which are befitting their ages and interesting to them.

पत्रांक १५ ]

वैशाख वद्य ११।१६७७
एप्रिल २७, १७५५

(४)

(पहिले ३ बंद गहाळ)

आलिया नंतर जें होणें तें होईल, यैसें सांगोन **श्रीमंतां**चा निरोप घेऊन **वाईस** आले तों यैवजाच्या वराता श्रीमंतांनीं केल्या त्या माघाऱ्या फिरविल्या कीं, आपला करार जाहाला नाहीं. आम्ही बोलिल्या प्रों चालिस हजार रुपये याची निशा **मावले** वगैरे स्वदेशची करून घ्यावी. बाकी सोला राहिले तर परमुलकीं नेमून द्यावे. चालिस हजार घ्यावयास केले आहेत. त्यास थोडे बहुत आज देऊं, थोडे बहुत पुढें देऊं. त्यावरून त्यांणीं दाहापांच पत्रें पाठविलीं कीं, राजश्री **लक्ष्मण बलाल** यास पाठवावें. त्यास आम्हीं पाठविलें नाहीं. हलीं येक राऊत आला आहे कीं, मारनिले यास पाठवणें, आथवा देत नाहीं यैसें साफ सांगणें म्हणजे हा यैवज दुसरेयास देऊन कार्य करू(न) घेऊं. तुम्हांस पुसावयासि कारण कीं पुढें बोल लावाल, यांजकरितां पुसोन उतराई होतो, म्हणौन त्यांणीं साफ लिहिलें आहे. त्यास यैवज घ्यावा तर वडिलांची आज्ञा नाहीं, न द्यावा तर दरबार तुटतें आणि पैसा गुंतला तो खुंटलियावर पडतो. ऐसा प्रसंग आहे. याजकरितां तीर्थश्वरूप राजश्री **लक्ष्मणपंत** यांस उदईक द्वितीयेस **भोरास** पाठवितों. तेथील रंग पाहोन चिंतानुरूप बनोन आलें तर चालीस हजार रुपये द्यावयास करितों, तों आपणही येतील. मग आपले विचारें जें होणें तें होईल. येविसीं आपणास दोन चार पत्र पाठविलीं, परंतु पावलीं न पावलीं हें कलत नाहीं. तर याचा अर्थ चितांत आणून पुढें काय करावें तें लिहीलें पाहिजे. वरकड अर्थ येथास्थित आसे. राजश्री **सदासिवपंत** यांस **पेशवे** यांनीं पालखी दिल्ही. पालखी व वेतन दरमाहापैकीं घ्यावें म्हणून **श्रीमंतांस** सनद घेतली आहे. त्यांचा आमचा करार गुदस्तां साठ हजारांचा होता त्याप्रों सालभारीं नवें द्यावें याचा तिजाईचा आहे. वडिलांस कलावें याजकरितां लिहिलें आहे. राजकी वर्तमान तर, राजश्री **पंतप्रधान पुणें**यास आहेत. **सातारे**यांचें वर्तमान पूर्ववत् प्रों आहे. राजश्री **राघोपंत राजवाडे** यांस **पेशवे** यांनीं बोलाऊन नेलें आहे. मनसचा काये हें कलत नाहीं. **कर्णाटक**ची फौज आद्याप फिरली नाहीं.

(५)

**कोकण** प्रांतींचें वर्तमान तर **आंगरे** यावर **पेशवे** यांची कमरबंदी जाहाली आहे. **इंग्रज, फिरंगी व मानाजी आंगरे व पेशवे** याचें आरमार घेऊन **रामाजी माहादेऊ** जलमार्गे येऊन **जंजिरे, सुवर्णदुर्ग** यास मोर्चे लाऊन आठवे दिवसीं **जंजिरा व कनकदुर्ग व फत्तेदुर्ग व गोवा** यैसे चारी किले घेतले. दुसरी तिसरे

दिवसीं **बाणकोट** व **मंडणगड** व **पालगड** हे किले घेतले. **रसालगड** भाडत आहे. तेथून आरमार **आंजणवेलीवरून रत्नागिरीस** गेले. **आंजणवेलीवर** एक दिवस मारगिरी केली. परंतु मोर्चेबंदी केली नाहीं. पुढें **रत्नागिरी** गेले. मोर्चेबंदीस केली आहे. राजश्री **दिनकरपंत** व **समसेरबहादर** यांस खाना केलें. त्यां( पैकीं ) **समशेर-बहादर मलकापुरावर** आहे. **दिनकरपंत रत्नागिरीस** मोर्चेयांत आहेत. [१]जेर जाहाली म्हणोन वर्तमान आहे. **खारेपाटणची गडी खंडोजी माणकर** व **सावंत कुडाळकर** यांणीं घेतली. ते तेथेंच आहेत. **आंगरे** यांचें आरमार **पूर्णगडचे** खाडींत आहे. **सुवर्णदुर्गास** लोकांचे [२]कबिले बहुत सापडले. ज्यांचे कबिले सांपडले त्यांस निरोप दिल्हा. सल्याचा प्रसंग कांहीं होता दिसत नाहीं. पुढें काय होईल तें पहावें. बहुत काये लिहिणें. कृपा करावी हे विज्ञाति.

---

१ हैराण, त्रस्त. २ परिवार, बायकामुलें.

Though first 3 pages are missing, the remaining two pages give an important information on the following points :—

(i) The hundis sent for sadashiv Raghunath, to Sawakars were not accepted. Hence Bhikambhat was sending Laxman Ballal to Bhor to give him for the present, Rs. 40 thousands. (2) Sadashiv Raghunath was given an honour of using palanquin by Peshwe and was to receive the cash every month through Pant Sachiv. (3) Pant Pradhan was at Poona at this time. (4) The army sent to Karnatak did not return. (5) Peshwe was preparing to go to Konkan against Tulaji. (6) English and Manaji Angre have formed an alliance and joined Peshwe. (7) Ramaji Mahadeo Biwalkar was sent with navy by sea to capture the 4 forts viz. सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग, and गोवा within 8 days and after 3 days more he will succeed to take बाणकोट, मंडणगड, पालगड, रसालगड, अंजनवेल व रत्नागिरी were also attacked. Dinkar Mahadeo has also joined Biwalkar at Ratnagiri and Sumsherbahadur was sent to Malkapur. Kharepatan Gadhi was taken by Khandoji Mankar, and Sawant Kudalkar and other sardars. (8) There were no signs of Tuloji coming to terms for peace.

पत्रांक १६ ] श्री वैशाख वद्य. ४।१६७७
एप्रिल, २९,१७५५

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **रामाजी यादव फौजदार** पा सिरवल
स्वामी गोसावी **यांसि.**

पो **विस्वनाथभट वैद्य** कृतानेक नमस्कार. विनंति श्रीमंत राजश्री **पंतसचिव** यांणीं तुम्हांकडून पा मारपैकीं रु ५००० पांच हजार रु आम्हांकडे देविले होते त्यांपैकीं श्रीमंतांनीं करार केले रु ३००० तीन हजार ते तुम्ही राजश्री **सदासिव रघुनाथ** यांजकडून देविले, ते भाद्रपद शुध प्रतिपदा भाव सवछरीं सदरहू तीन हजार रुो पावले आसेत. लिा मिा वौ वद्य ४ युवानाम सवछरे बहुत काये लिहीणें. हे विनंति. सदरहू रु तीन हजार आमुचे रद कर्जाचे येवजीं देविले, ते पावले. हे विनंति.

Vishwanathbhat Vaidya has informed Ramaji Yadav Foujadar paragane Shirwal that the sum of Rs. 3000 out of Rs. 5000 were received from you through Sadashiv Raghunath Ghanekar on 19-8-1754. This transcation is mentioned in the letter of 25-6-1754.

---

पत्रांक १७ ] श्री वैशाख वद्य ४।१६७७
एप्रिल २९,१७५५

दा

श्रीसर्वेउपमायोगये यखंडितलक्षीमी सदाराजमान्ये राजश्री **केसूजी हुद्दार** प्रो कलंबेश्वर गो याहास. **बगूजी यादव** नमस्कार. येथील क्षेम जानोनू. स्वकीये कुसेल लिहिर्ने. विसेसू. रा **विश्वनाथ वैद्ये** याहाचे **पोतदारीचे** तुम्ही दस्तक करून देला आहे. तरी त्याहार्चे प्यादेयाबरचरी जमान प्यादा देऊन पैसा वसूल करनें.

ते छ. ४ वदी वैशाख.

Baguji Yadav asks Kesuji Huddar to collect the Potadari of Vishwanathbhat Vaidya, of his Paragana and pay the same to him. This Varhadi language is worth noting e. g. उपमायोगये, —उपमायोग्य ; यखंडित—अखंडित ; याहास—यास ; याहाचे — याचे, Baguji

Yadav is Parasnis (see P. D. 21, 65). Baguji Pant was one of the persons who gave presents to Nanasaheb Peshwe on receipt of a letter from Raghoba Dada from Delhi that Azizuddin was seated as emperor in place of Gazuddin.

---

नकल १

पत्रांक १८] श्री वैशाख वद्य ५।१६७७

एप्रील ३०, १७५५

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **सदासिवपंत घाणेकर** स्वामी गोसावी यांसि.

पो **विस्वनाथभट वैद्य** नमस्कार. विनंति उपरी श्रीमंत राजश्री **पंतसचिव** यांच्या सरकारांत कर्ज रुो ३६००० छतीस हजार सालमारीं नवें दिल्हें, त्याचें खत श्रीमंतांनीं आमचे नांवें दिल्हें आहे. तुमचा आमचा करार सरकतीचा कीं, दोन तक्षिमा आम्हीं द्यावे, येक तक्षीम तुम्हीं द्यावें. याप्रों करार, त्यास तक्षिमेप्रों रुो सरकारांत दिल्हे. हे रुो **श्रीमंतांनीं** पेस्तर सालीं द्यावे, येसा करार केला आहे. त्यास सरकारांतून यैवज सदहूपैकीं जो येईल, त्यांपैकीं तिसरे तक्षिमेप्रों येईल वांटणी ते तुम्हीं घ्यावी. दोन तक्षिमा आम्हीं घ्याव्या. याप्रों तुमचा आमचा करार आसे. यांत उभय पक्षीं आंतर करूं नये, मिं। शके १६७७ युवानाम सवछरे वौ वद्य ५ पंचमी सदरहू यैवज सरकारांत दिल्हा. याचें खत सरकारचें मिति मारचें आसे. बहुत काय लिहीणें, सदरहू छतीस हजार पैकीं आमचे तक्षिमेस रुो २४००० चौवीस हजार बसले व तुमचे तक्षिमेस रुा १२००० बारा हजार बसले. तेणेप्रों तक्षीमबा रुा सरकारांत दिल्हे आसेत. हे विनंति, हस्ताक्षर **लक्ष्मण बलाळ** दि। मार.

सदरहू प्रों पत्र **सदाशिवपंता**जवळ दिल्हें असे.

Vishwanathbhat has written to Sadashivpant Ghanekar how Rs. 36000 is to be divided for interest among them and how the money returned to them is to be divided.

पत्रांक १९ ] श्री वैशाख वद्य ५।१६७७
एप्रिल ३०,१७५५

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विस्वनाथभट वैद्य** स्वामी गोसावी **यांसि.**

पो **सदासिव रघुनाथ** कृतानेक नमस्कार. विनंति उपरी श्रीमंत राजश्री **पंतसचिव** याच्या सरकारांत कर्ज रुा ३६००० छतीस हजार सालमजकूर नवें दिल्हे. त्याचें खत **श्रीमंतांचे** नांवें तुमचे नांवें आहे. तुमचा आमचा करार सरकतीचा कीं, येक तक्षीम आम्हीं द्यावे, दोन तक्षिमा तुम्हीं **द्यावें.** या प्रों करार. त्यास तक्षिमेप्रों रुा सरकारांत दिल्हे. हे रुा **श्रीमंतांनीं** पेस्तर सालीं द्यावे यैसा करार **केला आहे.** त्यास.सरकारांतून यैवज सदरहूपैकीं जो येईल त्यापैकीं तिसरे तक्षिमेप्रों येईल वाटणी ते आम्हीं घ्यावी. दोन तक्षिमा तुम्हीं घ्याव्या. (या) प्रों तुमचा आमचा करार आसे. यांत उभयपक्षीं अंतर करूं नये. सदरहू यैवज सरकारांत दिल्याचें खत **सरकारचें** मिती मजकूरचें आसे. सदरहू छतीस हजारपैकीं आमचे तक्षिमेत रुा १२००० बारा हजार बसले व तुमचे तक्षिमेस रुा २४००० चोवीस हजार. या प्रों **सरकारांत** दिल्हा असेत. शके सदरहू लिहील्याप्रों स्वामींनीं व आम्ही [व]र्तावें. कृपा लोभ असो दीजे. हे विनंति शके १६७७ युवानाम सवछरे वौ वद्य पचमी हे विनंति.

Sadashiv Raghunath Ghanekar and Vishwanathbhat were partners in paying new debt of Rs. 36000 to Pant Sachiv. In this 'letter the writer describes how the partnership will be given effect. Vishwanathbhat gave two-thirds and Ghanekar gave one-third of the sum. Letter Nos. 18/19 are copies of mutual contracts.

---

पत्रांक २० ] श्रीसांचोजयती

वैशाख वद्य १३।१६७७
मे ९,१७५५

श्रीमंत राजश्री **विश्वनाथभटजी वैद्य** स्वामींचे सो.

पो **सदासिव हरि** नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष श्रीमंत् राजश्री **जानोजी भोसले सेना-साहेबसुभा** यांणीं तुम्हांवरी आम्हांस रुो २०००० आंके वीस हजार देविले, ते **नागपुरीं** आम्हांस दिल्हे, ते भरोन पावलों. शके १६७७ युवानाम सवछरे वैशाख वद्य त्रयोदसी + बहुत काय लिहीणें हे विनंति.

साक्ष

केसो कृष्ण सेंबेकर पत्रप्रमाणें तुकोराम डिंग(ण)कर

This is a receipt passed by Sadashiv Hari to Vishwanath-bhat for having received the sum of Rs. 20,000 which Janoji Bhosle was to give him. He was the first Diwan of Mudhoji and afterwards he joined Janoji.

---

पत्रांक २१ ]

युवानाम
अधिक ज्येष्ठ शुद्ध २।१६७७
मे १३,१७५५

या जमाखर्चाच्या एका पानांत शिवभटाचा संबंध ज्या लोकांशीं विशेष खतां-पत्रांनीं आला आहे त्यांची माहिती आहे.

खतें सिवभट साठे (१६७६) भाव सवछरे.

| | |
|---|---|
| ११०१ | भवानजी अटोळे पौष्य शुध ३ व्याज दर २ |
| ३५० | गोविंदराव सिर्के मि पौष्य शुा ७ दर २ |
| ५०० | बाजी मोहिते पौष्य शुा नवमी दर २ |
| ४०० | आबाजी जगन्नाथ पौष्य शुध ७ दर २ |
| १७०० | बिंब्राजी भोसले पौष्य शुध १ दर २ |
| १००० | बाबुराव देवस्थली खत नाहीं. |
| ५०५१ | |
| २००० | सदाशिव हरी खत १६७७ युवासवछरे जेष्ट अधिक शुा २ व्याज दर १ |
| २० | स्वरूपसिंग जमातदार |
| ७५ | बैरागी |
| १०॥ | गोपजी पाचपांडे |
| ३००० | वकिली प्रांत देवगड वगैरे वि नरहर बल्लाळ सुभेदार आदमासे जमा |
| ५०० | मा राघो बल्लाळ मामले रामटेक अदमासे रुपये |

३६८ **बाबुराव मजमदार** ७५८ पैकीं **आनंदराव वाघ** ३०० बाकी ४५८ पैकीं हवाला **मजीदखान** ९० बाकी ३६८

---

३३३००॥

---

तेरीज

५९०९५
३३३००॥
५०५१

---

९७४४६॥·

४ **शंकराजी चिटणीस** व्याजपैकीं

२०० पा **चंद्रपूर**पैकीं

---

९७६५०॥

१०० मौजे **गुमथले** अदमास बाकी

---

९७७५०॥

१०००० **बाळकृष्णभट पटवर्धन** आधिक जेष्ट शुध ३ शके १६७७ युवानाम सवछरे मुदत कार्तिकमास व्याज बिनसुट रुा १॥

५००० **केसो कृष्ण संबेकर** मिा जेष्ट अधिक शुध ५ शके १६७७ युवा सवछरे व्याज दर १॥ मुदत माघअखेर.

---

११२७५०॥

The account can be explained this way. At the end of Shaka 1675 (श्रीमुख), the money due from Shivbhat was Rs. 59095 and in 1676 (भाव) and 1677 (युवा), together money paid for him to persons mentioned in this letter was 33300–8 So the amount due from him at the beginning of Shaka Dhata 1678 was Rs. 112750–8.

पत्रांक २२ ] श्री छ ८ माहे साबान मंगलवार
अ० जेष्ठ शुध ९।१६७७
मे २०, १७५५

श्रीमंत राजश्री **जानोजी भोसले सेना**साहेबसुभा गोसावी यांसि.

श्नोआभिलासी **विसाजी रघुनाथ** वकीळ रामराम विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जाहलों ते आज मंगळवारीं साईकाळीं मुकाम **तळेगांवास** आलों. आपणास कळावें. यानंतरीं आमचे मागाहून **धोंडजी खेडकर** दि [1]**हुडाभाडा** प्रां। **वराड**, हे मुकाम मजकुरास आले. ते तेथून **नागपुराहून** कुणबीण येक घेऊन आले. ते कुणबिणीचा थांग सरकारचे जासुदांनीं लाविला. तो म्हणों लागला कीं, विकत घेतली, लस्करांत घेतली, येसा म्हणत होता. त्यास आम्हीं म्हटलें कीं, **सरकारचें** खरीदपत्र दाखीव. त्यास त्याजवळ पत्र नाहीं, त्यावरून त्यास **सरकारचे** जासुदाबराबर आपणाकडे पाठविला आहे. आपण मनास आणून आम्हांस लेहून पाठवावें. जरी त्याची खरी असिली तर आम्हांस पत्र पाठवावें. त्याचें स्वाधीन करून देऊं. आपणांस कळावें. आम्ही मजल दरमजल पुढें जात असो. रा छ ८ माहे साबान बहुत काय लिहिणें.

---

१ जकात वगैरेचा मक्तेदार.

३०॥ ४॥९॥५॥२॥१
९०॥४६९६५६२६१
०॥०॥०॥०॥० ॥१
६०॥४६८६०॥२॥१
५६॥३॥३॥३॥२॥१
५६०॥२॥२॥२॥१॥१

---

८०१६०॥४॥४॥१॥१६०
३०॥४॥९॥५॥२॥१

---

७७०६०॥४॥१॥१६१
९०॥४६९६५६२६१

---

६७९॥१॥५॥२॥२६०
०॥०॥०॥०॥०॥१

---

६७८॥०॥४॥१॥१।१
६०॥४०८८०॥२॥१

---

६१७॥१॥६॥०॥१॥·०
५६॥३॥३॥३॥२॥१·

---

५६०॥२॥२॥२॥१॥१

Vishwanathbhat sends a letter to Janoji Bhosle about a maid servant who was found at Talegaon in the possession of Dhondaji Khedkar who said she was bought in Laskar. The writer left the final decision to the addressee. There are some lines at the end written probably in numerical language. It is printed for study of that language.

A letter of the same contents was written by Vishwanathbhat to Narhar Ballal Risbud Subhedar.

---

पत्रांक २३ ] श्रीनकल १० साबान
अ. जेठ. शुध ११।१६७७
मे २२,१७५५

राजश्री **विसाजी रघुनाथ** वकील गोसावी यांसि.

दा। अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य श्री **जानोजी भोसले सेनासाहेब सुभा** दंडवत सुा खमसखमसैन मया व अलफ प्रां **अकोटचे** यैवजी राजश्री **केसो कृष्ण** यांजकडे तुम्हांस वरात'शा पंधरा हजारांची दिली. त्यास **अकोट** यांजकडे न जालें, याकरितां यांणीं दाहा हजार तुम्हांस दिल्हे. बाकी पांच हजार राहिले ते अकोटची चुकोती होईल तेव्हां नेमून देऊं. त्याप्रों घेणें. मारनिलेचा पांचा हजारांचा रोखा घेतला आहे, तो फिरोन देणें. जाणिजे छ १० माहे साबान बहुत काय लिहिणें.

Visaji Raghunath was to receive the revenue of Akot district in payment of debt, from Bhosle. Janoji arranged to pay Rs. 15000 through Keso Krishna Shembekar as he did not receive the required revenue from the Akot district, Mr, Shembekar paid only 10 thousands.

---

पत्रांक २४ ] श्री मंगळवार अधिक जेष्ठ वद्य ९।१६७७
जून ३,१७५५

पो अधिक जेष्ठ वद्य १०
बुधवार मु।। वाई

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **भिकंभट वैद्य व बाबूराव वैद्य** स्वामी गोसावी यांसि

सेवक **नारो बल्लाल जोग** कृतानेक नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे. विशेष अजुरदारासमागमें तुम्हांस **लहण्या हुंडिया** रुा तीन हजारांच्या पाठविल्या. त्या तुम्हीं माघाऱ्या आम्हांकडे पाठविल्या आणि पत्रीं बहुत पर्यायें शब्द लाऊन तुम्हीं लिहिलें. ऐशास तुम्ही चिठी येकूणतीसशे बेताली(स)ची केली तो जाब आम्हांस तीन हजारांच्या हुंड्या तुम्हांकडे पाठविल्या त्या उपरी आम्हांस पावला यांजकरितां तुम्हावरी चिठी रुा च्यार हजारांची केली, ऐसें असोन चिठियां माघाऱ्या आल्या. बरें थोर आहां, चाकरी तुमची करावी त्याचा फालादेश हाच की काये ! तुम्ही पेसजी आम्हांस लिहिलें होतें कीं, **सातारेयाच्या** हुंडिया मिळाल्या तरी पाठविणें. म्हणौन आम्ही पाठवीत गेलों. सराफांच्याच पाठवाव्या तरी कांहीं हुंडावल मागत. याजकरितां विकाऊ चिठिया पाठवीत गेलों. यामध्यें कांहीं तुमचें नुकसान केलें नाहीं आणि आम्हांस बोल लाऊन लिहिलें हें अपूर्व आहे. हालीं तुम्हांवरी चऊ हजारांची हुंडी केली, त्यास **लहणें** हुंडिया

| | |
|---|---|
| पेसजी पाठविल्या होत्या. त्याच हालीं पाठविल्या आहे. याचे रुा घेणें मुदती प्रों ३०००. | नवी हुंडी येक बंदी मुदत जेष्ठ अधिक वदी १४ **आवधूत माहाजनी सातारे** रुा १२००. |

येकून बेतालीसशांच्या पा आहेत. या घेऊन पावलीयाचें उत्तर पाठवणें. इतकिया उपरी हुंडिया तुम्हांस पाठवीत नाहीं. कळलें पाहिजे. आम्ही तुमचे पदरींचे. कृपा करून सांभाळ करावा. उचित आहे बहुत काये लिहींणें. कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंति. मिति जेष्ठ अधिक वदीये.

राजश्री **रामचंद्रपंत व लक्ष्मणपंत** स्वामीस सां नमस्कार. विनंति उपरी लिा परिसीजे. लोभ असो दीजे. हे विनंति.

This letter to Bhikambhat by Naro Ballal Jog describes how Naro Ballal used the Lahani kind of hundis to pay off the various sums to Bhikambhat. His letter dated 19-4-55 is printed and some others are omited.

पत्रांक २५ ] श्री जेष्ठ शुद्ध ९।१६७७
जून १८,१७५५

वेदशास्त्रसंपन राजमान्य राजश्री **विश्वनाथभटजी** स्वामींचे सेवेसी.

पो **गंगाधरभट चिपळूणकर** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. उपरी येथील कुशल जेष्ठ शुद्ध ९ मुा **पुणें** येथें सुखरूप आसो विशेष. आपणांकडून पत्र येऊन कांहीं समाचार कलत नाहीं, तरी आलिया माणसासमागमें पत्र पाठऊन सांभाल करीत गेलें पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तर वो राजेश्री **घोडभट** ताकिदी घेऊन येतात, त्यावरून सविस्तर वर्तमान कलों येईल. **अकोल्या**-हून (जे)ष्ठ आधिक शुद्ध ११ येकादसीचें पत्र आजच आलें. तेथें लिहिलें कीं, **श्रीमंताचें** लस्कर अद्याप वराडांत आलें नाहीं, तिकडील आणखी पत्रें आलीं म्हणजे कांय वर्तमान येईल तें लिहून पाठवितों. तुम्हांस कांहीं कामकाज जें लागेल तें आम्हांस ल्याहावें. तुम्हांस चौकडा आम्ही पाहातों. मिलाल्यावर तुम्हांकडे पाठऊन देऊं. [1]सेलारीचा तलाश केला. परंतु उंच मिळत नाहीं. याकरितां पाठविली नाहीं, मागाहून कोणाचें कापड आलें म्हणजे पाठवितों. **घोडभटास** तुम्ही म्हणाल कीं, फार दिवस कां लागले? तर हें दरबार. फार खोल कामकाज लवकर होत नाहीं, यामुलें गुंता जाहाला. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असो दीजे हे विनंति.

---

१ शाल्, भारी किमतीचें लुगडें.

Gangadharbhat Chiplunkar informs Vishwanathbhat Vaidya that the army of Peshwa did not arrive in Berar. He offered his readiness to do his work of any kind.

---

पत्रांक २६ ] श्री जेष्ठ शुद्ध ९।१६७७
जून १८,१७५५

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथभटजी बावा वैद्य** स्वामींचे सेवेसी.

विनंती सेवक **सदाशिव रघुनाथ घाणेकर** कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. तुम्हांपासून आम्ही आत्म कार्य पवरत समंधें घेतलें कर्ज मुदल रुा २००० दोन हजार, यास व्याज रुा ।।। निमे प्रमाणें दरमाहा दरसदे जाहले मुदतीचा हिसेब करून देऊं. मिती शके १६७७ युवानाम संवत्छरे जेष्ट शुद्ध नवमी बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

Sadashiv Raghunath Ghanekar took Rs. 2000 as debt from Vishwanathbhat for his own use. It is wonder that he should be in need of money when he was a partner of Vishwanathbhat to pay the debt, to Pant Sachiv, of Bhor, of Rs 36,000.

---

पत्रांक २७ ] श्री जेष्ट शुा १०।१६७७
जून १९, १७५५

श्रीमंत राजश्री **विस्वनाथभट** वैद्य स्वामीचे सेवेसी.

पोष्य **केसो कृष्ण** सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता जेष्ट शुध दशमी पावेतों मुकाम **सुरंजी आंजनगाऊ** सुखरूप असो. विशेष आपणास आम्हांकडे **आकोटचे** ऐवजीं रुा पंधरा हजार देविले, आणि आपण निघोन गेले. मागें रा **रघोजी करांडे** यांणीं **अकोटची** घालमेल करून आम्हांकडून दूर करून आपणाकडे केलें. आम्हांकडे **सुरंजी** मात्र करार राहिली. **सुरंजीचे** ऐवजीं तुमचे रुा दाहा हजार करार केला, बाकी पांच हजार राहिले ते **आकोटचे** ऐवजीं त्यांणीं करून घेतले. त्यांस श्रीमंत **जानोजी बावा** देशास येणार आहेत, तेव्हां आपण प्रसंग करून पांच हजार रुा जाबसाल करून घ्यावा. आम्हांकडे दाहा हजार करार करून सनद दिली आहे. आपणास कळावें म्हणून लिा आहे. सदरहू तुमचे पांच हजार रुा **आकोटावरी** करार करून देतों म्हणून **बाबूराव** यांगीं करार केले आहे. + बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

---

+ फुलीपुढील अक्षर लेखकाचें स्वतःचें.

Keso krishna Shembekar writes to Vishwanathbhat from Suranji Anjangaon how Janoji had arranged to pay him Rs. 15000 for Akot revenue as stated in letter dated 22-9-1755. Raghuji Karande took the revenue of Akot. Suranji's revenue was recovered by Mr. Shembekar and arranged to pay only Rs. 10,000.

---

पत्रांक २८ ]　　　　　श्री　　　　　२४ रमजान
शनिवार ज्येष्ठ वद्य ११।१६७७
जुलै ५,१७५५

श्रीमत वो रा विस्वनाथभट बावा वैद्य साहेबांचे सेवेसी.

दोघो जिवाजी वलद पासकोजी परभ किरस्ताव साष्टीकर व अंतोजी वलद पिलोजी परभ किरस्ताव सिरोडेकर. रामराम विनंति उपरी साहेबीं आपणास मौजे रीळ येथील नारायेणाचें देवालय व मौजे वरवडे येथें तिवरीचे बंदरावरीं तळीं बांधावयासी फर्मांविलें, त्यावरून कबूल कतबा लेहून दिल्हा असे.

| | |
|---|---|
| रीळ येथें देवालये येथील बेत | तळीं वरवडे येथें |
| २० लांबी हात | २० लांब हात |
| १४ रुंदी हात | १२ रुंद हात |
| १८ मुकसाल | ७ उंच हात |
| १० लांब | —— |
| ८ रुंद | ३९ |
| —— —— | मधीं बांध घालून गुरांस व माणसांस |
| ५२ १८ | लगतें काम करावें. |

याचा पाया बो चौत्रा
उंची हात ३ जीवरखी हात ८

सदरहू दोन कामाचा मगता कुल यैन ९७५ पावणे दाहासे व पोस्त २५ येकूण दोही कामाचे येक हजार रुपये घेऊन चांगलें काम ज्याप्रों नरवणास देवाचें केलें आहे त्याप्रों करून रीळेस रा बाळाजी खोत सांघेल त्याप्रों व तळीस रा कृश्णाजी आनंत गद्रे खोत लावगनकर यांचे विचारें चांगलें काम करून देऊन. हें लिहिलें सही. सुा सीतखमसैन मया व अलफ, शके १६७७ युवानाम सवंसरे ज्येष्ठ वदी ११ मंदवार तेरीख छ २४ रमजान बीा चिमणाजी विस्वनाथ आठवेले.

This letter is given by two Christian contractors, binding themselves to finish the buildings of Narayan temple at Reel and a tank at Tivari harbour for Rs. 975. These places are in the Ratnagiri district. The places are not far off from Jayagad.

पत्रांक २९ ] श्री आषाढ शुा १।१६७७
जुलै १०,१७५५

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विस्वनाथभट वैद्य** स्वामी गोसावी यांसि—

सेवक **रामचंद्र कोनेर** सां नमस्कार. विनंति उपरी येथील कुशल ता आषाढ शुध प्रतिपदा जाणोन क्षेमरूप असो. विशेष तुम्ही गेल्यावरी तीर्थरूपांकडील पत्रें **साकरखेडल्याचे** मुकामीचीं आलीं, त्यावरून परम संतोष जाहाला. प्रस्तुत इकडील वर्तमान तरी, तुम्ही गेल्यादारभ्य अधिकोतर कांहीं जाहालें नाहीं. विशेषात्कारें वर्तमान जाहालियास साकल्य अर्थलेखन करूं. तुमच्या व **येजमानां** ( च्या ) व तीर्थरूपांच्या भेटी जाहाल्यावरी आपणांकडील सविस्तर अर्थ सायंत लेहून पाठवणें. राजश्री **बाळंभटमामा** दरबारास गेले होते. सुखरूप आहेत. **सिरके** यांणीं मायावाद फार लाविला आहे जें राजश्री **पंत** आलियावर त्यांणीं जर आज्ञा केली इमानपूर्वक, तर मातबर कार्य जें, सांगतील तें करून देऊं. येविसीं **बाईसाहेबांस** त्यां ( नीं ) पुसिलें. त्यांणीं मान्य केलें जें, **पंत** दरमियान आलियावर दुसरा विचार धरणार नाहीं. परंतु त्यांणीं दोनतीनदां बेमानी केली आहे. इतबार येत नाहीं. त्याही मधें **पंत** आल्यावर दुसरा विचार नाहीं. वरकड पुढें जो विचार होईल तो वरचेवर पत्रीं पाठवितों. आपणांकडील सविस्तर अर्थ वरचेवर दिनचर्या लिहित असिलें पाहिजे. बहुत काये लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंती.

सेवेसी **हरी बल्लाळ** सां नमस्कार. विनंती लिा पा सदैव पत्र पाठवून संतोषवीत असिलें पाहिजे. इकडील साकल्य अर्थ श्रीमंतीं लिहिलें त्यावरून कळेल. + विशेष काये लिहिणें. कृपालोभाची वृधि कीजे, हे विनंती.

Ramchandra alias Baburao Koner Kolatkar writes from Satara to Vishwanathbhat that there was nothing worth writing about the Satara Court. However he wants to know from him what happened when his father and Vishwanathbhat met Raghuji Bhosle. Shirke was not keeping his word about the return of Vaidya's debt. Tarabai Saheb requested Kolatkar to wait till Vishwanathbhat's return.

पत्रांक ३० ] श्रीभवानीशंकर आषाढ शुध ७।१६७७
सौम्यवार, (बुधवार,) जुलै १६,१७५५

तीर्थस्वरूप राजश्री **विश्वनाथभट्ट काका** वडिलांप्रति.

अपत्यानुरूप **धोंडभट्ट** व **सदाशिवभट वैद्य** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरि. वडिलांचे कृपेंकरून आषाढ वद्य द्वितीया शुद्ध सप्तमी सौम्यवारपर्यंत सहकुटुंब सुखरूप असो विशेष. तुमचें पत्र **जिवाजी किरिस्ताव** याजबराबर आलें, तेथें लिहिलेंत कीं, मौजे **रीळ** येथील **लक्ष्मीनारायणाचे** देवळाची लांची रुंदी किती आहे ती लिहोन पाठवणें. त्यास तो **किरिस्ताव** आम्हांस भेटला नाहीं. तुमचें पत्र पंधराविसा दिवशीं आम्हांस प्रविष्ट जाहालें. त्यावरून तेथें जाऊन गांवकरी यांचे गुजारतीनें देवळ मोजिलें. त्यास लांबी हात १९, रुंदी हात १३ व जीवरखी लांबी हात ७, रुंदी ७, व चौथरा व **भिंतिभोग** व **जीवरखी** मिळोन जुने दगड सात आठशेंपर्यंत आहेत. याप्रमाणें जुना बेत असे. **मुखसाळ** जुनी नाहीं, परंतु सात हात रुंदी व अकरा हात लांबी होय सारिखें स्थळ आहे. जीर्णोद्धार करावा, हें उत्तम. आहे. देवळांत कांहीं बाकी राहिली नाहीं व मौजे **नरवण** येथील श्रीचे देवळास खर्चवेंच जाहाला आहे, त्याचीं वडिलांकडे येक दोन पत्रें गेलीं, परंतु त्याचें उत्तर आलें नाहीं. दया करून उत्तर पाठवावें. बहुत काय ल्याहावें. कृपा वर्धमान करीत अशिले पाहिजे, हे नमस्कार विनंती.

राजश्री **रामचंद्रपंत** व **लक्ष्मणपंत** व **मोरोपंत** यांस आशीर्वाद. घरांत सर्वांस अनुक्रमें नमस्कार व आशीर्वाद सांगणें, हे आशीर्वाद. राजश्री **हरिपंत काणे कुळकर्णी** मौजे **रीळ** हे म्हणतात कीं, श्रीचे देवळाचें काम आम्हांस सांगाल तरी आम्ही कामावरी राहों. त्यास तेही आपले कुटुंबांतर्गत आहेत, यांसच ठेवावें. इष्टमित्राचें मनोरथ वडील चालवीतच आहेत. विशेष काय ल्याहावें, हे नमस्कार.

Dhondabhat and Sadashivbhat, residents of Narawan, wrote to Vishwanathbhat the measurements of the Laxmi-Narayan temple which was to be rebuilt. They also suggest some improvements of the temple of Narayan. Hari pant Kane is mentioned as Kulkarni of Reel. They recommended him for supervision of the work of the building of Laxmi-Narayan temple at Reel.

पत्रांक ३१ ] श्री आषाढ वद्य १०।१६७७
आगष्ट २,१७५५

राजेश्री **विश्वनाथ वैद्य** स्वामी गोसावी यांसि.

**सिवभट साठे** कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती उपरी येथील वर्तमान अषाड वदी १०, गडमर्धी सुखरूप असो विशे(ष). पूर्वी **यजमानाचे** पत्रीं लिहिलें होतें कीं, **विश्वनाथ वैद्य** यांचे पत्रीं लिहिलें, ते विनंती करीतील, त्यावरून कळों येईल. तर **सदुदीखा(न)** जेथून **नागपुराहून** स्वार जाहले, तेथून **सिवनीछपारे** पावेतों परमश्रमी. हस्ती माघारा फिराऊन पाठवीत होते. तो परभारें **महमदखान** यांस पुसणें. तेथून श्री**वाराणसी** पावेतों आले. तेथून येथें आली. येथून **पटणेया** प्रांतीं जाहागीर त्यांची आहे, तेथें जावयास उमेदवार जाहलेस. बाकी हें कोणाजवळ न सांगणें, **यजमानास** मात्र येकांतीं पुसोन ठीक करून ठेवणें. परंतु आपलें कार्य जाहालियावरी अपण व **मिरजासाले** ऐसे येकत्र होऊन त्यांची खतरजमा केली कीं, आपण हें कार्य करून देतों. त्याजवरू(न)तो खुलासें करून **मक(सु)दाबाजे** गेला कीं, जातांना माझा भाग निमा आपला, ऐसें इमानप्रमाण वाचा गेला **कृष्णंभट राय(र)करही मकसुदाबाजेहू(न)** आले. त्यांणींही सांगितलें कीं, याचा [1]इतबार **आला वदियास** असे. त्यावरून कार्य जाहलिया आपण वचनास हरलों, आणि त्याणेंही इमा(न) प्रमाण केलें कीं, आंपण श्रीमंतांची गुलामगिरी करूं नयेसें केलें. त्या(स) तुम्हीं **यजमानांस** पुसणें. येकांतीं कोणास कललियावरी आपली फजीती आणि तुमचीही फजीती. ऐसें न करणें. जाबसाल घेऊन उत्तर पाठवणें. हजार पांचसे खर्चास लागतील तरी देणें; परंतु **म(ख)सुदामाजेहून** ऐवज आलियावरी **रामाजीस**

× × × × × —फाटलेली ओळ

जीस चिटी देऊन पाठऊन. तेवां हें कार्य करावें लागतें. कितेक प्रकारें **यजमानास** समजाऊन तो तरी पूर्वी श्रमी **यजमानावर** होता. परंतु त्यांस **यजमानाची** तरी (राख) **मिरजासाले** यांणीं **त्रिंबकजीबावा** याज[स] जरच नामी दिली. तरी हे एक ओळ लिहिली असे. हें वाचून फाडून टाकणें. **बाजीनकर** फजीती तुम्ची आपली असे. येविसीं व पूर्वी **यजमाना(स)** पत्रें लिहिलीं. कापड व येथें खर्चा(स) दिले. ते बजिनस हस्तें पाठविलीं. **यजमानाचे** पत्रीं लपटून ते दाखऊन परवाणगी पाठऊ(न) देणें. कार्यास अंतराय होणार नाहीं. परं(तु) ते शा मागतील, कबजे घेतील, तरी पैका से घ्या. आपणास हे गोष्टीचा इतला नवता. बीत.

| | | | |
|---|---|---|---|
| १०००० | **सदुदीखान** (क)रार | ३२५ | किरकोल भोई |
| १००० | **रघोपंत** | | महिना |
| ५००० | किता करार | १२५ | [2]चितेवान महिना |

कगर
हस्तीचे
५००० मागता पा
२०००० मिरजासाले दसरि—
या पासून (म्)हणतो तरी
आ अडीच हजार रु
असे येकून रु.

येणेप्रों तन-
खामिरजासा(ले)—
याजवळ असे

हे या(दा)स्ती प्रों यजमानास पुमोन परवाणिगी पाठवणें. नाहीं तरी यैवज आलियावरी ते श्रीमंत(त) रुा घेऊं लागतील. कचज आपणांजवल मागतील. अशेसिवाय देणार नाहीं. अणी अपणा(स) इतलाच नाहीं तरी [3]परिछिन परवाणगी अथवा जैसे आज्ञा येईल तेसें करून. परंतु यजमानाचे साहेयान सावराता असते हे विनंति. कितेक लोकांकडील अपला यैवज येतो. यजमानास सांगोन वसूल करून घेणें. कजिया तुमचा व माहा(दा)जी पंताचा, हे वि(नं)ति.

रा निलोपंत व तुम्ही व माहा(दा)जी पत्रें देऊन उतरें पाठवीत जाणें. हे विनति.

---

१ भरवसा. २ राज्याच्या किंवा सरदाराच्या पदरीं असलेल्या चित्त्यांची निगा राखणारा अधिकारी. ३ खात्रीनें, निश्चित. वदियात = वैयात.

The whole letter is written by Shiwabhat Sathe himself. In it the movements of SadrudiKhan are given from Nagpur to Patane. He asked Vishwanathbhat to speak to Janoji Bhosle the intention of Khan. Janoji, after being friendly with Mirjasale, was advised to go to Murshidabad. Krishnambhat Rayerkar had just returned from Murshidabad and repented for being unfaithful towards Janoji. Shiwabhat was giving a hint to Vishwanathbhat, as to how he should behave with Janoji at this critical time.

## ओरिसा प्रांताचे सुभेदार व शिवभट साठे

**टीप:—** या सालांत शिवभट साठे यांचा संबंध असलेले जमाखर्च व पत्रें बरीच आलेलीं आहेत. या पुराव्याचें महत्त्व जाणून साठे घराण्याच्या कुलवृत्तांतांत रा. शंकरराव जोशी (वत्स) इतिहाससंशोधक, यांनीं बरीच माहिती शिवभटाबद्दल संकलित करून दिली आहे. तसेंच काळेकृत 'नागपूर प्रांताचा इतिहास' यांतही याच्याबद्दल माहिती निरनिराळ्या प्रसंगानें दिली आहे. वैयदफ्तरांतही वैद्यांशीं

देवघेवींचे व इतर राजकीय व्यवहाराचे बरेच जमाखर्च व पत्रें सांपडत आहेत. या सर्वांचा विचार करतां **रघूजी** (पहिला) व **जानोजी भोसले** यांचे कार्कीर्दींत हा **शिवभट बंगाल**च्या चौथाईची **नबाबा**कडून वसूल करण्याची महत्त्वाची कामगिरी करीत होता. **ओरिसा** प्रांतावर जे सुभेदार होते त्यांची वाचकांस माहिती होणें जरूर आहे म्हणून ती खालीं देण्यांत येत आहे.

**दिल्लीचा** मोगल बादशहा **महमदशाहा** असतांना बंगालचा सुभेदार **जाफरखान** ऊर्फ **मुर्शिदकुलीखान** होता. हा **अवरंगजेबाचा** एक कर्तबगार अधिकारी होता. यानेंच जमिनीची नवीन जमाबंदीची व्यवस्था **दक्षिणेंत** सुरू करून राज्याचें उत्पन्न वाढविलें होतें. **महमदशाहाची** कारकीर्द १७१९ ते १७४७ पर्यंत होती. '**जाफरखान**' हा **अवरंगजेबानें** त्यास दिलेला किताब आहे. त्याचें नांव **मुर्शिदकुलीखान** असून या नांवावरूनच **मुर्शिदाबाद** हें शहर वसलें आहे. यानें या सुभ्याचें उत्पन्न १।। कोट केलें. या सुभ्यांत **बंगाल, बिहार** व **ओरिसा** हे प्रांत येतात. **ओरिसा**ची राजधानी **कटक** शहर आहे. या सुभेदारानें आपली मुलगी **सुजाउद्दीन** यास दिली होती. त्याला **सरफराज** म्हणून मुलगा झाला होता. **सुजाउद्दीन** यास **जाफरखानानें** '**नायब नाजीम**' म्हणून **ओरिसाच्या** सुभेदाराचा (सहाय्यकारी (असिस्टंट) नेमला होता, पण आपल्या मागें **बंगालची** सुभेदारी यास (नातवास) मिळावी अशी त्यानें **दिल्लीस** बादशहाकडे खटपट चालविली होती, पण ती आपल्यास मिळावी असा **सुजाउद्दीन**चाही प्रयत्न चालू होता. तो त्याचा प्रयत्न सफल होऊन तोच बंगालचा सुभेदार सासरा वारल्यावर झाला व तें काम पाहूं लागला. **सुजाउद्दीन** हलक्या वृत्तीचा व परप्रत्ययनेयबुद्धीचा असल्यामुळें-त्याचे सल्लागार सांगतील त्याप्रमाणें तो वागत असे. मुख्य सल्लागार ५ जण होते त्यांत **अलींवर्दीखान**ही होता. **सुजानें ओरिसा** प्रांतावर दुसऱ्या बायकोचा मुलगा **महमद टाकी** यास नेमून **अलींवर्दीखानास बिहार** प्रांताचा सुभेदार केलें. आपल्या प्रांताचा वसूल **फत्तेचंद** ऊर्फ 'जगत् शेट' यांच्या दुकानाच्या पेढीमार्फत **बादशहास** पोंहोंचवूं लागल्यामुळें त्याचें नांव प्रसिद्धीस आलें. त्याच्या हाताखालीं '**आलमचंद**' यास देऊन पुढें **बंगाल**चा '**नायब दिवाण**' त्यास केलें.

**टाकीखान ओरिसांतच** वारल्यामुळें, त्याच्या जागीं आपला दुसरा जांवई **मुर्शिदकुलीखान** यास '**नायब दिवाण**' नेमिलें. **मीरहबीब** म्हणून एक इराणी प्रामाणिक, स्वामिभक्त मुसलमान गृहस्थ हा एक त्याचा विश्वासू अधिकारी होता. **बंगाल**वरील स्वाऱ्यांत हा मराठ्यांच्या फार उपयोगी पडल्यामुळें फार प्रसिद्धीस आला.

**सुजाउद्दीन** १७३९ मध्यें मरण पावल्यावर त्याचा मुलगा **सरफराजखान** यानें बादशहाकडे खटपट करून **बंगाल**ची सुभेदारी मिळविली. हे **अलींवर्दीखानास** न आवडून त्यानें **चिनकिलिचखान निजामुल्मुल्ककडे** वशिला लावून सुभेदारीची

सनद आपणांस मिळविली. त्यासाठीं तो **सरफराजखानाशीं गढिया** येथें लढला व त्यास ठार केलें. पुढे **ओरिसाचा** नायब **मुर्शिदकुलीखान** याच्या मागें लागून त्यास त्यानें **ओरिसांतून** हांकून लावलें. तो **मच्छलीपट्टणास** पळून गेला. अशा तऱ्हेनें **ओरिसा प्रांत** त्यानें आपल्या ताब्यांत आणला.

बंगाल्यावरील **रघूजींच्या** पहिल्या स्वारीच्या वेळेस **ओरिसा** प्रांत, **अलीवर्दीखान** बंगालचा सुभेदार असल्यामुळें, त्याच्या ताब्यांत होता. **सरफराजखानानें** आपला मेहुणा **मुर्शिदकुलीखान, ओरिसाचा नायब दिवाण,** नेमला होता. याचाच प्रामाणिक सरदार **मीरहबीब** होता. **अलीवर्दीच्या** कपटी स्वभावाचा त्यास वीट आल्यामुळें त्यानें पूर्वी **अलीवर्दींच्या** विरुद्ध जाऊन त्याच्याशीं लढाई करण्यासाठीं **रघूजी भोसले** याची मदत मागितली होती. १७५११५२ पर्यंत त्याला त्रस्त करण्याचे कामीं हा **भोसल्यास** फार उपयोगी पडला होता. **भास्कररामाच्या** प्रयत्नानें **मीरहबीब** मराठ्यांच्या सैन्यांत सामील झाला होता. त्यानें मराठ्यांचें कांहीं सैन्य घेऊन **मुर्शिदाबाद** लुटलें होतें. **बंगालच्या** तिसऱ्या स्वारींत **भास्कररामास** आपला सेनापति **मुस्ताफाखान** व त्याचा कारभारी **जानकीराम** यांच्या साहाय्यानें ता. ३१।३।४४ रोजीं **अलीवर्दीनें** ठार केलें व त्याचेबरोबर आणखी २२ लोक कापले. या कृष्णकृत्याचा सूड **रघूजीस** उगवावयाची फार तळमळ लागली होती. पण इतर व्यवसायामुळें त्यास लवकर फुरसत मिळाली नाहीं.

सन १७४८ मध्यें **अलीवर्दीनें ओरिसा** प्रांतावर **मुस्ताफाखानास** सुभेदार नेमलें. पण या वेळीं सुभेदार व इतर अफगाण सरदार मराठ्यांस मदत करून **अलीवर्दीच्या** विरुद्ध बंड करण्याच्या तयारींत आहेत ही बातमी **रघूजीस** लागतांच तो **जानोजी** व सरदार **तुळजाराम** व **मीरहबीब** यांस घेऊन **ओरिसा** प्रांतावर स्वारी करण्यास गेला. त्यानें तो प्रांत काबीज करून **बंगाल्यावर** स्वारी केली. पण **देवगड** प्रांतांत बंडाळी सुरू झाल्याचें **रघूजीस** कळतांच तो **जानोजीस** ओरिसांत ठेवून तिकडे गेला. पण **जानोजी ओरिसावर मीरहबीबची** नेमणूक करून तो **नागपुराकडे** गेला. पुढें **मीरहबीब** यास **ओरिसांत अलीवर्दीनें** फार त्रास दिल्यामुळें **रघूजीनें** पुनः **जानोजीस ओरिसा प्रांतावर** १७४८ मध्यें पाठवून २ वर्षांत तिकडील बंडाळी मोडली व **अलीवर्दीस बंगाल्यांत** जाऊन जिकीरीस आणलें. शेवटीं त्यानें भोसल्याशीं १७५१ मध्यें तह केला. व **ओरिसा प्रांत रघूजीस** देऊन **सुवर्णरेखा** नदी ही उभयतांची सरहद्द ठरविली. तसेंच त्यानें **बंगालची** व **बिहारची** चौथाई १२ लाख देण्याचें कबूल केलें. १७४८ मध्यें **जानोजीस कटकचा** सुभेदार नेमल्यावर **मीरहबीबचें** त्याचें जमलें नाहीं. प्रांताच्या हिशोबावरून त्याचें वाकडें आलें असें कोणी म्हणतात. तो कैदेंतून सुटून पळून जात असतां पहारेकऱ्यांची त्याची झटापट होऊन तो पडला असेंही म्हणतात. अशा रीतीनें **मीरहबीब** मेल्यावर **रघूजीनें मिर्झामस्लुद्दीन** यांस सुभेदार नेमिलें. **रघूजी** व **अलीवर्दीखान** यांचा १७५१ चा

तह यानेंच घडवून आणला. सुभेदार नेमल्यावर आपण चार लक्ष जास्त वसूल करून देऊं असें त्यानें कबूल केलें होतें. जास्त पैसे तर दिले नाहींतच, पण त्यानें पूर्वीपेक्षां कमीच वसूल केला. म्हणून त्यास सुभेदारीवरून काढावें लागलें. ही गोष्ट १७५५ मध्यें **रघूजी** मरण्याच्या सुमारास झाली. नंतर **शिवभट साठे** यांस १७५६ मध्यें सुभेदार करण्यांत आलें. हा पहिला मराठा ब्राह्मण सुभेदार होय. तो पहिल्या **रघूजीचा** व **जानोजीचा** एक प्रमुख सरदार व मुत्सद्दी होता. या सुभेदाराच्या हाताखालीं प्रसिद्ध सरदार **जाचक** घराण्यापैकीं **रखमाजी** व **मुकुंद पंडित** हे रघूजीनें अधिकारी दिले होते. **मानाजी, दारकोजी, हैबतराव** व **पद्मोजी** हीं **जाचकांचीं** नांवें इतर वैद्य-दप्तरांतील कागदांत येऊन गेलीं आहेत. हे अधिकारी **ओरिसांत** नेमण्यांत आले होते.

**रखमाजीचा** बाप **नऱ्होजी** हा **कटक**जवळील **बाराभाटी** किल्ल्यावर पहिला किल्लेदार होता. **शिवभट कटक** प्रांतावर अधिकारी असणें, **इंग्रजांस** सोईचें नव्हतें. **बंगाल्यांतून मद्रासकडे** जाण्यास **ओरिसा** प्रांतांतून जावें लागे. **शिवभटानें** आपल्या सुभेदारींत **बंगालच्या** १२ लक्षांच्या **चौथाईचा** **इंग्रजां**मार्फत सारखा तगादा **नबाबाच्या** मागें लावलेला होता. **शिवभट** १७६४ पर्यंत सुभेदार होता. १७६१ मध्यें **इंग्रजांनीं** बंगालचा नवाब **मिरजाफर** यास काढून **मिरकासीम** यास नवाब केलें. तो नांवालाच नवाब होता. खरा कारभार **इंग्रजांनींच** चालविला होता. **शिवभटानें बंगाल्यावर** स्वारी केल्यामुळें त्यास हुसकण्याचा **इंग्रजांचा** सारखा प्रयत्न चालू होता. **मराठे** व **मिरकासीम नबाब** यांमध्यें वितुष्ट आणण्यासाठीं निरनिराळ्या तऱ्हेनें इंग्रजांनीं प्रयत्न केले. शेवटीं **मिरकासीम** आपलें ऐकेना म्हणून १७६३ मध्यें त्याच्याशीं युद्ध करून त्यांनीं पुनः **मिरजाफरास** नवाब केलें. **चौथाईचा** पैसा **भोसल्यांस नबाबाकडून** इंग्रज मिळूं द्यावयाचा नव्हता, म्हणून त्यांनीं **बादशहाकडून बंगाल** व **बिहारची दिवाणीची** सनद मिळवून ठेविली होती. शिवभटानें आपला भाऊ **भास्करराव** यास विश्वासाचा माणूस म्हणून **बलसोर** येथें फौजदार नेमून ठेवलें होतें. हें एक महत्त्वाचें बंदर आहे. **मराठे, भोसले, इंग्रज** व **नबाब** यांचें या वेळीं केवळ शिष्टाचारी वर्तन चाललें होतें. कोण कोणास कसें व केव्हां फसवितो इकडे सर्वांचे प्रयत्न चालले होते. **भोसल्यांना चौथाई** मिळेना, म्हणून **जानोजीनें** आपला पुतण्या **मुधोजीचा** मुलगा **खंडोजी** ऊर्फ **चिमणाबापू** यांस **ओरिसाची** सुभेदारी १७६४ मध्यें दिली. त्याच्याबरोबर **भवानी काळू,** कसलेला योद्धा, वेळ पडल्यास लढाई करून **चौथाई** वसूल करावी, म्हणून दिला होता; पण सर्व किल्ली **इंग्रजांच्या** हातांत असल्यामुळें त्यांनींच **चौथाईचा** निकाल लावून दिला नाहीं, व **ओरिसा** ( ओडेसा ) आपल्याकडे कसा येईल इकडे प्रयत्न चालविले. ओरिसास लागून **बंगालचा मेदिनीपूर** परगणा **इंग्रजांच्या** ताब्यांत होता. तेथील लष्कर काढून घ्यावें असें **शिवभटाचें** म्हणणें होतें, तसेंच **चौथाईची** रक्कम न

मिळाल्यास आपणास **बंगालवर** स्वारी करावी लागेल, असें त्यानें **इंग्रजांस** कळविलें होतें. या मागण्यामुळें **इंग्रज** त्याचा द्वेष करूं लागले आणि त्याचे हाताखालील अधिकारी **रखमाजी जाचक** यास गोड गोड पत्रें लिहून व घड्याळासारख्या जिन्नसा बक्षीस देऊन आपलेंसें करून घेतलें. त्यानें व त्याच्या शत्रूंनीं व **इंग्रजांनीं जानोजीचें** मन त्याचेविषयीं कलुषित केलें होतें. यामुळें **जानोजीनें शिवभटाची** सुभेदारी **१७६४** मध्यें काढून घेतली. त्यानंतर **बंगाल**मध्यें व **ओरिसा**मध्यें तो तसाच राहून दंगाधोपा करीत होता. त्याची कारकीर्द लोकांस सुखावह झाल्यामुळें तिकडील **बरेच** जमीनदारांचें त्यांस पाठबळ मिळालें होतें. इतकेंच नव्हे तर **कलकत्तेकर इंग्रज व नबाब** यांनीं त्यास तिकडे मुकाट्यानें राहूं दिलें. **शिवभटास** काढल्यावर **जानोजीनें भवानी काळू** यास सुभेदारी दिली. त्यास इंग्रजांनीं आपलें लष्कर देऊन **बलसोर** येथून **शिवभटास** घालवून देण्यास मदत केली. **ओरिसांत चिमणाबापू** सुभेदारीवर होता. त्यानें **भवानी काळूस** मदत करून **शिवभटास** कैद करून **बाराभाटी** किल्यांत ठेविलें.

**शिवभटानें** आपल्या सुभेदारीच्या कारकीर्दींत **ओरिसाची** नवीन जमाबंदी करून त्याचें १८ लक्ष उत्पन्न केलें. **मुकुंद पंडित** हा त्याचेबरोबर होता तो पळून गेला. **जाचकाप्रमाणें इंग्रजांस** सामील झाला नाहीं. पुढें **भवानी काळूनें इंग्रज** गव्हर्नरास पत्र लिहून व वकील पाठवून **चौथाईची** रक्कम मागितली. कांहीं तरी शुष्क कारणें देऊन **इंग्रजांनीं भोसल्यास** ती अजिबात मिळूं दिली नाहीं.

१७६४ ते १७६८ पर्यंत **भवानी काळू** सुभेदार होता. नंतर तो **नागपुरास** परत आला.

१७६८ ते **१७७१** पर्यंत **गणेश संभाजी खांडेकर** हा **ओरिसाचा** सुभेदार होता. याचा भाऊ **गोपाळ** हा **साताऱ्याच्या फडणीस** घराण्याचा पूर्वज आहे.

१७७१ ते १७७३ पर्यंत **बापूजी नाईक** हे **ओरिसाचे** सुभेदार होते. १७७३ ते १७७५ पर्यंत **महादाजी हरी खाडिलकर** सुभेदार झाला. याचें नांव **वैद्य** यांच्या शके १७०३ ते १७७५ च्या खतावणींत असून त्याला त्यांचें देणें रु. ३५११ होतें. हें घराणें मूळ **नगर** जिल्ह्यांतील **अकोळनेर** गांवचें होतें असें दिसतें.

१७७५ ते १७७८ पर्यंत कोण सुभेदार झाले कळत नाहीं. १७७८ ते १७९२ पर्यंत **राजाराम मुकुंद** हा सुभेदारीवर होता. हा **शिवभट साठे** यांचा दिवाण फार दिवस होता. १७९२ ते १७९७ पर्यंत त्याचा मुलगा **सदाशिव राजाराम** हा सुभेदार झाला. त्याचा दिवाण **व्यंकाजी विठ्ठल फडणीस** म्हणून होता.

**ओरिसा प्रांतावरील** सुभेदार कोण कोण होऊन गेले व भोसल्याच्या ताब्यांत **बंगालच्या नबाबाकडून** हा प्रांत आल्यावर चौथाईची वसुली सन १८०४ पर्यंत मराठ्यांनीं कशी केली ही माहिती वर देण्यांत आली आहे. आतां **शिवभट साठे**

१७५६ मध्यें **ओरिसाचा** सुभेदार होण्यापूर्वी **वैद्याच्या** हिशोबावरून व पत्रव्यवहारावरून त्याच्याबद्दल काय म्हणतां येईल, त्याची संक्षिप्त माहिती देण्यांत येत आहे.

**कान्होजी** भोसल्यानंतर पहिल्या **रघूजीस वऱ्हाड नागपुराकडे छत्रपतींनीं** पाठवितांना त्यांचेबरोबर दक्षिणेंतील जीं कर्तबगार माणसें दिलीं त्यांपैकींच हा **साठे** होता. सन १७५४।५५।५६ सालच्या **वैद्यांच्या** कागदावरून असें दिसतें कीं, हा **साठे** कोकणस्थ **रत्नागिरी** तालुक्यांतील **वरवडे** अथवा **रीळ** गांवचा रहिवासी असावा. **वैद्यांचा** व यांचा देवघेवीचा निकट संबंध तर होताच पण नात्याचाही संबंध असावा असें दिसतें. त्यानें तेथें **श्रीआदित्येश्वराचें** देवालय **वैद्यांकडून** बांधविलें व त्यासाठीं त्यांच्यापाशीं रु. ५००० देऊन ठेवल्याचा उल्लेख आहे. त्यानें लिहिलेल्या पत्रांत देवालय किती बांधून झालें याची चौकशी केली आहे. हिशोबाच्या कागदांतही या रकमेचा उल्लेख आहे.

सन १७४३ मध्यें **रघूजीची बंगालवरील** पहिली स्वारी झाल्यावर **छत्रपतींनीं** पेशव्यांना व त्याला साताऱ्यास बोलावून त्यांचा तंटा प्रांत वाटून मिटविला. त्यांत **रघूजीकडे बंगालची** चौथाई, **मूर्शिदाबाद, लखनौ** व **पटण्याची** सरदेशमुखीही दिली व पेशव्यास **अजमीर, अग्रा, प्रयाग** व **माळवा** हा भाग दिला होता. याबद्दलचा मसुदा छापला आहे. (वै. द. खंड ४–२६ पहा). **शिवभटाची वैद्य** घराण्याशीं हजारों रुपयांची देवघेव असे. ती हुंड्या, वराता, चिठ्या व नक्त रक्कम इतक्या प्रकारांनीं झालेली आहे. ही देवघेव करतांना खालील माणसांशीं त्याचे, किरकोळ रकमेपासून शेंकडों, हजारों, लक्ष व कोटी रकमेपर्यंत व्यवहार झालेले आहेत. हीं नांवें हिशोबांत आलेलीं आहेत. १ **वैद्य**बंधू, पुतणे व मुलगे २ **रघूजी भोसले** व त्याचे मुलगे ३ **कायगांवचे बाळकृष्ण** व **वासुदेव दीक्षित पाटणकर** ४ **बंगालच्या** नबाबाचा सरदार **मिरजासाले** ५ **हिरोजी भोसले** दि **सोलापुरकर** ६ **बापूभट वैद्य** ७ **भवानी** व **चिटकोपंत मुनशी** ८ **येशवंतराव वाघ** ९ **काशी भास्कर कोल्हटकर,** १० **बाबुराव गणेश देवस्थळी** ११ **देवगडचा** गोंडराजा **बुऱ्हाण शहाराजे** १२ **चिंतामण केशव** १३ **गोंदशेट होनराव** १४ **गंगाधरभट चिपळुणकर** १५ **शंकराजी ना। अनगळ** १६ **नरसीभट** १७ **महादाजी केशव** १८ **गोविंभट दात्ये** १९ **गदाधरभट कुसरे** २० **महादाजी ना। दामले** २१ **बाबुराव अनंत गद्रे.** २२ **रामाजी ना। काळे** (सावकार) २३ **बाळकृष्णभट पटवर्धन (माखजनचे)** २४ **रहिमानखान. मोरो मल्हार पतकी** हे **नानाजी ना। जोशी** (सातारकर) यांचे कारकून. **कटक** येथें असतांना त्यांनीं सन १७६० ते १७६४ सालांचा जमाखर्च **जोशाकडे** ऑगष्ट २।१७६४ रोजीं पाठविला त्यांतही आणखी नांवें सांपडतील. **शिवभटाला रघूजीनें** १७६४ सालीं काढून टाकल्यावर **बाराभाटी** किल्ल्यांत कैद करून ठेविलें होतें, त्यासंबंधींचा उल्लेख

**पतकी** यांनीं पाठविलेल्या जमाखर्चांत आहे. यांत फार उपयुक्त माहिती आहे. एका हिशोबाच्या कागदांत शेवटीं खालील महत्त्वाचा उल्लेख आहे. 'बाकी खर्ते, मागील दोन, येणें न होतीं तीं दिल्हीं व फाजील देणें, हिसेची व्याज त्यांचें आमचें धरिलें नाहीं, रुबरू फडशा केला. मिती रु. २६२५ सुध ११.'

**बंगाल**च्या चौथाईच्या वसुलांतील ३०,००० रु. **शिवभटानें औरंगाबादेहून** हुंड्या करून पाठविले. त्याचा तपशील पौष वद्य १।१६७६, सन ३०।१२।१७५४ च्या हिशोबांत दिला आहे.

माघ वद्य १।१६७६ चे हिशोबांत ही हुंडी 'अनामत' म्हणून लिहिली असून '३०००० ची **औरंगाबाची** हुंडी **शिवभट साठे**यांपैकीं, सदरहू रुपये **वाई**खातें यास जमा केले आहेत' असा उल्लेख आहे यावरून. **वैद्यांचा** व **शिवभटाचा** देव-घेवीचा किती निकट संबंध होता हें दिसून येतें. **वरवड्यास आदित्येश्वराचें** देवालय बांधण्यास त्यानें **वैद्यां**जवळ रु. ५०.०० दिले होते. यावरून तो तेथील रहिवासी असावा असें अनुमान काढलें तर चूक होणार नाहीं. **इंग्रजांनीं** यास सुभेदारीवरून काढण्याच्या ज्या शकली लढविल्या, त्यांस तोंड देऊन काम करणारा हा पुरुष होता. या हिकमती कळाव्या म्हणून **संबळपुरास** आपला भाऊ **भास्करपंत** फौजदार नेमून ठेवला होता. १७६४ मध्यें **शिवभटास जानोजीनें** कामावरून काढल्यावर पुढें तो कोठें गेला व कधीं वारला याबद्दल माहिती देणारीं पत्रें सांपडलीं नाहींत. **काळे** यांनीं लिहिलेल्या **नागपूर** प्रांताच्या इतिहासांत तिकडील रेसिडेन्सी दफतरांतील कागदांवरून थोडी बहुत १।२ वर्षांची पुढील माहिती दिली आहे. त्या वेळीं पर प्रांतांत जाऊन दाक्षिणेंतील लोकांनीं आपली कर्तबगारी कशी दाखविली हें दाखविण्यास **शिवभटाचें** उदाहरण चांगलें आहे.

ही टीप युवानाम संवत्सर (१७५५-५६) मध्यें देण्याचें कारण **शिवभट साठे** या कर्तबगार पुरुषासंबंधाचे कागद, विशेषतः हिशोबाचे, मिळाले व त्यावरून संशोधकास त्याच्या व्यवहाराचा बराच उलगडा होण्याजोगा आहे. मला त्याबद्दल फार विचार करतां आला नाहीं, यामुळें मी त्याबद्दल ठाम मत देऊन कांहीं लिहूं शकलों नाहीं. **शिवभटाच्या** हस्ताक्षराचीं पत्रें सांपडलीं, तीं छापलीं आहेत. या सालानंतरही **शिवभटाचा** संबंध असणारे हिशोब व पत्रें सांपडतील. व तसे ते महत्त्वाचे असल्यास त्या सालचे कागद छापताना त्याबद्दल माहिती देतां येईल. यापुढील कागद ज्यांचेकडून छापले जातील, त्यांना हें काम करावें लागेल. ही टीप माझे कल्पनेपेक्षां जास्त लांबलचक झाली आहे. पण जी माहिती दिली आहे ती संकलित देण्याचा प्रयत्न केला आहे.

पत्रांक ३२ ] श्री छ. २४ सवाल

आषाढ वद्य ११।१६७७

आगष्ट ३,१७५५

अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री **माधवराऊ सिवदेव** सुभेदार प्रां **कडेवलित** गोसावी यांसि.

सेवक **बाळाजी बाजिराऊ प्रधान** नमस्कार. सुहुर सनसीतखमसैन मया आलफ. मौजे **भातोडी** प्रा मजकूर येथें चोरी राजश्री **विश्वनाथभट वैद्य** यांची जाहाली. त्याबद्दल तेथील कुणची वगैरे तुम्हांकडे आले आहेत, त्यावरून मौजे मजकूरचे पाटील हुजूर आला आहे, तरी तुम्हांकडे गावकरी गेले आहेत, ते सोडून देणें व या कामाबद्दल सरकारचा जासूद पाठविला आहे. त्यास हुजूर पाठवणें. गांवकरी यांसि तगादा न करणें. जाणिजे छ. २४ सवाल आज्ञा प्रमाण.

This letter by Nanasaheb Peshwe to Madhavrao Shiwadeo Subhedar of Bhatodi shows that the Peshwa himself inquired about the theft of Vishwanathbhat's property, while he was going to Nagpur and asked the Subhedar of Bhatodi to release the villagers who were arrested in this connection. He was convinced by the statement made by the Patil of the place that they were innocent. The word 'आज्ञा प्रमाण' is always written by a clerk and not by the Pant Pradhan.

---

पत्रांक ३३ ] श्री श्रावण शुा ११।१६७७

आगष्ट १८,१७५५

श्रीमंत राजश्री **विस्वनाथभट वैद्य** स्वामींचे सेवेसी.

सेवक **नारो अनंत गद्रे** कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंति उपरी येथील क्षेम ता। श्रावण सुध येकादसी मुकाम **लस्कर नजिक लाखणवाडा** जाणून स्वकीये लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष **रामाजी परशराम व सदाशिव विस्वनाथ सहस्रबुधे** यांजचो हुंड्या व पत्रें पाठविलीं तें पावलीं. पावोन संतोश जाहाला. पत्रीं लिहिलें जें, मारनिलेच्या हुंड्या साडेतीन हजार रुा केल्या आहेत, त्याप्रों रुा **आकोले** अथवा **टाकळीस** देणें म्हणून लिलें. त्यावरून **गंगाधरभट चिपळोणकर** याजचा यैवज **गोडाजीपंत** दिा **खासनीस** यांजकडे नव हजार रुा येणें त्यांपैकीं साडेतीन हजार रुा श्रावण वद्य प्रतिपदेस दिल्हे आणि पेशजी **कुसाजी**

**चुंबलकर** यांसी देविले तीन हजार येकून साडे सा हजार रुा नव हजार पैकीं देविले. स्वामीस कलावें म्हणून लिा आहे. राजश्री **माहादाजी नारायेण** यांजवल पचवीस हजार रुा [1]वरात **बालापूर** वगैरा यैवजीं दिल्ही होती तो यैवज आला नाहीं. राजश्री **बाबुराव कोनेर**यास बहुता प्रकारें म्हटलें. परंतु त्याच्या चितास न आलें, तुम्ही **नागपुरा** होतेत तेव्हां वराता करून घेतल्यात होतात, त्यांपैकीं **बालकृष्णभट** यांनीं दाहा हजार रुा कबूल केले. **केसो कृष्ण** यांजकडे पंधरा हजार रुा होते, त्यांपैकीं ते म्हणत आहेत जें, दाहा हजार रुा यैवज आपणाकडे आहे. पांच हजार रुा यैवज नाहीं. राजश्री **रघोजी करांडे** यांजकडे **आकोट**चे यैवजीं दाहा हजार रुा वरातआहे, परंतु त्यांनीं प्रा मजकूरची [2]रसद दिल्ही आहे. तो यैवज पावोन बाकी राहिली तर देऊं म्हणून **रघोजी करांडे** म्हणतात कलावें, म्हणून लिहीलें आहे वरकड वर्तमान येथास्थित असे. मौजे **लाखणवाडा** मोकास आपण घेतला आहे तो प्रस्तुत उज्याड आहे आणि रहदारीचा गांव आहे, त्यास याचा मोबदला मौजे **खिरपूर पा बालापूर** हा गांव **श्रीमंत पुणें** यांसी आलियावरी करून घेतला पाहिजे. दरबारचें वर्तमान पेशजी लिा आहे, त्याप्रों येथास्थित असे. राजश्री **सिवभट साठे** यांचें पत्र आलें आहेत बजिनस पाठविलें आहेत. पोचेल. आम्हींहि त्यांस पत्र पाठविलें आहे. पेशजी **बालापूर**चें कापड खरेदी करणें म्हणून स्वामींनीं लिहिलें होतें, त्यास कापड माहाग आहे. हजार पांचसे रुा आज्ञेप्रों घेतों. लोकांकडील यैवज येणें, त्यांस वरचेवरी तगादे करीत आहों. पा **वडनेरबिबी** येथील नव हजार रुो आले. ते **बालाजी माहादेव केलकर** यांसी दिल्हे. कललें पाहिजे. आलिया माणसांबो आपणाकडील व राजकी सविस्तर वर्तमान लिहिलें पाहिजे. बहुत काये लिहीणें. लोभ असो दीजे हे विनति.

राजश्री **रामचंद्रपंत** व **लक्षुमणपंत** व **मोरोपंत** स्वामीस साष्टांग नमस्कार. विनंति आलिया माणसाचाा पत्रीं सांभाल करीत असिलें पाहिजे. बहुत काये लिहीणें लोभ असो दीजे हे विनंति.

चिरंजीव **गोपालास** आसिर्वाद. उपरी आपणांकडील व **कोकणचें** सविस्तर वृत्त लिहीत जाणें. चिरंजीव **रामचंद्रपंत** कोठें आहेत तें लिहीणें. तुम्ही लिहीत जाणें बहुत काये लिहीणें हे आसिर्वाद.

---

१ मामलेदार इत्यादिकांकडून यावयाचा जो पैसा, त्या विषई सरकारांतून जी चिटी करतात ती, हुंडी, चेक, किंवा बिल.

२ कमाविसदारानें आपल्या मुलुखाच्या वसुलाचा जो भरणा आगाऊ केलेला असतो तो; मुलुखाच्या वसुलाचा कमाविसदारानें जो मक्ता घेतलेला असतो त्याबद्दल आगाऊ भरावी लागणारी रकम.

Naro Anant Gadre informs Vishwanathbhat from Lakhanwada ( Berar ), how he disposed off hundis and letters sent to him. The persons with whom he had to deal with were Ramaji Parasharam Ghare, Sadashiv Vishwanath Sahastrabudhe Gangadharbhat Chiplunkar, Kusaji Chumbalkar ; Mahadaji Narayan, Baburao Koner, Balkrishnabhat Patankar, Keso Krishna Shembekar, Raghuji Karande, Shiwabhat Sathe and Balaji Mahadeo Kelkar. The receipt of Ghare and Sahasrabudhe of having received Rs. 3,500 is received by him on 22-8-1750. It is not printed.

---

पत्रांक ३४ ] श्री युवानाम

श्रावण वद्य १।१६७७

आगष्ट २२,१७५५

हिसेब राजश्री **पंतप्रधान वि। विश्वनाथभट वैद्य**

८७६० यैन श्रीमुख सवछरे आषाढ शुा १

१०२१ व्याज दर १ प्रों चिनसूट बा खत इा ता भाव सवछरे जेष्ठ अखेर मुा माहे १२ यो रुा १०५१ वजा पचातिसावा हिसा रुा ३० बाकी १०२१

---

९७८१

१३७७॥। व्याज इा ता युवा श्रा. वद्य १ मु माहे

१३॥ यैन माहे

१ अधिक माहे

---

१४॥

‿ रुा १४१८ पैकीं वजा पंचतिसावा हिस्सा रुा ४०॥ बाकी.

---

१११५८॥।

४९२। यैवज दिक्षिताकडील
३५६ यैन
१३६। व्याज

——

—— ४९२।

११६५१

This is an account of Pant Pradhan Nanasaheb in the ledger of Vishwanathbhat Vaidya. It is to be considered whether it was the custom to deduct one thirty fifth of the interest, as the charge or tax of Government. In other accounts usually one-twelveth of interest was remitted to the debtor. The sum of Rs. 8,760 is found in the account of Shivbhat Sathe in Vaidya's ledger.

---

पत्रांक ३५ ] श्री भाद्रपद शुध ५।१६७७.
सपटंबर १०,१७५५

तीर्थरूप राजश्री **दादा** वडिलाचे सेवेसी.

अपत्ये **मोरयानें** चरणांवर मस्तक ठेऊन सिरसा नमस्कार. विज्ञापना यैसी जें येथील वर्तमान ता भाद्रपद शुध पंचमी मुा **पुणें** सुखरूप जाणौन स्वकीयें कुशल लेखन करावयासि आज्ञा केली पाहिजे. विशेष वडिलांचा निरोप घेऊन स्वार जाहालों, ते **पुणियासि** सुखरूप पावलों. वडिलांस कलावें म्हणोन लिहीलें आसे. येथें रा **गोविंदपंत** यांजपासी **नारो माहादेव पनलकर** यांचा शोध घेतला; परंतु ते कांहीं येथें आले नाहींत व **मारो नारायेण करकरेहि** येथें नाहींत. वरकड वर्तमान तरी येथास्थित आसे. श्रीमंत राजश्री **विस्वनाथयाबाच्या** व राजश्री **पंतप्रधान** यांच्या भेटी जाहाल्या. बहुत सन्मान केला. कितेक बोलणें चालणें जाहालें. राजश्री **जानोजीबाबा भोसले पैठणास** आले, म्हणोन पत्रें आलीं होतीं. त्यास राजश्री **वैद्यबाबाहि** सामोरे पुढें जाणार आहेत. चौ दिवसीं जातील. येक मजल पुढें जाऊन भेटी घ्यावी आणि त्यास घेऊन **पुणियासी** यावें यैसें वर्तमान आहे. शरीरभावनेचें वर्तमान तरी आपले आसिर्वादेंकरून रक्त राहिलें, परंतु कांहीं [1]आवस आहे, यैसें भासतें. वरकड वर्तमान येथास्थित आसे. बहुत काये लिहिणें हे विज्ञाति.

---

१ अवशेष.

Moropant Karkare writes to his father from Poona the news that Vishwanathbhat met Pant Pradhan Nanasaheb and after being received with respect, had a free talk on various subjects. Janoji Bhosle had come to Paithan and Vishwanathbhat proceeded, it is heard, to see him and bring him to Poona.

---

पत्रांक ३६ ] श्री भाद्र. शु. ५।१६७७
सपटेंबर १०,१७५५

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **रामचंद्रपंत** स्वामी गोसावी यांसी.

सेवक **विश्वनाथभट वैद्य** कृतानेक नमस्कार. विनंती उपरी श्रीमंत **राजश्री पंतप्रधान** यांचें खत तेथें रुमालांत गेलें म्हणून लिहिलेंत, त्यास खत येथें आलें नाहीं. **वाईतच** आहे. येथें कोणाचींच खतें आणलीं नाहींत. त्यास खत व हिसेब श्रीमंतांचा जरूर पत्रदर्शनीं पाठऊन देणें व राजश्री **सदाशिव रघुनाथ** यांचा खासगत खातें व सरकार [1]निसबत उतरून पाठवणें, जरूर जाणोन लिहिलें आहे. तर पत्रदर्शनीं पाठवणें. राजश्री **जानोजी भोसले** व **मुधोजीबावा आमदानगरा**-वर आले. म्हणोन वर्तमान आहे. आम्ही यका मजलीवर पुढें जाणार, तर हिशेब पत्र-दर्शनीं पाठविणें. जासूद येक क्षण न खोलंबणें. राजश्री **गोविंद ना दिघे** यांचे चिठीचे रुपये येथें दिल्हे. कळलें पाहिजे. राजश्री **गोविंदराउ चिटनीस** यांचा हिशेब पेशजीचा आहे तो साकसुरत मनास आणून इस्तक बील तागायेत पाठऊन देणें. त्यांचीं खतें काय आहेत तीं रकमेची रकमेस दाखला लिहिणें. तीर्थस्वरूप राजश्री **केसोपंतबावा** यांचीं खतें पेशजीचीं आहेत तीं पाठवणें. **कृष्णाजी ना भावे** यांचीं खतें पाठवणें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

सेवेसी **लक्ष्मण बल्लाळ** सां नमस्कार. विनंती आमचा सेला व पागोटें पाठऊन देणें. येथून सेला व पागोटें **गोपाळाचें** आणिलें होतें तें पाठविलें आहे. हे परटीस टाकून धुवोन आणून ठेवणें. वरकड वर्तमान राजश्री **मोरोपंतीं** लिहिलें आहे, त्यावरून कळेल. हे विज्ञापि.

---

१ संबंधींचा, बद्दलचा.

Vishwanathbhat writes to Ramchandrapant Karkare to send the deeds belonging to Pant Pradhan, the extracts of accounts of Sadashiv Raghunath Ghanekar, Govinda Naik Dighe, Govindrao Chitnis Krishnaji Naik Bhave, and Kesopant Vaidya to Poona early with special messenger. Laxman Ballal wanted from Wai his shela and turban.

---

पत्रांक ३७ ] श्री मंगलवार भाद्रपद शुध११।१६७७
सपटंबर १६, १७५५

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **नारोपंत गद्रे** स्वामी गोसावी यांसी.

पोष्य **विस्वनाथभट वैद्य** कृतानेक नमस्कार. विनति उपरी येथील कुशल ++ भाद्रपद शुध येकादसी मुा **जेजूरी** सुखरूप जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. श्रीमत् राजश्री **जानोजीबावा भोसले** सेनासाहेब सुभा यांच्या व आमच्या भेटी काल सोमवारीं त्रितीये प्रहरीं जाहाल्या. पुढें मजल दर मजल **पुणें** यासि जात आहों [ पुढे कोरी जागा असून मजकूर लिहीलेला नाहीं. ]

Vishwanathbhat writes from Jejuri to Naropant Gadre that he met Janoji Bhosle on 15th i. e. yesterday ( Monday. )

---

पत्रांक ३८ ] श्री भाद्रपद वद्य ३।१६७७
सपटंबर २३,१७५५

सद्द्आयु चिरंजीव विजईभव राजश्री **रामचंद्र बल्लाळ** व **बाबूराव विस्वनाथ वैद्य** या प्रती **जनार्दनभट वैद्य** अनेक आसिरवाद. विनंती उपरी येथील कुषळ ता। भाद्रपद वद्य त्रितीया पावेतों सुखरूप असो. विशेष आपला निरोप घेऊन मौजे **लावगणास** आलों. देवळीं जाऊन गांवकरी आणून **श्रीस** प्रसाद लावविले. त्यावरून **देवीनें आगविणतीवरी**[1] व [2]**आवसरी** सांगितलें कीं, 'खूप आपना कार्या जाऊन तुमचे नाश करितों व कितेक उपद्रव होतात.' त्यास आम्ही पुसिलें कीं, कार्या जावयासी कारण काय ? त्यावरी **देवीनें** सांगितलें कीं, 'तुम्ही माझें स्मरण करीत येकंदर नाहीं. त्यामुळें नाश होतात, जेव्हां रा **भास्करभट** वरघाटीं गेले, तेव्हां बोलिलें कीं, आम्हांस ईश्वरें सवासेर दिल्हा म्हणजे तुझें स्मरण करूं. येसें बोलिले होते, त्या आलीकडेस माझें स्मरण न करितां चालीवरी नजर देऊन मनस्वी देवधर्म करिता(त) आणि बरें करून

घेता(त,) त्यामुळें अशा गोष्टी होतात व माझीं देवळें बांधावीं येसें **देव आवसरी व आगाविणतीवरी** सांगितलें आहे. सर्व तीन गांवचे गांवकरी म्हणतात. **देव** सांगतो त्याप्रमाणें कबूल **वैद्यांही**' केल्यास **देव** बरें करील व **देवही** आवसरीं व प्रसादीं सांगतो, हें कबूल केलेंयांनीं सर्व गोष्टी अनुकूल मी करीन. येसा देवाचे आड देवळें बांधावयाचा आहे. याखेरीज मौजे **मोभार** येथील खोतीचा कजिया **रानड्यांस** व **देवरुखे** यांस कजिया लागला,.तेव्हांची ³मानणुक काले कलसास मानणुक रुपें तोळा १ व वस्त्र १ व नारळ २ येणेंप्रमाणें आहे. यास पडमोड नारळ १ व मौजे **नांदीवडे** येथील कार्यावाी **काळे** यांचे निसबतीनें आहे, येसें आपले गांवचे **देवांनीं** सांगितलें आहे. आणखी दोहो चोहो जागा **देवास** पुसिलें. त्यांणींही याजप्रमाणें सांगितलें आहे. येथें कांहीं वारावार करावयाची ती करवितो. गांवच्या **देवाचा** धीर भरंवसा मागत होतों, त्यास **देव** म्हणतो कीं, माझीं देवळें बांधावयासी काम लावणें. म्हणजे सर्व गोष्टी, उपद्रव दूर होतील. त्यास आम्ही, तूं **देवा** सांगतोस, यास साक्ष, आम्हा साहा महिनेयांचे दुःखी ⁴अनुपती होतात त्या दूर करून दे, म्हणजे तुझीं देवळें बांधवूं, **देव आवसरी** म्हणतो कीं, येव्हांच काम लावणें. त्याखेरीज **देव** ⁵सुदामत ⁶ढाल्यास येत नाहीं येसा विचार आहे व वाोमूर्ति रा **परशरामभट वेद्य** म्हणतात कीं, **देव** म्हणतो तें कबूल केल्यास बरें होईल येसें आहे. यांजकरितां आपणाकडेस लिहून **सटवोजी** बराबरीं माणस देऊन पाठविला आहे. या पत्राचें प्रतीउत्तर पाठवावें, त्याज सारिखी येथें गांवच्या **देवाचा** धीर भरवसा घेऊन भेटीस येऊं. बहुत काय लिहिणें हे आसिरवाद.

हेच **रामजी चव्हाण** याचे रामराम. विनंती सविस्तर पत्रीं लिा आहे, त्यावरून विदित होईल. तुम्ही तेथें भगतभावें पंचाक्षरी यांजकडील तूर्त गुणमान न करवणें. येथें गांवचा **देव** म्हणतो सर्व गोष्टी तुमच्या बऱ्या करीन. देवळें बांधावयाचा हेत फार आहे. हे विनंती.

---

१ देवास फूल, तांदूळ, सुपारी वगैरे लाऊन मागितलेला कौल. २ अंगास आलेला भगत, देवऋषी. ३ नवस. ४ विपत्ति, दारिद्य. ५ बिनघोक, सरळ. सुखसंतोषानें, बिनत्रासानें, ६ बारण्यास

The Vaidya family were suffering often with bodily and mental illness. Janardhanbhat Vaidya went to Lawagan, and the Village God was entreated with usual practice to say why the trouble to Vaidyas was continued and how it would be stopped. The letter is worth-reading as it is an instance of blind faith or casting of evil spirits. and contains technical words of that faith.

पत्रांक ११]

भाद्रपद वद्य ११।१६७७
आक्टोबर १, १७५५

श्रीमंत राजश्री विश्वनाथबावा स्वामीचे सेवेसी.

सेवक विठ्ठल हरी फडणीस किले नागपूर सां नमस्कार. विनंति येथील कुशल ता। भाद्रपद वद्य येकादसी पावेतों स्वामींचे कृपेकरून किले मजकुरीं सुखरूप असो विशेष. स्वामीकडून बहुत दिवस आज्ञापत्र येऊन परामर्ष होत नाहीं. याजकरून चित उदास आहे. तरी वडिली यैसें न करावें. सदैव आलिया [1]वार्तिकाचा आसिर्वादपत्र पाठऊन सांभालीत जावें. आम्हांस वडील तुम्ही आणि दरबारी मुरबीही तुम्हीच असा. जो परामर्ष कराल तो थोडका आहे. आम्ही स्वामींच्या कुटुंबांतील स्वजातही असो. सर्व अभिमान तुम्हांसच असे. तेथें विस्तार काये लिहिणें? प्रा बोरीची फडनिसीचें लिहिण्याची वेतन साल दीडसे रुपये करून सनद घेऊन आम्हांकडे दिल्हीत, तेथें चाकरीवरी आम्ही आपला भाऊ चिरंजीव सिवाजी हरी पा. त्याचे हाताखालें एक लिहिणारही दिल्हा. त्याचेंच पोट भरत नाहीं; परंतु स्वामी या प्रांतास येतील आणि पोख्ती बेगमी करून घेऊं, यैसी उमेद राखोन बसलों असो. यैसें असोन रा। नारोपंत व रा। केसोपंत स्वामीकडील येथें आहेत हे संभर रुपये मागतात. त्यास यांसी कोठून द्यावे? आपला आमचा कांहीं करार नाहीं. [2]रुबरू स्वामींनीं सनद दिल्ही ते समईं पुसिलें, तेव्हां आपण उत्तर केलें जें, तुम्ही आमचे लेकरादाखल आपत असा. हे आसामी तुम्हांस दिल्हे. आपणास येक पैसा घेणें नाहीं, यैसें उत्तर असोन हे मागतात. तरी यांसी काय लिहावयाचें असेल तें लिहून पाठवावें. दुसरें, बोरीची सनद रत्ना महाडीक देऊन आले आहेत. त्यास पुढेंही त्याचे नांवें ताकीद घेऊन पाठविणार आपण समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये कृपा निरंतर असो देणें. हे विनंतिपर.

---

१ जासूद, दूत.

Vithal Hari Phadnis writes from Nagpur to Vishwanathbhat that he, being a relative and interested in his welfare, secured the Phadnisi of Bori district for a yearly remuneration of Rs. 150. per year. He had sent his younger brother, Sivaji Hari to do the work and provided a clerk to assist him. The remuneration being very scanty, required more money which he expected to get, on Vishwanathbhat's arrival in Berar. Naropant Gadre and Keso Hari Sawarkar are willing to do the work for Rs, 100. But this was unjust when there

was no talk like this when the Phadnisi was offered to him. Vithal Hari says that Ratna Mahadik has got the Sanad of Bori and may get orders in his name to enjoy it.

---

पत्रांक ४० ] श्री + शंकर आश्विन शुा १।१६७७
आक्टोबर ६, १७५५

चिरंजीव राजश्री **लक्षुमणपंत जोसी** मुा **पुणें** याप्रति **विस्वनाथभट वैद्य** मुा **नागपूर** जाणून स्वकीये लेखन करणें. विशेष आम्ही **पुणे**याहोन निघोन आलों. ते आश्वीन शुध प्रतिपदेस **श्रीमंतांची** भेट जाहाली. बहुमान उत्तम प्रकारें जाहाला. तुम्हांस कळावें म्हणून लिहिलें आहे. तुम्ही आपणाकडील व श्रीमंताकडील व वरकड प्रांतीचें वर्तमान सविस्तर लिहोन पाठवणें, पेसजी तुम्हांस कामकाज **पुणें** वगैरा सांगितलें आहे त्याप्रमाणें करणें. पेसजी हिसेबाविसीं सांगितलें आहे त्या प्रों तुम्ही व राजश्री **रामचंद्रपंत** बसोन इा पासून आजपर्यंत हिसेब तयार करून ठेवणें. येविसीं अनमान न करणें. तांदूळ व जोनले व इराजिनस गला घेणें. तांदूळ कोंकणांतून **नांदिवडे** वगैरा जागाबजागा[1] खाा करून आणवणें. घरीं खर्चवेच करणें तो बहुत सावधपणें करीत जाणें. राजश्री **पंतसचीव** यांजकडील कराराप्रमाणें यैवज निशा करून घेणें आणि त्यास द्यावयासी यैवज केला आहे तो कराराप्रमाणें देणें. पुढें कोणास कर्जवाम देणें जाहालें तर गाहाणा सिवाय कोणायेकास न देणें. लिहिल्याप्रमाणें कामकाज करणें, बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

---

१ निरनिराळ्या ठिकाणीं.

The contents of this letter are almost the same as those in the letter dated 16-9-55.

---

पत्रांक ४१ ] श्री २९ जिल्हेज सूरसन ११६५
आश्वीन शुध १। १६७७
आक्टोबर ६, १७५५

श्रीमंत राजश्री **विश्वनाथभट वैद्ये मोकासी** साहेबाचे सेवेसी

० ।।द अर्जदास सेरीकर मोकदम **मौजे कान्हाटी** प्रां **सुपे** सुमासनसुहूर ११६५

चा ता। छ २९ जिल्हेज मौजे मजकूरचें वर्तमान आपले कृपेंकरून येथास्थित असे. यानंतरे रा। सिवरामपंत सुभेदार यांनीं बैल व लाखोटा सुपीयाहून पा, तो आपल्याकडे पाठविला आहे, तरी घेऊन पावलीयाचें उत्तर दिल्हें पाहिजे. सरलस्करच्या आमलाचा कैसा काये तह केला, तो साकलेवार लेहून पाठवणें. त्यासारखी वर्तणूक करूं. सेवेसी श्रुत अर्जदास.

This leter is written by the Mokadam of Karhati inam to Vishwanathbhat, informing that the letter brought by Shivarampant Karmarkar from Supe was sent to him.. He inquired of the result of the inquiry about the rights of Sarlaskar over the inams given to him. The letter is selected to show that the word: Suhur to give the date of the letter does not refer to Arabi Shak. It is Phasali. The calculation of the Late with the help of the chronological Tables (शकावली) is interesting,

---

पत्रांक ४२ ] श्री+शंकर अश्वीन शुा ४।१६७७
· आक्टोबर ९,१७५५

तीर्थस्वरूप मातुश्री सखूबाई वडिलांचे सेवेसी.

अपत्ये विश्वनाथ भट वैद्य सां नमस्कार. विनंति उपरी येथील क्षेम × ता। आश्वीन शुा चतुर्दशी मुक्काम × × सुखरूप जाणौन स्वकीये कुशल लिहीत असावें. विशेष आपण पत्र पाठविलें. तेथें लिहिलें कीं, 'कन्यागत आहे यात्रा जाणार आहे, त्याजबरोबर राधाबाई गाडगीळ जाणार आहे, त्यांचेबरोबर श्री द्वारकेस जाणार, म्हणोन लिहिलें.' × × मासीं अस्त आहे, याजकरितां राधाबाई राहिली आहेत व आश्वीन मासीं चिरंजीव राजश्री बाबूराव याचें लग्न करावें ऐसें आहे, तरी विजया दशमी जाहलियावर आम्ही वाईस येऊन माघमासीं चिरंजीवाचें लग्न करूं आणि तुमची यात्रेस रवानगी करून देऊं. बहुत काये लिहिणें तूर्त यात्रेस जावयाचा × × × असा आहे. अस्त आसल्यावर यात्रेस जाऊं नये, ऐसें आहे. × × × भिऊबाई यांस आणावयासी × × रामजी चव्हाण पाठवून सां. नमदेसही × × लास आणवणें. + बहुत काय लिहीणें लोभ असो दिल्हा पा. हे विनंति( हे विनंति पत्र बरेंच फाटलें आहे.)

---

+ पुढील अक्षर लेखकाचें स्वतःचें.

The letter is writren by Vishwanathbhat to Sakhubai (the widow of Bhaskarbhat), as she was preparing to go to Dwarka, the holy place of pilgrimage. He requested her to cancel the present programme of going to it with Radhabai Gadgil as in Ashwin the planet Shukra was set and it was intended to perform the marriage of Baburao in the month of Magh. He proposed to make the preparation of her pilgrimage after marriage. The letter expresses the keen desire of Vishwanathbhat for his elder brother's wife's presence at the ceremony. Bhiubai was his sister married with Joshi of Burumbad in Konkan. Baburao's 1st martiage took place with Krishnaji Hari Sathe's girl on 3–3–1756 and the 2nd marriage on 26–3–1758.

---

पत्रांक ४३ ] श्री अश्वीन वद्य ११।१६७७
आक्टोबर २१, १७५५

पिंपळपानी दुरेघी
नाना सा। यांचा शिक्का.

राजश्री **मानाजी पवार** गोसावी यासि.

दा। अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रो **बालाजी बाजिराव** प्रधान आसीर्वाद सु॥ सीत खमसैन मया व अलफ. राजश्री **विश्वनाथभट वैद्य** यांचें कर्ज तुम्हांकडे आहे. त्यास बहुत दिवस जालें, अद्याप देत नाहीं म्हणोन विदित जालें. त्यास मारनिलेचें कर्ज तुम्हांकडे असोन देत नाहीं हें काये ! हालीं हें पत्र लिहिलें असे, तर खताप्रों वाजवी हिसेब होईल त्याप्रों व्याजसुधां देणें. + जाणीजे छ १४ मोहंरम बहुत काये लिहिणें.

• श्री ‿
राजा शाहुनर
पति हर्ष निधान
बाळाजी बाजि
राव प्रधान

शिक्यांतील मजकूर

मोर्तब लेखन सीमा

---

+ पुढील मजकूर नानासाहेब यांच्या हातचा.

The Peshwa writes to Manaji Pawar to repay the debt borrowed from Vishwanathbhat, with interest. It is wonder that the payment is delayed even by the Peshwa. But he helps Vaidya to recover money from other persons by sending urgent letters to them for payment. The following persons were also amongst those who delayed payment like Pawar.

**१ राघो आनंदराव वाघ २ निळो विठ्ठल देशपांडे ३ हैबतराव सोमवंशी.**

---

पत्रांक ४४ ] श्री+शंकर अश्वीन वद्य ९।१६७७
आक्टो. २९, १७५५

वेदशास्त्र संपन्न राजश्री **बालकृष्ण दिक्षित पाटणकर** स्वामीचे सेवेसी.

विद्यार्थी **विस्वनाथभट वैद्य** कृतानेक साष्टांग नमस्कार. विनति उपरी येथील कुषल ता। आश्विन वद्य नवमी ९ मुकाम **नागपूर** जाणून स्वकीये लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विषय वेदमूर्ति राजश्री **गदाधरभट कुसरे** यांजचा पत्र पाठविलें तें पावलें. पत्रीं लिहीलें जें, वेदमूर्ति राजश्री **सिवभट साठे** यांजकडील यैवज वरात श्रीमंत राजश्री **रघोजी भोसले**चा यैवज **बंगाल**पैकीं रुपये ७३९०० त्र्याहत्तर हजार नवसे आपले मारफतींनें सावकाराकडे जमे आहेत. त्यास वरात व कबज व पत्र आपलें पाठविलें आहे. हीं पत्रें पाठवणें म्हणजे ज्यास रुा देवाल त्यास देऊं, म्हणून लिहीलेत, त्यावरून कळों आले. त्यास सदरहू यैवज पैकीं **गदाधरभट** यांसी रुा ३५० साडे तीनसे दिल्हे म्हणून लिहीले तें कळलें, बाकी यैवज रुपये ७३५५० त्र्याहात्तर हजार साडे पांचसे राहिले. यापैकीं पेशजी राजश्री **सिवभट खरे** यासी रुा १०००० दाहा हजार देविले आहेत तें देणें बाकी रुा ६३५५० त्रेसष्ट-हजार साडे पांचसे रुा राजश्री **रामाजी नाईक काले** यांस **श्रीवाराणसी**मध्यें रुा देणें आणि सदरहू लिहीलेया प्रों कबजें घेणें. सदरहू यैवज आम्ही येथें घेऊन, हें पत्र स्वामीस लिहीलें आहे. तुम्ही लिहीलेयाप्रों वरात व कबज व तुमचें पत्र येसें तीन कागद व हालीं चालतें पत्र येकून च्यार पत्रें पाठविलीं आहेत. हें घेणें, आणि लिहीलेयाप्रों यैवज देणें. बहूत काये लिहीणें +लोभ असो दिल्हा पाहिजे. हे विनंति. पेसजी तुम्हास लिहीलें आहे, त्यास हालीं **गदाधरभट** आले. त्याजचा स्वामीचें पत्र आलें, त्याप्रों यैवज देविला आहे, त्याप्रां देणें. हे विनंति.

---

\+ पुढील अक्षर लेखकाचें स्वतःचें.

Shiwabhat Sathe brought money from Bengal to be paid to Raghuji out of the Chouthai and kept the amount with Balkrishna Dixit Patankar of Toke. This letter is written to him by Vishwanathbhat to distribute the money amongst the money lenders who paid debt to Raghuji in accordance with Raghuji's letter. The amount was Rs. 73,900.

---

पत्रांक ४५ ] श्री कार्तिक ३० शके १६७७
डिसेंबर ३,१७५५

हिसेब राजश्री **व्यंकटराऊ गंगाधर** सुा सीत खमसैन मया आलफ इा ता कार्तिक अखेर.

रुपये

३७०८।।। · यैन क्रोधन सवछरे आषाढ शु ३
९२६०।। · व्याज दर २ प्रों इा ता कार्तिक अखेर युवानाम सवछरे ता मुदत वर्षे १० माहे ५ बा.

१२९६९। ·

The account of Vyankatrao Gangadhar Hanumante is taken from Vaidya's ledger. The rate of interest is exhorbitant. The interest calculated amounts to more than the principal.

---

पत्रांक ४६ ] श्री पौष शु १६७७
जानेवारी १६५६

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथबावा वैद्य** स्वामीचे सेवेसी.

सेवक **शंकराजी वासुदेव** व **दिनाजी जगनाथ** दि राजश्री **महंत हंसपुरीबावा** कृतानेक सां नमस्कार. विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत जाणे. विशेष बहुत दिवस जाहाले आपणाकडून पत्र येऊन परामृश करीत

नाहीं, हे आपणास विहित नव्हे, हरघडी येनारा समागमें पत्र पाठवून परामृश करीत जाणे. आपलें वर्तमान आपले कृपेंकरून आनंदरूप असो. इकडोन **श्रीमंत सेनासाहेबसुभा** या समागमें **तपोनिधी रा महंतबावा** गेले. त्याजकडील आलीकडे वर्तमान कळत नाहीं. आपणाकडे वर्तमान वरचेवर येत असेल तरी लिहून पाठवणें. आम्हांकडलि दोन च्यार जोड्या गेल्या आहेत. आद्याप आल्या नाहींत. राजश्री **सिवभटबावा साठे** यांजपासीं **नागपुरीं** खुशाल आहों. कळावें. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंती.

Shankaraji Wasudeo and Dinaji Jagannath, the mukhtyars of Hansapuri write to Vishwanathbhat that Hansapuribawa accompanied Raghuji, to the scene of action. Both the writers were living at Nagpur with Shivbhat Sathe, who had latterly come from Bengal.

---

पत्रांक ४७ ] श्री २१ रावल

पौष शु. ११।१६७७

जानेवारी २, १७५६

श्रीमंत राजश्री **विश्वनाथबावा** मोकासी साहेबांचे सेवेसी.

०॥र्दे अर्जदास सेरीकर मोकादम मौजे **कान्हाटी** प्रा **सुपें** सुा सीत खमसैन मया अलफ. बा॥ ता॥ छ २९ माहे रविलवल मौजे मजकूरचें वर्तमान, आपण रोखा सादर केला कीं, साल्मजकूरचे ऐवजीं पाचसे रुपये देणें, त्यासी गावचा हालहवाल कीं, तुम्ही सनद **श्रीमंतांची, सरलष्करास** ताकीद पाठविली कीं, हलीसालचा यैवज न घेणें व पेशजीचा यैवज माघारा देणें. त्यावरून त्यांनीं **मानाजी चव्हाण** यासी उत्तर केलें कीं, आपण आपल्या खावंदास कागद लेहूं. (या)हाचे आज्ञे प्रों वर्तणूक करूं. आम्हांस खावदांची आज्ञा प्रा आहे. यैसें वर्तमान जालें. तरी आम्ही रयत दुईखालीं पडलों. आम्हांस येके सोईनें पैका घ्या. तो देऊं. परंतु तुमची व त्यांची दोन्हीही सनदा आम्हा मान आहे. नवें खत करावयास सामर्थ्य नाहीं. तुम्ही ते खावंदच आहा. परंतु जे गोष्टीनें गांव पेचांतून निघे तें करावें. येके विल्हेस लागल्याखेरीज आम्हांस पैका देवत नाहीं. गुदस्तीची खंडणी रा॥ **सिवरामपंत** सुभेदार यांजकडे जाऊन करणें म्हणोन लिहिलें, तरी ते कांहीं खंडणी करीत नाहींत. साहेबांकडे आपण खंडणीस आलों, ते **सरलष्कर**चा यैवज व चाकारमान्याचा यैवज आम्हांस मजुरा न पडेल म्हणोन खंडणी न जाली. आपण **पुणियास** गेले. आपण खाविंद आहेत. पडिलें पान मजुरा देऊन जीवन माफिक खंडणी केली (तर) या गावांवरी वस्ती राहील. श्रीमंतांची

श्वारीनें गांव खराब जाला, तो सेवेसी लिहितां पुरवत नाहीं. मानाजी चव्हाण यानें नित्य उठोन गांवामधें आटाआट मांडिली आणि आम्ही तो येैसे पेचांत पडिलों आहे. जेव्हां साहेब पेचनिवृत्ति कारितील तेव्हां आप डोईनें चालतें. सेवेसी येऊं तो परियंत मानाजी चव्हाणास तहकूप चिटी पा पाहिजे. जरी अर्ज ध्यानास न ये तरी गांवावरील वस्ती मोडेल. सेवेसी कळावें म्हणोन लिहिलें असे. सेवेसी अर्जदास.

Mukadam of Karhati writes to Vishwanathbhat by an application that though it was settled that the villagers should pay Rs. 500 as this year's revenue, the Peshwa ordered the Sarlaskar not to recover any revenue of this year and if any revenue was already collected, it should be returned Manaji Chavan when demanded the revenue from the villagers, he was told that it was Shahu Chatrapati's order that they need not pay any revenue this year. The people are greatly troubled by the present arrangement of the two owners who issue contrary orders. Hence Shiwaram Tukdeo did not settle the amount of last year's revenue. Manaji Chavan requires prohibition from any revenue collection.

---

पत्रांक ४८ ] श्री पौष शु. ३।१६७७

जानेवारी ४, १७५६

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री विश्वनाथबावा स्वामीचे सेवेसि.

सेवक सिवभट साठे कृतानेक नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ता। पौष शुध त्रितीचा मुकाम नागपूर, यथास्थित असो विशेष. तुम्हांकडून बहुत दिवस पत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तरी येैसें नसावें. सदैव पत्र पाठवीत असिलें पाहिजे. विशेष आम्हीं बंगालियाहून मार्गसीरष वद्य त्रयोदशीस नागपुरास आलों. यानंतरी या सालची मामलत व सादुलाखान यासी समागमें घेऊन आलों. श्रीमंतास हस्ती व जवाहीर व सिरपाव घेऊन आलों. त्यास आपली वरात एक लक्ष तीस हजाराची श्रीमंत कैलासवासी यांहीं देविली होती, त्यांपैकीं पूर्वीं आपणास भरणा पावला आहे. बाकी राहिली ते. कटकाहून खजिना येणार आहे तेही घडवेल. चिंता न करावी. श्रीमंत या प्रांतें आले, तरी आपण हिकडे यावें. त्यास दिसगत लागली तरी आम्ही तिकडे येऊन आपणही श्रीमंतापासीं यावें. भेटीनंतर सविस्तर वर्तमान निवेदन

होईल. वरकड वर्तमान राजश्री राघोपंत यांहीं लिहिलें आहे, त्यावरून कळों येईल. +आपण कितेक गोष्टीचा भरवसा आपला धरिला होता. त्यास आपण यजमानाचा सत्वर वाईस गेलेत, हें अनुचित केलें. येक वरीस त्या उभयेतां समागमेंच असावयाचे होते. श्रीमंत कैलासवासी यांची म(म)ता तुमचे ठाईं बहुत होते. तुमचें चित सा(पे)क्ष असेल तर. बहुत ल्याहावें येसें नाहीं. पत्र पावतां(च) श्रीमंताजवळ यावें. अपणही जलद येतों.

---

+ पुढील सर्व मजकूर शिवभटाच्या हातचा आहे.

Shivabhat Sathe writes to Vishwanathbhat Vaidya from Nagpur, giving an account of his work in Bengal and the loan which he had to pay to the addressee. Shrimant in the letter refers to Janoji Bhosle, who was at this time with the Peshwa's swari in the south. Shivbhat returned from Bengal to Nagpur on 25-12-1755.

---

पत्रांक ४९ ] श्रीवरद पौष शु. १२।१६७७
जानेवारी १३,१७५६

श्रीमंत राजश्री विस्वनाथबावा स्वामीचे सेवेसी.

सेवक रंगो महादेव सां नमस्कार विनंति. येथील क्षेम ता। पौष शुा। १२ मुा। नागपूर. येथा(स्थि)त जाणऊन स्वानंदलेखन लिहावया आज्ञा केली पाहिजे. विशेष पेशजी कालोजी जासुदाचा येथील सर्व सविस्तर वर्तमान व यैवज काये आला, राहिला, पुढें येणें, वसूल घेणें तें वृत साद्यंत तपसिलवार लिहिलें आहे, त्यावरून विदित होईल. सांप्रत आपलीं पत्रें आलीं तींहि पावलीं. तेथेंहि आज्ञा आहे, तेणेंप्रों वर्तणूक करूं. राजश्री सिवभट साठे बंगालीयाहून येथें आले. मार्गसीर्ष वद्य १३ मंगलवारीं भेटी जाल्या. राजश्री रामाजी नाईक काळे यांचे बागांत तिगस्ता राहिले होते, तेथेंच राहिले. सद्रहेलाखानचा आले आहेत. मामलेत सारीच उगवली आहे. हुंड्या आणल्या आहेत, परंतु येजमानाची व खानमजकुराच्या भेटीनंतर येवज पटेल, येसें म्हणतात. आम्हीं आपल्या यैवजाकरितां आठच्यार रोज बहुत येरजारा केल्या. त्यास उत्तर देत कीं, यैवज सारा आणिला आहे, भेटी जाल्यावर ज्यांचा त्यांस देऊं, ये(सें) म्हणतात. आम्ही त्याजवल प्रत्योत्तर, आपण पत्रीं (सां)गितलें जें, जासूद रवाना करितों, त्यास काये तें लिहून द्यावें. त्यावरून पत्र लिहून दिल्हें.

ते पत्र रवाना करीत होते, त्यास जासूद तयार नव्हते. जासूद तयार केले, तों आपलीं पत्रें वराडांत आलीं, तीं राजश्री **नारोपंत नाना** यांणीं आम्हांजवळ पा, तीं पावलीं. राजश्री **सिवभटजीस** पत्र होतें तें त्यांस दिल्हें. त्या पत्रावरून वर्तमान सर्व कललें. **भटजीनें** दुसरें पत्र पत्राचें उत्तर लिहून दिल्हें. यैसीं दोन्हीं पत्रें घेऊन सेवसी पा आहेत. त्यावरून सर्व कलेल. **भटजींनीं** सांगीतलें कीं, दर्शन जाल्यावर सर्व होईल. यैवज मिलेल. चिंता नाहीं. कितेक बोलणें आहे. त्यास **येजमानाचो** जावें, आम्ही येतों, तेथें कितेक बोलणें होईल. तुमच्या कार्यास आंतर करणार नाहीं, यैसें म्हणतात. सेवेसी वर्तमान कलावें. येथ जे कामकाज आहे तें आज्ञेप्रों करितों. वकीलाच्या वसुलास वरचेवर माणसें पा आहे व आसाम्या येथें आहेत. त्यांस तगादे करून वसूल घेतच आहों. वसूल घेऊन यैवज जमे करून वरचेवर लिहून पाठवितों. पेशजी याद लिहून पा आहे. त्यांत लिहीलें होतें. आलीकडे वकिलीपैकीं व कर्जापैकीं यैवज जो येकंदर व गांवगनांचा यैसा वसूल आला आहे, त्यास आपली आज्ञा जे, राजश्री **नाना** लिहीतील तेणेंप्रों करणें. त्याप्रों त्यांणीं दोनच्यार हाजारांच्या चिठ्या केल्या. त्याप्रों यैवज दिल्हा. कललें पा. **वरकड** यैवज हुंड्या कराव्या तर सुधामत नाहीं. आपण चिठी करतील तेणेप्रों यैवज आसेल तो देऊं, **वरकड** वरचेवर वसूल करीतच आहे. **चांदे व वण** येथील ताकिदा पावल्या. त्या वरचेवर त्यांजकडे पा आहेत. वसूल येईल तो घेतों. जमाबंदीचा उजूर करितात. आम्ही निकड क(रीत)च आहों. होईल तें वर्तमान लिहून पाठवितों. कललें (पा)हिजे. राजश्री **शामजी फुलाजी**कडील यैवज कधीं घेणें तो वायेदा कलला पा. **मूलतापी** रा व **जगोजी फुलाजी**कडे माणसें पा. त्यांणीं आपणांस देणें, म्हणोन सांगीतलें नाहीं. वायेदाहि जाला नाहीं. यैसें लिा. रा. **शामजीपंत** देशींच आहेत. राजश्री **सुभेदाराकडील** यैवज कधीं मागणें? वायेदा कलला पा. आम्हीं मागितले, त्यांस देतों म्हणतात. (अपूर्ण)

Rango Mahadeo, Vaidya's clerk in Berar writes from Nagpur, what Shivbhat Sathe did after his return from Bengal, to Vishwanathbhat. He said that Vaidya would receive their amount after Sadruhelakhan's visit to Janojibawa and the money would be distributed to all moneylenders by him. Shiwabhat wrote to Vishwanathbhat that he should be with the Peshwa. The writer informs the addressee what he did about the recovery of money of ambassadorship, and the debt paid to other persons such as :— Shamaji phulaji Jagoji Phulaji and Subhedar Krishnaji Govind. The letter is incomplete.

पत्रांक ५० ] श्री पौष वद्य ३।१६७७

जानेवारी २०,१७५६

श्रीमंत राजश्री **विस्वनाथभटबाबा स्वामींचे सेवेसी.**

षोष्यवर्ग **कृष्णंभट पटवर्धन** सां. नमस्कार विनंति येथील कुशल ता। पौष वद्य ३ पावेतों वर्तमान येथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष **जानोजी घाटगे** यांनीं रा **दिनकरपंता**च्या घरीं जाऊन लग्नाचा मजकूर मनास आणावयासी आपण आज्ञा केली आहे, म्हणोन सांगितलें. त्यावरून त्यांचे घरीं जाऊन वर्तमान मनास आणिलें. त्यास त्यांचे लस्करांतून त्यांचें पत्र आलें कीं, आम्ही माघ वद्य निरोप घेतों. उपरांत जो लग्नाचा निश्चय करणें तो करूं. या प्रकारचें वर्तमान आहे. त्यांकडून लस्करांतून **बालाजीपंत** आले आहेत. तुम्हांकडे येतील, ते सर्व वर्तमान सांगतां विदित होईल. बहुत कार्य लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंती. **जोनाजी** मजकूर यास खर्चास रु. १ येक दिला आहे. कळलें पाहिजे हे विनंति.

हो राजश्री लक्ष्मणपंतस्वामीस नमस्कार विनंति लोभ करीत जावे हे विनंति.

Krishnambhat Patwardhan writes to Vishwanathbhat that Janoji Ghatge had gone to Dinkarpant and spoke about the marriage of probably Baburao. But Dinkarpant had gone to the battlefield and would decide the question after his return in Magh.

---

पत्रांक ५१ ] श्री १९ रविलाखर

पौष वद्य ५।१६७७

जानेवारी २२।१७५६

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथभट वैद्यबावा** स्वामींचे सेवेसी.

पो। **सदाशिव रघुनाथ** सा। नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ता। छ. १९ राखरपर्यंत मुक्काम **सातारा** वर्तमान येथास्थित असे. विशेष तुम्हीं **भिवजी** जासूद याजबार. राजश्री **दिनकरपंत** यांस पत्र लस्करांत लिहिलें होतें, त्यास **भिवजी** आम्हांस वाटेस भेटला. पत्राचा अर्थ पाहातां नवरीचा मात्र होता. त्यास राजश्री **दिनकरपंत** यांणीं आम्हांस सांगितलें जें, **वैद्यबावासीं** आम्हांस शरीरसंबंध कर्तव्य आहे. निरोप **बागलकोट**चे मुकामीं मागत होतों, परंतु देईनात. हालीं **मुरारराव**

यांजकडील जावसाल जाहाला म्हणजे माघ मासीं येऊन लग्नकार्य करावें हा भाव आहे. व त्यांणींही आपल्याजवळ याप्रमाणेंच सांगावयास सांगितलें, यावरून लिहिलें असे. वरकड वर्तमान भेटीनंतर कळेल. **दिनकरपंतांनीं** निश्चयात्मक आपणांस विनंति करावयास सांगितली की, लग्न माघमासीं करणार. शरीरसंबंध बावासींच करूं, ऐसें यांनीं जरूर सांगितलें आहे. **गोपाळपंतही पुण्यास** आले असतील किंवा येतील. हे विज्ञापना.

Sadashiv Raghunath Ghanekar writes to Vishwanath-bhat from Satara, that he read the contents of his letter addressed to Dinkarpant about the marriage of his daughter with Baburao ( his son ). The letter of Vaidya refers to the treaty with Murarrao which delayed his return to Wai and he wished consequtenly that the inteneded marriage should be postponed to Magh month.

---

पत्रांक ५२ ] श्री + रामचंद्र ७ रावर

माघ शुध ८।१६७७

जानेवारी २०,१७५६

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **बाळंभट** व राजश्री **विश्वनाथभट वैद्य** स्वामी गोसावी यांस:—

पो **चिमणाजी नारायण** सचीव नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. **नागोजी सर्जाराव जेधे** देशमुख ता **भोर** यांजकडे तुमचा यैवज आहे. याबद्दल तुम्हीं यास निकड केली आहे. म्हणोन वर्तमान विदित जालें. यैसीं यास यांचे घरीं लग्न समीप उरलें आहे. याबाा हें पत्र तुम्हांस लिहिलें असे. तरी पंधरा दिवस तकूब करणें. तोंपर्यंत वरातदार पाठऊन उपसर्ग येकंदर न करणें ये विशईं अनमान न कीजे. पुढें आमचेही घरीं लग्न आहे. ते होऊन इकडे येणें होय. तोंपावेतों तकूब असो देणें. येक महिना उपद्रव न कीजे. छ ७ रबिलाखर. बहुत काय लिहिणें. + लोभ असो दीजे हे विनंति.

---

+ पुढील अक्षर सचिवांचें.

Chimnaji Narayan Sachiv requests Vaidya brothers to postpone the demand of his debt from Sarjerao Jedhe, as he is engaged in the performance of marriage at his house. and also in his own house. The date is uncertain.

पत्रांक ५३ ] श्री माघ १६७७
फेब्रुवारी १७५६

राजश्रियाविराजित राजश्री **विश्वनाथभटबावा वैद्य** स्वामीचे सेवेसी.

पोष्य **केसो गणेश** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करावया आज्ञा केली पाहिजे. विशेष स्वामींनें, पत्र पाठविलें, पावोन समाधान जाहालें. चिरंजिवाचें लग्न फालगुण शुध द्वितीयेस योजिलें, राजश्री **कृष्णाजी पंत साठे** यांची वधू नेमस्त केली आहे, तर सहपरिवार येऊन मंडप शोभिवंत केला पाहिजे व सौभाग्यवती चिरंजीव **उमाबाईस** घोडें पाठविलें आहे, पाठऊन द्यावी, म्हणून आज्ञा बहुत उत्तम. आज्ञेप्रों **उमाबाईची** खानगी दोन रोजा करितों. आम्हीहि आवश्यमेव लग्नास **पुणियास** येतों. पूर्वींच्या करारास विपर्यास काये म्हणून केला ? हें उत्तम दिसत नाहीं. थोर लोकांचा करार येके जागा येकेवेल जाहला. श्रीमंतांस श्रुत त्यांनीं केलें. सेवेमुलें च्यार दिवस त्यास गुंता पडिला. म्हणून जाहाल्या,वचनास अंतर. येणेंकरून लौकिक बरा सहसा नव्हे. आम्हांसही येविसीं आपण लिहिल्यावरून बहुत श्रम वाटले, जोड पाहातां बहुतच उत्तम. राजश्री **दिनकरपंती** आम्हांस आपणांस सांगावयाविसी सांगितलें, त्याप्रों येतां स्वामीस श्रुत केलेचें बरें. आण उताविली करून वचनास अंतर उत्तम नव्हे. थोरथोराच्या गोष्टी. आम्ही सामान्य ग्रहस्त ; परंतु तुमच्या पदरचें म्हणून जरूर लिहावें लागलें. योजिली गोष्टी सहसा उत्तम नव्हे. उत्तर पाठवावें. लोभ असो दीजे हे विनंति.

Keso Ganesh, after receiving the invitation of the marriage of Baburao with the girl of krishnaji Hari Sathe in Phalgun, chastises Vishwanathbhat for having broken his promise to accept Dinkarpant's girl for Baburao.

---

पत्रांक ५४ ] श्री माघ १६७७
फेब्रुवारी १७५६

राजश्री **विश्वनाथबावा** गोसावी यांसि.

दा। अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो। **बऱ्हानजी मोहिते** दंडवत विनंति उपरी. येथील कुशेल जाणून स्वकीये कुशेल लिहीत गेलें पाहिजे. विशेष तुम्ही. पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कलों आलें. **लग्नास वाईस आलें आहा.** दरबारीं साहित्याविसीं राजश्री **बावांनीं** लिहिलें आहे. त्यास तुमचा आमचा स्नेह

नूतन नाहीं. साहित्याविशीं आपण लेहून पाठवावें. आपले कार्यांत अंतर पडणार नाहीं. बहुत काये लिहिणें. लोभ असो दीजे. हे विनंति.

---

+ पुढील अक्षर मोहित्यांचें स्वतःचें.

This letter of Barhanjibawa Mohite was written to Vishwanathbhat, when he had been at Wai for Baburao's marriage. He was requested by Janoji to assist him in his political questions that will be discussed in the Satara Darbar. There is also a letter written by Sadashiv Dixit Thakur of the same contents and handwriting. It is not printed. The marriage was to take place on 3–3–1755, at Poona Sadashiv Dixit had intimate relations with Bhosle, Mohite and Vaidya families.

---

पत्रांक ५५ ] श्री माघ शके १६७७
फेब्रुवारी सन १७५६

यादी वस्ता बाबूराव यांचे बायकोस करविल्या गुा लक्ष्मण सोनार सुा सीत खमसैन मया आलफ माघ.

३० मोहरा ३० यो वजन क्षा भार सुरती क्षा भार २८ मासे ५॥.

| उतार | क्षा भार | मासे |
|---|---|---|
| मंगळसूत्र व नथ व १ पंखे | ० | ३ |
| बाळ्या जोड २ व कुडुक | २ | ३। |
| पंखे जोड १ | ० | ६॥। |
| राखडी १ | १ | ६॥। |
| गोंडे जोड १ | ३ | २। |
| कारलें | २ | ३८१ |
| हातसर मणी ८ | २ | १॥ |
| दोर | १ | ५।१ |

पांटल्या                                    ६        ४॥।·

२५        ३६॥।

३ ⌣दरभारी ११॥ मासे प्रा भार सुरती ८॥ भार ३ बाकी मासे २। वजा येकंदर वजनास कमी पाऊण सोमासा किरकोळीस

२८

बाकी येणें मासे २॥·

१८ सरी १ मोहरा १८ उतार मों भार बाकी येणें मासे
   १७   ६।·   ४॥१

२५ पटा १ मोहरा २५ उतार भार मोहरा २४, मासे १०॥· बाकी येणें गुंजा ६३

२४ गोट ४ मोहरा २४ उतार मों भार २३ मासे १०।१ बाकी येणें मासा ·॥·

१८ मोहरा १८ वजन ८॥ भार सुरती
⌣मो   ११ रु १० भार   ५ मासे
   ७   ६   ७।१
   १८   १६   १२।१

⌣उतार

| | ८॥ भार | मासे |
|---|---|---|
| बाजूबंद मणी बोराचे | २ | २।· |
| जवे हातचे | ८ | |
| | १६ | १॥१ |

बाकी मासे १०॥।

५० बाकी जोड २ मोहरा उतार मो भार

| | | मोभार | मासे |
|---|---|---|---|
| | बाकी नागमोडी | २४ | १०॥ |

बाकी येणें

२ फुतलीस फासे मोहरा २

फुतली वजन

४५ ८१॥।·॥।·

बाकी ०

२७ मोहरा माळ

२५ येन मो

२ फासे.

---

२७

उतार मो भार

---

१९४

१ [2]चाद [3]सिसफुलास मोत्यास सरी

१ पदकास साखळीस टिकेस

---

१९६

१ किरकोळी बाळयास मो सूत.

---

१९७

१ कानांतील दागिना. २ चंद्रकोर. ३ डोक्यांतील फूल.

This is a list of ornaments that were prepared for Baburao's marriage that took place in Phalgun with Sathe's daughter on 3-3-1756. Mohar is supposed to be weighed $10\frac{3}{4}$ Masas and one Gunj.

पत्रांक ५६ ] श्री माघ शुध ६।१६७७
६।२।१७५६

तीर्थस्वरूप राजश्री **मोरजोशीकाका** वडिलांचे शेवेशी.

अपत्ये **बापूचे** कृतानेक नमस्कार विनंती. येथील क्षेम ता। माघ वद्य ६ पावेतों मु॥ **वाई** समस्त सुखरूप असो विशेष. तुमची मूल नवरी, म्हणून राजश्री **विश्वनाथभट वैद्य** यांनीं येथें आइकिलें. त्यास ते येथें काल पंचमीस आमचे घरीं येऊन आम्हांस पुशिलें कीं, मूल उत्तम आहे कीं काय. त्यास आम्ही सांगितलें कीं, यथास्तित उत्तम आहे. त्यानंतर त्यांनीं सांगितलें मला कीं, तुम्ही कागद त्यांस लिहून द्या, आम्ही माणूस पाठवितों. त्यावरून मीं पत्र लिहिलें. हें ईश्वरसूत्र असोन घडलें तर मूल उत्तम. त्यांचा कुळशील उत्तम. कांहीं संवशय नाहीं. तुमचेंही यांप्रोंच त्यांस सांगितलें. त्यांनीं सर्व मान्य केलें. परंतु त्यांचा अभिप्राय आहे कीं, कृष्णातीरीं येथें लग्न करावें. तुम्हीही येथेंच यावें असें आहे. तर तुमचा विचारें करून मनाचा उल्हासें येथें येऊन करावें, असें असेल तर पत्राचें उत्तर तशासारिखेंच मला पत्र लिहावें. त्याप्रों त्यांस मी सांगेन. मातुश्री **बाईचेही** मनास आलें. तुमचेहीच मनांत मात्र यावें. विशेष. येथें यावयाचा विचार तर, त्यांचा आग्रह फार आहे कीं, ते आपले भिक्षुक आहेत. हजार पांचश्यांत येथेंच लग्न करावें, त्याप्रमाणेंच त्याचें मानस आहे. विशेष काय लिहिणें. हे विनंती.

सौभाग्यादि संपन्न वज्रचुडेमंडित **आकाबाईस** साष्टांग नमस्कार. पत्राचा अभिप्राय मनांत आणून मला उत्तर पाठवावें. **मातुश्रीचे** व **येसूबाईचे** व माझे चित्तास आलें. तुमचे उभयतांचे चित्तास येऊन ईश्वरसूत्र घडलें तर बहुत उत्तम. हे विनंति.

चिरंजीव **बाळास** व **मुलीस** आशिर्वाद.

---

सबंद पत्र बालबोधींत आहे. नकल करितांना मुळांतील लेखन कायम ठेविलें आहे.

Bapu writes this letter from Wai to Mor Joshi who had a daughter to be married. Vishwanathbhat's son, Baburao, was also to be married and hence Vishwanathbhat asked Bapu his opinion about the selection of the girl of Mor Joshi who was very favourable for the proposal. Vishwanathbhat wished to perform the marriage at Wai, it being a holy place on the bank of the river Krishna, and the ceremony will not cost at Wai more than Rs. 1000 at the most. Bapu seems to be by surname

Joshi and closely related with Mor Joshi who was living out of Wai. Bapu's mother approved of this proposal. The letter is selected to find out the relation of Bapu, with Mor Joshi and the women mentioned in the letter.

---

पत्रांक ५७ ] श्री माघ वद्य ९।१६७७
२४।२।१७५६

चैत्र शु. ७

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विस्वनाथबावा वैद्य** स्वामीचे शेवेसी.

पोष्य **सिवभट साठे** कृतानेक नमस्कार. विनंति उपरी येथील कुशल तागाईत माघ वद्य ९ नवमी मुक्काम **नागपूर** जाणून स्वकीये लेखन केलें पाहिजे विशेष. स्वामीनें कृपायुक्त पत्र पाठाविलें. पावोन सविस्तर अर्थावलोकनें परम समाधान जालें. थैसेंच सदैव पत्रद्वारें सांभाल केला पाहिजे. विशेष. पत्रीं लिहिलें कीं, सविस्तर वर्तमान लिहीणें, थैसियास आमचे [1]**असमुरबी** आगण असेत. तुमची आज्ञा घेऊन स्वार जालों. ते मजल दर मजल **कटकास** पावलों. मागें **श्रीमंत** कैलासवासी जालें, हें वर्तमान प्रांतींच्या लोकांनीं श्रवण केल्यानंतर, तमाम राजेरजवाडे [2]**खंडाईत** [3] बेबदल जाले. तेव्हां सिबंदी ठेऊन प्रथम **अबागडचा** जमीदार यास तंबी पोहाचाऊन ठाणें घेतलें व अणखी दोन-च्यार जागे सोडाविले. फिरोन **कटकास** आलों तों **फत्तेखान** किले **बाराभाटींत** होते. त्यांनीं बेबदल गोष्ट सांगितली. तेव्हां किलेयास मोर्चे लाऊन, सतांविसा दिवसा किला घेतला. चालीस पनास माणूस कामास आलें. पुढें **मकसुदाबादेस** जावें तों राजश्री **दुलभराम** याचे विद्यमानें **सिदी मुरज्जान** व **कर्डाराम बादैलिये** समागमें स्वार व प्यादे घेऊन संस्थान **ढेकानाल बादले** वगैरे दोन च्यार जागे बेबदल केले. पूर्वी आम्हींही **नबाबास** अर्जी लिहीली होती त्याचें उतर उतमच आले होतें आणि या कामाचा तों फितुराचा मजकूर दिसोन आला. तेव्हां फिरोन अर्जी या वर्तमानाची अभिप्रायेयुक्त लिहीली. हें वर्तमान **दुलभरामासही** कललें. तोंपर्यंत आम्ही **मुरज्यान** वगैरेयांची बातमी राखोन त्यांस सिरपाव व [4]इस्तकजालीचे परवाने जात होते ते धरिले व बातमीच्या जोरानें पंचवीस तीस कोस धाऊन गेलों, **मुज्यान** मजकुरासी लडाई जाली. अजम **मिर्जासाले** यांचाहि फितूर होता. मारानिले समागमें लडाईस न आले; परंतु श्रीमंत

कैलासवासी यांचे पुण्यानें फत्ते करून लुटून घेतलें. उभयतास मृत्युसदनास पाठविलें. संवस्थान ढेकानाळ येथील ठाणें काबीज केलें. तेथें स्वार व प्यादे व येक भला माणूस ठेऊ[न].तेथील बंदोबस्त केला. किले बाराभाटीचा बंदोबस्त करून स्वार होऊन मकसुदाबादेस चाललों. हें वर्तमान दुलभराम यांणीं श्रवण करून तो रा खंडो केशव यांचे पुत्र अनंदराव, यांस पांच मजली सामोरा पाठविलें. बहुत सन्मान करून [५]मिनंत केली. तेव्हां मुर्ज्यान यांचा मजकुराची [६]तकसीर माफ केली. अनंतर मकसुदाबादेस गेलों. तेथें गेलियानंतर अजम नवाबांनीं कितेक गोष्टी गरमनरम सांगीतल्या. परंतु श्रीमंत कैलासवासी यांच्या पुण्यानें सर्व उतमच प्रकार जाला. [७]सुदामतप्रमाणें करारमदार बंदोबस्त करून पेसा घेतला. तेथेंहि मिर्जासाले आले होते, यांजवर नबाबाची नामेहेरबानगी जाली. निदान यांस मारावें येसें जालें. तेव्हां कितेक प्रकारें वाचऊन काढलें. त्यास वोडसा प्रांतें रवाना केलें. नबाबांनीं कितेक प्रकारें गौरव केला. श्रीमंत चौघाजणांस वस्त्रें व सिरपाव व जवाहीर व हस्ती दिले, व आम्हांसहि सिरपाव [८]खिलत सिरपेच व हती व चौकडा वगैरे देऊन बिदा केलें. समागमें अजम सदरुल्लाखान व रा धरणीधर महता येसें दिले असेत. जे कितेक मजकूर श्रीमंतासी करारमदार करून घेऊन येणें, त्यांसहवर्तमान मुा मजकुरास आलों. तो श्रीमंत दूर लांबले. यास्तव येथें राहिलों. तों आपलें पत्र आलें. परम समाधान जालें. शायेयाचा मजकूर लिहीला. तर मकसुदाबादेहून मिर्जासाले यांस वोडशांत पाठविलें होतें, त्यांस मुरबी नवाब शामतजंग हे मृत्यु पावले. त्याजवरून मिर्जा मजकूर हरकोठें निघोन जावें, या विचारें पिपलीच्या रोखें सातरा आठरा कोस मजला गेले. तेव्हां रा रखमाजी जाचक वगैरे यांस आम्ही फिरते स्वारीचे कामावर ठेविलें होतें. यांनीं जाऊन त्यांस घेऊन आले. तेहि मुकाम मजकुरास येणार असेत. आलियानंतर सालगु(द)स्ताची बाकी त्याजकडे असे, व साल मजकूरचा पैसा यांची निर्गत करून घ्यावी लागते. साल मजकूरचे मकसुदाबादेच्या मामलतीचा विचार तर बशर्त जाबसाल जाली आहे. यास्तव उभयतां भले माणूस समागमें आले असेत. यांचा व श्रीमंताचा जाबसाल जालियावर येवज हातास येईल. [९]अनंतर स्वामींचें कार्य आधीं केलें जाईल. अनमान होणार नाहीं. पुढें येकतियार श्रीमंतांचा असे, वरातेचा यैवजपैकीं रो सतर हजार तुम्हांस पावले. याचा हिसेब भेटीनंतर कलेल. भेटीची अपेक्षा बहुत असे. भेटी होईल तो सुदीन +रा नारोपंतांचे पत्रीं पुढील विचार लिहीलात. यजमानांची भेटी घेऊन निरोप घ्या. हे कायमचें असे. तीर्थयात्रा करावी. त्या आपला हेत असे कीं, कैलासवासी यांचे गया करावी आणि परिभ्रमण करावें कीं, आम्हां लोकाचें पालन ग्रहण करावया योग्य तेच होते. आतां खुशमती रोजगार. तरी मागेंहि केला नाहीं. आणि पुढेंहि करणार नाहीं. परशराम क्षेत्रीं असो. त्या कोठवर ल्याहावें. जे दिवसीं भेटीचा लाभ होईल तो दिवस लक्षां दिवसांचा. तरी आपण यावें. यजमान गेलिया-

सारकी निमित्यवादेस राहिलेत. यजमानासमागमें न गेलेत. हा हायस न कलो आला. तरी तपसिलवारें ल्याहावें. रुा लिहीलेंत कीं, पंचवीस हजार वजा करून द्यावे. तरी आपण दिले ते वजा करून द्यावयास दिले नवते बरें, आतां आपण लिहीतात कीं, वजा करणें तरी आपले आज्ञेसिवाय पूर्वींहि नवतो आणि आतांही नाहीं. बहुत काये लिहीणें हे विनति. या(ल) तेवां नारोपंतास समागमें घेऊ(न) येणें. हे विनंति.

---

+ पुढील अक्षर लेखकाच्या हातचें.

१ नातेवाईक शहाणें. २ शस्त्रधारी, खड्गधारी. ३ बंडखोर. ४ जोर, धीर. ५ विनंति. ६ अपराध, गुन्हा, चूक, अन्याय. ७ पूर्वी. ८ सन्मानाचा पोषाख. ९ पाठापोठ.

Shivbhat Sathe writes from Nagpur to Vishwanathbhat, the account of his doings and the Maratha activities in Bengal, preceding the battle of Plassey and after the death of Raghuji Bhosle. He says that Vishwanathbhat was his prudent relative. He went to Kattak with his advice. He exerted his very best there and also at Murshibabad to maintain the Maratha prestige. The princes of the states when heard the news of Raghuji's death became all rowdy. The landlords of Abagad and two more forts were taken to task and the forts were captured by the soldiers kept there for protection. Fattekhan was at Barabhati fort and was found to be at arms. Shivbhat after fighting with him for 27 days captured the fort. He then went to Murshidsbad. None of the Bhosales were with him. He formed friendship with the Nabab and recovered the Chouthai of 2 years as settled with him. Mirjasale, the Diwan of the Nawab was not on good terms with him. The letter is very important and requires careful reading, it being very lengthy and containing many important personages and places in Bengal. He was pressed by Vishwanathbhat to pay his money Rs. 25,000. But this action, of Vishwanathbhat was not liked by him, and hence condemned.

पत्रांक ५८ ]　　　　श्री　　　　२५ जमादिलावल
माघ व. ११।१६७७
२६,२,१७५६

श्रीमंत धरममूर्ती माहामेरू अखंडयैश्वर्य परिपूर्ण निराश्रियांसी जीवाआश्रय राजमानेयाविराजित राजश्री विस्वेनाथबावा वईद स्वामी राजाचे सो.

सो आज्ञांकीकत रघूनाथ टेंभेकर करद्वायें जोड्न चेरनावरी मस्तक ठेऊन सिर सां. नमस्कार. विनंती उपर येथील क्षेम ता छ. २५ माहे जमादिलावल वडिलींचे आसीरवादें करून मुकाम मजकुरीं कुसेल जानऊन वडिलीं आपलें कुसेल लिहावया लेखकांस आज्ञा केली पाहिजे. विसेसु–तु(म्ही) गेलिया तागाइत कांहीं आसीरवाद पत्र येऊन पोश्याचा सांभाळ न केला. तर आतां आलिया मनुशा समागमें आसीरवादपत्रें करून (मज)कूर पाठवावा. वांछितास सदइव संतोषवीत आसेलें पाहिजे. आनि आपन येथून स्वार होता वेळेस सांगून गेले जें, वकिली पेठेची, आपना जवळ जमा करनें तर आपन कलसी खुदा केला, तो रा भिवाजीपंत फौ यांचे मारफतीनें येका भले मानसाचे दुकानीं जमा केला. आनि रा रंगोपंत यांहीं आपना जवळून शा पाऊनसे तुम्ही गेलियावर घेतले. आपन तुमचे पत्राचा उजूर केला; परंतु आपनास कलावे म्हनउन लिहिलें. आपन चाकर आसूं. आज्ञे धारक आसूं. आनी आपन पगडी घेत होतों; परंतु न घेतली जे, रंगोपंत शा मागूं लागले आनि आज्ञा येईल तर रोजची [1]आमद याहाचे स्वाधीन करून. परंतु आपन जयेसी आज्ञापत्र लिहून पाठवितील तयेसी पतनू करून आपन लेकर आसूं. वडीलही सांभाळ करनें. आनी आपन या प्रांतास येनार आस्तील तर कांहीं [2]करोट घेण्याची अइया होईल तर कांहीं दाना घेऊन. नाहीं तर शा अनामत नाहेत. रंगोपंतास देण्याची आइया होईल तर देऊं. नाहींतर कळसीखुदा शा जमा करून ठेवितों. बहुत काय लिहिने. पोश्यावर कुरपा लोभ आसूं देनें, हे विनंती.

---

१ वसूल, उत्पन्न २ धान्य

Raghunath Tembekar writes to Vishwanathbhat that he will be following his order to collect money of Nagpur peth for ambassadorship. Rango Mahadeo will be paid money if his permission to do so is received. The writer seems to be a perfect Nagpuri man. His language is peculiar and seems to be a Brahmin of that district.

पत्रांक ५९ ] श्री फाल्गुन शुद्ध १।१६७७
मार्च २,१७५६

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथभट**जी स्वामीचे सेवेसी.

सेवक **नरहर बल्लाल** सां नमस्कार. विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन केलें पाहिजे. विशेष पत्र पाठविलें पावोन सविस्तर वर्तमान कळों आलें. पत्रीं लिा कीं, वर्तमान लिहीत नाहीं तर जें माणूस जातें त्याजचा पत्र पाठवीत असे. तो पावत नसेल. प्रस्तुत या प्रांतींचें वर्तमान येथास्तित असे. **वराड** प्रांतीं **श्रीमंत** रा **बिंबाजीबावा** यांणीं धूम बहुत मांडिली आहे. **तांब्र वाजरासंगमपरियेंत** आला होता. तेथून माघारा गेला. **कलबुरगे** याजकडे गेला. रा **रायाजी भोसले** यांणीं धामधूम बहुतसी केली होती त्याचेंहि पारपत्य स्वामीचे कृपें करून केलें. प्रस्तुत घरांतील कजिया आहे. **बंगालियाचें** वर्तमान तरी वाा रा **सिवभट साठे** यांणीं सविस्तर लिा आहे. त्यांजवरून कलेल, वकिली व कर्जे येणें व कितीक कामकाज या प्रांतीं आपलें आहे. त्याजविसीं चिंता न करणें. बहुतेक उरकले आहेत. सर्व प्रकारें भरवसा स्वामींचा आहे. दुसरा अर्थ जाणत नाहीं. कृपा अखंड करीत आसावें. यैवजाचा तपसील रा **रंगोपर्तीं** लिा आहे. त्याजवरून कलेल. बहुत काये लिहीणें. कृपा लोभ आसो दीजे हे विनंति.

This letter refers to Shiwabhat Sathe's detailed letter dated 24-2-55 of his doings in Bengal. It refers to the disturbance created by Bimbaji and Rayaji in Berar. The writer has checked them and pacified the situation. He was doing properly the work of collecting remuneration for ambassadorship and also recovering the debt from persons who borrowed money from the addressee. The writer is Vithal Ballal Paranjape's sister's son i. e. भाचा.

---

पत्रांक ६० ] श्रीवरद फाल्गुन शुद्ध १।१६७७
मार्च २,१७५६

श्रीमंत राजश्री **विश्वनाथ बावा** स्वामीचे सेवेसी

सेवक **रंगो महादेव** सां नमस्कार विनंति. येथील कुशल ताा फाल्गून शुा १

मुा नागपुरीं स्वामीचे कृपें करून सुखरूप असे विशेष. कृपा करून जिवाजी जासूद व पिलाजी सिंदे याजबराबर पत्र पाठविलें तें पावोन बहुत समाधान जालें. लिहीलें वर्तमान सविस्तर कललें. तेथें आज्ञा जे, पेशजी कालोजी जासुदासमागमें पत्रें व ताकिदी पाठविल्या आहेत तेणेप्रों कामकाज करणें व हल्लीं पत्रें पा आहेत. याप्रों आणखी राजश्री सुभेदारांस व राजश्री सिवभट साठे यांस व राजश्री बुरानशा राजे व राजश्री नेगीस वगैरे पत्रें पा, त्यास पोहचाऊन उतरें घेऊन पाठवणें, म्हणोन लिाप्रों यांचे जाब घेऊन दिल्हे. त्यावरून सर्व वर्तमान कलेल, राजश्री बालंभटजींच्या वराता पाठविल्या, त्या देऊन काये तें लिा पाठवणें, म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रों ताकिदी राजश्री रामचंद्रपंत सरदेशमूख यांजवल दिल्ह्या, त्यांणीं घेतल्या. ब्राह्मणाच्या कार्यास आंतर न करून. दो चौ महिन्यानें शा देऊं, ऐसें उतर दिल्हें, सध्यां कांहीं नाहीं. दस्तऐवज घ्यावा तरी राजश्री हरीपंत दादा येथें नाहीं. शहरास गेले ते आठां पनरां जोरां येतील, तेव्हां जो करारीचा जाब देणें, तो देतील, परंतु हे उतर देत नव्हेते. वराता मागें घेणें तरी उतम नव्हे. याकरितां लाविल्या. शहरीहून मारनुले आले म्हणजे यांचे [1]रोहपोह करून घेऊन सेवेसी विनंति लिहून पाठवीन. सविस्तर जिवाजी सांगतां कलेल. राजश्री रामचद्रपंतीं जाब लिा आहेत, त्यावरूनहि कलेल. ऐवजाचेविसीं आपण आज्ञा केली कीं, जो ऐवज जमा होईल तो राजश्री नारोपंत व राजश्री गोडाजीपंत दिाा जोग हे चिठ्या करून ऐवज उतरोन घेतील. तरी देणें. त्यांस पांच सात हजार दिल्हे. आणखी वरचेवर जो ऐवज आहे त्याप्राा लिा पाठविला आहे. त्याप्राा चिठीया कारितील. तेणेप्राा देऊं. येथें गुंतला तो सुरलीत आहे. तरी ठेऊं, नाहींतरी वसूल घेऊं. जमा करून, आली चिठीस शाये घेऊन देऊं. राजश्री राजे बुरानशाहा यांजकडे ऐवज येणें त्याचा करार वायेदे केले होते जे, दरमाहा पांच हजार. तेणेंप्राा साडेसतरा हजार वसूल जाले. बाकी साडेपांच राहिले तेहि घेणें त्यास मागणें लाविलें कीं, हिसेब करून ऐवज बाकी व व्याज देणें. त्यास रोखे नाहीं म्हणोन हिसेब करीत नाहीं. हिसेब करणें तेव्हां दुसरा रोखा करणें किंवा सह्या देणें तरी रोखे पाहिजे. तरी बाकीचा फाग आखेर झाडा करून देतील. घेऊं. व्याज वसूल घेणें, त्यास खतें आली पा. तीं पाठवावीं. तैसेंच रा गोविंद निंबदेव यांचाहि रोखा पा पाहिजे. [2]वर्षिकाविसीं विनंति केली जे, येंदा लग्नहि आहे आणि विनंति करतो. ऐवज जमा होईल तो या प्रसंगीं द्यावे, हें उतम आहे. त्यास उतर केलें कीं, आमचा प्रसंग कर्जावर दिवसेंदिवस. या प्रकारीं [3]वोढा तुमचा घेतला. ऐवज देऊन खरें आसलों तरी बरें. याहीमध्यें देतों म्हणोन बोलावें तरी ऐवज पेस्तरचा [4]तवजीचा. याकरितां लटिकें बोलणें कायास ! आम्ही सर्व प्रकारें त्यांचे पदरचे. आम्हांस भरोसा दुसरा नाहीं. जे प्रसंगीं आज्ञा करितील ते प्रसंगीं देऊं. ऐवजीं गोष्ट झाली

श्री

२ पुरवणी श्रीमंतांचे सेवेसी.

म्हणजे देणें तें देऊं. राहिले तरी दुसरा आर्थ नाहीं. येसें कितेक प्रकारें सामोपचारें बोलोन जाब दिल्हे आणि निरोप दिल्हा. तेव्हा कैसें मागावे ? या उपरी रा विश्वनाथ वेंकटेश यांस जें लिा तें लिहीलें पा, म्हणजे यांची वाट करून घेऊं. रा भवानीपंत यांसही लिहीलें पा. राजयाच्या चित्तीं कांहींसी गोष्ट बिंबली होती. त्यावर कारभारी यांणीं लांबिवली. तरी कारभारी प्रस्तुद दोघे, यांस लिा जे, वार्षिक देवणें. म्हणजे रोखा वरात "बहरक करून घेऊं. वरकड रा सुबेदाराजवल वरचेवर जें काम लागतें तें सांगोन माणसें पा आहे. वकिलीचे वसुलाकरितां दोन दोन वेला तमाम ताकिदा केल्या. कांहीं यैवज सुरलीत जागाचा आला. वरकड दोन तीन भारी तालुके वगैरे जागा जाब आले, जमाबंदीवर येऊन निर्गत करितों. त्यांस रा सुभेदार म्हणत आहेत जे, हे जमाबंदीवर तमाम भाग वारून देवितों. प्रसंगास आहों. वरचेवर विनंति करून जैसें होईल तैसें करून घेऊं. वरकड कर्जाचे जे तगादा करणें तोहि करितों. रामटेकची वगैरे वरचेवर माणसें पाठवीत आसे, वसूल येत आहे. राहिलाहि घेतों. चंद्रपुरीं संकराजीपंत पा आहे. त्यास गोवरीचे दीडसे रा आले ते त्यांणीं खर्चले, म्हणोन आईकलें. उरलेहि काये, ते ते आले म्हणजे कळेल. गेले ते आद्याप येत नाहीं. माणसें दुसरीं पा आहेत. ती आलियावर सेवेसीं लिहितों. राजश्री शामजी फुलाजी याजकडील तालुकियांस माणसें पा. त्यास ते नाहींत म्हणोन उजूर करितात. जमाबंदीस तरी त्यांचे तालुकीयाची जमाबंदी होत नाहीं. मागती ताकिदी व सरकारचीं माणसें पा आहेत. याचें उत्तर आलें म्हणजे लिा पाठवितों. राजश्री आनंदराव वाघ याजकडील व्याजीबाबत रा कोनेरपंत यांचे वायदियाचे करारप्रा वसूल घेणें. त्याची हकीकत पेशजी लिाचु होती. त्यावर त्यांची समजावीस करून पहिल्या वायेद्याची निर्गत त्याणें केली. येणेंप्रा आपण जातेसमई आडीच हजार घेऊन आनंदराव यास देविले. ते वजा घेतले. बाकी दीड हजार राहिले त्याची निशा करून घेऊन मागती आर्जीस गेला. मागें कोडालीहून आनंदराव याचा कबिला व चिरंजीव मानसिंग व कारभारी आले. देवडीस वाडियांत बाईजवल हकीगत निवेदन केली जे, कोनेरानें आम्हांसी बहुत बेअदबी केली. त्यास दूर करून दुसरा ठेवणार. त्यास सावकार रुपयां करिता आडवितात. त्यास ताकीद जे, याजपासून विचारें करून घेणें, कोनेराचे वायेदे देणें. यैसी ताकीद करविली. त्यावर आम्हांस म्हणत होती कीं, तुमची निशा करितों. मानसिंग वाघ यांचे नांवें रोखे वायदे करून घेणें आणि कोनेरपंताचें देणें. त्यावर आम्ही तरी याप्रों कबूल न केले. सावकारी निशा देणें व वायेदियानें देणें; परंतु त्याची निशा धणीयाचे हातची, ती टाकून, आम्हांस तुमची घेवत नाहीं. सावकारी देणें त्यावर दुसरे साडेच्यार हजार येणें. त्याची निशा दो हजारांची रा

**गणेशभट खरे** यांची महिन्याचे वायेदियानें घेतली. बाकी आडीच, त्याची रा **यशवंतराव वाघ** यांची घेतली. यास वा(य)दा दोन महिने. यैसी निर्गत करून घेऊन त्यांस जाब दिले. **कोनेरपंता**चा वायेदा दिल्हा नाहीं. निशेचे रा येतील. हिसेब होईल. मग देऊं, म्हणोन ठेविले. त्यास **गणेशभट**बा रा माघ वद्य येकादसीचे दिवसीं वायेदा जाला, घेतले. जमा केले. **यशवंतराव** बाबत येणें ते वायेदियास फाग अखेर येतील. चौसे रा चा कारभारी याचा रोखा घेतला आहे. तेही आठां-पंधरां रोजीं घेऊं. हाजार व्याज म्हणोन होतें, त्यापैकीं **कारभारी** यांचा रोखा चौशाचा जाहा(ला) वरकड साहासे, पहिले अडीच हजार **कोनेरपंतानें** दिल्हे, ते अगोदर देणें लागलें. त्याचें व्याज मनोती म्हणोन वजा केलें. याकरितांच वायेदा दिल्हा नाहीं. येणें प्रो वर्तमान. पुढें **आनंदराव** यांजकडे दुसरे पांच हजार येणें त्याचें काये करणें? ते आज्ञा येईल तैसी वर्तणूक करूं. कितेकाविसीं आपण रा **सुभेदारास** लिहावें म्हणजे वरचेवर विनंति करून यैवज वसुलांत आणूं. रा **गोपाळ रघुनाथ** यांसही पत्र पाठविलें. राजश्री **सुभेदारा**कडील यैवज घेणें. याविसीं पेशजी पत्र होतें, परंतु अद्याप घेतलें नाहीं. त्यांणीं दिल्हें नाहीं. त्याची वाट कैसी हे आज्ञा लिा पा. **वराडांत** देवितों, म्हणत होते, परंतु आद्याप पटले नाहींत.

---

१ व्यवहार. २ दरसालचा वसूल. ३ आग्रह, ताण, वजन. ४ सुगी, हंगाम, हसा. ५ सरकारांत घ्यावयाचा वसूल.

श्री

१ श्रीमंतांचे सेवेसी.

रा. **सखो गणेश** मृत्य पावले. त्यांजकडील गुंता राहिला. त्यास **आको गणेश** यास पत्रें व माणसें पा; परंतु **वकिलीचें प्रत्योत्तर लिा कीं**, जमा (बं) दीस येतों, तेव्हां निर्गम करून. परंतु कर्जाचें कांहीं उत्तर नाहीं. त्यास येथें आल्यावर तें मनास आणून तगादा करितों. राजश्री **सिवभटजीस** म्हणावें, त्यांस सध्या देणें तर नाहीं. सतर हजार दिल्हे म्हणतात. उरले तेही भेटीनंतर देऊं. कित्येक प्रकारें आत्मता बोलणें आहे. तेंहीं सविस्तरें पत्रें लिा आहेत. त्यावरून कलेल. येथें **देवडीस** मातुश्री **बाईच्या** नांवें आपण पत्र येक लिहिलें पा. सर्वांविसीं आज्ञा कामाकाजाची. पुसींस घडीघडी दादी, फिरादी हुकू (म) बंदोबस्त आहे. रा **सुभेदार** म्हणतील आणि कोणीं वाडियांत निवेदिलें म्हणजे तटलें. येसियाकरितां लिा आहे. वरकड आज्ञा वरचेवर आहेत. त्याप्रो करीतच आसो. सविस्तरें जबानी वर्तमान जासूद सांगतां कलेल. बहुत काय लिहावें कृपा लोभ आसों द्यावा. हे विज्ञापना.

हो राजश्री **रामचंद्रपंतदादा** स्वामीचे सेवेसीं. सां नमस्कार. लिा परिसोन कृपेची वृधी आसो द्यावी. परामर्षास आविस्मर नसावें. आमचे घराकडील वर्तमान

मनास आणून लिहिलें पा. पत्राचें सविस्तर मनास आणून प्रत्योत्तरें सर्व येत येसीं कीजे. हे विनंति.

Rango Mahadeo was one of the experienced clerks of Vaidya, working in the C. P. He was in the habit of writing a detailed account of the work done there, of the collection of Revenue and debt. The money dealings were with the following persons:—Krishnaji Govind Gore (Subhedar), Shivbhat Sathe, Shankaraji Keso, Buranshaha Raje, Negi, Ramchandra Koner, Govind Nimdeo, Vishwanath Vyankatesh, Shamaji Phulaji, Anandrao Wagh, Manasing Wagh, Ganeshbhat Khare, Yeshwantrao Wagh, Gopal Raghunath, Sakho Ganesh, Ako Ganesh. There is a mention of Baburao's marriage. There is very little of historical matter. The letter is important, because it gives the idea of the extensive control of Vishwanathbhat over the district and the important persons with whom he had money transactions.

---

पत्रांक ६१ ] श्री + रामचंद्र फाल्गुन वद्य ।१६७७
मार्च १७५६

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथभट वैद्य** स्वामी गो.

पो **चिमणाजी नारायेण** सचीव नमस्कार. विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत जाणें. विशेष. श्री नवमीचा उछाह आहे, तरी उछाहाकरितां येणें. + राजश्री **भिकंभट** व **बाबुराव** यांस घेऊन येणें. बहुत काये लिहिणें लोभ असो दीजे हे विनंति.

---

+ पुढील मजकूर सचिवांच्या हातचा असे.

This is an invitation to Vishwanathbhat for attending Ramnavami festival of Bhor, made by Chimanajipant Sachiv. The writer makes a special mention of Bhikambhat and Baburao. This shows to his special intimacy with the Vaidya family.

## बारामतीकर व सातारकर जोशासंबंधीं पत्रें

**टीप :**—शके १६७२ मधील पत्रांक ५३,५४, ५५ हीं पत्रें **सातारचे कृष्णाजी नाना जोशी** यांचे हयात वंशज रा० **बाबुराव जोशी** यांच्या जुन्या दफतरांतून व पत्रांक ५२ हें पत्र **पेशवे** दफतरांतील श्री. रा. **आबूराव जोशी बावडेकर** यांजकडून मिळालें. हीं सर्व पत्रें वाचून त्यांतील मुख्य गोष्टी ठरविण्यास वेळ लागल्यामुळें तीं ज्या त्या सालांत छापतां आलीं नाहींत. जेवढी माहिती मिळाली त्यावरून ही टीप आतां येथें देण्यांत येत आहे. या शकांतील पत्रांक ३७ याचाही मला या कामीं उपयोग झाला आहे. या पांच पत्रांच्याखालीं त्यांचा इंग्रजी सारांश दिला आहे. त्यांत पत्रांतील मजकुराचा थोडक्यांत खुलासा केला आहे.

यांतील विचारणीय मुख्य गोष्टी खालीं दिल्या प्रों आहेत.

१ **कृष्णाजीतात्या जोशी** यांच्या मृत्यूचें साल.

२ पत्रांक नं. ५२, व ५३ यांचा निश्चित काल.

३ धर्मपुत्र व स्वबीजपुत्र **कृष्णाजी**च्या मुलांपैकीं कोण ?

४ **पेशवे** व **जोशी** कुलांचें हाडवैर होतें कीं काय ?

**जोशी** व **पेशवे** घराण्यांचा नात्याचा संबंध होताच. पण **जोशी** हे **पेशव्यांशीं** व **महाराजांशीं** मुख्य देवघेवीचा धंदा करीत. **बाबूजीनाना बारामतीकर** हे राजकारणांतही भाग घेत. **जोशांची** कारणापुरती वंशावळ खालीं देत आहे.

```
१ केळशीकर रुद्र जोशी
        |
२     केशव
        |
   -------------------------------------------
   |                    |                    |
३ सदाशिव            कृष्णरावतात्या          विश्वनाथ
   | =पार्वती          | =काकूबाई =रखमा
   --------------      ----------------------------
   |      |     |      |              |           |
४ बाबूजीनाना अबूराव गोविंद  नारायण      विश्वनाथ     जनार्दन
  =कमला (=भिऊबाई =राधा | ऊ. नानाजी    |   =उमा. अल्पवयी मृत्यु
 बाळाजी विश्वनाथांची मुलगी)  | =सगुणा      |           |
     ज. २३।५।१६९५     कृष्णरावतात्या    नारायण       बळवंत
५    मृ. ५।१०।१७७७                                  =सगाबाई
```

(१) पत्रांक ५२ हें पत्रांक ५३ पूर्वी घेतलें आहे. कारण हें श्री. **काकूबाईनें** स्वतः लिहिलें नाहीं. **विश्वनाथाकडून** लिहविलें आहे. या वेळीं **कृष्णाजी** नाना वारून वर्षसुद्धां झालें नसल्यानें ती स्वतः पत्र लिहिण्याचे स्थितींत नसावी व कदाचित्

**जनार्दन** फार लहान असावा. **विश्वनाथ**ही लहान होता व त्याची मुंजही झाली नव्हती. या वेळीं **नानाजी** **काशीस** नसावा.

**कृष्णाजीनाा** सन १७५० अखेर वारले असें धरलें तर हें पत्र सन १७५२ च्या श्रावणांतील धरावें लागेल. म्हणजे त्याची मिति श्रावण वद्य ५।१६७४ येईल. पत्रांक ५३ चें पत्र पुढें श्री. **काकूबाईनीं** स्वतः लवकरच लिहिलें असावें. त्यांत आपले दोनच पुत्र असें त्यांनीं म्हटलें आहे. यावरून **जनार्दन** लवकरच वारला असावा. कांहीं दिवस लोटल्यावर तिला **पंतप्रधान नानासो** यांस पत्र लिहिण्याची स्फूर्ति झाली असावी. **नारायण** व **विश्वनाथ** हे पुढें बरेच दिवस जिवंत असल्याचें इतर कागदांवरून म्हणतां येतें.

पत्र नं. ५४ व ५५ वरून **कृष्णाजीनाा** सपटेंबर १, १७४९ ला जिवंत होते व नं. ३७ वरून नवंबर १७, १७५० लाही होते हें स्पष्ट दिसून येतें. तेव्हां त्यांचा मृत्युकाळ सन १७५० नंतरचा धरावा लागणार आहे.

**कृष्णाजीनाा** फार धर्मशील व दानशूर होते. ते वारले, त्या सालीं खालील कृत्यें करण्यांत आलीं:—१ गायित्रीपुरश्चरण, २ सोमयाग, ३ श्रीकोटिहोम, ४ कैलासवासाच्या वेळचा धर्म-खर्च, ५ **विश्वनाथाचा** व्रतबंध, ६ वडिलांचें उत्तर कार्य, ७ संसार खर्च, ८ इमारती बांधणें. ह्यांस कमींत कमी रु. २५ हजार तरी खर्च झाला असावा.

पत्रांतील माहितीवरून मी **कृष्णाजीनाा** यांच्या मृत्युकालासंबंधीं जीं अनुमानें काढलीं आहेत तीं निश्चित करण्यास **सातारकर जोशी** यांच्या येथील पत्रें व जमाखर्च याशिवाय दुसरें साधन दिसत नाहीं. ते वारले, त्या सालीं केलेल्या कृत्यांची स्पष्ट नोंद जमाखर्चांतच असणार व तीं कृत्यें क्षुल्लक नसून, तीं पार पाडण्यास हजारों रु० खर्च झाले आहेत. ते **काशींत** वारले.

२. पत्र नं. ५२ व ५३ यांचा निश्चित कालही **कृष्णाजीनाइकांच्या** मृत्यूसंबंधीं अनुमानें काढण्यास जीं पत्रें आधारभूत घेतलीं आहेत, त्यावरून ठरणार आहे. म्हणून यासाठींही **सातारकर जोशांच्या** दफ्तराचा उपयोग केल्याखेरीज गत्यंतर नाहीं.

३. आतां पत्रांक ५३ मध्यें श्री. **काकूबाईनीं** माझा एक **धर्मपुत्र** व दुसरा **स्वबीजपुत्र** असें म्हटलें आहे. ती **पंतप्रधानांस**ही धर्मपुत्र म्हणते. व्यवहारांत धर्मपुत्र स्वबीजपुत्रापेक्षां कमी मानतात. **तिनें** कोणता **धर्मपुत्र** व कोणता **बीजपुत्र** हें पत्रांत दर्शविलें नाहीं. माझे पूर्वज **कृष्णरावतात्या वैद्य** यांनीं आपली मुलगी **सगाबाई** ही **विश्वनाथ कृष्ण** यांचा मुलगा **बळवंत** यास दिली होती. लग्न १४।५।१७८० रोजीं झालें. ती धर्मपुत्राच्या मुलास दिलेली नसावी. म्हणून **नारायण** ऊर्फ **नानाजी कृष्ण** हा धर्मपुत्र असावा. औरसपुत्राशिवाय जे मानलेले पुत्र ते धर्मपुत्र असें म्हणण्यास हरकत नाहीं. हीं पत्रें **नानासाहेब** यांच्या कार्कीर्दीतील आहेत.

४. **पेशवे व जोशी** घराण्यांचें हाडवैर होतें कीं काय ? हा प्रश्न जरी या पत्रांतून निघत नसला तरी असा आक्षेप घेणारांना यांतून चांगलें उत्तर मिळत आहे. मा० **काकूबाईनीं कृष्णरावतात्या** वारल्यावर **पंतप्रधान नानासाहेब** व **भाऊसाहेब** यांना जीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांवरून या घराण्यांचें परस्पर हाडवैर म्हणण्यापेक्षां विशेष प्रेम होतें असें म्हणावें लागेल. **कृष्णरावतात्यां**च्यामागें वार्षिक तनखा १० हजार होता तो **नानाजी**च्या अर्जावरून **पेशव्यांनीं** ११ हजार केला. **नानासाहेब** १७४० मध्यें **पेशवेपदावर** चढले, तेव्हां **बाबूजीनां** तें पद आपणास मिळावें म्हणून प्रयत्न करीत होते, यामुळें **पेशव्यांचें** व **जोशांचे** वांकडें आलें होतें असें सांगण्यांत येतें. पण यामुळें **बाबूजीं**चें व त्यांचें फार तर वांकडें येईल. त्यामुळें हाडवैर आलें होतें असें म्हणतां येणार नाहीं. या वेळीं **कृष्णाजी नाईक** जिवंत होते. **बाळाजी विश्वनाथ** यांची मुलगी **भिऊबाई बाबूजी**चा भाऊ **आबूराव** यास दिल्यामुळें दोन्ही घराण्यांचा फार प्रेमाचा अगोदरच संबंध आलेला होता. **बाबूजी पुण्यास** राहून **छत्रपतींना** व **पेशव्यांना** त्रास देत असे म्हणून त्यांस **पुण्यांतून** काढून **बारामतीस** घालविलें. पण त्यांस नामशेष न करतां राहण्यास जागा दिली व पैशाचीही तजवीज केली. हें हाडवैर कसें म्हणतां येईल ? **नानासो** यांची आजी **राधाबाई** इजला, **बाबूजी** पैशासाठीं उपास करीत आहेत म्हणून कळलें तेव्हां तिनें त्यांचा जीव वांचेल असें करण्याबद्दल अधिकाऱ्यांस कळविलें, हें प्रेम नव्हे काय ?

५. पत्रावरून सुचणाऱ्या कांहीं स्मरणीय गोष्टी :—

(१) वडील व मातोश्री यांच्या नांवाचा निर्देश करतांना त्यांच्या पूर्वी बहुमानार्थी 'तीर्थरूप' व इतर वडिलधाऱ्या माणसापूर्वी 'तीर्थस्वरूप' असे शब्द योजण्याचा प्रघात आहे. **बाबूजी व आबाजी ना० जोशी** यांच्या सपटेंबर १।१७४९ च्या **कृष्णाजीनां** या चुलत्यास लिहिलेल्या पत्रांत हा निर्बंध पाळलेला दिसत नाहीं. हा नियम उलंघिलेलीं पत्रें मधून मधून पाहण्यांत येतात. पितृतुल्य मानलेल्या संबंधी माणसांचे ठिकाणीं हें उल्लंघन केलें जात असेल असें वाटतें.

(२) **बाळकृष्ण दिक्षित पाटणकर** यांच्यावर **जोशी** घराण्याचा विशेष लोभ दिसतो असें पत्र नं. ५२ मधील श्री. **काकूबाईं**च्या उद्गारावरून दिसतें.

(३) पत्र नं. ५२ मध्यें **(सदाशिवराव) भाऊसाहेब** यांस **पंतप्रधान** म्हटलें आहे. ते जरी चुलत-बंधु होते तरी ते कर्तबगारींत व अधिकारांत **नानासाहेब** यांच्या तोडीचे होते. म्हणून त्यांस **पंतप्रधान** संबोधण्यांत गैर कांहींच म्हणतां येत नाहीं.

## शके १६७१ ते १६७७ च्या कागदांतील

# महत्त्वाच्या माणसांची सूची

नांवाच्या पुढें व्यक्तीची त्रोटक माहिती देऊन नंतर ज्या शकांत त्याचा उल्लेख आला आहे. तो कंसांत लिहून त्यांतील कागदांचा क्रमांक दिला आहे.


अक्काबाई (१६७७) ५६.

अग्निहोत्री (१६७६) ६०

अजबसिंग ऊर्फ माधेजी शंकर भोसले (हवालदार पांडवगड) (१६७४) ४१. (१६७५) २१.

अंताजी कृष्ण जोग (१६७३) ३, (१६७४) ७

अंताजी नारायण (१६७६) २८, ३१

अंतोजी पिलोजी परब (१६७७) २८

अंताजीराम मछे (मत्से) कऱ्हाडे (१६७२) १०

अंताजी विष्णु (दी बऱ्हाणजी मोहिते) (१६७५) ३३, ३४ (१६७६) ४२, ४४, ६०, ६१ (१६७७) ९

अंताजी शिवदेव मुतालिक (१६७४) ९

अंताजी हरी (१६७१) ३ (१६७६) ३७

अनंतभट द्रविड (वैद्यांचा नोकर) (१६७१) ४

सौ. अनुबाई रास्ते (बाळंभट वैद्याची मुलगी) (१६७५) १७, (१६७६) ७.

अंबरसिंग (१६७६) १०,

अंबाजी महाडिक (रघोजीचे नातलग) (१६७२) ४

अमृतराव खोपडे (१६७४) १६

अलिमहमद (१६७६) ३७

अलिवर्दीखान (बंगालचा नवाब) (१६७७) ३१,

अवधूत महाजनी (१६७७) २४,

आको गणेश (१६७७) ६०,

आंग्रे तुळाजी (सरखेल) (१६७४) १६ (१६७७) १२

आंग्रे मानाजी (वजारत माव) (१६७७) १५

आटोळे भवानजी (भोंसल्यांचा सरदार) (१६७९) २१

आठवले आबाजीपंत (१६७४) ४३

आठवले चिंमणाजी विश्वनाथ (१६७७) २८
आठवले बाळाजीपंत (१६७४) ४३
आनंदराव (१६७६) ६१
आनंदराम कासीद (१६७४) २९, ३५
आनंदराव खंडो (१६७७) ५७
आनंदराव चिटणीस (१६७३) ८
आनंदराव वाघ (१६७६) २; २८, ३४ (१६७७) ४, २१, ६०
आपा (१६७५) २
आपाजी दादाजी दामले (१६७६) २१
आपाजी नरहर जोशी (१६७५) २५
आपाजी मल्हार बरवे ( रामाजीचा भाऊ ) ( १६७३ ) १०
आपाजी भिवराव (१६७७) ९
आपाजी महादेव खांडेकर (१६७७) १३
आपाजी रघुनाथ (विठल शिवदेवाचा दिमत) (१६७३) १४
आपाजीराम गाडगीळ (१६७६) ९, ११, १२
आपाभट खरे शारंगपाणी (१६७६) १८, ५०, ६३
आबाजीपंत आठवले (१६७४) ४३
आबाजी जगन्नाथ (१६७७) २१
आबाजी नाईक जोशी बारामतीकर (बाबाजी नाईक याचा धाकटा भाऊ)
(१६७२) ५४, ५५, (१६७४) ४२, ४४
आबाजी नागेश (१६७६) ५१
आबाजी सुंदर ( मराठा ) ( १६७५ ) १३
आबूजीपंत (१६७६) २८
इंगळे सिदोजी (हवालदार राजगड) (१६७४) २, (१६७५) १०,
इंग्रज (१६७७) १३, १५
उदाजी पवार ( धारच्या संभाजीचा मुलगा व मानाजीचा चुलत भाऊ )
(१६७२) ४०
उमदी व्यंकाजी शामजी (१६७१) ५ ( १६७२ ) ४६
सौ. उमाबाई वैद्य ( विश्वनाथ भटाची स्त्री ) ( १६७२ ) २, ५,
( १६७३ ) ११, (१६७४) २४, (१६७५) १७ (१६७६)
१, ७, ६१ ( १६७७ ) ५३,
कटीराम बादयीलये ( १६७७) ५७,
कडु जीवनसा ( १६७६ ) २८, ३७

कडु मानसिंग (१६७६) ५७
कदम खंडोजी शेटे (१६७६) २
कदम सावाजी (१६७३) २२
कमळाबाई ठाकरीण (१६७२) ३२
करकरे (१६७३) ४, १६
करकरे मोरो नारायण (१६७७) ३५,
करकरे मोरो रामचंद्र (रामचंद्र गोपाळचा मुलगा) (१६७४) ३३, (१६७७) ३०, ३३
करकरे राघोबा नाईक (१६७६) १
करकरे रामचंद्र गोपाळ (वैद्यांचा कारभारी) (१६७२) २, ५, ३२, ४५, ५० (१६७३) ४, ८, १६, २० (१६७४) २, (१६७५) १६, ३३, ३४, ३९ (१६७६) ९, १०, ३८ ४२, ४४, ५६, ६२, ६३, (१६७७) २४, ३०, ३३, ३६, ४०, ६०
करंदीकर हरीपंत (१६७५) ३९
करमरकर शिवराम तुकदेव (वैद्याचा कारकून) (१६७२) २९ (१६७४) ३२ (१६७५) १५ (१६७७) ४१
कर्वे केशवभट (१६७५) ३८ (१६७७) ५
करांडे रघूजी (भोंसल्याचा सरदार) (१६७२) १८ (१६७३) ६ (१६७४) १३, १४, २६, २७, २८, (१६७६) २८, ३७, (१६७७) ५, २७, ३३
काकूबाई (कृष्णाजी नाईक जोशी सातारकर यांची पत्नी) (१६७२) ५३,
काटे ब्रह्माजी महादेव (१६७६) ५२,
काणे बगाजीपंत (कलकत्त्यास पाठविलेला रघूजीकडील) (१६७२) २७
काणे महादाजी कृष्ण (१६७५) २, ३३
काणे हरी कृष्ण (बावधनकर फडणीस) (१६७५) २ (१६७७) ३०,
कानडे केसो महादेव (१६७३) १३
कानिटकर बाजीपंत (१६७७) १३
कान्हो महादेव गद्रे (१६७६) २
कान्होजी शंकराजी (१६७४) २५, ३४
कान्होजी शिरके (१६७६) ५८
कासीद आनंदराम (१६७४) २२, ३५
कासीराव गणपत रास्ते (वाईकर) (१६७४) ८
कासीराव भास्कर कोल्हटकर (१६७२) १५, १९, २० ३१ (१६७३) २, २०

काशिनाथ भास्कर (१६७६) २
काळे (१६७७) ३८
काळे कृष्णंभट (१६७३) ४ (१६७४) २२ (१६७५) १८
काळ रामाजी नाईक (नागपूरचा सावकार) (१६७४) ७ (१६७५) ७,
३९ (१६७६) ४५ (१६७७) ४४, ४९
काळोजी जासूद (१६७३) ७ (१६७४) २९, ३४ (१६७६) ४४,
६० (१६७७) १४, ४९, ६०
कुडाळकर सावंत (१६७७) १५
कुरणें जिवाजी (कुसगांवकर) (१६७५) २३
कुसरे गदाधर भट (१६७६) ३३, ४५ (१६७७) ४४
कुसाजी केशव (१६७६) २८
कुसाजी चुंबळकर (१६७७) ३३
कुसाजी जामदार (१६७३) १९
कुसाजी जासूद (१६७४) ३३
कुसाजी येवले (१६७६) ४
कृष्णा (१६७६) ७
कृष्णाजी अनंत गद्रे लावगनकर (नारोपंताचा भाऊ) (१६७४) २२
(१६७५) १६ (१६७७) २८
कृष्णंभट काळे (काळेपहा)
कृष्णाजी गोविंद गोरे (वऱ्हाडचा सुभेदार) (१६७२) २७, ३४, ३५,
४३ (१६७४) ७, १२, २६, २७, ३६ (१६७६) ४०
कृष्णाजी गोविंद (१६७६) ५९. ६५
कृष्णाजी गोविंद गोरे (ताई कोल्हटकरणीचा कारभारी) (१६७३) ७, ८
(१६७५) ३, ३५
कृष्णाजी गोविंद गोरे (इंदलकर) (१६६६) २०, २१,
कृष्णाजी नाईक जोशी (सातारकर केशव रुद्र केळशीकर यांचे पुत्र)
(१६७२) ३७, ५२, ५३, ५४, ५५
कृष्णाजी ठाकूर (मोझरी तळेगांवकर) (१६७६) २
कृष्णाजी नाईक जिवाजी भावे (१६७६) १९, २७, ५० (१६७०) ३६,
कृष्णाजी तानदेव साठे (बुरंबाडकर) (१६७२) ४
कृष्णाजी त्र्यंबक लोहोकरे (रायगड किल्ल्यावरील अमलदार) (१६७१) १
(१६७२) ३०, ४८ (१६७३) १६ (१६७४) २, (१६७५) १०
कृष्णाजी नारायण पोंक्षे (१६७६) २९, ५९, ६५

कृष्णंभट पटवर्धन (१६७७) ५०
कृष्णाराम मोधी (१६७२) ४
कृष्णाजी मोरेश्वर (पेशव्यांचा बातमीदार) (१६७३) ७, (१६७५) ३, ३५ (१६७६) ५९
कृष्णंभट रायरेकर (१६७३) ३, (१६७७) ३१
कृष्णाजी नाईक रास्ते (१६७६) १९, ६१
कृष्णाजो वामन खरे (सावकार) (१६७२) १६, ४७,
कृष्णाजी हरी साठे (बाबुराव वैद्यांचा सासरा) (१६७७) ५३
केदारजी मोहिते (बऱ्हाणजीचा भाऊ) (१६७२) ५०
केसुजी हुद्दार (१६७७) १७
केसो आप्पाजी (१६७५) ३५
केशवभट कर्वे (१६७५) ३८ (१६७७) ५
केसो कृष्ण शेंबेकर (सावकार) (१६७२) ५० (१६७३) १४ (१६७४) १३, १४, २६, ४२, ४४ (१६७५) ३३ (१६७६) ५६ (१६७७) २०, २१, २३, २७, ३३
केसो गणेश (१६७७) ५३
केसो भैरव वैद्य (विश्वनाथभट वैद्यांचा जवळचा वयोवृद्ध चुलत भाऊ) (१६७१) १ (१६७३) ९, १०, १३ (१६७४) ४० (१६७५) ३९, ४० (१६७६) २७, (१६७७) १२, ३६
केसो महादेव कानडे (१६७३) १३
केरा राय (१६७६) ३७
केसोपंत वैद्य (१६७६) २७
केसो हरी सावरकर (वैद्यांचा कारकून) (१६७१) ३२, ३४ (१६७७) ३९
केसरकर (१६७६) २५
केळकर बाळाजी महादेव (१६७७) ३३
केळकर महादाजी रामचंद्र (१६७२) १५
कोकरे सुलतानजो (१६७२) १६
कोकाटे नारायणजी (मनमोहनगडचा किल्लेदार) (१६७२) ३९ (१६७३) १६
कोन्हेरपंत (१६७७) ६०
कोबडा जखापा (वैद्यांचा नोकर) (१६७२) ३१, ३४ (१६७४) ३ ५, (१६७५) ३, ३७
कोल्हटकर काशीराव भास्कर (काशीराव भास्कर पहा)

कोल्हटकर गणोबा नाईक (१६७४) २९
कोल्हटकर बापूजी विश्वनाथ (१६७६) २०
कोल्हटकर ताईबाई (भास्कर राम यांची पत्नी) (१६७२) १५. ३३, ३४,
कोल्हटकर रामचंद्र ऊर्फ बाबूराव कान्हेर (१६७७) २९, ३३
खंडोपंत (१६७२( ४०
खंडो केशव (१६६७) ५७
खंडोजी गोगवले (१६७१) ५ (१६७२) ९
खंडो गोविंद (१६७६) ५२
खंडोजी जाधवराव (सिंव खेडच्या बहादुरजीचा नातु व राघोजीचा पुत्र )
(१६७२) २२, २३ (१६७३) १९
खंडोजी भोसले (१६७६) २८
खंडो मल्हार (१६७२) ७
खंडो मल्हार तोरणेकर (१६७५) ३९
खंडोजी माणकर (१६७७) १५
खंडेराव बाबा कृष्ण मोहिते (१६७६) ५८
खंडोजीशेटे कदम (१६७६) २
खरे आप्पाभट शारंगपाणी (आपाभट पहा)
खरे कृष्णाजी वामन (कृष्णाजी पहा)
खरे गणेशभट (१६७७) ६०
खरे बापूभट शारंगपाणी (१६७६) १८, २६
खरे महादाजी केशव (१६७६) ४३
खरे शिवभट (१६७६) १८, २६, २७, ४५ ५० ६० (१६७७) ४४
खांडेकर आप्पाजी महादेव (आपाजी पहा)
खांडेकर गोविंदराम (१६७६) ६१
खाल्बाई (१६७६) ७
खेडकर धोंडजी (१६७७) २२
खोपडे अमृतराव (१६७४) १६
गंगाधरभट चिपळुणकर (१६७७) २५, ३३
गंगाधर नाईक वानवले (१६७२) ७
गंगाबाई वैद्य (बाळंभटाची स्त्री (१६७२) ५ (१६७४) २४
गणेश कृष्ण गद्रे (१६७६) १७
गणेश कृष्ण दामले (पेशव्यांचा बातमीदार) (१६७४) २९, ३९ (१६७५) ३७
गणोबा नाईक कोल्हटकर (कोल्हटकर पहा )

गणेशभट खरे (खरे पहा)
गणेश दत्ताजी (१६७६) २८, ३१
गणेश बल्लाळ दामले (पेशव्यांचा बातमीदार) (१६७५) १५
गणेश महादेव गद्रे (१६७६) २
गणेश मुकुंद (१६७५) ४
गणोबा नाईक रास्ते (१६७६) ११
गणेश संभाजी (१६७६) ६१
गदाधर भट कुसरे ( कुसरे पहा )
गद्रे कान्हो महादेव ( कान्हो पहा)
गद्रे कृष्णाजी अनंत (कृष्णाजी पहा )
गद्रे गणेश कृष्ण (गणेश पहा )
गद्रे गणेश महादेव ( गणेश पहा )
गद्रे गोपाळ अनंत ( नारो अनंताचा भाऊ लावगनकर ) ( १६७२ ) १८ १९, २७, ३१, ३२, ३४ ( १६७३ ) ७, १५, २०, ( १६७५ ) २
गद्रे नारो अनंत लावगनकर ( वैद्यांचा कारकून) ( १६७२ ) ७, १५, १७, २७, ३१, ३२, ३३, ३४, ४३, ( १६७३) ७, १५, २० ( १६७४ ) ३, ५, २२, २५, ३४ ( १६७५) ३, (१६७७ ) ३३, ३७, ३९
गद्रे बाबूराव नारायण (१६७६) १७
गद्रे विनायक अनंत (लावगनकर) (१६७२) २७
गाडगीळ आपाजी राम (आपाजी पहा)
गाडगीळ बाळंभट नारायण (१६७४) १
गाडगीळ राधाबाई (१६७७) ४२
गायकवाड (१६७६) ६५
गायकवाड दमाजी (१६७३) १७
गायकवाड बहीरजी (१६७६) ६४
गार्दीखान (१६७४) ९
गिरमाजी खंडेराव ( १६७६ ) ६५
गुजर सिधोजी (१६७३) ११
गुणाजी शिरके (१६७६) २४, २८, ४८
गोखले गोविंद अनंत (कर्जदार) (१६७५) १४ (१६७६) ६३
गोखले गोविंदपंत (१६७६) ५६

गोखले नारो अनंत (१६७५) ३७
गोगवले खंडोजी (खंडोजी पहा)
गोडबोले महादाजी आनंद (१६७५) २९
गोडसे भास्कर नाईक (१६७६) ६०
गोडसे राघोबा नाईक (सावकार) (१६७५) २९
गोडाजी यादव (१६७६) ४०
गोडाजीपंत (१६७७) ३३, ६०
गोदसेट वायकोल (१६७६) ५१
गोदशेट होनराव (१६७६) ४०, ४६, ४७
गोपजी पांचपांडे (१६७७) २१
गोपाळजी (१६७५) ५.
गोपाळ (१६७७) ३३, ३६, ५१
गोपाळ अनंत गद्रे (गद्रे पहा)
गोपाळ आनंदराव (१६७३) २२
गोपाळ नाईक भनगे (१६७५) ३४
गोपाळ महादेव (१६७२) १५
गोपाळ रघुनाथ (१६७७) ६०
गोपाळपंत लघाटे (१६७३) १४
गोपाळ विश्वनाथ (१६७६) ३५
गोपाळ शंकर (१६७२) ३०, ४८
गोपिकाबाई (१६७६) ७
गोपिकाबाई सचिव (१६७७) १०
गोरे कृष्णाजी गोविंद (कृष्णाजी पहा)
गोरे बाळाजीपंत (१६७६) २०, २१
गोविंदपंत (१६७७) ३५
गोविंद अनंत गोखले (गोखले पहा)
गोविंद कृष्ण (निंबाळकरांचा दिमत) (१६७४) ४३
गोविंद केशव (१६७६) ६
गोविंदपंत गोखले (गोखले पहा)
गोविंदराव चिटणीस (१६७७) ३६
गोविंदजी नाईक जोशी (बाबूजी नाईक जोश्याचा सर्वांत धाकटा भाऊ)
(१६७२) ५२, ५४, ५५
गोविंदभट दाते अग्निहोत्री (१६७५) २२ (१६७६) ६०

गोविंद [illegible] (१६७७) ३६
गोविंद न[illegible] (१६७६) २
गोविंद निमदेव (१६७६) ३६ (१६७७) ६०
गोविंद बल्लाळ तेरे देसाई (कोळसरे येथील) (१६७४) १७
गोविंदजी भोंसले (१६७६) ४१
गोविंदराम खांडेकर (खांडेकर पहा)
गोविंदभट लघाटे (१६७२) १०
गोविंदशेट वाईकोल (१६७४) ५
गोविंदराव शिरके (१६७६) ३७ (१६७७) २१
गोविंद सामराज (मावळचा सुभेदार वडगांवकर) (१६७२) ३० (१६७४) १९
गोविंदराव हरी (१६७५) ३२
गोसावी (१६७६) १५
गोसावी महंत गुलाबगीर (१६७२) १६
गोसावी बभूतगीर (१६७३) ६, १९, २२
गोसावी हंसपुरी (१६७५) ३, २६, २९, ३१, ३३, ३५ (१६७६) २, २८ ३६, ६५, (१६७७) ४६
घाटगे जानोजी (१६७७) ५०
घाणेकर सदाशिव रघुनाथ सावकार (१६७१) २ (१६७२) ७, ३०, (१६७३) १६ (१६७४) ४५ (१६७६) ८, ९, १०, ६१ (१६७७) ११, १६, १८, १९, २६, ३६, ५१
घारे रामाजी परशराम (१६७७) ३३
घाशीराम (१६७४) २६
घोरपडे नारायण व्यंकटेश जोशी (इचलकरंजीकर) (१६७३) १
चव्हाण (१६७३) १०
चव्हाण मानाजी (१६७७) ४७
चव्हाण रामजी (जासूद) (१६७२) २४ (१६७४) २३, २७ (१६७५) ३९ (१६७७) १८, ४२
चव्हाण संताजी (१६७६) ३७
चाफेकर हरीपंत (१६७६) ३८
चिटणिस आनंदराव (आनंदराव पहा)
चिटकोपंत (१६७६) ४९
चिंतामण केशव (१६७५) ३६

चितो विठ्ठल फडके (कारकून) (१६७४) १५
चिपळुणकर गंगाधरभट (गंगाधर पहा)
चिमणाजी नारायण पंतसचिव (१६७२) १२, १३, १४; ३०, ३८, ३९, ४१, ४५, ४८, ५१ (१६७४) ५, १९, ३५, ३७, ३८ ४६ (१६७५) १, ६, ९ (१६७६) ८, ९, १२, ५६, ६७ (१६७७) ६, ७, १०, ११, १६, १८, १९, ४०, ५२, ६१
चिमाजी विठ्ठल जोशी (१६७२) ३६
चिमणाजी विश्वनाथ आठवले ( आठवले पहा )
चिमणाजीपंत शेखदार (१६७४) ४३
चिमणा साव (१६७६) २९, ६५
चिरगुटे येसजी (कामावरील गर्दी) (१६७५) १५
चुंबळकर कुसाजी ( कुसाजी पहा )
छत्रपति ताराबाई (१६७२) ८, १२, २०, ३०, ३६, ४५ (१६७३) १८ (१६७४) ३, ९, ११, १३, ३०, ४१ (१६७६) ६१ (१६७७) ९, २९
छत्रपति रामराजे (१६७२) ८, १२, १४, २६, ३६, ४१, ५२ (१६७३) ११ (१६७४) ३, ९, ११, १३, ३०, ४१
छत्रपति शाहु (१६७१) २ (१६७२) २०
जखापा कोबडा ( कोबडा पहा )
जगजीवन परशुराम (१६७४) ६, ९, ४४, ४५
जगदाळा भिकाजी (१६७२) १२
जगोजी फुलाजी (१६७०) ४९
जनार्दन कृष्ण जोशी ( कृष्णाजी नाईक जोशी सातारकर यांचा मुलगा ) (१६७२) ५२
जनार्दनभट वैद्य (१६७७) ३८
जयराम भट (१६७५) २
जाचक नरोजी ( रघोजी जानोजीचा सरदार व सल्लादार ) (१६७४) ३२ (१६७५) २४
जाचक मानाजी (१६७६) २८
जाचक रखमाजी (१६७७) ३, ५७
जाधव धेमाजीपंत खंडेराव (१६७६) ९
जाधवराव खंडोजी ( खंडोजी पहा )
जाधव मल्हारजी (१६७२) १२

जाठ ( १६७६ ) ११
जानकीबाई वैद्य ( १६७६ ) ७
जानगवडा कारागिर ( १६७५) १६
जानमहमद ( १६७३) २० ( १६७४ ) ३४
जानीबावा ( भाई ) ( १६७६ ) ५, ६, ५९
जानो गिरमाजो ( १६७६ ) ५८
जानोजी घाटगे ( घाटगे पहा )
जानोजी जाळके ( १६७१) २
जानोजी निंबाळकर ( १६७२ ) ५०
जानोजी भोंसले ( १६७४ ) १५, ४६ ( १६७६ ) २२, ५३, (१६७७)
५, २०, २२, २३, २७, ३५, ३६, ३७, ४८, ४९, ५४
जामदार कुसाजी ( कुसाजी पहा )
जासूद काळोजी (काळोजी पहा )
जासूद दुलभाजी ( १६७४ ) १६
जासूद पुजाजी (१६७५) ३
जासूद भिवजी ( १६७७ ) ५१, ५८
जासूद शेखजी ( १६७२ ) ३३, ३४ ( १६७५ ) ५
जाळके जानोजी ( जानोजी पहा )
जाळके राघोजी ( १६७१ ) २
जिवनराम बावा मोहिते ( १६७६ ) २८
जिवराव बावसी ( १६७६) ३७
जिवनसा कडु (१६७६) २८, ३७
जिवाजीपंत (१६७६) ६०
जिवाजी कुरणें ( कुरणें पहा )
जिवाजी गोपाळ ( १६७६) ४७
जिवाजी जासूद ( १६७६) ६२ (१६७७) ६०
जिवाजी नरहर ( जाधवाचे कारकून ) ( १६७२ ) २३
जिवाजी पासकोजी परब (१६७७) २८, ३०
जिवाजी पाटील बोतरे (१६७४) १८
जिवराज मोहिते (रघोजीचे नातेवाईक ) (१६७४) ३५ (१६७६) ३६
जिवराव शिंदे (१६७२) ९
जेधे (१६७६) १०
जेधे दर्याजी नाईक ( भोर संस्थानांतील वतनदार देशमुख ) ( १६७४) १६

जेधे नागोजी नाईक देशमुख (१६७५) ७, १५,
जेधे नागोजीराव पाटणकर (१६७६) १४, १५,
जेधे नागोजी सरजाराव देशमुख (१६७७) ५२
जोग (१६७७) ६०
जोग अंताजी कृष्ण (अंताजी पहा)
जोग धोंडो अनंत (वैद्यांचा कारकून) (१६७४) ३२
जोग नारो बल्लाळ (१६७२) ५० (१६७४) ७, ३२ (१६७६) ६३
(१६७७) ११, २४
जोग बापूजी गणेश (१६७४) २२, २४
जोग विसाजी अनंत (धोंडो अनंताचा भाऊ) (१६७४) ३२ (१६७५) ३
जोग विसाजी बल्लाळ (१६७५) ३१
जोग हरी रघुनाथ (१६७४) २०
जोगळेकर धोंडोपंत (१६७३) ९
जोरकर सोनजी (१६७६) ९
जोशी आपाजी नरहर (आपाजी पहा)
जोशी आबाजी नाईक (आबाजी पहा)
जोशी कृष्णाजी नाईक (कृष्णाजी पहा)
जोशी गोविंदजी नाईक (गोविंदजी पहा)
जोशी चिमाजी विठ्ठल (चिमाजी पहा)
जोशी जनार्दन कृष्ण (जनार्दन पहा)
जोशी नानाजी कृष्ण (१६७१) ५ (१६७२) ५२, ५५ (१६७४) २९
जोशी परशुराम नाईक (१६७५) १६, २९
जोशी बापू (१६७७) ५६
जोशी बाबूजी नाईक (बाबूजी नाईक पहा)
जोशी भिऊबाई बल्लाळ (१६७६) १ (१६७७) ४२
जोशी मोर (१६७०) ५६
जोशी रामचंद्र (१६७६) ११
जोशी लक्ष्मण बल्लाळ (वैद्यांचा कारकून व नातेवाईक) (१६७२) ३६,
(१६७३) २० (१६७४) १६, २२ (१६७५) २२ (१६७६) ३८
(१६७७) १३, १५, १८, २४, ३०, ३३, ३६, ४०
जोशी विश्वनाथ कृष्ण (कृष्णाजी नाईक जोशी सातारकरांचा मुलगा)
(१६७२) ५२
जोशी हरबाजी नाईक (१६७३) १४

झुलाजी जगन्नाथ (भूगांवचा पाटील चिपडे देशमुख) (१६७२) ३१, ३२
टेंभेकर मानाजी (१६७४) २७
टेंभेकर रघुनाथ (१६७७) ५८
ठकार सदाशिव दीक्षित (१६७७) ९
ठकार सीदभट (१६७५) ५
ठाकरीण कमलाबाई (कमलाबाई पहा)
ठाकूर कृष्णाजी मोझरी तळेगांवकर (कृष्णाजी पहा)
डांबरे येसाजी (१६७२) ७
डिंगणकर तुकाराम (१६७७) २९
डुबल बाळोजी (१६७६) २५
ताईबाई कोल्हटकर (भास्करराम यांची पत्नी) (कोल्हटकर पहा)
तांबवेकर महादेव नाईक सावकार (१६७२) ६
तानशेट (१६७४) २४
ताराबाई छत्रपति (छत्रपति पहा)
तावरे संभाजी (१६७६) ५२
तुळजोराम भगवंत (रघोजीचा सरदार) (१६७३) ७ (१६७४) १५, २५
तुकोराम डिंगणकर (१६७७) २०
तुळाजी आंग्रे (आंग्रे पहा)
तुळाजी नाईक भोई भोकरे (१६७४) ४
तेरेदेसाई गोविंद बल्लाळ (गोविंद पहा)
तेरेदेसाई नारो अनंत (कोळीसरें येथील) (१६७४) १७
तोरणेकर खंडो मल्हार (खंडो पहा)
त्र्यंबकजी बावा (१६७७) ३१
त्र्यंबक कृष्ण (१६७६) ३४
त्र्यंबकराव मामा पेठे (सदाशिवरावभाऊचे सावत्र मामा) (१६७५) ३८, ३९
त्र्यंबक बाबाजी नाईक नातु (१६७४) २२
त्र्यंबक मोरेश्वर (१६७२) १२
त्र्यंबकजी राजे वावीकर भोंसले (१६७४) १३ (१६७६) २८, ३७, ६५, (१६७७) ५
थत्ते महादोबा नाईक (१६७१) ५
थोरात बाळाजी (१६७४) २४, ३९
थोरात विठ्ठल जिवाजी (१६७२) ७, ४४

दगडो त्र्यंबक (१६७४) ४
दत्ताजी शिंदे (१६७६) ३१
दत्ताजी सगे (१६७४) ८
दमाजी गायकवाड (गायकवाड पहा)
दयाजी नाईक (१६७५) ७
दये भुकणजी काशीदास (मारवाडी व्यापारी पेढीवर साक्षीदार) (१६७५) ३४
दर्याजी नाईक जेधे (भोर संस्थानांतील वतनदार) (जेधे पहा)
दरवे राघोबा नाईक (नांदीवडयाचा व्यापारी) (१६७५) १६
दातार बाळंभट (नांदीवडेकर) (१६७३) ४
दाते गोविंदभट (गोविंदभट पहा)
दाते सदाशिव भट (१६७६) १७
दादो बाबाजी (१६७६) २८
दादोपंत वाघ (१६७४) २१
दामले आपाजी दादाजी (आपाजी पहा)
दामले गणेश कृष्ण (गणेश पहा)
दामले गणेश बल्लाळ (गणेश पहा)
दामले धोंडु (नांदिवडे) (१६७४) २४
दामले महादाजी राम (सावकार) (१६७२) ३६ (१६७४) २९, ३९,
४४, ४५ (१६७५) १४, २८,
दामले मोरोपंत (१६७७) १३
दामले राघोबा नाईक (१६७७) १३
दामले विनाजी केशव (१६७४) ३३
दामाजी राम (१६७६) २८
दामोदर रघुनाथ वैशंपायन (त्रिचनापल्लीस गेलेल्या निळो रघुनाथाचा भाऊ)
(१६७२) ११
दिघे गोविंद नाईक (गोविंद पहा)
दिघे सटवोजी (१६७४) १८
दिनकरपंत (१६७७) ५०, ५१, ५३
दिनकर महादेव (ताराबाईचा कारभारी) (१६७४) ४३, ४५ (१६७५) ८
(१६७७) १५
दिनानाथजोपंत (१६७७) ३
दिनाजी जगन्नाथ (१६७७) ४६
दीपचंद आदले (१६७६) ३

दीक्षित (१६७६) ४५, ६० (१६७७) ३४
दीक्षित बापूभट (१६७३) १२
दीक्षित बाबूराव हरी (विनायक दीक्षितांचा संबंधी) (१६७४) २१ (१६७५) ८
दीक्षित विनायक (बाबूराव हरीचा संबंधी) (१६७२) ३७ (१६७५) ४०
दुलभाजी जासूद (जासूद पहा)
दुलभराम (१६७७) ५७
दुर्गोजी महाडिक (१६७६) १४
देवजी बल्लाळ (१६७६) ३७
देवजी शिरके (१६६५) ४
देवरुखे (१६७०) ३८
देवस्थळी बाबूराव गणेश (१६७६) २ (१६७७) २१
देवी कुणबीण (१६७५) २२
देशपांडे निळो विठ्ठल (१६७७) ४३
देशपांडे श्रीनिवास नारायण (१६७६) १४
देशपांडे हिराजी दिवाकर (१६७६) २
देशपांडे हैबतराव भवानीशंकर राजाज्ञा (१६७५) २३
द्रविड अनंतभट (वैद्यांचा नोकर) (अनंतभट पहा)
द्रविड श्रीनिवास व्यंकाजी (१६७१) ४
दिमत सदाशिव नाईक लिमये धनसिंग (१६७६) २०
धरणीधर मेहता (१६७७) ५७
धेमाजीपंत खंडेराव जाधव (जाधव पहा)
धोंडभट (१६०७) २५
धोंडो अनंत जोग (जोग पहा)
धोंडजी खेडकर (खेडकर पहा)
धोंडोपंत जोगळेकर (जोगळेकर पहा)
धोंडु दामले नानिवडेकर (दामले पहा)
धोंडोबा नाईक रास्ते (हरी विठ्ठलचे चिरंजीव) (१६७४) ८, १० (१६७५) २३
धोंडभट वैद्य (विश्वनाथ भटाचा पुतण्या) (१६७५) १७, १९ (१६७७) ३०
नबाब अमिरखान (१६७४) ३३
नबाब (१६७६) ३३
नरहरपंत (१६७२) ३२

नरहर बल्लाळ रिसबुड (१६७५) ३५ ( १६७६ ) ५५ ( १६७७ ) २१, ५९
नरसो गणेश (१६७६) ३४
नरसो भिकाजी ( १६७६ ) २८
नरसो मल्हार ( १६७५ ) ३८
नरोजी जाचक (बारभाटीचा किल्लेदार) ( जाचक पहा )
नर्मदाबाई (१६७७ ) ४२
नलंगे सटवोजी ( १६७४ ) ३२
नलवडे बयाजी ( १६७६) २
नाईकजी भोईटे ( १६७४) १६
नागोजी नाईक जेधे देशमुख ( जेधे पहा )
नागोजीराव पाटणकर जेधे (जेधे पहा)
नागोजी सर्जाराव जेधे ( जेधे पहा )
नातू त्र्यंबक बाबाजी ( त्र्यंबक पहा )
नामदार खान पनी ( १६७६) ५४
नानाजी कृष्ण जोशी ( जोशी पहा )
नाना उर्फ त्र्यंबक सदाशिव पुरंदरे ( १६७३) १७
नानासाहेब पेशवे ( १६७२ ) १२, १५, २३, २५, २८, २९, ३६, ३७, ४८, ५३ (१६७४ ) ३, ९, १२, १३, २९, ३१ ३३, ३९ ४५ (१६७५) ८, २१, २५, ३८, ३९, ४० ( १६७६) १४, ३८, ५७, ६१,
नारोपंत (१६७६) ६ (१६७७) ४९, ५७, ६०,
नारो अनंत गद्रे ( गद्रे पहा )
नारो अनंत गोखले (गोखले पहा )
नारो अनंत तेरेदेसाई ( तेरे देसाई पहा )
नारो कृष्ण ( १६७७ ) ४
नारायणजी कोकाटे ( कोकाटे पहा )
नारोजी नेगी ( १६७२ ) ३१, ३२ ( १६७६ ) ५२
नारो बल्लाळ जोग ( जोग पहा )
नारो महादेव पनलकर ( १६७७) ३५
नारो मुकुंद ( १६७६ ) ६५
नारो रघुनाथ (१६७४) ३५ (१६७६) २८, ३१
नारो विश्वनाथ (१६७६) ११

नारायणभट वैद्य (१६७४) २३, २४
नारायण व्यंकटेश जोशी घोरपडे (इचलकरंजीकर) (घोरपडे पहा)
नारो शिवदेव विंचुरकर (शाखा राजे बहादर) (१६७१) २
नारो शिवदेव (१६७४) ५
नारो हरी चिटणवीस (१६७२) १८
निजाम अलिखान (१६७४) २९
निजाम गाजिउद्दीन (१६७२) ३६, ४३
निंबाजी नाईक निंबाळकर सरलश्कर (१६७४) २१ (१६७७) ४७
निंबाळकर जानोजी (जानोजी पहा)
निंबाळकर निंबाजी नाईक (१६७४) २१ (१६७७) ४७
निंबाळकर महादाजी नाईक (१६७४) ४३, ४५
निंबाजीपंत मुजुमदार (१६७४) ४३
नेगी (१६७६) ५ (१६७७) ६०
नेगी नारोजी (नारोजी पहा)
निळोपंत (१६७७) ३१
निळो रघुनाथ वैशंपायन (त्रिचनापल्लीची बातमी कळविणारा) (१६७२) ११ (१६७४)३६
निळो विठ्ठल देशपांडे (देशपांडे पहा)
न्हरोजी जाचक (जाचक पहा)
पटवर्धन कृष्णंभट (कृष्णंभट पहा)
पटवर्धन बचंभट (१६७४) २४
पटवर्धन बाळकृष्ण भट (१६७७) २१
पटवर्धन भास्कर हरी (हरभटाचा वडील मुलगा) (१६७४) ४०
पटवर्धन महादेव भट (१६७२) ४६
पटवर्धन महादाजी गोपाळ (१६७७) १३
पटवर्धन रघुनाथ भट (झिंवरे पटवर्धन रघोजीचे सरदार व शिकनवीस) (१६७२) ३४ (१६७५) ५
पटवर्धन राघोबा नाईक (१६७४) २४
पटवर्धन राघो महादेव (१६७६) २०
पटवर्धन विनायक दीक्षित (१६७३) २१
पंत प्रतिनिधी (१६७२) ४२, ४३
पंत प्रतिनिधी जगजीवनराम परशुराम (जगजीवन पहा)
पंतप्रधान नानासाहेब (बाळाजी बाजीराव) (नानासाहेब पहा)

पंत राजाज्ञा भवानी शंकर मोरेश्वर ( १६७२ ) ३८ ( १६७३ ) ५
पंतसचिव चिमणाजी नारायण (चिमणाजी पहा)
पनलकर नारो महादेव (नारो पहा)
परभु गुजर (१६७६) ९
परशुराम नाईक जोशी (जोशी पहा)
परशुरामभट वैद्य (१६७७) ३८
परांडे (१६७३) ८
पवार उदाजी (उदाजी पहा)
पवार मानाजी (देवासच्या काळोजीचा मुलगा पाथेरकर) (१६७१) १
(१६७७) ४३
पवार सद्रू (१६७४) १६
पांचपांडे गोपजी (गोपजी पहा)
पाटणकर बाळकृष्ण दीक्षित (शेंदुर्णीकर) (१६७२) ५२ (१६७६)
२६, ३२, ३३ (१६७७) ३३, ४४
पाटणकर वासुदेव दीक्षित (१६७६) १८, २६, ३३
पांडे (१६७३) ७
पांडे महादाजी (१६७६) २
पांढरे हैबतराव (१६७२) ४
पिराजी बावर (वैद्यांचा नोकर) (१६७४) १८
पिलाजी शिंदे (१६७७) ६०
पिसाळ भगवंतराव (१६७४) ८ (१६७६) ३८
पिसाळ हैबतराव पाटील (१६७३) १७
पुजाजी जासूद ( जासूद पहा )
पुजाजी शंकर (१६७६) २८
पुरंदरे त्र्यंबक सदाशिव ऊर्फ नाना ( नाना पहा )
पुराणिक (१६७४) ९
पेठे त्र्यंबकराव मामा ( त्र्यंबकराव पहा )
पेशवे ( पंतप्रधान पहा )
पोतदार व्यंकाजी नाईक (१६७१) ५
पोतदार शंकराजी नाईक (१६७२) ३७
पोंक्षे कृष्णाजी नारायण ( कृष्णाजी पहा )
पोंक्षे महादाजी नारायण ( वैद्यांचा कारकून ) (१६७२) ३४ (१६७३)
६ (१६७४) १२, ४२, ४४ (१६७५) ३५, ३७ (१६७६) ४

प्रतापराव सिलिमकर ( सचीवाचा मानकरी ) (१६७२)
फकीर महंमद (१६७६) ३७
फगरे राघोपंत खंडकर (१६७२) ३
फडके चिंतो विठ्ठल ( चिंतो पहा )
फडके बाजी विठ्ठल (१६७४) ३२
फडणीस बावा (१६७५) ८
फडणिस विठ्ठल हरी (१६७७) ३९
फडणिस शिवाजी हरी (१६७७) ३९
फत्तेखान (१६७६) २८, ३१ (१६७७) ३, ५७
फाटक बापूजी दादाजी (१६७१) २ (१६७७) ११
फिरंगी (१६७० ) १५
फिरंगोजी पाटील बोतरे (१६७४) १८
बगाजीपंत (१६७६) १३, ६५
बगाजीपंत काणे ( काणे पहा )
बगूजी यादव (१६७६) ५९ (१६७७) १७
बचंभट पटवर्धन ( मारवजन ) ( पटवर्धन पहा )
बची कुणबीण (१६७५) ३९
बन्सीपुरी बावा गोसावी ( रघुजीचा सावकार ) (१६७२) १, ४, ६ (१६७३) ६, २२
बभूतगीर गोसावी (सावकार) (१६७३) १९
बयाजी नलवडे वाईकर (१६७६) २
बयाबाई जनार्दनपंत ( सचीवाची स्त्री, नारोशंकराची सून ) (१६७२) ३०
बरवे आपाजी मल्हार ( आपाजी पहा )
बरवे रामाजी मल्हार (१६७३) १० (१६७५) ३९
बऱ्हाणजी मोहिते (केदारजीचा भाऊ) (१६७२) ५० (१६७५) ३३, ३४, ३८ (१६७७) ५४
ब्रह्माजी महादेव काटे ( काटे पहा )
बहीरजी शिंदे (१६७६) ९
बहीरवभट बापट (१६७५) २९ (१६७६) ५६
बळवंतराव (१६७६) ६१
बागूल येसाजी (१६७६) ४७
बाजीराव अमात्य (१६७२) ४८
बाजीराव कानिटकर (कानिटकर पहा)

बाजी दामोदर (१६७२) २५
बाजी बावाजी (१६७६) ९
बाजी मल्हार (१६७३) १
बाजी मालसी मोरे (१६७६) ५२
बाजी मोहिते (१६७७) २१
बाजी विठ्ठल फडके (१६७४) ३२
बाजी विठ्ठल (१६७५) ३, ३८
बाजी हरी (१६७२) २६
बापट बहिरवभट (बहिरवभट पहा.)
बापट बाळाजीपंत (१६७३) १० (१६७५) ३९
बापू (१६७२) २०, ४८
बापाजी नाईक (१६७६) २१
बापूजी गणेश (१६७५) १३
बापूजी गणेश जोग (जोग पहा)
बापू जोशी (जोशी पहा)
बापूजी दादाजी फाटक (सदाशिव रघुनाथ घाणेकरांचा मुखत्यार) (फाटक पहा)
बापूभट दीक्षित (दीक्षित पहा)
बापूजी विश्वनाथ कोल्हटकर (कोल्हटकर पहा)
बापूभट वैद्य (लावगनकर तांदूळवाडीकर) (१६७२) ७, ८ (१६७३) ९, १३ (१६७४) १७
बापूभट खरे शारंगपाणी (खरे पहा)
बाबर पिराजी (वैद्यांचा वसूली नोकर) (पिराजी पहा)
बाबा फडणिस (१६७५) ८
बाबाशास्त्री (१६७४) २९
बाबूराव (१६७४) ७, २६ (१६७६) १० (१६७७) २७
बाबूराव कान्हेरे (१६७४) २९
बाबूराव गणेश देवस्थळी (देवस्थळी पहा)
बाबू गोपिनाथ (१६७३) १५ (१६७५) ५ (१६७६) ६२
बाबूजी नाईक जोशी (बारामतीकर) (१६७२) ४०, ५४, ५५, (१६७४) ४२, ४४
बाबूराव दत्तो महाशब्दे (१६७१) ७
बाबूराव नारायण गद्रे (गद्रे पहा)

बाबूजी नाईक भिडे (१६७६) ४४
बाबूराव मुजुमदार (१६७७) २१
बाबूराव मुरार (१६७६) २८, ३७
बाबूराव मोरेश्वर (१६७२) ४६
बाबूराव विश्वनाथ वैद्य (१६७४) १६ (१६७५) ११, १६, २९, ३१, ३२, ३३ (१६७६) ७, ४४, ५३, ५६, ६०, ६१, ६३ (१६७७) ११, १२, १४, २४, ३८, ४२, ५५, ६१
बाबूराव हरी दीक्षित (दीक्षित पहा)
बालु (१६७५) ११
बाळाजीपंत (१६७६) ४० (१६७७) ५०
बाळंभट (१६७७) ६०
बाळाजीपंत आठवले (आठवले पहा)
बाळाजी खोत (१६७७) २८
बाळाजीपंत गोरे इंदलकर (गोरे पहा)
बाळाजी चिमणाजी (१६७६) २
बाळाजी नाईक जिवाजी भावे (१६७६) १९, २७, ५० (१६७७) १२
बाळोजी डुबल (डुबल पहा)
बाळाजी बाजीराव पेशवे (नानासाहेब पहा)
बाळाजीपंत बापट (बापट पहा)
बाळाजी थोरात (थोरात पहा)
बाळाजी नारायण (१६७६) ३७
बाळंभट नारायण गाडगीळ (गाडगीळ पहा)
बाळंभट दातार (दातार पहा)
बाळकृष्णभट पटवर्धन (पटवर्धन पहा)
बाळकृष्ण दीक्षित पाटणकर शेंदुर्णीकर (पाटणकर पहा)
बाळाजी महादेव (१६७६) २
बाळाजी महादेव केळकर (केळकर पहा)
बाळंभट मामा (१६७२) ७ (१६७७) २९
बाळाजीराम (१६७६) ६
बाळाजी विश्वनाथ (१६७६) २८
बाळकृष्ण (वैद्य) (१६७६) ७
बाळंभट वैद्य (१६७२) २१, (१६७४) ९, १३ (१६७५) १, २, ३, ५, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १८, (१६७६) १५ ३५, (१६७७) ५२

बिबाजी वाजाळ (१६७६) ५९
बिबाजी भोंसले ( १६७७ ) २१, ५९ -
बिवलकर रामाजी महादेव ( १६७७ ) १३, १५
बुऱ्हाणशा राजे ( गोंड राजे ) ( देवगडचा गोंड राजा ) ( १६७२ ) ३१
( १६७४ ) २७ (१६७५) २८ ( १६७७ ) ६०
बोतरे जिवाजी पाटील ( जिवाजी पहा )
बोतरे फिरंगोजी पाटील (फिरंगोजी पहा)
भगवंतराव पिसाळ (पिसाळ पहा )
भनगे गोपाळ नाईक (गोपाळ पहा)
भवानजीपंत (१६७७) ६०
भवानजी आटोळे ( आटोळे पहा )
भवानीबाई ( चिमणाजी नारायण सचिव यांची पत्नी ) (१६७२) १३, १४
भवानीशंकर मोरश्वरपंत राजाज्ञा (१६७२) ३८ (१६७३) ५
भालचंद्रपंत (जाधवांचे कारकून) (१६७२) २२, २३
भावे कृष्णाजी जिवाजी ( कृष्णाजी पहा )
भावे बाळाजी नाईक जिवाजी ( बाळाजी पहा )
भावे माधव शिवदेव (१६७३) ८
भावे शिवाजी नारायण (१६७६) १९
भास्कर नाईक गोडसे ( गोडसे पहा )
भास्करभट वैद्य (१६७७) ३८
भास्कर हरी पटवर्धन ( पटवर्धन पहा )
भिऊबाई बल्लाळ जोशी ( जोशी पहा )
भिक पाटील ( १६७२ ) ३२
भिकाजी जगदाळा ( जगदाळा पहा )
भिकाजी बगदेव ( १६७६ ) १६
भिकाजी बल्लाळ वैद्य ( बाळंभट वैद्यांचा मुलगा ) (१६७४) २९, ४१
(१६७५) ११, १६, १७, २२, २९, ३१, ३२, ३३, ३४, ३५
(१६७६) ४४, ५३, ५६, ६०, ६३ (१६७७) ७, १०, ११
१२, २४, ६१
भिकाजी नाईक मराठे ( १६७६ ) १८, ४४
भिकाजी नाईक रास्ते (१६७१) १ ( १६७६ ) ६१
भिकाजी विठ्ठलभूत ( १६७६ ) २३
भिडे बाबूजी नाईक (बाबूजी पहा)

भिडे शंकराजी नाईक (१६७७) ११
भिडे सखाराम नाईक (१६७६) १८
भिवजी जासूद (जासूद पहा)
भूत भिकाजी विठ्ठल (भिकाजी पहा)
भोइटे नाईकजी (नाईकजी पहा)
भोकरे तुळाजी नाईक (तुळाजी पहा)
भोगले राघो बल्लाळ (रामटेकचा वैद्यांचा कारकून) (१६७२) २ (१६७३) १५ (१६७४) ३५, (१६७५) ५ (१६७६) २, ५, ६२,
भोरपकर (१६७२) ४८ (१६७३) १६
भोसले (१६७२) १, २ ४, ६, ९, १६, १९, २१, २७, ३१, ३२, ३३, ३४, ४१, ४३, ५०
भोसले अजबसिंग (अजबसिंग पहा)
भोंसले खंडोजी (खंडोजी पहा)
भोंसले गोविंदजी (गोविंदजी पहा)
भोंसले जानोजी (जानोजी पहा)
भोंसले त्र्यंबकजी राजे (त्र्यंबकजी पहा)
भोंसले बिंबाजी ( बिंबाजी पहा )
भोंसले मालोजी (१६७६) २
भोंसले मुधोजी ( सेना धुरंधर ) (१६७२) ४१, ५० (१६७४) २६, २७, ३१, (१६७५) ३८, (१६७६) २, ४१, ४३, ५३, (१६७७) ३६
भोंसले रघूजी (सेनासाहेब सुभा ) (१६७१) ५ (१६७२) १, ४, ६, ९, १६, १९, २१, २७, ३१, ३२, ३४, ४३, ५० (१६७३) २, ११, १७, (१६७४) १, ३, ९, ११, १३, १४, २०, २८, ३३ (१६७५) ३, ४, २१, २६, ३३ ( १६७६ ) २, ३, ५, २२ २४, २९, ३०, ३२, ३३, ३४, ४२, ४३, ५६, ६० ( १६७७ ) १, ९, २९, ४४, ४६, ४८, ५७,
भोंसले राणोजी ( रघूजीचा चुलता ) (१६७२) ४३ (१६७३) २, ११, १७ ( १६७६ ) २२
भोंसले रायाजी (रघुजीचा चुलत भाऊ) (१६७२ ) ४३, ( १६७७ ) ५९,
भोंसले सटवाजी (१६७६) २८, ३१
भोंसले संताजी (१६७२) ३३, ३४, ४३

भोसले साबाजी (१६७४) १ (१६७६) ३१
मत्से अंताजी (अंताजी पहा)
मजीदखान (१६७६) २८ (१६७७) २१
मनाजी टेंभेकर (टेंभेकर पहा)
मराठे भिकाजी नाईक (भिकाजी पहा)
मया (ला) राम (१६७५) ३८ (१६७६) ३७
मल्हारपंत (१६७२) ४०, (१६७५) २, ३८,
मल्हार आनंदराव (१६७२) ७
मल्हारजी जाधव (जाधव पहा)
मल्हार त्र्यंबक मसूरकर (१६७६) १४
मल्हार नाईक रास्ते (१६७६) ११, ६१
मल्हारजी होळकर (१६७४) ९
मसूरकर मल्हार त्र्यंबक (मल्हार पहा)
महंत गुलाबगीर गोसावी (गोसावी पहा)
महमदखान (१६७७) ३१
महमद मुझफूर (१६७५) २४
महाडिक अंबाजी (अंबाजी पहा)
महाडिक दुर्गोजी (दुर्गोजी पहा)
महाडिक रत्ना (१६७७) ३९
महादाजीपंत (१६७७) ३१
महादेव भट (१६७७) १०
महादाजी अनंत गोडबोले (गोडबोले पहा)
महादाजी कृष्ण काणे (काणे पहा)
महादाजी केशव खरे (खरे पहा)
महादाजी गोपाळ पटवर्धन (पटवर्धन पहा)
महादाजी जिवाजी साठे (अंबडयाचे देऊळ बांधणारा) (१६७२) ३०
(१६७४) ३८ (१६७५) १५
महादोबा नाईक दामले (दामले पहा)
महादाजी नारायण (१६७७) ३३
महादाजी नारायण पोंक्षे (पोंक्षे पहा)
महादाजी नाईक तांबवे (१६७२) (तांबवेकर पहा)
महादोबा नाईक थत्ते (थत्ते पहा)
महादाजी नाईक निंबाळकर (निंबाळकर पहा)

महादेवभट पटवर्धन (पटवर्धन पहा)
महादाजी पांडे (पांडे पहा)
महादाजी राम दामले (दामले पहा)
महादाजी रामचंद्र केळकर (केळकर पहा)
महादेव नाईक सहस्त्रबुद्धे (१६७४) २९
महाशब्दे बाबूराव दत्तो (बाबूराव पहा)
महिपतराव (१६७६) ३७
महिपती रघुनाथ वाघ (१६७४) १८
माणकर खंडोजी (खंडोजी पहा)
माणको सकदेव (१६७६) ५४
माधवराव पेशवे (१६७५) २५
माधवराव शिवदेव (१६७७) ३२
माधव शिवदेव भावे (भावे पहा)
माधोराव सोमनाथ (१६७५) ३८
मानकर रघुनाथ (१६७६) ५
मानसिंग कडू (१६७६) ५७
मानसिंग वाघ (१६७७) ६०
मानसिंग वांजाळ (१६७६) २८, २९
मानाजी आंग्रे (आंग्रे पहा)
मानाजी चव्हाण (चव्हाण पहा)
मानाजी जाचक (जाचक पहा)
मानाजी पवार (देवासच्या काळोजीचा मुलगा पाथरकर) (पवार पहा)
माने सदू (१६७४) ३, ५
मालोजी भोसले (भोसले पहा)
मासाल रंगाणा (१६७१) ५
मिरजा साले (१६७७) ३, ३१, ५७
मुकूंदपंत (१६७६) ५४
मुजूमदार निंबाजीपंत (निंबाजीपंत पहा)
मुतालिक अंताजी शिवदेव (अंताजी पहा)
मुतालिक यमाजी शिवदेव (१६७४) ९, ४२
मुधोजी भोंसले (भोसले पहा)
मुरादखान (१६७६) ३०
मुरारराव (१६७७) ५१

मोतीराम (१६७६) २८
मोरया (१६७५) ३२
मोराजी (१६७५) ११
मोरे बाजो मालसी (बाजी पहा)
मोरोपंत (१६७२) ३४ ४८, ५०
मोर जोशी (जोशी पहा)
मोरोपंत दामले . (दामले पहा)
मोरो नारायण (१६७६) ९
मोरो नारायण करकरे (करकरे पहा)
मोरो महादेव (१६७४) १२ (१६७६) ३५
मोरो रामचंद्र (१६७५) ३२
मोरो रामचंद्र करकरे (करकरे पहा)
मोहनसिंग (१६७६) २३
मोहिते केदारजी (केदारजी पहा)
मोहिते खंडेराव कृष्ण (खंडेराव पहा)
मोहिते जिवराज (जिवराज पहा)
मोहिते जिवनराम (जिवनराम पहा)
मोहिते बऱ्हाणजी (बऱ्हाणजी पहा)
मोहिते बाजी (बाजी पहा)
मोहिते यशवंतराव (१६७६) २
मोहिते रंभाजी (छत्रपतीचा नातलग) (१६७१) २
मोहिते शिवाजी (१६७२) ५०
मोहिते हणमंतराव (१६७६) २
यमाजीपंत शिवदेव (प्रतिनिधीचा मुतालिक) (१६७३) ८ (१६७४) ९, (१६७७) १२
यशवंतराव (१६७६) ६१
यशवंतराव गुलाब (१६७१) २
यशवंतराव मोहिते (मोहिते पहा)
यशवंतराव वाघ (१६७७) ६०
यशवंतराव वाबळे (कान्हाटीकर पाटील) (१६७२) १६
यादोजीपंत (१६७५) ५
यादव गोंडाजी (१६७६) ४०
यादव बगोजी (१६७६) ५९
यादो महादेव (१६७६) १६

यादो रघुनाथ (१६७६) २८
येशभट (१६७६) ४१
येशी कुणबीण (१६७६) ७
येसाजीपंत (१६७७) १२
येसजो चिरगुटे (चिरगुटे पहा)
येसाजी डोबरे (डोबरे पहा)
येसाजी बागुल (बागूल पहा)
येसूबाई (१६७२) ८ (१६७७) ५६
रखमाजी जाचक (जाचक पहा)
रंगाणा मासाल (मासाल पहा)
रंगोपंत (१६७६) १३, ६२
रंगो महादेव (वैद्यांचे कारकून) (१६७२) ४८ (१६७४) २९, ३५ (१६७७) ४९, ५८, ५९, ६०
राघोबा (१६७२) ३६
राघोबा नाईक (१६७६) २१, ६०
राघोपंत (१६७७) ३१, ४८
राघो आनंदराव वाघ (१६७७) ४३
राघोबा नाईक करकरे (करकरे पहा)
रघूजी करांडे (भोंसल्याचा सरदार) (करांडे पहा)
राघोबा नाईक गोडसे (गोडसे पहा)
राघोजी जाळके (जाळके पहा)
रघुनाथ टेंभेकर (टेंभेकर पहा)
राघोबा नाईक दरवे (नांदीवडेकर व्यापारी) (दरवे पहा)
राघोबा नाईक दामले (दामले पहा)
रघुनाथ भट झिंग्रे पटवर्धन (पटवर्धन पहा)
राघोबा नाईक पटवर्धन मारवजने (पटवर्धन पहा)
रघुनाथराव पेशवे (१६७६) ११
राघोपंत फगरे (फगरे पहा)
राघो बावाजी (१६७५) ३८
राघो बल्लाळ (१६७७) २१
राघो बल्लाळ भोगले (भोगले पहा)
रघूजी बावा भोसले (भोसले पहा)
राघो महादेव पटवर्धन (पटवर्धन पहा)

रघुनाथ मानकर ( मानकर पहा )
राघोपंत राजवाडे (१६७४) ४४, ४५ (१६७७) १५
रघूजी यशवंत (१६७६) २८
रत्नपारखी सावकार (१६७२) ४८ ( १६७६ ) ९
रत्ना महाडिक (महाडिक पहा)
रत्नाकर विठ्ठल ( सावकार सातारकर ) (१६७३) २
रत्नी (१६७६) ७
रंभाजी मोहिते ( मोहिते पहा )
राजवाडे (१६७६) ७
राजवाडे राघोपंत ( राघोपंत पहा )
राजवाडे सदाशिव रघुनाथ ( १६७२ ) ७
राणोजी भोंसले ( भोंसले पहा )
राधाबाई गाडगीळ ( गाडगीळ पहा )
रानडे ( १६७७ ) ३८
रामचंद्र (१६७२) २७
रामचंद्रपंत गोपाळ करकरे ( वैद्यांचा कारभारी ) ( करकरे पहा )
रामचंद्रपंत ( १६७५ ) २९ ( १६७६ ) ६० ( १६७७ ) ११, १२
रामाजी (१६७७) ३१
रामाजी नाईक ( १६७६ ) ६५
रामाजी नाईक काळे ( काळे पहा )
रामाजी कृष्ण शेंबेकर (१६७५) ३३
रामचंद्र कोन्हेर ( १६७५ ) ३२
रामचंद्र ऊर्फ बाबूराव कोन्हेर कोल्हटकर (कोल्हटकर पहा )
रामाजी गिरवर ( वैद्यांचा देणेकरी ) ( १६७२ ) १८, १९, ३३, ३४
(१६७३) ७ (१६७५) ३
रामजी चव्हाण (चव्हाण पहा)
रामराजे छत्रपति ( छत्रपति पहा )
रामचंद्र जोशी ( जोशी पहा )
रामाजी दामोदर ( १६७२ ) १६
रामाजी परशुराम घारे ( घारे पहा )
रामाजी मल्हार बरवे (भोसल्यांचा सावकार) (बरवे पहा)
रामाजी मल्हार (१६७६) २८
रामाजी महादेव बिवलकर ( बिवलकर पहा )

रामाजी यादव फौजदार (१६७७) १६
रामभट वैद्य (बाळंभटाचा मुलगा) (१६७४) १६ (१६७५) ११, १६, २९, ३१, ३२, ३३, ३४, ३५ (१६७६) ७, ४४, ५३ ५६, ६० (१६७७) १२, १४, ३८
रामचंद्र शिवदेव दिमत शिवाजी नारायण (१६७२) १६
रामाजी सदाशिव (१६७६) ३७
रामचंद्रपंत सरदेशमुख (१६७७) ६०
रायरकर कृष्णंभट (कृष्णंभट पहा)
रायाजी भोंसले (रघुजीचा चुलत भाऊ) (भोंसले पहा)
रास्ते (१६७२) ४८ (१६७६) ७, २७, ३८, ६१
रास्ते अनुबाई (अनुबाई पहा)
रास्ते काशीराम (गणपतरावाचा मुलगा) (काशीराव पहा)
रास्ते कृष्णाजी नाईक (कृष्णाजी पहा)
रास्ते गणोबा नाईक (गणोबा पहा)
रास्ते धोंडोबा नाईक (हरबाचा पुत्र) (धोंडोबा पहा)
रास्ते भिकाजी नाईक (भिकाजी पहा)
रास्ते मल्हार नाईक (मल्हार पहा)
रास्ते विठोबा नाईक (हरबाचा पुत्र) (१६७४) ८, १०
रिसबुड नरहर बल्लाळ (नरहर पहा)
रुद्राजीपंत (१६७६) २८
लघाटे गोपाळपंत (गोपाळपंत पहा)
लघाटे गोविंदभट (गोविंदभट पहा)
लक्ष्मणपंत (१६७७) ६, ११, १२, ५०
लक्ष्मण कृष्ण (१६७४) १३, १४
लक्ष्मण कृष्ण शेंबेकर (१६७५) १४
लक्ष्मण बल्लाळ जोशी (जोशी पहा)
लक्ष्मण वैद्य (१६७६) ७
लक्ष्मण शिंपी (१६७६) २०
लक्ष्मण सोनार (१६७७) ५५
लक्ष्मीबाई नारो सचिव (१६७७) ७, १०
लालाई तांबोळीण (१६७२) ४
लिमये सदाशिव नाईक (१६७१) ४, (१६७२) २, (१६७५) ३४
लोहोकरे कृष्णाजी त्र्यंबक (कृष्णाजी पहा)

वडगांवकर गोविंद सामराज (गोविंद पहा)
वरवडेकर (१६७६) ६०
वाकडे विठोबा नाईक (१६७५) ४
वाघ आनंदराव (आनंदराव पहा)
वाघ दादोपंत (दादोपंत पहा)
वाघ महिमती रघुनाथ (महिपती पहा)
वाघ मानसिंग (मानसिंग पहा)
वाघ यशवंतराव (यशवंतराव पहा)
वाघ राघो आनंदराव (राघो पहा)
वाघमारे सटवोजी (१६७६) २०
वांजाळ बिबाजी (बिबाजी पहा)
वांजाळ मानसिंग (मानसिंग पहा)
वाबळे यशवंतराव (यशवंतराव पहा)
वायकोल गोविंदशेट (गोविंदशेट)
वायकोल गोंदशेट (गोंदशेट पहा)
वासुदेव दीक्षित पाटणकर (पाटणकर पहा)
वासुदेव मोरेश्वर (१६७६) ४९
विंचुरकर नारो शिवदेव (नारो पहा)
विठ्ठलपंत (१६७६) ३७
विठ्ठल जिवाजी थोरात (थोरात पहा)
विठ्ठल जिवाजी (१६७४) ५ (१६७६) १
विठोबानाईक रास्ते (हरीविठ्ठलचे चिरंजीव) (रास्ते पहा)
विठोबा नाईक वाकडे (वाकडे पहा)
विठ्ठलराव शिवदेव (१६७३) १४
विठ्ठल हरी फडणिस (फडणिस पहा)
विनायक अनंत गद्रे (लावगणकर) (गद्रे पहा)
विनाजी केशव दामले (दामले पहा)
विनायक दीक्षित (दीक्षित पहा)
विनायक दीक्षित पटवर्धन (पटवर्धन पहा)
विसाजी अनंत जोग (जोग पहा)
विश्वनाथ कृष्ण जोशी (जोशी पहा)
विसाजीपंत खासनिस (१६७२) ४
विसाजी गोविंद (१६७४) १५

विसाजी बल्लाळ जोग (जोग पहा )
विश्वनाथ रघुनाथ वैद्य (१६७२) १०, २५, ( १६७४ ) ३, ५, १२, १३, १४, १५, १६, १८, १९, २०, २१, २४, २५, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४३, ४४, ४५, (१६७५) १, २, ३, ५, ६, ७, १०, ११, १३, १४, १५, १६, १८, १९, २०, २१, २२, २५, २६, २७, २९, ३०, ३२, ३३, ३४, ३६, ३७, ३९, (१६७६) २, ३, ४, ५. ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १८, १९, २०, २१, २२, २३, २५, २६, २७, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३८, ४०, ४१, ४३, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५८, ५९, ६०, ६२, ६४, ६५ (१६७७) ४, १६, १८, २२, ३६, ३७, ४०, ४२, ४४,
विश्वनाथभट (१६७६) ३५
विश्वनाथ व्यंकटेश (१६७७) ६०
विसोबा नाईक सहस्त्रबुद्धे ( १६७४ ) २९
विष्णू (१६७६) १७
विष्णाजीपंत ( १६७६ ) ३७
व्यंकाजी केशव ( १६७६ ) २८
व्यंकाजी शामजी उमदी ( उमदी पहा )
वेलणकर सदाशिवभट (१६७७) १३
वैद्य उमाबाई ( उमाबाई पहा )
वैद्य केसो भैरव ( केसो पहा )
वैद्य गंगाबाई ( गंगाबाई पहा )
वैद्य जनार्दनपंत भट ( जनार्दन पहा )
वैद्य जानकीबाई ( जानकीबाई पहा )
वैद्य धोंडभट ( धोंडभट पहा )
वैद्य नारायणभट ( नारायणभट पहा )
वैद्य परशरामभट ( परशरामभट पहा )
वैद्य बापूभट ( बापूभट पहा )
वैद्य बाबूराव विश्वनाथ ( बाबूराव पहा )
वैद्य बाळकृष्ण ( बाळकृष्ण पहा )
वैद्य बाळंभट ( बाळंभट पहा )
वैद्य भास्करभट ( भास्करभट पहा )

वैद्य भिकाजी बल्लाळ ( भिकाजी पहा )
वैद्य रामभट ( रामभट पहा )
वैद्य लक्ष्मण ( लक्ष्मण पहा )
वैद्य विश्वनाथभट ( विश्वनाथभट पहा )
वैद्य सखूबाई ( भास्करभट वैद्यांची स्त्री ) (१६७३) ४, १३ (१६७४) २४, ४६ (१६७७) ४२
वैद्य सदाशिवभट (१६७७) ३०
वैद्य सरस्वतीबाई ( बाळंभटाची स्त्री ) ( १६७२ ) २ ( १६७३ ) १३ (१६७५) १७ ( १६७६ ) १, ७
वैशंपायन दामोदर रघुनाथ ( दामोदर पहा )
वैशंपायन निळो रघुनाथ ( निळो पहा )
व्यंकाजी नाईक ( १६७४ ) ७
व्यंकटराव गंगाधर हणमंते (१६७७) ४५
व्यंकाजी नाईक पोतदार (पोतदार पहा )
व्यंकाजी शामजी उमदी ( उमदी पहा )
शंकराचार्य करवीर ( १६७१ ) २
शंकराजीपंत (१६७०) ६०
शंकराजी कान्हो (वैद्यांचा भुगांव इनाम गांवचा वसुली कारकून) (१६७२) ३२, (१६७४) २५, ३४ (१६७५) २,
शंकराजी गोविंद (१६७५) २
शंकराजी चिटणिस (१६७७) २१
शंकराजी नाईक पोतदार दिमत पेशवे नानासाहेब ( पोतदार पहा )
शंकराजी नाईक भिडे ( भिडे पहा )
शंकराजी वामन (१६७६) २
शंकराजी वासुदेव (१६७७) ४६
शामजी तुकदेव ( १६७६ ) ४८
शामजी फुलाजी ( १६७४ ) ७, २९, ३५, (१६७६) १३, २९, ५९, ६५, ( १६७७ ) ४९, ६०
शामदजंग (१६७७) ५७
शायदी जमान ( १६७६ ) ३०
शाहू छत्रपति (छत्रपति पहा )
शिंदे जिवराव ( जिवराव पहा )
शिंदे दत्ताजी ( दत्ताजी पहा )

शिंदे पिलाजी (पिलाजी पहा)
शिंदे बहिरजी (बहिरजी पहा)
शिंदे सटवाजी (१६७६) २८, ३५
शिंदे संताजी (१६७२) ४५
शिंपी (१६७६) १३
शिरके (१६७०) २९
शिरके कान्होजी (कान्होजी पहा)
शिरके गुणाजी (गुणाजी पहा)
शिरके गोविंदराव (गोविंदराव पहा)
शिरके देवजी (देवजी पहा)
शिरगिरे बाबा (१६७५) २
शिवभट (१६७६) ६५
शिवभट खरे (खरे पहा)
शिवभट साठे (ओरिसाचा सुभेदार) (१६७४) ४, ८, १७, ३५ (१६७५) ३, २८, ३६ (१६७६) ३२, ३३, ३९, ४५, ४६ (१६७७) १, ३, २१, ३१, ३३, ४४, ४६, ४८, ४९, ५७, ५९, ६०
शिवरामपंत (१६७२) ४५
शिवराम तुकदेव (१६७२) २९, (१६७७) ४७
शिवराम तुकदेव करमरकर (करमरकर पहा)
शिवराम गदाधर (१६७२) २९
शिवाजीपंत (१६७४) १२
शिवाजी केशव (१६७६) ६५
शिवाजी दादाजी (१६७२) ३४, (१६७५) ३, ३५ (१६७६) ६५
शिवाजी नारायण (१६७२) १६
शिवाजी नारायण भावे (भावे पहा)
शिवाजी भिकाजी (१६७०) २, ५
शिवाजी मोहिते (मोहिते पहा)
शिवाजी हरी फडणीस (फडणीस पहा)
शिवापा (१६७२) ३४
शेखजी जासूद (जासूद पहा)
शेखदार चिमणाजीपंत (चिमणाजीपंत पहा)
शेख नसरुल्ला (भोरमधील महिपतगडचा किल्लेदार) (१६७२) ५१

शेख हुसेन (१६७२) १४ (१६७६) ३०
शेंबेकर केसो कृष्ण (केसो पहा)
शेंबेकर रामाजी कृष्ण (सावकार) (रामाजी पहा)
श्रीनागनाथ (१६७६) १०
श्रीनिवास नारायण देशपांडे (देशपांडे पहा)
श्रीनिवास व्यंकाजी द्रविड (द्रविड पहा)
सखो गणेश (१६७७) ६०
सखाराम नाईक भिडे (भिडे पहा)
सखूबाई भास्कर वैद्य (वैद्य पहा)
सगशहा (१६७६) ६२
सगे दत्ताजी (दत्ताजी पहा)
सचिव चिमणाजी नारायण (चिमणाजी पहा)
सटवोजी (१६७७) ३८
सटवोजी दिघे (दिघे पहा)
सटवोजी नलगे (नलगे पहा)
सटवाजी भोंसले (भोसले पहा)
सटवाजी वाघमारे (वाघमारे पहा)
सटवाजी शिंदे (शिंदे पहा)
संताजी चव्हाण (चव्हाण पहा)
संताजी शिंदे (शिंदे पहा)
संताजी भोंसले (भोंसले पहा)
सदाशिवपंत (रघुजीचा वकील) (१६७२) १८ (१६७५) ३८
सदाशिव गोपाळ (१६७३) ६
सदाशिव दीक्षित ठकार (ठकार पहा)
सदाशिवभट दाते (दाते पहा)
सदु पवार (पवार पहा)
सदाशिवराव भाऊ पेशवे (१६७२) २६, ५२ (१६७५) ३८ (१६७६) १०, ११
सदु माने जासूद (माने पहा)
सदाशिव रघुनाथ (१६७७) १५
सदाशिव रघुनाथ घाणेकर (घाणेकर पहा)
सदाशिव रघुनाथ राजवाडे (राजवाडे पहा)
सदाशिव नाईक लिमये (लिमये पहा)

सदाशिव विश्वनाथ सहस्त्रबुद्धे (१६७७) ३३
सदाशिवभट वेलणकर (वेलणकर पहा)
सदाशिवभट वैद्य (वैद्य पहा)
सदाशिव नाईक सहस्त्रबुद्धे (१६७४) २९.
सदाशिव हरी (मुधोजीचा दिवाण) (१६७२) ३३, ३४ (१६७४) ७, २६ (१६७७) २०, २१.
सद्रुद्दिखान (१६७७) ३१
संभाजी तावरे (तावरे पहा)
संभू (१६७६) ३७
समशेर बहाद्दर (१६७७) १५
सरस्वतीबाई वैद्य (वैद्य पहा)
सहस्त्रबुद्धे महादेव नाईक (महादेव पहा)
सहस्त्रबुद्धे विसोबा नाईक (विसोबा पहा)
सहस्त्रबुद्धे सदाशिव नाईक (सदाशिव पहा)
सहस्त्रबुद्धे सदाशिव विश्वनाथ (सदाशिव पहा)
साठे कृष्णाजी ज्ञानदेव (कृष्णाजी पहा)
साठे कृष्णाजी हरी (कृष्णाजी पहा)
साठे महादाजी जिवाजी (महादाजी पहा)
साठे शिवभट (शिवभट पहा)
सादुल्लाखान (१६७७) ४८, ४९, ५७
साबाजी कदम (कदम पहा)
साबाजी भोंसले (रघुजीचा पुत्र) (भोंसले पहा)
सावंत कुडाळकर (कुडाळकर पहा)
सावरकर केसो हरी (केसो पहा)
सीती (१६७६) ७
सीदी मुरदजहान (१६७७) ५७
सींदोजी इंगळे (इंगळे पहा)
सीधोजी गुजर (गुजर पहा)
सीधभट ठकार (ठकार पहा)
सीलीमकर प्रतापराव (प्रतापराव पहा)
सुजातखान (१६७६) ६४
सुदामशेटी (१६७५) ३८
सुभानजी (१६७६) २५
सुलतानजी कोकरे (कोकरे पहा)
सेनापति (१६७२) ४०
सोनजी जोरकर (जोरकर पहा)

सोनजी पाटील (१६७३) १७
सोमवंशी हैबतराव (१६७७) ४३
स्वरूपसिंग (१६७०) २१
स्वरूपजी प्रतापजी (१६७६) १४
हणमंतराव मोहिते (मोहिते पहा)
हणमंते व्यंकटराव गंगाधर (व्यंकटराव पहा)
हत्तीवाला (१६७६) ९
हरबाजी नाईक (१६७२) ४०
हरबाजी नाईक जोशी (जोशी पहा)
हरबाजी नारायण (१६७६) २८
हरीपंत (१६७६) ६५
हरीपंत करंदीकर (करंदीकर पहा)
हरी कृष्ण काणे (काणे पहा)
हरीपंत चाफेकर (चाफेकर पहा)
हरीपंत दादा (१६७७) ६०
हरी दामोदर (पेशव्यांचा माणूस) (१६७५) ३८
हरी बल्लाळ (१६७७) २९
हरी रघुनाथ जोग (भोंसल्यांचा सल्लागार) (जोग पहा)
हंसपुरी बाबा गोसावी (गोसावी पहा)
हिराजी दिवाकर देशपांडे (देशपांडे पहा)
हुसेनखान (१६७६) २८
हैबतराव पांढरे (पांढरे पहा)
हैबतराव पिसाळ पाटील (पिसाळ पहा)
हैबतराव भवानीशंकर देशपांडे राजाज्ञा (देशपांडे पहा)
हैबतराव सोमवंशी (सोमवंशी पहा)
होनाजी राम (१६७५) ९
होळकर मल्हारजी (मल्हारजी पहा)
इनाम, सनदापत्रे, आज्ञापत्रें, कर्जखते, पावत्या, करार, हुकूम (१६७२) १७, २०, २५, २६, ४२ (१६७३) १, २, ५, २२ (१६७४) ६, ४३ (१६७७) ४१, ४७
हिशोब, याद्या, खतावण्या, जमाखर्च (१६७४) ७, १७, २१, २२ (१६७६) १, २, ७, २८, ३६, ३७, ६१, ६५
खाजगी, घरगुती (१६७४) २३, २४, ४०
वैद्यांचें मुक्काम (१६७२) २४, २९
माहिती (१६७२) ५, ६, १०, १५, ४४, ४९
दस्तक (१६७५) २७

## शके १६७१ ते १६७७ च्या कागदांतील

# स्थल सूची

ही देतांना नांवाच्या पुढें ज्या सालांत त्याचा उल्लेख आला आहे तें कंसांत लिहून त्यांतील कागदाचा क्रमांक दिला आहे.


अकोट (वऱ्हाड) (१६७४) २६, २८ (१६७७) २३, २७

अकोला (१६७७) २५, ३३

अंजनवेल (१६७७) १५

अटपाली (जि. सातारा) (१६७२( २९

अबागड (१६७७) ५७

अब्रावती (१६७६) २८

अमरावती (वऱ्हाड) (१६७२) १, (१६७३) ७, (१६७४) ३१, (१६७६) २८

अरोली (वऱ्हाड) (१६७५) ५

अरोली तुमान (१६७६) ६२

अलजपूर (एलिचपूर वऱ्हाड) (१६७३) ६

अहमदनगर (१६७७) ३६

आकोलें (वऱ्हाड) (१६७२) ३४, ५० (१६७३) ६

आंजणडोह (वऱ्हाड) (१६७४) ४३

आजी (१६७७) ६०

आटोली (१६७६) २८

आबागड (१६७६) २८, ३१

आबोली (१६७६) ३७

आलजपूर (१६७५) ३

आष्टी आमनेर (वऱ्हाड) (१६७२) ३४

इंदापूर (१६७७) ६

इसापूर (वऱ्हाड) (१६७४) २५, ३४ (१६७६) २९

उंदेरी (हैद्राबाद) (१६६४) २५, ३४ (१६७६) ३

उंबारडी (१६७६) २

उमरखेड (वऱ्हाड) (१६७७) २

उमरावती भवानीची (१६७६) ५३

उंब्रज (ता, कऱ्हाड) (१६७४) ६

एलिचपूर (१६७२) १८, १९, ३३, ३४

औरंगाबाद (हैद्राबाद) (१६७४) ३३, (१६७६) २६, ३३, ४४, ६०, ६१ (१६७७) १

कटक (१६७७) ३, ४८, ५७

कठोर (बरवे यांचे इनाम) (१६७५) ३९

कडेगांव (ता. कराड जि. सातारा) (१७७२) २७ (१६७४) ४५

कनकदुर्ग (१६७७) १२, १५

करडेकलेवलित (प्रा। करडे) (१६७५) ६ (१६७७) ६, ४२

करनाटक (१६७६) ६१

कऱ्हाड (जि. सातारा) (१६७४) २१

कऱ्हाटेश्वर (कोंकण) (१६७३) ४

कलापरी (१६७६) २८

कलाकदरी बोरगांव (१६७६) ३०

कलबुरगें (१६७०) ५९

कवडी (१६७५) ३९

कळंबेश्वर (१६७६) २ (१६७७) १७

काटवळ (१६७६) २८

कारगांव (१६७६) २८. ३७

कारंजे (वऱ्हाड) (१६७५) २९, ३२, ३३, ३४

काऱ्हाटी (ता. बारामती) (१६७२) २५, २६, (१६७४) १८ २१, ३२ (१६७५) १६ (१६७६) ६१ (१६७७) ४१, ४०

काशी (१६७२) ५२, ५४ (१६७३) ३ (१६७६) ५०, ६०, ६१

कुऱ्हें (१६७६) ४

कुसगांव (ता. वाई) (१६७५) २३

कुही (१६७६) २८, ३७, ५१

केसोरी (१६७२) ३२

केळवद (१६७६) ५, २८

कोंकण (१६७६) १७, ३८, ६१ (१६७७) १५

कोंडाली (१६७४) २९ (१६७६) ५ (१६७७) ७

कोठूर (१६७५) ६

कोळें (जि. सातारा) (१६७२) ४७

कोळें (सं. भोर) (१६७२) ५२ (१६७६) ४

खारेपाटणची गढी (१६७७) १५

खीरपूर ( १६७० ) ३३
खोडद ( ता. कराड ) ( १३७२ ) २६, ४२ ( ११७४ ) २१
( १६७६ ) २५, ३८
गया ( १६७७ ) ५७
गाविलगड ( १६७६ ) ५३
गिरड पातीखान (१३७६) २८
गुंजण मावळ ( तर्फ भोर ) ( १६७१ ) ६, (१६७४) २ (१६७५) १०
गुमथळे ( १६७७ ) २१
गोकाक (१६७६) ६१
गोंडापूर ( निजाम ) ( १६७२ ) २३
गोडेगवडी ( १६७५ ) ५
गोपाळगड ( कोंकण ) ( १६७२ ) ४४
गोवरी ( १६७७ ) ६०
गोवा ( १६७७ ) १२. १५
चंद्रकोना ( प्रा। बरद्वान ) ( १६७३ ) ३
चंद्रपूर ( वऱ्हाड ) ( १६७३ ) १५ ( १६७४ ) १५ ( १६७५ ) ३८
(१६७६ ) २९ (१६७७ ) २१, ६०
चहरापूर ( १६७२ ) ४६
चांदा (वऱ्हाड ) (१६७२) ३१, ३२, ३४ (१६७४) २५ (१६७६) २९
(१६७७) ४९
चिमनासाब ( १६७६ ) १६
चिमूर (१६७६ ) २८, ३७
चोपडद (ता. बारामती ) (१६७२ ) २५, २६ ( १६७६ ) ५७
चोरे (सं. औन्ध ) (१६७४) ६ (१६७६) ४१
छत्तिसगड ( १६७६ ) ६
जयगड (ता. रत्नागिरी ) (१६७२ ) ४४
जादे (१६७६ ) ५९
जांबळी ( सं. भोर ) (१६७४) २ ( १६७५ ) १, १०
जामगड ( १६७६ ) ३४
जालनापूर ( हैदराबाद ) ( १६७४ ) ३७ ( १६७६ ) ८, ९, ६१
(१६७७ ) ६
जेजुरी ( जि. पुणें ) ( १६७२ ) २४, ४० ( १६७० ) ३७
झरी ( १६७२ ) २९

टाकळी ( १६७६ ) ५९ ( १६७७ ) ३३
टेंकाडी ( वऱ्हाड ) ( १६७२ ) ३१, ३२ ( १६७४ ) ३४ ( १६७५ ) ५
( १६७६ ) ६२
टोकें ( १६७२ ) २
ठाणेंगांव ( १६७६ ) २८
डीग ( १६७४ ) १५
डुमरी चिखलें ( वऱ्हाड ) ( १६७४ ) १ ( ( १६७५ ) ५
डोंगरमोदे ( १६७६ ) २८, ३१, ३७
ढेकानाल ( १६७७ ) ५७
तळेगांव ( १६७७ ) २२
तळें घोसाळें ( १६७६ ) १७
तारगांव ( ता. कऱ्हाड ) ( १६७२ ) ४२ ( १६७४ ) २१
तारणें ( १६७६ ) २८
तिवरी ( १६७७ ) २८
तुमान ( वऱ्हाड ) ( १६७५ ) ५
तुळजापूर ( ता. सोलापूर ) ( १६७२ ) ४३
त्र्यंबकेश्वर ( ता. नाशीक ) ( १६७५ ) ३८ ( १६७६ ) ११, ६१, ६३
थेऊर ( जि. पुणें ) ( १६७४ ) ९
दहीगांव ( १६७४ ) ४३
दहीयाडें ( वऱ्हाड ) ( १६७३ ) ६
दिल्ली ( १६७६ ) १०
देवगड ( वऱ्हाड ) ( १६७४ ) १, ३४ ( १६७६ ) २, ६, २८, ५९
( १६७७ ) २१
देवर ( जि. सातारा ) ( १६७३ ) २
देहू ( जि. पुणे ) ( १६७२ ) २४
द्वारका ( ११७७ ) ४२
धांदलें ( १६७६ ) ३७
धापलें ( १६७६ ) २८
धार ( संस्थान ) ( १६७४ ) १३
धावडी ( ता. वाई ) ( १६७४ ) ५
धोम ( ता. वाई ) ( १६७४ ) १९
नंदरघन ( १६७६ ) २८, ३१
नरवण ( ता. रत्नागिरी ) ( १६७५ ) १६ ( १६७७ ) २८, ३०

नरवेल (वऱ्हाड) (१६७४) १२

नागपूर (मध्य प्रदेश) (१६७२) १८, ३१, ३३, ४३ (१६७३) ७ (१६७४) ५, १४, १५, २५, २७, २९, ३१, ३४, ३५ (१६७५) २, ३, ५, ३३,. (१६७६) ६, ७, ३३, ३९, ५३, ४६, ६० (१६७७) ८, २०, २२, ३१, ३३, ३९, ४०, ४४, ४६. ४८, ४९, ५७, ६०

नागभीड (१६७६) २८, ३७

नातेंपुते (१६७४) ४३

नांदगांव पेठ (वऱ्हाड) (१६७२) ३४ (१६७३) ६ (१६७६) २

नांदगांव काजी (वऱ्हाड) (१६७५) ३

नांदिवडें (१६७७) ३८, ४०

नाशिक (१६७५) ३८, (१६७६) ११, ६१

निघोज (१६७६) ९

निर्मल (हैद्राबाद) (१६७५) २

नीरा (नदी) १३७४ १६

नेरी (१६७६) ३७

नेरें (भोर) (१६७१) ३

पटणा (१६७७) ३१

पट्टण (वऱ्हाड) (१६७५) ५८

पंढरपूर (क्षेत्र) (१६७२) २९

पणज (वऱ्हाड) (१६७४) १३, १४, २६

पयोष्णि नदी (वऱ्हाड) (१६७५) ३८

परळी (ता. सातारा) (१६७२) ६ (१६७४) ९

पवनी (१६७६) २

पाटण सांगवी (१६७६) २८

पांडवगड (ता. वाई) (१६७४) ४१ (१६७५) २१

पांडुरणें (१६७६) २८

पातुर (वऱ्हाड) (१६७२) ३५, (१६७३) २० (१६७५) ३

पारगांव मालुचें (ता. बारामती) (१६७४) १८

पारशिगे (१६७६) २८

पारशिवनी (१६७६) २८, ३७

पालगड (१६७७) १२, १५

पाली (ता. सातारा) (१६७२) ४७, (१६७६) १४

पिंपरी ( १६७२ ) २
पिंपर्रे (१६७२) २४
पिपळी ( १६७७) ५७
पुणें (जिल्हा) ( १६७१ ) १ (१६७२) ८, १३, १४, २१, २३, २४, २७, ४५, ५०, (१६७३) १०, १३, १६, (१६७४) ३, १३, १६ २६, २९, ३३, ३९, ४३, (१६७५ ) ११, १५, २२, ३१, ३८, ३९ (१६७६ ) १०, ११, ३८, ५०, ६०, ६३ ६४, (१६७७ ) ११, १५, २५, ३३, ३५, ३७, ४० ४७, ५१, ५३,
पूर्णगड (१६७७ ) १५
पेठ ( १६७० ) ५८
पेठखार्पे ( १६७६ ) २८
पेडवणी ( १६७६) २८
पैठण (हैदराबाद ) ( १६७५ ) १७, (१६७६ ) ३ (१६७७) ३५
फत्तेदुर्ग (१६७७) १२, १५
बंगाल ( इलाखा ) ( १६७४ ) ३४, ३५, ( १६७५) ७, ३८, (१६७६) ३२, ३९, ४४, ४५, (१६७७ ) १, ४४, ४८, ४९, ५९,
बरद्वान (बंगाल) (१६७३) ३
बद्रीकेदार (१६७६ ) ५०
बागलकोट (१६७७) ५१
बाणकोट ( १६७७) १२, १५
बादलें (१६७७) ५७
बाराभाटी (१६७७ ) ५७
बावधन ( ता. वाई ) ( १६७२ ) २६ ( १६७३ ) १७, १८ ( १६७४ ) २१ (१६७६) ३८
बालापूर ( वऱ्हाड ) (१६७२) ३४ ( १६७३ ) ६ ( १६७७ ) ३३
बीड आंबड ( १६७४ ) ३७ ( १६७६ ) ८, ९, ६१ ( १६७७ ) ६
बिदनूर ( १६७६ ) ३५
बिरवाडी ( १६७६ ) ६४
बुध ( ता. सातारा ) ( १६७५ ) ४
बेलापूर ( ता. नगर ) ( १६७५ ) ८, ४०
बेळगांव शहापूर ( १६७६ ) ६१
बोधन ( १६७५ ) ४
बोरगांव ( वऱ्हाड ) ( १६७३ ) ७ ( १६७६ ) २८

बोरी ( १६७६ ) २८, ३७ ( १६७७ ) ३९

ब्रह्मपुरी ( १६७६ ) २८

भागपूर ( १६७६ ) २८

भागानगर ( हैद्राबाद ) ( १७७४ ) २९

भातगांव ( कोंकण ) ( १६७२ ) २६ ( १६७४ ) १६

भातोडी ( १६७७ ) ३२

भालकी ( १६७४ ) ३३

भिवगड (१६७६) २८

भिवपूर ( १६७६ ) ३७

भिसी (१६७६) २८, ३७

भूगांव तर्फ ( वऱ्हाड ) (प्रांत नागपूर ) (१६७२) १७, ३१, ३२, ३३,
(१४७३ ) २० ( १६७४) २५, ३४ ( १६७५ ) ५ (१६७६) २८

भोर ( संस्थान) ( १६७३ ) ८ ( १६७५ ) ६ (१६७६) १०, ६१
(१६७७) ६, १५, ५२

भोवरगड किल्ला ( १६७६) २९

मकसुदाबाद (१६७६) ३३, ४५, ( १६७७) ३१, ५७

मंडणगड (१६७७) १२, १५,

मनमोहनगड (सं. भोर ) (१६७२ ) ३९ ५१

मलकापूर (वऱ्हाड ) (१६७४) १२ (१६७५) ३८ ( १६७७ ) १५

मबाड (वऱ्हाड) (१६७२ ) ३४ (१६७४) ३४

महागांव ( वऱ्हाड ) (१६७४) १३, १४

महाबळेश्वर ( ता. वाई) (१६७२) ६

माहुर (वऱ्हाड) ( १६७५) ३३

महुरी (१६७४) २ (१६७५ ) १०

मारुड (१६७६) २८

मालेगांव ( १६७६) २८

मावडी ( ता. बारामती ) (१६७२ ) २५, २६, ( १६७६ ) ५७

मावळ ( महाराष्ट्र ) ( १६७२ ) ४८ ( १६७६ ) ९ ( १६७७ ) ६

माहूर ( १६७५ ) ३३ ( १६७६ ) ३

माहुली ( १६७२ ) २४

माळवा ( १६७४ ) ९

मिरज ( १६७४) १६

मूलतापी ( १६७४ ) ३१ ( १६७७ ) ४९

मोभार ( १६७७ ) ३८

मोहरी बुद्रुक ( भोर ) ( १६७१ ) ६ ( १६७२ ) ३६ ( १६७३ ) १६

म्हसांग ( वऱ्हाड ) ( १६७२ ) ३४, ( १६७३ ) ७

म्हैसरें ( १६७६ ) २८

रतनपूर घमदे ( कौसलदेश ) ( १६७२ ) १६

रत्नागिरी ( १६७६ ) १७ ( १६७७ ) १३, १५

रसाळगड ( १६७७ ) १५

राजगड ( किल्ला ) ( भोर ) (१६७१) १ (१६७३) १६ (१६७४) २ (१६७५) १, १०

रामटेक ( ता. देवगड वऱ्हाड ) ( १६७२ ) २, ३१, ३२ ( १६७४ ) १, २९, ३४, ३५ ( १६७५ ) ५ ( १७७६ ) ५, २३, ६२, ( १६७७ ) २१, ६७

रामक्षेत्र (रामटेक) ( १६७३ ) १५

रामपायरी दामो ( १६७६ ) २८, ३१

राहारगांव ( वऱ्हाड ) ( १६७२ ) १८, ३४ ( १६७३ ) ७ ( १६७४ ) ३४ ( १६७५ ) २, ३, ( १६७६ ) २

रील ( १६७७ ) २८, ३०

रोहिडखोरें (सं. भोर ) (१६७२) १४

लाखनवाडा ( वऱ्हाड ) ( १६७२ ) ३४ ( १६७४ ) १२ ( १६७७) ३३

लावगन (ता. रत्नागिरी ) (१६७५ ) १९ (१६७७ ) ३८

लोणी (ता. बारामती ) ( १६७२ ) २४

वडगांव (जयराम स्वामीचें ता. सातारा ) ( १६७२ ) २९

वडनेर बी बी ( १६७६) ५५ (१६७७) ३३

वणशिरपूर ( १६७६) २९

वण ( १६७७) ४९

वरवडे ( ता. रत्नागिरी) ( १६७५) १६ ( १६७७ ) २८

वऱ्हाड ( प्रांत ) (१६७२) २७, ३४, ४३, (१६७४) १३, २६ २९, ३२, ३५, ४२, ४४, ( १६७५ ) ५, २९, ३२, ३३, ३४, ३८ (१६७६) २, ४, २२, ५९, (१६७७) २, २२, ४९, ५९, ६०

वाई (जि. सातारा) (१६७२) २०, २६, ४८, ( १६७३ ) ५, १८ ( १६७४ ) ७, १६, १९, २९, ३०, ४२, ( १६७५ ) १५, १८, २३, ३५, ( १६७६ ) २, १०, ११, ५६, ६० ६१, ६४, ( १६७७ ) १२, १५, २४, ३६, ४२, ४८, ५४, ५६

वाकी (ता. बारामती ) (१६७२) २५, २६, ( १६७६ ) ५०

वाजरा संगम (१६७७) ५९
वाराणशी - (१६७६) ३३, ४५ (१६७७) ३१, ४४
विचित्रगड ( सं. भोर ) (१६७२) १४ (१६७४) ३७
विजयदुर्ग ( कोंकण ) (१६७२) ४४ (१६७७) १३
विरली (१६७६) २८, ३७
विसापूर (१६७२) ३२
वैरागड (१६७६) २८
वोडसा (१६७७) ५७
व्याहाड ( वऱ्हाड ) (१६७४) २७
शिरवळ ( सं. भोर ) (१६७२) १४ (१६७५) ९ (१६७६
९ (१६७७) १६
शिवणी छपरा (१६७६) २८, (१६७७) ३१
शिवापुर ( सं. भोर ) (१६७५) १२
श्रीअवध ( सं. औन्ध ) (१६७५) ४
श्रीरंगपट्टण (.१६६६) ३५
सरंद (१६७७) १३
साखर खेडले (१६७७) २९
सागर (१६७६) १३
सांगवी (१६७६) २१
सांगोले ( नगर ) (१६७२) २६, २९, ४८
सातारा ( महाराष्ट्र ) (१६७१) ६ (१६७२) ७, ८, १३, २९
३०, ४३, ४५, ४८, ५५ (१६७३) १; ३, १७ (१६७४)
९, १३, १४, ४२, ४५ (१६७६) ३, ५, ७, ९, १५,
३८, ३४, ६१, ६३ (१६७७) १५, २४, ५१
सावंगी (१६७६) ३४
सावनेर (१६७६) २८
सिंहगड ( जि. पुणें ) (१६७२) १४
सीताबर्डी ( वऱ्हाड ) (१६७४) २९
सुपें (ता बारामती) (१६७२) २५, ४५, ४८ (१६७४) १८, २१
(१६७५) ६, १५ (१६७६) ९, ५७ (१६७७) ६,
४१, ४७
सुरंगी अंजनगांव (वऱ्हाड) (१६७४) २६ (१६७७) २७
सुवर्णदुर्ग (१६७६) १७ (१६७७) १२, १५

सैतवडें ( कोंकण ) (१६७४) १७
सोनगांव (१६७६) ३८
हस्तिनापूर (१६७६) ११
हळदगांव (१६७६) २८, ३०
हासूल (१६७६) २८
हिंगणे (१६७६) ११, २८